# ‘‘चिन्मय जगत मासिक : एक राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास (१९१० ते १९६८)’’


टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
इतिहास विभाग


नेहरु सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक
श्वेता ज्ञानेश्वर सावले

मार्गदर्शक
डॉ. स्वाती काळभोर
असोसिएट प्रोफेसर,
श्रीमती सी. के. गोयल महाविद्यालय
दापोडी, पुणे



फेब्रुवारी २०१९

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्वेता ज्ञानेश्वर सावले यांनी, ''**चित्रमय जगत मासिक : एक राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास (१९१० ते १९६८)**'' या विषयातील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमुद केलेली माहिती व संशोधनात्मक विधानेही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : पुणे **डॉ. स्वाती काळभोर**

दिनांक :/ /२०१९ संशोधन मार्गदर्शक

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करते की, ''**चित्रमय जगत मासिक : एक राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास (१९१० ते १९६८)**'' हा प्रबंध मी डॉ. स्वाती काळभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेला आहे. या लिखाणासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन साधनांचा योग्य तो श्रेयनिर्देश प्रबंधात केलेला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. (इतिहास) पदवीकरिता प्रस्तुत प्रबंध विद्यापीठास सादर करण्यात येत आहे. हा शोध–प्रबंध इतर कोणत्याही पदवी किंवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : पुणे — **श्वेता ज्ञानेश्वर सावले**

दिनांक :   /   /२०१९ — संशोधक

# ऋणनिर्देश

’चित्रमय जगत मासिक : एक राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अभ्यास (१९१० ते १९६८)’ या विषयावर पीएच.डी. प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. या संशोधनाचे फलित या निमित्ताने टिळक महाराष्ट्र विद्यापीठास संकलित रूपाने सादर होत आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी जरी मी अथक प्रयत्न आणि परिश्रम घेतले असले तरी ते सार्थकी लावण्याचे श्रेय माझ्या मार्गदर्शक डॉ. स्वाती काळभोर मॅडम यांना देणे ही मी माझे कर्तव्य समजते. त्यांच्या सहकार्य आणि मार्गदर्शनाशिवाय हा प्रबंध मी पूर्ण करू शकले नसते. या शिवाय टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहास विभागप्रमुख डॉ. नलिनी वाघमारे यांचे सहकार्य मी अत्यंत मोलाचे मानते. तसेच याच विभागातील डॉ. स्वराली कुलकर्णी यांचेही वेळोवेळी मला मार्गदर्शन लाभले. त्यांच्या कायम ऋणात राहणे मी अगत्याचे मानते. इतिहासातील संशोधनाच्या वाटा चालण्यास मी ज्यांच्यामुळे शिकले ते माझे प्रेरणास्थान प्रा. डॉ. राजा दीक्षित यांचे प्रोत्साहन संशोधन कार्यामध्ये लाभले.

याशिवाय ज्यांच्या प्रेरणेने मी या क्षेत्राकडे वळले आणि मला या प्रबंधासाठी अनेक महत्त्वपूर्ण साधनांची माहिती दिली त्या माझ्या एम. फिल. च्या मार्गदर्शिका प्रा. डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांच्या कायम ऋणात राहणे मला आनंददायी वाटते. तसेच इतिहासाच्या अभ्यासात मी ज्यांच्यामुळे आकर्षित झाले, त्या माझ्या महाविद्यालयीन प्राध्यापिका आणि मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड येथील इतिहास विभागप्रमुख प्रा. सौ. श्रृती भातखंडे यांचे मी मनापासून आभार व्यक्त करते. तसेच माझ्या संशोधनाची वेळोवेळी चौकशी करुन मला संशोधन कार्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. डॉ. ज्योती गगनग्रास, तसेच संशोधनासाठी सहकारी प्राध्यापकांना सतत प्रोत्साहन देणारे माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय खरात यांचे मी मनापासून आभार व्यक्त करते. तसेच माझ्या मैत्रिणी व सहकारी प्राध्यापिका डॉ. प्रिया गोहाड व डॉ. मिनाक्षी तिवारी यांचेही मला मोलाचे सहकार्य लाभले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे व मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे येथील व्हिजीटर डॉ. प्रकाश दीक्षित यांनी महाविद्यालयातील प्राध्यापकांना संशोधनासाठी वेळोवेळी प्रोत्साहन दिले त्यांचेही मनापासून आभार व्यक्त करते. मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर येथील इतिहास विभागप्रमुख व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. देविदास वायदंडे यांचेही मी आभार मानते.

तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागप्रमुख डॉ. राधिका सेशन, डॉ. दिपक गायकवाड, प्रा. बाबासाहेब दुधभाते, डॉ. श्रद्धा कुंभोजकर यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

याशिवाय महाराष्ट्रातील अनेक नामवंत ग्रंथालयांनी संदर्भ साधने उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाचे सहकार्य केले. त्यामध्ये पुणे मराठी ग्रंथालय, मुंबई मराठी ग्रंथालय, मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, फर्गुसन महाविद्यालयाचे ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय यांनी वेळोवेळी मला अत्यंत आधारभूत व महत्त्वाचे ग्रंथ उपलब्ध करून दिले. तसेच पुणे मराठी ग्रंथालयाने मला चित्रमय जगतचे सर्व अंक उपलब्ध करुन दिले त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे. तसेच या संशोधन प्रबंधासाठी अनेक प्राध्यापक मित्र–मैत्रिणींचे मार्गदर्शन मला वेळोवेळी लाभले त्यांचेही ऋण मी व्यक्त करते.

या प्रबंधाच्या परिपूर्णतेसाठी ज्यांचे विशेष सहकार्य लाभले व ज्यांच्या सहकार्याशिवाय मी हे संशोधनपूर्ण करु शकले नसते ते माझे पती डॉ. उत्तम गोरड, माझी मुलगी रुही तसेच माझे आईवडील व भाऊ कुलदीपक तसेच माझे सासुसासरे यांच्या प्रेरणेशिवाय हे कार्य मी पूर्ण करु शकले नसते. या प्रबंधाचे डी.टी.पी. वेळेत व अचूक पूर्ण करुन देणाऱ्या सौ. पुष्पा बुळे मॅडम यांचेही आभार व्यक्त करते.

ठिकाण : पुणे **श्वेता ज्ञानेश्वर सावले**

दिनांक : / /२०१९

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | ऋणनिर्देश | |
| १. | विषयप्रवेश | १–२२ |
| २. | चित्रमय जगतचे स्वरूप | २३–५३ |
| ३. | चित्रमय जगत मासिकामधील राजकीय लेखन | ५४–१२९ |
| ४. | चित्रमय जगतमधील सामाजिक लेखन | १३०–२१७ |
| ५. | चित्रमय जगतमधील सांस्कृतिक लेखन | २१८–२७२ |
| ६. | उपसंहार | २७३–२९१ |
| | • निवडक संदर्भग्रंथ सूची | २९२–२९५ |
| | • परिशिष्ठे | २९६–३०२ |

## प्रकरण–१

# विषयप्रवेश

१. भारतीय प्रबोधन

१.१ भारतीय नियतकालिकांचा उदय (१९ वे शतक)

१.२ २० व्या शतकातील भारतीय नियतकालिके

१.३ ऐतिहासिक संशोधन पद्धती

१.४ पूर्व लेखनाचा आढावा

१.५ विषय निवडीमागील भूमिका

१.६ विषयनिवडीचे महत्व

१.७ साधनांची उपलब्धता

१.८ प्रकरणांची रचना

१.९ उद्दिष्टे

१.१० गृहितके

# प्रकरण–१

# विषयप्रवेश

## १. भारतीय प्रबोधन :–

भारतीय प्रबोधनाचा उदय ब्रिटिश कालखंडात झाला. भारतीय प्रबोधन हे युरोपीयन प्रबोधनापेक्षा वेगळे आहे. युरोपातील प्रबोधनाचे नेतृत्व तेथील कारागीर व व्यापारी वर्गाने केले होते. तर भारतीय प्रबोधनाचे नेतृत्व पाश्चात्यविद्याविभूषीत भारतीयांनी केले होते. यासंदर्भात एकोणिसावे शतक हे अत्यंत महत्वाचे शतक मानले जाते. म्हणूनच 'एकोणिसावे शतक हे भारताच्या इतिहासामध्ये प्रबोधनाचे शतक म्हणून ओळखले जाते.[१] ब्रिटिशांसारख्या परकीय सत्तेचे दुरगामी परिणाम भारतीयांवर होऊन नवजागृती घडून आली. ब्रिटिश सत्तेची प्रशासकीय धोरणे, पाश्चात्य शिक्षण, दळणवळणाची आधुनिक साधने, ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे कार्य या घटकांनी प्रबोधन घडवून आणण्यात महत्वाची भूमिका निभावली. पाश्चात्य शिक्षणामुळे स्वातंत्र्य, समता, बंधूता, विज्ञाननिष्ठा, विवेकनिष्ठा, उदारमतवाद, उपयुक्ततावाद व लोकशाही या आधुनिक विचारमुल्यांचा परिचय भारतीयांना झाला. यासर्वांमुळे भारतीय समाजव्यवस्थेत असणारे दोष दृष्टीगोचर झाले; आणि ते दोष दूर करण्यासाठी सुशिक्षित भारतीय पुढे सरसावले. यातूनच भारतीय आधुनिकता उदयास आली.

'पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या नवशिक्षित भारतीयांनी भारतात आधुनिकतेचा प्रारंभ केला. परंतु युरोपियनांचे अंधानुकरण न करता आपल्या समाजाला रुचेल पटेल असे त्यांचे सुधारकी धोरण होते.'[४] भारतीय संस्कृतीतील चांगली तत्वे आणि पाश्चात्यांची विचारमुल्ये यांचा सुरेख संगम घालून त्यांनी आधुनिकतेच्या दिशेने वाटचाल सुरु केली. आपल्या समाजामध्ये जागृती घडवून आणण्यासाठी अनेक साधने व मार्ग त्यांनी शोधून काढले. त्यामध्ये पाश्चात्य शिक्षण देणाऱ्या विविध शिक्षण संस्था, सामाजिक धार्मिक सुधारणा संस्था, वृत्तपत्रे, नियतकालिके या साधनांचा व मार्गाचा उल्लेख करता येईल.

लोकसंपर्काचे अतिशय प्रभावी व सुलभ साधन म्हणजे वृत्तपत्रे व नियतकालिके होय. याचा अतिशय योग्य व पद्धतशीर वापर सुधारकांनी करुन लोकांना जागृत केले. अशाप्रकारे वृत्तपत्रे व नियतकालिके ही प्रबोधनाची आपत्ये होती असे म्हणावयास हरकत नाही.

## १.१ भारतीय नियतकालिकांचा उदय (१९ वे शतक) :–

'नियतकालिक म्हणजे ठराविक काळानंतर प्रसिद्ध होणारे मुद्रित लेखन होय.'[३] यामध्ये सात दिवसांनी निघणारे 'साप्ताहिक', पंधरा दिवसांनी निघणारे 'पाक्षिक', एका महिन्याने निघणारे 'मासिक' व तीन महिन्याने निघणारे 'त्रैमासिक' यांचा समावेश होतो. नियतकालिकाच्या विकासामागे छपाई तंत्र किंवा मुद्रणकलेचा फार मोठा हात आहे. या छपाई तंत्राचे उगमस्थान चीन हा देश असला तरी युरोपियनांनी या तंत्रज्ञानाचा विशेष वापर केला. साधरणतः पंधराव्या शतकात गटेन्बर्ग, कॅक्स्टन यांच्या प्रयत्नाने युरोपात मुद्रणकला विकसित झाली. भारताच्या संदर्भात मुद्रणकेलेचा विकास अभ्यासताना युरोपियनांचेच नाव आधी घ्यावे लागेल. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी यात महत्वाची भूमिका निभावली. 'भारतात पहिला छापखाना प्रथम सोळाव्या शतकात पोर्तुगीज जेजुईट मिशनऱ्यांनी काढला.'[४] ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणे हा यामागील मुख्य उद्देश होता. त्यामुळे स्थानिक भाषेत ख्रिस्ती धर्माचे ग्रंथ छापण्याचा प्रयत्न केला गेला. इ.स. १७१४ मध्ये तमिळ भाषेत न्यू स्टेटामेंट छापण्यात आले. पुढे बंगाल, सुरत, बंगलोर येथे छापखाने उघडण्यात आले. या मिशनऱ्यांनी मराठी भाषा व तिच्या उपभाषांचा अभ्यास केला. त्यामुळे मराठी भाषेत नव्या सुबोध शैलीची पुस्तके तयार झाली. यामध्ये व्याकरण, मोडी लिपीतील मराठी कोश, सिंहासनबत्तीशी, पंचतंत्र, हितोपदेश, रघुजी भोसल्यांची वंशावळ अशी पुस्तके निर्माण झाली.

याच कालखंडामध्ये निरनिराळ्या वार्ता, बातम्या देण्याचे मुद्रित साधन छापखान्यांच्या रुपाने किंवा मुद्रणकलेमुळे उपलब्ध झाल्याने इंग्रज मिशनऱ्यांनी इंग्रजी भाषेत नियतकालिके सुरु केली. इ.स. १७८० मध्ये कलकत्ता येथून निघालेले हिंदुस्तानातील पहिले वृत्तपत्र म्हणजे 'हिकीज गॅझेट' (Hikeys Gazette) होय. पुढे इ.स. १७८९ मध्ये 'बाँबे हेरॉल्ड' हे वृत्तपत्र ब्रिटिशांची करमणूक व देशीविदेशी बातम्या देण्यासाठी निघाले. तर इ.स. १८२३ मध्ये बंगाली भाषेतील 'समाचारदर्पन' हे देशी भाषेतील पहिले वृत्तपत्र निघाले. महाराष्ट्राच्या संदर्भात वृत्तपत्र विकासाची सुरुवात पहावयाची झाली तर बाळशास्त्री जांभेकरांचे नाव प्रथम घ्यावे लागते. इ.स. १८३२ मध्ये 'दर्पण' हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र त्यांनी काढले. तर इ.स.१८४० मध्ये 'दिग्दर्शन' नावाचे मराठी भाषेतील पहिले मासिक सुरु करण्याचा मानही त्यांच्याकडे जातो.

म्हणूनच त्यांना मराठीतील आद्य पत्रकार या नावाने ओळखले जाते. 'भारतीय लोकांना पाश्चात्य विद्यांचा परिचय व्हावा आणि भारत देशाची समृद्धी व भारतीयांचे कल्याण याविषयी स्वतंत्र रितीने उघडपणे विचार करण्यास एखादे स्थळ मिळावे. या उद्देशाने हे महाराष्ट्रातील पहिले वृत्तपत्र सुरु करण्यात आले होते.'[५] पुढे आर्थिक कारणांमुळे इ.स.१९४० मध्ये हे वृत्तपत्र बंद पडून 'मुंबई अखबार' हे वृत्तपत्र सुरु झाले. ते फार काळ चालले नाही. १८४१ मध्ये 'प्रभाकर' नावाचे वृत्तपत्र सुरु झाले. लोकहितवादींची 'शतपत्रे' याच वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाली. यामध्ये ब्रिटिशांच्या कल्याणकारी राज्याच्या मुखवट्यामागील भारतीयांचे आर्थिक शोषण करणारा खरा चेहरा उघडकीस आणणारे अनेक लेख छापले गेले. याचबरोबर ब्रिटिशांनी भारतीय उद्योगधंद्याचा जो ऱ्हास केला; त्याच्या कारण परिणामांविषयी चर्चा करणारे अनेक लेख छापले गेले. भारतीय औद्योगिकरणास चालना देणारे लेखनही या काळात झाले. तसेच अनिष्ट रुढी, परंपरा, पुरोहितशाही यावर हल्ला करणारे लेख ही यात छापले गेले.

'लोकांना अज्ञान, रुढी, वेडगळ धर्मकल्पना यांच्या अंधारातून दूर करणाऱ्या वृत्तपत्रांनी प्रकाशवाचक नावे घेणे स्वाभाविक होते.'[६] त्या संदर्भात महाराष्ट्रातील इंदूप्रकाश, ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, सुर्योदय, प्रभाकर अशी नावे असणारी वृत्तपत्रे महत्वाची आहेत. स्त्रियांचे प्रश्न, इतिहास संशोधन, साहित्यचर्चा, राजकीय, सामाजिक विषयांचे विवेचन यासाठी ही वृत्तपत्रे महत्वाची ठरली.

पुढील काळात महिन्याने निघणाऱ्या मासिकांचा उदय झालेला दिसतो. 'काही स्थायी विचार, उद्‌बोधनाची दिशा, साधकबाधक विवेचन, प्रसार व प्रचार, शिकवण इत्यादीसाठी प्रत्येक महिन्यास निघणाऱ्या मासिकाची जरुरी असते.'[७] या संदर्भाने बाळशास्त्री जांभेकरांनी १८४० मध्ये 'दिग्दर्शन' नावाचे मासिक काढले. हे मासिक अल्पायूषी ठरले. यामध्ये भौतिक शास्त्रे, विविध देश, प्राण्यांची माहिती छापली जात असे. याच काळात ज्ञानचंद्रोदय, उपदेशचंद्रिका, मराठी ज्ञानप्रसारक अशी मासिके निघाली. यामध्ये इ.स. १८६१ मध्ये श्री कृष्णशास्त्री तळेकर यांच्या संपादकत्वाखाली शालापत्रक हे मासिक निघाले. यामध्ये शाळांतील अध्यापनाचे विषय, शाळांतील अडचणी, शिक्षणखात्याकडून आलेल्या वार्ता यांचा समावेश होता.'[८] यानंतर 'न्यायाश्रय', 'तारप्रसारक', 'चंद्रिका', 'सद्‌धर्मदीपिका', 'बोधसागर',

'स्त्रीभूषण' अशी अनेक मासिके मराठीत निघाली. परंतु दीर्घकाळ चालून 'मराठी वाङ्मय व संशोधनात मोठे नाव कमावलेले एक प्रतिष्ठित मासिक म्हणजे सन १८६७ साली निघालेले 'विविधज्ञान विस्तार' हे होय; हे मासिक 'कुलास्त्रिया व गृहस्थ' यांच्यासाठी निर्माण झाले.'[९] साहित्य विवेचन, पुस्तक परीक्षण, सामाजिक राजकीय विषयांवरील लेख, प्रवासवर्णने, ऐतिहासिक लेख याचशिवाय विविध कथा, कादंबऱ्या, नाटके यांनाही मासिकामध्ये स्थान मिळत गेले. तसेच मराठ्यांच्या इतिहासाची साधने, शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, रामचंद्रपंत अमात्याची राजनिती, भास्कराचार्यांच्या लीलावतीचे भाषांतर इत्यादीमुळे या मासिकाला गांभिर्याबरोबरच लालित्याचीही जोड मिळाली होती.

पुढे विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेमुळे १८७४ मध्ये स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म या क्षेत्रांत एका नव्या युगाचा जन्म झाला. मराठी भाषेतील 'निबंध'या वाङ्मय प्रकारासही डौलदार व भारतदस्त वळण दिले गेले. इतिहास, भाषा, साहित्य, धर्म, संस्कृती, चरित्रे, वाङ्मय, समीक्षा, समाजसुधारणा, भौतिक शास्त्रे, पुस्तक परीक्षण इत्यादी विविध क्षेत्रांत विष्णुशास्त्री यांनी आपले विचार अतिशय निर्भीडपणाने व शैलीदार भाषेत मराठी वाचकांपुढे ठेवले. सुधारणावादी विचार आणि व्यक्ती यांवरही त्यांनी टीका केली. याच 'निबंधमालेतून स्फूर्ती घेऊन महाराष्ट्रात वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके यांच्याद्वारा एक नवे चैतन्याचे वारेच सुरु झाले.'[१०] महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक जीवनास वळण देणारी व लोकांना कार्यप्रवृत्त करणारी अनेक वृत्तपत्रे येथून पुढच्या काळात निघाली. त्यामध्ये केसरी हे वृत्तपत्र महत्वाचे आहे. इ.स. १८८१ मध्ये निघालेल्या या वृत्तपत्राला इतकी लोकप्रियता लाभली की, इ.स. १८८५ मध्ये त्याचा खप चारसाडेचार हजार होता, तो इ.स. १८९७ मध्ये साडेसहा हजार व नंतरच्या काळात तीस–पस्तीस हजारापर्यंत गेलेला दिसतो. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व टिळकांकडे आल्यानंतर या वृत्तपत्रास विशेष लोकप्रियता लाभली. 'टिळकांच्या गुणवैभवामुळे व प्रखर देशाभिमानामुळे केसरीची गर्जना महाराष्ट्रात घरोघरी होत राहिली.'[११]

केसरी प्रमाणेच आगरकरांचे 'सुधारक' हे गाजलेले वृत्तपत्र होते. सामाजिक–राजकीय प्रश्नांवरुन आगरकर व टिळकांचे मतभेद झाले व त्यातून इ.स. १८८८ मध्ये सुधारकाचा जन्म झाला. या वृत्तपत्रात सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला गेला. समाजातील अंधश्रद्धा जावी,

वेड्या खुळ्या कल्पना उरु नयेत, बुद्धीवादास महत्व यावे, पोथी निष्ठा संपावी, व्यक्ती स्वातंत्र्याची जोपासना व्हावी, माणसाचे लक्ष्य ऐहिक सुखसंवर्धनाकडे लागावे. अशा अनेक धोरणांनी आगरकरांचे 'सुधारक' लोकप्रिय बनले. 'विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक, आगरकर यांचे उद्‌बोधनाचे कार्य महत्वाचे होतेच त्याच बरोबर मनोरंजन करणे, वाचनाची गोडी वाढवणे यातून हरी नारायण आपटे यांनी मासिक 'मनोरंजन' सुरु केले.'[१२]

या कालखंडामध्ये जी राष्ट्रीय वृत्तीची वृत्तपत्रे सुरु झाली त्यामध्ये शि. म. परांजपे यांचे 'काळ' (१८९७) हे वृत्तपत्र महत्वाचे आहे. उपरोध, वक्रोक्ती, कल्पनाविलास आणि शुद्ध ध्येयवाद यामुळे परांजपे यांचे काळ वृत्तपत्र अल्पावधीतच लोकप्रिय झाले. 'मराठी वृत्तपत्राच्या इतिहासात स्वातंत्र्याची जोपासना करणारे ते एक जहाल पत्र होते.'[१३] अशा वृत्तपत्रावर ब्रिटिश सरकारची वक्रदृष्टी पडून हे वृत्तपत्र बंद पडले. इ.स. १९०४-०५ च्या वंगभंग आंदोलनाच्या कालखंडातून प्रेरणा घेऊन 'राष्ट्रभक्त', 'भाला', 'देशसेवक' अशी वृत्तपत्रे विशेष कामगिरी पार पाडू लागली. त्यामुळे अशा वृत्तपत्रावर सरकारी खटले भरुन ती बंद पाडण्यात आली. याच कालखंडामध्ये कायदा, ज्योतिष, शेती, शिक्षण, कलासमीक्षा, साहित्यविचार, वैद्यक अशी विशेष विषयाला वाहिलेली मासिके जन्माला आली. यामध्ये 'काव्येतिहाससंग्रह' (१८९०) या मासिकाने ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिद्ध केली. याचसंदर्भात 'भारतवर्ष' (१८९७), 'ऐतिहासिक लेखसंग्रह' (१८९७), 'इतिहाससंग्रह', 'सरस्वतीमंदिर', 'ग्रंथमाला', 'महाराष्ट्र कोकीळ' (१८८७), 'काव्यसंग्रह', 'महाराष्ट्र कवी', 'इतिहास-ऐतिहासिक', 'महाराष्ट्र धर्म' या मासिकांनी इतिहास संशोधनावर भर दिला.[१४] 'सत्यबोधिनी (१८८५)' 'तत्वविवेचक' (१८८३), 'ज्ञानसागर' (१८७६), 'ज्ञानदीप' (१८८४-८५), 'हिंदुधर्म विवेचक' (१८५५), 'सद्‌धर्मदीप' (१८८७) या मासिकांनी धर्म तत्वज्ञान यांची चर्चा केली आहे.

अशा प्रकारे एकोणिसाव्या शतकातील नियतकालिकांचे स्वरूप पहाता असे लक्षात येईल की, विशिष्ट विषयाला वाहिलेली मासिके या काळात निर्माण झाली. प्रामुख्याने साहित्य, ललित वाङ्मय, प्राचीन वैभवाचे पुनरुज्जीवन, भाषा व्याकरण, इतिहास, करमणूक तसेच स्त्री शिक्षण व धर्मसुधारणा या विषयी मत प्रदर्शित करणारी नियतकालिके या काळात निर्माण झाली. त्याचबरोबर राजकीय जागृती घडवून स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यांचा पुरस्कार करणारी

नियतकालिके या काळात उदयास आली होती. अशाप्रकारे नियतकालिकांचा उदय हा वृत्तपत्राच्या उदय आणि विकासात दडलेला आहे. ज्ञानप्रसार व लोकसुधारणा ही या दोघांची उद्दिष्टे होती. वृत्तपत्रे ही चालु क्षणाशी आपणास जोडतात परंतु नियतकालिके चालु क्षणाशी न थांबता आपल्या काळाशी आपले नाते जोडतात. म्हणूनच व. दि. कुलकर्णी म्हणतात की, 'नियतकालिके एका अर्थी वर्तमानाची आपत्ये असतात. वर्तमानातून ती जन्मतात व वर्तमानालाच ती आशयघन बनवितात, ती वृत्तपत्राइतकी सद्य क्षणाशी बांधलेली नसतात पण वर्तमानाहून फार दूर ही गेलेली नसतात.'[१५]

## १.२ २० व्या शतकातील भारतीय नियतकालिके :–

पुढील कालखंडामध्ये सुशिक्षितांची व हौशी वाचकांची संख्या वाढलेली दिसते. याकाळात स्वातंत्र्य चळवळ गतीमान झाली होती. त्यातच पहिल्या दुसऱ्या महायुद्धाच्या काळात देशाच्या बातम्यांबरोबर युरोपखंडाच्या बातम्या वाचण्याचे व्यसनच वाचकांना लागलेले दिसते. त्यामुळे नियतकालिके व वृत्तपत्रे व्यवसाय विशेष भरभराटीला आला होता. त्यासंदर्भाने वऱ्हाड येथील 'महाराष्ट्र', मुंबईतील 'लोकसेवक', नागपूरचे 'देशसेवक', पुण्याचे 'लोकसंग्रह', सी. के. ठाकरे यांचे 'प्रबोधन', वा. रा. कोठारी यांचे 'जागरुक', शि. म. परांजपे यांचे 'स्वराज', कृ. प्र. खाडिलकरांचे 'लोकमान्य', त्याचबरोबर 'नवा काळ', 'ज्ञानप्रकाश' ही वृत्तपत्रे महत्वाची होती.

या काळातील मासिके संख्यात्मक वाढ व विविधांगी विषयासाठी महत्वाची ठरलेली दिसतात. '१९२० पर्यंत ज्ञात मासिकांची संख्या पाचशे असावी.'[१६] विविधज्ञान विस्तार या मासिकाच्या इ.स. १९२६ च्या मे च्या अंकात १८६७ ते १९१९ च्या मासिकाचे समालोचन दिले आहे. या कालखंडातील मानवी जीवन अधिक गतिमान व गुंतागुतीचे बनलेले दिसते. 'विसाव्या शतकातील सामाजिक, राजकीय, जागतिक घडामोडी पहाता या काळात मानसिक ताणतणाव ही वाढलेले दिसतात. भौतिक जीवनास विशेष महत्व प्राप्त झालेले दिसते. यामुळे मनुष्याच्या इच्छा आकांक्षा आवडनिवड, करमणुकीची साधनेही बदललेली दिसतात. या सर्वाचा परिणाम मासिकांच्या स्वरुपावरही झालेला दिसतो.'[१७] त्यातून सर्वसंग्राहक विषय हातळणारी पुष्कळ मासिके या काळात निर्माण झालेली दिसतात. या काळात स्त्रीया शिकल्या, त्यांच्या

समस्या व स्त्रीचे प्रतिनिधित्व करणारी मासिके ही याकाळात निर्माण झाली. कविता, कथा, कादंबरी इ. वाङ्मय प्रकारची गोडी असणाऱ्या हौशी वाचकांसाठी ललित साहित्य पुरविणारी व मानवाचे सांस्कृतिक जीवन समृद्ध करणारी मासिके ही या काळात मोठ्या संख्येने निर्माण झाली.

या संदर्भात धार्मिक विचारांचे प्रतिनिधित्व करणारी 'आचार्य', 'धर्मजागृती', 'विद्यार्थी', 'धर्म' ही मासिके होती. 'लहान मुलांसाठी', 'आनंद', 'किशोर', 'खेळगडी', 'एकलव्य', 'चांदोबा' ही मासिके विशेष वाचनीय होती. रहस्य कथा, अदभूत जीवन, नवलकथा यांचा आनंद देणारी, 'अपराध', 'चोर', 'गूढकथा', 'दक्षता', 'धनंजय', 'नवल', 'पाठलाग', 'शार्विलक', 'शेरलॉक' ही मासिके होती.

याच काळात स्त्रीच्या सामाजिकीकरणाची प्रक्रिया वेगाने घडून आली. स्त्रिया शिकल्या, नोकरी करु लागल्या, त्यांच्या समस्या, त्याचे जीवन, त्यांच्या आवडीनिवडी यांना अनुसरुन 'स्त्री', 'अनुराधा', 'ललना', 'गृहशोभा', 'गृहलक्ष्मी', 'मानिनी', 'माहेर', 'स्नेहप्रभा', 'रागिणी', 'वहिनी' अशी मासिके निघाली. 'ज्योतिषशास्त्रावर' आधारीत गूढविद्या 'ज्योतिषसमाचार', 'भविष्यदर्शन', विज्ञानशास्त्रावर आधारित 'मराठी विज्ञानपरिषद पत्रिका', 'विज्ञानयुग', 'सृष्टिज्ञान', 'उदयम' ही मासिके' होती. शेती, उद्योग यावर मतप्रदर्शित करणारी 'आपली शेती', 'ऊसमळा', 'बहर', 'बळीराजा', 'रयत', तर खेळाडूच्यासाठी 'क्रीडांगण', 'क्रीडाजगत', 'क्रीडाविश्व', 'शाररीक शिक्षण', 'बलवान' ही मासिके महत्वाची होती.

'मराठी मासिकांचा दिवाळी अंक ही विशेष वाचनीय मेजवानी असते. कथा कादंबरी विनोदी लेखन, टीका समीक्षा, प्रवास, मुलाखती, वैचारिक निबंध असे विषय यात असतात. त्यासाठी 'अपर्णा', 'नवयुग', 'निषाद', 'सुगंधप्रभा', 'साहित्यशोभा', 'सह्याद्री'ही मासिके महत्वाची आहेत.'[१८]

त्याचबरोबर सर्वसंग्राहक स्वरुपाच्या नियतकालिकांमध्ये 'चित्रमय जगत', 'मासिक मनोरंजन', 'मधुकर', 'विहार', 'उषा', 'किर्लोस्कर', 'सह्याद्री', 'रत्नाकर' ही मासिके महत्वाची होती.

याच काळात अस्पृश्य दलित बांधवाच्या व ब्राम्हणेतरांच्या जाणिवा प्रदर्शित करणारी मासिके निर्माण झाली. यामध्ये 'मराठी दीनबंधू', 'विजयी दीन बंधू', 'विजयी मराठा', 'गरीबांचा कैवारी', 'मजूर', 'शिवस्मारक', 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'प्रबोधन', ही मासिके महत्वाची होती.'[१९] 'विटाळ विध्वंस', सोमवंशिय मित्र', 'मजूर पत्रिका', 'निराश्रित हिंदू नागरिक' या वृत्तपत्रातून दलितांचे प्रश्न चर्चीले गेले. दलित जाणिवा प्रकर्षाने व्यक्त करणारे 'अस्मितादर्शन' हे नियतकालिका महत्वाचे आहे.'[२०]

'नव्या शिक्षणामुळे नव्या विचारांचा नवशिक्षित वर्ग निर्माण झाला. वृत्तपत्रे,साप्ताहिके, मासिके यातून प्रतिष्ठित नामवंतांनाच वाव होता. नवोदितांची त्यामुळे कुचंबणा होत होती. परंतू नवोदितांचीत भाषा अनुभव, जीवसृष्टी, अभिव्यक्ती यात नाविण्य होते. परंपराचे ओझे, बंडखोर विचार, सांस्कृतिक उलथापालथ यातून जी नवी पिढी पुढे आली; त्यांची भाषा अविष्कार, पद्धती समजण्यासारखी नव्हती. यातूनच लघुनियतकालिकांचा जन्म झाला.'[२१] इ.स. १९५५ पासून अशी नियतकालिके निघू लागली. यात 'शब्द', 'दिशा', 'नवे लेखन', 'रुपगंधा', 'रुप', 'तापसी', 'टिंब', 'अबकडई' या नियतकालिकांचा समावेश होतो. अशाप्रकारे विसाव्या शतकातील मासिकांचे स्वरुप पहाता एक गोष्ट लक्षात येते की या काळात विशिष्ट विषयांना महत्व प्राप्त झाले होते. त्यामुळे अशा विशिष्ट विषयांना महत्व देणारी उदा. 'शेती व्यापार', 'शिक्षण', 'आरोग्य', 'स्त्री' विषयक मासिके मोठ्या संख्येने निर्माण झाली आणि सर्वात महत्वाचे म्हणजे याकाळात  'सर्वसंग्राहक स्वरुप' असणारी मासिकेही मोठ्या संख्येने सुरु झालेली दिसतात. त्यांच्या या स्वरुपामुळे ती अनेक वर्ष वाचनीय ठरली व टिकलेली दिसतात. नियतकालिकांचा व वाङ्मयाचा जवळचा संबंध आहे. समकालीन जीवनातील घटना संकल्पना यावर त्यात मार्मिक भाष्य केलेले असते. तसेच समाजाचे वास्ववदर्शी प्रतिबिंब ही त्यात पडलेले दिसते.

नियतकालिकाचे स्वरुप वृत्तपत्रापेक्षा थोडे भिन्न असते. वृत्तपत्रामध्ये एखादी घटना समाजाच्या निदर्शनास आणून दिलेली असते तर तीच घटना नियतकालिकांमध्ये तपशीलवार स्पष्ट केलेली असते. अशी ही नियतकालिके कालसापेक्ष असल्यामुळे त्यांच्या अभ्यासातून समकालीन समाजाच्या उत्क्रांतीचे विविधांगी पैलु दृष्टीक्षेपात येतात.म्हणूनच असे म्हटले जाते

की, 'नियतकालिके म्हणजे ठराविक काळाच्या अंतराने उपलब्ध केले जाणारे वाङ्मय आहे. त्यात तत्कालीन महत्वाचे तपशील असतात व काही चिरस्थायी महत्वाचे विषयही आलेले असतात. लौकिक घटना आणि त्यावरील भाष्य, काही स्फुट जीवनविचार, व्यवहारोपयोगी शास्त्रे आणि विद्या यांची माहिती इत्यादींनी या नियतकालिकांची जागा व्यापलेली असते.'[२२]

याचबरोबर साहित्य व वाङ्मयाच्या लेखन शैलीचे व्यासपीठ म्हणूनही वृत्तपत्रापेक्षा नियतकालिकांना महत्व आहे. वृत्तपत्रांमध्ये वाङ्मय अभिरुची व घटनेच्या रीतसर कारणमीमांसेला मर्यादा येतात. आणि त्याचमुळे या गोष्टींची हौस भागवून घेण्यासाठी तसेच लेखनिक चोखंदळ अभ्यासू वाचक यांच्या गरजेपोटीच नियतकालिकांची निर्मिती झाली असावी. म्हणूनच जे. हॅरिस गेबल आपल्या 'मॅन्युअल ऑफ सीरिअल वर्क' या ग्रंथामध्ये असे म्हणतात की, ''वृत्तपत्रे प्रश्नाला चालना देतात नियतकालिके त्याचा तपशीलवार पाठपुरवठा करतात आणि पुस्तके त्यांची साधक–बाधक विचक्षणा करतात.'' अशाप्रकारे 'विशिष्ट कालखंडातील विविध स्तरातील लेखक, वाचक, टीकाकार, सरकार आणि समाज यांची वाङ्मयीन धारणा, ध्येय, प्रेरणा यांचा व्यापक आलेख यातून येतो.

अशा प्रकारे वरील सर्व नियतकालिकांचे कार्य पहाता त्यांचा निर्मिती उद्देश सहज स्पष्ट होतो. त्यावरुन असे म्हणता येईल की, ज्ञान आणि विज्ञान याचा प्रसार करणे, समाजामध्ये जागृती घडवणे किंवा प्रबोधन घडवणे हा यांचा मुख्य उद्देश असावा. याचबरोबर विविध आणि विशिष्ट विषयांवर काही महत्वपूर्ण, अर्थपूर्ण, चिकित्सक लिखाण करणे व त्यातून विचारमूल्ये समाजास बहाल करणे हा नियतकालिकांचा हेतू असावा हे स्पष्ट होते.

समकाळात घडत असणाऱ्या घटना, त्यांची वास्तवता, स्वरूप, मूळ कारणे, परिणाम यांचा उहापोह या नियतकालिकांमध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यातूनच त्या घटनेतील दोष किंवा गुण अधिक प्रकर्षाने समाजापुढे उद्‌बोधित होतात. नियतकालिकांमुळे साहित्याच्या विकासालाही चालना मिळते. हे साहित्य नवविचार मुल्ये निर्माण करुन एक सुसंस्कृत पिढी घडवण्याचे कार्य करते. काळानुसार मासिकांचे स्वरूप आणि व्याप्ती विस्तारलेली दिसते. इ.स. विसाव्या शतकातील मासिकांमधून समकालीन समस्या आणि विविध विषय मांडले गेले. मासिके समाजातील बदल आणि बदलाच्या दिशा समजून घेण्यासाठी मार्गदर्शन करतात.

त्यातून तत्कालीन वैचारिक प्रवाह, सामाजिक मुल्ये जाणून घेण्याचा प्रयत्नही आपणास करता येतो.

## १.३ ऐतिहासिक संशोधन पद्धती :–

इतिहास म्हणजे भूतकाळाची कथा होय. परंतु ही कथा सांगण्यासाठी त्या काळचा माणुस आता जिवंत नाही किंवा आपण टाईमशीन लाऊन त्या काळात जाऊ शकत नाही. हा भूतकाळ दृष्टी आड गेलेला असतो. परंतु त्याचा शोध घेणे, तो उजेडात आणणे गरजेचे असते. यासाठी ज्या माध्यमाची मदत घेतली जाते त्यास 'इतिहासाची साधने' म्हणतात. स्त्रोत साधनांचा अभ्यास करुन इतिहासकार अज्ञान गतकाळाचा शोध घेतो.Istoria ह्या ग्रीक शब्दाचा अर्थ जिज्ञासापूर्वक घेतलेला गतकाळाचा शोध असा होतो. या दृष्टीने 'अज्ञात अशा मानवी जीवनाचा, जीवनपद्धतीचा, सर्वांगीण घडामोडींचा,परिवर्तनाचा, विचार प्रवाहांचा शोध घेणे हे इतिहास संशोधनाचे मुलभूत उद्दिष्टे ठरते.'[२३]

इतिहास संशोधनाचे प्रामुख्याने तीन प्रकार आहेत. त्यातील पहिला म्हणजे कथनात्मक किंवा निवेदनात्मक संशोधन पद्धती होय. या प्रकारामध्ये एखाद्या घटनेबद्दल, प्रसंगाबाबत, अगर विषयासंबंधी नवी माहिती, तोवर अज्ञात असलेली माहिती मिळवून ती सुसंबद्ध रीतीने वाचकापुढे मांडणे हा उद्देश असतो. हा इतिहास संशोधनाचा पहिला प्रकार होय. याचा 'मुळ उद्देश अज्ञात बाबींवर प्रकाश झोत टाकणे, गतकाळासंबंधीच्या ज्ञानात नवी भर टाकणे, ज्ञानाचे नवे दालन खुले करणे हा असतो.' यामध्ये नव्या माहितीच्या संशोधनावर व त्याच्या पद्धतशीर सुसंगत मांडणीवर भर दिलेला असतो.

दुसरा संशोधन प्रकार विश्लेषणात्मक लेखनाचा असतो. यामध्ये वर्ण्यविषयासंबंधी नवी माहिती प्रकाशात आणण्यापेक्षा उलब्ध ऐतिहासिक माहितीचा ऐतिहासिक साधनांचा नव्या दृष्टीकोनातून अभ्यास करुन प्रस्थापित प्रमेया पेक्षा भिन्न प्रमेय मांडण्याचा प्रयत्न असतो. उपलब्ध साधनसामग्रीचे पुनः परीक्षण करुन प्रचलित मतापेक्षा वेगळा निष्कर्ष काढण्याचा या संशोधनाचा प्रयत्न असतो. याचा अर्थ असा नाही की यामध्ये नव्या साधनांच्या शोधाला महत्व नसते.किंबहुना नवी सामग्री अथवा पुरावा हाती लागल्यामुळेच नवे प्रमेय मांडण्यास पुष्टी

मिळते. परंतु अशा संशोधनात नव्या पुराव्यांच्या मांडणीवर भर नसतो. 'उपलब्ध माहितीचा नवा अन्वयार्थ लावण्याचा संशोधकाचा हेतू असतो.'[२४]

तिसरा इतिहास संशोधनाचा प्रकार हा मुलगामी संशोधनाचा आहे. हे संशोधन अधिक मौलिक व तात्विक स्वरुपाचे असते. इतिहास विषयाच्या सखोल व प्रदीर्घ चिंतनातून त्याबाबत काही नवे सिद्धांत मांडण्याचा त्यात प्रयत्न असतो. उपलब्ध साधन सामग्रीचा अधिक चिकित्सक अभ्यास करुन त्यातून काही सर्व सामान्य सिद्धांत काढले जातात. त्यातून इतिहास विषयाला तत्वज्ञानाची बैठक दिली जाते. अशा संशोधनासाठी केवळ एखादी घटना अथवा व्यक्ती हा अभ्यास विषय नसतो तर 'दीर्घकालखंडातील घटनाप्रवाहांचा, मानवी समुहांचा, जीवनप्रवाहांचा अगर गतकालीन मानवी जीवनाच्या विविध घटकांचा अभ्यास करुन त्यातील अंतर्गत सुत्र उलगडून दाखवण्याचा प्रयत्न यामध्ये केलेला असतो.'[२५]

वरील तीन प्रकारापैकी कोणत्या प्रकारात इतिहास संशोधन करावयाचे आहे हे सर्वस्वी संशोधकावर अवलंबून असते. माझ्या संशोधनाचा विषय 'चित्रमय जगत मासिक एक राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास' आहे. माझ्या संशोधनाचा कालखंड (१९१०–१९६८) असा आहे.संशोधनाचे महत्व, उद्दिष्टे याचा विचार करता माझे संशोधन कार्य हे दुसऱ्या संशोधन प्रकारामध्ये मोडते.

## १.४ विषयनिवडीमागील भूमिका :–

ऐतिहासिक संशोधन पद्धतीचे विविध टप्पे स्वीकारुन त्यानुसार विषयाचा आराखडा, ध्येयधोरणे, गृहितके साधनांची उपलब्धता इ. गोष्टींची पुर्तता करण्याचा प्रयत्न केला. मासिकाची चिकित्सक छाननी इतर समकालीन लिखित साधनांवरुन त्याचे परिक्षण करुन त्यातील सत्यदर्शन घडविण्याचा प्रयत्न यात केला आहे. संश्लेषणात्मक प्रक्रियेमध्ये मासिकातील विविध विषयांवरील लेखांचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक असे वर्गीकरण करुन त्यातून एक समविचार किंवा नवविचार शोधण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच मी माझ्या संशोधनाच्या उद्दिष्टापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी 'चित्रमय जगत मासिक एक राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास' हा विषय निवडला आहे. जानेवारी १९१० मध्ये चित्रशाळा या छापखान्याद्वारे हे मासिक सुरु करण्यात आले. चित्रशाळा छापखाना हा विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी १८७८ मध्ये स्थापन केला होता. ब्रिटिशांचा अंमल व प्रशासकीय धोरणे, नवशिक्षित भारतीयांचा सुधारणावादी, आधुनिक दृष्टीकोन या सर्व गोष्टींची पार्श्वभूमी या चित्रमय जगतच्या निर्मितीस कारणीभूत ठरली. विष्णुशास्त्री चिपळुणकरांची स्वदेश, स्वभाषेविषयीची निष्ठा या मासिकाच्या उदयास प्रेरक ठरली. पुढे चित्रशाळा छापखान्याची मालकी वासुकाका जोशी म्हणजेच वासुदेव गणेश जोशी यांच्याकडे आली. तेव्हा त्यांनी चित्रमय जगत हे मासिक सुरु केले. त्यांच्या काळात चित्रशाळा या छापखान्यास विशेष उर्जित अवस्था प्राप्त होऊन ती एक 'सार्वजनिक राष्ट्रीय संस्था' बनली. अनेक क्रांतीकारक, राष्ट्रीय सभेचे नेते यांचा चित्रशाळेशी संबंध आलेला दिसतो. चित्रशाळेचे गाजलेले अतिशय लोकप्रिय ठरलेलेव दीर्घकाळ अखंड, चालु राहिलेले मासिक म्हणजे 'चित्रमय जगत' होय.

या प्रदीर्घ कालखंडात चित्रमय जगतास जे संपादक लाभले ते इतिहास संशोधक दत्तोपंत विष्णु आपटे, काँग्रेसचे पुढारी त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर आणि साहित्यिक रा. प्र. कानिटकर हे होते. या तिघांनीही या मासिकाच्या लोकप्रियतेमध्ये मोलाची भर घातली. या मासिकामध्ये महाराष्ट्रातील अनेक नामवंत लेखक, साहित्यकार, कवी, राजकारण आणि समाजकार्य यामध्ये सक्रीय असणाऱ्या विविध थोर मंडळींनी लिखाण केलेले दिसते.प्रकाशनातील नियमितपणा, अखंड दर्जेदार वितरण सेवा, तसेच सचित्र मासिक, समालोचनाचा उपक्रम या मासिकाने हाती घेतला होता. यामुळेच या मासिकाला विशेष लोकप्रियता प्राप्त झालेली दिसते.

## १.५ विषय निवडीचे महत्व :–

चित्रमय जगत हे मासिक सर्व संग्राहक स्वरुपाचे मासिक होते. म्हणजेच ते कोणत्याही एका विषयाला वाहिलेले मासिक नव्हते. यामध्ये समाजकारण, राजकारण, इतिहास, संस्कृती, भाषा–वाङ्मय, अर्थकारण या विषयांवर आधारीत अनेक लेख छापले गेले होते. हे मासिक भारतीयांना राष्ट्रीय शिक्षणाचे धडे देण्यासाठी सुरु झाले होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या

टिळक युग, गांधीयुगाचे हे मासिक साक्षीदार होते. या अनुषंगाने स्वातंत्र्यचळवळीवर भाष्य करणारे अनेक लेख यात छापले गेले होते.

महात्मा गांधी, त्यांचे सत्य, अहिंसेचे तत्वज्ञान, असहकार चळवळ, कायदेभंगाची चळवळ, छोडो भारत आंदोलन, विधायक कार्यक्रम, स्वदेशी, बहिष्काराचे तत्व याविषयी यात अनेक लेख आहेत. केवळ भारतीय स्वातंत्र्ययुद्धच नव्हे तर तत्कालीन जागतिक घडामोडींची दखल ही यात घेण्यात आली होती. विविध देशांचे विशेष अंक यात छापून येत असत. भारताबाहेरील जग, विविध देश, त्यांचे आचारविचार, धर्म, चालिरिती, परंपरा, शासनव्यवस्था, अर्थकारण यांचा भारतीयांना परिचय करुन देण्याचा प्रयत्न यातून झालेला दिसतो. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाचे विशेष अंक या काळात छापले गेले. ते इतके गाजले की या काळात या मासिकाचा खप वाढल्याचा उल्लेख मिळतो.

ब्रिटिशांचे भारताच्या आर्थिक शोषणाचे धोरण, त्याविरुद्धची प्रतिक्रिया आर्थिक राष्ट्रवादाची संकल्पना याविषयी अभ्यासपूर्ण लेखन यामधून झाले आहे. चित्रशाळेच्या मालकीच्या चितगुप्पीच्या वाड्यात पुण्यातील पहिला बॉम्ब तयार करण्यात आला होता. तसेच पुण्यातील पहिली कायदेभंग सभा येथेच आयोजित केली गेली होती. असे उल्लेख चित्रशाळेचा इतिहास यामध्ये मिळतात. चित्रशाळा व क्रांतिकारी चळवळ यांचा संबंध असावा म्हणून १८८७, १९०८, १९२८ मध्ये चित्रशाळेची झडती घेतली गेली होती. तसेच चित्रमय जगतचे १९३२ मधील तीन अंक जप्त करण्यात आले होते. सरकाराने वृत्तपत्र स्वातंत्र्याची गळचेपी करणारे कायदे पास केल्याने सरकार विरोधी वक्तव्य छापल्याच्या आरोपावरुन हे अंक जप्त करण्यात आले होते. सर्वांत महत्वाचे म्हणजे वि. का. राजवाडे यांचा 'भारतीय विवाह संस्थेचा इतिहास' व लोकमान्य टिळकांचा 'हिंदू धर्माचे स्वरुपलक्षण' हा लेख आणि वि. दा. सावरकर यांची 'सागरा प्राण तळमळला' ही कविता प्रथम याच मासिकामध्ये छापली होती.

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील लेखमाला या काळात विशेष गाजली. यामुळे या मासिकाच्या लोकप्रियतेत वाढ झाली व मासिकाचा खप २० हजारापर्यंत गेल्याचा उल्लेख मिळतो. हे मासिक मुंबई आणि पुणे येथून प्रकाशित होत असे. याशिवाय हिंदी आणि

गुजराती भाषेतही प्रकाशित करण्याचा घाट घालण्यात आला. अनेक विद्‌वान इतिहास लेखक, समाजसुधारक, राष्ट्रीय चळवळीतील नेते यांनी यामध्ये लेखन केलेलेदिसते.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासाचे हे समकालीन व विश्वसनीय साधन आहे. ब्रिटिश सरकारची ध्येय–धोरणे, कॉंग्रेसची वाटचाल, स्वातंत्र्य लढ्यातील अनेक घडामोडी यावर आधारित प्रचंड लेखन यात झाले.लोकांना राजकीय शिक्षणाचे धडे देणे हे या मासिकाचे ब्रिद होते व त्याचे अतिशय काटेकोर पालन मासिकाने केलेलेदिसते.

स्वातंत्र्य युद्धानंतरच्या कालखंडातील भारताची राजकीयस्थिती, काँगेसची भूमिका, भारतातील स्वातंत्र्योत्तर काळातील समस्या जाणून घेण्यासाठी सुद्धा हे मासिक महत्वाचे साधन ठरु शकते. आधुनिक महाराष्ट्राच्या ऐतिहासिक प्रक्रियेच्या वाटचाली संबंधीची माहिती मिळवण्यासाठी एक साधन म्हणून या मासिकाचे महत्व प्रतिपादित करण्याचा प्रयत्न यात केला जाणार आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि उत्तर काळात सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनात झालेले परिवर्तन, परिवर्तनाची दिशा, स्वरूप यांची कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न यात केला जाणार आहे.

विषय निवडीमागील भूमिका आणि विषयाच्या निवडीचे महत्व प्रतिपादित करता या संशोधन कार्यामुळे राष्ट्रीय इतिहासलेखन आणि आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात नव्या संशोधनाची भर पडेल. ही भर घालणे हेच या संशोधन विषयाचे योगदान राहिल.

असे हे नाविन्यपूर्ण मासिक जानेवारी १९१० ते जानेवारी १९६८ पर्यंत अखंड चालु राहिले. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर या दोन्ही कालखंडाचे प्रतिबिंब यात दिसते. प्रस्तुत शोध प्रबंधासाठी १९१०–१९६८ हा संपूर्ण कालखंड निवडला आहे. व या मासिकातील राजकीय, सामाजिक व आर्थिक सांस्कृतिक लेखनाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. व त्यायोगे हे मासिक स्वातंत्र्यपूर्व आणि उत्तर कालखंडातील महाराष्ट्र समजून घेण्यासाठी एक महत्वाचे ऐतिहासिक साधन ठरु शकते हे सिद्ध करण्याचा प्रयत्न हाच या संशोधनाचा मुख्य उद्देश ठरणार आहे.

## १.६ पूर्व लेखनाचा आढावा :-

एकोणीसाव्या आणि विसाव्या शतकामध्ये अनेक नियतकालिके निर्माण झाली होती. त्यातील काही मासिकेही विशिष्ट विषयाला वाहिलेली होती; तर काही मासिके सर्वसंग्राहक स्वरुपाची दिसतात. वाचक वर्गाच्या आवडीनुसार मासिकाचे स्वरुपही निर्धारीत झालेले दिसते. या मासिकांवर अनेक विद्वान लोकांनी मुलगामी संशोधन केलेले दिसते.

या संदर्भात व. दि. कुलकर्णी याचे संशोधन महत्वाचे आहे. 'मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास' या शीर्षकाखाली एकूण तीन खंड त्यांनी प्रसिद्ध केलेले दिसतात. यामध्ये प्रसारमाध्यमामध्ये १९ व्या व विसाव्या शतकाच्या सुरुवातीस वृत्तपत्र व मासिकांना असणारे महत्व प्रतिपादीत केले आहे. त्याचबरोबर वृत्तपत्र व मासिक यामधील फरक व साम्यस्थळेही स्पष्ट करुन दोन्ही माध्यमांची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट केली आहे. त्याचबरोबर ज्ञानप्रसारामध्ये व साहित्यपरिपोषणासाठी नियतकालिके किती महत्वपुर्ण आहेत हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. उषा मा. देशमुख यांनी 'मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास' खंड १ ते ३ अशी महत्वपूर्ण ग्रंथ संपदा निर्माण केली आहे. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातील महत्वपूर्ण मासिकाच्या स्वरुपाचा अभ्यास करुन साहित्य वाङ्मयाच्या अंगाने त्याचे परिक्षण केलेले दिसते. व साहित्यिक दृष्ट्या मासिकांचा नवा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

रा. गो. कानडे यांनी सुद्धा 'मराठी नियतकालिकांचा इतिहास' (१८३२-१९३६) हा ग्रंथ लिहला आहे. या ग्रंथामधून एकोणिसाव्या शतकापासून ते विसाव्या शतकाच्या पुर्वार्धापर्यंत मराठी मासिकांच्या वाटचालीचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. कालपरिस्थितीनुसार मासिकाचे स्वरुप विषय कसे बदलत गेले हे त्यातून समजते. याशिवाय शंकर गणेश दाते यांनी 'मराठी नियतकालिकांची सूची' हा ग्रंथ लिहिला आहे. यामध्ये एकोणिसाव्या शतकापासून ते विसाव्या शतकापर्यंतच्या महत्वपूर्ण मासिकांची सूची दिली आहे. या काळात मराठीमध्ये निर्माण झालेल्या विविधांगी मासिकांचे स्वरुप जाणून घेण्यासाठी ही सूची महत्वपूर्ण आहे. मराठी मासिकांचा उद्देश, काल, संपादक, गुण वैशिष्ट्ये यांची संक्षिप्त माहिती यामधून मिळते.

याशिवाय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील इतिहास विभागामध्ये अनेक मराठी नियतकालिके वृत्तपत्रे यावर संशोधन झाले आहे. 'जागृतीकार पाळेकरांचे शिक्षण विषयक विचार व कार्य' हा सचीन मोरे यांचा लघुशोध प्रबंध, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुकनायक सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय विचार' हा सुरज सोनावणे यांचा लघुशोध प्रबंध, अश्विनी गायकवाड यांचा 'साधना साप्ताहिकातून व्यक्त झालेले सामाजिक धार्मिक राजकीय व आर्थिक विचार (१९४८–६०)' हा लघु शोधप्रबंध महत्वपूर्ण आहे. जालंदर गणपत भोसले यांनी 'बहिष्कृत भारत व समाज प्रबोधन (१९२७–२९)' या विषयावर संशोधन कार्य केले आहे. तसेच केसरी, ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, काळ, सह्याद्री इत्यादी महत्वपुर्ण वृत्तपत्र व मासिकावरही काम झालेले दिसते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मराठी विभागातही विविध मासिकांवर संशोधन कार्य झालेले दिसते. यासंदर्भाने 'श्रीपतराव शिंदे यांच्या 'विजयी मराठा या नियतकालिकाचा अभ्यास', हा दुधाळ शुक्राचार्य यांचा पीएच.डी. प्रबंध तसेच शेवाळे प्रकाश यांनी 'अनुस्तुभ नियतकालिकांचे वाङ्मयीन योगदान' हा पीएच.डी. प्रंबध व याचबरोबर सिद्धपाठक मीरा यांचा मासिक 'मनोरंजनने मराठी ललित वाङ्मयात घातलेली भर' या विषयावर काम केले आहे. याचबरोबर बीसीयुडी च्या मायनर व मेजर संशोधन प्रकल्पामध्ये ही नियतकालिकांवर काम झाले आहे. त्या संदर्भाने डॉ. स्वाती काळभोर यांनी किर्लोस्कर या मासिकावर काम केले आहे.तर प्रा. श्रुती भातखंडे यांनी स्त्री मासिक व सुधारणा चळवळ या अनुषंगाने प्रकल्प सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सादर केलेला दिसतो.

तसेच 'चित्रमय जगत मासिक : एक ऐतिहासिक अभ्यास (१९१०–१९४७)' विषय घेऊन मी स्वतः या विषयावर एम. फिल. लघुशोध प्रबंधसावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये सादर केला आहे. परंतु लघुशोध प्रबंधाला मर्यादा असतात. त्यामुळे (१९१०–१९४७) एवढाच मर्यादीत कालखंड मी निवडला होता. या कालखंडातील इतिहास विषयावर आलेले लेख अभ्यासले होते. या लेखांमधून राष्ट्रीय इतिहास लेखन कसे झाले हा माझ्या संशोधनाचा उद्देश होता. हा अभ्यास करताना या मासिकाचे सर्वसंग्राहक स्वरूप पहाता हा विषय पीएच. डी. साठी होऊ शकतो याची कल्पना आली. १९१०–१९६८ या प्रदीर्घ कालखंडात या मासिकामधून सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, साहित्य, वाङ्मय या विषयावर विविधांगी लेख छापून आले होते. हे लेख लिहिणारा लेखक वर्ग त्याकाळातील सामाजिक राजकीय जीवनात

आपली भरीव कामगिरी करणारा विद्वान सुशिक्षित भारतीय वर्ग होता. ज्याला आपण मध्यमवर्ग किंवा पांढरपेशा वर्ग या नावाने ओळखतो. याच वर्गाने स्वातंत्र्यपूर्वकाळात प्रबोधन, आधुनिकता आणि भारतीय राष्ट्रवादाचे नेतृत्व केले होते. त्यामुळे त्यांचे लेखन वास्तवदर्शी आणि अभ्यासपूर्ण होते. अशा लेखांचा अभ्यास करुन आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडीचा इतिहास समजून घेणे शक्य आहे. या मासिकाचा कालखंड १९१०–१९६८ हा बृहत कालखंड आहे. जवळ जवळ अर्ध शतकाच्या इतिहासाचे अखंड साधन म्हणून या मासिकाचे कार्य उजेडात आणण्याचा प्रयत्न याद्वारे करणे शक्य आहे.

## १.७ साधनांची उपलब्धता :–

चित्रमय जगत या मासिकाचे मूळ अंक पुणे मराठी ग्रंथालय पुणे, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, जयकर ग्रंथालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, फर्ग्युसन महाविद्यालय ग्रंथालय पुणे येथे उपलब्ध आहेत.

## १.८ प्रकरणांची रचना :–

प्रकरण पहिले– 'विषय प्रवेश' हे पहिले प्रकरण असून यामध्ये विषयनिवडीमागील भूमिका, विषय निवडीचे महत्व, संशोधन पद्धती, उद्दिष्टे व गृहितके मांडली आहे. तसेच भारतीय प्रबोधन, प्रबोधनाचे साधन म्हणून मुद्रित वाङ्मयाचे योगदान स्पष्ट केले आहे. त्या अन्वये नियतकालिकांचे स्वरूप व एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातील काही महत्वाची नियतकालिके याविषयी विवचेन करुन कालखंडानुसार नियतकालिकांचे स्वरूप कसे बदलत गेले व कसे व्यापक झाले याविषयी माहिती देण्याचा प्रयत्न आहे.

प्रकरण दुसरे – 'चित्रमय जगत मासिकाचे स्वरूप' यामध्ये मासिकाच्या निर्मितीमागील राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याकाळातील देशी वृत्तपत्रांविषयी ब्रिटिश सरकारची भूमिका वृत्तपत्राचा राजकीय जागृतीचा प्रयत्न यावर प्रकाशझोत टाकला आहे. या मासिकाची ध्येय, धोरणे, त्याचे सर्वसंग्राहक स्वरूप, चित्र हे वैशिष्ट्य, महत्वाची राजकीय संस्था असणारा चित्रशाळा छापखाना, छापखान्याचे मालक वासुकाका जोशी यांचे व्यक्तीमत्व, प्रकाशक व छापखान्याचे मालक म्हणून त्यांची भूमिका, चित्रमय

जगतचे विशेष अंक, पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाचे सिंहावलोकन, सरकार विरोधी वक्तव्य केल्याच्या संशयार्थ मासिकावर भरलेले खटले, मासिकात लिखाण करणारा लेखक वर्ग, मासिकाचे संपादक द. वि. आपटे, त्र्यं. र. देवगिरीकर, रा. प्र. कानिटकर यांची संपादक म्हणून भूमिका याविषयी भाष्य केले आहे.

तिसरे प्रकरण – 'चित्रमय जगतातील राजकीय लेखन'– स्वातंत्र्य चळवळ आणि चित्रमय जगतची ध्येय धोरणे यांचा जवळचा संबंध आहे. लोकांना राजकीय शिक्षण देणारे 'राष्ट्रीय मासिक' असे त्याचे स्वरुप होते. त्यानुसार यात अनेक राजकीय लेख छापले गेले. स्वातंत्र्य आंदोलनाचा चालु इतिहास,विविध घडामोडी, ब्रिटिश सरकारची ध्येय धोरणे, गांधींचे नेतृत्व, देशी राजकारणाबरोबरच युरोप व आशिया खंडातील राजकीय घडामोडी, या घडामोडींचा भारताच्या दृष्टीकोनातून लावलेला अन्वयार्थ याचबरोबर स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय जीवन, महाराष्ट्र सरकारची ध्येय धोरणे, विविध प्रशासकीय योजना, युद्धोत्तर जगातील राजकीय घडामोडी या सर्व गोष्टींची माहिती याद्वारे देण्याचा प्रयत्न आहे.

प्रकरण चौथे – 'चित्रमय जगतातील सामाजिक लेखन' यामध्ये सामाजिक, आर्थिक, धार्मिक संदर्भाने चित्रमय जगतमधून जे लेखन झाले त्याचे विवेचन आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक संस्था संकल्पना याचा अभ्यास करता येईल व त्यानुसार तत्कालीन समाजाच्या वैचारिकतेमध्ये मानसिकतेमध्ये झालेला बदल व एकूण समाजरचनेमध्ये झालेले बदल याचा मागोवा घेता येईल. यामध्ये वर्णव्यवस्था, धर्म, स्त्री जीवन, शिक्षण, कुटुंबपद्धती याविषयावर आधारीत लेखांचा समावेश आहे. त्याच बरोबर ब्रिटिश पूर्व व उत्तर कालीन भारतीय अर्थकारणाचा वेध यात घेतला आहे.

प्रकरण पाचवे – 'सांस्कृतिक लेखन' चित्र हे या मासिकाचे वैशिष्ट्य होते. या अनुषंगाने यामधील विविध चित्रांची माहिती देऊन तत्कालीन राजकीय व सामाजिक वास्तवाच्या संदर्भात भाष्य करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठीतील हे पहिले सचित्र मासिक होते. नानाविध चित्रांचे ब्लॉक्स देण्याच्या पद्धतीचा प्रथम अवलंब या मासिकाने केला. नंतर इतर मासिकाने त्याचे अनुकरण केले. अनेक विषयांच्या अनुरोधाने अनेक चित्रे दिली गेली.तत्कालीन चित्रकार बी. बी. जुवेकर, एन. जी. हळदणकर, एन. एस.जोशी, व्ही.एम खरे

बालचित्रकार आचरेकर, चित्रकार दाणी, चित्रकार बागल यांची व्यक्तीचित्रे, कथाचित्रे, सण उत्सवाची चित्रे, विनोदी, व्यंगचित्रे यांची माहिती सांगण्याचा प्रयत्न यामध्ये केला आहे.

चित्रमय जगत या मासिकातून येणाऱ्या चित्रांचे ठळक दोन भाग दिसतात. एक छायाचित्रे व दोन रेखाचित्रे, त्यांची वैशिष्ट्ये व महत्व सांगण्याचा प्रयत्न राहणार आहे. इतिहासाचे साधन म्हणून त्यांचे महत्व प्रतिपादित करण्याचा प्रयत्न राहणार आहे. सामाजिक, चालिरिती परंपरा, नैतिकता, शिष्ठाचार, व्यक्तीस्वभाव इ. यांची माहिती समजते.

प्रकरण सहावे 'उपसंहार' हे शेवटचे प्रकरण असून चित्रमय जगतातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक लेखांमधून स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडाचे प्रतिबिंब समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

या मासिकाने मनोरंजनाबरोबरच ज्ञानप्रबोधन व राजकीय जागृती केली. जनमानसात राजकीय शिक्षण देण्याचे ध्येय गाठले.त्या संदर्भाने मासिकाचे परिक्षण करण्याचा प्रयत्न करणार आहे. या सर्व अभ्यासातून या मासिकाने वाचक वर्गाच्या मनात मिळवलेले स्थान, लोकप्रियता याविषयी भाष्य करणार आहे. या मासिकातील लेखाचे स्वरुप पहाता हे मासिक राष्ट्रीय लेखन प्रवाह निर्देशित करते असे सिद्ध करण्याचा प्रयत्न राहील.

## १.९ संशोधनाची उद्दिष्टे :–

१. चित्रमय जगत या मासिकाची कामगिरी उजेडात आणणे.
२. स्वातंत्र्यपूर्व कालखंड व स्वातंत्र्योत्तर कालखंड यामधील भारत आणि महाराष्ट्रातील घडामोडी समजून घेण्यासाठी हे एक महत्वाचे साधन आहे या दृष्टीने मासिकाचे योगदान स्पष्ट करणे.
३. राष्ट्रीय इतिहास लेखनामधील मासिकाचे योगदान स्पष्ट करणे.
४. स्वातंत्र्य चळवळीवर विशेष प्रकाश टाकणे.
५. मासिकातील सचित्र सांस्कृतिक इतिहासावर भाष्य करणे.

## १.१० गृहितके :–

१. चित्रमय जगत हे राजकीय वृत्तीचे मासिक होते.

२. चित्रमय जगतचे स्वरुप सर्व संग्राहक होते.

३. चित्रमय जगतमधील लेख राष्ट्रीय स्वरुपाचे होते.

४. मासिकात असणारी चित्रे हे या मासिकाचे ठळक वैशिष्ट होते.

**तळटीपा :–**

१. दि. के. बेडेकर, भा. श. भणगे, 'भारतीय प्रबोधन', समीक्षण व चिकित्सा समाज प्रबोधन संस्था पुणे, १९७३, पृ.१०२

२. म. श्री. दीक्षित, 'आधुनिक भारत आणि चीन', निराली प्रकाशन, पुणे, पृ.१३.

३. प्र. न. जोशी, 'मराठी वाङ्मयाचा विचेक इतिहास', अर्वाचीन काळ, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे २००५, पृ.४३.

४. उपरोक्त, पृ.४३

५. उपरोक्त, पृ.४३

६. कित्ता, पृ.४७.

७. कित्ता, पृ.४९.

८. कित्ता, पृ.५२.

९. व. दि. कुलकर्णी, 'मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास', खंड–१ श्री विद्या प्रकाशन, पुणे १९८७, पृ.७.

१०. प्र. न. जोशी, पृ.५९.

११. कित्ता, पृ.६०.

१२. कित्ता, पृ.६१.

१३. कित्ता, पृ.६२.

१४. कित्ता, पृ.६४.

१५. व. दि. कुलकर्णी, पृ.२.

१६. प्र. न. जोशी, पृ.६६.

१७. कित्ता, पृ.६७.

१८. कित्ता, पृ.६८.

१९. कित्ता, पृ.६९.

२०. कित्ता, पृ.७७.

२१. कित्ता, पृ.७८.

२२. व. दि. कुलकर्णी, पृ.४.

२३. शांता कोठेकर, 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७, पृ.५६.

२४. कित्ता, पृ.५७.

२५. उपरोक्त, पृ.५७

*****

# प्रकरण २

# चित्रमय जगतचे स्वरूप

२.१ चित्रमय जगतची पुर्वपिठिका

२.१.१ चित्रशाळा छापखाना

२.१.२ चित्रशाळा छापखाना आणि वासुकाका जोशी

२.१.३ चित्रशाळा एक सार्वजनिक संस्था

२.१.४ चित्रशाळेची मासिके

२.२ चित्रमय जगतचे स्वरूप

२.२.१ पार्श्वभूमी

२.२.२ मासिकाचा उद्देश

२.२.३ चित्रमय जगतचे संपादक आणि लेखक

२.३ मासिकाची वैशिष्ट्ये

२.३.१ मुखपृष्ठ

२.३.२ विषयानुक्रमणिका

२.३.३ सुची

२.३.४ पहिले सचित्र मासिक

२.३.५ चित्रमय जगतमधील विशेष सदरे

२.३.६ चित्रमय जगतचे विशेष अंक

२.३.७ जप्त केलेले अंक व मासिकावरील खटले

२.४ चित्रमय जगतचे सर्व संग्राहक व व्यापक स्वरूप

२.४.१ चित्रमय जगतमधील विविध लेख

२.५ चित्रमय जगतचा अंत

# प्रकरण २

# चित्रमय जगतचे स्वरूप

## २.१ चित्रमय जगतची पुर्वपिठिका :-

### २.१.१ चित्रशाळा छापखाना :-

विष्णुशास्त्री चिपळूणकर हे चित्रशाळा या छापखान्याचे संस्थापक होते. इ.स. १८७८ च्या ऑगस्ट महिन्यामध्ये त्यांनी या छापखान्याची स्थापना केली. चित्रशाळा हा छापखाना सुरुवातीच्या काळात देवादिकांची चित्रे तसेच ऐतिहासिक पुरुषांच्या तसबीरी छापून देण्यासाठी प्रसिद्ध होता. या संदर्भात निबंधमालेच्या सहाव्या वर्षातील ७२ व्या अंकात माहिती आढळते. 'आमच्या वाचकांपैकी कित्येकांस माहित असेलच की काव्येतिहासाच्या तिसऱ्या अंकात नाना फडणविसांची लहानशी रंगीत तसबीर घातली होती. ती चित्रशाळेचा आरंभ होय. तेव्हापासून सुधारणा होता होता हल्ली रामपंचायतन, शिवपंचायतन येथपर्यंत मजल येऊन ठेपली आहे. या तसबिरीचे काम कोणत्या तऱ्हेचे झाले आहे हे आम्ही स्वतः सांगण्याची गरजच उरली नाही. हजारो प्रती उडून दूरदूरच्या गावांहूनही त्याचविषयी प्रतिदिवशी मागण्या येत आहेत. या उद्योगाच्या संबंधाने आमच्या वाचकांस विशेषकरून एवढीच एक गोष्ट कळवावयाची आहे की, आमच्या इतिहास प्रसिद्ध पुरुषांच्या मूर्ति चिरकाळ रहाव्या एवढ्याकरीता मुळी हा कारखाना आम्ही काढला आहे.'[१] अशा प्रकारे ऐतिहासिक पुरुषापैकी नाना फडणविस, श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांचे चित्र चित्रशाळेच्या शिळेवर अनेक रंगात व मोठ्या आकारात छापण्यात आले होते. त्यांच्या मुळ तसबीरी युरोपीयन चित्रकारांनी तैलचित्रात काढून ठेवल्या होत्या. त्या तैलचित्रांची नक्कल पाणरंगात तयार करून चित्रशाळेने छापल्या होत्या. त्याचबरोबर तत्कालीन प्रसिद्ध पुरुषांची चित्रे ही चित्रशाळेने छापली, परंतु त्याला फारशी मागणी नव्हती. तेव्हा रावजी श्रीधर गोंधळेकर यांनी शास्त्रीबुवांना देवादिकांची चित्रे काढण्यास सुचविले. चित्रशाळेचे ड्राफ्टसमन बाळकृष्णपंत जोशी यांना ही कल्पना पटली व ते त्या संदर्भात उद्योगाला लागले. औंध संस्थानातील चित्रकार भिवा सुतार याने रामपंचायतनचे उत्कृष्ट चित्र काढले होते. पुण्याचे एक फोटोग्राफर राजाराम रंगोबा यांनी १८७४ मध्ये या चित्राचा फोटो काढून आणला व चित्रशाळेचे ड्राफ्टमन बाळकृष्णपंत जोशी यांनी त्यावरून रंगीत चित्र तयार करून चित्रशाळेत

छापले. हे चित्र इतके उत्कृष्ट झाले की एक महिन्याच्या आत त्याच्या २००० प्रती हातोहात खपल्या 'रामपंचायतनाच्या चित्राने चित्रशाळेचा पाया घातला व तिला नाव मिळवून दिले.'[२]

## २.१.२ चित्रशाळा छापखाना आणि वासुकाका जोशी :–

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या हयातीत वासुदेव गणेश उर्फ वासुकाका जोशी यांचा चित्रशाळेशी फारसा संबंध नव्हता. परंतु निबंधमालेच्या प्रकाशनामध्ये शास्त्रीबुवांना मदतनीस हवा होता. तेव्हा त्र्यंबक जोशी यांनी वासुकाकांचे नाव सुचविले. त्र्यंबक जोशी हे कृष्णशास्त्री चिपळुणकरांच्या 'नेटिव्ह प्रेस रिपोर्टर' च्या ऑफिसमध्ये काम करीत होते. त्यांना वासुकाका माहित होते. या काळात वासुकाका इंजिनिअरिंग कॉलेजच्या ॲग्रीकल्चरल क्लासमध्ये शिकत होते. तरीही त्यांना भरपूर वेळ होता व असल्या कामाची आवडही होती, म्हणून त्यांची शिफारस करण्यात आली. अशाप्रकारे वासुकाका निबंधमालेच्या कार्यात रूजू झाले. निबंधमालेच्या अंकाचे हिशोब तपासतांना त्यांना असे दिसून आले की, ज्या वर्गणीदारांची नावे पटावर आहेत पण ज्यांनी वर्गणी भरली नाही त्यांना सुद्धा कित्येक अंक मोफत जातात. तेव्हा वासुकाकांनी काटेकोर तपासणी करून मोफत जाणारे अंक बंद केले व १००० ऐवजी ६०० च अंक पाठवले. पुढे न्यु इंग्लीश स्कुलच्या उभारणीतही त्यांनी महत्त्वाचे योगदान दिल्याने विष्णुशास्त्री व वासुकाका यांच्यातील स्नेहभाव वाढत गेलेला दिसतो. विष्णुशास्त्रींच्या सहवासाने त्यांच्या मनात सरकारी नोकरी विषयी अप्रिती व स्वतंत्र उद्योगाविषयीची हौसही उत्पन्न झाली. यामुळे छापखान्याचे काम त्यांनी अगदी कौतुकाने स्विकारले. कौटुंबिक परिस्थिती चांगली असल्यामुळे पगार पाण्याची ही विशेष अपेक्षा ठेवली नाही. 'विष्णुशास्त्री यांच्या सहवासाने, त्यांच्या लेखांनी व त्यांच्या स्वतःच्या उदाहरणाने ज्यांच्या अंगी साहस, स्वतंत्र धंदा करण्याबद्दल आवड व सतत निःसीमभावाने उद्योग करणे वगैरे गुण आले त्यामध्ये रा. जोशी यांचा नंबर पहिलाच लागेल.'[३] शास्त्रीबुवांच्या निधनानंतर किताब खान्याची सर्व व्यवस्था वासुकाकांकडे आली. विष्णुशास्त्री नंतर त्यांचे बंधू लक्ष्मणराव, बाळकृष्ण जोशी (ड्राफ्टमन) व शंकर तुकाराम शाळिग्राम हे त्रिवर्ग चित्रशाळेचे मालक बनले. त्यापैकी बाळकृष्ण व शाळिग्राम हिशोबाच्या बाबतीत अव्यवस्थित असल्याने लक्ष्मणरावांनी वासुकाकांना चित्रशाळेत बोलावले व त्यांची व्यवस्थापक पदी नेमणूक केली. अशाप्रकारे वासुकाका इ.स.

१८८३ च्या सुमारास चित्रशाळेत दाखल झाले, तेव्हापासून अखेरपर्यंत त्यांनी चित्रशाळा चालविली व उर्जित अवस्थेस आणली. 'प्रारंभी चित्रशाळा कर्जात होती. १८८४ मध्ये बाळकृष्ण पंताचा संबंध तोडण्यात आला व तीन वर्षांनी शाळिग्रामांची भागीदारी संपुष्टात आली. या दोघांना ही मालकी हक्काबद्दल प्रत्येकी ३०० रुपये देण्यात आले. हे दोघे गेल्यावर लक्ष्मणकृष्ण चिपळूणकर, वासुदेव गणेश जोशी, विनायक त्र्यंबक चिपळूणकर हे तिघे चित्रशाळेचे मालक बनले. इ.स. १९०० साली या तिघांत भागीदारीचा दहा वर्षांचा करार झाला. त्यात लक्ष्मणराव सहा आणे व बाकीचे दोघे प्रत्येकी पाच आणे अशी भागीदारी ठरली.'[४] पुढे वासुकाकांनी लक्ष्मणराव व विनायकराव यांची भागीदारी तोडून इ.स. १९०५ साली चित्रशाळेची मालकी स्वतःकडे घेतली, तेव्हा केलेल्या करारनाम्यात पुढील विधान आढळते. 'रा. वासुदेव गणेश जोशी हे चित्रशाळेतील कर्जाची वगैरे वाट लावून आपलाही हक्क न ठेवता सर्व चित्रशाळा छापखान्याचा सार्वजनिक ट्रस्ट करून देणार अशा समजूतीने ही व्यवस्था केली आहे.'[५] यावरून चित्रशाळेची मालकी आपल्यालाच वंशपरंपरेने मिळावी अशी वासुकाकांची इच्छा नव्हती. उलट या संस्थेचे सार्वजनीक विश्वस्त निधीत रूपातर करावे असा संकल्प करून निस्वार्थीपणा व उदारपणाचा प्रत्यय दिला.

वासुकाका जोशी यांचा कालखंड भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा कालखंड होता. टिळक युगातील राजकारणात ते सक्रीय सहभागी होते. टिळकांचे निकटचे सहकारी आणि टिळकांचे परराष्ट्र मंत्री म्हणून त्यांचा उल्लेख झालेला दिसतो. प्लेगची साथ, रँडचा खुन, चाफेकर बधुंना पाठिंबा इ. गोष्टींमध्ये टिळकांसोबत अगदी सावली सारखे पाठिशी असणारे एकमेव गृहस्थ म्हणजे वासुकाका जोशी होय. टिळकांच्या परदेशवारीतही ते सहभागी होऊन त्यांना मार्मिक सुचना देत असत. क्रांतीकारकांना आश्रय देण्यासाठी चित्रशाळेच्या मालकीचा वाडा 'चिटगुप्पीचा वाडा' प्रसिद्ध होता. 'सार्वजनिक सभा रानडे, गोखले यांच्या ताब्यात होती ती त्यांच्याकडून काढून तिच्यात आपल्या विचारांच्या लोकांचे मताधिक्य करण्यात टिळकांना यश मिळाले याचे बरेच श्रेय वासुकाकांना द्यावे लागेल.'[६] इग्लंडच्या मजूर पक्षाची मदत मिळवून देण्यात व आयरिश क्रांतीकारकांशी संपर्क करण्यात टिळकांना वासुकाकांनी मदत केल्याचे दिसते. तसेच इग्लंड व अफगाणिस्तान यांच्यातील शत्रुत्वाचा फायदा घेऊन अफगाणिस्तानाच्या अमिरांच्या मदतीने हिंदुस्थानावर स्वारी करून इथल्या लोकांच्या मदतीने इंग्रजांचे राज्य बुडवावे

या टिळकांच्या मताला दुजोरा देऊन अमीरांस पुण्यात बोलवून मानपत्र देण्याची योजनाही त्यांनी आखली होती.

टिळकांच्या मृत्युनंतर गांधी राजकारणात ते सामील झालेले दिसतात. गांधीच्या असहकार चळवळीत ते सक्रीय सहभागी झाले होते. शाळा, महाविद्यालये, न्यायालये, विधीमंडळे यांच्यावर बहिष्कार घालण्याच्या कार्यक्रमात ते अग्रेसर होते. गांधीजींनी टिळकांच्या नावाने काढलेल्या 'स्वराज्य फंडाच' उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. खाडिलकरांना नवाकाळ हे वृत्तपत्र काढ्यास आर्थिक मदतही दिली; व छापखान्याची यंत्रसामग्रीही चित्रशाळेतून दिली. टिळकांच्या काळात काकांची भूमिका पडद्यामागून सुत्र हालविण्याची असल्यामुळे त्यांच्यावर शिक्षा भोगण्याची वेळ आली नाही. परंतु गांधीजींच्या कालखंडात त्याचीही कसूर भरून निघाली. पिकेटिंग (निषेध करणे) च्या चळवळीत आर्थिक दंड्ही त्यांना अनेक वेळा झालेला दिसतो. टाटांच्या धरणाविरूद्ध झालेल्या मुळशी सत्याग्रहात भाग घेतल्याने त्यांना पंधरा दिवसांची शिक्षाही झाली. स्वदेशीच्या चळवळीत चरखा चालवून कातलेल्या सुताचे कापड विणून त्याचे ताग घरोघरी जाऊन विकण अभिप्रेत होत स्वतः काका शिवरामपंत परांजपे, शंकरराव देव, बाळुकाका कानिटकर, हरीभाऊ फाटक अशी गांधीवादी मंडळी खांद्यावर खादीचे तागे टाकून शहरातून फेरी काढीत तेव्हा टिळक पक्षाचे लोक त्यांचा उपहास करीत. 'गांधाळ', 'सुताळ' अशा शेलक्या विशेषणांनी त्यांचा उद्धार केला जाई. असे असले तरी गांधीजींचा मार्ग अहिंसेचा असल्यामुळे या शिवराळांचा प्रतिकार करणे त्यात बसत नव्हते.

अशाप्रकारे टिळकांपेक्षा वयाने थोडे मोठे असलेल्या वासुकाकांनी अगोदर विष्णूशास्त्री चिपळूणकरांकडे उमेदवारी केली, त्यानंतर ते टिळकांचे सहकारी म्हणून वावरले व टिळकांच्या पश्चात त्यांनी गांधींचे राजकारण स्विकारले. 'तीन पिढ्या पाहिलेल्या या कार्यकर्त्याची तुलना शिवकाळातल्या रामचंद्रपंत अमात्य यांच्याशीच करता येईल.'[७] अशाप्रकारे चित्रशाळेचे मालक असणारे वासुकाका तत्कालीन राजकारणाातही तेवढेच सहभागी होते. पंचहौद मिशन मधील चहा बिस्कीट प्रकरण, क्रीडाभुवनातील दंगल, बापट प्रकरण, नेपाळ प्रकरण इत्यादी राजकीय घटनांमध्ये सुद्धा त्यांचा सक्रीय सहभाग होता. इ.स.१९३२ च्या सविनय कायदेभंगाच्या

चळवळीत सहभाग घेऊन त्यांनी तुरुंगवासही भोगला होता. त्यावेळी त्यांचे वय ७७ वर्षे होते. महात्मा गांधी, नेहरु पिता–पुत्र, सरदार पटेल, जमनालाल बजाज यांच्याशी त्यांचा स्नेह संबंध होता. या संदर्भातील अधिक माहिती त्यांच्या चरित्र ग्रंथात मिळते.

## २.१.३ चित्रशाळा एक सार्वजनिक संस्था :–

छापखाना चालवण्यासाठी व्यापारी दृष्टि काकांनी ठेवली नव्हती. वासुकाकांच्या सार्वजनिक कार्याची हकीकत आपण वरीलप्रमाणे पाहिलीच आहे. त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकरांनी 'वासुकाका जोशी आणि त्यांचा काळ' या ग्रंथात या संदर्भात विस्तृतपणे माहिती लिहिली आहे. 'पुण्यातील एक चळवळे गृहस्थ म्हणून ते त्या काळी ओळखले जात.'[८] लोकमान्य टिळक, हरीभाऊ आपटे, चि. वि. वैद्य, सी. के. दामले, शि. म. परांजपे, बाबासाहेब परांजपे, कृ. प्र. खाडिलकर, वीर वामन जोशी, म. रा. बोडस, राजवाडे इत्यादी विद्वानांच्या सहवासामुळे वासुकाकांच्या हयातीत चित्रशाळा ही सार्वजनिक व राष्ट्रीय संस्था बनली. चित्रशाळा हा केवळ छापखाना राहिला नव्हता, कारण पुण्यात त्या काळी अनेक लहान मोठे छापखाने होते पण ते नुसते छापखानेच होते. चित्रशाळेप्रमाणे कोणालाही सार्वजनिक संस्थेचे स्वरूप नव्हते. पण चित्रशाळा एक संस्था बनली होती. अनेक देशी परदेशी व्यक्तीनी चित्रशाळेला भेट दिली होती. 'चित्रशाळेच्या राष्ट्रीयत्वाचे स्वरूप 'चित्रमय जगतच्या' द्वारे दृग्गोचर होत होते.'[९] चित्रमय जगतचे संपादक त्र्यं. र. देवगिरीकर यांनी राशिया अंक असा खास अंक चित्रमय जगतात छापला होता. त्यामुळे त्यांच्या घराची झडती घेण्यात आली होती. अशा प्रकारे चित्रमय जगतच्या खास अंकामुळे चित्रशाळेवर झडत्या, जामीन, जप्त्या असे प्रसंग अनेक वेळा आलेले दिसतात व काही खास अंक राजद्रोहाच्या आरोपाने सरकारने जप्तही केलेले दिसतात. चित्रशाळेचे संस्थापक असणाऱ्या विष्णुशास्त्री चिपळुणकर यांच्याविषयी वासुकाकांच्या मनात आदर व कृतज्ञता होती. त्या भावनेतून त्यांनी विष्णुशास्त्री चिपळुणकरांचे चरित्र लिहिण्यासाठी २०० रुपयांचे बक्षीस जाहिर केले होते. या प्ररणेने शास्त्रीबुवांचे बंधू लक्ष्मण कृष्ण चिपळुणकर यांनी शास्त्रीबुवांचे अधिकृत चरित्र लिहिले. त्यातून उत्कृष्ट दर्जाचा चरित्र ग्रंथ निर्माण झाला. महात्मा फुले मंडईच्या मध्यभागी चिपळुणकरांचा पुतळा उभारून ४ सप्टें. १९२४ ला महात्मा गांधींच्या हस्ते त्याचे उद्घाटन केले. अशा प्रकारे चित्रशाळेचे मालक असणारे वासुकाका जरी

सार्वजनिक जीवनामध्ये क्रियाशील असले तरी चित्रशाळेकडे त्यांचे मुळीच दुर्लक्ष झाले नाही. देवादिकांच्या रंगीत चित्रांबरोबरच त्यांनी अनेक महत्त्वाचे व संग्राह्य ग्रंथ प्रसिद्ध केले. अशाप्रकारे प्रकाशन क्षेत्रातही चित्रशाळेने; तत्कालीन प्रसिद्ध छापखाना निर्णयसागरच्या तोडीची कामगीरी केल्याचा उल्लेख मिळतो.

संपूर्ण संस्कृत महाभारत, ज्ञानेश्वरी, तुकाराम, नामदेव, रामदास यांचे समग्र ग्रंथ, त्याचबरोबर प्राचीन कोश, शिवराम पंत परांजपे यांचे वाङ्मय, इतिहासाचार्य राजवाडे यांचे इतिहास ग्रंथ, निबंधमाला, अरबी भाषेतील गोष्टी, सरस्वती कोश, लावण्या, पोवाडे, धार्मिक, राजकीय, वैद्यकीय व शास्त्रीय ग्रंथ, कोश वाङ्मय, प्रवासवर्णने, कथा, कादंबऱ्या इत्यादी विविध प्रकारचे ७५० लहान मोठे ग्रंथ प्रसिद्ध करून मराठी साहित्याच्या भांडारात बहुमोल भर घालण्याचे काम चित्रशाळेने केलेले दिसते. याचबरोबर एक महत्वपूर्ण गोष्ट म्हणजे चित्रशाळेच्या उत्कर्षामध्ये त्यांचे पुतणे शंकर नरहर जोशी या व्यक्तीचेही महत्वपूर्ण योगदान आहे. ते वासुकाकांचे कर्तबगार जोडीदार व सहकारी होते. त्यांच्या सहकार्यामुळेच वासुकाकांना चित्रशाळेबरोबरच सार्वजनिक कामात लक्ष घालता आले. चित्रशाळा छापखान्यामध्ये नवे तंत्रज्ञान व आधुनिकता आणण्याचा प्रयत्न वासूकाकांनी केलेला दिसतो. ‘१८८७ पर्यंत चित्रशाळेत केवळ एक मोठे (लिओ मशीन) शिळा प्रेस होते. ४० हजार प्रतीचे मोडी पुस्तक छापण्याचे काम याच मशिनवर पूर्ण केले गेले. चित्रशाळेत छापलेले पहिले पुस्तक म्हणजे लोकहितवादीकृत ‘ऐतिहासिक गोष्टी’ हे होय’.[१०] पुढे चित्रशाळेत टाईप आल्याने सुधारणा झालेल्या दिसतात. त्याचबरोबर चित्रशाळेत फोटोग्राफीचे काम ही सुरु झाले होते. फोटोग्राफीच्या व्यवसायात चित्रशाळेने बरेच नाम कमवले; त्यातच भर म्हणून वासुकाकांनी आपल्या मुलाला ब्लॉक मेकींगच्या शिक्षणासाठी इग्लंडला पाठविले होते. शिक्षणपूर्ण होऊन परत आल्यावर त्यांनी चित्रशाळेत ब्लॉकमेकींगचे स्वतंत्र खाते सुरु केले. अशा प्रकारे चित्रशाळेच्या संवर्धनात आधुनिक यंत्रे व तंत्रज्ञानाचा ही तितकाच वाटा आहे असे विधान योग्य ठरेल.

पुस्तकांच्या प्रकाशनाबरोबरच वासुकाकांनी राष्ट्रीय मासिके काढण्याचा उपक्रमही केलेला दिसतो. १८९० मध्ये त्यांनी शिक्षण खात्याचे ‘मराठी शालापत्रक’ हे सरकारी मासिक चालवावयास घेतले होते. परंतु सरकारी रोषामुळे हे मासिक जास्त काळ चालले नाही.

त्यानंतर १९१० मध्ये चित्रमय जगत हे मासिक सुरु केले. त्याचबरोबर स्फूर्ति, चित्रमय कृषीवल, ध्रुव, आपली शेती अशी मासिकेही काढली होती.

चित्रशाळेने शालापत्रक हे मासिक सुरु केले होते. परंतु सरकारी रोषामुळे ते बंद पडले. त्यातील सरकारी पुस्तके जप्त करण्यात आली. तेव्हा वासुकाकांनी स्वतः शालोपयोगी क्रमिक पुस्तके तयार करण्याचा घाट घातला. त्यानुसार आकर्षक चित्रांचा वापर करुन मुलांसाठी मुळाक्षराचे तक्ते तसेच विविध प्रकारचे बालशिक्षण साहित्य प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली.

१९२० पर्यंत चित्रशाळेकडे 'स्टीम प्रेस' होता. पुढे तो ऑईल एंजिनवर चालू लागला. पुढे १९३० साली इलेक्ट्रिक मोटार आली. अशा प्रकारे छापखान्याच्या यंत्रसामुग्रीचा दर्जा उंचावत गेलेला दिसतो. छापखान्याचे प्रशासकीय विभागही पडलेले दिसतात. यामध्ये ब्लॉक खाते, ड्रॉईंग खाते, सुतार खाते, बायंडिंग खाते, कॅस्टर खाते, मशीन खाते, पुस्तक प्रकाशन व विक्री खाते अशी अनेक खाती सुरु झालेली दिसतात. अशा प्रकारे '४०० रुपायांच्या भांडवलावर सुरु झालेली चित्रशाळा वासुकाकांच्या हयातील ४ लाखावर गेली.'[११]

चित्रशाळेच्या कार्यपद्धतीचा विचार करता या छापखान्यात कोणकोणती कामे चालत होती हे समजते. या छापखान्यात मराठी, इंग्रजी, हिंदी व गुजराती भाषेतील सर्व प्रकारची पुस्तक छपाईचे काम चालत असे. त्याचबरोबर एकरंगी किंवा अनेकरंगी पोस्टर्स, डिजाइन्स, चित्रे, आकृत्या तयार केले जात. एकरंगी अगर अनेक रंगी झिंकवे व कॉपरचे ब्लॉक्स तयार करण्याचे कामही छापखान्यात केले जात. त्याचबरोबर सर्व प्रकारच्या टाईप, स्टीरिओज, शाई, फर्निचर, स्टिक्स, रोलर, कांपोझिशन ब्रश इत्यादी मुद्रणसाहित्य विकत मिळत असे. याचबरोबर देवादिकांची चित्रे, पुढाऱ्यांची चित्रे, सर्व प्रकारचे नकाशे, पृथ्वीचे ग्लोब, गोट्यांच्या चौकटी, मुळाक्षरांचे पत्ते, देवादिकांचे पत्ते, गंजिफा, जनावरांचे फळांचे तक्ते; मराठी, गुजराती, हिंदी, कानडी, उर्दू व बंगाली भाषेतील सचित्र वर्णमाला, मानवी शरीर, रचनादर्शक तक्ते, प्राणीशास्त्र, आरोग्य, विविध सण, विविध देशातील माणसे; यांविषयीचे सचित्र तक्ते; म्हणीचा तक्ता पशुपक्षी झाडे यांची मोठी चित्रे; जग, हिंदुस्थान, युरोप, आशिया, अमेरिका आफ्रिका यांचे शालेय नकाशे, शालेय पाठासाठीची सचित्र गोष्टीरुप पुस्तके येथे तयार करुन विकली जात. त्याबरोबर कापडापासून तयार केलेली फळे, लाकडी जनावरे सुद्धा चित्रशाळेत तयार करुन

विक्रीसाठी ठेवली जात असत. याशिवाय चित्रशाळेमध्ये पेनाची कटलरी, चाकू, कात्री अशा दैनंदिन उपयोगाच्या वस्तु तसेच काही खेळांची साधने उदा. हॉकी स्टीक, क्रिकेट बॅटस, फूटबॉल, सावंतवाडीचे लाकडी फळे, धरपुरची खादी, सोयाबीन, कॉफी, केशर, चर्मी जोडे, छपाईचा कागद व शाई यांचीही विक्री होत असे.

१९३८ पासून चित्रशाळेमध्ये मराठी माध्यम पहिली ते सातवीची नवीन मराठी क्रमिक पुस्तके तयार केली होती. ती सरकारकडून मंजूर होऊन शाळांमधून सुरु करण्यात आली. पुढे १९५४ साली बदललेल्या सरकारी धोरणामुळे चित्रशाळेने उच्च माध्यमिक शाळांसाठी निरनिराळ्या विषयाची पुस्तके अभ्यासक्रमानुसार तयार करुन घेतली होती. शिक्षणखात्याने त्यास मंजुरी दिल्याने निरनिराळ्या शाळांनी ती आपल्या अभ्यासक्रमात समाविष्ट केली होती.

चित्रशाळेत छापल्या जाणाऱ्या पुस्तकांची व नकाशांची काही ठोक गिऱ्हाइके होती.त्यामध्ये नाटकांची, सिनेमांची व निवडणुकीची पोस्टर्स, तक्ते इत्यादी छपाईचाही समावेश होता. या संदर्भातील प्रकाशन व संस्थाची यादी चित्रशाळेत दिली आहे. यामध्ये तेज ब्रदर्स पुणे, छत्रपति स्टोअर्स सातारा, नेवे ब्रदर्स जळगाव, नाईक स्टोअर्स औरंगाबाद, दादर बुक डेपो मुंबई, बिडकर पंढरपूर, ओरिएंटल बुक डेपो पुणे, इंटरनॅशनल बुक सर्व्हिस पुणे, जयचंद तलकसी मुंबई जिल्हा, लोकल बोर्ड सातारा, पुणे आणि खानदेश, हिंदुस्थान स्टोअर्स औरंगाबाद, आदर्श स्टोअर्स जळगाव, मॉडर्न बुक डेपो, व्हीनस बुक स्टॉल, कॉंटिनेंटल प्रकाशन, नॅशनल बुक ट्रस्ट दिल्ली, पब्लिकेशन डिव्हिजन दिल्ली, गजानन महाराज चरित्राचे प्रकाशक शेगाव, म. गांधी वाङ्मयाचे प्रकाशक महाराष्ट्र राज्य अशाप्रकारे संस्थात्मक व व्यक्तीगत पातळीवरील छपाई करण्यासाठी अनेक जन चित्रशाळेशी संबंध ठेवून होते. त्यातील स्थळांच्या उल्लेखावरुन चित्रशाळेचे नाव लौकिक दिल्लीपर्यंत गेलेले दिसते. अशाप्रकारे विविध प्रकाशन संस्था आणि सरकार सुद्धा चित्रशाळेमध्ये छपाईस प्राधान्य देत असल्याचे समजते.

## २.१.४ चित्रशाळेची मासिके :-

वासुकाका जोशी हे चित्रशाळेचे मालक होते. त्यांनी मासिक निर्मितीला विशेष प्राधान्य दिल्याचे दिसते. वृत्तपत्र काढण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसत नाही. चित्रशाळेची मासिके

चालविताना काकांनी आधुनिक व्यापारी दृष्टी स्वीकारली नव्हती. जाहिराती जास्त मिळवण्यासाठी प्रयत्न करणे. एजंटांना कमिशन देणे या गोष्टी त्यांना मान्य नव्हत्या. त्यामुळे चित्रमय जगत पेक्षा कमी अंक खपणारे मासिक जितके जाहिरातीचे उत्पन्न कमवू शकत तितके उत्पन्न या मासिकाला मिळत नसे. ठराविक लेखकांशिवाय इतरांना सुरुवातीच्या काळात मोबदला दिला जात नसे. तसेच काका अभिप्रायाच्या विरोधात होते. अभिप्राय म्हणजे फुकट जाहिरात करणे होय असे त्यांना वाटे. 'छंद व ध्येय या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.'[१२] अशी त्यांची विचारसणी मासिकाच्या निर्मिती मागे होती.

## मराठी शालापत्रक :-

सरकारी शिक्षण खात्याचे हे मासिक होते. मराठी शाळामधील शिक्षकांचे ज्ञान वाढविण्याच्या उद्देशाने 'पुणे पाठशाळापत्रक' या नावाने हे मासिक मे १८६१ मध्ये सुरु करण्यात आले. कृष्णशास्त्री तळेकर हे त्याचे पहिले संपादक होते. पुढे विष्णुशास्त्री पंडित हे संपादक पदावर आले. ऑगस्ट १८६३ मध्ये मराठी शालापत्रक म्हणून ते ओळखले जाऊ लागले. हे मासिक प्रामुख्याने मराठी शिक्षक मंडळीसाठी होते आणि सरकारी ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपल त्याचे संपादक होते. '१८६५ पासून कृष्णशास्त्री चिपळुणकर हे मराठी शालापत्रकाचे कर्ते झाले.'[१३] त्यांनी रासेलस व्याकरणावरील निबंध, अरबी भाषेतील गोष्टी वैगेरे पुस्तके या मासिकात क्रमशः प्रसिद्ध केली. गनिबंधाच्या प्रास्ताविक लेखामधील मिशनऱ्यांवरील टिका शालाधिकाऱ्यांना इतकी झोंबली की शाळा खात्याने हे मासिक बंद पाडण्याचा तडकाफडकी निर्णय घेतला.'[१४] शास्त्रीबुवांची लेखनी किती जबरदस्त व प्रभावशाली होती हे यावरुन दिसून येते.

पुढे सितारामपंत चिपळुणकर यांच्या सहाय्याने व सरकारच्या मदतीने चित्रशाळेने पुन्हा या मासिकाचे पुनरुज्जीवन करायचे ठरविले. आणि वासुदेव गणेश जोशी म्हणजेच वासुकाकांच्या संपादकत्वाखाली जानेवारी इ.स. १८९० मध्ये शालपत्रकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. या मराठी शालापत्रकाची ध्येय धोरणे पूर्वीचीच होती. ट्रेनिंग कॉलेजातील शिक्षक त्याचे संपादकीय सहाय्यक असत. हे मासिक जुन १९११ पर्यंत म्हणजे वीस वर्षे सरकारी आश्रयाने चालु राहिले. परंतु नंतर ब्रिटिश सरकारची ध्येय धोरणे बदलली. देशी वृत्तपत्रावरील बंधने

वाढली. त्यातच चित्रशाळेच्या राष्ट्रीय ध्येय धोरणामुळे सरकारची वक्रदृष्टी या छापखान्याविषयी झालेली दिसते. यामुळे १९१२ पासून या मासिकासाठी मिळणारा सरकारी आश्रय बंद झाला. पुढे चित्रशाळेचे मासिक म्हणून ते पुढे चालु राहिलेले दिसते. हे मासिक प्राथमिक शाळेतील शिक्षकांना उपयुक्त असल्याने शाळा व शिक्षक यांच्या सहकार्याने हे मासिक चालु राहिलेले दिसते. इ.स.१९१६–२० याकाळात इतिहास संशोधक द. वि. आपटे; चित्रमय जगत या मासिकाबरोबर या शालपत्रकाचेही संपादन करीत होते. पुढे त्र्यं. रं. देवगिरीकरांच्या काळामध्ये या मासिकाचे चौथे स्थित्यंतर घडून आले.'१९२९ पासून केवळ 'शालापत्रक' या नावाने ते फक्त मुलांच्यासाठी मुलांचे मासिक झाले.'[१५] व पुढे १९७४ मध्ये ते थांबविण्यात आले.

## स्फूर्ति :–

बेळगावचे सुप्रसिद्ध नाटककार कृष्णाजी लक्ष्मण सोमण उर्फ 'किरात' यांच्या संपादकत्वाखाली नोव्हेंबर इ.स. १९१८ पासून हे मासिक सुरु करण्यात आले. राष्ट्रीय जागृती करणाऱ्या लघुकथा, कादंबऱ्या, चरित्रे प्रसिद्ध करणे हे या मासिकाचे उद्दिष्ट होते. यामध्ये किरातांनी स्वतःलिहिलेली नाटके क्रमशः यातून प्रसिद्ध झाली. यामध्ये 'भासाची नाटके', 'माझी बहीण' या नाटकांचा समावेश होतो.पुढे राजकीय चळवळीला या काळात वेग आल्याने सरकारची वक्रदृष्टी यावर पडली आणि जामिन मागितल्यामुळे १९३४ च्या जानेवारीमध्ये ते बंद करावे लागले. १९३१–३२ च्या काळात र. गो.सरदेसाई हे या मासिकाचे संपादक होते.

## चित्रमय कृषीवल :–

वा. रा. गाडगीळ यांचे 'महाराष्ट्र कृषीवल' हे मासिक चित्रशाळेने चालविण्यास घेतले होते. कारण वासुकाकांना शेतीची आवड असल्यामुळे यावर आधारीत मासिक सुरु करण्याचा त्यांचा विचार होता. हे मासिक दोन वर्षे चालले. इ.स. १९३१ च्या जुलैला सुरु झालेल्या या मासिकामध्ये कृषी व्यवसायावर आधारीत अनेक लेख व उपयुक्त माहिती छापून येत असे. जून १९३३ पर्यंत या मासिकाचे अस्तित्व होते.

## ध्रुव :–

एप्रिल १९३५ पासून रा. प्र. कानिटकर यांच्या संपादकत्वाखाली पंधरा वर्षे चाललेले मासिक म्हणजे ध्रुव होय. ललित वाङ्मय व ललित कला यास वाहिलेले पुरोगामी विचाराचे

मासिक म्हणजे ध्रुव होय. या मासिकामध्ये समाज व वाङ्मय या अंगाने आरोग्य, आहार, सिनेमासृष्टी, विचारविहार, विनोद, विश्रांती, चालु महत्वाच्या घडामोडी अशी विविध सदरे होती.

या मासिकाने लघुकथा, गोमंतक, निसर्गोपचार, घटनापरिषद, आरोग्य, साहित्य संमेलन, म. गांधी संस्मरण असे अनेक वैशिष्टयपुर्ण विशेषांक प्रसिद्ध केले. सचित्र व जास्त पृष्ठ संख्या असणारा दिवाळीअंक दरवर्षी काढण्याचा चांगला उपक्रम या मासिकाने हाती घेतला होता. मार्च १९५० पर्यंत हे मासिक चालु होते.

**'आपली शेती'** या नावाचे शेतकीविषयक मासिक वासुकाका जोशी यांचे नातु जी. अनंततनय यांनी जुलै १९४७ ला सुरु केले. 'हिंदुस्थानातील शेती करु इच्छिणाऱ्या प्रत्येक बांधवांकरिता सहाय्यभूत होणारे मासिक, विधायक, पक्षभेदरहित व वादविवादापासून आलिप्त' असे याम मासिकाचे ध्येय होते. मार्च १९५० मध्ये विश्वस्तांच्या ठरावानुसार ते बंद करण्यात आले.

## २.२ चित्रमय जगतचे स्वरुप :–

### २.२.१ पार्श्वभूमी :–

चित्रमय जगत हे मासिक चित्रशाळा छापखान्याने जानेवारी १९१० मध्ये सुरु केले. मराठी मासिकांच्या सृष्टीत नावाजलेले व अग्रेसर ठरलेले हे मासिक होते. या मासिकाने महाराष्ट्राच्या बौद्धीक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. विविधज्ञानविस्तार व मनोरंजन या एकेकाळी गाजलेल्या मासिकांप्रमाणेच चित्रमय जगतचे एक स्वतंत्र युग होऊन गेले. 'विविध ज्ञानविस्तार' ६८ वर्षे, 'लोकमित्र' ४९ वर्षे व 'मनोरंजन' ४० वर्षे चालले तर 'चित्रमय जगत्ची कारकीर्द ६० वर्षाची होती.

वासुकाका जोशी हे चित्रमय जगतचे आद्य संस्थापक होते. त्यांनी परदेशवारी केली होती. इंग्लंड, अमेरिकेची सचित्र नियतकालिके पाहिलेली होती. तेव्हा लंडनच्या 'इलेस्ट्रेटेड लंडन न्युज' या सचित्र साप्ताहिकांच्या धर्तीवर व त्याच आकाराचे संपुर्ण चित्रमय असे मासिक काढण्याची त्यांनी योजना आखली होती. याशिवाय वासुकाका जोशी यांचे चिरंजीव रामभाऊ हे

नुकतेच विलायतेहून ब्लॉग मेकिंगची कला शिकून आले असल्यामुळे मासिकात जास्तीत जास्त चित्रे घालणे त्यांना सहज शक्य होते. मराठीत त्यावेळी अशाप्रकारचे एकही सचित्र मासिक नव्हते. 'विविध ज्ञानविस्तार', 'मनोरंजन', 'लोकमित्र', 'नवयुग', 'लोकशिक्षण' अशी काही मोजकीच मासिके त्याकाळात प्रसिद्ध होत होती. पण त्यात चित्रे नसत आणि ती आकाराने सुद्धा लहान होती. म्हणून चित्रमय जगत मासिकाचा आकार दुपट्टीहून अधिक (१३.८ ''९.४'') ठेवण्यात आला होता.

वासुकाकांनी हे मासिक कोणत्या हेतूने काढले व त्यात त्यांचा उद्देश काय होता याचा खुलासा त्यांच्या चरित्रात कोठेही आढळत नाही. तथापि 'केसरी' या सप्ताहिकाच्या ६ डिसेंबर १९०९ च्या अंकात पहिल्यापानावर चित्रमय जगत्‌ची मोठी जाहिरात प्रसिद्ध झाली होती. तिच्यावरुन पुष्कळसा उलगडा होतो. ती जाहिरात अशी होती– 'चित्रमय जगत या नावाचे मासिक पुस्तक आम्ही येत्या जानेवारीपासून सुरु करणार आहोत. हे मासिक पुस्तक दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्रसिद्ध होईल. प्रत्येक अंकात फोटोवरुन तयार केलेली चित्रे व कारटूने (विनोदी चित्रे) देण्यात यावयाची असून चित्रमय जगत हे अन्वर्थक नाव या मासिक पुस्तकास दिले आहे. चरित्रे, स्थलवर्णने समारंभाची वर्णने कादंबऱ्या व नाटके, चर्चात्मक व टीकात्मक वगैरे विषयाचा यात समावेश करण्यात येईल व प्रत्येक विषय सचित्र येईल. महत्वाच्या बातम्या मार्मिक टीकेसह देण्यात येतील व बातम्यांना अनुसरुन विनोदी चित्रे (कारटूने) व इतर चित्रे घालण्यात येतील.'[१६] या माहितीवरुन या मासिकाचे स्वरुप सर्व संग्राहक मासिक असे होते, त्याचबरोबर हे मासिक मराठीतील पहिले सचित्र मासिक होते या विधानाला पुष्टी मिळते.

चित्रमय जगत इ.स.१९१० मध्ये सुरु झाले. हे वर्ष किंबहुना संपुर्ण दशक भारतीय इतिहासाच्या राजकीय घडामोडीसाठी अत्यंत महत्वपूर्ण असे शतक होते. या पार्श्वभूमीवर मासिकाची निर्मिती झाली होती. ब्रिटिश सरकारने भारतीयांच्या एकात्मतेला विरोध करण्यासाठी 'फोडा आणि झोडा' ही निती वापरलेली दिसते. त्या संदर्भात बंगालची झालेली फाळणी अत्यंत महत्वाची आहे. या फाळणी विरुद्ध भारतीयांनी अनेक पातळीवरुन निषेध केलेला दिसतो. वृत्तपत्रे, नियतकालिकांमधून फाळणीच्या विरोधात जोरदार प्रतिक्रिया दिलेल्या दिसतात.

फाळणीचा निषेध करण्यासाठी परदेशी मालावर बहिष्कार टाकून स्वदेशी चळवळ सुरु करण्यात आली. १६ ऑक्टोबर १९०५ हा दिवस फाळणीच्या अंमलबजावणीचा दिवस होता. तो दिवस बंगालमध्ये शोकदिन म्हणून पाळला गेला. या फाळणीच्या निमित्ताने भारतात स्वदेशी चळवळीचा उदय झाला. त्या चळवळीपासून पुढे क्रांतीकारी चळवळीचा उदय झालेला दिसतो. इ. स. १९०६ च्या अखेरीस या नव्या राजकीय प्रवाहाचा उदय झाला. अधीर झालेल्या बंगाली तरुणांनी वैयक्तिक साहसाचा व क्रांतीकारी दहशतवादाचा मार्ग अवलंबिला. आपली देशभक्तीची भावना व्यक्त करण्याचा तो अत्यंत प्रभावी व एकमेव असा मार्ग होता. सरकारची अरेरावी व दडपशाही आणि काँग्रेसच्या नेत्यांची भिक्षुकी वृत्ती यामुळे बंगाली युवकांचा संताप अनावर झाला; जहाल नेते जनतेला सकारात्मक नेतृत्व बहाल करण्यात अपयशी झाल्यानेच हे तरुण बॉम्बच्या राजकारणाकडे वळले.

या सर्व कारणांमुळे विसाव्या शतकातील पहिले दशक विशेष गाजले होते. या काळात सरकारी दडपशाहीने कळस गाठला होता. लोकजागृतीचे अत्यंत महत्वाचे साधन म्हणून वृत्तपत्रांनी विशेष कामगिरी बजावलेली दिसते. सरकारने अशा वृत्तपत्रांची मुस्कटदाबी केलेली दिसते. इ.स. १९०८ मध्ये पुन्हा वृत्तपत्रे नियंत्रीत करण्यासाठी नवे कायदे करण्यात आले. अनेक वृत्तपत्रे आणि त्यांचे संपादक यांच्यावर खटले भरण्यात आले. त्यासंदर्भात लोकमान्य टिळकांची बॉम्ब विषयक लेखमाला खूप गाजली. एका लेखात ते म्हणतात, ‘जेव्हा अधिकारी वर्ग जनतेला विनाकारण धाक दाखवून घाबरुन सोडतो आणि त्यामुळे जनतेमध्ये उद्वेगाची भावना निर्माण होते; अशावेळी दडपशाहीचे असहिष्णू धोरण मुकाट्याने मान्य करण्याच्या तिरस्करणीय आणि भेकट अवस्थेतून ती बाहेर पडून उन्नत अवस्थेत पोहोचते आणि ही गोष्ट सरकारच्या लक्षात आणून देणारा बॉम्बचा आवाज उत्स्फूर्तपणे उमटू लागतो.’[१७] या लेखामुळे टिळकांवर राजद्रोहाचा आरोप करुन खटला भरण्यात आला. टिळकांवर झालेल्या राजद्रोहाच्या खटल्यामुळे संपुर्ण देशभर संतप्त प्रतिक्रिया उमटली. २२ जुलै १९०८ या दिवशी टिळकांची शिक्षा जाहीर झाली. त्यानंतर पुढे आठवडाभर मुंबईतील बाजार बंद होते.

या सगळ्या गोष्टींची पार्श्वभूमी चित्रमय जगतच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये महत्वाची ठरली. त्यातच भर म्हणून मोर्लेमिंटो सुधारणा प्रसिद्ध झाल्या. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ब्रिटिश

सरकारने आपली राजधानी कलकत्याहून दिल्लीला आणण्याचे ठरविले होते. काँग्रेसपक्ष दुबळा झाला होता. नेमस्त अर्ज विनंत्यांच्या राजकारणात गुंतले होते. या पार्श्वभूमीवर जानेवारी १९१० मध्ये चित्रमय जगत या मासिकाचा जन्म झाला.

## २.२.२ मासिकाचा उद्देश :–

'चित्रमय जगत मासिकाच्या पहिल्या अंकावर पहिल्या पानामध्ये आत्रिकुलोत्पन्न राहतव्य ऋषींचे ऋग्वेदातील व्याचिष्टे बहुपाय्ये यते महि स्वराज्य हे पाचव्या मंडलातील ६६ वे सुक्त दिले आहे त्यातून चित्रमय जगतचे ध्येय समजते.'[१८] त्यासाठी वरील सुक्ताचा मराठी अर्थ पहाणे आवश्यक आहे. ज्या राज्यव्यवस्थेत राजाचे अधिकार लोकमताने नियंत्रित झालेले असतात त्यालाच स्वराज्य किंवा बहुपाय्य असे स्वराज्य म्हटले जाते. अशा स्वराज्याची इच्छा बाळगणाऱ्या विद्वानांनी सामान्य जनतेची दृष्टीव्यापक, बनेल त्यांच्यात ऐक्य बनेल, ते विद्येने तेजस्वी होतील. व्यापक विचार, ऐक्य व ज्ञान हे तीन मार्ग ज्या ठिकाणी जाऊन एकत्र मिळतील तेथे स्वराज्य निर्माण होईल असा वेदग्रंथामध्ये उल्लेख आढळतो. वरील सुक्तावरुन थोडक्यात असे सांगता येईल की, जनतेला वैचारिक दृष्ट्या समर्थ बनवून त्यांच्यामध्ये ज्ञान आणि ऐक्यभाव वाढवणे व त्यांना स्वराज्याच्या प्राप्तीसाठी प्रेरीत करणे हा या मासिकाच्या निर्मितीचा मुळ हेतू होता.

याशिवाय मासिकाच्या पहिल्या अंकातील दुसऱ्या पानावर कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे जे पुर्ण स्मरण केले आहे, त्यांतील पुढील वाक्येही वाचकांना तितकीच अर्थबोधक वाटतील. ''चित्रमय जगत हे चित्रशाळेच्या उत्कर्षाचे फळ आहे. शास्त्रीबुवांनी न्यू इंग्लिश स्कूल, केसरी–मराठा, चित्रशाळा व किताबखाना ही त्यांनी लावलेली सर्व झाडे चांगली वाढीस लागून त्यांस सुंदर फळे येत आहेत. चित्रमय जगत हे त्यापैकीच एक फळ आहे. त्यादृष्टीने चिपळूणकरांचे अवतार कार्य संपादण्यासाठी स्वभाषेची सेवा, स्वदेश सेवा, सत्प्रीती व स्वावलंबन इत्यादी गुणांचे संवर्धन करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.'' या माहितीवरुन स्वदेश, स्वभाषा आणि सत्यधर्म यांचे पालन करणे आणि विद्वत्ता, नितीमत्ता स्वालंबन इत्यादी सदगुणांचे संवर्धन करणे हे या मासिकाचे उद्दिष्टे होते. याशिवाय या मासिकाच्या निर्मितीमागे विष्णुशास्त्री चिपळूणकर या महान राष्ट्रीय नेत्याची प्रेरणा होती हे ही समजते.

मासिकाच्या निर्मितीमागील ध्येय जाणून घेताना मासिकाचे 'ब्रिदवाक्य' तितकेच महत्वाचे आहे. आजकालच्या मासिकांमध्ये अशी ब्रिदवाक्ये आढळत नाहीत. परंतु २० व्या आणि १९ व्या शतकाच्या मासिकांमध्ये सुचक, समर्पक, आव्हानात्मक अशी ब्रिदवाक्ये आढळतात. तर काही मासिकांमध्ये मलपृष्ठावर चित्र काव्याचा नमुना वाचकांसाठी सादर केलेला असतो. चित्रमय जगत यास अपवाद नव्हते.

मी वंदितो श्री गणनायकासी।
विद्या अविद्याहि यदियदासी।।
प्रसन्न भक्तावरी होय विद्या।
पिडी अभक्तास सदा अविद्या।।

हा श्लोक चित्रमय जगतच्या प्रत्येक अंकावर पहिल्या पानावर छापून येत असे. या श्लोकातून असे समजते की विद्या, ज्ञान याचा प्रचार करणे हे या मासिकाचे ध्येय होते. गांधीयुगामध्ये या मासिकाचे स्वरुप राजकीय वृत्तीचे राष्ट्रीय मासिक असे झाले. म्हणजेच लोकांना राजकीय शिक्षण देणे, राष्ट्रीय भावना आणि राजकीय जाणिवा विकसित करणे हे या मासिकाचे ध्येय होते असेही स्पष्टपणे म्हणता येईल.

## २.२.३ चित्रमय जगतचे संपादक व लेखक :–

### चित्रमय जगत मासिक व संपादक वर्ग :–

प्रारंभीच्या काळात चित्रमय जगतचे संपादक कोण होते किंवा संपादकीय व्यवस्था कोण पाहत असावे याविषयी मासिकामध्ये नोंद आढळत नाही. केवळ मुद्रकाचे नाव मासिकावर छापले जात होते. परंतु चित्रशाळेचा इतिहास या ग्रंथामध्ये असा उल्लेख मिळाला आहे की, सुरुवातीच्या काळात नाटककार अनंत वामन बर्वे, ज. र. आजगावर, सेनापती बापट, वा. म. जोशी, ज. स. करंदिकर या सल्लागार मंडळींनी मिळून संपादकीय व्यवस्था पहिली होती. त्या काळात मासिकाच्या पहिल्या अंकांवर प्रकाशक व मुद्रक म्हणून वासुदेव गणेश जोशी यांचे नाव लिहिलेले दिसते. इ.स.१९२७ पर्यंत चित्रमय जगतच्या कोणत्याही अंकावर संपादकाचे नाव छापलेले दिसत नाही.

इ.स.१९१५ पासून इ.स.१९२१ पर्यंत चित्रमय जगतच्या संपादक पदी इतिहासाचार्य दत्तोपंत विष्णू आपटे यांची नियुक्ती झाली होती. त्या काळात इ.स.१९२१ पासून सहसंपादक म्हणून त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर काम पाहत होते. पुढे द. वि. आपटे यांनी स्वइच्छेने संपादक पदाचा राजीनामा दिल्यावर त्र्यं. र. देवगिरीकर यांनी इ.स.१९२२ पासून इ.स.१९५० पर्यंत संपादक पदाचा कारभार पाहिलेला दिसतो. त्यानंतर इ.स.१९५० पासून पुढे इ.स.१९६८ पर्यंत साहित्यिक रा. प्र. कानिटकारांनी संपादक पदाची सुत्रे हाती घेतलेली दिसतात.

## दत्तात्रय विष्णु आपटे :–

द. वि. आपटे महान इतिहास संशोधक व साहित्यकार होते. त्यांनी इतिहास लेखनात पुढीलप्रमाणे योगदान दिले आहे. 'ऐतिहासिक दंतकथा व गोष्टी', 'दोस्ताची श्रीरंगपट्टणवर मोहिम' अथवा सव्वाशे वर्षापूर्वीचा दक्षिण हिंदुस्थान, 'बर्थडेट ऑफ शिवाजी', 'महाराष्ट्र इतिहास मंजिरी' अथवा निवडक ऐतिहासिक उतारे, 'संशोधकाची छोटी जंत्री' इ. ग्रंथ त्यांनी स्वतः लिहिले आहेत. तर त्यांनी संपादीत केलेले ग्रंथ म्हणजे 'करण–कौस्तुभ', 'गोलाध्याय', 'ग्रहगणित बीजगणित', 'लीलावती', 'मराठ्यांच्या इतिहासाचे साहित्य', 'मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास', 'शिवकालीन पत्रसार संग्रह', 'शिवचरित्र प्रदीप', 'साधन परिचय' अथवा 'महाराष्ट्राचा पत्ररुप' इतिहास इत्यादी या ग्रंथावरुन इतिहासामधील विशेषतः मराठ्यांच्या इतिहासातील त्यांचे योगदान स्पष्ट होते.

याशिवाय इतिहास विषयाच्या संदर्भात 'भारत इतिहास संशोधक मंडळातून' त्यांनी अनेक निबंध वाचले, व्याख्याने दिली. इतरांच्या ग्रंथांना प्रस्तावनाही दिल्या. भारत इतिहास मंडळाचे त्रैमासिक, चित्रमय जगत, सह्याद्री, विविध ज्ञानविस्तार, ज्ञानप्रकाश इत्यादी मासिकांमध्ये त्यांनी इतिहासविषयक लेखन केले आहे. स्फुट लेखन आणि ग्रंथांना प्रस्तावना लिहिण्यामध्ये त्यांचा विशेष हातखंड होता. गणित आणि ज्योतिषशास्त्रावरही त्यांनी लेखन केले आहे. इतिहास संशोधनामधील सर्वात मोठी समस्या म्हणजे अचुक कालगणना करणे होय. या समस्येमुळेच त्यांचे लक्ष्य गणितशास्त्राकडे वळले होते. अचुक कालगणना करण्यामध्ये त्यांचा विशेष कटाक्ष असे. यामुळेच पुढे त्यांनी भास्कराचार्याच्या 'सिद्धांत शिरोमणी' या ग्रंथाचे प्राचीन टीकाकाराच्या टीकासह संपादन व प्रकाशन केले आहे.

चित्रमय जगतमधील त्यांचे लेख ऐतिहासिक घडामोडींची चिकित्सा करणारे आणि इतिहास लेखन व संशोधन पद्धतीवर आधारलेले होते. या विविध लेखांची माहिती पाहिल्यास त्यांचा इतिहास विषयक दृष्टीकोन कसा होता या विषयीची कल्पना येते.साधनांचे संकलन यावर त्यांनी विशेष भर दिलेला दिसतो. मोठ्या प्रमाणात इतिहासाची साधने गोळा करुन त्यांची चिकित्सक छाननी करुन विश्वासार्हता तपासली पाहिजे; व त्याच आधारावर इतिहास लेखन केले पाहिजे असा त्यांचा इतिहास लेखनाबाबतचा शास्त्रीय दृष्टीकान दिसतो. मराठ्यांच्या इतिहासा संदर्भात त्यांनी विशेष योगदान दिले आहे. आपल्या वैभवशाली इतिहासाला उजाळा देऊन त्यातून प्रेरणा घेण्याचे व इतिहास विषयक संशोधकीय वृत्ती वाढवण्याचे आवाहन यामधून दिसून येते. त्यांचे या संदर्भाचे सर्व लिखाण हे राष्ट्रीय इतिहास लेखन प्रवाहाच्या परंपरेतील आहे. चित्रमय जगतचे संपादन कार्य करतांना संपादकीय भूमिकेवरही त्याचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

## त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर :-

त्र्यं. रं. देवगिरीकर इ.स.१९२१ पासून चित्रमय जगतचे संपादक म्हणून रुजू झाले. चित्रमय जगत द्वारे त्यांनी सार्वजनिक व राजकीय जीवनामध्ये प्रवेश केला असे म्हणावयास हरकत नाही. कारण जरी या काळात एक प्रतिष्ठित मासिक म्हणून चित्रमय जगतचा नावलौकिक झालेला असला तरी; किंवा सार्वजनिक पुढारी व प्रसिद्ध लेखक यांच्या भारदस्त लेखामुळे मासिकाचा दर्जा वाढलेला असला तरी मासिकाला राजकीय रंग फारसा चढला नव्हता. 'राजकीय सद्यस्थिती' नावाचे संपादकीय सदर नुकतेच सुरु झाले होते. ज्यावेळी संपादक म्हणून देवगिरीकरांनी कार्यभार स्वीकारला त्यावेळी अनेक महत्वाच्या राजकीय घडामोडी घडल्या आणि चित्रमय जगतावर त्याचा प्रभाव पडून खऱ्या अर्थाने 'राजकीय वृत्तीचे राष्ट्रीय मासिक' म्हणून त्याचे स्वरुप पुढे आलेले दिसते.

चित्रशाळेचे मालक आणि चित्रमय जगतचे चालक वासुकाका जोशी हे कट्टर राष्ट्रीय वृत्तीचे गांधीवादी व कॉंग्रेसचे पुरस्कर्ते होते. देवगिरीकरही त्याच मताचे होते. या दोघांनी राजकीय चळवळीत भाग घेतला होता. इ.स.१९२५ मध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात फेरनाफेर अशी दुफळी निर्माण झाली होती. त्या कालखंडात 'ध्रुवाची गोष्ट खोटी असली पाहिजे' या

नावाची एक गोष्ट शि. म. परांजपे यांनी कौन्सिलवाल्यांना उद्देशून लिहिली. त्याच काळात प्रचलीत राजकारणावर आधारीत व्यंगचित्रे किंवा विनोदी चित्रे छापण्यास सुरुवात झाली. या व्यंगचित्राचा बराच बोलबाला झाला. चित्रमय जगतमधून काँग्रेसच्या धोरणाचे समर्थन करणारे लेख छापले जाऊ लागले.

प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीचा पहिला अंक हा विशेष अंक म्हणून प्रसिद्ध होऊ लागला. वेगवेगळ्या देशांची माहिती देणारे विशेष अंक खुप गाजलेले दिसतात. त्यांच्या संपादकीय लेखनामध्ये दरमहाच्या अंकात प्रासंगिक विषयावर आधारीत 'संपादकीय स्फुटविचार' हे सदर महत्वाचे आहे. हे सदर अत्यंत अभ्यासपुर्ण व चिंतनशील असे. भारतीय राजकारणाबरोबरच आंतरराष्ट्रीय राजकारणाचा चालु इतिहास यात प्रविष्ठ झालेला दिसून येतो. हे संपादकीय लिखाण निर्भिड व निःपक्षपाती असे. त्यामध्ये प्रचलीत राजकारण आणि सरकार यावर जरुर तेथे स्पष्ट टीका केलेली असे. ही टीका समतोल असल्याने संपादकीय स्फुटांना उच्च दर्जा प्राप्त झालेला असे.

इ.स.१९२२ पासून ते इ.स.१९५० पर्यंत त्यांनी मासिकाच्या संपादक पदाची भूमिका यशस्वीपणे निभावली. संपादकीय कार्याबरोबरच सार्वजनिक चळवळीत त्यांनी यशस्वी सहभाग घेतला होता. लोकमान्य टिळकांनंतर महाराष्ट्रात काँग्रेस व गांधीवाद रुजवण्याचे कार्य करणारी जी पिढी निर्माण झाली त्या पिढीचे कर्तुत्वशाली प्रतिनिधी म्हणजे त्र्यं. र. देवगिरीकर किंवा मामासाहेब देवगिरीकर होय. अनासक्तियोग, सत्य, अहिंसा, अपरिग्रह, सहिष्णुता, ब्रह्मचर्य आणि सेवा या व्रताचे त्यांनी पुरेपुर पालन केलेले दिसते. काँग्रेसच्या विधायक कार्यामध्ये ते हीरीरीने सहभाग घेत. शिरोड्याच्या सत्याग्रहाचे नेतृत्व त्यांनी केलेले दिसते. काँग्रेस निवडणूक मंडळाचे चिटणीस, वैयक्तिक सत्याग्रह व राज्यसभेतील अर्थसंकल्पावरील भाषणे इ. गोष्टी पहाता त्यांची निस्वार्थ बुद्धी आणि कर्मयोगी वृत्ती दिसून येते. काँग्रेसमध्ये कार्य करीत असताना त्यांच्याकडे अनेक अधिकारपदे चालून आलेली दिसतात. ते शहर काँग्रेस, जिल्हा काँग्रेस व प्रदेश काँग्रेस चे अध्यक्ष झाले.

१९५० मध्ये पहिल्या लोकसभेच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. पुढे ते राज्यसभेत गेले. या कार्यातही त्यांनी गांधीवादाच्या प्रचार प्रसाराचे काम सोडले नाही. त्यामुळेच महाराष्ट्र

गांधी स्मारक निधीच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झालेली दिसते. ते आजन्म ब्रह्मचारी असल्यामुळे कौटुंबिक स्वार्थ नव्हता. त्याचप्रमाणे कोणाचा पाशही नव्हता. पुढे ते प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष झाले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष झाले. ही पदे त्यांनी निस्वार्थीपणे व लोकइच्छेखातर स्वीकारलेली दिसतात.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या वेळी विधायक मार्गाने प्रयत्न करुन राज्यकर्ते व राष्ट्रीय नेते यांचे मन वळविण्याचा प्रयत्न त्यांनी शेवटपर्यंत केला होता. परंतु त्यांना जनतेकडून आरोप सहन करावे लागले. पुणे मुंबईच्या वृत्तपत्रांमधून त्यांच्यावर अश्लाघ्य हल्ले करण्यात आले तरीही ते त्यांनी सहन करुन परंतु काँग्रेसशी एकनिष्ठा राहून काँग्रेसला महाराष्ट्राची बाजू समजून सांगण्याचा अखेर पर्यंत प्रयत्न केला होता. 'प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष, राज्यसभेचे सदस्य व वर्किंग कमिटीचे सभासद या तीन्ही अधिकारपदाचा उपयोग करुन ते महाराष्ट्राचा लढा एकाकी लढवत होते.'[१९] हे अनेकांना माहित नाही.

त्र्यं. र. देवगिरीकर हे महान कर्मयोगी होते. २८ वर्षे चित्रमय जगतचे संपादन त्यांनी केले. १२ वर्षे संसद सदस्य म्हणून कार्य पाहिले. लोकसभा व राज्यसभेत अभ्यासपूर्ण भाषणे दिली. आकाशवाणीवर १७ वर्षे भाषणे दिली. ५५ पुस्तके व शेकडो लेख लिहिले. तसेच इ.स.१९५८ ते इ.स.१९७५ पर्यंत गांधी निधीचे अध्यक्ष म्हणून कार्य केले.

त्यांची ग्रंथसंपदा पुढीलप्रमाणे सांगता येईल. स्वातंत्र्याच्या इतिहास ग्रंथांमध्ये स्वातंत्र्याच्या पूर्वतयारीचा इतिहास, महाराष्ट्रातील कायदेभंगाचा इतिहास, रशियन राज्यक्रांतीचा इतिहास, आशियाच्या पारतंत्र्याचा इतिहास, फिलिपाईन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास, आर्यलंडच्या स्वातंत्र्याचा इतिहास, भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास इत्यादी ग्रंथ लिहिले आहेत.

तत्कालीन प्रचलीत राजकारणावर त्यांनी औद्योगिक हिंदुस्थान, आजचा जर्मनी, पहिली पंचवार्षिक योजना, भारत–चीन संघर्ष, तिबेटचा बळी, कच्छचा रणसंग्राम, नागभूमि, स्वातंत्र्योत्तर काळातील समरप्रसंग इत्यादी ग्रंथाचे लेखन केले आहे.

राज्यघटना व राज्यशास्त्र यावर आधारीत ग्रंथांमध्ये फेडरेशन व त्याचे भवितव्य, वसाहतीचे स्वराज्य, घटना परिषद, अल्पसंख्याक, भारतीय राज्यघटना, पाकिस्तानची राज्य घटना, भारतीय राज्यघटनासार यांचा समावेश होतो.

चरित्रे व आठवणी यामध्ये वासुकाका जोशी व त्यांचा काळ, भारताचे भाग्यविधाते, राजकीय आठवणी, नेहरु व अन्य नेते, वल्लभभाई पटेल, थोरांच्या आठवणी, जवाहरलाल नेहरुंच्या आठवणी या ग्रंथाचा समावेश होतो.

महात्मा गांधी विषयक ग्रंथामध्ये गांधीचा अहिंसावाद, चिरस्मृती, गांधी योगी की प्रयोगी, गांधीजीची अखेरची चार वर्षे, महात्मा गांधींचा दैनंदिन विचार, गांधीचा वारसा, आश्रम भजनावली या ग्रंथाचा समावेश होतो.

यामधून ते महान साहित्यिक व इतिहास लेखक होते हे निर्विवादपणे सांगता येईल. थोडक्यात असे सांगता येईल की 'काँग्रेसभवन, गांधीभवन, चित्रशाळाभवन ही त्रिभुवने उभारण्याचे काम त्यांनी निर्विदवादपणे केले.'[२०]

## रा. प्र. कानिटकर :–

श्री. रा. प्र. कानिटकर हे चित्रमय जगतचे तिसरे संपादक होते. इ.स.१९५० ते इ.स. १९६८ पर्यंत म्हणजे चित्रमय जगताच्या अंतापर्यंत त्यांनी संपादकत्वाची भूमिका पार पाडलेली दिसते. हे एक महान साहित्यकार होते. त्यांची ग्रंथसंपदा पुढीलप्रमाणे सांगता येईल. चरित्रग्रंथामध्ये त्यांनी वामन मल्हार जोशी, पं. मोतीलाल नेहरु, कवींद्र रविद्रनाथ टागोर, राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद, सुभाषचंद्र बोस, बेनिटो मुसोलिनी, पं. जवाहरलाल नेहरु, राजाजी, त्र्यं. र. देवगिरीकर यासारख्या ग्रंथाचा समावेश होतो. त्यांच्या इतर लिखानामध्ये निसर्गोपचार क्रांतीच्या ज्वाला, काँग्रेस दीपिका, स्वतंत्र ब्रह्मदेश, चित्रशाळेचा इतिहास यांचा समावेश होतो.

अनुवादित ग्रंथांमध्ये भारतीय रंगभूमी, गोपाळ कृष्ण गोखले, महात्मा गांधी संकलित वाङ्मय खंड–३६, ३७, ४६, ४७ यांचा समावेश होतो. तर संपादित ग्रंथामध्ये सुवर्णपंचक, आगरकर दर्शन, राजवाडे दर्शन, कोल्हाटकरांचे आत्मवृत्त यांचा समावेश होतो.

यावरुन साहित्य, लेखनी, संपादन, अनुवाद, चरित्र लेखनातील त्यांचा हातखंडा दिसतो. चित्रमय जगतच्या संपादक पदी रुजु झाल्यानंतर ज्या कारणाने हे मासिक सुरु झाले होते ते ध्येय साध्य झाले होते. भारतीय राजकीय शिक्षण देण्याचे ध्येय यशस्वी रित्या या मासिकाने गाठले होते. मासिकाच्या वाटचालीचा एक अध्याय पूर्ण झाला होता. पुन्हा तेच ध्येय कायम ठेवून नफ्या तोट्याचा विचार न करता मासिक चालू ठेवणे कठीण झालेले दिसते. विश्वस्त मंडळाचे अंतःस्थ वाद वाढून जानेवारी १९६८ मध्ये या मासिकाला पुर्ण विराम द्यावा लागला.

या तीन्ही संपादकांच्या धोरणांचा व व्यक्तीमत्वाचा प्रभाव चित्रमय जगताच्या ध्येय धोरणावर पडलेला दिसून येतो. हे मासिक अगदी अखेरच्या अंकापर्यंत वाचनीय व लोकप्रिय राहिलेले दिसते.

## चित्रमय जगतचा लेखक वर्ग :-

या मासिकाच्या लेखकवर्गामध्ये तत्कालीन सामाजिक राजकीय नेते, विचारवंत, इतिहास संशोधक, साहित्यिक यांचा समावेश होतो. 'सार्वजनिक पुढारी व प्रसिद्ध लेखक यांच्या भारदस्त लेखांमुळे मासिकाचा दर्जा वाढला होता.'[२१] यामध्ये शि. म. परांजपे, कृ. प्र. खाडिलकर, चिं. वि. वैद्य, लो. टिळक, इतिहासाचार्य राजवाडे, न. चि. केळकर, वि. सी. गुर्जर, वैकुंठराय, कृष्ण शास्त्री घुले, डॉ. खानखोजे, वीर वामन जोशी, लोकनायक अणे, दा. वि. गोखले, श्री. कृ. कोल्हटरकर, दाजी नागेश आपटे, सरदार किवे, माधवराव बोडस, ह. ना. आपटे, सी. के. दामले, ल. ब. भोपटकर, के.रा. कानिटकर, ग. र. अभ्यंकर, द. वा. पोतदार अशा सारख्या प्रसिद्ध व्यक्तींचा समावेश होता. कवि अनंततनय, आनंदराव टेकाडे, गोविंदाग्रज, तिवारी यांच्या कविता चित्रमय जगतमध्ये छापल्या जात. यांच्या विषयी सविस्तर माहिती पुढील प्रकरणांमध्ये येणार आहे.

## २.३ मासिकाची वैशिष्ट्ये :-

## २.३.१ मुखपृष्ठ :-

चित्रमय जगतची मुखपृष्ठे अत्यंत आकर्षक असत. हि चित्र चित्रशाळेचे प्रसिद्ध चित्रकार बी. बी. जुवेकर काढत असत. इ.स. १९३० पर्यंतची विविध अंकांची मुखपृष्ठे पाहिली असता हे

लक्षात येते की, यामध्ये रेखाचित्रांना विशेष प्राधान्य दिले होते. पौराणिक, धार्मिक, निसर्ग विषयक, छायाचित्रांनी युक्त मुखपृष्ठे छापली गेली. त्याचबरोबर समकालीन मानवी जीवन व्यवहारांनाही यात स्थान दिलेले दिसते. ही चित्रे चित्रशाळेसाठी काम करणारे बी. बी. जुवेकर, एस. डब्ल्यु. अधिकारी, एस. एस. माळी, एस. हळदणकर यांनी काढली आहेत.

इ.स. १९३० च्या काळातील अंकामध्ये स्वातंत्र्य लढ्याच्या अनुषंगाने मुखपृष्ठे देण्यात आली. इ.स. १९४१ पासूनच्या अंकामध्ये इ.स.१९४७ पर्यंतच्या अंकापर्यंत काँग्रेसच्या नेत्यांची छायाचित्रे मोठ्या प्रमाणात मुखपृष्ठावर छापलेली दिसतात. यामध्ये लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरू यांची छायाचित्रे विशेषत्वाने आहेत. इ.स. १९४७ ऑगस्ट या भारताच्या स्वातंत्र्यकाळात 'स्वतंत्र हिंदुस्थान अंक' काढण्यात आला तेथून पुढे इ.स.१९५० पर्यंत प्रत्येक अंकावर सारनाथ अशोक स्तंभ व स्वतंत्र भारताचा ध्वज तिरंगा हा मुखपृष्ठावर झळकलेला दिसतो.

भारतातील अनेक जाती जमाती, विविध राज्यातील स्त्रीया त्यांची वेषभूषा व्यवसाय यांची माहिती देणारी छायाचित्रे व रेखाचित्रे ही चित्रमय जगतच्या मुखपृष्ठावर दिसतात. यातील विशेष मुखपृष्ठांमध्ये दिवाळी अंकाचा समावेश होतो. त्याचबरोबर नृत्याविष्कारातील स्त्रीया विविध कुलीन सुंदर स्त्रीयाच्या विविध पोज, शिष्ठाचार दर्शविणारी मुखपृष्ठेही दिसतात.

भारतातील ऐतिहासिक धार्मिक प्रेक्षणीय स्थळांची माहिती देणारी मुखपृष्ठे दिसतात. त्याचबरोबर खास अंक किंवा विशेष अंकास अनुलक्षुन मुखपृष्ठेही छापलेली दिसतात. विविध देशाचे जे खास अंक काढले गेले त्या अंकामध्ये त्या देशाची राष्ट्रीय प्रतिके, नकाशा, लोकजीवन, राष्ट्रपुरुष यांची माहिती देणारी चित्रे मुखपृष्ठावर छापली गेली होती. खास चीन अंक, खास जपान अंक, झेकोस्लोव्हिया अंक, रशिया अंक, पाकिस्तान अंक, कोरिया अंक, नवचीन अंक, अमेरिका विशेषांक याची मुखपृष्ठे या संदर्भाने महत्वपूर्ण आहेत.

## २.३.२ विषयानुक्रमणिका :–

विषयानुक्रमणिका हे या मासिकाचे वैशिष्ट्ये होते. प्रत्येक अंकाच्या मुखपृष्ठांच्या मागील पानावर विषयानुक्रमणिका आढळते. यामधून अंकामध्ये कोणत्या विषयावर आधारीत

लेखाचा समावेश आहे हे समज होते. मासिकाचे सर्व संग्राहक स्वरुप समजून घेण्यासाठी ही अनुक्रमणिका महत्वाची आहे. तसेच काळानुसार मासिकाचे बदलत गेलेले स्वरुप आणि विषय समजण्यासाठी सुद्धा मार्गदर्शन याधमून मिळू शकते.

## २.३.३ सुची :-

मासिकाच्या प्रत्येक वर्षाच्या शेवटच्या अंकात सुची देण्याची पद्धत होती यामध्ये वर्षभरात प्रसिद्ध होणाऱ्या बारा अंकातील विविधा लेखाची संक्षिप्त यादी प्रसिद्ध होत असे.

## २.३.४ पहिले सचित्र मासिक :-

चित्रशाळा हा छापखाना देवादिकांची चित्रे छापण्यासाठी प्रसिद्ध होता. याच छापखान्याने पहिले सचित्र मासिक सुरु केले ते म्हणजे चित्रमय जगत होय. या मासिकामध्ये नानाविध चित्रांचे ब्लॉक्स विषयानुरुप देण्यात येत असत. या रंग रंगोटी मागे केवळ नेत्र सुख हा हेतु नव्हता. तर ते चित्र विषयाच्या आशयास पोषक असावे यासाठी चित्रशाळेचे मालक व चित्रमय जगतचे चालक वासुकाका जोशी विशेष लक्ष देत. राजा रवि वर्मा सारखे महान चित्रकार चित्रशाळेसाठी काम करीत होते. परंतु चित्रमय जगत सुरु होण्यापूर्वीच त्यांचा वासुकाका जोशी यांच्याशी वाद होऊन त्यांनी तेथील नोकरीचा राजीनामा दिला होता.

चित्रमय जगत या मासिकाचे नाव ठेवण्यामागे वासुकाका जोशी यांची महत्वाची भूमिका होती. चित्रशाळेचे मासिक म्हणून 'चित्र' हा शब्द विशेष अर्थाने वापरला गेला. एखादी घटना फक्त वाचणे; व ती सचित्र वाचणे यात फरक असतो. घटनेचे उत्तम आकलन होण्यासाठी चित्रे महत्वाची असतात. 'घटनेचा सम्यक बोध'[२२] होण्यासाठी चित्रे महत्वाची असतात. म्हणून या मासिकाचे नाव चित्रमय जगत ठेवण्यात आले असावे.

चित्रमय जगत मधून अनेक छायाचित्रे व रेखाचित्रे प्रसिद्ध होत असत. यामध्ये ऐतिहासिक, धार्मिक स्थळांचे फोटो, भारतीय व आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्वपूर्ण व्यक्तींची छायाचित्रे, तसेच विविध जाती-जमातीचे देशी विदेशी लोक, आदिवासी लोक यांची छायाचित्रे; तसेच दोन्ही महायुद्धाची चित्रे प्रसिद्ध झालेली दिसतात. याशिवाय रेखाचित्रामध्ये

सणउत्सवाची चित्रे, ऐतिहासिक व्यक्तींच्या तसबीरी, इतिहासविषयक चित्रे, पौराणिक धार्मिक चित्रे, कथाचित्रे, विनोदी चित्रे अशा चित्रांचा समावेश यामध्ये होतो.

वरील चित्रांची सविस्तर माहिती पुढील प्रकरणामध्ये पाहणार आहोत. मासिकासाठी व संपुर्ण छापखान्यासाठी चित्रकारीचे काम करणारे अतिशय कुशल व कलात्मक चित्रकार दिसतात. ज्यांनी चित्रमय जगतच्या प्रसिद्धीमध्ये महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे, यामध्ये बी. बी. जुवेकर, एन. जी. हळदनकर, एन. एस.जोशी, व्हि.एम. खरे तत्कालीन बालचित्रकार एम. आर.आचरेकर, चित्रकार दाणी, चित्रकार बागल यांची चित्रे महत्वाची आहेत.

## २.३.५ चित्रमय जगतमधील विशेष सदरे :–

चित्रमय जगतचे स्वरुप हे सर्वसंग्राहक असल्यामुळे विविध विषय हातळले गेले. तसेच अशा विविध विषयाला अनुसरुन अनेक सदरे या मासिकामध्ये सुरु करण्यात आली होती. इ.स.१९१० पासून इ.स.१९६८ पर्यंतच्या विविध सदरांचा समावेश यामध्ये केलेला आहे.

यात सर्वात महत्वाची सदरे म्हणजे महायुद्धांच्या काळात गाजलेली 'पहिले महायुद्ध' आणि 'दुसरे महायुद्ध' ही सदरे होय. या सदरांमधून महायुद्धाच्या ताज्या, सचित्र व वस्तुनिष्ठ लेखांच्या सहाय्याने महायुद्धांचा इतिहासच सादर करण्यात आला होता. या सदरांमध्ये कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी लिखाण केले होते.

'विनोदी चित्रे' या नावाचे सदर इ.स.१९१० पासून सुरु करण्यात आले होते. राजकारण, समाजकारण यावर आधारित अनेक महत्वाच्या घटनांची विनोदी चित्रे यात दिली आहेत. त्यावरुन सामाजिक व राजकीय जीवनातील व्यंगात्मक पण वास्तववादी भाष्य यात केले गेले आहे.

'एक गोष्ट' नावाच्या सदरातून विविध प्रकारच्या पौराणिक, ऐतिहासिक कथा, चरित्रकथा, राजाराणीच्या बोध कथा छापल्या गेल्या. या सर्व कथातत्कालीन मानवी विचारशक्ती, नैतिकता, जीवनसरणी, सामाजिक वास्तव, भावभावना यावर प्रकाश टाकतात.

'नाटकांचे देखावे' या सदरा अंतर्गत त्या काळात गाजलेल्या विविध नाट्यसंस्था, त्यांची नाटके, नाटकांची परीक्षणे, देखावे छापून आणले जात. हे सदर अत्यंत लोकप्रिय व मनोरंजनपर होते.

भारतीय राजकारणावर भाष्य करणारे 'संपादकीय स्फुटविचार' हे सदर अत्यंत गाजले. स्वातंत्र्यचळवळीचा वास्तवादी इतिहास यामध्ये छापला जात असे. अशाप्रकारे चित्रमय जगतमधील या विशेष सदरामुळे मासिकाच्या लोकप्रियेत वाढ झाली.

## २.३.६ चित्रमय जगतचे विशेष अंक :–

चित्रमय जगतचे विशेष अंक हे विशिष्ट विषयांना, प्रासंगिक घडामोडींना व थोर व्यक्तींना अनुलक्षुण काढले होते. त्यामध्ये 'चीन अंक' (ऑगस्ट १९२४), 'रशिया अंक' (जून १९२९), 'औद्योगिक हिंदुस्थान अंक' (जानेवारी १९३३), 'जपान अंक' (जानेवारी १९३६), 'महात्मा गांधी अंक' (एप्रिल १९३१), 'जागतिक शांतता अंक' (जानेवारी १९३३), 'महाराष्ट्र काँग्रेस अंक' (जानेवारी १९३६), 'युरोप अंक' (जून १९३६), 'स्पेन अंक' (जानेवारी १९३६), 'झेकोस्लोव्हिया अंक' (जानेवारी १९३९), 'महायुद्ध अंक' (जानेवारी १९४०, १९४१, १९४२, १९४४), 'वासुकाका जोशी अंक' (जानेवारी १९४५), 'काँग्रेस हिरक महोत्सवी अंक' (जानेवारी १९६४), 'स्वातंत्र्य महोत्सव अंक' (ऑगस्ट १९४७) अशा प्रकारचे विविध विशेष अंक निरनिराळ्या विषयाला वाहिलेले दिसतात. यावरुन मासिकाची व्यापकता दिसून येते.

## २.३.७ जप्त केलेले अंक व मासिकावरील खटले :–

चित्रमय जगताचे काही अंक अतिशय प्रभावी, लक्षणीय, वेधक होते. या अंकांनी वाचक वर्गात तर प्रसिद्धी मिळवलीच परंतु सरकार दरबारीही याची दखल घ्यावी लागली. समाज जागृतीचे कार्य करणाऱ्या वृत्तपत्र व नियतकालीकांवर सरकारची वक्रदृष्टी असणे सहाजिकच होते. त्यात वृत्तपत्रांची गळचेपी करणारे कायदेही सरकारने पास केले होते. असे खटले चित्रमय जगतावरही चालविण्यात आले होते. त्या संदर्भात इ.स.१९३२ चे जानेवारी फेब्रुवारी मार्च चे अंक महत्वाचे आहेत. हे तीन्ही अंक जप्त करण्यात आले होते. जानेवारी १९३२ चा'लष्करी

अंक' खुपच गाजला. कारण यात हिंदी लष्कराची इतकी गुप्त तपशीलवार माहिती देण्यात आली होती की इतर कोणत्याही मराठी मासिकात अशी प्रसिद्ध झाली नव्हती, त्यामुळे हा अंक जप्त झाला. त्यानंतर १९३२ मधील फेब्रुवारीचा 'सप्तर्षी' कविता असणारा अंक सरकारी दडपशाहीमुळे जप्त केला गेला. त्यामुळे या कवितेचे कवी प्रोफेसर नारायण केशव बेहरे यांची नोकरीही गेली. राष्ट्र प्रेमाने भरलेली ही कविता ब्रिटिश सत्तेविषयी असंतोष निर्माण करणारी होती. त्यामुळे हा अंक जप्त झाला. मार्च १९३२ च्या अंकात बंगालच्या गर्व्हनरवर गोळी झाडणाऱ्या वीणादासचे स्टेंटमेंट छापले होते. 'स्फुट वीणादास'या नावाने ते छापण्यात आले होते. या सर्व अंकामुळे सरकारविरोधी वातावरण निर्माण होईल म्हणून हे अंक जप्त करुन चित्रशाळेचे ब्लॉक्सही उचलून नेण्यात आले होते. अशाप्रकारे या माहितीवरुन हे मासिक राष्ट्रीय वृत्ततीचे व देशकार्याला वाहिलेले होते हे समजते.

## २.४ चित्रमय जगतचे सर्व संग्राहक व व्यापक स्वरूप :-

वासुकाकांनी चित्रमय जगत हे मासिक मराठी प्रमाणेच हिंदी, गुजराथी मधूनही काढले होते. गुजराथी चित्रमय जगत हे मासिक ३३ वर्षे चालेले (१९१५-४८) तर हिंदी चित्रमय जगत मासिक १३ वर्षे (१९१९-३२) पर्यंत चालले. याद्वारे हिंदी, गुजराथी मधील अनेक नामांकित लेखक मासिकाला संपादक म्हणून लाभलेले दिसतात. याशिवाय कानडी मधून सुरु केलेले मासिक दोन वर्षे चालले. इंग्रजी भाषेतील चित्रमय जगत काढण्याचा विचार वासुकाकांनी केला होता. परंतु त्याला फारसे यश आले नाही. याद्वारे चित्रमय जगत वेगवेगळ्या भाषांमधून वाचले गेले. त्यामुळे पर्यायाने वाचक वर्गातही मोठ्या प्रमाणावर भर पडलेली दिसते. यावरुन चित्रमय जगतचे स्वरुप व व्याप्ती किती विस्तारलेली होती याची कल्पना येते.

## २.४.१ चित्रमय जगतमधील विविध लेख :-

आंतरराष्ट्रीय लेख, चरित्र लेख, शिक्षण विषयक लेख, शास्त्रीय लेख, आहार आणि आरोग्य विषयक लेख, अर्थविषयक लेख, धर्मतत्वज्ञानाअंतर्गत येणारे लेख, स्त्री विषयक लेख, सामाजिक लेख, साहित्यविषयक लेख, भारतीय राजकारणावरील लेख यांचा समावेश होतो.

## २.५ चित्रमय जगतचा अंत :–

चित्रमय जगत या मासिकाचा अंत कसा झाला हे जाणून घेताना वासुकाका जोशी यांची भूमिका जाणून घेणे फार महत्वाचे होते. वासुकाकांनी कोणतीही व्यापारी किंवा व्यावहारिक दृष्टी ठेवून मासिक चालवले नाही. जाहिराती मिळवण्याबाबत प्रयत्न केला नाही. पुर्णतः लोकाश्रयावर हे मासिक अवलंबून होते. ज्या उद्देशाने हे मासिक सुरु केले होते त्या उद्देशाशी कधीही प्रतारणा केली नाही. मासिक चालवण्यामध्ये कोणतीही धंदेवाईक दृष्टी दिसत नाही. त्यांच्या मृत्युपत्रामध्ये 'ध्येय निष्ठेने व विशिष्ट धोरणाने हे मासिक चालविण्यचे चालकांवर बंधन होते.'[२३] आपल्या मृत्युपत्रात त्यांनी मासिकांच्या धोरणासंबंधीचा आदेश पुढील प्रमाणे दिला होता. 'मासिक माझ्या पूर्वीच्या धोरणाने चालवावी. त्यात बदल करू नये. देशाच्या प्रचलित परिस्थितीनुरूप प्रचलित प्रश्नांची त्यात चर्चा व्हावी. त्या परिस्थितीत भाग घ्यावा व त्याप्रमाणे मजकुर मासिकात येत जावा. या मासिकांचे सध्याचे जे संपादक म्हणून आहेत ते जोपर्यंत माझे मागील धोरण कायम ठेवतीलतोपर्यंत त्यांना संपादक म्हणून कायम ठेवावे. विश्वस्तांनी हल्लीचे जे धोरण आहे ते कायम ठेवून मासिके चालवावी.'

वासुकाकांच्या नंतरही त्यांचे धोरण संपादकांनी व विश्वस्तांनी निष्ठेने पाळले. चित्रमय जगतच्या नोव्हेंबर १९६३ च्या अंकात दिलेल्या जाहिरातीत विश्वस्तांनी वर्गणीदारांना उद्देशून जी विनंती केली होती ती पाहिली असता या ध्येय धोरणांचा आणखी उलगडा होईल. वर्गणीदारांना केलेली ती जाहीर विनंती पुढील प्रमाणे होती– 'जानेवारी १९६४ पासून चित्रमय जगतची वार्षिक वर्गणी ७ रुपये करणे भाग पडत आहे, याबद्दल आम्हांस दुःख होते. ७ रुपये वर्गणी घेऊनही मासिक चालविणे कठीण जाणार आहे; इतकी महागाई वाढली आहे. चित्रमय जगत हे मासिक धर्मादाय विश्वस्त निधीतर्फे चालविण्यात येते, त्यामुळे आम्हास ही सेवा करता येते. फायद्याकडे लक्ष्य ठेवून आम्ही हे मासिक चालवत नाही. जी संस्था कै. विष्णू शास्त्री चिपळुणकरांनी काढली व ज्या संस्थेची जोपासना कै. वासुकाका जोशी यांनी केली. ती संस्था एक राष्ट्रीय ध्येय पुढे ठेवून हे मासिकाचे कार्य चालवीत आहे, एवढेच आम्ही निवेदन करु इच्छितो. वर्गणीदारांनी पूर्ववत लोभ कायम ठेवावा अशी विनंती आहे. व्यवस्थापक'[२४]

या संदर्भात अधिक विवेचन करताना म्हणता येईल की स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या परिस्थितीमध्ये बदल झाला; परकीय सत्तेशी झगडा करण्याचे दिवस संपले; जनतेची अभिरुची बदलली व एकंदरीतच स्थित्यंतर घडून आले. त्यामुळे वासुकाकांनी निर्दिष्ठ केलेल्या धोरणानुसार मासिक चालवणे कठीण झाले. तरीही हजारो रुपयाचा तोटा सहन करुन विश्वस्तांनी हे मासिक चालविले. जनतेला राजकीय शिक्षण देण्याचे ध्येय पुढे ठेवून व नफ्याची दृष्टी न ठेवता मासिक चालविणे हे सोपे काम नव्हते परंतु विश्वस्तांनी हे पुढे नेटाने चालविले. लोकप्रियतेसाठी इतर कोणत्याही गोष्टी केल्या नाहीत. तत्वाशी प्रतारणा केली नाही. परिस्थितीच्या वाहत्या वाऱ्याबरोबर वाहून न जाता स्वाभिमानाने निष्ठेने मार्गक्रमण केले. व शेवटी ६० वर्षाचे आयुष्य उपभोगून जानेवारी १९६८ मध्ये हे मासिक विराम पावलेले दिसते.

## तळटीपा :–


१. रा. प्र. कानिटकर, 'चित्रशाळेचा इतिहास' (१८७८ ते १९७३); वासुकाका जोशी विश्वस्त निधी, पुणे १९७५, पृ.१.

२. रा. प्र. कानिटकर, उपरोक्त, पृ.२.

३. त्र्य. र. देवगिरीकर, 'वासुकाका जोशी व त्यांचा काळ', चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९४८, पृ.५.

४. रा. प्र. कानिटकर, 'चित्रशाळेचा इतिहास', पूर्वोक्त, पृ.५.

५. रा. प्र. कानिटकर, उपरोक्त, पृ.५.

६. दैनिक सकाळ, सप्तरंग, १८ सप्टें. २०१६, पृ.२०.

७. दैनिक सकाळ, सप्तरंग, १८ सप्टें. २०१६, पृ.२२.

८. रा. प्र. कानिटकर, 'चित्रशाळेचा इतिहास', पूर्वोक्त, पृ.८.

९. कित्ता, पृ.१०.

१०. कित्ता, पृ.८.

११. कित्ता, पृ.११.

१२. त्र्य. र. देवगिरीकर, पूर्वोक्त, पृ.२४०.

१३. रा. प्र. कानिटकर, 'चित्रशाळेचा इतिहास', पूर्वोक्त, पृ.१६.

१४. रा. प्र. कानिटकर, उपरोक्त, पृ.१६.

१५. रा. प्र. कानिटकर, उपरोक्त, पृ.१७.

१६. रा. प्र. कानिटकर, उपरोक्त, पृ.१८.

१७. बिपिनचंद्र, 'इंडियाज स्ट्रगल फॉर इनडिफेन्डस', मराठी अनुवाद, के सागर पब्लिकेशन, पुणे, पृ.१२८.

१८. रा. प्र. कानिटकर, 'चित्रशाळेचा इतिहास', पूर्वोक्त, पृ.१९.

१९. रा. प्र. कानिटकर, 'देवगिरीकरांचे चरित्र' महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे, पृ.२.

२०. कित्ता, पृ.३.

२१. कित्ता, पृ.१२४.

२२. त्र्य. र. देवगिरीकर, ‘वासुकाका जोशी व त्यांचा काळ’, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९४८, पृ.२४०.

२३. रा. प्र. कानिटकर, ‘चित्रशाळेचा इतिहास’ (१८७८ ते १९७६); वासुकाका जोशी विश्वस्त निधी, पुणे १९७५, पृ.२४.

२४. चित्रमय जगत, जानेवारी १९६४.

*****

# प्रकरण ३

# चित्रमय जगत मासिकामधील राजकीय लेखन

३.१ प्रस्तावना

३.२ प्राचीन भारतावरील आधारित राजकीय लेखन

३.३ मध्ययुगीन भारतावर आधारित राजकीय लेखन

३.४ आधुनिक भारतावर आधाारित राजकीय लेखन

 ३.४.१ स्वातंत्र्यपूर्व भारतावर आधारित राजकीय लेखन

 ३.४.२ स्वातंत्र्योत्तर भारतावर आधारित राजकीय लेखन

 ३.४.३ आधुनिक भारतावर आधारित विशेष सदर/लेखमाला

 ३.४.४ आधुनिक भारतावर आधाारित खास अंक/विशेष अंक

३.५ जागतीक घडामोडीवर आधारित राजकीय लेखन

 ३.५.१ जागतीक घडामोडीवर आधारित खास अंक/विशेष अंक

## प्रकरण ३

# चित्रमय जगत मासिकामधील राजकीय लेखन

### ३.१ प्रस्तावना :–

चित्रमय जगतमधील राजकीय लेखन पहाण्यापूर्वी राजकीय इतिहास म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. प्राचीन कालखंडापासून विचार केल्यास ग्रीकांनी प्रथम इतिहास लेखनास प्रारंभ केला. त्यांच्या इतिहासाचा मुख्य विषय 'राजकारण' हाच होता. एकोणिसाव्या शतकापर्यंत राजकीय विषयांनाच इतिहासात प्रमुख स्थान दिले होते. म्हणूनच प्रसिद्ध ब्रिटिश इतिहासकार सीले म्हणतात, 'गतकालीन राजकारण म्हणजे इतिहास होय.'

यामध्ये राजकीय संस्था व संकल्पना प्राचीन कालखंडापासून कशा उत्क्रांत पावत गेल्या याचा वेध घेतला जातो. राजा, राजपद, राज्याचे स्वरूप, राजपदाचा व राज्याचा सिद्धांत, मंत्रीमंडळ, प्रशासकीय विभाग, प्रशासकीय संस्था, न्याय व्यवस्था, लष्कर आणि महसुल व्यवस्था, विविध लष्करी मोहिमा, युद्धनिती, विविध तह, करार, परराष्ट्रीय संबंध यांचा समावेश यामध्ये होतो.

इतिहास व राज्यशास्त्र यांचा निकटचा संबंध आहे व ही दोन्ही शास्त्रे परस्पर पुरक आहेत. या संदर्भात पॉलिबिअस हा ग्रीक इतिहासकार म्हणतो की, राजकारणाची कला आत्मसात करण्यास इतिहास मदत करतो. तर सीले हा ब्रिटिश इतिहासकार याचे अधिक स्पष्टीकरण करताना म्हणतो की, प्रत्यक्ष घडलेल्या सत्याधिष्ठित राजकारणाकडे दुर्लक्ष झाल्यास इतिहासाला कल्पनाधिष्ठित साहित्याचे रूप प्राप्त होते. राजकीय इतिहास लिहीण्यासाठी मोठ्या प्रमाणात इतिहासाची साधने उपलब्ध असल्याने  राजकीय इतिहास लेखन सुकर झाले आहे.

ब्रिटिशांनी लिहिलेल्या साम्राज्यवादी इतिहास लेखन प्रवाहाला विरोध करण्यासाठी पाश्चात्य शिक्षण घेतलेले उच्च विद्याविभूषीत भारतीय पुढे आलेले दिसतात. व साम्राज्यवादी इतिहास लेखनास प्रतित्युत्तर देण्यासाठी राष्ट्रवादी इतिहास लेखन प्रवाहास यांनी जन्म दिलेला दिसतो. भारतीय राज्यव्यवस्था, राजनिती, संस्कृती यावर ब्रिटिशांनी केलेली टिका खोडून काढण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसतो. त्यामुळे इतिहासविषयक जाणिवा निर्माण झालेल्या

दिसतात व त्यामुळे स्वातंत्र्य लढ्यास प्रेरणा, मार्गदर्शन व वैचारिकताही प्राप्त झालेली दिसते. राष्ट्रवादाची निर्मितीही त्यामधून झालेली दिसते.

अशा प्रकारचा प्रयत्न त्या काळातील लोकसंपर्काचे अतिशय महत्त्वाचे साधन असलेल्या देशी वृत्तपत्र व नियतकालिकांनीही केलेला दिसतो. त्याला चित्रमय जगत हे मासिका सुद्धा अपवाद नव्हते. चित्रमय जगत हे मासिक मुळातच राष्ट्रीय वृत्ती व राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठी जन्माला आले होते. यामधील राजकीय लेखन हे सर्वांगीण व वैविध्यपूर्ण असे झाले आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या जडण–घडणीमध्ये योगदान असलेल्या अनेक विद्वान, राजकारणी, समाजसुधारक, साहित्यिक मंडळींनी यामधील राजकीय लेखन केले आहे. त्यांनी महत्वपूर्ण वैचारिक लेख, संपादकीय, लेखमाला, विशेष अंक, विविध सदरे यामध्ये राजकीय लेखन केले आहे. या प्रकरणामध्ये राजकीय लेखनामध्ये प्राचीन भारतावर आधारीत राजकीय लेखन, मध्ययुगीन भारतावर आधारित राजकीय लेखन व आधुनिक भारतावर आधारित राजकीय लेखनाचा परामर्श घेतला आहे.

## ३.२ प्राचीन भारतावरील आधारित राजकीय लेखन :–

'भारतीय राज्य व्यवस्था'[१] हा द. गो. लिमये यांचा लेख आहे. या लेखामध्ये भारतीयांना राज्यव्यवस्थेचे ज्ञान नव्हते; या पाश्चात्य विद्वानांच्या विचाराला खोडून काढण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. लेखकाने यामध्ये राज्यपद्धती व प्रजास्वातंत्र्य यांचा संबंध साधन आणि साध्य या स्वरूपाचा असून भारतीय राज्यपद्धती अनियंत्रिक राज्यसत्ताक असूनही प्रजाजनास कसे स्वातंत्र्य होते हे सांगितले आहे. प्रजाजनांचे सुख आणि भरभराट ही एक दृष्टी ठेवून विचार केल्यास भारतीय राज्यपद्धती कशी योग्य होती हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी संदर्भ म्हणून पाश्चात्य विद्वान ट्रोबो, ले. कर्नल मार्क विल्कन्स, चार्लस मेटकाफ यांनी भारतातील ग्रामव्यवस्था आणि शहरे याविषयी केलेले विवेचन दाखवले आहे. अशा प्रकारचा 'आर्यांच्या प्रतिनिधिक संस्था'[२] हा कृष्णाजी विनायक वझे यांचा लेख महत्त्वाचा आहे. यामध्ये कुल, जाती, वर्ग, संघ, सभा, समिती, मंडल, परिषद, विदथ, गण या महत्त्वाच्या प्राचीन राजकीय संघटना होत्या त्यांचा परिचय करून दिला आहे. यामधून भारतात प्राचीन काळी राज्य चालवणारी एक सुसंगठीत यंत्रणा निर्माण झाली होती याविषयी माहिती दिली आहे.

राज्यव्यवस्थेच्या संदर्भात धर्म आणि कायदा यांची प्रमुख भूमिका असते या संदर्भात मनुस्मृतीचे उदाहरण देऊन कायदे व धर्मशास्त्र यांच्यातील श्रेष्ठ दर्जाच्या नियमामुळे येथील राज्यव्यवस्था नियंत्रीत होत होती. असे सांगून जेम्स मीलच्या इतिहासामध्ये मनुस्मृतीवर केलेल्या टीका खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात कोलमन यांच्या Mythology of Hindu व डॉ. रॉबर्टसन यांच्या Disquisition Concerning India या पुस्तकाचा दाखला दिला आहे. अशाप्रकारे 'प्राचीन मनुस्मृती व हल्लीचे कायदे कानून'[३] यामध्ये हल्लीचे कायदे मनुष्याने काय करू नये हे सांगतात. तर मनुस्मृतीमध्ये काय करावे हे सांगितले आहे. राष्ट्रहित संबंधाला पोषक अशा अनेक गोष्टी यामध्ये सांगितल्या आहेत त्यामुळे राज्यघटना कशी तयार करावी याचा परीपाठ मिळतो असे लेखक म्हणतो.

'कौटिलीय अर्थाशास्त्र'[४] या पां. वा. काणे यांच्या लेखामध्ये अर्थशास्त्र या ग्रंथाचे राजनैतिक स्वरूप स्पष्ट करून त्यातील विविध प्रकरणांची सविस्तर माहिती दिली आहे व त्यातून प्राचीन काळी भारतीय राज्यव्यवस्था कशी सुदृढ झाली होती हे समजून सांगण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे.

'राज्यारोहणाचे व्यवहारिक स्वरूप'[५] यामध्ये रामकृष्ण गोपाळ भिडे यांनी राज्याभिषेक या संकल्पनेचे स्वरूप स्पष्ट केले आहे. प्राचीन काळी राज्याभिषेक हा एक सामाजिक विधी होता परंतु नंतर तो धार्मिक स्वरूपाचा बनला व पुढे त्यातील मोठमोठे यज्ञ, कर्मकांड इ. विधीचे प्रमाण वाढले, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात रामायण, महाभारतापासून मध्ययुगातील शिवराज्याभिषेकापर्यंत आढावा घेतला आहे. या विधीचा राजकीय उद्देश काय होता व त्या संदर्भात लोकशाही तत्व व राज्याभिषेकाचे सामाजिक स्पष्टीकरण यात कसे साम्य आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

'राजतरंगिणी'[६] या द. के. केळकर यांच्या लेखामध्ये काश्मिरच्या इतिहासावर प्रकाश टाकणाऱ्या राजतरंगिणी या ग्रंथाची माहिती दिली आहे. आठव्या शतकापासून ते बाराव्या शतकापर्यंतचा काश्मिरचा इतिहास समजण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त असून संमिधान मातृगुप्त, चंद्रापीड अशा राजाची माहिती देऊन राजाच्या लहरी व विक्षिप्त स्वभावामुळे राज्य कसे नष्ट झाले याविषयी चर्चा केली आहे.

'हर्षकालीन हिंदुस्थान'[७] या लेखात श्री. वा. ताटके यांनी हर्षाची सामाजिक, राजकीय व धार्मिक कामगिरी सांगितली आहे. त्याचे परराष्ट्र धोरण किती दृढ होते हे ही सांगितले आहे. जावा, सुमात्रा येथील वैष्णव लेख याची साक्ष देतात. चिनी प्रवासवर्णनातून त्याने एक ब्राह्मण वकिलही समुद्रामार्गे चीनला पाठवला होता हे समजते. त्याने ब्राह्मणवर्गास दिलेली जमिन दान; त्यातून सरंजामशाहीचे अवतरण कसे झाले इ. ची माहिती यात दिली आहे. त्याचे धर्म निरपेक्ष व्यक्तीमत्व, कनौजची धर्म परिषद इ. विषयावर सविस्तर माहिती देऊन प्राचीन कालखंडात भारतात महान राज्यकर्ते होऊन गेले त्यांचा परिचय देण्याचा प्रयत्न केला आहे.

'अशोकाचे शिलालेख व तत्कालीन समाज'[८] या मधुकर अनंत मेहेंदळे यांच्या लेखामध्ये भारतात ठिक ठिकाणी विखुरलेल्या अशोकाच्या शिलालेखांची माहिती दिली आहे. त्याच्या शिलालेखावरून त्या काळचा समाज, धर्मकारण, राजकारण कसे समजते व एक इतिहासाचे साधन म्हणून हे शिलालेख किती महत्त्वाचे आहेत याविषयी सविस्तर माहिती मिळते. 'अशोक आणि तत्कालीन संस्कृती'[९] या त्र्यं. रं. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये गौतम बुद्ध हा महान क्रांतीकारक प्राचीन भारतात होऊन गेला त्या विषयी माहिती दिली आहे. या बुद्धाने धर्माची चाके कशा पद्धतीने फिरवली की, ज्यामुळे 'धर्मचक्रपरिवर्तन' घडून आले, याविषयी चिकित्सक माहिती दिली आहे. तसेच सम्राट अशोकाने 'रथचक्र परिवर्तन' कसे घडवून आणले व त्याचे राज्य हे प्राचीन भारताच्या राजघरण्यांमध्ये कसे सर्व श्रेष्ठ होते हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्याने आपल्या राज्यात Materialism and Spritualism याचा सुंदर संगम कसा घडवून आणला याची माहिती देऊन या संगमाचे प्रतिक म्हणून भारतीय राष्ट्रध्वजावर अशोकचक्राची स्थापना झाली आहे असे लेखक म्हणतो.

'गीतारहस्याचे महत्व'[१०] या चिं. वि. वैद्य यांच्या लेखामध्ये गीतेमधील 'निष्कामकर्मयोग' ही संकल्पना काय आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. निष्काम कर्म म्हणजे उदासिनपणा नव्हे हे सांगून भारतीय नितीतत्व व पाश्चात्य नितीतत्व यांची तुलना केली आहे. त्या संदर्भाने गीतेतील कर्म–अकर्म, विकर्म व कार्य–अकार्य, कर्तव्य काय आहे; त्यातून भारतीय नितीतत्व किती उच्च दर्जाचे होते हे दाखवून दिले आहे. तसेच पाश्चात्य तत्वज्ञानाप्रमाणे सर्वांचे हित, अधिकांचे हित याचाही संदर्भ गीतेत येतो. गीतेतील आत्मोपम्य

बुद्धी किंवा सर्वत्र ब्रह्मदृष्टी याचे वर्णन करून गीता हा सर्वश्रेष्ठ नितीग्रंथ कसा आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. सध्याच्या ब्रिटिश विरोधी राजकीय लढ्यात हा ग्रंथ एक मागदर्शक ग्रंथ म्हणून मदत करेल असे लेखक म्हणतो.

'चाणक्यकृत राजनितीशास्त्र'[११] या अनंत भास्कर आळतेकर यांच्या लेखामध्ये प्राचीन भारताच्या अभ्यासासाठी उपयुक्त महत्त्वाचे लिखित साधन म्हणून अर्थशास्त्राचे महत्व स्पष्ट केले आहे. हा जरी इतिहास ग्रंथ नसला तरी त्यातून तत्कालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थितीवर प्रकाश पडतो. तसेच या ग्रंथाची विश्वासाहर्ता मॅगास्थिनीसच्या विवरणाशी जुळणारी आहे. तसेच अशोकाच्या शिलालेखावरूनही या ग्रंथाची उपयुक्तता समजते. राजा, राजपद, मंत्री परिषद, अर्थकारण, व्यापार, उद्योग, युद्धनिती, शेती, जंगल, वजनमाप, गणिका, महसुल, अधिकारी, धर्म, विवाह, वर्णाश्रम पद्धती या बद्दलची माहिती यात दिली असल्याने राजनितीवर भाष्य करणारा तो अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ होता असे लेखक म्हणतो. सध्याच्या राजकीय लढ्यामध्ये त्यातील अनेक मार्गदर्शक तत्वे उपयोगी पडतील असे लेखक म्हणतो.

'वैदिक राष्ट्रगीत'[१२] हा पं. सातवळेकर यांचा विश्ववृत्त या मासिकात छापला गेलेला लेख ब्रिटिशांच्या दृष्टीने राजद्रोही ठरला होता. तो स्वातंत्र्य उत्तर काळात चित्रमय जगत मधून पुनर्मुद्रीत करून छापण्यात आला. यामध्ये लेखक असे म्हणतो की कोणत्याही राष्ट्राचा अथवा कोणत्याही जातीच्या राष्ट्रीय आकांक्षा पहावयाच्या असतील तर त्या राष्ट्रगीतात दिसतात. त्या संदर्भात अथर्ववेदाच्या बाराव्या कांडात दिलेल्या वैदिक राष्ट्रगीताचा संदर्भ दिला आहे. भारतीयांच्या राजकीय, राष्ट्रीय जाणिवा विकसित करण्याचा यातून प्रयत्न केला गेला.

## ३.३ मध्ययुगीन भारतावर आधारित राजकीय लेखन :-

मध्ययुगीन कालखंडाच्या संदर्भात अनेक लेख चित्रमय जगतमध्ये छापण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, पेशवे कालखंड, इंग्रज–मराठा संबंध, पानिपतची लढाई, यांची माहिती सांगणारे लेख राजकीय अंगाने चित्रमय जगतमध्ये लिहले गेले. याशिवाय चित्रमय जगतचे पहिले संपादक दत्तोपंत विष्णु आपटे हे स्वतः मराठ्यांचे इतिहासकार असल्याने त्यांनीही अशा प्रकारच्या लेखांना आग्रक्रम दिलेला दिसतो.

'मध्ययुगीन राज्यपद्धती व शिवाजी महाराजांची राज्यपद्धती'[१३] या लेखामध्ये चि. वि. वैद्य यांनी शिवाजी महाराजांची राज्यपद्धती काय होती; त्यावर हिंदु धर्म तत्वाचा प्रभाव कसा दिसतो, धर्मग्रंथामध्ये सांगितलेल्या आदर्श राज्यपद्धतीला विचारात घेऊन शिवाजी महाराजांनी कसे स्वराज्य उभारले याची माहिती दिली आहे. असे असले तरी मध्ययुगीन मुस्लीम राज्यकर्त्यांची आदर्श राज्यतत्वे सुद्धा शिवाजी महाराजांनी स्विकारली होती. त्यांचे अष्टप्रधान मंडळ, मुस्लीमांची प्रशासन व लष्करातील काही योग्य तत्वे शिवाजी महाराजांनी स्विकारून एक आदर्श राज्यपद्धती उभी केली असे लेखक म्हणतो.

'शिवाजी महाराजांची साक्षरता आणि महाराष्ट्र धर्म'[१४] हा द. वि. आपटे यांनी लिहिलेला लेख आहे. यामध्ये जदुनाथ सरकार यांनी शिवाजी महाराजांच्या साक्षरतेवर जी शंका घेतली ती पुराव्यानिशी दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. यासंदर्भात मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ४ व मल्हार रामकृत शिवचरित्राचा दाखला दिला आहे. याशिवाय रामदास स्वामी व संत तुकाराम यांनी जाणता राजा, सर्वज्ञ अशी शिवाजी महाराजांना विशेषणे का लावली याचा मतीतार्थ सांगितला आहे.

शिवाजी महाराजांनी स्वतः काही अभंग व पदरचना केल्या होत्या. याशिवाय न्याय व मनसुबीची कामे ते स्वतः पाहत होते, हे वाई येथील कागदपत्रातून सिद्ध होते. त्यांच्या पत्रामधून उर्दु शब्दही येतात. त्यावरून त्यांना फारशी भाषा सुद्धा अवगत होती हे समजते. त्यांच्या पदरी शास्त्री, पंडित व कवी अशी विद्वान मंडळी होती. रायगडावरील शंकरांच्या देवालयातील दोन संस्कृत भाषेतील श्लोक, तसेच राज्यव्यवहारकोष या अभिनव ग्रंथाच्या निर्मिती मागील त्यांची भूमिका, त्यांचा संस्कृत भाषेबद्दलचा आदर व ज्ञानीपणा स्पष्ट होतो. त्याचबरोबर ते क्षत्रीय असल्यामुळे त्यांना स्नानसंध्या, लिहणे वाचणे आवश्यकच होते. तसेच सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्या व्यक्तीने सारी निजामशाही आपल्या बुद्धीबळावर चालवली अशा King Maker शहाजी राजांचा मुलगा शिवाजी हा निरक्षर असणे अशक्य आहे.

या शिवाय महाराष्ट्र धर्म या विषयी चर्चा करताना शिवकालीन धर्म समजूती, रानडे यांचा महाराष्ट्र धर्माचा दृष्टिकोण, राजवाडे यांची महाराष्ट्र धर्माची संकल्पना विचारात घेऊन शिवकालीन महाराष्ट्र धर्म व प्रचलीत महाराष्ट्र धर्म यात असणारा वेगळेपणा याची माहिती दिली

आहे. अशा प्रकारे शिवाजी महाराजविषयी प्रस्थापित पूर्वग्रह खोडून काढण्याचा पुराव्यानिशी प्रयत्न यात केलेला दिसतो.

'शिवचरित्र व चिकित्साशास्त्र'[१५] द. वि. आपटे यांच्या या लेखामध्ये इतिहास लेखक जदुनाथ सरकार यांच्या शिवचरित्राच्या साधनाविषयी केलेल्या विधानाला प्रतिउत्तर देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. शिवचरित्र लिहिण्यासाठी मराठी साधने फारशी उपयुक्त नाहीत असे जदुनाथ सरकारांचे मत होते. हे विधान खोडून काढून मराठ्यांच्या इतिहास लेखनात मराठी साधनांचे महत्व ते स्पष्ट करतात. मराठी साधनांशिवाय मराठ्यांचा चिकित्सक व शास्त्रशुद्ध इतिहास लिहीणे अशक्य आहे असे ते म्हणतात.

मराठी साधनांवर मोठ्या प्रमाणात संशोधन झाले पाहिजे व विश्वासार्ह मराठी साधने उजेडात आली पाहिजेत. ग्रँट डफ व यदुनाथ सरकारांच्या मराठ्यांच्या इतिहासाविषयीच्या लिखाणात अनेक दोष आढळतात, कारण त्यांनी मराठी साधनांना दुय्यम स्थान दिले. तसेच परकीय व परप्रांतीय इतिहासकारांनी मराठी साधनांचा वापर न केल्यामुळे त्यांचा इतिहास एकांगी व दोषपूर्ण झाला आहे. तशीच स्थिती मराठी इतिहासकारांची होऊ नये म्हणून मराठी इतिहास लेखकांना फारशी व इंग्रजी भाषेचे सुक्ष्म ज्ञान असले पाहिजे असे द. वि. आपटे म्हणतात. मराठी साधनांच्या प्रकाशनातील चित्रशाळेचा व भारत इतिहास संशोधन मंडळाचा सिंहाचा वाटा आहे हे ते नमुद करतात. शिवाय शिवचरित्राला उपयुक्त साधने व कागदपत्रे अजुनही महाराष्ट्रातील विविध देशमुखांकडे संग्रही आहेत, त्याचा वापर करणे अत्यावश्यक आहे असे ही ते सांगतात.

'शिवाजी महाराज लुटारू होते काय?'[१६] या लेखात रा. चि. वैद्य यांनी इंग्रजी इतिहासकारांनी शिवाजी महाराजांवर केलेल्या आरोपाचे खंडन करण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात त्यांनी सामुदायिक राजनितीची संकल्पना मांडली आहे. या संकल्पनेनुसार एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राशी युद्ध पुकारल्यावर त्यांना लुटणे, स्वबळ वाढवणे व परबळ कमी करणे हे युद्धनितीला धरून असते; परंतु असे करताना दोन अटी महत्त्वाच्या असतात. एक म्हणजे लुटणारा खाजगी व्यक्ती नसावा तो राजा अथवा राष्ट्र असावे; आणि तो राष्ट्रीयदृष्ट्या वागत असावा. दुसरी अट म्हणजे राष्ट्रातील व्यक्तींना लुटताना त्या राष्ट्राविरोधी युद्ध पुकारले असले

पाहिजे. या दोन्ही अटी शिवाजी महाराजांना लागु पडतात. कारण ते बड्या जहागीरदारीचे मालक होते. तसेच स्वतंत्र राज्य स्थापण्याचा त्यांचा उद्योग त्यांनी गुप्त ठेवला नव्हता. या अनुषंगाने पहिली अट त्यांना लागू पडते. अशा प्रकारे लुटण्याची क्रिया एका स्वतंत्र राष्ट्राधिपती किंवा त्यांच्या हुकुमाने झाली होती. तसेच चौथ वसुलीसाठी केलेली मुलुखगिरी व इतर स्वाऱ्या विचारात घेतल्या असता, उच्चधर्माची कास त्यांनी कधीही सोडली नव्हती. शत्रुच्या लोकांना लुटणे तत्कालीन राजनितीला धरून होते. इतकेच काय तर या संदर्भातील अटीही पाळल्या गेल्या होत्या. युद्धाच्या वेळी गाई, ब्राह्मण, फकीर, देवळे, मशीदी, स्त्री, शेतकरी यांना हात न लावण्याचे धोरण त्यांनी पूर्णपणे पाळले. युद्धाच्या वेळी राजापुर, हुबळी येथील इंग्रजी वखारीचे नुकसान झाले ते ही भरून देण्याची तयारी दर्शविली. शिवाजी महाराजांच्या लुटी इतक्या फलदायी ठरल्या की सहाजिकच कोणत्याही मनुष्याला हेवा उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाही. इंग्रज व मुसलमानही त्यांना अपवाद नव्हते. औरंगजेबही त्यांना राजा लेखीत नव्हता. त्यांना लुटारू, दरोडेखोर असे म्हणत असत. परंतु शिवाजी महाराज प्रारंभापासून स्वतःला राजा मानत होते व आपल्या प्रजेकडे पितृभावनेने पहात असे. असे सांगून लेखक म्हणतो की, ते King of Fact होते, म्हणजे वस्तुस्थितीतील राजे होते, पण ते King of Jure नव्हते. म्हणूनच त्यांनी राज्याभिषेक करवून धार्मिक विधीने हिंदुपदपात शाहीची स्थापना केली. त्यामुळे त्यांना लुटारू म्हणणे चुकीचे होईल. अशाप्रकारे शिवाजी महाराजांवरील दोषारोपाचे खंडन करून मराठी सत्तेला धार्मिक व राजकीय मान्यता मिळवून देणाऱ्या शिवाजी महाराजांच्या कामगिरीचे महत्व स्पष्ट केले आहे.

'शिवाजी महाराजांचा जन्मकाल'[१७] या द. वि. आपटे यांच्या लेखामध्ये शिव जन्मतिथीचा वाद शक, महिना, तिथी, वार, इ. संबंधी ऐतिहासिक पुरावे, जेधे शकावली, बखरी यांचा आधार घेऊन संपूर्ण जन्म कालखंड समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. असाच एक दुसरा लेख दि. वि. काळे यांनी लिहिला तो म्हणजे, 'शिवजन्मतिथी प्रश्नातील तथ्य आणि पथ्य'[१८] शिवाजी महाराजांच्या जन्मतिथीचा नेमका वाद काय आहे? त्याची वस्तुस्थिती काय? याविषयी यात चर्चा केली आहे. शिवाजी महाराजांची खरी जन्म तारिख फाल्गुन वद्य तृतीय शके १५५१ आहे असे लेखकाने पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

'शिवाजीची वंशकुळी'[१९] वि. ल. भावे यांनी या लेखामध्ये शिवाजी महाराजांचे मुळ वंशज हे रजपुतान्यातील होते असे म्हटले आहे. तेथील सिसोदिया घराण्याशी त्यांचे मुळ वंशज संबंधीत होते. नंतर स्थल काल परत्वे महाराष्ट्रातील स्थलांतर व भोसले घराण्याचा इतिहास याविषयी यात माहिती दिली आहे. 'शिवाजी व नेपोलिअन'[२०] या लेखामध्ये कृष्णाजी मोरोंपत शेंबवणेकर यांनी शिवाजी महाराज व त्यांचे व्यक्तिमत्व, पुर्वपरिस्थिती, योग्यता, राजकीय, सामाजिक योगदान व युद्धनिती यावर चर्चा केली आहे. नेपोलिअनचे व्यक्तीमत्व, त्याची कौटुंबिक पार्श्वभूमी, क्षमता, धाडस व लष्करी योग्यता याविषयी माहिती देऊन शिवाजी व नेपोलिअन यांच्यातील साम्य व विषम स्थळे निर्देशित केली आहेत. प्रसिद्ध ऐतिहासिक पुरुषाची तुलना करणे, साम्य व विषम स्थळे निर्देशित करणे यामुळे त्या विशिष्ट महापुरुषाची योग्यता समजते असे लेखक म्हणतो.

'संभाजी महाराजांचा वध'[२१] या पा. न. पटवर्धन यांच्या लेखात संभाजी महाराजांचा कोणी, कोठे, केव्हा वध केला हे ऐतिहासिक पुराव्यानिशी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात खाफीखानची तवरीख, सर एच. एलियट यांनी लिहिलेला History of India हा ग्रंथ व महमद साकी मुस्तेक खान याचा मासिरे आलमगिरी या ग्रंथाचा विशेष उपयोग लेखकाने केला आहे. यामध्ये संगमेश्वर ठिकाणाचे भौगोलिक स्थान, संभाजीला पकडून देणारे लोक, संभाजीची कैद, औरंगजेब व संभाजी यांचे संबंध, कविकलश कोण होता, जैबुनिसा बेगम कोण होती; या प्रकरणात तिचा संबंध काय? अशा अनेक प्रश्नांना उत्तरे देण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. याशिवाय संभाजी महाराजांच्या इतिहासावर अधिक संशोधन होणे गरजेचे आहे असे लेखक म्हणतो.

'थोरले बाजीराव'[२२] या ना. गो. चापेकर यांच्या लेखामध्ये थोरल्या बाजीरावांची कामगिरी, त्यांची साम्राज्यवादी भूमिका, त्यांच्या काळात मराठी शाहीचा झालेला विस्तार, शुर सेनापती व प्रशासक म्हणून त्यांची योग्यता, त्यांच्या मध्ये असणारे अवगुण, क्षात्र धर्म आणि मस्तानी संबंध यावर चर्चा केली आहे.

मराठे कालखंडात होऊन गेलेल्या सरदार घराण्यांची ही माहिती चित्रमय जगतातून प्रसिद्ध झालेली दिसते. 'सेनापती आबासाहेब दाभाडे' या काशिनाथ नारायण उर्फ बाबासाहेब

साने यांच्या लेखामध्ये मराठे कालिन थोर सरदार दाभाडे घराण्याची माहिती दिली आहे. दाभाडे घराण्याची वंशावळ, मुळ ठिकाण, शिवाजी महाराज, संभाजी महाराज व राजाराम महाराज यांच्या काळात दाभाडे यांनी गाजवलेल्या पराक्रमाची माहिती दिली आहे. तसेच खंडेराव, यशवंतराव, त्रिंबकराव दाभाडे या दाभाडे घराण्यातील वीर पुरुषांची कामगिरी यावर प्रकाश टाकला आहे. 'नागपुरचे राघोजीराव बाबासाहेब भोसले यांच्या हस्ताक्षराची पत्रे'[२३] द. वि. आपटे यांनी चित्रमय जगत द्वारे प्रकाशीत केली आहेत. राघोजीच्या बंगालच्या स्वारीची हकीकत यातून समजते. यामध्ये राघोजीचे हस्ताक्षर, भाषा, विनोद या गोष्टींची माहिती या पत्रातून समजते. मराठ्यांचा अमल पूर्व बंगालपर्यंत पसरला होता हे यातून समजते. त्याच बरोबर अशा प्रकारे सरदार घराण्याची कागदपत्रे प्रसिद्ध करून इतिहासात नवी भर घालण्याचे कामही चित्रमय जगत द्वारे होत होते हे समजते.

'होळकर घराण्याची पुर्वपिठिका'[२४] यामध्ये द. वि. आपटे यांनी होळकर घराण्याने मराठी सत्तेला दिलेल्या योगदानाची महती सांगण्याचा प्रयत्न केला आहे. मल्हारराव होळकरांपासून या सरदार घरण्याची माहिती देण्याचा प्रयत्न यात केला आहे. मल्हाररावांनी बाळाजी विश्वनाथाच्या काळात दिल्लीच्या स्वारीमध्ये दाखवलेली कामगिरी, पुढे पहिल्या बाजीरावाच्या काळात मावळा प्रांत काबीज करून इंदुर हे संस्थान कसे बसवले हे यात सांगितले आहे. त्यांच्यानंतर आहिल्याबाईंनी स्वाभीमान व स्वामीनिष्ठा दाखवून इंदूरचा यशस्वी राज्य कारभार कसा केला या विषयी माहिती दिली आहे. त्यानंतर तुकोजी होळकर व पुढे यशवंतराव होळकर यांची माहिती दिली आहे. तसेच शिंदे–होळकर संघर्ष, पेशवा होळकर संघर्ष व इंग्रज होळकर संघर्ष यावर प्रकाश टाकला आहे. पुढे १८११–१७ या काळात तुळशीबाई होळकरांनी इंदुरचा कारभार कसा केला याची माहिती दिली आहे. त्यांच्यानंतर १८५४–८४ या काळात दुसऱ्या तुकोजी होळकरांनी इंदुरचा कारभार चालवून १८५७ च्या उठावात इंग्रजी स्त्री पुरूषांना संरक्षण देण्याचे काम कसे बजावले याची माहिती दिली आहे. त्यांच्या नंतर पुढील तुकोजी होळकर यांनी १९११ मध्ये इंदुरची कुलमुखत्यारी स्वीकारली त्यावेळच्या त्यांच्या अधिकारदान समारंभाची माहिती यात दिली आहे. अशा प्रकारे होळकर घराण्यातील थोर स्त्री पुरुषांच्या कर्तबगारीचा आढावा यात घेतला आहे.

'आहिल्याबाई होळकर व त्यांचे आक्षेप'[२५] हा वि. सी. सरवटे यांचा लेख आहे. अहिल्याबाईवरील दोषांचे खंडन करण्याचा प्रयत्न यात केला आहे. अहिल्याबाईंनी दौलतीचा पैसा दानधर्मात उधळला व फौजेकडे दुर्लक्ष केले असा त्यांच्यावर आरोप होता. या संदर्भात लेखक म्हणतो की, अहिल्याबाई पुणे दरबाराशी म्हणजे पेशव्यांशी नेहमीच एकनिष्ठ राहिल्या. मराठी सत्तेला धोका पोहचेल असे कोणतेही आचरण त्यांनी केले नाही. त्यांनी हिंदुना पवित्र असलेल्या तीर्थक्षेत्री घाट, धर्मशाळा, मंदिरे व विहिरी बांधुन जो खर्च केला त्यामुळे मराठ्यांच्या राजकीय अस्थिरतेच्या काळात यात्रेकरू व पांथस्थांना सोयी उपलब्ध झाल्या. यामुळे त्यांच्या राज्यास सामान्य जनतेचे समर्थन प्राप्त झाले. या संदर्भात सर जॉन माल्कन या इतिहासकाराने म्हटले आहे की, त्यांनी टिपू सारख्या परधर्मीय व मराठी साम्राज्याचा शत्रु असणाऱ्या व्यक्तीवर आपली जरब बसवली. यावरून असे म्हणता येईल की, लाखो फौजा ठेवल्याने जे कार्य झाले नसते ते धर्माचाराने झाले. या संदर्भात लेखक म्हणतो की, अहिल्याबाईंनी जरी फौजा बाळगल्या नव्हत्या तरी प्रजेची मने प्रेमाने बद्ध करून त्या त्यांच्यावर राज्य करीत होत्या. याशिवाय स्वरक्षणासाठी व मराठेशाहीची नोकरी बजावण्यासाठी आवश्यक तेवढे सैन्य त्यांनी ठेवले होतेच. या संदर्भात रा. चि. वैद्य यांनी मांडलेल्या विचाराचा निर्देश करून लेखक म्हणतो की, ''खरा राजकीय सिद्धांत तोच म्हणजे सैन्य हे स्वरक्षणासाठी असते, परराष्ट्र गीळंकृत करण्यासाठी नसते. अशा प्रकारे अहिल्याबाईवरील आरोप दूर करण्याचा यशस्वी प्रयत्न लेखकाने यामध्ये केला आहे.

'सुर्याजी पिसाळ'[२६] पा. न. पटवर्धन यांनी या लेखामध्ये वि. का. राजवाडे यांचे मराठ्यांच्या इतिहासाची साधने आणि पिसाळ घराण्याची कागदपत्रे अभ्यासून सुर्याजी पिसाळ यांच्याविषयी माहिती दिली आहे. पिसाळ हे वाईचे देशमुख होते. रायगडावर किल्लेदार म्हणून त्यांची नेमणूक केली गेली होती. त्याने किल्ल्याचा दरवाजा उघडून बादशहाचे सैन्य आत घेतले. औरंगजेबाच्या आग्रहाने तो मुस्लीम झाला. त्याचा बदला घेण्यासाठी शाहुने साऱ्या पिसाळ कुळाची कत्तल केली. अशी विधाने बखरीमधून दिसतात. परंतु ती विश्वासार्य नाहीत असे लेखक म्हणतो. त्याचबरोबर तत्कालीन मराठी सरदारांमध्ये राजनिष्ठेपेक्षा वतननिष्ठा किती प्रिय होती याचेही विवेचन यात केले आहे. अशा प्रकारे वतनाबद्दल सरदारांचा लोभ स्वदेशाभिमानापेक्षा मोठा दिसतो. असे सांगून पुढे लेखक असा म्हणतो की, संभाजीच्या

बायकामुलांना पकडून देणाऱ्या वतन लोभी सुर्याजीला राजारामाने आणि शाहूने शासन करण्याचे सोडून त्याला वाईची सुभेदारी दिलेली दिसते. हे कागदपत्रातून दिसते. परंतु असे त्यांनी का केले याचे गुढ उलगडत नाही. तसेच राजारामाने संभाजीच्या बायकामुलांस स्वराज्यात ठेवून जिंजीस जावे आणि त्यांच्यावर सुड उगवणाऱ्या सुर्याजीस शिक्षा न देणे चमत्कारिक वाटते. यावरून संभाजी व राजाराम याचे संबंध तणावपूर्वक होते का असे वाटते.

शिवाय नवऱ्यापासून दूर गेलेल्या आणि दिराने वाऱ्यावर सोडलेल्या येसुबाईंना औरंगजेबाने न बाटविता इतमानाने ठेवले याविषयी माहिती दिली आहे. यामागे औरंगजेबाची भूमिका अशी होती की मराठे युद्धाने जिंकता आले नाहीत तर गृहकलहाने जिंकता येतील. अशा प्रकारे भाऊ बंदकीच्या नात्यामध्ये संशय निर्माण करून मराठ्यांमध्ये दुही माजवता येईल व मराठेशाही नष्ट करता येईल असा औरंगजेबाचा हेतू होता. याविषयी अधिक कागदपत्रे अभ्यासून याविषयावर संशोधन होण्याची गरज लेखकाने व्यक्त केली आहे.

पानितपच्या तिसऱ्या लढाईवर प्रकाश झोत टाकणारे अनेक लेख चित्रमय जगत मध्ये छापण्यात आले. 'पानिपतच्या लढाईविषयी चर्चा'[२७] या सि. के. दामले यांनी लिहिलेल्या लेखामध्ये पानिपतच्या लढाईच्या पराभवाची कारणमीमांसा करण्यात आली आहे. यामध्ये दिल्लीस मुक्काम न ठेवता भाऊंनी पुढे कुच केली होती. ही मराठ्यांची पहिली चुक होती. अंतर्वेदीमध्ये गिलच्याची रसद मोडण्यासाठी शिंदे होळकरांसारख्या भरधाव घोडेस्वरांना न पाठविता गोविंद पंत बुंदेले सारख्या वृद्धास पाठविले ही दुसरी चुक झाली. आब्दालीने यमुना नदी पार केल्यानंतर लगेचच त्याच्यावर हल्ला न करता दोन तीन महिने निष्क्रीयता स्वीकारली ही मराठ्यांची तिसरी चुक झाली. तसेच मराठ्यांची सर्वात मोठी चुक म्हणजे लढाईला जाताना स्वतःच्या बायका व यात्रेकरूंना लष्कराबरोबर ठेवणे ही भयंकर चुक केल्यामुळे सैन्य हालचालीस मंदपणा आला. याचबरोबर शिवाजी महाराजांच्या लष्करी नियमांचे उल्लंघन या लढाईमध्ये झाले. विश्वासराव पडल्यानंतर लष्कराची जबाबदारी न घेता काढता पाय घेण्याची वृत्ती भाऊरावांनी दाखवली ही त्यांची मोठी चुक होती.

अशा प्रकारे या लेखात पानिपतच्या लढाईची व त्यात झालेल्या पराभवाची कारणमीमांसा करून मराठी लष्कराच्या उणिवा, नेतृत्व गुणातील उणिवा तसेच निर्णय

क्षमतेतील अस्थिरता या गोष्टींमुळे मराठ्यांचा पराभव झाला. याविषयावर विचारमंथन केले आहे. या संबंधीचा दुसरा महत्त्वाचा लेख म्हणजे 'पानिपताच्या युद्धाची जबाबदारी'[२८] या द. वि. आपटे यांच्या दुसऱ्या लेखामध्ये म्हटले आहे की, भाऊसाहेब, मल्हारराव होळकर व गोविंदपंत बुंदेले या तीघांमुळे पानिपत वर मराठ्यांची हार झाली. या पराभवाला हे तिघे कसे जबाबदार आहेत याची सविस्तर माहिती या लेखामध्ये दिली आहे. 'विजयनगरच्या इतिहासातील काही पाने'[२९] या श्रीपाद टिकेकर यांच्या लेखात विजयनगरच्या राज्यकर्त्यांनी हिंदु धर्माला दिलेला राजाश्रय, त्यांच्या शासन पद्धतीवर वर्णधर्माचा असलेला प्रभाव, त्या काळातील व्यापर, उद्योगधंदे, व्यवसाय, नाणी व्यवस्था, कर व्यवस्था, सामाजिक जीवन या सर्वांची चर्चा करून राज्यकर्त्यांचा दूरदृष्टी व राजकीय कोतेपणा यामुळे विजयनगर साम्राज्य कसे लयास गेले याची माहिती दिली आहे.

इंग्रजांनी मराठी सत्तेचा नाश कसा केला या संदर्भात अनेक लेख चित्रमय जगतमध्ये छापण्यात आले होते. 'श्रीरंगपट्टणचा वेढा'[३०] या द. वि. आपटे यांच्या लेखामध्ये मराठे, इंग्रज व निजाम यांच्या संयुक्त फौजांनी टिपु सुलतानचा पराभव कसा केला याची माहिती दिली आहे. कॉर्नवालिस या गव्हर्नरच्या काळात झालेल्या लढाईत टिपुला या संयुक्त फौजेपुढे माघार घ्यावी लागली व श्रीरंगपट्टणमचा तह करावा लागला. या तहात टिपुचे अर्धे राज्य व साडेतीन कोटी रूपये खंडणी ब्रिटिशांना मिळाली. पुढे आपल्या एतदेशीय सत्तांना पराभूत करण्यासाठी एतदेशीय सत्तांची मदत ब्रिटिशांना मिळाली, हे फार मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. भारतीय राजनितीतील दोष व एकजुटीचा आभाव म्हणूनच आपण पारंतंत्र्यात जगतो आहोत असे लेखक म्हणतो.

ब्रिटिश आणि मराठा युद्धावर आधारितही लेख चित्रमय जगतमध्ये छापले गेले. 'खडकीची लढाई'[३१] यामध्ये शि. म. परांजपे यांनी खडकीच्या लढाईत बाजीरावाचा झालेला पराभव व त्याची कारणमीमांसा केली आहे. दुसऱ्या बाजीरावाची दुर्बलता, त्याने केलेल्या चुका, आपल्याच सरदारांशी केलेले दुवर्तन यामुळे शिंदे आणि होळकर यापैकी कोणीही त्याच्या मदतीला आले नाही. तरी सुद्धा बाजीरावाने ५० हजार फौज जमवून युद्ध सज्जता दाखवली. या लढाईत बापु गोखले यांनी केलेला पराक्रम आणि इंग्रजांनी मराठी मंडळात पाडलेली फूट

इत्यादी गोष्टींवर चर्चा केली आहे. पुढे शि. म. परांजपे यांनी 'येरवड्याची लढाई'[३२] हा लेख लिहीला. यामध्ये खडकीच्या लढाईत निर्णायक विजय मिळाला नसल्याने पुन्हा इंग्रज पेशवा संबंधातील वितुष्टतेमुळे १६ नोव्हें. १८१७ मध्ये येरवडा येथे लढाई झाली. त्यात मात्र इंग्रजी फौजेने मराठ्यांच्या फौजेचा जोरदार पराभव केला. बाजीरावाने घेतलेली माघार व दुसऱ्या दिवशी एलफिन्स्टनने पुण्यात प्रवेश करून शनिवारवाड्यावर युनियन जॅक फडकवला या विषयी माहिती दिली आहे. बापु गोखल्यांचा पराक्रम ब्रिटिश फौजेपुढे कसा कमी पडला, इंग्रजी लष्कराची शिस्त व मराठी लष्करातील उणिवा यावर चर्चा केली आहे. 'अष्ट्याची लढाई'[३३] या लेखात शि. म. परांजपे यांनी येरवड्याच्या लढाईत झालेल्या मराठ्यांच्या पराभवामुळे दुसऱ्या बाजीरावाने पळ काढला. पुढील सहा महिने बाजीराव व ब्रिटिशांच्या लपंडावात बाजीरावाने सातारच्या छत्रपतींनाही बरोबर घेतले. शेवटी पंढरपूर जवळील अष्टी येथे शेवटची लढाई झाली. त्यात मराठ्यांचा पूर्णपणे पराभव झाला. मराठ्यांच्या लष्कराचे नेतृत्व करणारे बापू गोखले यांना वीरमरण प्राप्त झाले. पेशव्याने शरणागती पत्करली. त्यावेळी ब्रिटिशांनी त्याला पदच्युत करून पेशवाई कशी खालसा केली व बाजीरावाची कानपुरला रवानगी केली इ. बद्दल सविस्तर माहिती दिली आहे. 'पेशवाईची अखेर'[३४] या गो. का. चांदोरकर यांच्या लेखामध्ये दुसऱ्या बाजीरावाच्या काळात पेशवाईची झालेली अवस्था, दुसऱ्या बाजीरावाची जुलमी व भ्रष्ट कारकीर्द, त्याच्या व्यक्तीमत्त्वातील गुण दोष, राष्ट्रीयत्वाच्या भावनेशी व हिंदवी स्वराज्याच्या संकल्पनेशी घेतलेली फारकत यामुळे पेशवाईचा ऱ्हास कसा झाला यावर चर्चा केली आहे.

'मराठी व इंग्रजी सैन्याची मुलाखत'[३५] या लेखामध्ये द. वि. आपटे यांनी इंग्रजी सैन्याचा सुटसुटीतपणा व मराठी सैन्याचा अवाढव्यपणा, अनेक विद्वांनी मराठी सैन्यव्यवस्थेवर बेशिस्तपणा व लुटारूपणा यावर जी टीका केली आहे. त्याविषयीची यात चर्चा केली आहे. असे असले तरी मराठी सैन्य व्यवस्थेमध्ये असलेले बाजारबुणगे सैन्यव्यवस्थेचे काम व्यवस्थित चालण्यासाठी कसे उपयोगी पडत याविषयी श्रीरंगपट्टण येथील मोहिमेचे उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे. जवळ असणारी रसद आणि शत्रुच्या मुलखात तलवारीच्या जोरावर मिळणारी लुट आपल्या सैन्यास पुरु शकेल या अंदाजाने धडाडीने जाणाऱ्या कॉर्न वॉलिसवर उपासमारीने हैराण झालेल्या आपल्या सैन्याला वाचवण्यासाठी परत फिरण्याचा प्रसंग आला. अशा वेळी

बाजारबुणगे बाळगणाऱ्या परशुराम भाऊंनी अडिचशे मैल प्रवास करून कॉर्नवालिसच्या उपाशी सैन्यास पोटभर जेवण दिले. हे लक्षात घेण्यासारखे आहे.

अशा प्रकारे बाजारबुणगे या शब्दाने जो अनिष्ट अर्थ सध्या आपल्या डोक्यात येतो तो बाजुला ठेवून लष्करातील एक आवश्यक घटक म्हणून तो मराठी सैन्यात असे हे लक्षात घेतले पाहिजे असे लेखक म्हणतो. या बाजार बुणग्यांच्या हातून प्रसंगोपात काही वाईट गोष्टी घडत. पण लष्कर म्हटले की तेथे असे प्रकार व दांडगाई चालायचीच असे लेखक म्हणतो. अशा प्रकारे दुय्यम परंतु महत्वपूर्ण ठरलेल्या लष्करी अंगाचे विवेचन येथे केले आहे.

'मराठी राज्य कोणी बुडवले'[३६] या रा. गो. भिडे यांच्या लेखामध्ये मराठेशाहीला लागलेल्या ग्रहणाची क्रमवार चर्चा केली आहे. प्रथम नानासाहेबांनी कान्होजी आंग्रे यांचे बंड मोडण्यासाठी इंग्रजांसारख्या शत्रुची मदत घेतली. तसेच पुढे दुसऱ्या बाजीरावाने तैनाती फौजेचा स्वीकार करून इंग्रजांकडे मराठी राज्य गहाण टाकले. त्याचबरोबर राघोबा दादाने इंग्रजांची मदत घेऊन वसईचा तह घडवून आणला. या सर्व घटनांची सविस्तर चर्चा या लेखात केली आहे. याचबरोबर मराठ्यांच्यामधील आपआपसातील हेवेदावे, संघर्ष त्यामध्ये प्रामुख्याने शिंदे होळकर संघर्ष, होळकर–नागपूरकर–भोसले यांचा संघर्ष यामुळे मराठे शाहीत फुट पडली आणि मराठेशाहीचा ऱ्हास झाला. राघोबादादाने नारायणरावाचा केलेला खुन, दुसऱ्या बाजीरावाचा जुलमी कारभार या गोष्टीमुळे सुद्धा मराठेशाहीचा अंत झाला असे लेखक म्हणतो.

## ३.४ आधुनिक भारतावर आधाारित राजकीय लेखन :–

### ३.४.१ स्वातंत्र्यपूर्व भारतावर आधारित राजकीय लेखन :–

'राष्ट्राची संपत्ती'[३७] या गो. दा. तामस्कर यांच्या लेखामध्ये बुद्धीमत्ता व शील ही राष्ट्राची खरी संपत्ती असते असे सांगून, भारतीयांमध्ये बुद्धीमत्ता व शीलतेचा अभाव आहे असे म्हणणाऱ्या ब्रिटिश विद्वानांना उत्तर देण्यासाठी; भारत प्राचीन कालखंडापासून या संपत्तीने किती संपन्न झाला होता, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय सामाजिक, धार्मिक संस्था संकल्पनातून याचे अस्तित्व कसे दिसते याविषयी माहिती दिली आहे. त्याचबरोबर आधुनिक काळात परकीय सत्तेशी लढण्यासाठी या संपत्तीचे पुनरूज्जीवन व्हावे असे लेखक म्हणतो.

'राष्ट्राचे ध्येय'[३८] या महादेव रामचंद्र बोडस यांच्या लेखामध्ये हिंदुस्थानाचे सांप्रत ध्येय काय असावे याचे विवेचन केले आहे. राष्ट्राच्या ध्येया संदर्भात इतिहासाची भूमिका स्पष्ट करताना लेखक म्हणतो की, ब्रिटिशांमुळे व पाश्चात शिक्षणामुळे जी आधुनिक मूल्ये उदयास आली ती स्विकारून वृद्धींगत करणे हे आपल्या राष्ट्राचे ध्येय असावे असे लेखकास वाटते. 'विधात्मक की विधायक'[३९] या त्यांच्या लेखामध्ये लोकमान्य टिळक यांचे धोरण ब्रिटिश सरकारला विधात्मक का वाटते व तेच धोरण भारतीय जनतेला विधायक कसे आहे याचा उहापोह केला आहे. या संदर्भात स्वराज्य आणि स्वदेशी या दोन संकल्पना स्पष्ट करून त्याद्वारे विधायक मार्गाने ब्रिटिशांच्या भारतीय पारंतत्र्याची बंधने कशी तोडली जातील याविषयी आपले मत व्यक्त केले आहे.

'प्रतियोगी सहकारिता'[४०] या महादेव रा. बोडस यांच्या लेखात भारतातील स्वदेशी राजकीय पक्ष, त्यामध्ये टिळक पक्ष, गांधी पक्ष, दास पक्ष यांचे स्वरूप, विचार–सरणी यावर चर्चा केली आहे. यामध्ये टिळकपक्ष अर्ध नेमस्त होता का? यावर चर्चा केली आहे. त्याचबरोबर सरकारशी सहकारी धोरण ठेवणारा नेमस्त प्रागतिक पक्ष आणि राज्यकर्त्यापासून दूर राहून असहकारितेचे धोरण ठेवून स्वावलंबनाने आणि स्वतंत्रपणे स्वराज्याचे ध्येय गाठणारा राष्ट्रीय पक्ष याची माहिती दिली आहे. 'डोमिनियन स्टेट'[४१] या म. रा. बोडसांच्या लेखामध्ये सायमन कमिशन काय आहे, भारतीयांना घटनात्मक सुधारणा देण्यात ब्रिटिश सरकारची धोरणे काय आहेत, भारतीयांचे स्वराज्याचे हक्क काय आहेत, ते पूर्ण करण्यास सायमन कमिशन यशस्वी होईल की नाही याविषयी अनेक महत्वपूर्ण विचार या लेखात मांडले आहेत.

'हिंदुस्थानची संयुक्त घटना'[४२] या लेखमालेत म. रा. बोडस यांनी दिल्लीचा व्हाईसरॉय व हिंदुस्थानातील संस्थानिक यांच्यातील अधिकाराची चर्चा केली आहे. संस्थानातील अंतर्गत राज्यकारभारात व्हाईसरॉयला अनिर्बंध अधिकार प्राप्त झाले होते. याशिवाय संस्थानिक मुर्ख, ना–लायक, नाबालिक असेल तर संस्थानाच्या कारभारात हस्तक्षेप करायची त्याला आयती संधी मिळत असे. तसेच सामान्य जनतेच्या हिताचा विचार करता दुर्वर्तनी राजाला पदच्युत करून त्याजागी दुसऱ्याची नेमणूक करण्याचा अधिकार सार्वभौमतत्वाखाली व्हाईसरॉयने स्वतःकडे ठेवला होता. या संदर्भात वेलस्लीची योजना, कॅबिनेट अधिकार मंडळ कसे व

कोणाचे असावे या संदर्भात चर्चा केली आहे. याच लेखमालेमध्ये डिसे. १९२९ च्या अंकामध्ये भारतीयांना देण्यात येणाऱ्या सुधारणांमध्ये सायमन कमिशनचे महत्व सांगितले आहे. तसेच ब्रिटिश पार्लमेंटने हिंदी राष्ट्राची भावी राज्यघटना तयार करण्यासाठी डोमिनियन स्टेटची संकल्पना मांडली होती. यामध्ये ब्रिटिश इंडिया व देशी संस्थाने यांची संघटना आणि पार्लमेंट या दोघांचे प्रतिनिधीत्व असणारी सामायिक परिषद लंडन येथे असावी असा निर्णय घेण्यात आला होता. या परिषदेमध्ये घेतलेल्या निर्णयावरून भारतीय राज्यघटना कायदा समंत व्हावा अशा ब्रिटिशांच्या निर्णयावर चर्चा केली आहे. याच लेखमालेच्या डिसेंबर १९३१ च्या अंकामध्ये हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणे पुष्कळ अंशी इग्लंडमधील लोकस्थितीवर अवलंबून आहे असा विचार मांडला आहे. यासाठी भारतीय बहिष्कार व स्वदेशी चळवळींची गती वाढवून आपली संपत्ती इंग्लंडमध्ये जाणार नाही याची व्यवस्था केली पाहिजे. याचा परिणाम ब्रिटिश अर्थकारणावर होऊन तेथे कॉन्झरवेटिव आणि मजूर पक्ष यांच्यातील अंतर्गत वाद उफाळून येईल. या वादाचा परिणाम तेथे बोल्शेविझम उफाळून येईल आणि खुद्द मायदेशीच बेबंदशाही निर्माण झाल्यावर इंग्लडला हिंदुस्थानचे राज्य चालवणे कठिण होऊन बसेल. व पुढील तीन वर्षात राज्यक्रांती घडून १९३५ ला हिंदुस्थानला पूर्ण स्वराज्य मिळेल असे भाकित या लेखमालेच्या अंती महादेव रामचंद्र बोडस यांनी केले आहे.

'हिंदी राष्ट्राचे शत्रू'[४३] या म. रा. बोडस यांच्या लेखामध्ये हिंदुस्थानातील विविध धर्म व अल्पसंख्याक जाती जमाती यांच्या चालीरीती, परंपरा हिंदुस्थानच्या हितसंबंधाचा विचार करता विरोधात जाणाऱ्या आहेत. त्यामुळे स्वराज्य मिळाले तरी आपणास पुढे कसे विरोध होतील याचा आता पासून विचार करणे गरजेचे आहे असे लेखक म्हणतो. अशाप्रकारे स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उफाळलेला जातीयवाद लेखकाला जणुकाही आधीच समजला होता.

'वसाहतीचे स्वराज्य'[४४] या दा. वि. गोखले यांच्या लेखामध्ये १९०६ मध्ये दादाभाई नौरोजी यांनी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष या नात्याने वसाहतीच्या स्वराज्याचा पुरस्कार केला. स्वराज्याची संकल्पना स्पष्ट करताना ते म्हणतात, स्वराज्य म्हणजे केवळ सुशिक्षित लोकांच्या हक्काची अगर आकांक्षाची परिपूर्ती नसून हिंदुस्थानातील दारिद्र्य, दुष्काळ, आर्थिक आपत्ती या गंभीर प्रश्नांच्या उत्तराचा ही शोध या संकल्पनेत अभिप्रेत आहे. यातून बाहेर पडण्यासाठी

पुढील उपाय दादाभाई नौरोजींनी सुचवले आहेत. १. राज्यकारभार हिंदी लोकांच्या हाती असावा २. कर व कायदे निर्मितीमध्ये हिंदी लोकांचा सहभाग असावा. ३. इग्लंड व हिंदुस्थान यांचा आर्थिक संबंध समान हक्काच्या तत्वावर प्रस्थापित केला जावा. त्याचबरोबर जगातील इतर मोठ्या राष्ट्राप्रमाणे हिंदी राष्ट्राने आपले राजकीय, औद्योगिक, धार्मिक, साहित्य, कला कौशल्यामध्ये आपले स्थान निश्चित करावे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण राज्य कारभारास लायक आहोत हे दाखवून देण्याची साधने उपलब्ध करून द्यावीत असे लेखकांने दादाभाईंचे वसाहतीचे स्वराज्य या बद्दलचे विचार वाचकांपुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'प्रेस ॲक्टची पुर्वपिठिका'[४५] यामध्ये केशव सिताराम ठाकरे यांनी व्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या प्रेस ॲक्ट किंवा वृत्तपत्र विरोधी कायद्याची कारणमीमांसा केली आहे. यांचा संबंध प्राचीन 'इक्वीझिशन' म्हणजेच धर्मसभेने संपादीत करण्याच्या पद्धतीशी जोडला आहे व प्राचीन काळापासून दंडकशाहीचा वापर केल्यामुळे शुद्ध 'ज्ञानरचनावादाला' कसा सुरुंग लागतो याविषयीची मांडणी केली आहे. विष्णु महादेव भट यांच्या 'जबाबदारीचे स्वराज्य'[४६] यामध्ये स्वराज्य ही संकल्पना, Resonsible Government म्हणजे काय? प्रातनिधिक राज्यपद्धती, आर्वाचीन राज्यपद्धती, Cabinet प्रधानमंडळ, Council of Ministers प्रधान संसद या संकल्पनांची तोंड ओळख करून देऊन भारतीयांना राजकारण व शासनपद्धतीचे ज्ञान देण्याचा उत्तम प्रयत्न केला आहे.

'स्वदेशी चळवळी संबंधी प्रासंगिक विचार'[४७] या द. वि. आपटे यांच्या लेखात भारतीय कुटीर उद्योग व हस्तउद्योग यांचे महत्त्व, उत्पादन व उद्योग पद्धती, ब्रिटिश कारखानदारीमुळे भारतीय परंपरागत उद्योगांचा झालेला ऱ्हास, भांडवलदाराचा स्वार्थ व कामगारांचे शोषण, आधुनिक स्वदेशी उद्योगाचा पुरस्कार, स्वदेशी यंत्रशास्त्र निर्माण करण्याची आवश्यकता याविषयी विचार मांडले आहेत. स्वबळावर आधुनिक यंत्रपद्धतीवर आधारित उद्योग धंदे भारतीयांनी सुरु करावेत यासाठी प्रोत्साहन दिले आहे.

'अहिंसा तत्त्वाचा राजकारणात प्रवेश'[४८] या चि. वि. वैद्य यांच्या लेखामध्ये अहिंसा हे तत्व प्राचीन कालखंडापासून भारतामध्ये अस्तित्वात आहे, या तत्वाचा संबंध धर्माशी जोडला गेला. याचा पुरस्कार करणारे जैन व बौद्ध असे दोन महान धर्म भारतात होऊन गेले. हे तत्व

इस्लाम व ख्रिश्चन धर्मापेक्षा जुने असून भारत तिचे उगमस्थान आहे, या संदर्भात विवेचन केले आहे. आधुनिक काळात गांधीजींचा उद्देश व त्यांच्या नेतृत्वाखाली अहिंसा तत्वाचा भारतीय राजकारणात झालेला प्रवेश यावर चर्चा केली आहे.

'ब्रिटिश राजनितीचा एक नमुना' या रा. गो. भिडे यांच्या लेखामध्ये न्याय, समता आणि विश्वबंधूतेचा शांतिपाठ देणाऱ्या ब्रिटिशांनी कुटीलनितीचा वापर करून बंगालची फाळणी कशी केली याची कारणमीमांसा केली आहे. यामध्ये ब्रिटिशांच्या कल्याणकारी मुखवट्यामागील जुलमी भ्रष्ट चेहरा दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

'सोळा सत्याग्रह'[४९] या शि. म. परांजपे यांच्या लेखामध्ये गांधीजींनी भारतीयांना सत्याग्रहाचे तत्व दाखवून दिले; त्या सत्याग्रहाचे महत्व राजकीय लढ्यासाठी एक प्रभावी हत्यार म्हणून त्याचा कसा उपयोग होत आहे या संदर्भात सोळा सत्याग्रहाची माहिती यात दिली आहे. जुलमी इंग्रजी सरकारविरुद्ध सुरु केलेल्या या व्यापक चळवळीमध्ये पूर्णपणे असहकार स्विकारण्यात आला होता. त्यांनी केलेल्या जुलमी कायद्याचा निषेध करून अन्यायकारक कायदे मोडणे, बहिष्कार घालणे, निदर्शने, मोर्चे या गोष्टींना यामध्ये महत्व प्राप्त झाले होते याचे वर्णन यामध्ये आहे. दैनंदिन मानवी जीवनात वापरल्या जाणाऱ्या मोठ्या सामान्य पदार्थाचा संबंध राष्ट्रीय चळवळशी कसा जोडला गेला व त्यामुळे राष्ट्रीय चळवळ प्रभावी कशी झाली या संदर्भात माहिती दिली आहे. तसेच दांडी, धारासना, वडाळा, शिरोडा या भागात झालेल्या मीठाच्या सत्याग्रहाची हकीकत यात सांगितली आहे. ज्या ठिकाणी समुद्र किनारा, मिठागरे नाहीत अशा भागात करबंदी व जंगल सत्याग्रह करण्यात आले होते. यामध्ये मुळशी येथील शेतकऱ्यांचा सत्याग्रह, वैकोमचा सत्याग्रह, बार्डोली सत्याग्रह, कौन्सिल प्रवेशावर घातलेला बहिष्कार, इंग्लंडच्या युवराजाच्या भारतातील आगमनावर घातलेला बहिष्कार, नागपूर येथील झेंडा सत्याग्रह इत्यादीची माहिती यामध्ये दिली आहे.

'लोकसत्तात्मक राज्यपद्धती आणि लोकशिक्षण'[५०] या लेखामध्ये शि. म. परांजपे यांनी भारतीय जनतेला राजकारणाचे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. या लेखात डोमेनियन स्टेट म्हणजे काय? याची सविस्तर माहिती दिली आहे. तसेच पूर्ण स्वातंत्र्याची संकल्पना काय आहे हे स्पष्ट करून भारतीयांना घटनात्मक सुधारणा देताना डोमेनियन स्टेट व पूर्ण स्वातंत्र्य या

दोन्हीही गोष्टी पैकी कोणतीही गोष्ट भारतीयांना देणे इंग्रजांना कसे संकटात टाकणारे आहे याची माहिती दिली आहे.

'१९१९ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टची थोडीशी छाननी'[५१] या सी. के. दामले यांच्या लेखामध्ये २० व्या शतकातील सुरुवातीची भारतीय राजकारणाची स्थिती स्पष्ट केली आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी बंगालच्या फाळणीमुळे भारतीय जनतेचा असंतोष वाढला होता. त्यामुळे राजकीय व क्रांतीकारी हालचालीमध्ये वाढ झाली होती. त्यामुळे भारतीयांचा असंतोष दडपून टाकण्यासाठी ब्रिटिश सरकारने रौलेट यांच्या अध्यक्षतेखालील समीतीच्या शिफारशीनुसार दोन जुलमी कायदे पास केले. त्याला रौलेट कायदा म्हणतात. यामध्ये राजद्रोहाचे खटले उच्च न्यायालयात गुप्तपणे चालवणे, संशयाने व्यक्तीला अटक करणे व त्याचा अपील करण्याच्या हक्कास नकार देणे या गोष्टी महत्वाच्या होत्या. तसेच आरोपी व्यक्तीला जामीन न देणे, पोलिस स्टेशनला हजेरी लावणे, राहते ठिकाण न सोडणे, वॉरंटशिवाय अटक करणे इ. गोष्टींना महत्व प्राप्त झाले होते. या जुलमी कायद्याचा काळा कायदा म्हणून गांधीजींनी निषेध केलेला दिसतो. या कायद्याने भारतीय चळवळ दडपून टाकण्याऐवजी तीला एक प्रकारे गती मिळाली असे लेखक म्हणतो. यामुळे असहकार चळवळीची पार्श्वभूमी कशी तयार झाली याचे वर्णन यामध्ये दिले आहे. यामध्ये काँग्रेसने बहिष्काराचे शस्त्र वापरून प्रस्थापित कायद्याला विरोध कसा केला याचे ही वर्णन आले आहे. सरकारी पदव्या, मानसन्मान, अधिकारपदे, विदेशी माल, सरकारी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ, नोकऱ्या, कायदेमंडळ या सर्वांवर कसा बहिष्कार घालण्यात आला याचे वर्णन या लेखामध्ये केले आहे.

'सोलापूरच्या राष्ट्रीय झेंड्याचा लढा'[५२] मुकुंद देवकुळे यांनी या लेखामध्ये सविनय कायदेभंगाच्या चळवळीतील अत्यंत संवेदनशील कामगिरी केलेल्या सोलापूर जिल्ह्यातील झेंडा सत्याग्रहाची माहिती यामध्ये दिली आहे. दांडी येथील मिठाच्या सत्याग्रहानंतर गांधीजींना अटक करण्यात आली होती. या घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात कसे पडले त्या संदर्भात सोलापूरच्या नगरपालिकेवर झेंडा लावण्याच्या माणिकचंद शहा यांच्या कामगिरीचे वर्णन केले आहे. या घटनेमुळे माणिकचंद शहा यांना झालेली अटक, त्यामुळे निघालेल्या निषेधार्थ

मिरवणूका याचे वर्णन केले आहे. पुढे शंकरराव शिवदारे यांचा मृत्यु, संतप्त जमावाने मंगळवार पेठ पोलिस चौकीला लावलेली आग आणि सोलापूर शहराची संतप्त स्थिती, तेथील लष्करी कायदा याची माहिती दिली आहे. त्याचबरोबर यामध्ये सोलापूरच्या राष्ट्रीय निशानाचा केलेला अपमान, या संदर्भात तेथील वंदे मातरम या पत्रकात आलेला लेख, सोलापूरच्या निशाणाचा कायदा मोडण्यासाठी पुण्याहून आलेल्या शंभर स्वयंसेवकांची माहिती यामध्ये दिली आहे.

'महाराष्ट्र वीरांचा धारासनावरील ३१ मे १९३० चा हल्ला'[५३] मीठाचा कायदा मोडण्यासाठी गांधीजींनी दांडी येथील मीठागरावर पदयात्रा करून मीठावरील जुलमी कर मोडला. या धर्तीवर धारासना येथे मीठाचा कायदा मोडण्यासाठी सत्याग्रह करण्यात आला होता. परंतु गांधीजींना झालेल्या अटकेमुळे धारासनातील सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांच्याकडे आले. या सत्याग्रहामध्ये पोलिसांनी अमानुष लाठीमार केला असला तरी सत्याग्रहींनी दाखवलेला निर्धार व उत्साह अद्वितीय होता. सरोजिनी नायडूसह अनेक नेत्यांना यावेळी अटक करण्यात आली. या घटनेचे पडसाद देशभरातून उमटले. या सत्याग्रहात २६ मे १९३० रोजी पुण्यातील स्वयंसेवकांची एक तुकडी धारासनाला रवाना झाली होती. यामध्ये पुणे, सातारा, सोलापूर, नगर खानदेश येथील सत्याग्रही सामिल झाले होते याचे वर्णन यात दिले आहे. याशिवाय लेखाच्या अंती धारासना मधील सत्याग्रहाच्या संदर्भात पोवाडाही चित्रमय जगत मध्ये छापला गेला.

'सुताने स्वराज्य'[५४] या ना. बा. केळकर यांनी लिहिलेल्या लेखामध्ये चरखा, सुत कताई, खादीचा प्रचार व प्रसार याच्याशी संबंधीत असणाऱ्या सुताने स्वराज्य मिळेल ही कल्पना जरी हास्यास्पद वाटत असली तरी या विषयाचा सुक्ष्म अभ्यास केल्यावर या संकल्पनेत बरेच तथ्य आहे हे कबूल करावे लागेल असे लेखक म्हणतो. स्वदेशी व्रताचा अविभाज्य भाग असणाऱ्या सुतामध्ये चरख्यामध्ये असे कोणते रहस्य दडलेले आहे व त्याद्वारे हिंदुस्थानाला स्वराज्य मिळण्याची कितीशी आशा आहे याचा विचार लेखकाने या लेखात मांडला आहे.

'बहिष्कार बळकट करा'[५५] या लेखामध्ये 'अनामिक' लेखकाने स्वराज्य प्राप्तीचे ध्येय हे परदेशी मालावर बहिष्कार घालुनच साध्य होणार आहे हे बहिष्काराचे तत्व जितके बळावेल

व टिकेल तितक्या लवकर स्वराज्य प्राप्तीचे ध्येय साध्य होईल असे लेखक म्हणतो. या संदर्भात अधिक स्पष्टीकरण देण्यासाठी विलायती कापड आणि साखर याचे भारतातील आयातीचे प्रमाण दिले आहे. अशाप्रकारे आयात मालाचे प्रमाण आकडेबद्ध माहिती देऊन स्वदेशी कापड निर्मितीला प्रोत्साहन देण्याचे आवाहन लेखकाने केले आहे.

'स्वदेशी म्हणजे काय?'[५६] या शांतीनाथ यशवंत नांद्रे यांच्या लेखामध्ये ब्रिटिश साम्राज्यवादाचा खरा चेहरा हे भारताचे आर्थिक शोषण हा आहे. त्याला प्रतिकार करण्यासाठी स्वदेशी या संकल्पनेचा कसा पुरस्कार करणे गरजेचे आहे याबद्दल लेखक लिहितो. विदेशातून येणाऱ्या कोण–कोणत्या वस्तु भारतीय लोक वापरतात. यासंबंधी १९२८–१९३३ या वर्षातील आकडेवारी सहीत प्रमाण लेखकाने सादर केले आहे. त्याद्वारे आपण आपला किती पैसा विदेशी पाठवतो, यामुळे भारतीय संपत्तीचे कसे युरोपात वहन होत आहे याची कल्पना येते. म्हणून आपली संपत्ती आपल्या देशात राहण्यासाठी व हे परकीय लोक देशाबाहेर घालवण्यासाठी स्वदेशीचे व्रत किती महत्वाचे आहे याची माहिती लेखकाने दिली आहे.

'धारासना रणक्षेत्रातील हल्ले'[५७] या लेखात मुकुंद सदाशिव देवकुळे यांनी जून १९३० मध्ये पहिल्या आठवड्यात मीठाचा कायदा मोडण्यासाठी धारासना येथे झालेल्या सत्याग्रहाची माहिती यात दिली आहे. त्यावेळी सत्याग्रही स्वंयसेवक यांनी दाखवलेली धाडसी वृत्ती व ब्रिटिशांची दडपशाही याचे रोमहर्षक वर्णन यामध्ये दिले आहे.

'बहिष्काराचा गळफास बसु लागला'[५८] या रा. प्र. कानिटकर यांच्या लेखामध्ये बहिष्कार, स्वदेशी, कायदेभंग या तीन गोष्टींचा ब्रिटिश व्यापारावर कसा प्रतिकुल परिणाम होत आहे याची माहिती दिली आहे. या संदर्भात इंग्लडमधून आयात होणारे कापड, लोखंड याची आकडेवारी देऊन त्यात झालेली घट निदर्शनास आणून दिली आहे. इंग्लंडमधील बेकारीचे प्रमाण ही यात दिले आहे. यावरून भारतीयांनी आपल्या स्वातंत्र्याचे प्रभावी हत्यार म्हणून बहिष्कार तत्वाची कशी अंमलबजावणी केली आहे याची सविस्तर व चिकित्सक माहिती यात दिली आहे.

'भारतीय स्वातंत्र्य आणि आंतरराष्ट्रीय राजकारण'[५९] या शंकर दत्तात्रय जावडेकर यांच्या लेखामध्ये पंडित नेहरू यांनी केलेला युरोप व इंग्लंडचा दौरा, लंडनच्या किंगवे हॉल मध्ये दिलेली भाषणे, यातून व्यक्त झालेले समाजवादाचे ध्येय व विचारसरणी याविषयी यात चर्चा केली आहे. यामुळे काँग्रेसची या पुढील वाटचाल ही समाजवादी आहे का यावर झालेली चर्चा याचीही माहिती यात दिली आहे. आधुनिक भारतात नव चैतन्य निर्माण करण्याचे श्रेय गांधींना व लोकमान्य टिळकांना जाते. त्यांनी ब्रिटिश साम्राज्य व तिचा पाशवी प्रभाव या विरूद्ध टक्कर देण्यासाठी जी राष्ट्रशक्ती निर्माण केली, या राष्ट्रशक्तीच्या परिणामाचे फळ म्हणजे पंडित नेहरू होय व महात्मा गांधीचे राजकीय वारस म्हणून ही त्यांच्याकडे पाहिले जाते याविषयी मते यात दिली आहेत.

'म. गांधींजीची आधुनिक जगास देणगी'[६०] या शं. द. जावडेकर यांच्या लेखामध्ये महात्मा गांधी यांनी दिलेले अहिंसा हे तत्व जगाला दिलेली सर्वात मोठी देणगी आहे या संदर्भात माहिती दिली आहे. या संदर्भात व्यक्तीवाद, लोकसत्ता, राष्ट्रवाद, समाजवाद इ. संकल्पनांचा उदय जरी युरोप खंडात झाला असला तरी या संकल्पनांचे भौतिक रूप विकृत झाले असल्यामुळे तेथे अनेक राजकीय समस्या निर्माण झाल्या आहेत. परंतु महात्मा गांधीनी दिलेली अहिंसेची देणगी ही आधुनिक भारत घडविण्यासाठी किती उपयोगी ठरणार आहे व वरील वैचारिक संकल्पनांना भौतिकदृष्ट्या सुस्वरूप बनवून एक आदर्श राजकारण घडविण्यासाठी हे शस्त्र किती महत्त्वाचे आहे याविषयी मौलिक विचार यात मांडले आहेत.

'भारतीय स्वातंत्र्याचा त्रिविध लढा'[६१] या शं. द. जावडेकरांच्या अत्यंत महत्त्वाच्या लेखामध्ये साम्राज्यशाही,सरंजामशाही व भांडवलशाही हे राष्ट्रीय लढ्याचे प्रमुख तीन शत्रु आहेत असे लेखक म्हणतो. भारतीय स्वातंत्र्याचे मुख्य लक्ष्य जरी साम्राज्यशाहीचा नाश हे असले तरी तिच्या आश्रयाने अनियंत्रित राहिलेली संस्थानिकांची सरंजामशाही व तिच्या आश्रयाने वाढणारी गोरी–काळी भांडवलशाही याचाही नाश करणे गरजेचे आहे असे लेखक म्हणतो. कारण घटनात्मक सुधारणा देणाऱ्या ब्रिटिशांनी जी संयुक्त घटना बनवली आहे त्यामुळे हिंदी सरंजामशाही व हिंदी भांडवलशाही यांचे संघटन होऊन त्याचा एकत्रित पाठिंबा साम्राज्यशाहीस

मिळेल असे लेखक म्हणतो. त्यामुळे राष्ट्रीय लढा हा त्रिविध असला पहिजे असा समर्पक विचार या लेखामध्ये मांडला आहे.

'संस्थाने आणि सार्वभौमसत्ता'[६२] हा लेख दत्तात्रय श्रीधर मराठे यांचा आहे. यामध्ये संस्थानी प्रदेशात काँग्रेसचे प्रत्यक्ष नेतृत्व नसले तरी काँग्रेसच्या प्रोत्साहनामुळे बहुतेक सर्व संस्थानांमधून जबाबदारीच्या राज्यपद्धतीसाठी चळवळ सुरु झाली आहे, या संदर्भात माहिती दिली आहे. यामध्ये संस्थानी प्रजेची भूमिका महत्त्वाची असून संस्थानी प्रजेच्या हाती जोपर्यंत कायदे करण्याचा अधिकार नाही तो पर्यंत त्यांच्या कोणत्याच तक्रारी लेजिटिमेस (न्याय) ठरणार नाहीत असे लेखक म्हणतो.

'राष्ट्रसभा व तिच्यातील पक्षोपक्ष'[६२] या शं. द. जावडेकर यांच्या लेखामध्ये आखिल भारतीय पातळीवरील महत्त्वाची राजकीय संघटना म्हणून राष्ट्रीय सभा म्हणजे काँग्रेस किती महत्त्वाची आहे या संदर्भात विवेचन केले आहे. या राष्ट्रीय सभेच्या अंतर्गत विविध विचार सरणीच्या लोकांचा सहभाग वाढल्याने प्रागतीक पक्ष, स्वातंत्र्यवादी पक्ष, समाजवादी पक्ष, स्वराज्य पक्ष असे अंतर्गत पक्ष पडलेले दिसतात. १९३४ नंतर कम्युनिस्टही यात शिरलेले दिसतात व त्यातून गांधीवादी, समाजवादी, रॉयवादी व स्टॅलिनवादी असे पक्ष गट निर्माण झाले. परंतु यामध्ये गांधीवादी व कम्युनिस्ट विचारांचे पुरोगामी असे दोन ठळक पक्ष विशेष प्रभावी आहेत असे लेखक म्हणतो.

'राष्ट्रसभा, घटनाभंग आणि महायुद्ध'[६४] शं. द. जावडेकर यांच्या लेखामध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक राजकारणाची स्थिती दिवसेंदिवस कशी गंभीर व वादळी होत चालली आहे याच्यावर चर्चा केली आहे. महायुद्धाच्या भिषण परिस्थितीमध्ये गांधीजींचे अहिंसक तत्वज्ञानच जगाला वाचवू शकेल याविषयी यात चर्चा केली आहे. 'सत्याग्रह' हे केवळ व्यवहारशुन्य तत्वज्ञान नसून त्यामध्ये सामाजिक व्यवहारात अमुलाग्र क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य आहे असे लेखक नमुद करतो.

'असहकार घटनाभंग आणि कायदेभंग'[६५] या शं. द. जावडेकरांच्या लेखामध्ये राष्ट्रीय सभेने आठ प्रांतातील मंत्री मंडळाचे राजीनामे देऊन १९३५ च्या कायद्याने भारतीयांवर

लादलेली राज्यघटना, महायुद्धांच्या घनचकरीत कशी मोडून काढली व घटनाभंगाची आपली प्रतिज्ञा कशी खरी करून दाखवली या संदर्भात विवेचन केले आहे. त्याचबरोबर १९३६ च्या निवडणूकीमध्ये राष्ट्रीय सभेने अभूतपूर्व यश संपादित करून ब्रिटिशांनी लादलेली राज्यघटना वाटेल त्या क्षणी मोडून काढण्याचे सामर्थ्य राष्ट्रीय सभेकडे आहे हे दाखवून दिले.

याचबरोबर या महायुद्धाच्या कालखंडात हिटलर व चेंबर्लेन यांच्या साम्राज्यवादी धोरणामुळे युरोपीय संस्कृतीचा कसा विध्वंस होणार आहे, या विषयी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्याचबरोबर महायुद्धानंतर भावी जगासंबंधी ब्रिटिश मुत्सद्यांची काय कल्पना आहे आणि या महायुद्धामुळे हिंदी राजकारण व स्वातंत्र्य लढ्यास कसे आग्रस्थान प्राप्त झाले आहे यावर चर्चा केली आहे.

'स्वातंत्र्य संग्रामाची गंभीर घोषणा'[६६] या त्यांच्या लेखामध्ये मौलाना अब्दुल कलाम यांच्या नेतृत्त्वाखाली रामगड येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन पार पडले. त्या संदर्भात चर्चा केली आहे. हे अधिवेशनास राष्ट्रीय सभेच्या इतिहासात अनेक पटीने महत्त्वाचे कसे ठरले याविषयी विवेचन केले आहे. कारण राष्ट्रीय सभेच्या दैनंदिन कार्यकारणीमधून संन्यास घेतलेले महात्मा गांधी पुन्हा एकदा राष्ट्रीय सभेचे सेनापती बनलेले दिसतात. १९३४ साली तहकुब केलेला सत्याग्रहाचा लढा पुन्हा सुरु करण्याची घोषणाही दिलेली दिसते. याची माहिती दिली आहे.

'भारतीय क्रांति आणि भारतीय संरक्षण'[६७] या जावडेकरांच्या लेखामध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या परिणामांविषयी विचारमंथन केले आहे. दुसऱ्या महायुद्धात जपान, जर्मनी व इटली या देशांचा विजय झाला तर साम्राज्यशाही व लष्करशाहीचा प्रभाव वाढेल, इंग्लंडचा विजय झाला तर त्यांच्या वसाहतींना स्वातंत्र्य व लोकशाहीचा लाभ होऊ शकत नाही. दोन्ही पक्षाचा नाश झाला तर नवे जग कोण निर्माण करेल याविषयी प्रश्न निर्माण केला आहे. या सदंर्भात अमेरिका, रशिया व जपान या तीन बलाढ्य राष्ट्रांना व भारत व चीन सारख्या सुसंस्कृत पण भौतिकदृष्ट्या दुर्बल राष्ट्राला भावी जगाच्या निर्मितीसाठी भाग घ्यावा लागणार आहे; असे लेखक म्हणतो. परंतु युद्ध संपण्यापूर्वी भारताने स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र करून स्वातंत्र्य व स्वयंनिर्णायाचे हक्क प्राप्त करून घेतले पाहिजेत अन्यथा अनर्थ ओढवेल असे भाकित या लेखात केले आहे.

महायुद्ध, हिंदुस्थान या संबंधाने शं. द. जावडेकर यांनी अनेक लेख लिहिले. त्यांच्या 'हिंदी स्वातंत्र्य व जागतिक महायुद्ध'[६८] या लेखामध्ये ते म्हणतात दुसरे जागतिक महायुद्ध भारताच्या सरहद्दीपर्यंत पोहचल्यानंतर भारताच्या सहकार्याशिवाय शत्रु पक्षाला शह देणे शक्य नाही, हे इग्लंडला कळून चुकले आहे, त्यामुळे भारतीयांना घटनात्मक सुधारणा देण्यासाठी क्रिप्स योजना त्यांनी अंमलात आणली आहे. या क्रिप्स योजनेमध्ये कोण–कोणत्या तरतुदी होत्या? त्यातून हिंदुस्थानाचे विभाजन करण्याचा कुटील डाव कसा होता? याविषयीचे विवेचन या लेखामध्ये केले आहे. 'आत्मबल, शस्त्रबल आणि राष्ट्ररक्षण' या त्यांच्या लेखामध्ये भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आत्मबल आणि शस्त्रबल या पैकी कोणते हत्यार जास्त उपयोगी आहे या संदर्भात विवेचन केले आहे.

'स्वातंत्र्याचा लढा लवकर संपत नाही'[६९] या त्यांच्या पुढील लेखामध्ये रामगढ येथील अधिवेशनात गांधीजींनी केलेल्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या घोषणेबद्दल माहिती दिली आहे. याच्या स्वरूपाविषयी सांगताना लेखक म्हणतो की गांधीजीचे तत्वज्ञान हे मानवतावादावर आधारित होते. महायुद्धांमुळे संकटात सापडलेल्या इग्लंडबद्दल त्यांना सहानुभूती होती, परंतु अशा परिस्थितही साम्राज्यवादी इंग्लंड हिंदुस्थानला स्वातंत्र्य द्यायला तयार नव्हते. काँग्रेसच्या मागण्याचा विचार करत नव्हते. यासाठी वैयक्तिक सत्याग्रहाचे म्हणजे व्यक्तीगतरित्या सत्याग्रहात समाविष्ट होण्याचे तत्वज्ञान गांधीनी मांडले. यासाठी प्रथम विनोबा भावे यांची निवड झाली होती. याबद्दल माहिती देऊन स्वातंत्र्य लढा हा स्वातंत्र्य प्राप्तीनेच संपेल असे लेखकास वाटत आहे. त्याचबरोबर बॅ. जीना, बॅ. सावरकर, बॅ. आंबेडकर यांच्या अराष्ट्रीय जातिनिष्ट राजकारणामुळे स्वातंत्र्य लढ्याच्या कार्यात अडथळा येत आहे असेही लेखक म्हणतो.

'हिंदी स्वातंत्र्याची वाढती तीव्रता'[७०] या लेखात जावडेकरांनी क्रिप्स योजनेचे स्वरूप स्पष्ट केले आहे. या योजनेमध्ये भारताला वसाहतीच्या दर्जाचे स्वातंत्र्य दिले जाईल, महायुद्धाच्या समाप्तीनंतर प्रांतिक कायदेमंडळातून घटना समितीचे सदस्य निवडले जातील, ज्यांना घटना मान्य नसेल अशा प्रांत व संस्थानांना स्वतंत्र घटना निर्माण करण्याचा अधिकार असेल अशा प्रकारच्या तरतुदी असल्यामुळे हिंदुस्थानाचे विभाजन करण्याचा कुटील डाव इंग्रजांनी केला होता. यामुळे काँग्रेसने या योजनेचा निषेध करून राष्ट्रीय लढा अधिक तीव्र

केला. अशा प्रकारे हिंदी राजकारणाच्या लढ्याचे स्वरूप व तीव्रता कमी करण्यासाठी क्रिप्त मिशन योजले होते. परंतु ब्रिटिशांचा हा डाव फसला. त्या संदर्भात लेखक म्हणतो की, भारतीय स्वातंत्र्य लढ्याची धग कमी करण्यासाठी क्रिप्स आले होते परंतु अग्नीवर रॉकेल ओतून ते परत गेले.

स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडात संस्थानी प्रदेशातही स्वातंत्र्याचे वारे वाहु लागले होते. या संदर्भातील लेखही चित्रमय जगत मध्ये छापले गेले. या संदर्भात 'समीक्षक' या उपनामाने 'निजाम हैद्राबादचा प्रश्न'[७१] हा लेख लिहिला गेला. यामध्ये हिंदुस्थानातील संस्थानी प्रदेशातून जबाबदार राज्यपद्धती प्राप्त करून घेण्यासाठी संस्थानिकाविरूद्ध तेथील सामान्य जनतेने जी चळवळ सुरु केली आहे, याविषयी यात माहिती दिली आहे. त्याचबरोबर हैद्राबाद संस्थानाच्या विशेष संदर्भाने हैद्राबाद जनतेच्या लढ्याचे परिक्षण करताना लेखक म्हणतो की हैद्राबाद प्रजेचा झगडा केवळ राजकीय नसून तो धार्मिक व सांस्कृतिक ही आहे याची माहिती दिली आहे.

'संस्थानाचे राजकारण'[७२] या द. श्री. मराठे यांच्या लेखात संस्थानिक व ब्रिटिश सरकार यांचे संबंध कसे आहेत या संदर्भात विवेचन केले आहे. कुठल्याही संस्थांनाबरोबर झालेला तह हा संस्थानिकाच्या घराण्याशी झालेला असतो, त्यामुळे संस्थानिकांनी कसेही वागले तरी ब्रिटिश सत्तेने त्याला पाठिशी घालावे असे संस्थानिकास वाटते. परंतु ब्रिटिश सत्ता असे करत नाही. प्रजाक्षोभाच्या संकटापासून ब्रिटिश सत्ता संस्थानाचे रक्षण करते संस्थानिकाचे नाही असे लेखक म्हणतो. यामध्ये व्यक्ती व राष्ट्र या संकल्पनेत राष्ट्र हे व्यक्तीपेक्षा नेहमी श्रेष्ठ असते या राजकीय नितीचा खुलासा केला आहे.

'प्रतिगामी हैद्राबाद संस्थान'[७३] या अच्युत देशपांडे यांच्या लेखामध्ये हैद्राबाद संस्थान व ब्रिटिश सरकार यांचे संबंध कसे सलोख्याचे आहेत हे सांगितले आहे. निजामास इंग्रजांनी Faithfully Ally of the British Government म्हणजे ब्रिटिश सरकारचा इमानी दोस्त ही पदवी दिली होती. या पदवी वरूनच स्पष्ट होते की, इंग्रज व निजाम यांचे निकटचे व चांगले संबंध होते. त्यामागील कारणांचा खुलासा करताना हैद्राबाद संस्थानांमध्ये इंग्रजांचे हितसंबंध कसे गुंतले होते आणि तेथील कट्टर मुस्लिम धर्मीयांची प्रतिगामी प्रबळ संघटना इंग्रजांनी निर्माण करून हैद्राबाद संस्थानात प्रतिगामी साम्राज्यवादी धोरणाचा विकास कसा केला होता हे

समजते. याच संदर्भात 'हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचा लढा'[७४] हा वि. द. माडे यांचा लेख छापला गेला. यामध्ये पक्षपातीपणा, पद्धतशीर दडपशाही व बहुसंख्य जमातीच्या हक्काची पायमल्ली ही हैद्राबाद सरकारची प्रमुख वैशिष्ट्ये कशी आहेत. या सदंर्भात हैद्राबाद संस्थानातील राजकीय पक्षपात व सांप्रदायिकतावाद स्पष्ट करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. तेथील मुस्लीम सत्ता ही मुसलमान जमातीच्या घडामोडींचे विजयस्थान असले तरी बहुसंख्य जमातीच्या म्हणजे हिंदुंच्या पराभवाने स्थान आहे. हे लक्षात घेऊन हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या चळवळीचा इतिहास म्हणजे संस्थानातील जनतेने आपल्या न्याय हक्कासाठी केलेल्या संघटनात्मक घटनांचा इतिहास होय असे लेखक म्हणतो.

भारतीय जमातवाद, मुस्लीम लीग व पाकिस्तानच्या निर्मितीच्या संदर्भ अनेक लेख चित्रमय जगतमध्ये छापले गेले. या संदर्भात 'हिंदुस्थानाकरीता नवे राष्ट्रगीत'[७५] ज. स. करंदीकर यांच्या लेखामध्ये बॅ. जीना यांनी मुस्लीमलीगच्या लाहोर येथील अधिवेशनामध्ये द्विराष्ट्र सिद्धांताची रूपरेखा मांडली या संदर्भातील त्यात माहिती दिली आहे. यामध्ये लेखकाने लिहले आहे की, बॅ. जीना म्हणतात, ''हिंदुस्थान हे एक राष्ट्र नसून अनेक राष्ट्राचे कडबोळ आहे. म्हणून हिंदुस्थानचे तुकडे पाडून निरनिराळी राष्ट्रे बनवली पाहिजेत.'' या त्यांच्या विधानाला विरोध करण्यासाठी नवीन राष्ट्रगीताची आवश्यकता लेखकाने प्रतिपादित केली आहे. एकराष्ट्रीयत्वाची भावना जनतेमध्ये बिंबवण्याचे कार्य राष्ट्रगीत करत असते. हिंदुस्थानाकरता राष्ट्रीय भावना उजागर करणारे नवीन राष्ट्रगीत निर्माण व्हावे अशी लेखकाची इच्छा आहे.

'मुसलमान व कॉंग्रेस'[७६] या रा. प्र. कानिटकर यांच्या लेखामध्ये हिंदु मुस्लीम ऐक्यासाठी आजपर्यंत अनेक योजना कॉंग्रेसने सुचवल्या होत्या. यामध्ये खिलाफत चळवळ व असहकार चळवळीचा समन्वय, यातून मुस्लीम लीग व कॉंग्रेसमध्ये साधलेली एकता यावर भाष्य केले आहे. त्याचबरोबर याच काळात जातियवादाची भावना कशी वाढीस लागली. व त्यासाठी बॅरिस्टर महमंद अली जींना यांचे जमातवाद वाढविण्यामध्ये कसे फार मोठे योगदान आहे याविषयी चर्चा केली आहे.

सायमन कमिशनवर घातलेल्या बहिष्कारामुळे भारतातील सर्व जाती धर्मांना समंत होईल अशी घटना कॉंग्रेसने तयार करावी असे आवाहन ब्रिटिश सरकारने राष्ट्रीय कॉंग्रेसला

केले. ते आवाहन काँग्रेसने स्विकारले व पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापित करून 'नेहरू रिपोर्ट' सरकारला सादर केला. या अहवालात राष्ट्रहिताच्या संरक्षणासाठी स्वतंत्र मतदार संघाऐवजी अल्पसंख्याकास राखीव जागाबाबत शिफारस करण्यात आली होती. सिंध प्रांतासाठी स्वतंत्र दर्जा देण्याबाबत शिफारस होती. परंतु बॅ. जीना यांनी मुस्लीम लिगच्या वतीने हा नेहरू रिपोर्ट कसा फेटाळला याचे वर्णन यात केले आहे. मुस्लीम लीगच्या हितसंबंधांचे रक्षण होईल अशी चौदा सुत्री योजना तयार केली ती काय होती याचे ही विवेचन या लेखात केले आहे. द्विराष्ट्र सिद्धांताची उत्पत्ती, पाकिस्तानची मागणी याविषयी यामध्ये चर्चा केली आहे. याच संदर्भात कानिटकरांनी दुसरा एक लेख लिहिला तो म्हणजे 'हिंदी राजकारणाचा रंग'[७७] यामध्ये दुसरे महायुद्ध, गांधीजीचे वैयक्तिक सत्याग्रहाचे स्वरूप व त्यातून काँग्रेसच्या आंदोलनास आलेली तीव्रता, यामुळे राष्ट्रीय आंदोलन दडपून टाकण्यासाठी क्रिप्स मिशन भारतात कसे आणले. भारतीयांच्या ऐक्यात फुट पाडण्याचा कुटील डाव या मिशनमध्ये होता. या योजनेचा प्रमुख क्रिप्स ही योजना तयार करण्यासाठी अपयशी कसा ठरला. भारतातील राष्ट्रीय पक्षांना ही योजना पटली का नाही, याशिवाय ब्रिटनचा पंतप्रधान चर्चिल हा साम्राज्यवादी धोरणाचा पुरस्कर्ता असल्यामुळे त्याच्या सुचनेनुसार क्रिप्सला आपल्या योजनेतील तरतूदीत बदल करावे लागले या संदर्भात माहिती दिली आहे. या सर्व घडामोडीतून चले जाव चळवळची पार्श्वभूमी कशी तयार झाली याची माहिती दिली आहे. त्याचबरोबर मुस्लीम लीग, बॅ. जीना यांच्या मागण्या, त्यांनी मांडलेला द्विराष्ट्र सिद्धांत व पाकिस्तानची मागणी या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय राजकारणास धार्मिक व साम्राज्यवादी स्वरूप कसे प्राप्त झाले आहे याची चर्चा यात केली आहे.

पाकिस्तानच्या निर्मितीसंबंधी 'अनामिक' लेखकाने 'हिंदुस्थान अखंड राहणार की द्विखंड होणार'[७८] या लेखामध्ये बंगालच्या फाळणी संदर्भात विचार मांडला आहे. १९०७ मध्ये हिंदु मुस्लीम ऐक्यासाठी बंगालच्या फाळणीचा सगळ्या राष्ट्राने विरोध केला होता. परंतु आता बरोबर विरूद्ध दृष्टीकोनातून फाळणीची भूमिका पुढे येत आहे. हिंदु मुसलमान हे दोन स्वतंत्र देश असून त्यांची धर्मतत्वे भिन्न असल्यामुळे ते कधीच एकत्र नांदु शकत नाही. त्यामुळे त्यांनी वेगळे होणेच इष्ट आहे. या संदर्भात बॅ. जीना यांनी मांडलेल्या द्विराष्ट्र सिद्धांताचे परिक्षण करण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे. या संदर्भात पंजाब व बंगाल प्रांतातील हिंदु मुस्लीमांच्या

आकडेवारीचे प्रमाण देऊन लेखक असे म्हणतो की बॅ. जीनांच्या पाकिस्तानी मागणीमुळे हिंदुस्थान अखंड रहाणे अशक्य आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळाखंडात भाषा हा घटक विचारात घेऊन प्रांतांची पुनर्रचना करावी या संदर्भाने अनेक लेख छापले गेले. त्यासंदर्भाने 'महाराष्ट्र आणि कर्नाटक'[७९] यालेखामध्य रा. प्र. कानिटकर यांनी भाषिक प्रश्न सोडला तर इतर बऱ्याच बाबतीत महाराष्ट्र व कर्नाटक यामध्ये कसे साम्य आहे यावर भाष्य केले आहे. तसेच मराठी कानडी यांच्या वादाविषयीची कारणमीमांसा केली आहे. महाराष्ट्राचे अराध्य दैवत विठोबा हा कर्नाटनातून आलेला आहे. याच्या मागील संदर्भ सांगून शास्त्रीयदृष्टया विचार केल्यास दोन्ही भाषिकांमधील भाषिक साशंकता हेच त्यांच्या वादाचे मुख्य कारण आहे असे लेखक म्हणतो. 'भाषाभेदांचे भूत'[८०] या के. ना. डांगे यांच्या लेखामध्ये ते म्हणतात की भाषावार प्रांतरचनेच्या संकल्पनेमुळे प्रांतिकतावादाचा उदय झाला आहे आणि त्यामुळे देशाच्या ऐक्यास हानी पोहचणार आहे. त्यामुळे स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर देशातील निरनिराळ्या भाषांमध्ये परस्पर सहकार्य व प्रेम वाढवले पाहिजे असा विचार यात मांडला आहे.

के. एन. डांगे यांच्या या लेखाला विरोध करण्यासाठी श्री. मा. कुलकर्णी यांनी 'एक राष्ट्रीयत्वासाठी भाषावार प्रांतरचना–भाषा–व्यवस्थेचे सुत्र'[८१] हा लेख लिहिला. यामध्ये ते म्हणतात भाषाभिन्नत्व हे राष्ट्राच्या एकतेच्या आड येत नाही. भाषाभिन्नत्व असूनही भारतामध्ये एकराष्ट्रीयत्वाची भावना कशी दिसते याविषयी विवेचन केले आहे. भारताची म्हणून एक संस्कृती असली तरी त्या अंतर्गत प्रांतीय संस्कृतीचे महत्त्वाचे स्थान आहे. प्रांत संस्कृतीचे विशिष्ट स्वरूप, महत्त्व व वैशिष्ट्ये नजरेआड करता येणार नाहीत. तिची जोपसना व वाढ करण्यासाठी प्रान्त पुनर्रचना आवश्यक आहे असे लेखक म्हणतो.

भारतीय क्रांतीकारी चळवळीचाही भारतीय राष्ट्रीय आंदोलनात फार मोठा वाटा आहे. त्या अनुषंगाने क्रांतीकारी चळवळी विषयीचे लेखही यात छापण्यात आले या संदर्भाने 'क्रांतीकारकांचा कर्मयोग'[८२] यामध्ये रा. प्र. कानिटकर म्हणतात की, १८५७ पासून भारताच्या स्वातंत्र्यासाठी भारतीयांनी जे विविध प्रयत्न केले. त्यामध्ये १८९७ ते १९१५ या १८ वर्षाच्या कालखंडाला स्वतंत्र स्थान दिले पाहिजे. या काळात क्रांतीकारकांनी देशाची गुलामगिरीतून

मुक्तता करण्यासाठी आपल्या मनोधर्यानुरूप व स्वशक्तीनुसार जी कृत्ये केली; ती कृत्ये उच्च नैतिक मूल्यांच्या दृष्टीने अत्याचारी व अततायी ठरली तरी त्या कृत्यामागे श्रेष्ठ प्रकारच्या देशभक्तीची प्रेरणा होती. हे कोणालाही नाकारता येणार नाही. या देशभक्तांना बाबु अरविंद घोष, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, बिपिनचंद्रपाल, लाला लजपतराय, शिवराम महादेव परांजपे यांच्याकडून देशसेवेची प्रेरणा व स्फुर्ती कशी मिळाली होती व क्रांतीकारकांनी स्वार्थनिरपेक्ष कर्मयोगाचे कसे आचरण केले याविषयी माहिती दिली आहे. याशिवाय प्रस्तुत लेखामध्ये हिंदी क्रांतीकारकांनी केलेल्या कार्याचे धावते समालोचन केले आहे. त्यावरून भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांना सहभागी ठरवता येईल किंवा नाही याविषयी वाचकास मनन करण्यास सांगितले आहे.

'हिंदी क्रांतीकारकांचा परिचय'[८३] यामध्ये 'अनामिक' लेखकाने १८९७ पासून १९४२ पर्यंत भारतामध्ये जे शुरवीर क्रांतीकारक होऊन गेले त्यामध्ये दामोदर हरि चाफेकर, गणेश दामोदर सावरकर, मदनलाल धिंग्रा, अरविंद घोष, कन्हैयालाल दत्त, विष्णु गणेश पिंगळे, सेनापती बापट, विनायक दामोदर सावरकर, अनंत लक्ष्मण कान्हेरे, खुदीराम बोस, रासबिहारी बोस, गोपीमोहन साहा, वीणादास, प्रीतीलता वड्डादार, कल्पना दत्त इ. शुरवीर क्रांतीकारकांच्या क्रांतीकार्याचा धावता आढावा घेतला आहे.

'भारतीय क्रांतीकारकांचे परदेशातील प्रयत्न'[८४] यामध्ये शिवाजी रामचंद्र फाटक म्हणतात की, यांनी १९०७–१९१५ पर्यंत भारतीय क्रांतीकारकांनी हिंदुस्थानात राहुन स्वातंत्र्य संपादण्याचा प्रयत्न केला, तसाच प्रयत्न देशाबाहेर परदेशी राहून भारतातील ब्रिटिश सरकारशी लढा देण्याचा प्रयत्न केला होता. इंग्लंड, अमेरिका, अफगाणिस्तान, ब्रह्मदेश, नेपाळ, फ्रान्स, तुर्कस्तान, सयाम इ. देशात भारतीय क्रांतीकारकांनी आपले कसे जाळे पसरवून ठेवले होते. या संदर्भातील माहिती यात देण्यात आली होती. महायुद्धाची संधी साधून शस्त्रास्त्राच्या सहाय्याने उठाव करण्याचा प्रयत्नही त्यांनी केला होता. या संदर्भाने अभिनव भारत आणि गदर पक्ष यांची माहिती यामध्ये दिली आहे.

'स्वातंत्र्यावाचून युद्ध सहकार्य नाही'[८५] यामध्ये त्र्य. रं. देवगिरीकर यांनी दुसरे महायुद्ध सुरु होताच राष्ट्रीय सभेने सत्याग्रहाचा लढा कसा उभारला व स्वराज्याची मागणी कशी जोर लावून पुढे रेटली याची माहिती दिली आहे. तसेच युद्ध हिंदुस्थानपासून दूर होते तोपर्यंत

ब्रिटिशांवर असहकार व सत्याग्रहाचा फारसा परिणाम झालेला दिसत नव्हता, परंतु हे महायुद्ध जसजसे हिंदुस्थानच्या जवळ येऊ लागले तसतशी हिंदुस्थानच्या युद्ध सहकार्याची जाणिव ब्रिटिशांना झालेली दिसते. त्यामुळे त्यांनी महत्त्वाच्या सत्याग्रही पुढाऱ्यांना बंधमुक्त केले आहे असे केल्याने ते सहकार्य करतील असे ब्रिटिशांना वाटत आहे. परंतु स्वातंत्र्याशिवाय सहकार्य नाही, हे पं. नेहरू यांनी ब्रिटिश पार्लमेंटशी केलेल्या पत्रव्यवहारात कसे नमूद केले आहे याची माहिती यात दिली आहे.

'आजचा प्रेचप्रसंग कसा सुटेल'[८६] यामध्ये रा. प्र. कानिटकर यांनी महायुद्धाची भीषणता वर्णन केली आहे. १९४२ मध्ये जपान ज्यावेळेस जेव्हा हिंदुस्थानावर धडक मारण्याचा धाक दाखवू लागला तेव्हा ब्रिटिश सरकारचे धाबे कसे दणाणले व हिंदी जनतेच्या समाधानासाठी बादशाही सरकाने सर स्टेफोर्ड क्रिप्स यांच्या अध्यक्षतेखाली भारतीयांना देण्यात येणाऱ्या सुधारणांबाबत क्रिप्स योजना कशी तयार केली, तीचे स्वरूप कसे होते, भारतातील विविध राजकीय पक्षांनी ती का फेटाळली याविषयींच्या विविध मतांवर यामध्ये चर्चा केली आहे.

'चरखा अहिंसेचे प्रतिक'[८७] या भाऊ धर्माधिकारी यांच्या लेखामध्ये म्हटले आहे की, गांधींच्या राजकीय व सामाजिक तत्वविचारमध्ये 'चरखा' या संकल्पनेला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. चरखा हे अहिंसेचे जीवन प्रतीक आहे. कोणत्याही प्रकारच्या शोषणातून सर्वस्वी मुक्त अशा अहिंसक समाजाची रचना करणे हा त्याचा उद्देश आहे. हिंदुस्थानाच्या सात लाख खेड्यांमध्ये जर ही जागृती निर्माण झाली असती तर संपूर्ण हिंदुस्थानचे स्वातंत्र्य आम्हास लगेच प्राप्त झाले असते असे गांधीचे विचार यात मांडले आहेत.

'गीतेतील सत्याग्रहयोग'[८८] या प्रेमा कंटक यांच्या लेखामध्ये गीतेमधील स्थिती प्रज्ञता व तिचे स्वरूप स्पष्ट केले आहे. इंद्रिय नियंत्रण व आत्मनाशापासून परावृत्त करण्यासाठी स्थिती प्रज्ञता महत्त्वाची आहे असे गीतेमध्ये सांगितले आहे. त्याच प्रमाणे सत्याग्रह करताना सत्याग्रहींच्या अंगी ही स्थितीप्रज्ञता निर्माण होणे फार महत्त्वाचे आहे, याची माहिती दिली आहे. सत्याग्रहाच्या अतः सत्वामध्ये व आविष्कारामध्ये या शक्तीचे अस्तित्व प्रभावी रित्या निर्माण झाल्याशिवाय सत्याग्रह यशस्वी होणार नाही असे लेखिका म्हणते.

'स्वातंत्र्य लढा आणि हिंदी वृत्तपत्रे'[८९] प्रो. नरहर रघुनाथ फाटक यांनी या लेखामध्ये वृत्तपत्राचे महत्व स्पष्ट केले आहे. देशामध्ये स्वातंत्र्याची आंकाक्षा उत्पन्न करण्याचे काम प्रामुख्याने राष्ट्रीय पुढारी करत असतात. असे असले तरी राष्ट्रांच्या जागृतीसाठी वृत्तपत्रे प्रचाराची कामगिरी करत असतात. ती सुद्धा तितकीच महत्त्वाची असते. हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्य चळवळीत देशी वृत्तपत्रांनी प्रक्षोभ व जागृती उत्पन्न करून संपूर्ण स्वराज्याचा जयघोष केला त्यामुळे सरकारशाही हादरली पण हिंदी जनताही खडबडून जागी झाली. स्वातंत्र्याच्या लढ्याच्या इतिहासात वृत्तपत्रांनी काय केले याचा मागोवा या लेखात घेतला आहे.

'आमची फौज व तिचे अंतरंग'[९०] या लेखाचे लेखक के. सागर यांनी हिंदी राष्ट्रीय सभेचे माजी अध्यक्ष व हिंदुस्थानातील एक श्रेष्ठ पुढारी बाबु सुभाषचंद्र बोस यांनी १९४३ साली पूर्व आशियात हिंदी स्वातंत्र्यासाठी जी आझाद हिंद सेना स्थापन केली होती या फौजेच्या स्थापनेचा पूर्व इतिहास या लेखामध्ये अधिकृतरित्या ग्रंथित केला आहे. तसेच सिंगापूर येथे सुभाष बाबुंनी जे तात्पुरते सरकार स्थापन केले होते त्याचा वृत्तांत यामध्ये दिला आहे. नेताजींच्या हिंदुस्थान बाहेरील कार्यकर्तृत्वाची ओळख या लेखाद्वारे कथन करण्याचा उत्तम प्रयत्न झाला आहे.

## ३.४.२ स्वातंत्र्योत्तर भारतावर आधारित राजकीय लेखन :-

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील चित्रमय जगत मध्ये जे राजकीय लेखन झाले त्यावरून स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय घडामोडी व समस्या यांचा वेध घेता येतो.

'हिंदी संघराज्याच्या घटकांचे अधिकार'[९१] या वासुदेव मुकुंद लिमये यांच्या लेखामध्ये स्वतंत्र हिंदुस्थानाच्या घटनेचा मसुदा प्रसिद्ध झाल्यानंतर या मसुद्यात संघराज्याच्या घटकांना जे अधिकार दिले आहेत ते कितपत योग्य आहेत व पुरेसे आहेत का? यासंबंधीचे विचार यात मांडले आहेत. 'भारतीय राज्यघटना'[९२] ९ डिसेंबर. १९४६ साली सुरु झालेल्या हिंदी घटना परिषदेने तीन वर्षाच्या दीर्घ परिश्रमानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना तयार केली व तीला एकमताने मंजुरी देण्यात आली. हिंदुस्थानची ही राज्यघटना २६ जाने १९५० पासून प्रत्यक्ष

अंमलात येणार आहे या घटनेची सुमारे २९० पृष्ठे ३९३ कलमे ८ परिशिष्ठे आहेत. या संबंधीची सारांश रूपी माहिती या लेखामध्ये दिली आहे.

'भारतीय लोकशाही'[९३] या लेखामध्ये त्र्य. र. देवगिरीकर यांनी भारतीय राज्यघटना, तिचे पुरोगामी स्वरूप, तिची वैशिष्ट्ये, केंद्रसत्ता व घटक राज्ये यांचे अधिकार व कर्तव्ये, कायदे व न्याय व्यवस्था, मतदार संघाची रचना, समाजवादी वैशिष्ट्ये, धर्मनिरपेक्षता याविषयी माहिती दिली आहे. याचबरोबर समाजवादाकडून समतेकडे व समाजाच्या विकासाप्रमाणे व्यक्ती विकासाकडे तिची असणारी वाटचाल व समाजकल्याण हे उद्दिष्ट याविषयी या लेखामध्ये चर्चा करण्यात आली आहे.

'समाजाची समाजवादी रचना'[९४] या लेखामध्ये त्र्य. रं. देवगिरीकर यांनी समाजवादी समाजरचना ही एक व्यापक तत्व प्रणाली कशी आहे. यासंदर्भाने समाजवादी संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय व शांततेवर आधारलेल्या लोकशाही पद्धतीने होणारी प्रगती या गोष्टींचा समावेश असला तरी; या समाजवादी समाज रचनेमध्ये राजकीय, धार्मिक, शैक्षणिक समानताही अपेक्षित आहे असे लेखक म्हणतो.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर उद्‌भवलेली मुख्य समस्या म्हणजे भारताची झालेली फाळणी, काश्मीर प्रश्न व निर्वासीतांची समस्या होय. या संदर्भात ही अनेक लेख चित्रमय जगत मध्ये छापले गेले. 'निर्वासितांचा प्रश्न'[९५] या वि. म. हार्डीकर यांच्या लेखामध्ये म्हटले आहे की, देश स्वातंत्र्य झाला तरीसुद्धा फाळणीमुळे देशवासियांना या स्वातंत्र्याचा आनंद घेता आला नाही. या फाळणीमुळे पश्चिम पंजाब, सरहद्द प्रांत, सिंध, काश्मिर या प्रांतातील लाखो लोक निर्वासीत बनले. त्यासंबंधी माहिती देऊन निर्वासितांचा प्रश्न प्रामुख्याने दोन विभागात कसा विभागला आहे तो म्हणजे सहाय्यता कशा प्रकारे द्यावी व त्याचे पुनर्वसन कसे करावे? हे प्रश्न सोडविण्यासाठी काय करता येईल याची माहिती यामध्ये दिली आहे. 'निर्वासीतांची छावणी'[९६] दिल्लीजवळ कुरुक्षेत्रात पंजाबी व सरहद्दी प्रांतीय निर्वासीतांच्या छावणीला लेखक वि. म. हार्डिकर यांनी प्रत्यक्ष भेट दिली होती. त्या छावणीतील बोधप्रद अनुभव या लेखामध्ये देण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. निर्वासितांच्या प्रश्नाइतके निर्वासीतही किती बिकट आहेत. याची

कल्पना यातून येते. निर्वासीतांच्या छावण्या कोठे असाव्यात त्याची व्यवस्था कशी असावी त्यासाठी स्वतंत्र शहरे उभारावीत की प्रांतांची पुनर्घटना करून निर्वासितांच्या वसाहती त्यात समाविष्ट कराव्यात वगैरे प्रश्नावर उपयुक्त सुचना यात केल्या आहेत.

'काश्मिरची ऐतिहासिक पार्श्वभूमी'[९७] ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्य शाहीच्या तटबंदीसाठी व संरक्षणासाठी जी लहान मोठी संस्थाने हाताशी ठेवली व जगवली त्यात काश्मिर हे अत्यंत महत्त्वाचे संस्थान आहे असे लेखक रा. प्र. कानिटकर म्हणतात. या संदर्भाने काश्मिर हे संस्थान कसे उदयास आले, त्याचा पूर्व इतिहास काय, त्याची भौगोलिक स्थिती, प्राचीन कनिष्क, ललितादित्य सारखे राजे व राजतरंगिणी या ग्रंथामध्ये उद्देशलेले काश्मिर व राज्य कारणारे राजे यांची माहिती दिली आहे. त्यानंतर मोगल, अफगाण, शीखापर्यंतचे विविध राजे व तेव्हा पासूनचा काश्मिरच्या सध्याच्या संस्थानिकांचा इतिहास संक्षिप्त रित्या यात दिला आहे. 'काश्मिरचे भवितव्य'[९८] त्र्य. रं. देवगिरीकर या लेखामध्ये म्हणतात की, भारत व पाकिस्तान या दोन राष्ट्रात वारंवार संघर्ष होण्याचे मुख्य कारण हे काश्मिरचा प्रदेश हेच आहे. काश्मीरच्या महाराजांनी कायदेशीर करार करून भारतात काश्मीरचे विलिनीकरण केले तरी ते पाकिस्तानला मान्य नाही. १९४७ पासून काश्मिर जिंकण्याचा प्रयत्न पाकिस्तान करत आहे. पठाण, टोळीवाले व लष्कर घुसवून काश्मीर घेण्याचा बॅ. जीना यांचा डाव होता. त्यावेळी भारताने लष्करी कारवाई केली परंतु त्याच वेळी युद्धबंदी जाहिर झाल्यामुळे काश्मिरचा २/५ भाग भारताला मुक्त करता आला नाही. अनेक लष्करी करार करून आपली लष्करी ताकद वाढविण्याचा प्रयत्न पाकिस्तान कसे करत आहे. याविषयीही महत्त्वाचे विवेचन या लेखात केले आहे. तसेच युद्धबंदी कराराचे उल्लंघन करून पाकिस्तान सतत लष्करी कारवाया कसा करत आहे याची माहिती यात दिली आहे.

'फाळणीची रणचंडी'[९९] या न. वि. गाडगीळ यांच्या लेखामध्ये १९४७ साली झालेल्या भारत व पाकिस्तान फाळणीची कारमीमांसा केली आहे. हिंदुस्थानातील जातीयवादी राजकारणाचा उदय, सर सय्यद अहमदखान यांचे मुस्लिमांसाठीचे कार्य, प्राचार्य बेक यांची यामागील कामगिरी, बंगालची फाळणी, मुस्लीमांसाठी स्वतंत्र मतदार संघ याचे विवेचन केले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुस्लीम लीगची स्थापना व कामगिरी, चौधरी रहमत अली यांची

पाकिस्तानची कल्पना, बॅरिस्टर जीना व त्यांच्या मागण्या, जातीय निवाडा, द्विराष्ट्र सिद्धांत इ. गोष्टीची कारणे यात सांगण्यात आली आहेत. 'ताश्कंद'[१००] या लेखात रा. प्र. कानिटकर यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्या ऐतिहासिक शांतता कराराचे शांती क्षेत्र म्हणजेच ताश्कंद चा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. ताश्कंदचा जाहिरनामा, त्यातील कलमे यांची माहिती यात दिली आहे. भारत पाकिस्तान यांच्यातील शांततामय मैत्री संबंध प्रस्थापित करण्यासाठी हा करार कितपत यशस्वी ठरणार आहे याविषयी यात चर्चा केली आहे.

'ताश्कंद कराराचा अन्वयार्थ'[१०१] या के. ल. जोग यांच्या लेखात भारतीय उपखंडात चिरस्थायी शांतता प्रस्थापित व्हावी व उभयपक्षाचे तंटे सामोपचाराने मिटवले जावेत म्हणून हा करार करण्यात आला होता या विषयीची कारणमीमांसा केली आहे.याशिवाय रशियाचे पंतप्रधान कोसिजीन यांची मध्यस्ती व भारत पाकिस्तानचे राजकीय व आर्थिक मैत्री संबंध कसे असतील याविषयी माहिती त्यात दिली आहे. 'आझाद काश्मिर'[१०२] या रा. प्र. कानिटकरांच्या लेखामध्ये पाकिस्तानाने दांडगाईने बळकावलेल्या काश्मिरच्या भागाचे वर्णन आझाद काश्मिर असे केले जाते असे म्हटले आहे. त्याचे क्षेत्रफळ, नैसर्गिक साधन संपदा, आर्थिक राजकीय स्थिती, युद्ध विराम रेषा आणि काश्मिरची सद्यस्थिती यावर या लेखन चर्चा केली आहे.

स्वतंत्र भारताच्या ध्येय धोरणावर व स्वरूपावर भाष्य करणारे अनेक लेख चित्रमय जगतमध्ये छापले गेले. यामध्ये 'खरे लोकराज्य केव्हा निर्माण होईल'[१०३] या नारायण चापेकर यांच्या लेखामध्ये हिंदुस्थानचे परराष्ट्रीय राजकारण, उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण, विविध राजकीय पक्ष, नवा मतदार संघ, व्यक्ती स्वातंत्र्य व मत प्रदर्शनाचे स्वातंत्र्य इ. विषयी चर्चा केली आहे.

'भारतीय प्रजा राज्याचा उदय'[१०४] या ग. वा. माळवेकर यांच्या लेखामध्ये परराष्ट्रीय धोरण व अंतर्गत समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था या राज्यव्यवस्थेच्या कशा दोन भिन्न बाजू आहेत हे सांगितले आहे. या दोन्ही गोष्टी परस्परांशी कशा निगडीत आहेत. त्यासाठी अंतर्गत व्यवस्था बळकट करून प्रजाशक्ती कशी वाढवली पाहिजे याविषयी माहिती दिली आहे. 'विकेंद्रित लोकशासनाचा आधार'[१०५] यामध्ये गो. स. कामत यांनी स्थानिक स्वराज्य संस्था ही संकल्पना स्पष्ट करून तिच्या अंतर्गत ग्राम पंचायत, जिल्हा बोर्ड, नगरपालिका, महानगरपालिका यांची रचना, कार्ये व स्वरूप यांची माहिती दिली आहे. तसेच ग्रामपंचायत ही

जरी पुरातन संस्था असली तरी तिच्या कामकाजात नवी दृष्टी आली पाहिजे व सरकारी नियंत्रणही राहिले पाहिजे असे लेखक म्हणतात.

'भारताच्या परराष्ट्र खात्याचा कारभार'[१०६] या रा. प्र. कानिटकर यांच्या लेखामध्ये भारताचे परराष्ट्र धोरण कशा प्रकारचे असावे या संदर्भात राज्यघटनेमध्ये काही मागदर्शक तत्वे सांगितली आहेत त्याची माहिती यात दिली आहे. त्यानुसार भारत सरकारने आंतरराष्ट्रीय धोरणांमध्ये आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांचा पुरस्कार करून न्याय व सामान्य संबंध कसे प्रस्थापित करावेत यावर यात चर्चा केली आहे. 'पंचायती राज्याचा नवा मनु'[१०७] या त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये सगळ्या देशाला बळकटी यायची असेल तर देशातील ग्रामीण घटक बलवान झाला पाहिजे. त्यासाठी पंचायती राज हा लोकशाही पद्धतीचा परिणामकारक उपाय आहे. या संबंधानी पंचायती राज विषयी चर्चा या लेखात केली आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण हा पंचायती राज्याचा पाया असल्याने मध्यवर्ती सत्ता जशी खालपर्यंत विभागली जाईल तसतशी खेड्याची सुधारणा होईल असे विचार यात मांडले आहेत.

'महाराष्ट्रातील विकेंद्र सत्तेची योजना'[१०८] या पां. वा. गाडगीळ यांच्या लेखामध्ये जिल्हा पातळीपासून खाली चालणाऱ्या कारभारामध्ये समाज विकास प्रकल्पातील कामे याचबरोबर कायदा, सुव्यवस्था व न्याय इ. कामे जिल्हा परिषदेकडे सोपवून सत्ता विकेंद्रीकरणाची प्रक्रिया कशी तीव्र होत आहे याची माहिती दिली आहे. भारतीय प्रशासनाबद्दल नकारात्मकता दाखवणारे लेख ही यात छापले गेले. यामध्ये 'सध्याचा राज्यकारभार'[१०९] या लेखात ना. गो. चापेकर यांनी सध्याच्या राजकारणात नोकरशाहीमध्ये लाचलुचपत आणि भ्रष्टाचार इ. गोष्टी कशा वाढत आहेत यावर गंभीर चर्चा केली आहे.

## ३.४.३ आधुनिक भारतावर आधारित विशेष सदर/लेखमाला :-

चित्रमय जगतच्या सुरुवातीच्या काळात गाजलेले अत्यंत महत्त्वाचे सदर म्हणजे **'स्वराज्याचा लढा'** हे होय. हे सदर १९१८ ते १९३० या कालखंडापर्यंत चालू राहिले. दामोदर विश्वनाथ गोखले यांनी या सदराच्या अंतर्गत विविध राजकीय विषयावर महत्त्वपूर्ण लेखन केले

आहे. राष्ट्रीय सभेची ध्येय, धोरणे, विचार सरणी, तिची वाटचाल व बदलते स्वरूप याला अनुसरून यामध्ये लेखन झाले आहे.

लोकशाहीची संकल्पना, काँग्रेसचे विधायक कार्यक्रम, फेर नाफेर पक्ष, मवाळ–जहाल विचारसरणी, काँग्रेसच्या विविध सभा व त्या सभेमध्ये पास झालेले ठराव, असहकार चळवळीचे स्वरूप, वाटचाल आणि महत्व, ब्रिटिशांची दडपशाही, विविध अन्यायकारी कायदे, त्याविरूद्ध राष्ट्रीय सभेने उभारलेले बहिष्कार व स्वदेशीचे शस्त्र याविषयी माहिती देणारे लेखन या सदरामध्ये करण्यात आले.

'स्वराज्याची वैचारिक संकल्पना', 'राष्ट्रीय शिक्षण', 'अहसकारिता–एक नैतिक युद्ध', 'गांधीजींचा सत्याग्रह', 'ब्रिटिशांची भारतीय ऐक्यास फुट पाडण्याची निती', 'ब्रिटिशांची नोकरशाही' असे लेख यात छापले गेले. याचबरोबर राष्ट्रीय लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या पुढाऱ्याविषयी माहिती देणारे लेखही यामध्ये छापण्यात आले. महात्मा गांधी, मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास, लाला लजपत राय यांची कामगिरी सांगणारे लेख या सदरामध्ये छापण्यात आले. तसेच गांधीजीच्या नेतृत्वाखाली झालेल्या विविध सत्याग्रहांची माहिती सांगणारे लेखही यात दिले गेले. यामध्ये 'गांधीजीचे नेतृत्व', 'सत्याग्रह आणि अहिंसा', 'बार्डोली सत्याग्रह', 'चौरीचौरा प्रकरण', 'युद्धाचे निशाण खाली उतरवले', 'राष्ट्रीय सभेचे व्यापक स्वरूप' इ. महत्त्वाचे लेख राष्ट्रीय सभेची व चळवळीची वाटचाल दाखविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. अशाप्रकारे १९१८ ते १९३० या काळातील राजकीय घडामोडी समजून घेण्यासाठी राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे सदर म्हणून 'स्वराज्याचा लढा' या सदराने चित्रमय जगत मासिकात आपली छाप पाडली.

जानेवारी १९२१ पासून डिसेंबर १९४७ पर्यंत **'स्फुट विचार'** हे सदर चालू होते. चित्रमय जगताचे हे 'संपादकीय' सदर होते. स्वातंत्र्य लढ्याचा चालू इतिहास यातून समजतो. हे सदर सर्व संग्राहक स्वरूपाचे असले तरी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास व त्यातील छोट्या मोठ्या घटना कालानुक्रमे व संक्षिप्त पद्धतीने या सदरामध्ये लिहिल्या गेल्या. या सदराचे लेखन त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर यांनी केले होते. या सदरामध्ये भारतीयांना राजकीय शिक्षण देण्यासाठी विविध लेख छापले गेले. त्यामध्ये 'राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता',

'असहकार चळवळ', 'मुळशी सत्याग्रह', 'मलबारातील दंगे', 'मोपला बंड', 'ऑल इंडिया काँग्रेस कमिटी', 'संस्थानी प्रजा व सुधारणा', 'लोकशाहीतील दोष', 'हिंदु मुसलमानांचे ऐक्य', 'देशबंधू दासबाबु व कौन्सिले', 'बारडोली व चौरी चौरा', 'स्वराज्यपक्ष', 'मिठावरचा कर व सरकार', 'महात्मा गांधी ऐक्य', 'महात्मा गांधीचा किमान कार्यक्रम', 'खिलाफत का नष्ट केली', 'बंगलमधील दडपशाही', 'हिंदु महासभा', 'स्वराज्य पक्षाचा कौन्सिल त्याग', 'प्रतिसहकार व स्वराज्य अधःपात', 'रॉयल कमिशन', 'असहकारीतेचे पुनरूज्जीवन', 'कमिशन आले', 'सायमन यावयास निघाले', 'स्वातंत्र्याचा ठराव', 'असेंब्लीतील पब्लीक सेप्टी बिल', 'सायमन कमिशन कशा करिता', 'राष्ट्रीय सभा व नेहरू रिपोर्टचे भावितव्य', 'असेंब्लितील बॉम्ब', 'हिंदु मुसलमानांच्या मागण्यांचा प्रश्न', 'राऊड टेबल परिषद व चार अटी', 'मुंबईतील दंगे', 'बाबु गेनु', 'म. गांधी व राऊड टेबल परिषद', 'मुसलमानांचा हट्ट', 'रॉऊड टेबल परिषदेची इतिश्री', 'मुसलमान व कॉझर्वेटिव्हांचे कारस्थान', 'कॉग्रेस कार्यकर्ते व विधायक कार्यक्रम', 'स्वराज्य पक्ष व विधायक कार्यक्रम', 'जिनांचे वर्चस्व', 'राष्ट्रमत व काँग्रेसमधील स्त्रिया' अशा प्रकारचे लेखन या सदरात केले गेले.

मुस्लिम लिगची कारस्थाने व द्विराष्ट्र सिद्धांत यावरही अनेक लेख या सदरामध्ये छापले गेले. यामध्ये 'जिनांची घातकी वृत्ती', 'जीनांचा पाकिस्तान दिवस', 'सप्रु जिना आणि सप्रु गांधी पत्रव्यवहार', 'जिना साहेब व काँग्रेसचा कट', 'अहिंसा व जातीय दंगे', 'क्रिप्स योजना का फेटाळली', 'गांधी व्हाइसरॉय पत्रव्यवहार', 'गांधी जीना वाटाघाटी', 'राजाजी योजना', 'गांधी–जीना', 'लाहोर ठराव', 'आझाद सैन्य', 'वेव्हेल योजना काय आहे', 'त्रिमंत्री योजना', 'काश्मिरचा खरा प्रश्न', 'घटना परिषदेचे भावितव्य', 'लिग मारेकऱ्यांची संस्था', 'आझाद हिंद सेना' याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराच्या निर्णयावर आधारित 'धर्मांतराचे राजकारण बोलू लागले' इत्यादी महत्वपूर्ण लेख स्वातंत्र्यपूर्ण काळातील राष्ट्रीय आंदोनाच्या वाटचालीवर प्रकाश टाकतात.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये नवे प्रश्न, नविन समस्या यावर आधारित लेख लिहिले गेले. यामध्ये फाळणी, निर्वासीतांची समस्या, भाषांवर प्रांतरचना व संस्थानांचे विलिनीकरण इ. गोष्टींवर आधारित लेख या सदरामध्ये लिहिले गेले. यामध्ये 'निर्वासित उर्फ नव नागरीक',

‘हैद्राबादच्या वाटाघाटी’, ‘रेशनिंगची उपाययोजना’, ‘महागाईचे उगमस्थान’, ‘नियंत्रणे व काळाबाजार’, ‘संयुक्त महाराष्ट्र’, ‘भाषावार प्रांत रचना’, ‘विदर्भाचा भिन्न सुर’, ‘मुंबईनेच संयुक्त महाराष्ट्र निर्माण करावा’, ‘हैद्राबादी प्रजा’, ‘हैद्राबादच्या स्वारीचे परिणाम’ इत्यादी लेख यामध्ये छापले गेले. अशा प्रकारे गांधी युगातील राष्ट्रीय चळवळीची वाटचाल, काँग्रेसमधील विचार प्रवाह, ब्रिटिशांची धोरणे, मुस्लिम लीगचे राजकारण, देशाची फाळणी व फाळणीनंतर उद्‌भवलेल्या समस्या समजून घेण्यासाठी हे सदर अत्यंत महत्त्वाचे आहे.

**विचार संग्रह** हे अत्यंत महत्त्वाचे सदर मे १९२२ पर्यंत चालू राहिले. या सदरामध्ये निरनिराळ्या इंग्रजी मासिकात प्रसिद्ध झालेले महत्त्वाचे विचार अनुवादित करू देण्यात आले. यावरून परकीय व स्वदेशी लेखकांच्या निवडक लेखांची दिशा समजणे हा हेतू होता. या सदरामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय विचारांना विशेष प्राधान्य देण्यात आले. यामध्ये ‘इंडियन रिव्ह्यु’, ‘एंडिबरोरिव्ह्यू’, ‘नेशन’, ‘कॉर्फ औटलुक’, ‘वर्ल्डस वर्क’, ‘आयरिश पब्लिक’, ‘लिबरेटर’, ‘मिथक सोसायटीचे त्रैमासिक’, ‘स्कूल लाईफ वुईइस’, ‘मॉडर्न रिव्ह्यू’ इत्यादी इंग्रजी मासिकामध्ये छापलेल्या लेखावर या सदराच्या अंतर्गत चर्चा करण्यात आली.

**‘राजकीय सद्यस्थिती’** हे अत्यंत महत्त्वाचे सदर जुलै १९२२ ते जुलै १९२४ या काळात चित्रमय जगत मध्ये सुरु करण्यात आले होते. यामध्ये ‘स्पष्टवक्ता’ या विशेषनामाखाली लेख छापले गेले. या सदरामध्ये विशेषतः राष्ट्रीय सभेच्या ध्येय धोरणावर प्रकाश टाकला गेला. काँग्रेसमधील विविध पक्ष आणि विचारसरणी, काँग्रेसची कार्यक्रम पत्रिका, विधायक कार्यक्रम यांचे स्वरूप समजून घेण्यासाठी हे लेख महत्त्वाचे आहेत. यामध्ये ‘लखनौ काँग्रेस’, ‘इंडियन सिव्हिल परिक्षा’, ‘फेरनाफेर विचार’, ‘कायदेभंगाची चळवळ’, ‘स्वराज्य पक्षांचे राजकारण’ असे लेख छापण्यात आले.

**‘संपादकीय’** हे अत्यंत महत्त्वाचे सदर १९४७ पासून चित्रमय जगतच्या अंतापर्यंत चालू राहिले. भारतातील राष्ट्रीय लढ्याचा अंतिम टप्पा व स्वातंत्र्य उत्तर काळातील भारताचे राजकारण समजून घेण्यासाठी हे अत्यंत महत्त्वाचे सदर आहे. यामध्ये भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या शेवटच्या कालखंडातील महत्त्वाच्या घडामोडीवर प्रकाश टाकणारे लेखन चित्रमय जगतचे संपादक त्र्यं. र. देवगिरीकर व नंतर रा. प्र. कानिटकर यांनी केले आहे. यामध्ये

‘ब्रिटनचे मुख्य प्रधान अॅटली यांची भारताला स्वातंत्र्य देण्याची घोषणा’, ‘१९३६ च्या कायद्यातील तरतुदी’, ‘घटना परिषद’, ‘वेव्हेल योजना’, ‘लॉर्ड माऊंट बॅटन नवे व्हाईसराय यांच्या पुढील प्रश्न’ अशा लेखातून भारत व इंग्लंडमधील भारतीय स्वातंत्र्यासंबंधीची प्रक्रिया समजून घेता येते.

याचबरोबर भारताची फाळणी व मुस्लीम लीगच्या कारवायाबद्दल महत्वपूर्ण लेखन या सदरामध्ये झाले. यामध्ये ‘पंजाब व बंगालची विभागणी’, ‘फाळणी केली तर’, ‘माऊंट बॅटन योजना’ या लेखाचा समावेश होतो. स्वतंत्र हिंदुस्थानच्या अंकापासून चित्रमय जगतामधील संपादकीय सदरात स्वातंत्र्योत्तर काळातील विविध घडामोडी व समस्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला गेला. फाळणीमुळे भारतवासियांना स्वातंत्र्याचा आनंदही व्यवस्थित घेता आला नाही. या संदर्भात लेखन करताना फाळणी नंतरच्या प्रश्नांवर विशेष भर या सदरात दिलेला दिसतो. या संदर्भात ‘या पेक्षा युद्ध परवडेल’, ‘हे काय झाले’, ‘जीनांनाच गुंडगिरी भोवेल’, ‘गांधीचे उपोषण’, ‘जुनागड काश्मिरचा लढा’, ‘म. गांधीचा उपवास’, ‘गांधींनी उपवास का केला’, ‘पाकिस्तान आणि आपण’, ‘काश्मीर’, ‘युनोमधील फिर्यादी व आरोपी’, ‘पूर्व बंगालमधील दंगल’, ‘भांडणाचे मुळ व शक्यता’, ‘फाळणीनंतरची जातीय दंगल शमली’, ‘काश्मीर पाकिस्तानात जाण्यापासून वाचविले’, ‘पाकिस्तानच्या कारवाया किती पड खाणार’ असे महत्त्वाचे लेखन यामध्ये आहे. भारत पाकिस्तान युद्धा संबंधीही लेख यात होते. यामध्ये ‘वास्तवादी शास्त्री व सीमा प्रश्न’, ‘पाकिस्तानने शेवटी आक्रमण केलेच’, ‘युद्ध सुरु झाले व संपले आम्ही काय साधले’, ‘कुरबुरी’, ‘ताश्कंद’, ‘रशियाच का’ इ. लेखन भारत पाकिस्तान संबंध, भारत पाकिस्तान युद्ध, ताश्कंद करार समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

संस्थानांच्या भारतातील विलिनीकरणाची प्रक्रिया समजून घेण्यासाठी सुद्धा महत्वपूर्ण लेखन या सदरात झालेले दिसते. यामध्ये ‘निजामाचे भवितव्य’, ‘रझाकारामुळे तडजोड मोडली’, ‘संस्थानांचे विलीनीकरण’ इ. लेख महत्त्वपूर्ण आहेत.

स्वतंत्र भारताच्या आर्थिक ध्येयधोरणांवर प्रकाश टाकणाऱ्या लेखनाचा या सदरात समावेश करण्यात आला. यामध्ये ‘रेल्वे बजेट’, ‘पाच वर्षात काय केले’, ‘पंच वार्षिक योजना’ यांचा समावेश होतो. तसेच संयुक्त महाराष्ट्र व गोवामुक्ती आंदोलनावर आधारित लेखही

संपादकीय सदरामध्ये समाविष्ट करण्यात आले. ‘गोवा विमोचन’, ‘गोमंतकाची भूमिका’, ‘गोवा सत्याग्रह’, ‘पाश्चात्य राष्ट्रे व गोवा’, ‘गोव्यात लोकशाही राज्य’ अशा प्रकारचे लेख गोवामुक्ती लढ्यावर चित्रमय जगतमध्ये छापून जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.त्याचबरोबर संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भात व राज्य पुनर्रचना आयोगाच्या संदर्भात– ‘महाराष्ट्राचा अपमान’, ‘हे कसले द्विभाषिक राज्य’, ‘मुंबई स्वतंत्र नको’, ‘मुंबई कोणाची’, ‘नवी राज्ये’, ‘दुरुस्त्या कोणाच्या’, ‘राज्यपुनर्रचना बिल’, ‘पुनर्रचना कायदा’, ‘मुंबई राज्यात’, ‘संयुक्त महाराष्ट्राचे काय’, ‘भाषिक राजकीय निष्ठा’, ‘महागुजराथ परिषद व समिती’, ‘महाराष्ट्र व गुजराथ तडजोड झाली’, ‘महाराष्ट्र राज्य स्थापना’ हे लेख महत्त्वाचे आहेत.

भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर प्रकाश टाकणारे ‘सीमा प्रश्न सुटला’, ‘चीनचे काय’, ‘चीनची पार्श्वभूमी’, ‘भारताचा तटस्थपणा’, ‘चीन एक यक्षप्रश्न’, ‘चीन युद्ध करील का?’, ‘सिलोन व भारत’, ‘चीनचे खुसपट’, ‘हिंदुस्थानचे काय–दोन गट’, ‘ब्रिटन व रशिया’ असे प्रश्न ही या सदारात चर्चीले गेले. अशा प्रकारे या सदरामधून स्वातंत्र्य प्राप्तीच्या घडामोडींबरोबर स्वातंत्र्य उत्तर कालीन भारतातील राजकीय घडामोडीवर प्रकाश पडतो.

**‘विचारधारा’** हे सदर १९४८ ते १९६० अशा प्रदीर्घ कालखंडापर्यंत चालु होते. देशी विदेशी राजकारण व संवेदनशील घटनांवर विचार यात मांडले जात. स्वातंत्र्योत्तर भारत समजून घेण्यासाठी हे सदर अत्यंत महत्त्वाचे आहे. संस्थानांच्या विलीनीकरणावर आधारित लेख यात छापले गेले. या संदर्भात ‘काश्मिर संस्थान व त्यांचे संस्थानिक’ हा लेख ‘हिंदुस्थानची लोकसंख्या’, ‘महाराष्ट्र महिला परिषद’– यावल येथील पहिले जिल्हा अधिवेशन,‘भारताच्या लष्कराची आंतरराष्ट्रीय भूमिका’, ‘पंचवार्षिक योजनेची पहिली तीन वर्षे’, ‘जागतिक शांततेसाठी पं. नेहरूंचा अमेरिकेत दौरा’, ‘मध्यवर्ती मंत्रीमंडळाची पुनर्घटना’ अशा प्रकारचे लेखन या सदरात केले गेले.

**‘कण आणि क्षण’** विविध क्षेत्रातील संख्यात्मक माहिती देणारे हे सदर होते. १९६१–१९६७ पर्यंत हे सदर चालू राहिले. राजकारण, विज्ञान, साहित्य, संगीत, कला, विविध सरकारी खाती, व्यापारी शहरे, देशी विदेशी वृत्तपत्र, आरोग्य यावर आधारित माहिती यामध्ये दिली आहे. यामध्ये भारतीय राजकारणाच्या संदर्भात ‘विविध राज्यांचे मंत्री’, ‘विविध

प्रशासकीय खाती','टपाल खात्याची संस्मरणीय तिकीटे','भारताचे मंत्रीमंडळ' इत्यादी लेखाद्वारे भारतीय राजकारणाची संरचना समजून घेण्यास मदत होते.

**'चालु इतिहास'** हे १९६४–६७ पर्यंत चालू अंकात येत असे. यामध्ये गेल्या चार आठवड्यातील महत्वपूर्ण घटनांची तारखे सहित संक्षिप्त माहिती दिलेली असे. देशी विदेशी राजकारण, लष्कर, युद्धे, जन्म मृत्यु, महत्वपूर्ण घटना, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक घटना यांची संक्षिप्त स्वरूपात माहिती यामध्ये येत असे. स्वातंत्र्योत्तर काळातील महत्त्वाच्या राजकीय घडामोडी, जेष्ठ लोकांच्या निधन वार्ता, युद्ध, लष्करी कारवाया समजून घेण्यासाठी, राजकीय अंगाने विचार करता यात फारसे लिखाण झाले नाही तरी सुद्धा महत्त्वाच्या राजकीय घडामोडींची संक्षिप्त व कालखंडासहित माहिती यात मिळते.

## ३.४.४ आधुनिक भारतावर आधारित खास अंक/विशेषांक :–

**लोकमान्यांचे पुण्यस्मरण :–** लोकमान्य टिळकांच्या मृत्युनंतर ऑगस्ट १९२० मध्ये त्यांच्या राजकीय कारकीर्दीचा आढावा घेणारा व त्यांना आदरांजली वाहण्यासाठी हा विशेष अंक काढण्यात आला. तो म्हणजे लोकमान्यांचे पुण्य स्मरण होय. या विशेष अंकामध्ये त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा चित्रमय आढावा घेतला आहे. यातील लेख त्यांच्या 'लोकोत्तर नेतृत्त्वाची' साक्ष देतात. न्यु इंग्लिश स्कूल सारखी संस्था व केसरी, मराठा सारखी वृत्तपत्रे स्थापन्यामागील त्यांची भूमिका यावर या लेखांमध्ये चर्चा केली आहे. स्वराज्य पक्ष, स्वदेशीचा लढा, शिवजयंती व गणेशोत्सवामागील तात्विक भूमिका या सर्वांचे विवेचन यातील लेखांमध्ये केले आहे. गीतारहस्य ग्रथाचे तात्विक व राजकीय अंगाने महत्त्व स्पष्ट करून देण्याचा प्रयत्नही या विशेष अंकात झाला. एक महान साहित्यिक, धर्मसमिक्षक, पत्रकार व प्रभावी वक्ते म्हणून त्यांचे गुण प्रदर्शित करणारे व लेखन यामध्ये झालेले दिसते. याचबरोबर लोकमान्य टिळकांच्या राजकीय जीवनातील विविध कृतींचे विवेचन व त्यांच्या सर्व गुणसंपन्न प्रभावी व्यक्तीमत्त्वाचा परिचय या लेखामधून होतो.

**लष्करी खास अंक :–** जानेवारी १९३२ साली हा खास लष्करी अंक निघाला होता. या खास अंकावर ब्रिटिशांनी बंदी घालून चित्रमय जगतवर खटला भरला होता. हिंदुस्थानचा

लष्करी इतिहास यामध्ये देण्यात आला होता. ब्रिटिशांनी भारतीय लष्कर आणि लष्करी वृत्तीची गळचेपी कशी केली याची माहिती यात दिली आहे. या बरोबर ब्रिटिशांची लष्करी व्यवस्था कशी आहे याचीही माहिती दिली आहे. विविध देशातील लष्करी शिक्षण संस्थांची माहिती यात देण्यात आली आहे. निरनिराळ्या प्रांतातील लष्करी जातींची सचित्र माहिती ही यात देण्याचा प्रयत्न झाला. त्या कालखंडात अशा प्रकारे लष्करी माहिती देण्याचा प्रयत्न इतर कोणत्याही मराठी व इतर भाषेतील देशी वृत्तपत्र किंवा मासिकाने केला नाही.ब्रिटिशांनी आपले स्थान आबादित रहावे यासाठी भारतीय लष्करावर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. यासंदर्भातही यामध्ये लेखन झालेले दिसते. याचबरोबर भारतीयांकडे वीरवृत्ती आहे व या वीरवृत्तीला संधी मिळाल्यास ब्रिटिश साम्राज्य धोक्यात येईल असे या लष्करी खास अंकात म्हटले आहे.

**खास काँग्रेस अंक :–** जानेवारी १९३५ मध्ये हा खास काँग्रेस अंक निघाला होता. या मध्ये काँग्रेसचा इतिहास सचित्र व सविस्तर रित्या दिला आहे. यामध्ये काँग्रेसच्या स्थापनेपूर्वी भारतातील राजकीय परिस्थिती, काँग्रेसची कार्यपद्धती, काँग्रेस व ब्रिटिश सरकार यांचे संबंध, काँग्रेसचे संस्थानिक प्रदेशाशी असणारे संबंध, काँग्रेसमधील विविध विचारसरणी, स्वराज्यासाठी काँग्रेसने केलेले प्रयत्न, लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या संदर्भाने काँग्रेसची झालेली वाटचाल यावर भाष्य करणारे लेख लिहिले गेले. या संदर्भाने 'काँग्रेस पूर्वीचा हिंदुस्थान', 'काँग्रेस व सरकार', 'काँग्रेस व संस्थाने', 'काँग्रेस व हिंदी राज्यकारभार', 'काँग्रेस व मुसलमान', 'काँग्रेसचे अर्थशास्त्र', 'काँग्रेस व प्रागतिक पक्ष', 'काँग्रेस व कायदेमंडळ', 'काँग्रेस व जागतिक परिस्थिती', 'काँग्रेस व सामाजिक प्रश्न', 'काँग्रेसवरील संकटे', 'काँग्रेसतर्फे राज्य संपादनासाठी झालेले प्रयत्न', 'काँग्रेस व परिषदा', 'टिळक आणि काँग्रेस', 'म. गांधी आणि काँग्रेस' असे अर्थपूर्ण लेखन झालेले दिसते. याशिवाय काँग्रेसची अधिवेशने, प्रतिनिधींची संख्या, काँग्रेसचे विविध अध्यक्ष यांची सचित्र व आकडेवारी सहित माहिती यामध्ये देण्यात आली होती.

**खास काँग्रेस अंक :–** डिसेंबर १९३५ मध्ये हा अंक निघाला होता. या अंकात 'राष्ट्रीय सभेचे विराट ध्येय', 'काँग्रेस व प्रागतिक पक्ष', 'काँग्रेस हिंदुसभा आणि राष्ट्रीयता', 'हिंदी

राजकीय ऐक्य', 'काँग्रेसमधील स्थित्यंतरे', 'काँग्रेसने काय केले', 'काँग्रेसचे सुत्रधार', 'महाराष्ट्र व काँग्रेस', 'कर्नाटक व काँग्रेस' इत्यादी लेख छापले गेले.

**खास महात्मा गांधी अंक :–** मार्च १९४८ मध्ये गांधीजींच्या हत्येनंतर हा अंक काढण्यात आला. यामध्ये गांधीजींची आवडती भजने छापण्यात आली. राजकीय लढ्याचे पुढारी व असामान्य विचारसरणींचा सामान्य व्यक्ती अशी त्यांची ओळख पटवून देण्याचा या अंकात प्रयत्न केला गेला. गांधीजींचा दिनक्रम व त्यांना विविध कारणांसासाठी भेटणारा लोकसमुह व त्यांना आलेले अनुभव यातील निवडक व्यक्तींचे गांधी सोबतचे अनुभव या अंकात कथन केले गेले.

**स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरण खास अंक :–** जानेवारी १९५० मध्ये हा अंक प्रकाशित झाला. स्वातंत्र्य भारताच्या निर्मितीनंतर भारताची व संपूर्ण जगाची ध्येय धोरणे बदलेली दिसतात. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले परंतु त्याच बरोबर भारताची फाळणी व पाकिस्तानच्या निर्मितीचे अनेक दुष्परिणाम भारतीयांना भोगावे लागले. त्याचवेळी अमेरिका व रशिया ह्या दोन महासत्ता निर्माण झाल्या होत्या. नव्याने स्वतंत्र झालेल्या आशिया, आफ्रिका व युरोप खंडातील देशांना लष्करी व पैशाची मदत देऊन आपआपल्या गटात ओढण्याच्या प्रयत्नात या होत्या. अशा वेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरण कसे असावे या संबंधी महत्त्वाचे निर्णय घेतलेले दिसतात. त्यासंबंधी हा खास अंक काढण्यात आला..

**काश्मिर खास अंक :–** जानेवारी १९५२ मध्ये हा काश्मिर खास अंक निघाला. या लेखामध्ये काश्मिरचा प्राचीन कालखंडापासून सद्यस्थितीचा आढावा घेतला आहे. प्राचीन कालखंडापासूनचे काश्मिरचे ऐतिहासिक भौगोलिक स्थान, प्राचीन राज्यकर्ते, मध्ययुगीन राज्यकर्ते, संस्थानी वर्चस्वाखालील काश्मिर या संदर्भात 'काश्मिरचा प्राचीन इतिहस' हा रा. गो. भिडे यांचा लेख महत्त्वपूर्ण माहिती देतो. याचबरोबर 'काश्मिरची लावण्य रेखा', 'काश्मिरचे रणकंद' व 'नव्या काश्मिरचे निर्माते शेख महमद अब्दुला', 'भारताचे राजकारण व काश्मिरचा प्रश्न' इत्यादी लेख यात छापले गेले.

**लोकमान्य टिळक विशेष अंक :–** ऑगस्ट १९५६ मध्ये लोकमान्य टिळकांच्या जन्मशताब्दी निमित्त हा विशेष अंक काढण्यात आला. या अंकातील 'लोकमान्य' हा लेख लोकमान्य टिळकांचे व्यक्तीमत्त्व जितके महान तितकेच त्यांचे कार्यकर्तुत्व उज्ज्वल होते. याविषयी माहिती देतो. 'लोकमान्यांच्या प्रगाढ पांडित्याचे ओझरते दर्शन' या लेखामध्ये लोकमान्य टिळकांचे वृत्तपत्रीय लेखन, केसरी, मराठा, श्रीमद्‌भागवतगीतारहस्य', 'आर्टिक होम इन द वेदाज' आणि 'ओरायन' यातील लेखन शैली विषयी माहिती दिली आहे.

याशिवाय 'कीर्ति मंदिरावरील सोन्याचा कळस', 'खरे मोठे पुरुष कोण', 'कर्तुत्वाचा कैलास', 'लोकमान्यांनी केलेले स्वातंत्र्याच्या लढ्याचे मार्गदर्शन', 'ब्रिटिशांच्या चार चक्षू नी चितारलेले बाळ गंगाधर टिळक' यामधुन भारतीय राजकारणात टिळकांचे महत्त्व कसे वाढत गेले याचे दिग्दर्शन केले आहे.याशिवाय या विशेष अंकात 'लो. टिळक स्मृति' याच्या अंतर्गत त्यांचे नातेवाईक, मित्र मंडळी व विविध क्षेत्रातील लोक; ज्यांना टिळकांचा सहवास लाभला त्यांचे टिळकांविषयीचे अनुभव या लेखामध्ये कथन केले आहेत. टिळकांच्या व्यक्तीमत्त्वाचे विविध पैलु समजून घेण्यासाठी हा लेख फार उपयुक्त आहे.

**विशाल मुंबई विशेषांक :–** जानेवारी १९५७ मध्ये चित्रमय जगतने हा विशाल मुंबई विशेषांक काढला होता. राज्यपुनर्रचना आयोगापूर्वीचे व नंतरचे मुंबई राज्य कसे आहे याविषयी वाचकांच्या मनात जिज्ञासा असणे स्वाभाविक आहे. ही वाचकांची जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी या खास अंकाचे प्रयोजन करण्यात आले होते. या खास अंकाच्या निमित्ताने मुंबई राज्याचे मंत्री, उपमंत्री व राज्यपाल यांची सचित्र माहिती यामध्ये देण्यात आली. मुंबई राज्यातील एकूण जिल्हे, एकूण भाषा, लोकसंख्या, क्षेत्रफळ यांची आकडेवारी सहित माहिती या विशेष अंकामध्ये देण्यात आली. याशिवाय यामध्ये विविध लेखही दिले गेले. यामध्ये 'महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा', 'ऐतिहासिक सिंहावलोकन– महाराष्ट्र व गुजराथ', 'कच्छ व सौराष्ट्र' , 'नव्या राज्याचा राज्य कारभार कसा असावा','मुंबई राज्याचा ऐतिहासिक विकास', 'असा आहे आमचा विदर्भ', 'असा आहे आमचा मराठवाडा' अशा प्रकारचे लेखन या विशेषांक केले गेले.

**आठराशे सत्तावन विशेषांक :–**१८५७ च्या उठावाला शंभरवर्षे पूर्ण झाल्याबद्दल ऑगस्ट १९५७ मध्येहा विशेष अंक काढण्यात आला. यामध्ये 'शिपाई घटनेची मीमांसा','असंतोषाचा

वणवा' 'रंगो बापुजी', 'सत्तावनच्या उठावाची पार्श्वभूमी व त्याचे परिणाम', 'नानासाहेब पेशवे', '१८५७ च्या लढ्याचे मूल्यमापन', '१८५७ च्या प्रचंड उठावाची मुळ भूमिका' इत्यादी लेख छापले गेले.

**सर्वोदय विशेषांक :–** जनू १९५८ चा हा सर्वोदय विशेषांक आहे. स्वातंत्र्य उत्तर काळात जवाहरलाल नेहरू यांचे भारताला लाभलेले नेतृत्व व म. गांधी यांची विचारसरणी यातून स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकारणात समाजवादी तत्वज्ञानाचा विकास झालेला दिसतो. त्यातूनच सर्वोदयाची संकल्पनाही विकसित झालेली दिसते. याविषयीची माहिती विशेषांक दिली आहे. यामध्ये 'प्रतिकाराचा नवा पर्याय', 'सर्वोदयाची साधना', 'सर्वोदयायाचा सार्वभौम विकास', 'सर्वोदयपात्र व शांतीसैनिक', 'आचार्य विनोबांविषयी', 'विनोबांचे विचार मनन' असे सर्वोदय संकल्पनेचे अर्थपूर्ण विवेचन करणारे लेख आढळतात.

**सुवर्ण महोत्सव विशेषांक :–** जानेवारी १९६० मधील या सुवर्ण महोत्सव विशेष अंकात १९१० ते १९६० या ५० वर्षाच्या काळात हिंदुस्थानामध्ये घडलेल्या राजकीय स्थित्यंतराचे धावते समालोचन केले आहे. या संदर्भात 'राजकीय सिंहावलोकन', 'तेव्हा आणि आता गेल्या ५० वर्षात काय गेले व काय आले', 'लोकशाही आणि महाराष्ट्राचे भवितव्य', 'महाराष्ट्रातील गेले अर्धशतक' या लेखांचा समावेश होतो.

**गोमंतक विशेषांक (जानेवारी १९६३) :–** डिसेंबर १९६१ रोजी गोवा पोर्तुगीजांच्या तावडीतून मुक्त झाला, या प्रसंगाचे औचित्य साधून गोव्याच्या पूर्वी व नंतरच्या राजकीय घडामोडींवर भाष्य करणारा हा अंक लिहीला गेला. त्यामध्ये 'गोव्याची समस्या', 'गोव्याचे प्राक्तन', 'गोमंतक स्वातंत्र्याचे एक पर्व', 'गोमंतकांचा पुर्वोतिहास', 'राण्यांच्या बंडाचे वनपर्व' या लेखांचा समावेश होतो.

**सीमा संघर्ष विशेषांक (जानेवारी १९६४) :–** याध्ये भारत पाकिस्तान संबंध, भारत–चीन संबंध यांच्यामधील सीमावाद, त्यातील बारकावे राजकीय संबंध यावर या विशेष अंकात चर्चा केली आहे. 'भारत पाकिस्तान व अमेरिका', 'चिनी कम्युनिझमचे स्वरूप', 'भारत व

पाकिस्तान', 'चिनी कम्युनिझमचे वाढते आक्रमण', 'भारत व पाकिस्तान यांचा सीमा संघर्ष' या लेखांचा समावेश होतो.

**महाराष्ट्र राज्य निर्मिती विशेष अंक (मे १९६४) :–** स्वातंत्र्य उत्तर कालखंडातील अत्यंत महत्त्वाची राजकीय चळवळ म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळ होय. या चळवळीचे फलित म्हणजे १ मे १९६० रोजी झालेली संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती. या महाराष्ट्र राज्यनिर्मिती संदर्भात १९६४ मे मध्ये हा विशेष अंक काढण्यात आला. 'महाराष्ट्र राज्यनिर्मिती : भारतीय लोकशासनातील एक महापर्व','संयुक्त महाराष्ट्राची वाटचाल', 'संयुक्त महाराष्ट्राची फलश्रुती', 'महाराष्ट्राची चार वर्षे' या लेखांचा समावेश होतो.

**जवाहरलाल नेहरू विशेष अंक, जुलै १९६४ :–** २७ मे १९६४ ला पं. जवाहरलाल नेहरू यांचा मृत्यु झाला. त्यानंतर त्यांच्या राजकीय कारकीर्दीवर प्रकाश टाकण्यासाठी व त्यांना आदरांजली वाहण्यासाठी हा खास अंक प्रकाशित करण्यात आला. यामध्ये 'थोर संत व यशस्वी मुत्सद्दी', 'नेहरूंच्या सानिध्यात', 'तुरुंगात आणि तुरुंगाबाहेर' या लेखांचा समावेश होतो.

## ३.५ जागतीक घडामोडीवर आधारित राजकीय लेखन :–

चित्रमय जगतमधील जागतिक लेखनातून पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या अनुषंगाने विविध देशांची राजकीय माहिती सांगणारे लेखन झाले. तत्कालीन भारत व जग समजून घेण्यासाठी हे जागतिक घडामोडींवर आधारित लेखन खुप महत्त्वाचे आहे. चीन, जपान, इग्लंड, अमेरिका, रशिया या देशाविषयी माहिती देणारे लेखन मोठ्या प्रमाणात झालेले दिसते.

'चिनातील राज्यक्रांती' या लेखांमध्ये चीन मधील मांचु राजघराणे कसे परकीय आहे व ते स्वतःला कसे श्रेष्ठ व उच्च मानतात. त्याचा पूर्वइतिहास काय आहे याबद्दल माहिती दिली आहे. तसेच चिनी लोकांशी मांचु कसे फटकुन वागतात, राज्यातील महत्त्वाची अधिकार पदे आपल्या ताब्यात ठेवून मांचु राजघराणे सामान्य चिनी जनतेवर कसा अन्याय करत आहे. या सर्व असंतोषातून चिनी लोकांनी मांचु घराण्याची सत्ता उलथून टाकण्यासाठी कशी क्रांती केली याची ही माहिती यात दिली आहे. 'पिवळा बागलबोवा'[११०] या लेखात सदाशिव या लेखकाने पिवळा बागलबोवा हे विधान चीनी लोकांना उद्देशून वापरले आहे. चिनी लोक पीत किंवा

पिवळ्या रंगाचे असून चीनमध्ये झालेल्या राज्यक्रांतीमुळे चीनची महत्त्वकांक्षा वाढली आहे व त्याची भिती युरोपीयन राष्ट्रांना कशी वाटू लागली आहे याविषयी विवेचन केले आहे.

'दोन समुद्रांच्यामधील चोखाटअथवा कैसरच्या डोळ्यात सलत असलेल्या सुएझचा कालवा'यामध्ये वैकुंठराय या लेखकाने सुएझचा कालवा इंग्रजांच्या साम्राज्यवादाचे मर्मस्थान कसे आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. भूमध्य समुद्र व अरबी समुद्र यांना सुएझच्या कालव्याने जोडल्यामुळे अशिया व आफ्रिका खंडात साम्राज्यविस्तार करणे कसे सोपे झाले. या कालव्यामुळे हिंदुस्थान व पौर्वात्यदेश कसे युरोपच्या जवळ आले आहेत व व्यापार व युद्धाच्या दृष्टीकोनातून या कालव्याला कसे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे आणि त्यामुळे तो कैसरच्या डोळ्यात कसा सलत आहे यावर चर्चा केली आहे.

'पनामा कालवा' महादेव राजाराम बोडस यांच्या या लेखामध्ये विसाव्या शतकात भौतिकशास्त्र व कलांमध्ये जो प्रचंड विकास होत आहे, त्याच्या सहाय्याने मानवी बुद्धीला बाह्य साधनांचे विपुल सहाय्य मिळून नवीन चमत्कार मानवी कृत्यामधून घडत आहेत व त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'पनामा कालवा' होय. हा कालवा अटालांटिक महासागराच्या कॅरिबियन समुदाला प्रशांत महासागरासोबत कसा जोडतो व त्यामुळे दळणवळणाचा वेग व सुविधा कशी वाढली आहे यावर चर्चा केली आहे.

## पहिल्या महायुद्धावर आधारीत जागतिक लेख :-

'ऑस्ट्रीयातील भयंकर अत्याचार! युवराज युवराज्ञीचा खुन!!'[१११] युरोपखंडातील महत्वाच्या प्रमुख राष्ट्रांमध्ये ऑस्ट्रीया-हंगेरी या राष्ट्रांचा समावेश होतो. या दोन्ही राष्ट्राची शासनपद्धती, पार्लमेट सभा भिन्न आहेत. पण दोन्ही देशाचा बादशहा मात्र १५२६ पासून एकच आहे. त्यामुळे लष्कर, आरमार आणि परराष्ट्र धोरण याबाबतीत या दोन्ही राष्ट्राचे एकीकरण झाले आहे. अशा या संयुक्त राष्ट्रावर फ्रॉन्सिस जोसेफ हे युरोपातील सर्वात वयोवृद्ध बादशहा सत्ता चालवित आहेत. या बादशहास पुत्र संतती नसल्यामुळे त्याचा भाचा आर्चडयुक फार्निनांड हेच त्यांचे भावी वारस आहेत. परंतु आर्चडयुक फार्निनांडचा २७ जून १९१४ मध्ये वॉसनिया प्रांतातील सेरा जेव्हो नामक मुख्य शहरी एक सर्व्हियन अराजकाने गोळ्या झाडून खुन केला या

संबंधी सविस्तर माहिती या लेखात दिली आहे. 'जलयुद्धाची सिद्धता'[११२] डॉ. गणेश सदाशिव सहस्त्रबुद्धे यांच्या लेखात ब्रिटिशांच्या आरमाराची माहिती दिली आहे. आरमारी जहाजाची सुसज्जता, तोफ गोळे यांची सचित्र माहिती दिली आहे. तोफाचे गोळे जहाजांकडे आणल्यानंतर घ्यावयाची काळजी, तोफाची पेरण, तसेच पाण्याच्या दाबापासून उत्पन्न केलेल्या शक्तीच्या सहाय्याने तोफा उडविण्याचे काम कसे केले जाते याची माहिती दिली आहे.पहिल्या महायुद्धात जलयुद्धाला महत्व प्राप्त झाले होते. त्यासंदर्भात समुद्रात जहाजावरुन केले जाणारे युद्ध व त्याची लष्करी रणनीती इ. ची माहिती यात दिली आहे. तसेच अशा लढाईत शिस्त किती महत्वाची असते त्याविषयी माहिती दिली आहे. इशाराचे ब्युगल वाजल्यावर जहाजाचे पांढरे निशान काढून युनियन जॅक फडकवला जातो. जहाजावर त्यानंतर कोणतीही वस्तु ठेवण्यास परवानगी नसते. कारण त्यामुळे शत्रुला सुगावा लागण्याची शक्यता असते. वेडर जहाजाची उपयुक्तता, जहाजावरील शस्त्रक्रिया व उपचाराची व्यवस्था या विषयीही माहिती दिली आहे.

'सांप्रतचे महायुद्ध व तत्संबंधी युरोपीय तंज्ञाची मीमांसा'[११३] या लेखामध्ये सी. के. दामले यांनी युरोपीयन तज्ञांची महायुद्धासंबंधीची भाकिते याविषयी चर्चा केली आहे. त्यासंदर्भात जर्मन सैन्य व्यवस्थेचा प्रमुख अधिकारी जनरल बर्नहार्डी याच्या 'जर्मनी व जर्मनीचे पुढील युद्ध' या ग्रंथाचा दाखला दिला आहे. जर्मनीच्या युद्ध तयारी संबंधी चर्चा केली आहे. तसेच इंग्लंडमधील सोशालिस्ट पक्षाचे प्रसिद्ध लेखक मि. रॉबर्ट ब्लॅचफर्ड यांनी १९०९ मध्ये 'डेलीमेल' या दैनिकात जर्मनी लवकरच युद्धामध्ये प्रवेश करेल अशी माहिती दिली होती. तसेच जॉर्ज बुर्डो या फ्रेंच ग्रंथकाराने पॅरिसमधील फिगाटो या वृत्तपत्रामध्ये what the Germans think what they want and what they can do याचे विवेचन केले आहे. या सर्व विवेचनावरुन हे सिद्ध होते की जर्मनी लवकरच युद्धात भाग घेणार असून हे युद्ध आकस्मित नसून पुर्वनियोजित असणार आहे. यासाठी जर्मनीने लष्कर आणि शस्त्रास्त्र यांची केलेली जुळवाजुळव व जर्मनीच्या गुप्तहेर कारवाया याविषयी माहिती दिली आहे.

'जर्मन हेरांची गुप्त कारस्थाने'[११४] या ज. स. करंदीकर यांच्या लेखामध्ये युरोपातील विविध देशांच्या गुप्त बातम्या काढण्यासाठी जर्मनीने स्वतंत्र खाते निर्माण केले आहे, त्यासंबंधी माहिती दिली आहे. या कामासाठी या राष्ट्राचा जितका पैसा खर्च होतो तितका कोणत्याच

राष्ट्राचा होत नसावा असे लेखक म्हणतो. हेर तयार करण्याचे प्रशिक्षण वर्ग जर्मनीने सुरु केले आहेत वेगवेगळ्या राष्ट्रांच्या प्रशासकीय यंत्रणेमध्ये राहून जर्मनीच्या हिताची भयंकर कारस्थाने हेरमंडळी कशी करतात याविषयी यात माहिती दिली आहे.

'आंतरराष्ट्रीय कायदा व सांप्रतचे महायुद्ध' या लेखात सी. के. दामले यांनी राष्ट्राराष्ट्रातील तंटे सोडविण्यासाठी सुधारलेली राष्ट्रे मधस्थी करुन ते तंटे कसे सोडवतात व त्याला आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरुप कसे प्राप्त होते याविषयी चर्चा केली आहे. तसेच या कायद्याची व्याप्ती सुधारलेल्या राष्ट्रापुरतीच कशी मर्यादीत असते याविषयी चर्चा केली आहे.

'जर्मनीचा आशिया खंडातील चंचु प्रवेश'[११५] या दा. वि. गोखले यांच्या लेखामध्ये 'विश्वसाम्राज्य अगर राष्ट्रीय मृत्यू या तत्वास धरुन जर्मनीने सर्व जगात आपले साम्राज्यवादी धोरण राबविण्यास कशी सुरुवात केली आहे याची माहिती दिली आहे. इजिप्त व हिंदुस्थानवर जर्मनीचा कसा डोळा आहे व त्याच्या बगदाद रेल्वे प्रकल्पामागचे उद्देश काय आहेत यावर चर्चा केली आहे. नविन देश काबीज करुन तेथे लष्करी व राजकीय वर्चस्व निर्माण करण्यासाठी जर्मनी काय काय करते आहे याविषयी यात चर्चा केली आहे.

'इटली व सांप्रतचे महायुद्ध' सी. के. दामले यांच्या लेखात इटली कोणत्या गटामध्ये सामील होऊन महायुद्धात उतरणार याविषयी माहिती दिली आहे. या संदर्भात जर्मनी, ऑस्ट्रीया व इटली यांचे त्रिकुट बऱ्याच वर्षापासून अस्तीत्वात होते त्यामुळे त्यांच्या बाजूने इटली महायुद्धात प्रवेश करेल अशी चर्चा होती. परंतु युद्धात आस्ट्रीयाचा पराभव दिसू लागल्याबरोबर इटलीने जर्मन त्रिकुटातील एक मित्र राष्ट्र असताना सुद्धा मित्र राष्ट्राच्या बाजूने युद्धात कसा प्रवेश केला याविषयी माहिती दिली आहे.

'अमेरिकेची युद्धाची तयारी' दा. वि. गोखले यांनी महायुद्धाच्या वनव्याच्या ज्वाला कमी अधिक प्रमाणात जगातील इतर राष्ट्रांनाही कसे चटके देत आहेत या संदर्भात या लेखामध्ये भाष्य केले आहे. अमेरिका हे पुढारलेले राष्ट्र आहे चालु महायुद्धामध्ये अमेरिका कोणत्याही पक्षास सामिल झाला नव्हता. परंतु अमेरिकेच्या व्यापारावर बराच मोठा परिणाम झाला. जर्मनीने

अमेरिकेची 'लुसिटानिया' नावाची बोट बुडवल्यानंतर अमेरिका युद्धात उतरेल की नाही याविषयी माहिती दिली आहे.

'जपानचे धोरण' (एका माजी जपानी प्रोफेसरचे विचार) अनुवाद–कृष्णाजी अनंत किनरे, या लेखात चालु महायुद्धात जपानला तोटा न होता त्या उलट त्याची आर्थिक सुधारणाच झाली आहे, युरोपीयन राष्ट्रे मात्र या युद्धाच्या प्रभावामुळे कशी हालाखीला आली आहेत याविषयी यात माहिती दिली आहे. तसेच जपानची महायुद्धाच्या संदर्भात काय भूमिका असेल याविषयी चर्चा केली आहे.

'रशियाचे ध्येय' या दामोदर वैजनाथ आठल्ये यांच्या लेखात रशियन सैन्य जीवाची पर्वा न करता महायुद्धामध्ये कसे सर्वशक्तीनिशी योगदान देत आहे यावर चर्चा केली आहे. त्याचबरोबर रशियाचे राष्ट्रीय ध्येय व प्रस्तुत अडचणी यावरही यात चर्चा केली आहे.

'परराष्ट्रीय राजकारण' या लेखामध्ये चीन व महायुद्ध या अंगाने विवेचन केले आहे. आशिया खंडातच नव्हे तर संपूर्ण जगात कायम शांतता रहाण्यासाठी चीन अभंग राहिला पाहिजे असे अनेक मुत्सद्यांचे मत आहे. त्यासाठी दोन गोष्टीची आवश्यकता आहे, त्या म्हणजे चीनमधील यादवी नष्ट झाली पाहिजे व दुसरे म्हणजे परकीय राष्ट्रांचा चीनमधील साम्राज्यवादी दृष्टीकोन नष्ट झाला पाहिजे या संदर्भाने चीनची राज्यपद्धती, परराष्ट्र धोरण यावर चर्चा केली आहे.

'जर्मनीची अतःस्थिती' या लेखामध्ये, जर्मनीने दोस्त राष्ट्रांकडे खलिता पाठवून तहास कबुल असल्याचा निरोप पाठविल्यानंतर या संदर्भात जगभरात अनेक तर्क वितर्क होऊ लागले त्यातील काहीजन जर्मनीच्या धुर्तपणाची तर काही जर्मनीला खरोखरच उपाशी मरण्याची वेळ आली आहे यावर चर्चा करत आहेत. या अनुषंगाने यात कारण मिमांसा केली आहे. जर्मनीतील सोशालिस्ट पक्षाने सुद्धा युद्ध बंद करण्याचा तगादा लावला आहे. त्यासंदर्भात त्यांनी हस्तपत्रके वाटली आहेत त्यातील एक स्विझर्लंडमधील प्रमुख वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले त्याचा सारांश या लेखात दिला आहे.

'रशियातील प्रमिला' या प्रस्तुत लेखात, रशियाने लष्करी दरारा कमी झाल्यानंतर तहाची बोलणी सुरु केली. पुरुषांनी लढाईतून माघार घेतली असतानाही रशियन स्त्रियांनी आपल्या पतीचा, नातेवाईकाचा जो युद्धात मृत्यू झाला त्याचा बदला घेण्यासाठी युद्ध चालु ठेवण्याचे कसे आवाहन केले याविषयी माहिती यात दिली आहे. रशियाच्या प्रशासन, अर्थकारणात स्त्रियांनी भाग घेऊन देशाची परिस्थिती सुधारण्यासाठी कसा प्रयत्न चालवला आहे याची माहिती यात दिली आहे. 'रशियन राज्यक्रांती व अमेरिकेची सहानुभूती' या लेखामध्ये, रशियामध्ये राज्यक्रांती होऊन राज्यसत्तेच्या जागी लोकसत्तेची स्थापना झाली या गोष्टीचा सर्वात जास्त आनंद अमेरिकेला का झाला? या मागे अमेरिकेचे धोरण काय आहे, रशियन लोकसत्ताक पक्षाला पुर्ण मदत करण्याचे कार्य अमेरिकेने का शिरावर घेतले आहे परंतु अमेरिकेने पाठविलेल्या मदतीचा रशियाने फारसा फायदा का घेतला नाही यावर चर्चा केली आहे.

'जर्मन हेर व त्यांची सांकेतिक भाषा' या लेखामध्ये पहिल्या महायुद्धाच्या काळात जर्मनीच्या हेरांनी जी महत्वपूर्ण कामगिरी बजावली त्याचे विवेचन केले आहे. जर्मन हेर आपल्या मायदेशी बातमी पुरवण्यासाठी सांकेतिक भाषेचा वापर करत. विविध भूमितीय आकृत्या, अल्फाबेटस, आकडेमोड, बुद्धीबळाचा पट याचा वापर करत असत. त्यांच्या एका पत्रातील चित्राच्या देखाव्यात जे पक्षी दाखवले आहेत त्यावरुन दोस्त राष्ट्रांनी कोठे कोठे पानसुरुंगक पेरले आहेत हे समजते.

## दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी तयार करणारे जागतिक लेख :–

पहिले महायुद्ध संपल्यानंतर दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी तयार करणारे जागतिक लेख या मासिकामध्ये छापण्यात आले.

'पोलंडचे पुनरुत्थान'[११६] उत्तर युरोपखंडातील पोलंड व हिंदुस्थान या दोन्ही देशाच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये बरेचसे साम्य आहे असे लेखक 'महाराष्ट्रीय' यांचे म्हणणे आहे. उत्तरेस बाल्टीक समुद्र आणि दक्षिणेस कार्पेशियनपर्यंत पोलंड देश पसरला आहे. सुमारे दीडशे वर्ष जर्मनी, रशिया व ऑस्ट्रिया या देशांनी पोलंडची तीन छकले करुन ती आपआपसात कशी

वाटून घेतली, युरोपच्या नकाशातून पोलंडचे नावही नष्ट केले. याविषयी माहिती देऊन युरोपीयन महायुद्धाच्या खळबळीत या राष्ट्राला स्वतःचे आत्मभान कसे आले आहे याचे वर्णन या लेखात केले आहे.

'कोरियन स्वातंत्र्यावर गदा' या ना. कृ. आगाशे यांच्या लेखामध्ये कोरिया जपानच्या वर्चस्वाखाली कसे गेले? तेथील पूर्वइतिहास, कोरियाचे महत्व, रशिया, जपान व इतर राष्ट्रांची कोरियावर असणारी वक्र दृष्टी यावर चर्चा केली आहे. 'टर्कीचा वीरशिरोमणी गाझी मुस्ताफा केमालपाशा' या त्र्यं. रं. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये तुर्कस्थानच्या स्वातंत्र्यासाठी झटणारे केमालपाशा यांच्या कर्तुत्वाचा परिचय करुन दिला आहे.

'चिनमधील अशांतता' या त्र्यं. रं. देवगिरीकरांच्या लेखामध्ये चीनमधील राजकीय पक्ष आणि व्यापारी यांच्यामधील संघर्ष, जपान व इग्लंडचे चीनमधील व्यापारी हितसंबंध यावर चर्चा केली आहे. 'जर्मन लोकांचे आकाशसामर्थ्य'[११७] यामध्ये रा. के. कोरटकर म्हणतात की, पूर्वी राष्ट्राचे सामर्थ्य हे जमीनीद्वारे मोजले जात असे. महायुद्धानंतर आकाशसामर्थ्य युगाचा प्रारंभ झाला या युद्धामध्ये इग्लंडने आकाशसामार्थ्याने जर्मनीचा पाडावा केला, परंतु युद्धानंतर दहा वर्षातच जर्मनीने आकाश सामर्थ्यामध्ये लक्षणीय प्रगती केली याचा आढावा या लेखात घेतला आहे.

'आशिया खंडाचे भवितव्य'[११८] या लेखामध्ये पाश्चात्य राष्ट्रांनी आशिया खंडातील निरनिराळे देश आपल्या घशात कसे घातले, तसेच आशिया खंडाची सांप्रतची स्थिती व भविष्यकाळी या खंडाच्या नशिबी लिहिलेल्या भवितव्याचा विचार या लेखात केला आहे. आशिया खंडाचा सारा इतिहास हा आपल्या गुलामगिरीचा इतिहास आहे. मागील इतिहासापासून धडा घेऊन चुकांची पुनरावृत्ती होऊ नये या गोष्टीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे असे लेखक म्हणतात.

'ज्यु आणि अरबांचे भांडण' या लेखात पॅलेस्ताईनमधील ज्यु आणि अरब यांच्या संघर्षाची माहिती दिली आहे. हिंदुस्थानप्रमाणे हिंदु व मुसलमान यांच्यात जश्या मारामाऱ्या चालु आहेत तशीच परिस्थिती पॅलेस्ताईनमधील ज्यु व अरब यांची आहे. या दोन्ही देशात ब्रिटिशांची

सत्ता आहे व हिंदुस्थानात मुसलमानांना व पॅलेस्ताईनमध्ये ज्यु लोकांना हाताशी घेऊन ब्रिटिश दोन संप्रदायांमध्ये भांडणे कशी लावत आहेत व स्वतःचा स्वार्थ कसा साधत आहेत याविषयी विवेचन केले आहे.

'जपान अमेरिकेचे युद्ध होणार काय?' या त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये पॅसिफिक महासागरामधील देश कोणी घ्यावेत यावरुन जपान व अमेरिकेमध्ये जो संघर्ष चालु आहे याची कारणमीमांसा यात दिली आहे. 'भावी युद्धाचे भयानक स्वरुप'[११९] हा लेख रा. गो. भिडे यांनी लिहिला आहे. यामध्ये पहिल्या महायुद्धाच्या परिणामांची व त्यातील मनुष्य आणि वित्तहानीची चर्चा केली आहे. त्याचबरोबर पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीमध्ये दुसऱ्या महायुद्धाची बीजे कशी रोवली आहेत याचीही माहिती दिली आहे. रुसो– जपानी युद्ध, बाल्कन युद्ध, पहिले महायुद्ध यामधून शास्त्रास्त्र निर्मिती व तंत्रज्ञान अजून कसे विकसित झाले आहे यावरही चर्चा केली आहे. यामध्ये खंदकी लढाई, पाणबुड्या, विमानयुद्धे, विषारी धूर, अग्नीप्रलय, भयंकर अशी स्फोटकद्रव्ये यांची माहिती देऊन भावी युद्धाचे स्वरुप भयानक कसे असणार आहे यांची माहिती दिली आहे.

'युद्धाची तयारी' यामध्ये द. श्री. मराठे यांनी जर्मनीने आपले सैन्य, आरमार, विमाने यांची संख्या वाढवून युद्धास अनुकूल अशी राष्ट्रभूमिका कशी तयार केली आहे यांवर चर्चा केली आहे. फ्रान्स व रशिया विरुद्ध जनमत तयार करण्यामध्येही जर्मनी कोणकोणत्या मार्गाचा वापर करत आहे यावर यात चर्चा केली आहे. 'हिटलरने कसा विजय मिळवला' या लेखामध्ये हिटलरने झेकोस्लोव्हाकिया, सुडेटन प्रांत अल्पावधीतच कसा मिळवला यावर चर्चा केली आहे. 'इटली फ्रान्सची तेढ आणि तिचे राजकारणावरील परिणाम' या द. श्री. मराठे यांच्या लेखामध्ये म्युनिच करारापासून युरोपीयन राजकारणाला घसरगुंडी लागली आहे आणि हे राजकारण शेवटी महायुद्धाच्या खाईत कसे जाऊन पडणार आहे याचा वेध यात घेतला आहे.

'आगामी युद्ध व भूमध्य समुद्राचा प्रश्न' आगामी युद्धात भूमध्य समुद्र कोणाकडे जाणार या प्रश्नाला फार महत्व प्राप्त झाले आहे. गेल्या महायुद्धात इटली इंग्लंच्या बाजूने असल्याने हा प्रश्न उद्भवला नव्हता. परंतु आता इटली व इंग्लंडमध्ये वाद निर्माण झाल्याने भूमध्य समुद्राचा

प्रश्न निर्माण झाला आहे या मागची कारणमीमांसा केली आहे. या सामन्यात कोणकोणाचे हितसंबंध कसकसे बाधित होणार आहेत याचीही चर्चा केली आहे.

'महायुद्धाची भीषण छाया पडू लागली' या द. श्री. मराठे यांच्या लेखात, युरोपात विविध देशामध्ये जे तह होत आहेत हे तसे इतक्या प्रमाणात क्वचीतच इतिहासात झाले असतील. या पार्श्वभूमीवर भावी रणकंदाची तयारी सर्व राष्ट्रे करीत आहेत. प्रत्येक राष्ट्र मित्र कोण आणि शत्रु कोण याची काळजीपूर्वक पहाणी करीत आहेत. त्यातून गंभीर वातावरण तयार होऊन महायुद्धाची छाया कशी पडत चालली आहे यावर चर्चा केली आहे. 'रशिया युरोपच्या रणक्षेत्रात' या लेखामध्ये रशिया व जर्मनी बाल्कनवर ताबा मिळविण्यासाठी आतोनात प्रयत्न करत आहेत त्यामुळे बाल्कनचे स्वातंत्र्य केव्हा धोक्यात येईल हे सांगता येत नाही. अशाप्रकारे जर्मनी व रशिया यांच्यातील बाल्कनच्या संदर्भाने होणाऱ्या संघर्षाविषयी कारणमीमांसा केली आहे.

'जलयुद्धाचा आरंभ' द. श्री. मराठे, यामध्ये गेल्या महायुद्धापेक्षा या महायुद्धाचे स्वरुप कसे वेगळे आहे यावर चर्चा केली आहे. हे युद्ध मुख्यतः इंग्लंड व जर्मनी यांचे असून हे युद्ध भूमीवर सुप्तावस्थेत दिसले तरी हवेत, समुद्रावर आणि राजकीय क्षेत्रात ते फार जोराने चालले आहे. यासंदर्भात अमेरिका व इंग्लंडच्या प्रबळ आरमाराची माहिती दिली आहे. 'रशियाचे परराष्ट्रीय राजकारण आणि युद्धनिती'[१२०] या दत्तात्रय श्रीधर मराठे यांच्या लेखामध्ये रशियाचे पराराष्ट्रीय धोरण व युद्धात मिळविलेला प्रवेश, फिनलंडवर रशियाने केलेली कारवाई यावर प्रकाश टाकला आहे.

'महायुद्धाचे तिहेरी स्वरुप'[१२१] या श्रीकृष्ण रामचंद्र पोतनीस यांच्या लेखामध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या भीषण स्वरुपाविषयी चर्चा करुन यातून होणारी वित्त व मनुष्य हानी याकडे लक्ष वेधले आहे. त्याचबरोबर या युद्धाच्या परिणामांची मीमांसा करताना या युद्धामुळे जगावर तिहेरी संकट पडणार आहे. ते तिहेरी संकट राजकीय, आर्थिक व नैतिक स्वरुपाचे आहे याविषयी चर्चा केली आहे. 'फ्रान्सचा रणसंग्राम' यामध्ये द. श्री. मराठे यांनी फ्रान्सच्या रणनीतीवर भाष्य केले आहे. फ्रान्सचा साम्राज्यवाद, त्यामध्ये जर्मनीचा हस्तक्षेप, फ्रान्सचा अडेलपणा आणि

मुर्खपणा व जर्मनीने फ्रान्सची केलेली चोहोबाजूंनी कोंडी व त्यामुळे फ्रान्सला पत्करावी लागलेली शरणागती यावर भाष्य केले आहे.

'या महायुद्धातून नवे जग कसे निर्माण होईल' या लेखाची मुळ लेखिका फ्रेडा युटेल आहे तिच्या लेखाचा मराठी अनुवाद यात देण्यात आला आहे. दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम काय होईल? नवी समाजरचना उदयास येईल की नवा रानटीपणा उदयास येईल. नाझीवादाचा विजय झाल्यास युद्धोत्तर जग कसे असेल याविषयी मांडणी केली आहे. 'रशियाची पुनर्घटना' या लेखामध्ये रा. ना. अष्टपुत्रे या लेखकाने रशियाची आर्थिक प्रगती, पंचवार्षिक योजना, साम्यवादी अर्थव्यवस्था यावर भाष्य केले आहे.

'महायुद्धाने शिकवलेले धडे'[१२२] या लेखामध्ये महायुद्धे ही ध्येयवादाच्या भूमिकेवरुन लढली जातात असा शास्त्रीय सिद्धांत मांडला आहे. समान ध्येयाची राष्ट्रे एक होतात व आपल्या ध्येयाशी विरोधी असणाऱ्या राष्ट्राचा निःपात करतात. असे पाश्चात्य विद्वानांचे मत आहे. परंतु चालु महायुद्धाचे अवलोकन केल्यास हे दिसून येईल की, युद्धाचा व ध्येयाचा काहीही संबंध नसतो. कारण हिटलर हा कम्युनिझमचा अत्यंत द्वेष्टा पण युद्धाची तुतारी फुंकताच त्याने रशियाबरोबर सख्य करुन टाकले. एक वेळ हिटलरचे धोरण समजू शकतो परंतु रशिया हा एकमेव मजुरांचा देश, भांडवलशाही व साम्राज्यशाही नष्ट करावी, चोहीकडे कामगार राज्ये स्थापन व्हावीत असे या राष्ट्राचे मत होते. तरीही त्याने जर्मनीशी सख्य केले. यावरुन असे दिसते की, महायुद्ध व राष्ट्र ध्येयाचे सिद्धांत याचा काहीही संबंध नसतो. हे सिद्ध करण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे.

'भुमध्य समुद्राच्या आसमंतात' या द. श्री. मराठे यांच्या लेखात दुसऱ्या महायुद्धात जलयुद्धामुळे भूमध्य सागरचे महत्व कसे वाढले आहे, फ्रान्स, इटली, इंग्लंड आणि रशिया या प्रमुख राष्ट्रांना हा समुद्र कसा महत्वपूर्ण वाटू लागला आहे. जर्मनी भूमध्य समुद्रातील बंदरे मिळवण्यासाठी कसा प्रयत्नशील आहे याविषयी चर्चा केली आहे. 'अमेरिका आणि महायुद्ध'[१२३] या द. श्री. मराठे यांच्या लेखामध्ये चालू महायुद्धामध्ये अमेरिकेची काय भूमिका रहाणार आहे, याकडे सगळ्या जगाचे लक्ष कसे वेधले आहे. अमेरिकेच्या युद्धातील पदार्पनामुळे जर्मनीचा धीर कसा खचु लागला आहे यावर चर्चा केली आहे.

'जपानची साम्राज्याविषयक महत्वकांक्षा'[१२४] यामध्ये महाराष्ट्रीय या लेखकाने रुसो जपानी युद्धामुळे जपानची महत्वकांक्षा कशी वाढली, तसेच पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांच्या बाजूने उतरुन जपानने आपला फायदा कसा केला. यानंतरच्या काळात जपानचा साम्राज्यवादी दृष्टीकोन वाढीस लागून चीनच्या मांचुरिया प्रांतावर कसे वर्चस्व मिळवले, सैन्य व आरमारात कशी वाढ केली, राष्ट्रसंघात कसा प्रवेश मिळवला याविषयी विवेचन केले आहे.

'ॲग्लो जर्मन जलयुद्ध' या श्रीकृष्ण रामचंद्र पोतनीस यांच्या लेखामध्ये भूमिगत युद्ध कौशल्यात जर्मनी कशी प्रभावी आहे व जलयुद्धामध्ये ब्रिटन कसे अग्रेसर आहे याविषयी माहिती दिली आहे. जलयुद्धात शत्रुपक्षाची नाकेबंदी कशी करायची यामध्ये इंग्लंड प्रसिद्ध आहे. यामध्ये नाकेबंदी म्हणजे काय? गेल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांनी तिचा कसा व किती उपयोग केला. चालु महायुद्धात तीचा कसा वापर करणार आहेत याविषयी चर्चा केली आहे. त्याचबरोबर याविषयी जर्मनीची मते काय आहेत याची माहिती देताना लेखक म्हणतो की ब्रिटनची नाकेबंदीची रणनिती फारशी उपयोगी नाही. गेले महायुद्ध जर्मन लोकांचे निती ध्येय ढासळल्यामुळे गमवावे लागले परंतु चालु महायुद्धात जर्मनीत स्वतःच्या पायावर उभे रहाण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले असून इंग्लंडचे नाकेबंदीचे शस्त्र जर्मनीला नामोहरण करु शकणार नाही याबद्दल विवेचन केले आहे.

'जर्मनीची युद्धाची तयारी' या द. श्री. मराठे यांच्या लेखामध्ये दुसऱ्या महायुद्धासाठी जर्मनी विशेष क्रियाशील का आहे याची कारणमीमांसा केली असून हिटलरचे नेतृत्व, नाझीवाद, पहिल्या महायुद्धाच्या पराभवाची सल, व्हर्सायचा तह याची सविस्तर माहिती दिली आहे.

'युद्धाचा काही विचार' या द. श्री. मराठे यांच्या लेखामध्ये महायुद्धामध्ये आधुनिक शस्त्रे आणि तंत्रज्ञानाने जी महत्वाची भूमिका बजावली याविषयी अधिक माहिती दिली आहे. त्यानुसार आधुनिक युद्ध तंत्र, वैज्ञानिक शोध, संहार युद्धशास्त्र, भूमीयुद्ध, समुद्रयुद्ध व अवकाशयुद्ध यांचे स्वरुप स्पष्ट केले आहे. 'जागतिक शांततेची योजना'[१२५] या रा. प्र. कानिटकर यांच्या लेखामध्ये जगातील सर्व राष्ट्रांनी युद्ध टाळण्यासाठी काय केले पाहिजे याविषयी चर्चा केली आहे. शांततामय सहजीवन, आर्थिक सामाजिक प्रश्नांकडे विशेष लक्ष,

निः शस्त्रीकरणाचे कायदे, युद्धबंदीचे निती नियम व युद्धाच्या संहारकतेविषयी जाणिव जागृती होणे गरजेचे आहे असे लेखक म्हणतो.

'रशिया ब्रिटन आणि हिंदुस्थान' शं. द. जावडेकर यांनी या लेखात रशियाने बर्लिनवर स्वारी करुन कामगारशाहीचा लाल झेंडा नाझीवादाच्या राजधानीवर कसा फडकविला याविषयी माहिती दिली आहे. त्याचबरोबर कम्युनिस्ट क्रांती, राष्ट्रसंघाचे अपयश यावर चर्चा केली आहे. तसेच जर्मनीने ब्रिटन, तुर्कस्थानवर चढाई करायचे सोडून रशियावर आक्रमण करुन आपल्याच हाताने स्वतःचा नाश कसा ओढवून घेता व ब्रिटनने हा आनंद कसा व्यक्त केला. या सर्व घडामोडीबरोबर हिंदुस्थानात ब्रिटिश विरोधी वातावरण कसे तयार झाले आहे व त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यचळवळीला कसा जोर आला यावर चर्चा केली आहे.

'नवा राष्ट्रसंघ'[१२६] या लेखामध्ये गेल्या महायुद्धातून राष्ट्रसंघ (लीग ऑफ नेशन्स) कसा जन्माला आला व जागतीक सुरक्षितेसाठी चालु युद्धातून संयुक्त राष्ट्र संघटना कशी जन्माला आली याविषयी चर्चा केली आहे. २५ एप्रिल १९४५ रोजी सॅनफ्रॉन्सस्को येथे अमेरिकेचे त्यावेळचे परराष्ट्र मंत्री एडवर्ड स्टेटिनियस यांच्या अध्यक्षतेखाली ४७ राष्ट्रांच्या प्रतिनिधीच्या साक्षीने संयुक्त राष्ट्र संघाची १११ कलमी घटना बनविण्यात आली यामध्ये मानवाचे मुलभूत हक्क, मनुष्यजातीचे मुल्य, स्त्री पुरुषाचे समान हक्क यांचा समावेश आहे. युद्धाच्या भीषणतेची जाणिव, समान न्याय, स्वातंत्र्य व सामाजिक प्रगती व जीवनमानातील प्रगतीचाही यात समावेश होता. सलोखा सहिष्णुता आंतरराष्ट्रीय शांतता व जगाची आर्थिक घडी नीट बसविण्यासाठी सगळ्यांनी एकत्र येण्याचे उद्दिष्ट यामध्ये कसे ठरविण्यात आले होते. यावर चर्चा केली आहे.

याशिवाय पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धावर आधारित विशेष सदर व लेखमाला चित्रमय जगतने सुरु केली होती. या संदर्भात पत्येक महिन्याच्या सदरातून युद्धाच्या प्रत्येक महिन्यातील युद्धामधील घडामोडी दोन्ही गटातील लष्करी हलचाली, रणनिती याविषयी सचित्र माहिती देण्यात आली होती. त्याचबरोबर युद्धाच्या प्रत्येक वर्षाचा शेवटचा अंक 'महायुद्धाचे सिंहावलोकन' हा होता युद्धविषयक वार्षिक घडामोडीचा संक्षिप्त व चिकित्सक आढावा यामध्ये

घेतला जात असे अशाप्रकारे महायुद्धांचा चालु व विश्वासार्ह चित्रपट चित्रमय जगत मधून दाखवला गेला. यामध्ये कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांनी या लेखमालेचे लिखाण केले होते.

भारताच्या स्वातंत्र्योत्तर कालखंडातील जागतिक लेखामध्ये दोन महासत्ता, साम्यवाद व भांडवलशाही यांच्यातील संघर्ष, भारताचे विशेषतः पं नेहरुंचे अलिप्ततावादी धोरण, भारत व चीन व भारत पाकिस्तान संबंध यावर आधारित लेख छापले गेले ते पुढीलप्रमाणे होते.

'मार्शल योजनेची चर्चा'[१२७] या हरी माधव नाफाडे यांच्या लेखामध्ये अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्शल यांनी युरोपीयन राष्ट्राच्या औद्योगिक उन्नती करता त्यांना कर्ज देण्याची योजना तयार केली आहे. तीला मार्शल योजना म्हटले जाते. या योजनेचे स्वरूप काय आहे. या मागील अमेरिकेचा मुळ उद्देश काय, आर्थिक भरभराटीबरोबरच युरोप खंडात आपले राजकीय वर्चस्व निर्माण करण्याचा हेतु यामागे आहे का याची चर्चा करुन युरोपीयन राष्ट्रांची भांडवलशाहीच्या तत्वावर औद्योगिक पुनर्घटना व्हावी या मागचा उद्देश आहे का यावर चर्चा केली आहे.

'पुर्व युरोपातील नवी घडी' या वा. य. कोल्हाटकर यांच्या लेखामध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या वणव्यात होरपळून निघालेल्या पूर्व युरोपातील राष्ट्राची नव्या लोकशाही राजवटीखाली कशी आर्श्चकारक प्रगती सुरु आहे याचा वृत्तांत यात दिला आहे. त्या संदर्भाने हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, बल्गेरिया इ. देशात काय काय बदल झाले आहेत, तेथील आर्थिक नियोजन, पंचवार्षिक योजना याविषयी यात चर्चा केली आहे.

'पहिल्या ॲटमबॉम्बचा स्फोट'[१२८] या पंढरीनाथ रेगे यांच्या लेखामध्ये हिरोशीमा या जपानी शहरावर ॲटम बॉम्बचा प्रयोग केल्यामुळे साठ हजार माणसे मारली गेली एक लाख जखमी झाली अडीच लक्ष वस्तीचे प्रचंड शहर आगीच्या वणव्यात जळून भस्म झाले. या घटनेचा समग्र वृत्तांत यॉर्कर या आंतरराष्ट्रीय वृत्तपत्राने प्रसिद्ध केला या संदर्भाने या घटनेची माहिती दिली आहे.

'पॉलिस्ताईन प्रश्नाचा पूर्व इतिहास' यामध्ये वि. न. घारपूरे यांनी पॉलिस्ताईन हा विषय आंतरराष्ट्रीय राजकारणात कसा गाजत आहे यावर भाष्य केले आहे. या संदर्भाने

पॅलिस्ताईनची भौगोलिक सीमा, पूर्व इतिहास, ज्यु–अरब संबंध, रशिया, ब्रिटन, अमेरिका यांची या लढ्यातील भूमिका यावर चर्चा केली आहे.

'पॅलिस्ताईन प्रश्नाचा पूर्व इतिहास' यामध्ये वि. न. घानपूरे यांनी पॅलिस्ताईन हा विषय आंतरराष्ट्रीय राजकारणात कसा गाजत आहे यावर भाष्य केले आहे. या संदर्भाने पॅलिस्ताईनची भौगोलिक सीमा, पूर्व इतिहास, ज्यु–अरब संबंध रशिया, ब्रिटन, अमेरिका यांची या लढ्यातील भूमिका यावर चर्चा केली आहे.

'अमेरिकेची मार्शल योजना' या ह. मा. नाफडे यांच्या लेखामध्ये युरोपीयन राष्ट्रांची आर्थिक घडी नीट बसवण्यासाठी अमेरिकेने त्यांना आर्थिक मदत देऊ केली आहे, याची माहिती दिली आहे. युरोपातील जीतकी अधिक राष्ट्रे अमेरिकेची मदत घेतील तितके अमेरिकेचे वर्चस्व कसे वाढत जाईल. व आपले परराष्ट्र धोरण बळकट करण्याकरता अमेरिकेनी ही योजना आखून रशियाला शह देण्याचा कसा प्रयत्न केला आहे यावर भाष्य केले आहे.

'रशियाला युद्ध हवे काय?'[१२९] या ज. ना. ढगे यांच्या लेखामध्ये तिसऱ्या महायुद्धाच्या संभव्यवतेसंबंधी रशियाची क्रियाशीलता परराष्ट्रीय धोरण यावर यात चर्चा केली आहे. याच संदर्भातील दुसरा लेख म्हणजे 'जगाचे भविष्य आणि चीन' यामध्ये न. वि. गाडगीळ म्हणतात की, चीनचे परराष्ट्रधोरण जर मास्कोशी एकरूप झाले तर तीसरे महायुद्ध फार काळ टळणार नाही. जगाच्या राजकारणाचे केंद्र बर्लिन नंतर मध्य आशियातील तेलाच्या प्रदेशातून आता पेकिंगमध्ये कसे स्थिरावले आहे यावर यात चर्चा केली आहे.

'युद्धोत्तर जपान' या मधुकर केशव शेटे यांच्या लेखामध्ये १९५१ मध्ये सॅनफ्रान्सिस्को येथे ४८ राष्ट्रांनी जपानशी शांततेचा तह करून जपानला स्वतंत्र राष्ट्राचे स्थान दिले. त्यानंतर पाच वर्षात अमेरिकेच्या दबावाखाली असणाऱ्या जपानने औद्योगिक प्रगती करून जागतिक राजकारणात पुन्हा दृष्टीक्षेपात येण्याचा प्रयत्न केला आहे याविषयी यात भाष्य केले आहे.

भारत चीन संबंधावर प्रकाश टाकणारे लेखही यात लिहिले गेले. यामध्ये 'चीनचे भारतावरील आक्रमण' या त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये भारत पाकिस्तान यांची सरहद्द, तेथील भूरचना व भौगोलिक परिस्थिती, भारतीय सीमेचा जुना इतिहास, प्राचीन मध्ययुगीन

राज्यकर्त्यांनी केलेला सीमा विस्तार, ब्रिटिशकालीन भारतीय सीमा यावर चर्चा केली आहे. त्र्यं. र. देवगिरीकरांच्या 'हे युद्ध कशाकरता?' पुढील लेखामध्ये भारत चीन यांच्यात झालेल्या युद्धाच्या विविध कारणांची चर्चा केली आहे. 'भारत चीन सरहद्द' या लेखामध्ये भारत व चीन यांच्या सरहद्दीच्या संदर्भातील पुर्वापार चालत आलेली परंपरा, संकेत, तह, करार नामे, मैत्री संबंध यावर चर्चा केली आहे. भारत चीन लढ्याची लेखमाला ही सुरु करण्यात आली होती. यामध्ये या युद्धाच्या ताज्या घडामोर्डींची वार्ता येत असे.

'चिनी युद्धाला विराम स्वल्प अर्ध का पुर्ण'[१३०] या त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये, चीनने तुफानी आक्रमण करुन दोन अडीच हजार मैलाचा भारतीय मुलुख जिंकला व अचानक युद्धबंदीची घोषणा केली व सैन्य ही मागे घेतले, याविषयी चीनच्या वर्तवणुकीची चर्चा यात करण्यात आली आहे. भारत पाकिस्तान संबंधावर भाष्य करणारे लेखन यात झाले. यासंदर्भात युद्धाच्या चालु घडामोडीचे समालोचन करणारी लेखमालाही सुरु करण्यात आली होती. त्याचबरोबर अनेक लेखही लिहिले गेले. या संदर्भात 'पाकिस्तान भारताशी युद्ध करील काय'[१३१] या सुमति वाळके यांच्या लेखामध्ये दोन्ही देशांचे लष्करी बळ, युद्ध तयारी यांचा तुलनात्मक आढावा घेतला आहे.

'युद्धाला सुरुवात' या त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या लेखात भारत पाकिस्तान युद्धाच्या कारणांचा सांगोपांग विचार केला आहे. तर रा. प्र. कानिटकर यांच्या 'भारत पाकिस्तान युद्धाचे समालोचन' या लेखात जिहादची संकल्पना, अमेरिकेची पाकिस्तानला होणारी लष्करी मदत, सरहद्दीचा वाद, करारभंग, सीमावर्ती प्रदेशात घुसखोरी यावर चर्चा केली आहे.

## ३.५.२ जागतिक इतिहासावर आधारीत खास अंक :–

**खास चीन अंक,** (ऑगस्ट १९२६) यामध्ये 'चीनमधील राष्ट्रीयत्वाची वाढ', 'चीनमधील अंतस्थ घडामोडी', 'चीनपासून हिंदुस्थानने काय लुबाडून घ्यावे', 'डॉ. सन्यत्सेन व त्यांचे तत्वज्ञान', 'चीन व हिंदुस्थान' या लेखांचा समावेश होतो.

**खास अंक रशिया,** (जून १९२८) यामध्ये ‘रशियन राज्य क्रांतीचा इतिहास’, ‘सोव्हिएट रशियातील न्यायकचेऱ्या व फौजदारी कायदे’, ‘बोलशेविझम’, ‘बोलशेविक त्रिमुर्ती’ या लेखांचा समावेश होतो

**स्पेन खास अंक** (जानेवारी १९३८), यामध्ये ‘स्पेन लढ्याची पार्श्वभूमी’, ‘स्पेनमधील लोकसत्तेची चळवळ’, ‘स्पेनमधील राजकारण’, हे लेख महत्त्वाचे आहेत.

**खास जपान अंक,** (जानेवारी १९३६) या अकांमध्ये ‘जपानचा पुर्णोदय’, ‘जपानची राज्यघटना’, ‘जपानचे सैन्य’ हे लेख महत्त्वाचे आहेत.

**जर्मनी खास अंक,** (नोव्हेंबर १९३८), या अंकामधील ‘जर्मनीतील लोकशाहीचे धिंडवडे’,‘जर्मनीतील लष्करशाही’, ‘नाझीपक्ष कसा संघटित केला‘, ‘जर्मनी व इंग्लंडची रणसामग्री’ हे लेख महत्त्वाचे आहेत.

**झेकोस्लोव्हाकिया खास अंक,** (जानेवारी १९२९), या अंकामधील ‘झेकोस्लोव्हाकिया आणि युरोपियन राजकारण’, ‘हिटलरला पाहिजे तरी काय?’, ‘झेकोस्लोव्हाकिया चिरफाडीचा इतिहास’ हे लेख महत्त्वाचे आहेत.

**खास कोरिया अंक,** (जानेवारी १९५०), या अंकामध्ये ‘डॉ. सिंगमनऱ्ही’, ‘कोरियाच्या स्वातंत्र्याचा जीवंत इतिहास’, ‘कोरिया व पं. नेहरुंचे परराष्ट्रीय राजकारण’, ‘चीन कोरीया आणि फोर्मोसा’, ‘कोरीया की कुरुक्षेत्र’, ‘कोरीया व संयुक्त राष्ट्र’,‘कोरीया प्रश्न व हिंदुस्थानचे परराष्ट्र धोरण’ हे लेख महत्त्वाचे आहेत.

**नवचीन विशेष अंक**, (जानेवारी १९५५)**,** या अंकामध्ये ‘चिनी कम्युनिस्ट राजवटीची पाच वर्षे’,‘भारत व लाल चीन’, ‘चिनी लोकराज्याची नवी घटना’, ‘भारत व चीन यांचा पुर्वापार ऋणानुंबंध’, ‘चीन व अमेरिका’, ‘सलोखा व शेजारधर्म’ हे लेख महत्त्वाचे आहेत.

**पाकिस्तान विशेष अंक** (जानेवारी १९५९) या विशेष अंकामध्ये ‘पाकिस्तान भूरचना आणि लोकवस्ती’, ‘पाकिस्तानातील पक्ष’, ‘पाकिस्तान पुढील प्रश्न’, ‘पाकिस्तानी राजकारण’ हे लेख महत्त्वाचे आहेत.

**खास अंक अमेरिका** (जानेवारी १९६१), या खास अंकातील 'अमेरिकेपासून जगाने काय शिकावे', 'मी अमेरिकेत काय पाहिले', 'भारत व अमेरिका', 'अमेरिकेचे प्रणेते', 'अमेरिकेची राज्यघटना आणि लोकशाही' हे लेख महत्त्वाचे आहेत.

## ३.५.१ जागतिक घडामोडीवर आधारीत महत्वपुर्ण सदरे :–

जागतिक घडामोडीवर असणारे खास सदरही चित्रमय जगातमध्ये सुरु करण्यात आले होते. ते म्हणजे **'परदेशातील घडामोडी'**. जुलै १९४७ पासून हे खास सदर सुरु करण्यात आले होते. परराष्ट्रातील राजकारणातील विचार प्रवाहांचा धावता परामर्श या सदरात सुरु करण्यात आला. निः पक्षपाती भूमिकेतून घेतलेला हा आढावा वाचकांना जागतिक परिस्थितीची यथार्थ कल्पना येईल असे लेख छापले गेले.

**'विचारधारा'** हे जागतिक इतिहासावर भाष्य करणारे दुसरे महत्वाचे सदर होते, १९४८–१९६० या कालखंडापर्यंत ते चालु राहिले. देशी विदेशी राजकारणावर संवेदनशील विचार यात मांडले जात असत. याशिवाय **'विचार संग्रह'** हे अत्यंत महत्वाचे सदर १९२०–१९४७ पर्यंत चालु होते. यातही मोठ्या प्रमाणात जागतिक राजकारणावर आधारित लेख छापले गेले.

## समारोप :–

ब्रिटिशांनी भारतीय इतिहासाची सदोष मांडणी केली. त्या मांडणीमध्ये 'साम्राज्यवादी' संकल्पनेला मुळ स्थान होते. अशा इतिहासाला विरोध करण्यासाठी भारतीयांनी राष्ट्रवादी इतिहास लेखन प्रवाह प्रस्तुत केला. या अनुषंगाने चित्रमय जगतमधील राजकीय लेखन पाहिले तर त्याचे स्वरुपही राष्ट्रीय लेखन परंपरेतील दिसून येते.

या मासिकाचा मुळ हेतु भारतीयांना राजकीय शिक्षणाचे धडे देणे हा होता. या मासिकातील राजकीय लेखावरुन हा हेतु साध्य झाल्याची प्रचिती येते. या मासिकामध्ये प्राचीन भारत, मध्ययुगीन भारत, भारताच्या स्वातंत्र्य लढ्याविषयाचे लेखन व समकालीन जागतिक घडामोडींवरील लेखन हे राजकीय अंगाने केले गेले होते.

प्राचीन भारतावर आधारित राजकीय लेखनाचा विचार करता, यामध्ये द. गो. लिमये, पा. वा. काणे, दां. वि. गोखले, म. अ. मेंहदळे, त्र्यं. र. देवगिरीकर, शं. ना. ताम्हाणे, चि. वि. वैद्य, अ. भा. आळतेकर या विद्वान मंडळींनी या संदर्भात लेखन केले आहे. त्यांच्या लेखनातील विषयांमध्ये प्राचीन भारतीय राजयव्यवस्था प्राचीन भारतीय राज्यकर्ते, प्राचीन भारतीय नगरे, प्राचीन भारतीय राजनिती ग्रंथ, धर्मग्रंथ, निती ग्रंथातील राजकीय संदर्भ असणारे लेख, बौद्ध व जैन धर्माचा व राजकारणाचा संबंध दर्शविणाऱ्या लेखांचा समावेश होतो.

भारतीयांना आपला वैभवशाली इतिहास ज्ञात व्हावा, प्राचीन राजकीय संस्था संकल्पनांची माहिती व्हावी, प्राचीन राज्यव्यवस्था व राज्यकर्ते याकडून प्रेरणा व मार्गदर्शन मिळावे, धर्म, संस्कृती, साहित्य, राजनिती संदर्भात भारत प्राचीन काळी किती वैभवशाली होता याचे ज्ञान भारतीयांना व्हावे यासाठी अशा प्रकारचे लेख लिहिले गेले.

परकीय अंमलाखालील भारतीयांना असंस्कृत व रानटी मानणाऱ्या ब्रिटिश राजनितीला वैचारिक दृष्ट्या शह देण्यासाठी व आपल्या सुसंस्कृत सभ्यतेचे रूप दाखावण्यासाठी या प्राचीन भारतावर आधारित राजकीय लेखनाने प्रेरणा देण्याचे काम केले आहे. भारतीय समाज सुसंस्कृत होता व त्यांनाही शासनप्रणालीचे ज्ञान होते हे दाखण्याचा प्रयत्न या लेखांमधून झालेला दिसतो.

मध्ययुगीन भारतावर आधारलेले राजकीय लेखन चित्रमय जगतमधून झालेले दिसते यामध्ये इतिहास संशोधक दत्तोपंत विष्णु आपटे, रा. चि. वैद्य, पां. न. पटवर्धन, शि. म. परांजपे, रा. गो. भिडे, गो. स. सरदेसाई यांच्या लेखांचा समावेश होतो. यांच्या लेखनाचे विषय छ. शिवाजी महाराज, छ. संभाजी महाराज, विविध सरदार घराणी, संस्थाने, वंशावळी, मराठ्यांच्या राजकारभारावर आधारित पत्रव्यवहारांचे प्रकाशन, ऐतिहासिक मध्ययुगीन विशेषतः मराठ्यांच्या इतिहासावर आधारीत वादग्रस्त विषयावरील चिकित्सक लेखन, मध्ययुगीन राजकीय संस्था संकल्पनांवर आधारित लेखन, प्रशासन लष्कर व्यवस्थेवर आधारीत लेखन, पानिपतच्या पराभवाची मीमांसा करणारे लेखन, मराठेशाहीच्या अस्ताची मिमांसा करणारे लेखन, मराठा–मुस्लीम सत्ता संबंध व मराठा–ब्रिटिश संबंधांवर प्रकाशन टाकणारे लेखन यामध्ये मराठ्यांच्या इतिहासाच्या संदर्भात करण्यात आले.

याचबरोबर मुघल सत्तेच्या नाशाची मीमांसा करणारे, मुघल सरदार, मुघल ब्रिटिश संबंधावर भाष्य करणारे लेखनही यात झाले आहे.

मध्ययुगीन भारतावर आधारित राजकीय लेखनामध्ये विशेषतः मराठ्यांच्या इतिहासावर भर देण्यात आला आहे. परकीय सत्तेच्या अंमलात स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवाजी महाराजांच्या कामगिरीचा परिचय भारतीयांना व्हावा. कर्तबगार राष्ट्रपुरुषांकडून प्रेरणा घेता यावी यासाठी शिवाजी महाराजांवर अनेक लेख यात छापण्यात आले.

द. वि. आपटे हे स्वतः इतिहास संशोधक असल्यामुळे त्यांच्या या वृत्तीची छाप त्यांच्या मासिकामधील लेखांवरही पडलेली दिसते. मराठ्यांच्या इतिहासावर टिका करणाऱ्या परप्रांतीय व परकीय इतिहासकारांना पुराव्यासहित प्रतिउत्तर देणारे लेख यात छापण्यात आले. टिकात्मक, चिकित्सक लिखाणास प्राधान्य देऊन ऐतिहासिक संशोधन पद्धतीला अनुसरुन यामधील लेखन झाले आहे. पानिपतचा पराभव व मराठेशाहीचा अस्त यांच्या संदर्भाने येणाऱ्या लेखामधून पूर्वजांनी केलेल्या चुका निदर्शनास आणून त्यापासून काय बोध घेतला पाहिजे याविषयी मार्गदर्शन केलेले दिसते.ब्रिटिशांच्या अंमलाखाली असणाऱ्या भारतीयांच्या राष्ट्रीय जाणिवा विकसित करुन हा अंमल दुर करण्यासाठी राष्ट्र कार्यास उदयुक्त करणारे लेखन यामधून झालेले दिसते.

आधुनिक भारतावर आधारीत राजकीय लेखनही मोठ्या प्रमाणात चित्रमय जगतमध्ये झालेले दिसते. त्यामध्ये ठळक दोन भाग करता येतील, एक म्हणजे स्वातंत्र्य लढ्यावर आधारीत राजकीय लेखन व दोन स्वातंत्र्योत्तर कालखंडातील राजकीय लेखन असे होय. यामध्ये चित्रमय जगतचे संपादक त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर आणि रा. प्र. कानिटकर यांचा मोठा सहभाग आहे. याशिवाय म. रा. बोडस, केशव सीताराम ठाकरे, दा. वि. गोखले, चि. वि. वैद्य, शि. म. परांजपे, सि. के. दामले, शं. द. जावडेकर, दे. श्री. मराठे, ज. स. करंदीकर, प्रेमा कंटक भाऊ धर्माधिकारी, न. र. फाटक या विद्वान मंडळीचा समावेश आहे.

यामध्ये बंगालची फाळणी, मोर्ले मिंटो सुधारणा कायदा, राष्ट्राचे ध्येय, स्वराज्य, साम्राज्य प्रतियोगिता सहकार्य, वसाहतीचे स्वराज्य, जबाबदारीचे स्वराज्य अशा प्रकारचे लेख

लिहिले गेले. त्यातून भारतीयांच्या राष्ट्रीय जाणिवा विकसित करण्यात आल्या. लोकमान्य टिळक व त्यांच्या जहालमतवादाचे चित्रण करणारे अनेक लेख यामध्ये छापले गेले. त्यामधून ब्रिटिश विरोधी भावना निर्माण करण्याचे कार्य चित्रमय जगतने साधलेले दिसते.

गांधी कालखंडावर मोठ्या प्रमाणात लेखन यामधून झाले यासंदर्भात अहिंसा, सत्याग्रह, सविनय कायदेभंग, स्वदेशी, बहिष्कार, हरताळ या गांधी तत्वज्ञानातील विविध घटकांची माहिती देणारे लेखन यामधून झाले. गांधीजीचे अफ्रिकेतील कार्य, त्यानंतर भारतात आल्यावर भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे त्यांनी स्विकारलेले नेतृत्व, चंपारण्य सत्याग्रह, खेडा सत्याग्रह, रौलेट कायदा, जालियनवाला बाग हत्याकांड, खिलाफत चळवळ, यातून असहकार चळवळीने प्राप्त केलेला आकार, असहकार चळवळीचे स्वरुप, वाटचाल या चळवळींच्या यशस्वी वाटचालीसाठी वापरलेले बहिष्काराचे आणि स्वदेशीचे तत्व या विषयाला अनुसरुन अनेक लेख चित्रमय जगतमध्ये छापले गेले. याप्रकारच्या लेखांमधून राष्ट्रीय चळवळीकडे सामान्य लोकांना आकर्षित करण्याचे काम चित्रमय जगतमधून झालेले दिसते. स्वातंत्र्यचळवळ सामान्य लोकांपर्यंत पोहचवण्याचे कामही याद्वारे झालेले दिसते.

यानंतरच्या राजकीय लेखांमध्ये फेर नाफेर, स्वराज्य पक्ष, सायमन कमिशन, नेहरु रिपोर्ट, लाहोर अधिवेशन, सविनय कायदेभंग चळवळीचा उदय, मिठाचा सत्याग्रह, धारासना सत्याग्रह, या संदर्भात महाराष्ट्रात झालेले मीठाचे सत्याग्रह, शिरोडा व वडाळा येथील सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, सोलापूरचा सत्याग्रह याविषयी माहिती देणारे लेख चित्रमय जगतमधून छापण्यात आले.

या लेखांमुळे स्वातंत्र्य चळवळीची व्याप्ती व स्वरुप कसे वाढत गेले हे समजते. लोकसहभाग व भारताच्या कानाकोपऱ्यापर्यंत चळवळीचे अस्तित्व कसे पोहचले आहे हे ही समजते. चळवळीला दडपून टाकण्यासाठी सरकारने राबवलेली दडपशाही व केलेल्या राजकीय सुधारणा याविषयी अनेक वैचारिक लेखही यात छापण्यात आले. याच पार्श्वभूमीवर पहिली गोलमेज परिषद, गांधी आयर्विन करार, दुसरी गोलमेज परिषद, रॅम्से मॅकडोनाल्डचा जातीय निवाडा व पुणे करार, तिसरी गोलमेज परिषद याविषयी ब्रिटिशांची फुटीर निती दाखवणारे लेखनही चित्रमय जगतमध्ये झालेले दिसते.

दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर वैयक्तिक सत्याग्रह, क्रिप्स मिशन, छोडोभारत चळवळ यावर आधारीत लेखामधून भारतीय स्वातंत्र्य लढा कसा स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर येऊन पोहचला होता हे ही समजते.

भारतीय स्वातंत्र्याच्या अनेक प्रवाहांपैकी भारतीय क्रांतीकारकांची सशस्त्र चळवळ हा एक महत्वाचा प्रवाह आहे. अन्यायी व जुलमी ब्रिटिश सरकारला सशस्त्र क्रांतीनेच वटणीवर आणता येईल अशी त्याची विचारसरणी होती. याच्यावर प्रकाशन टाकणारे लेखही यात छापले गेले. भारतीय तरुणवर्गाला स्वातंत्र्यलढ्यासाठी प्रेरीत करण्याचे काम या क्रांतीकारकावरील लेखांनी केले होते.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा सर्वोच्च आविष्कार म्हणजे राष्ट्रीय सभा होय. या राष्ट्रीय सभेचा स्थापनेपासूनचा इतिहास, विविध परिषदा, अधिवेशने, त्यात पास केलेले ठराव, काँग्रेस कार्यकारणीतील सदस्य याविषयी भाष्य करणारे बरेचसे लिखाण चित्रमय जगतमधून झाले होते. ब्रिटिशांविरुद्धच्या भारतीय लढ्याची घटनात्मक वाटचाल समजून घेण्यासाठी काँग्रेसवर लिहिले गेलेले लेख अत्यंत महत्वाचे आहेत. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या वाटचालीत उद्‌भवलेली सर्वात मोठी समस्या म्हणजे मुस्लीम लीगचे राजकारण, द्विराष्ट सिद्धांत व पाकिस्तानची मागणी आणि निर्मिती होय. यावर भाष्य करणारे लेखनही चित्रमय जगतमधून झाले होते.

या लेखांच्या अध्ययनातून जातीयवादाचा उदय, विकास आणि त्याची कारणे, विविध जातीयवादी संघटना आणि त्यांची कार्ये, मुस्लीम लीग, महमद जींनाची विचारसरणी आणि त्यांचा द्विराष्ट्र सिद्धांत, पाकिस्तान या स्वतंत्र राष्ट्राची रहमत अली चौधरी याची कल्पना व ब्रिटिशांच्या धोरणांमुळे सांप्रदायिकता किंवा जातीय वादाला मिळालेले खतपाणी यावर प्रकाश पडून पाकिस्तानच्या निर्मितीची पार्श्वभूमी लक्षात घेणे शक्य होते.

भारताच्या घटनात्मक सुधारणांच्या इतिहासातील शेवटचा टप्पा म्हणजे वेव्हेल योजना, सिमला परिषद, त्रिमंत्री योजना, माऊंट बॅटन योजना व भारतीय स्वतंत्र्याचा कायदा यावरील लेखांमधून भारतीय स्वातंत्र्याची निर्मिती प्रक्रिया व तिचा शेवटचा टप्पा समजून घेता येतो.

स्वातंत्र्योत्तर कालीन राजकीय लिखाणामध्ये भारताची फाळणी, फाळणीमुळे भारतासमोर उभ्या राहिलेल्या समस्या, जातीय दंगली, निर्वासीतांचे प्रश्न व पुनर्वसन, संस्थांचे विलिनीकरण या संदर्भात लेख छापले गेले. स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेल्या राजकीय समस्या समजून घेण्यासाठी हे लेख उपयुक्त आहेत. स्वातंत्र्य भारताच्या ध्येय धोरणावर भाष्य करणारे लिखाणही यामधून झालेले दिसते. यामध्ये घटना निर्मिती प्रक्रिया, लोकशाही तत्व, पंचायती राज, विविध राजकीय संस्था संकल्पनायावर लेख छापले गेले. स्वातंत्र्योत्तर भारताची राजकीय वाटचाल समजून घेण्यासाठी हे लेख महत्वाचे आहेत.

स्वातंत्र्योत्तर भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रकाश टाकणारे लेखनही यात झाले आहे. यामध्ये काश्मीर प्रश्न, भारत पाकिस्तान संबंध, सीमावाद, भारत–चीन संबंध यावर लेख छापले गेले. त्याचबरोबर पं. नेहरु यांचा अलिप्ततावाद यासंदर्भाने लेख लिहिले गेले. त्यामधून भारतीय परराष्ट्र धोरण व समस्या याविषयी आकलन होते. अशाप्रकारे आधुनिक भारतावर आधारित राजकीय लेखनांमधून स्वातंत्र्यपूर्व व उत्तरकालीन भारताच्या राजकीय वाटचालीची क्रमबद्ध माहिती मिळते.

जागतिक राजकीय घडामोडींवर भाष्य करणारे लेखनही चित्रमय जगतमध्ये झाले आहे. यामध्ये दा. वि. गोखले, द. श्री. मराठे, ज. स. करंदीकर, सी. के. दामले, रा. गो. भिडे या लेखकांनी लेखन केले आहे. याशिवाय चित्रमय जगतमध्ये गाजलेली व अत्यंत लोकप्रिय ठरलेली पहिल्या व दुसऱ्या महायुद्धावरील मालिका याचे लेखन प्रसिद्ध साहित्यकार कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांनी केले होते. यामध्ये पहिल्या महायुद्धाची पार्श्वभूमी तयार करणारे व युरोपीयन राष्ट्रांच्या साम्राज्यवादी विचारसरणीवर भाष्य करणारे लेखन झालेले दिसते. यामध्ये चीनी राज्यक्रांती, तुर्की इटालीयन युद्ध, बाल्कन युद्धे, सुएझ कालवा इ. महत्वपूर्ण लेख छापले गेले त्याचप्रमाणे पहिल्या दुसऱ्या महायुद्धातील सहभागी राष्ट्रे, रणनिति, लष्कर विचारसरणी, युद्धातील हालचाली, युद्धविषयक नकाशे यावर भाष्य करण्यात आले विविध युरोपीयन तज्ञांनी महायुद्धासंबंधीची मते प्रदर्शित करणारे लेखनही यामध्ये झालेले दिसते. त्याचबरोबर रशियन क्रांती, हिटलर नाझीवाद, कम्युनिझम, युरोपीयन राष्ट्राचे लष्करी व आर्थिक मदत देणारे करार, मार्शल योजना, युद्धोत्तर राष्ट्राची राजकीय अवस्था, अफ्रिकेतील वर्णद्वेषाची चळवळ,

तिसरे जग, शीतयुद्धातील घडामोडी यावर भाष्य करणारे बरेच लिखाण चित्रमय जगतमधून झाले. तसेच विविध देशांची माहिती देणारे खास अंकही चित्रमय जगतने छापले होते.

अशाप्रकारे जागतिक घडामोडींचे ज्ञान भारतीयांना देण्याचे काम चित्रमय जगतने केले होते. भारतीयांच्या जागतिकीकरणाची प्रक्रिया या मासिकाने घडवून आणली. चित्रमय जगतामध्ये झालेल्या विविधांगी राजकीय लेखनांमधून भारतीयांच्या राष्ट्रीय जाणिवा जागृत करुन त्यांना राजकीय शिक्षणाचे धडे देण्याचे काम चित्रमय जगतने उत्तम प्रकारे पार पाडले यात शंका नाही.

## तळटीपा :–

१. चित्रमय जगत, नोव्हे १९१३, पृ.४११.

२. चित्रमय जगत, ऑगस्ट १९२४, पृ.२९१.

३. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९१५, पृ.४५९.

४. चित्रमय जगत, जुन १९४०, पृ.२५९.

५. चित्रमय जगत, जुलै १९२८, पृ.३४३.

६. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९३१, पृ.३९९.

७. चित्रमय जगत, जुलै १९३१, पृ.२१०.

८. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९४१, पृ.४३९.

९. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९४७, पृ.५६५.

१०. चित्रमय जगत, जानेवारी १९१६, पृ.१.

११. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९२१, पृ.६१.

१२. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९६६, पृ.४५८.

१३. चित्रमय जगत, जानेवारी १९२७, पृ.२३.

१४. चित्रमय जगत, जानेवारी १९१३, पृ.४०१.

१५. चित्रमय जगत, जुलै १९२७, पृ.२३०.

१६. चित्रमय जगत, जुलै १९१८, पृ.२८१.

१७. चित्रमय जगत, एप्रिल १९२५, पृ.१७०.

१८. चित्रमय जगत, जुन १९६७, पृ.३४१.

१९. चित्रमय जगत, जुलै १९२२, पृ.२७८.

२०. चित्रमय जगत, सप्टेंबर १९३२, पृ.१७९.

२१. चित्रमय जगत, जानेवारी १९१६, पृ.१८.

२२. चित्रमय जगत, ऑगस्ट १९३७, पृ.३०३.

२३. चित्रमय जगत, मे १९१०, पृ.७०.

२४. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९११, पृ.२२३.

२५. चित्रमय जगत, ऑगस्ट १९१८, पृ.३१९.

२६. चित्रमय जगत, ऑगस्ट १९१७, पृ.३३७.
२७. चित्रमय जगत, जुलै १९२४, पृ.२९६.
२८. चित्रमय जगत, मार्च १९२५, पृ.२५३.
२९. चित्रमय जगत, जुलै १९२०, पृ.२६२.
३०. चित्रमय जगत, जुन १९१८, पृ.४२.
३१. चित्रमय जगत, ऑगस्ट १९२५, पृ.३५६.
३२. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९२५, पृ.४६३.
३३. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९२५, पृ.५११.
३४. चित्रमय जगत, मार्च १९२०, पृ.११७.
३५. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९१९, पृ.४११.
३६. चित्रमय जगत, ऑगस्ट १९३१, पृ.३५३.
३७. चित्रमय जगत, मे १९१४, पृ.२२५.
३८. चित्रमय जगत, जानेवारी १९२१, पृ.५९.
३९. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९२०, पृ.७२६.
४०. चित्रमय जगत, जानेवारी १९२७, पृ.३९.
४१. चित्रमय जगत, एप्रिल १९२९, पृ.१७९.
४२. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९३७, पृ.४६८.
४३. चित्रमय जगत, जानेवारी १९३१, पृ.२९.
४४. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९१६, पृ.१२५.
४५. चित्रमय जगत, एप्रिल १९१८, पृ.१७१.
४६. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९१९, पृ.२१३.
४७. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९२०, पृ.१६९.
४८. चित्रमय जगत, जानेवारी १९२१, पृ.२२.
४९. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९२९, पृ.२०३.
५०. चित्रमय जगत, जानेवारी १९२९, पृ.४५.
५१. चित्रमय जगत, जुन १९३०, पृ.२६०.
५२. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९३०, पृ.४०६.

५३. चित्रमय जगत, जुलै १९३०, पृ.३१३.
५४. चित्रमय जगत, सप्टेंबर १९३०, पृ.३९५.
५५. चित्रमय जगत, जानेवारी १९३१, पृ.३४.
५६. चित्रमय जगत, ऑगस्ट १९३४, पृ.२०१.
५७. चित्रमय जगत, सप्टेंबर १९३६, पृ.३३७.
५८. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९३६, पृ.५०३.
५९. चित्रमय जगत, ऑगस्ट १९३८, पृ.२१२.
६०. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९३८, पृ.२६९.
६१. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९३९, पृ.११६.
६२. चित्रमय जगत, मार्च १९३९, पृ.२१०.
६३. चित्रमय जगत, जुलै १९३९, पृ.३१७.
६४. चित्रमय जगत, ऑगस्ट १९३९, पृ.३७०.
६५. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९३९, पृ.४९९.
६६. चित्रमय जगत, एप्रिल १९४०, पृ.१७८.
६७. चित्रमय जगत, डिसेंबर १९४०, पृ.५२५.
६८. चित्रमय जगत, मे १९४२, पृ.१७२.
६९. चित्रमय जगत, मे १९४१, पृ.१०२.
७०. चित्रमय जगत, जून १९४२, पृ.१९३.
७१. चित्रमय जगत, डिसेंबर १९३९, पृ.५१६.
७२. चित्रमय जगत, जून १९४३, पृ.१७०.
७३. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९४५, पृ.३९६.
७४. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९४७, पृ.५९९.
७५. चित्रमय जगत, मे १९४०, पृ.२०५.
७६. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९४४, पृ.२९९.
७७. चित्रमय जगत, जुलै १९४५, पृ.२५९.
७८. चित्रमय जगत, मे १९४७, पृ.२४१.
७९. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९४३, पृ.२८४ .

८०. चित्रमय जगत, जून १९४७, पृ.३२१.
८१. चित्रमय जगत, ऑगस्ट १९४७, पृ.४१९
८२. चित्रमय जगत, जानेवारी १९४७, पृ.५८.
८३. चित्रमय जगत, जानेवारी १९४७, पृ.७५.
८४. चित्रमय जगत, जानेवारी १९४८, पृ.८५.
८५. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९४२, पृ.३९.
८६. चित्रमय जगत, सप्टेंबर १९४४, पृ.३६७.
८७. चित्रमय जगत, मार्च १९४५, पृ.७५.
८८. चित्रमय जगत, एप्रिल १९४५, पृ.१३५.
८९. चित्रमय जगत, जानेवारी १९४७, पृ.१२.
९०. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९४७, पृ.३५.
९१. चित्रमय जगत, ऑगस्ट १९४८, पृ.५२१.
९२. चित्रमय जगत, जानेवारी १९५०, पृ.९.
९३. चित्रमय जगत, एप्रिल १९५६, पृ.१८९.
९४. चित्रमय जगत, जून १९५५, पृ.२८१.
९५. चित्रमय जगत, ऑगस्ट १९४८, पृ.५३१.
९६. चित्रमय जगत, जून १९४९, पृ.७६६.
९७. चित्रमय जगत, ऑगस्ट १९४८, पृ.५२९.
९८. चित्रमय जगत, मे १९६४, पृ.३०७.
९९. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९६४, पृ.४८०.
१००. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९६६, पृ.६१.
१०१. चित्रमय जगत, मार्च १९६६, पृ.८९.
१०२. चित्रमय जगत, एप्रिल १९६६, पृ.१२०.
१०३. चित्रमय जगत, जानेवारी १९५०, पृ.६.
१०४. चित्रमय जगत, जानेवारी १९५०, पृ.२०.
१०५. चित्रमय जगत, सप्टेंबर १९५८.
१०६. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९५८.

१०७. चित्रमय जगत, मार्च १९६१.

१०८. चित्रमय जगत, मे १९६२.

१०९. चित्रमय जगत, सप्टेंबर १९६४.

११०. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९१३, पृ.३६३.

१११. चित्रमय जगत, जुलै १९१४, पृ.३४१.

११२. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९१४, पृ.५१७.

११३. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९१४, पृ.५२३.

११४. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९१४, पृ.५३९.

११५. चित्रमय जगत, एप्रिल १९१५, पृ.२१३.

११६. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९२१, पृ.४७४.

११७. चित्रमय जगत, मे १९२९, पृ.२१६.

११८. चित्रमय जगत, जुलै १९२१, पृ.३३१.

११९. चित्रमय जगत, मे १९३४, पृ.२४२.

१२०. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९४०, पृ.३४.

१२१. चित्रमय जगत, मे १९४०, पृ.१२९.

१२२. चित्रमय जगत, जानेवारी १९४१, पृ.४०.

१२३. चित्रमय जगत, मार्च १९४१, पृ.१३२.

१२४. चित्रमय जगत, जानेवारी १९४२, पृ.२३.

१२५. चित्रमय जगत, जून १९४५, पृ.२१५.

१२६. चित्रमय जगत, मार्च १९४६, पृ.३५३.

१२७. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९४७, पृ.५५१.

१२८. चित्रमय जगत, एप्रिल १९४८, पृ.२.

१२९. चित्रमय जगत, डिसेंबर १९४८, पृ.५.

१३०. चित्रमय जगत, जानेवारी १९६३, पृ.१२.

१३१. चित्रमय जगत, सप्टेंबर १९६५, पृ.३०२.

*****

## प्रकरण–४

# चित्रमय जगतमधील सामाजिक लेखन

४.१ चित्रमय जगतमधील सामाजिक लेखन

- ४.१.१ बोधपर सामाजिक लेखन
- ४.१.२ वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थेवर आधारित लेखन
- ४.१.३ विवाहासंदर्भातील लेखन
- ४.१.४ स्त्री विषयक लेखन
- ४.१.५ शिक्षण विषयक लेखन
- ४.१.६ इतर देशातील समाज व्यवस्थेविषयीचे लेखन
- ४.१.७ व्यक्ति चरित्रविषयक लेखन
- ४.१.८ आरोग्य विषयक लेखन

४.२ चित्रमय जगतमधील धर्मविषय लेखन

४.३ चित्रमय जगतमधील अर्थविषयक लेखन

- ४.३.१ स्वातंत्र्यपूर्व कालीन अर्थविषयक लेखन
- ४.१.२ स्वातंत्र्योत्तर कालीन अर्थविषयक लेखन
- ४.१.३ आर्थिक विषयावर आधारित विशेष अंक/खास अंक

४.४ समारोप

# प्रकरण–४

# चित्रमय जगतमधील सामाजिक लेखन

'इतिहास म्हणजे राजकारण' असे इतिहासाचे मर्यादीत स्वरुप १९ व्या शतकापर्यंत टिकून होते. परंतु १९ व्या शतकापासून इतिहासाकडे पहाण्याचा दृष्टीकोन अधिक व्यापक होत गेलेला दिसतो. या संदर्भाने मानवी जीवनाचा समग्र आलेख म्हणजे इतिहास ही इतिहासाची व्याख्या अतिशय समर्पक वाटते.

राजकारणाव्यतिरिक्त इतिहासामध्ये मानवी जीवनाच्या विविध अंगाचा अभ्यास करणे सुद्धा तितकेच गरजेचे आहे असा विचारापुढे आलेला दिसतो. त्यातूनच इतिहास या विद्याशाखेअंतर्गत 'सामाजिक इतिहास' या उपशाखेचा जन्म झालेला दिसतो. प्रा. जी. एम. ट्रिव्हेलियन यांनी इंग्लंडचा सातशे वर्षाचा सामाजिक इतिहास सांगणारा ग्रंथ लिहिला आहे. त्या संदर्भात सामाजिक इतिहासाची व्याख्या करताना ते म्हणतात की, ''राजकीय अंगाला फाटा देऊन लिहिलेला समाजाचा इतिहास म्हणजे सामाजिक इतिहास होय.'' याशिवाय ते म्हणतात की, सामाजिक इतिहास इतका महत्वाचा आहे की त्याच्याशिवाय आर्थिक, धार्मिक, इतिहास निष्फळ व राजकीय इतिहास अनाकलनीय आहे. अशाप्रकारे सामाजिक इतिहासामध्ये समाजासोबतच आर्थिक व धार्मिक घटकाचे महत्व ही तितकेच आहे असे लेखकास सुचवायचे आहे.

सामाजिक इतिहासाचा मुख्य गाभा 'समाज' हा असल्यामुळे हा इतिहास मुळातच व्यक्ती निष्ठतेऐवजी वस्तुनिष्ठ स्वरुपाचा आहे. सामाजिक चालीरिती, रुढी, परंपरा, संस्कृती, धार्मिक निष्ठा, समाजातील भिन्न घटकांचे परस्पर संबंध, कुटुंब संस्था, त्याचे स्वरुप यांचा अभ्यास यामध्ये अभिप्रेत असतो. सामाजिक स्थित्यंतरे, बदल सातत्य, सामाजिक संस्था संकल्पनांची उत्क्रांती, सामाजिक समस्या, सामाजिक सुधारणा या सर्वांचा अभ्यास यात अभिप्रेत असतो.

सामाजिक इतिहासामध्ये धर्मकारण व अर्थकारण हे दोन घटक अत्यंत महत्वाचे आहेत. सामाजिक इतिहासाचे आकलन हे या दोन घटकांशिवाय अशक्य आहे. समाजातील धार्मिक

जीवनामध्ये दोन बाजू असतात, एक अध्यात्मिक व दुसरी भौतिक. यामध्ये भौतिक बाजुमध्ये आचरण धर्माचा समावेश होतो. हा आचरण धर्म म्हणजे समाजाचा दैनंदिन व्यवहार असतो. त्यामुळे धर्म हा समाजाचा कणा आहे. या धर्मामध्ये धार्मिक पंथ, संप्रदाय, संस्था, संकल्पना, देवत्व कल्पना, धार्मिक श्रद्धा, चालिरीती यांचा समावेश होतो.

तसेच सामाजिक इतिहासामध्ये आर्थिक घटक सुद्धा महत्वाचा असतो. सामाजिक बदल हे आर्थिक घटकांशिवाय अशक्य आहेत. त्यामुळे सामाजिक वाटचालीत अर्थकारण महत्वाचे आहे. यामध्ये आर्थिक संस्था-संकल्पना, उत्पादन प्रक्रिया, साधने, संबंध यांच्यातील बदल हा समाजाच्या संरचनेत बदल घडवून आणतो.

या अनुषंगाने चित्रमय जगत या मासिकाचा सामाजिक अभ्यास या प्रकरणात केला आहे. हे मासिक जरी राजकीय वृत्तीचे असले तरी त्याचे सर्वसंग्राहक स्वरुप पहाता यामध्ये सामाजिक लिखाण सुद्धा मोठ्या प्रमाणावर झाले आहे. चित्रमय जगतमधील सामाजिक लेखनामध्ये बोधपर सामाजिक लेखन, वर्ण व जातीव्यवस्थेवर आधारित लेखन, विवाह संस्थेविषयीचे लेखन, स्त्री विषयक लेखन, शिक्षण विषयक लेखन, व्यक्तिचरित्र विषयक लेखन, आरोग्य विषयक लेखन यांचा समावेश केला आहे. त्याचबरोबर मासिकात धार्मिक व आर्थिक लेखनही मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्याचाही समावेश याप्रकरणात केला आहे.

## ४.१ चित्रमय जगतमधील सामाजिक लेखन :-

### ४.१.१ बोधपर सामाजिक लेखन :-

चित्रमय जगत मासिकामध्ये बोधपर सामाजिक लेख खूप छापले गेले. यामध्ये 'महाराष्ट्रीयांस इशारा'[१] या सी. के. दामले यांच्या लेखामध्ये महाराष्ट्रीयांच्या आळशी, निरुद्योगी व भेकडपणाची निंदा केली आहे. खरे पहाता ते स्वतःला फार बुद्धीमान, कर्तुत्ववान व शहाणे समजत. परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांच्या मानाने मद्रासी, गुजराथी, बंगाली हे परप्रांतिय लोक जास्त कर्तुत्ववान आहेत. महाराष्ट्रीयांच्या कुपमंडुप वृत्ती बद्दल येथे चिंता व्यक्त केली आहे. शेवटी लेखक असे म्हणतो की, महाराष्ट्रीयांनी आपले अवगुण सोडून कर्तुत्व दाखवले तरच राष्ट्र उन्नती साधता येईल.

'तरुणांसाठी दोन शब्द'[२] वयात येणाऱ्या तरुण मुलांमध्ये लैंगिकतेविषयी अनेक गैरसमज असतात. अशा विषयाबद्दल योग्य मार्गदर्शन न मिळाल्यास त्यांच्या हातून अनुचित प्रकार घडू शकतात. ते टाळण्यासाठी वडीलांनीच आपल्या मुलास योग्य मार्गदर्शन केले पाहिजे असे लेखक म्हणतो. बापाने मुलाशी असल्या नाजुक गोष्टीवर कधीच बोलू नये, ओघाने जे होईल ते होऊन द्यावे या खुळचट प्रघाताला लेखक विरोध करतो कारण ओघाने पुष्कळदा हानीच होते. या अनुषंगाने घरातील जेष्ठांनीच आपल्या तरुण पिढीला योग्य वळण लावले पाहिजे असे या लेखात अभिप्रेत आहे.

'सुधारणेची उत्क्रांती' या हरि रघुनाथ भागवत यांच्या लेखामध्ये सुधारणा या शब्दाचा समाजशास्त्रीय अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. वाईट गोष्टींचा त्याग व चांगल्या गोष्टीचे ग्रहण असा याचा अर्थ होतो. परंतु सुधारणा हे मुळ Civilization या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. इंग्रजी लोकांचे सामाजिक विचार आमच्या पेक्षा सुधारलेले आहेत म्हणून ते जगात नावारुपास आले आहेत असाही याचा अर्थ होतो. पुढे सुधारणा या शब्दाचा अर्थ 'सामाजिक सुधारणा' असा झाला. सध्या सुधारणा म्हणजे बदल किंवा फरक एवढाच काय तो अर्थ शिल्लक राहिला आहे असे लेखक म्हणतो. या किरकोळ अर्थाकडे लक्ष न देता लेखकाने या लेखात सुधारणा हा शब्द युरोपियन अथवा पाश्चात्य सुधारणा या अर्थी वापरला आहे. युरोपीयन लोक उद्योगी व धाडसी असल्याने त्यांच्यामध्ये सुधारणा झाली. भारतीय लोकांनी त्या अर्थाने सुधारणा करणे गरजेचे आहे. उद्योगी, धाडसी, राष्ट्रवादी बनून हिंदुस्थानास जगामध्ये नावारुपास आणले पाहिजे असे लेखक म्हणतो.

'हिंदु कायद्याची पुनर्घटना'[3] या ना. वि. भोंडे यांच्या लेखामध्ये हिंदुस्थान ब्रिटिश अंमलाखाली गेल्यानंतर पाश्चात्य राष्ट्रांशी आलेल्या संबंधामुळे आपल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, औद्योगिक वैगेरे बाबतीत जी विलक्षण स्थित्यंतरे झाली याचा आढावा या लेखात घेतला आहे. त्यानंतर पुनर्घटनेचा अर्थ स्पष्ट करताना प्रथम रोम, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड या देशात प्राचीन काळापासूनच्या कायद्यावर भाष्य केले आहे. भारतीय कायद्याची पुनर्घटना कशी करता येईल यावर विचार मांडले आहेत. विस्कळीत असलेल्या विद्यमान हिंदु कायद्याला

संकलित व व्यवस्थित स्वरुप देऊन त्याचे कलमवार निरुपण कसे करता येईल याविषयी विचार मांडले आहेत.

'आधुनिक महाराष्ट्रीय तरुण'[४] या ल. बा. हुबळीकर यांच्या लेखामध्ये ब्रिटिश अंमलाखाली संपूर्ण भारतभर निराश व कर्तव्यहीनतेची अवकळा पसरली आहे, अशा प्रसंगात तरुण पिढीने राष्ट्रकार्यास जोमाने सिद्ध होण्याचे आवाहन यात केले आहे. या तरुण पिढीच्या लढ्यात हजारो जातीचे सारे तरुण एकच दिसले पाहिजेत. त्यांना जातिभेदाचा वाराही लागता कामा नये. अशा प्रकारची जोमदार, उत्साही व कर्तुत्ववान तरुण पिढी राष्ट्रीय चळवळ गतीमान करु शकेल असे लेखकास वाटते.

'हे हिंदु संघटन कि विघटन'[५] या ना. के. बेहरे यांच्या लेखामध्ये महाराष्ट्रातील हिंदु संघटनाची जी चळवळ चालली आहे तिचे स्वरुप कसे असायला हवे याविषयी चर्चा केली आहे. हिंदु समाजामध्ये ऐक्य, वर्धन व्हायला हवे. बुद्धाच्या धर्मातील अंहिसा वादाचा स्वीकार करुन हिंदु धर्म ज्याप्रमाणे जगला, त्याप्रमाणे मुसलमान धर्मातील बंधुत्व व ख्रिस्ती धर्मातील प्रयत्नवाद स्वीकारल्याशिवाय यापुढे हिंदु धर्म जिवंत राहु शकत नाही असे लेखक म्हणतो.

'अश्लीलतेच्या मर्यादा'[६] या के. ना. डांगे यांच्या लेखामध्ये अश्लीलतेची संकल्पना स्पष्ट केली आहे. अश्लीलताही स्थलकाल सापेक्ष असल्यामुळे तिची व्याख्या करणे व मर्यादा ठरविणे अवघड आहे असे लेखक म्हणतो. त्यामुळे साहित्य व व्यवहारातील अश्लीलता संयमाने समजून घेऊन योग्य ते तारतम्य राखले पाहिजे असे लेखक सुचवितो. 'गुलाम व गुलामगिरी'[७] या वि. वि. दीक्षित यांच्या लेखात प्राचीन भारतीय गुलामगिरीचा आढावा घेतला आहे. प्राचीन काळी गुलामगिरी कशी उदयास आली तिचे स्वरुप काय होते, गुलामाचे विविध प्रकार, गुलामत्वाची कारणे, मुक्ततेच्या अटी याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. त्याचबरोबर प्राचीन युरोपीयन गुलामगिरीचाही आढावा घेतला आहे. या गुलामांची स्थिती भारतीय गुलामांपेक्षा किती दयनीय होती याची माहिती दिली आहे.

आधुनिक काळात वसाहतवादी राष्ट्रांनी मागासलेल्या दुर्बल राष्ट्रांवर बसवलेली राजकीय आर्थिक गुलामगिरी ही प्राचीन गुलामगिरीपेक्षा किती भयावह आहे याची चर्चा केली

आहे. 'फॅशन'[८] ज. ना. ढगे यांच्या या लेखामध्ये फॅशन या शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना सौंदर्य आकर्षण व कलात्मक वृत्ती यातून फॅशनचा उगम कसा झाला हे सांगितले आहे. देशाच्या सामाजिक राजकीय परिस्थितीचा या सौंदर्यवर्धन कलेशी कसा जवळचा संबंध असतो, तसेच दळणवळण व प्रसार माध्यमांचा फॅशनचा प्रसार करण्यामध्ये कसा वाटा आहे, त्याचबरोबर फॅशन व व्यापार, फॅशन व रुढीपरंपरा यांचा संबंध काय यावर चर्चा केली आहे. कारखानदार व धंदेवाले हे फॅशनचे निर्माते आहेत व तेच रुढींचे शत्रु आहेत आणि आजची फॅशन उद्याची रुढी कशी बनते याचेही विवेचन केले आहे. शेवटी लेखक म्हणतो की, फॅशनचा स्विकार करताना तिच्या सर्वांगीण हितवाहतेकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

'चित्रपट व तरुणपिढी'[९] या लेखामध्ये पाश्चात्य चित्रपटांमुळे तरुण पिढीची नितिमत्ता कशी ढासळू लागली आहे, तिचा बेछुटपणा व चटोर वृत्ती कशी वाढली आहे यावर चर्चा केली आहे. चित्रपटातील अश्लील दृश्ये आणि संवाद याचा अंगीकार करण्याचा प्रयत्न तरुण पिढी कसा करु लागली आहे याविषयी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. यावर उपाय म्हणून तरुण व बालकिशोर मुलांसाठी व प्रौढ लोकांसाठी वेगळी चित्रपट गृहे असावित व त्यांच्या चित्रपटाचे विषय ही नैतिकतेला धरुन असावेत असे लेखक म्हणतो. असे न केल्यास तरुण पिढ्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊन राष्ट्राची प्रेरकशक्ती असणारी ही तरुण पिढी वाया जाईल असे लेखक म्हणतो.

'मध्यमवर्ग नष्ट होणार काय?'[१०] गो. स. कामत यांच्या या लेखामध्ये मध्यमवर्गाच्या सामाजिक स्थितीच्या पहाणीवरुन निघालेल्या निष्कर्षावर चर्चा केली आहे. माध्यम वर्ग हा समाजाचा कणा असून समाजाला विचारधन पुरविण्याचे काम तो करत असतो. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील भेद अस्पष्ट करणारा हा वर्ग आहे, कारण दोन्ही वर्गाशी त्याचा तितकाच संबंध असतो. या दोन्ही वर्गामध्ये सामंजस्य घडवून आणण्याच्या प्रक्रियेत त्याची फार मोठी मदत होते. वाद प्रतिवाद यातून संवाद घडवून आणण्याचे काम तो करतो. अशा मध्यम वर्गाची संख्या आज कमी होत आहे. तो श्रीमंतही नाही व गरिब लोकांमध्येही त्याची गणना होत नाही. बौद्धिक श्रमावर उत्पन्न मिळवणाऱ्या या वर्गाचे समाजाच्या जडणघडणीत महत्वपुर्ण योगदान

असून या वर्गाच्या अस्तित्वासाठी काय उपाय केले पाहिजेत याविषयी यात विचार मांडले आहेत.

मद्यपान बंदीवर आधारित लेखन मोठ्या प्रमाणात चित्रमय जगतमध्ये केले गेले. 'प्राचीन क्षत्रिय वर्ग व त्यांची मुख्य व्यसने'[११] या लेखामध्ये काशीनाथ नारायण साने यांनी प्राचीन स्मृतीकारांनी व राजनितीकारांनी प्राचीन क्षत्रियांच्या व्यसनांसंबंधी माहिती लिहून ठेवली आहे, त्याची माहिती दिली आहे. यामध्ये मद्यापानासक्ति म्हणजे दारुबाजी, द्युतासक्ति म्हणजे जुवेबाजी, स्त्रीलंपटता, मृगयासक्ति म्हणजे शिकारीचा नाद यांचा समावेश होतो. यासंदर्भात यादव, पांडव, कौरव, नल, विदर्भराजा रुक्मी यांच्या व्यसनाची चर्चा केली आहे. 'प्राचीन भारतातील सुरापान',[१२] या लेखामध्ये स्वातंत्र्य लढाईच्या कालखंडात विधायक कार्यक्रमांमध्ये मद्यपानबंदी कार्यक्रमाला विशेष स्थान देण्यात आले. त्यासंदर्भाने मद्यपानाचे दुष्परिणाम, आर्थिक, नैतिक व शारीरिक हानी याविषयी चर्चा केली आहे. त्यानंतर प्राचीन काळी मद्यपानाविषयी लोकांची वृत्ती कशाप्रकारची होती, प्राचीन वाङ्मयात सुरापानाविषयी काय उल्लेख आहेत याविषयी माहिती दिली आहे. त्याचबरोबर सोमरसाचा इतिहास, यज्ञ प्रसंगी केला जाणारा सोमरसाचा वापर याविषयी माहिती देऊन त्याकाळी सुरापानास धार्मिक सामाजिक महत्व होते असे लेखक म्हणतो.

'दारुबंदी हे आपले राष्ट्रीय धोरण'[१३] या लेखामध्ये डॉ. त्रि. रा. नखणे यांनी सरकारच्या दारुबंदी धोरणाचा आढावा घेतला असून, दादाभाई नौरोजी, लो. टिळक, म. गांधी यांचे दारुबंदीविषयी विचारही यात मांडले आहेत. दारुबंदी यशस्वी करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे लेखक म्हणतो. याचबरोबर 'हृदय परिवर्तनाचा एक प्रयोग' या लेखामध्ये महाराष्ट्र राज्यात नशाबंदी मंडळातर्फे चालु असलेल्या हृदयपरिवर्तनाच्या प्रयोगाची माहिती दिली आहे.

'दारुचे मानसशास्त्र' या लेखामध्ये मीमांसातीर्थ श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांच्या दारुबंदीचा कार्यक्रम यशस्वी कसा करता येईल याविषयी चर्चा करताना सद्विचार व सुसंस्काराद्वारे जनतेच्या मनोभूमिकेत अनुकूल बदल कसा करता येईल याविषयी चर्चा केली आहे. व्यसनीवृत्ती ही मानसिक असते, कायद्याने तिला आळा घालणे सहज शक्य नाही.

त्यामुळे दारु पिणाऱ्या व्यक्तीच्या मानसिकतेमध्ये कसा बदल घडवता येईल या विषयी माहिती दिली आहे.

'ग्रामीण पुनर्रचना व दारुबंदी' या लेखामध्ये सामाजिक न्याय व आर्थिक उन्नतीच्या धोरणाचा एक भाग म्हणून दारुबंदीकडे पाहिले पाहिजे यासंदर्भाने विचार मांडले आहेत. 'लो. टिळक आणि दारुबंदी' या लेखामध्ये लोकमान्य टिळकांनी केसरीमध्ये मद्यपान स्वातंत्र्याचा निषेध करणारे जळजळीत लेख लिहिले आहेत. त्यावरुन त्यांना संपूर्ण दारुबंदी अभिप्रेत होती हे समजते. १९०८ ते १९१५ या काळात केसरीमध्ये प्रसिद्ध झालेले 'सरकार, दारु आणि लोक', 'दारु आणि सरकारची अडचण', 'बादशहा ब्राह्मण झाले' या तीन दारुबंदी विषयक लेखाचे उतारे या लेखात छापून लोकमान्य टिळकांचे दारुबंदी विषयक विचार मांडले आहेत.

'दारुबंदी विशेषांक' एप्रिल १९६० च्या अंकामध्ये मुंबई व मद्रास राज्यसरकारने दारुबंदीचा जो कार्यक्रम हाती घेतला आहे त्या अनुषंगाने लेख छापले गेले. या विशेषांकातील 'म. गांधीच्या दृष्टीकोनातून दारुबंदीचा प्रश्न' या दा. न. शिखरे यांच्या लेखात म. गांधी यांच्या नैतिक राष्ट्र लढ्याच्या विचारसरणीची माहिती दिली आहे. मिळालेले स्वातंत्र्य हे नैतिक अधिष्ठानावर टिकवले पाहिजे असे गांधीजींचे मत होते. विसाव्या शतकातील हे मोठे आंदोलन होते. यामध्ये विधायक कार्यक्रमामध्ये अस्पृश्यतेच्या खालोखाल दारुबंदीच्या कार्यक्रमास विशेष स्थान देण्यात आले होते. मद्यपानामुळे गोरगरिबांची कुटुंबे आर्थिक, नैतिक व आरोग्यविषयक अशा तिन्ही दृष्टीने कशी धुळीस मिळतात हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते. त्यामुळे दारुबंदीची निकड गांधीजींना पहिल्यापासून वाटत होती. त्यांनी दारुबंदीचे काम द. आफ्रिकेत १८९३ साली सुरु केले. तेथून मायदेशी परतल्यावरही हे कार्य आपल्या देशातही सुरु केले. २५ जून १९३१ च्या यंग इंडियात गांधीजी म्हणतात की, 'मी सर्वाधिकारी असतो तर आकर्षक मथळा देऊन दारुबंदीचा पुरस्कार केला असता. निर्भेळ दारुबंदीवर माझी श्रद्धा आहे.' अशा प्रकारे महात्मा गांधीनी आपल्या हयातीत केलेल्या दारुबंदीच्या प्रयत्नाची माहिती यात दिली आहे.

'जीवन शुद्धीचा मार्ग' या द. कृ. गोसावी यांच्या लेखामध्ये सरकारच्या दारुबंदीच्या कार्यक्रमाचा आढावा घेतला आहे. भारतात दारुबंदीला लोकमत कसे अनुकूल आहे, तसेच ना. गोखले, लो. टिळक, म. गांधी या पुढाऱ्यांनी दारुबंदीसाठी केलेल्या प्रयत्नांची चर्चाही यात

केली आहे. परंतु सरकारच्या या धोरणास म्हणावा तितका प्रतिसाद मिळत नाही याबद्दल खेद व्यक्त करुन दारुबंदी ही इतर सामाजिक व नैतिक सुधारणेप्रमाणे एक सामाजिक व नैतिक सुधारणा आहे. कायद्याचा पाठिंबा याला आवश्यक असला तरी अनेक समाजसेवक बुद्धीवादी व संतमहंत यांनी एकत्र येऊन हृदयपरिवर्तनाच्या टिकाऊ मार्गाने दारुबंदीचा कार्यक्रम अधिक परिणामकारक व यशस्वी करण्याची गरज आहे असे या लेखात म्हटले आहे.

'दारुबंदी कार्यक्रमाची दोन महत्वाची प्रभावी साधने' या लेखामध्ये लोकशिक्षण आणि प्रचार या दोन प्रभावी माध्यमामुळे दारुबंदीचा कार्यक्रम कसा यशस्वी होऊ शकतो यावर चर्चा केली आहे. तसेच श्रीमन्नारायण यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या नियोजन मंडळाच्या दारुबंदी चौकशी समितीच्या अहवालाची माहिती यात दिली आहे. दारुबंदी यशस्वी होण्यासाठी लोकशिक्षणावर भर दिला पाहिजे. व्यक्तीगत संपर्क व वैयक्तिक परिवर्तन हा सर्वात परिणामकारक मार्ग आहे असे लेखकास वाटते. दारुबंदीचा कायदा झाल्यावर प्रचाराची किंवा प्रयत्नांची जरुरी नाही असे नाही. किंबहुना आता लोकशिक्षणाची गरज जास्त आहे असे लेखक म्हणतो.

'कायद्याने दारुबंदी होईल काय?' या श्री. वि. गाडगीळ यांच्या लेखामध्ये लेखक म्हणतो की सामाजिक सुधारणा या निव्वळ कायद्याने घडून येत नाहीत. परंतु अशा सुधारणा घडवून आणण्याचे कायदा हे एक प्रभावी शस्त्र आहे हे विसरुन चालणार नाही. दारुबंदीने चोरट्या मार्गाने दारुचा व्यापार चालत आहे, त्यामुळे हा कायदा निरुपयोगी आहे असे अनेकजण म्हणतात. यावर लेखक म्हणतो की, असे असले तरी दारुबंदीच्या कायद्याने ज्या गोष्टी साध्य झाल्या त्याविषयी कोणीच काही बोलत नाही. अशाप्रकारे या कायद्याचे महत्व पटवून दिले आहे.

### ४.१.२ वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थेवर आधारित लेखन :-

'भारतीय समाज घटना'[१४] हा. द. गो. लिमये यांचा लेख भारतीय श्रेष्ठत्व या सदराअंतर्गत छापला गेला. या लेखात समाज या संकल्पनेचे स्वरुप स्पष्ट केले आहे. तसेच पाश्चात्य समाज शास्त्रज्ञांनी जी organic body ची संकल्पना मांडणी आहे त्याला धरुन

वर्णव्यवस्थेचे स्पष्टीकरण केले आहे. वर्णव्यवस्था, तिचे पूर्व वैदिक कालीन स्वरुप हे लवचिक होते. पुढे ब्राह्मण युगात तिला ताठरता प्राप्त झाली. तसेच परकीयांशी आलेल्या संपर्कामुळे तिचे स्वरुप आणखीनच तीव्र होऊन जातिभेदाचे सांप्रत चमत्कारीक रुप तिला प्राप्त झाले. भारतीय समाजाचे विवेचन हे जातीव्यवस्थेच्या अभ्यासाशिवाय होऊ शकत नाही. त्यामुळे हे एक भारतीय समाजाचे वैशिष्ट्य बनले असून अनेक धार्मिक व राजकीय क्रांत्या होऊनही जातीव्यवस्था अजूनही टिकून आहे.

शेवटी या लेखात असे म्हटले आहे की, प्राचीन काळीही समाज घटना गुणकर्मावर आधारलेली होती व युरोपीय समाज घटनेसारखे दोषही तिच्यात नव्हते. म्हणजेच ती शास्त्रशुद्ध पायावर उभी होती हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्याद्वारे प्राचीन भारतीय समाज रानटी होता या पाश्चात्य विचारसरणीचा निषेध केला आहे.

'चातुर्वर्ण्याची मोजदाद' या न. चि. केळकर यांनी लिहिलेल्या लेखामध्ये वर्णव्यवस्था व तिचे जन्माधिष्ठित स्वरूप यावर चर्चा केली असून जन्माधिष्ठित वर्ण धर्मामध्ये बदल होणे गरजेचे आहे, असा विचार यात मांडला आहे. गुण कर्माच्या अनुरोधानेच व्यक्तीला योग्य त्या वर्णात घातले पाहिजे असे लेखक म्हणतो. अशाप्रकारे चातुर्वर्ण्याची मोजदाद केली तरच वर्णव्यवस्थेला अर्थ उरेल असे लेखक म्हणतो. 'हे प्रश्न आर्य ऋषींनी कसे सोडविले' या ज. स. करंदीकर यांच्या लेखामध्ये उपयुक्तता म्हणजे काय?, देशाची उपयुक्तता कोणती? या संदर्भात प्रस्तुत महायुद्धाच्या अनुरोधाने विवेचन केले आहे. अशा संकट प्रसंगी राष्ट्राने काय भूमिका घेणे आवश्यक आहे यावर चर्चा करताना प्राचीन आर्य ऋषींचा दाखला दिला आहे. प्राचीन काळी संकटाच्या वेळी ऋषींनी दुरदृष्टी कायम ठेवून युद्ध टाळण्यासाठी अनेक उपाय केले व चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर नियंत्रण प्रस्थापित केले. शेवटी या लेखात असे म्हटले आहे की, आजपर्यंत आर्य संस्कृती अनेक संकटातून तावून सुलाखुन निघाली आहे. हजारो वर्षाच्या अनुभवाने तिचे व्यवहार उपयोगीत्व आणि समाज स्थैर्यक्षमत्व सिद्ध झाले आहे. याउलट पाश्चात्य संस्कृतीवर महायुद्धाचे अरिष्ट कोसळले असून त्यासाठी काय उपाययोजना करावी या विषयी अनेक प्रश्न त्यांच्यासमोर उभे आहेत. परंतु अशा सर्व प्रश्नांची उत्तरे प्राचीन ऋषींनी हजारो वर्षापुर्वीच कशी देऊन ठेवली आहेत या विषयी यात विवेचन केले आहे. अशा प्रकारे या

लेखातून भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व प्रतिपादित करुन या संस्कृतीकडे व संस्कृतीच्या रक्षक अशा ऋषीवर्गाकडे सगळ्या सामाजिक अरिष्ठतेवर उपाययोजना करण्याचे पांडित्य होते हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

'आर्याच्या प्रातिनिधिक संस्था'[१५] या कृष्णाजी विनायक वझे यांच्या लेखामध्ये प्राचीन भारतीय समाज व राजकारणाचा उगम कसा झाला हे समजून सांगण्यासाठी आर्याच्या प्रातिनिधिक संस्थांची माहिती दिली आहे. यामध्ये कुल, जातिवर्ग, संघ समिती, मंडल, परिषद, सभा, समिती इ. संस्थांच्या कार्य व स्वरुपाची माहिती यात दिली आहे. त्यातून प्राचीन भारतीयांना राजसंस्थेची माहिती होती हे समजते. ग्रामीण जीवनात ग्रामपंचायत ही अत्यंत महत्वाची सामाजिक व राजकीय संस्था होती याच्या कार्यपद्धतीची माहितीही या लेखात दिली आहे. अशाप्रकारे प्राचीन काळी भारतीय समाज विशिष्ट सामाजिक व राजकीय संस्था संकल्पनांवर उभारलेला होता हे यातून समजते.

'ब्राह्मण व त्याची समाजाला आवश्यकता'[१६] या जयराम केशव असनारे यांच्या लेखामध्ये चातुर्वर्ण्यव्यवस्था ही संकल्पना स्पष्ट केली आहे. वर्णव्यवस्थेतील प्रत्येक वर्ण त्याची कर्तव्ये सांगताना ब्राह्मण वर्गाच्या हक्क, अधिकार आणि कर्तव्याबद्दल सविस्तर माहिती या लेखामध्ये दिली आहे. ब्राह्मणांचे कार्य अध्ययन, अध्यापन, धार्मिक कर्मकांड, जगाच्या नितीमत्तेसाठी व संस्कृतींच्या उभारणीसाठी ब्राह्मण वर्ण महत्वाचा आहे असे लेखक म्हणतो. परंतु येथे ब्राह्मण्य हा जन्मवाचक अर्थ येथे अभिप्रेत नसून कर्मवाचक अर्थ अभिप्रेत आहे. ब्राह्मण हे जन्माने प्राप्त होत नसते तर ते कर्माने प्राप्त होते असे लेखक म्हणतो. अशाप्रकारे कर्माने ब्राह्मणत्व सिद्ध करणाऱ्या व्यक्तीची भारतीय समाजाच्या उभारणीत आवशक्ता आहे असे यात सांगितले आहे.

'स्वराज्य आणि जातिभेद'[१७] या ना. रा. बामणगोवकर यांच्या लेखामध्ये हिंदुस्थानातील जातिभेद आणि स्वातंत्र्यचळवळ किंवा स्वराज्य हे दोन भिन्न प्रश्न आहेत याचे स्पष्टीकरण दिले आहे. स्वराज्य हा आर्थिक प्रश्न आहे तर जातिभेद हा घरातला त्या त्या समुदायाचा प्रादेशिक प्रश्न आहे. त्यामुळे स्वराज्यप्राप्तीच्या ध्येयामध्ये जातिभेदाचा प्रश्न समाविष्ट करु नये. जातिभेद प्रथम मोडून काढावा असा प्रयत्न राष्ट्रीय सभेने करावा असे अनेक सुधारकांना

वाटू लागले आहे. परंतु लेखकाने या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या ध्येयाने प्रेरित असून त्या एकत्र आणू नयेत असे ठाम मत मांडले आहे. जातिभेद व अस्पृश्यता हजारो वर्षांपासून चालु आहे, तेव्हा आताच त्याविरोधात प्रश्न का निर्माण झाला असा सवालही लेखकाने उपस्थित केला आहे.

'अस्पृश्य विचार'[१८] या महादेव राजाराम बोडस यांच्या लेखामध्ये महात्मा गांधीजींच्या अस्पृश्यतेविषयी असणाऱ्या विचारावर चर्चा केली आहे. ही अस्पृश्यतेची कल्पना काय आहे, तिचा उगम, कारणे, वाटचाल यावर यामध्ये माहिती दिली आहे. तसेच ही अस्पृश्यता निवारण्यासाठी झालेल्या विविध सुधारकी प्रयत्नांचाही निर्देश केला आहे. शेवटी लेखकाने हे ही निर्देशीत केले आहे की, समाजसुधारकांप्रमाणेच सनातन पक्षालाही याबाबत जाणीव निर्माण झाली आहे. त्यासंदर्भात अहमदाबादच्या कॉंग्रेस अधिवेशनात अस्पृश्य हा प्रश्न कसा राष्ट्रीय केला आहे याची माहिती दिली आहे.

'पाश्चात्यकृत नवे आणि तीव्र जातिभेद'[१९] या लेखात परिचित यांनी जुन्या जातीव्यवस्थेचे समर्थन केले आहे. हिंदुस्थानात जातिभेद आहे त्यामुळे हिंदुस्थानची अधोगती झाली आणि तो मोडल्याशिवाय हिंदुस्थानाची प्रगती होणार नाही असे पाश्चात्य विचारवंतांना वाटते. परंतु पूर्वीचा जातिभेद व आताच्या जातीभेदात मोठा भेद आहे. हल्लीच्या विकृत व विपरीत जातीभेदाचा लेखक निषेध करतो व पूर्वीच्या जाती व्यवस्थेचे समर्थन करुन असा भेद असणे उत्क्रांती तत्वाला धरुनच आहे असे म्हणतो. विषमता, भिन्नता, उचनीचता ही सामाजिक मानवी उत्क्रांतीमधील अपरिहार्य व नैसर्गिक गोष्ट आहे व ती समाजाच्या स्थित्यंतरासाठी आवश्यकच आहे असे म्हणून पूर्ववैदिक कालीन वर्णव्यवस्थेचा पुरस्कार लेखक करत आहे.

'अस्पृश्यता निवारण व महात्माजी'[२०] या लेखामध्ये महात्मा गांधीजींच्या अस्पृश्यता निवारणाच्या कार्यक्रमाचे महत्त्व, स्वरुप, मर्यादा यांची सविस्तर चर्चा केली आहे. भारतीय ऐक्याच्या दृष्टीने हा विधायक कार्यक्रम किती महत्त्वाचा आहे यावर भाष्य केले आहे. ब्रिटिशांची फुटीरनिती व हिंदुस्थानचे स्वराज्य यामध्ये राष्ट्रीय ऐक्यासाठी अस्पृश्यता निवारणाच्या प्रयत्नास राजकीय महत्व प्राप्त झाले आहे यावर यात भाष्य केले आहे.

'भारतातील आर्यसंस्कृतीची स्थित्यंतरे'[२१] या शं. व. तळेकर यांच्या लेखामध्ये आर्य कालखंडापासून बौद्ध धर्माच्या उदयापर्यंत वैदिक धर्मात झालेल्या विविध बदलाची चर्चा केली आहे. यामध्ये वर्णव्यवस्था, उत्तरकालीन वर्णव्यवस्था, आश्रमपद्धती, यज्ञ, संस्कार पद्धती, रोटी–बेटी व्यवहारातील बदलते नियम यातील बदल स्मृतीग्रंथाच्या आधारे स्पष्ट करुन सामाजिक व धार्मिक स्थित्यंतराचा आढावा यात घेतला आहे.

'अस्पृश्यता निवारण्याचे गांधीजींचे प्रयत्न'[२२] या त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये अस्पृश्यता हा हिंदु धर्मावरील कलंक नष्ट करण्यासाठी महात्म गांधीनी आपले संपुर्ण आयुष्य कसे पणाला लावले याची माहिती दिली आहे. विधायक कार्यक्रम, लेखन, भाषण याद्वारे अस्पृश्यता निवारण्याचा म. गांधींनी कसा प्रयत्न केला याची माहिती यात दिली आहे. अनेकांचा विरोध पत्करुन उपोषणे केली, देशभर दौरे केले. अस्पृश्यांना समाजात योग्य ते स्थान लाभावे यासाठी व त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी गांधीजींनी जे अभूतपूर्ण प्रयत्न केले याचा वृतांत यात दिला आहे.

'वर्णभेदाचे तत्वज्ञान'[२३] या त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या लेखात दक्षिण अफ्रिकेतील वर्णभेदाचे भयानक स्वरुप येथे सांगितले आहे. वर्णभेदाचा जास्तीत जास्त अतिरेक येथे झाला आहे. चार आफ्रिकन लोकात एक गोरा माणूस असे तेथे प्रमाण आहे. त्यामुळे वसाहतवाल्याना आपले अस्तित्व टिकवण्यासाठी अनेक अघोरी उपाय करावे लागत आहेत. द्वेष आणि भिती यावर आधारीत कायद्याची उभारणी करुन वर्णभेद कसा तीव्र केला आहे याची माहिती यात दिली आहे.

'जाति आणि वर्ण'[२४] या ना. गो. चापेकर यांच्या लेखामध्ये भारतीय वर्ण व्यवस्था व तिचे जन्माधिष्ठीत स्वरुप, चार वर्ण व त्यांची कर्तव्ये, रोटी–बेटी व्यवहारातील कठोर नियम यांची माहिती दिली आहे. तसेच जाती उपजातींचे वाढते प्रमाण व त्यातील श्रेष्ठ कनिष्ठत्वाची भावना यामुळे समाजव्यवस्थेला आलेले भयानक स्वरुप स्पष्ट केले आहे. शेवटी लेखक म्हणतो की, कर्मानुसार वर्ण ठरविला पाहिजे व ही चातुर्वर्ण्य व्यवस्था व्यवहार्य केली पाहिजे.

### ४.१.३ विवाहासंदर्भातील लेखन :–

यामध्ये 'विवाह मीमांसा' ही लेखमाला फेब्रुवारी १९१५ ते ऑगस्ट १९१५ या अंकामध्ये सुरु करण्यात आली होती. याचे लेखन गो. मा. चिपळुणकर यांनी केले होते. या लेखमालेतील पहिल्या लेखांकामध्ये पौर्वात्य, पाश्चात्य विवाह पद्धती विषयी लेखकाने आपली मते नोंदवली आहेत. त्यासंदर्भाने लेखक म्हणतात की, पाश्चात्य व पौर्वात्य दोन्ही देशांमधील सध्या प्रचलीत असणारी विवाहसंस्था अपूर्ण आहे. सर्व देशात मनुष्य प्राणी सारखाच आहे. अन्नात व पोषाखात देशपरत्वे फरक असेल पण त्याच्या मनोभावनेत मनोविकारात व सदिच्छेत फरकापेक्षा साम्यच जास्त आढळेल. लेखकाने पाश्चात्य देशातील विवाह पद्धतीबद्दल तेथील लोकांनी व्यक्त केलेली मते अभ्यास करुन प्रत्यक्ष अनुभव घेऊन नोंदवली आहेत. वर्तमानातील एखाद्या घटस्फोटाच्या बातमीवरुन सर्व पाश्चिमात्य जगातील विवाह आर्थिक, शारीरिक असतात व हिंदुस्थानातील विवाह मात्र अध्यात्मिक व सनातन असतात असा अनुमान काढणे चुकीचे आहे असे लेखक म्हणतो.

दुसऱ्या लेखामध्ये विवाहाची आवश्यकता प्रतिपादली आहे. गतकाळात बहुपत्नीत्वपासून एकपतिपत्नीकत्व असे अनेक विवाह प्रकार मानव जातीत होते. त्यामधील बहुपत्नीत्व व बहुपतिकत्वाचे हिणकस प्रकार नष्ट होऊन एकपतिपत्नीकत्व हा विवाह प्रकार पौर्वात्य व पाश्चात्य जगात धर्मशास्त्रीय व सुसंस्कृत मानला गेला आहे. गृहस्थाश्रमातील धर्म, अर्थ व काम ही तीन तत्वे साध्य होण्याकरता विवाहाची आवश्यकता असते. पशुंमध्ये विवाह काळ हा उत्पादन कर्तव्यापुरता असतो. पण मानवी विवाह काळ हा विवाहित जोडप्याच्या आयुष्याप्रमाणे वाढत जातो असे लेखक सांगतो.

विवाह मीमांसेच्या तिसऱ्या लेखामध्ये वैवाहिक जीवनाच्या पूर्व तयारी विषयी चर्चा केली आहे. यामध्ये लेखक म्हणतो की, स्त्री व पुरुष यांना पुर्ण मनुष्यत्व प्राप्त करुन देण्यास विवाह हे अत्यंत महत्वाचे साधन आहे. या साधनाची बरोबरी जगातील दुसरे कोणतेही साधन करु शकत नाही. मानवजातीरुपी विराट पुरुषाची स्त्री व पुरुष ही दोन्ही समसमान योग्यतेची अर्धांगे आहेत. विवाहाचे आपल्या धार्मिक परंपरेप्रमाणे उत्पादन कर्तव्य हेच ध्येय आहे व ध्येय साध्य

होण्यास वधुवरांची पात्रता, योग्यता, परस्पर स्वभाव, अनुकूलता यांचा विवाहापूर्वी विचार होणे आवश्यक आहे याविषयी यात चर्चा केली आहे.

चौथ्या लेखात 'विवाह हे प्रीतीचे स्थान' यावर चर्चा केली आहे. प्रेम ही एक अच्युत मनोभावना आहे. या मनोभावनेने व्यक्तीचे परस्पर आकर्षण होऊन त्याचे निसर्ग कार्याकरिता सहकारित्व घडवून आणले जाते. याचबरोबर वैवाहिक वयोमानातील वाढ, प्रेमविवाहाकडे वाढणारा कल, त्याचे दुष्परिणाम यावरही यात चर्चा केली आहे.

विवाह मिमांसा या लेखमालेतील पाचव्या लेखामध्ये 'धर्म विवाह' या संकल्पनेचा अर्थ व्यक्त करताना आपल्या विवाह पद्धतीच्या प्राचीन व अर्वाचीन स्थितीची तुलना केली आहे. बाल विवाहापासून प्रौढ प्रिती विवाहापर्यंत झालेल्या परिवर्तनावर भाष्य करुन ही दोन अंतिम टोके अनिष्ट म्हणून सोडून दिल्यास इष्ट विवाह पद्धती कोणती या प्रश्नाचा विचार सुचनात्मक रीत्या या लेखांत केला आहे.

'चित्रमय विवाह पद्धती'[२५] या रा. भि. जोशी यांच्या लेखामध्ये विवाहाचे विविध विधी चित्रमय रुपात दिले आहेत, यावरुन हिंदु विवाह पद्धतीची कल्पना येते. यामध्ये कन्यादान, पाणिग्रहण, परिणय, सप्तपदी, आशीर्वाद इ. विवाहातील प्रसंग व त्यांचे सामाजिक व धार्मिक स्पष्टीकरण यात दिले आहे.

'भारतीय विवाह संस्थेचा इतिहास'[२६] या वि. का. राजवडे यांच्या लेखाने तत्कालीन महाराष्ट्रात खळबळ माजवली होती. या लेखामध्ये विवाहसंस्थेचे प्राथमिक स्वरुप कसे होते, या संस्थेचा टप्याने कसा विकास होत गेला, यावर भाष्य करताना आर्य कालीन स्त्री पुरुषांचे समागमन संबंध, त्यातील रानटीपणा याविषयी अतिशय जहालपणे लिहिलेले आहे. या संबंधामध्ये नियम, वय, नातेसंबंध, स्थळ, काल, याविषयी कोणतीच बंधने नव्हती, या संदर्भात श्रुती स्मृतीपुराणांचाही दाखला दिला आहे.

'डॉ. गौर यांचा मिश्र विवाहाचा कायदा'[२७] या श्री. प्रसन्न कुमार सदाशिव बखले यांच्या लेखामध्ये, हिंदुस्थानामध्ये मिश्र विवाहास संमती देणारा कायदा अमलात यावा यासाठी इ.स. १८७२ च्या स्पेशल मॅरेज ॲक्टची निर्मिती झाली. या कायद्यामध्ये नेमके काय मांडले आहे

याविषयी लेखकाने माहिती दिली आहे. त्या संदर्भात लेखक म्हणतो की, या कायद्यान्वये कोणत्याही जातीच्या अगर धर्माच्या स्त्री पुरुषास जातिभेद व धर्मभेद याकडे लक्ष न देता विवाह करण्याची परवानगी दिली गेली. हा कायदा विशेषतः ब्राह्मो समाजाच्या अनुयायांसाठी करण्यात आला होता. या कायद्यान्वये मी कोणत्याही धर्माचा अनुयायी नाही अशी रजिस्ट्रारपुढे कबुली द्यावी लागे. परंतु ज्यावेळेस ब्राह्मो समाजातील अनुयायाखेरीज इतर लोकही कायद्याचा फायदा घेऊ लागले त्यावेळी या कायद्यात दुरुस्ती व्हावी अशी मागणी सुधारकांनी केली. या अनुषंगाने यात चर्चा केली आहे.

'लग्नकार्यात पैशाची उधळपट्टी'[२८] या लेखामध्ये जुन्या रुढी, परंपरा, डामडौल, दिखाऊपणा, फुकटची प्रतिष्ठा यासाठी ऐपत नसतानाही कर्ज काढून लग्न कार्यात जो अमाप पैसा खर्च केला जातो त्यावर या लेखात माहिती दिली आहे. हा पैसा खर्च करण्याऐवजी दयाधर्म दाखवून पिडीत लोकांसाठी, विकलांग लोकासाठी उपाय योजना करण्यासाठी खर्च व्हावा असा उदार दृष्टीकोन या लेखात मांडला आहे.

'लग्नाबद्दल स्मृतिकार आज काय सांगतील?'[२९] या रा. के. रानडे यांच्या लेखामध्ये 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या वचनामागील स्मृतीकारांचा हेतु काय असावा याविषयी चर्चा केली आहे. स्त्रीला स्वातंत्र्य दिल्यास कोणते अनर्थ घडतील व त्यातून कुळाचा व धर्माचा नाश कसा ओढवेल, समाजाची नितिमत्ता कशी ढासळेल याविषयी चर्चा केली आहे.

जुनी स्मृतीवचने आधुनिक काळात कशी कालबाह्य झाली आहेत व आज पुरुषप्रधान संस्कृती कायम असल्याने काही स्वार्थी व दांभिक लोक आपल्या किरकोळ कल्पना स्मृतीकारांच्या नावाने कशा खपवत आहेत याविषयी विवेचन केले आहे. याच लेखाच्या पुढील भागात विवाहसंस्थेची स्थापना भारतात कशी झाली, सामाजिक संस्था म्हणून विवाह संस्थेचे महत्व कसे वाढत गेले, प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत लग्नाचे विविध प्रकार, त्याविषयी समाजाचा दृष्टीकोन, वधुवर परिक्षा घेताना वय, शिक्षण, एकमेकांविषयीच्या आकांक्षा, स्वभाव या गोष्टी नवीन युगात लक्षात घेणे महत्वाचे आहे. तसेच काळानुसार स्मृतीवचनांमध्ये अनुकूल बदल केल्यास भारतीय विवाह संस्था एक आदर्श सामाजिक संस्था म्हणून टिकेल असे लेखकास वाटते.

'संगोत्रीय विवाह वर्ज्य आहे का?'[३०] या रमाबाई जटार यांच्या लेखामध्ये आधुनिक काळात मुलामुलींच्या लग्नातील विविध समस्यांची कारणमीमांसा येथे केली आहे. या अडचणींमध्ये गोत्र संकल्पना कशी समस्या बनली आहे याचीही चर्चा केली आहे. त्या संदर्भाने गोत्र म्हणजे काय?, गोत्राची प्रथा कधी, कशी व का पडली, याची शास्त्रीय, अशास्त्रीय चिकित्सा यामध्ये केली आहे. इतकेच नव्हे तर लग्नाकार्यामध्ये गोत्राची आडकाठी दुर करण्याकरता केल्या जाणाऱ्या विविध युक्त्या ही येथे सांगितल्या आहेत. पूर्वीच्या चालीरीती या आजच्या स्थितीत घातक आहेत. त्या निर्माण झाल्या तेव्हा ती त्या काळाची व परिस्थितीची गरज होती. त्यामुळे त्या जशाच्या तशा आजच्या काळात स्वीकारणे कसे अशक्य आहे, काळानुसार त्यात स्थित्यंतर होणे गरजेचे आहे असा समाजशास्त्रीय विचार मांडला आहे.

'वारस आणि विवाह'[३१] या विनायक विष्णु देशपांडे यांच्या लेखामध्ये विवाह व वारस ही संकल्पना काय आहे व त्यांचा एकमेकांशी सहसंबंध काय आहे याची चर्चा केली आहे. यामध्ये कुंटुंबामधील धनावरील स्त्रीचा अमर्याद अधिकार कसा आहे, त्या संदर्भात विनीयोग करताना एकपत्नीत्व, बहुपत्नीत्व व त्याचा वारसा हक्क यासंदर्भात स्मृतीकारांनी निती कायद्यामध्ये काय मते नोंदवली आहेत याची चर्चा केली आहे.

'आंतरजातीय अथवा असवर्ण विवाह विचार'[३२] या के. वा. गजेंद्रगडकर यांच्या लेखामध्ये आंतरजातीय विवाहास मान्यता देण्यासाठी हिंदू कायदा कमिटीने राव समिती स्थापन केली आहे त्याची मिमांसा येथे केली आहे. या कायद्याच्या निर्मितीमध्ये आंतरजातीय विवाहास मान्यता देण्यासाठी निश्चयात्मक कलम तयार करुन हे विवाह कायदेशीर आहेत असा स्पष्ट उल्लेख करणे गरजेचे आहे. याविषयी विविध सामाजिक धार्मिक मुद्यांवर चर्चा केली आहे.

'भिन्नजातीय विवाह'[३३] या रा. के. रानडे यांच्या लेखामध्ये स्मृती श्रुती पुराणे यांच्या संदर्भाचा उल्लेख करुन प्राचीन कालखंडात भिन्न जातीय विवाह कसे होते याची माहिती दिली आहे. अशा विवाहाबद्दल स्मृतीकारांची धोरणे कशी उदार होती याविषयीही चर्चा केली आहे. परंतु पुढे मुस्लीम आक्रमणामुळे उदार दृष्टी कशी ताठर बंधनात परावर्तीत झाली याची

कारणमीमांसा केली आहे. शेवटी लेखक म्हणतो की सर्व हिंदु हे एकच आहेत त्यामुळे उदात्त भावनेने अशा प्रकारच्या आंतरजातीय विवाहाचे स्वागतच केले पाहिजे.

'सगोत्र विवाह विचार'[३४] या के. वा. राजेंद्रगडकर यांच्या लेखामध्ये हिंदु धर्म शास्त्रामध्ये सगोत्र विवाह निषिद्ध का मानले आहेत याची कारणमीमांसा केली आहे. याशिवाय प्रचलीत हिंदु कायद्यामध्ये असे विवाह बेकायदेशीर मानले जात आहेत. त्या संदर्भाने गोत्र म्हणजे काय?, तदसंबंधी सुत्र, स्मृति साहित्यामध्ये काय संदर्भ येतात, प्रवर विचार, सापिंड्याविचार यावर चर्चा केली आहे. तसेच मुंबईच्या सोशल रिफॉर्म असोशिएशन द्वारे सगोत्र विवाहास कायदेशीर मान्यता देण्याकरता कसे प्रयत्न चालले आहेत व कायद्यात बदल व्हायच्या दृष्टीने काय केले पाहिजे याविषयी विचार मांडले आहेत.

## ४.१.४ स्त्री विषयक लेखन :-

चित्रमय जगतमध्ये स्त्री जीवनाशी संबंधीत अनेक घटकावर विचार करावयास लावणारे लेखन झालेले दिसते. यामध्ये 'स्त्रियांच्या हक्काबद्दल पुरुषाचे विचार'[३५] या डॉ. ना. व. ताखडकर यांच्या लेखामध्ये स्त्रीच्या हक्काविषयी स्त्रियांना झालेल्या जाणिवेची चर्चा केली आहे. परंतु हे हक्क वस्तुस्थितीमध्ये लागू करणे अशक्य आहेत असे लेखक म्हणतो. स्त्री व पुरुष यांच्यातील शारीरिक व मानसिक भिन्नतेची चर्चा येथे केली आहे. शारीरिक दृष्ट्या स्त्री ही दुर्बल असल्याने स्त्रीला स्वतःचे रक्षण करण्यासाठी पुरुषांवरच अवलंबून रहावे लागते. कारण समानतेबद्दल, स्वातंत्र्याबद्दल, अन्यायाबद्दल स्त्रीने कितीही व्याख्याने दिली, सत्याग्रह केला तरी सुशिक्षित व चांगल्या विचारांच्या पुरुषांवर त्याचा अनुकूल परिणाम होईल परंतु बुद्धीहीन, अशिक्षित, निष्ठुर, पुरुषावर या मार्गाचा काहीही परिणाम होणार नाही. तर त्याला ठोशास ठोशा या मार्गानेच सरळ करावे लागेल, त्यासाठी स्त्री सक्षम नाही असे लेखक म्हणतो. स्त्रीच्या अंतःकरणाची ठेवण निसर्गतःच भावनाप्रधान असल्यामुळे दुःखद किंवा कठोर प्रसंग पुरुषाप्रमाणे सहन करण्याची तिची स्थिती नाही. त्यामुळे शिक्षण व वैद्यकी ही दोन क्षेत्रे सोडल्यास इतर कुठल्याही प्रकारच्या कामासाठी स्त्रीची क्षमता नाही असे लेखक म्हणतो. स्त्रिया या पाश्चात्यशिक्षणामुळे स्वतंत्र, स्वैराचारी विचार करु लागल्या आहेत. ब्रिटिश येण्याआधी स्वातंत्र्य व समतेचा विचार कधीच स्त्रियांना शिवला नव्हता असेही लेखक म्हणतो.

अशाप्रकारे स्त्रीच्या हक्काविषयी मांडलेल्या या विचाराची तत्कालीन परिस्थितीनुरुप चर्चा केली असून आधुनिक काळात हे विचार ग्राह्य धरणे अशक्य आहे.

'स्त्रियांच्या हक्काबद्दल स्त्रियांचे विचार'[३६] या लेखाच्या लेखिका शशि पेटारे यांनी वरील लेखास प्रतिउत्तर देणारा लेख लिहिला आहे. यात लेखिका म्हणते स्त्री व पुरुष हे दोघेही शारीरिक व मानसिक गुणधर्माने भिन्न असले तरी त्यात कोणीही पुर्ण नाही. निसर्गात प्रत्येक गोष्ट अपुर्ण आहे. त्यामुळे स्त्री व पुरुष एकत्र आल्याशिवाय त्यापैकी कोणालाही पुर्णत्व येऊ शकत नाही. प्राचीन कालखंडापासून पुरुष प्रधान संस्कृतीने स्त्री ही मनाने दुर्बल व स्वरक्षणासाठी परावलंबी करुन ठेवली आहे. यामध्ये स्त्रीचा दोष नसून पुर्वापार चालत आलेल्या पितृसत्ताक पद्धतीचा दोष आहे असे लेखिका म्हणते.

यामुळे स्त्री पुरुष यांच्यात भेदभाव व श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या कल्पनेवरुन वादविवाद करण्यापेक्षा त्यांच्या समानतेच्या तत्वावर भर देणे गरजेचे आहे. सामाजिक बंधने, नितीनियम ही स्त्री व पुरुषास सारख्याच प्रमाणात असावीत. कायदा व जबाबदारी, कर्तव्य यांचे भान स्त्री इतके पुरुषांनीही ठेवले पाहिजे. त्यामुळे बदलत्या काळात स्त्रियांच्या हक्काबद्दल पुरुषांनी मत मांडणे योग्य नसून स्त्रीलाही तितकेच विचारात घेतले पाहिजे असे लेखिका म्हणते.

'कुलीन स्त्रिया व संगीत'[३७] या रमाबाई मुजुमदार यांच्या लेखामध्ये संगीत या ललित कलेविषयी माहिती दिली आहे. कलेच्या प्रकारामध्ये जनानी (स्त्रियांच्या) व मर्दानी (पुरुषांच्या) या दोन प्रकारांचा समावेश होतो. यापैकी संगीत कला जनानी प्रकारात मोडते. तसेच संगीताची अधिष्ठात्री देवता सरस्वती ही सुद्धा स्त्री असल्याने या कलेवर स्त्रीचाच जास्त हक्क पोहचतो. संगीत ही उन्मादे उत्पन्न करणारी कला आहे. ती कुलीन स्त्रीच्या हाती गेल्यास त्या आपल्या शालिनतेस भ्रष्ट करतील; हा समज खोडून काढण्याचा प्रयत्न लेखिकेने या लेखात केला आहे. आज आधुनिक काळात जुन्या रुढीची मगरमिठी सैल झाली आहे. पुरुष वर्गही स्त्रीच्या हक्क कर्तव्याबद्दल अनुकूल झाला आहे. या संधीचा फायदा घेऊन आपले प्रापंचीक कष्ट व दुःख दुर करण्यासाठी जास्तीत जास्त कुलीन स्त्रियांनी संगीत कलेचा अंगीकार करावा असे लेखिका म्हणते.

'स्त्रियांचे आद्य कर्तव्य'[३८] डॉ. शंकर धोंडो कर्वे यांच्या लेखात सृष्टीच्या उत्क्रांती तत्वाप्रमाणे ज्ञानाची व ज्ञानेंद्रियांची उन्नती ही अवश्य झाली पाहिजे, स्त्रीया जर याबात पाठीमागे राहत असतील तर सृष्टीच्या प्रगतीला अडथळा निर्माण होईल असे लेखक म्हणतो. आज स्त्रियांना जी ज्ञानाची ओढ निर्माण झाली आहे, ती आवश्यक असून ज्ञानेद्रियांच्या उन्नतीमध्ये आपल्या पुढच्या पिढीला मागे यावे लागणार नाही इतके सर्वसाधारण ज्ञान स्त्रियांना होणे गरजेचे आहे. यामध्ये आपली जनन शक्ती ही स्त्रीचे प्रमुख कर्तव्य आहे त्याला अनुसरुन स्त्रीचे शिक्षण होणे गरजेचे आहे असे लेखक म्हणतो.

'स्त्रियांस मताचा अधिकार देण्यापासून राष्ट्रास कितपत धोका आहे.'[३९] या नारायण विनायक भोंडे यांच्या लेखामध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या आरंभी इंग्लंड सारख्या देशास तेथील स्त्रियांना मिळालेल्या मतदानाच्या अधिकाराबद्दल, पार्लमेंटमधील सभासद निवडून देण्याच्या हक्काबद्दल माहिती देऊन स्त्रियांच्या या प्रयत्नांचे कौतुक केले आहे. प्राचीन रोमन साम्राज्य, मुस्लीम धर्म किंवा हिंदु धर्मात राजकीय हक्क, अधिकार, कर्तव्याबाबत स्त्रियांना कोणतेच स्वातंत्र्य नव्हते. याविषयावर सविस्तर चर्चा करुन अशा प्रकारची बंधने म्हणजे मनुष्यांच्या नैतिक कमकुमवतपणाचे लक्षण असून स्त्रियांस मताचा संपूर्ण अधिकार असावा यातून राष्ट्र हितच साधले जाईल असे लेखक म्हणतो.

'वेश्या व्यवसाय– इतिहास व उपाय'[४०] या गो. वि. वेंगुर्लेकर यांच्या लेखामध्ये प्राचीन काळी भारतात वेश्या व्यवसाय हा प्रतिष्ठित व राजमान्य व्यवसाय होता हे सांगण्यासाठी बुद्ध, जातके, कौटिल्याचे अर्थशास्त्र यांचा संदर्भ दिला आहे. याशिवाय मनुस्मृती व कामसुत्र यावरुन वेश्यांची स्थिती, कर्तव्य, उच्चनीच दर्जा, दिनचर्या याविषयी माहिती मिळते. यावरुन त्याकाळातील त्या स्त्रियांचा उच्च दर्जा समजतो. परंतु मध्ययुगामध्ये धार्मिक प्रथा, नवस, अंधश्रद्धा यामधून धार्मिक वेश्या वर्गाचा कसा उदय झाला यावर चर्चा करुन देवदासी, कुंडिवर, मुरळी, बसवी, भाविण, नायकीण इ. धार्मिक वेश्यांची माहिती दिली आहे.

आधुनिक काळात वेश्याव्यवसाय स्वीकारणाऱ्या स्त्रियांचे दोन प्रकार दिसतात. यामध्ये धार्मिक समजुतीने वेश्या बनणे व दुसरे म्हणजे जीवन क्रम चालविण्यासाठी हा व्यवसाय स्वीकारणे. तसेच काही जाती उपजातींमध्ये हा प्रमुख व्यवसाय आहे. यामागील प्रमुख कारणे

सांगताना आर्थिक हालाखी, अज्ञान देवभोळेपणा यावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. सध्याच्या काळात या व्यवसायात किती गलिच्छ व किळसवाणे स्वरुप प्राप्त झाले आहे. हे सांगताना लेखकाने वेश्यावृत्ती, गुन्हेगारी, व्यसनाधीनता, कोंदट अस्वच्छ वातावरण, रोगराई व चोरुन व्यवसाय करण्याची चाल याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. यावर उपाय म्हणून लेखकाने अनेक गोष्टीवर चर्चा केली आहे. यामध्ये सामाजिक कायद्याचे नियंत्रण, परवानापद्धती, वेश्या स्त्रीयांच्या आरोग्य तपासणी, येणाऱ्या जाणाऱ्याची व वस्तीची तपासणी इ. गोष्टीबद्दल सरकारी नियंत्रण प्रस्थापित करण्याची गरज आहे असे लेखातून निर्देशिले आहे.

'विवाहितांचे सुख कशावर अवलंबून आहे' या लेखाचे मुळ लेखक एथिल मॅनिन हे असून त्याचा मराठी अनुवाद एस. एस. बेंद्रे यांनी केला आहे. यामध्ये इंग्लंडमधील वाढत्या घटस्फोटाच्या प्रकरणावर चर्चा केली आहे. हे घटस्फोट का होतात त्याची कारणे, लग्नाआधी व नंतर व्यक्तीच्या बदललेल्या अपेक्षा, इच्छा, आकांक्षा इत्यादींचे विवेचन यात केले आहे. व्यक्तीस्वातंत्र्य, स्वअभिमान स्वअस्तित्व या संकल्पना या अनुषंगाने स्पष्ट केल्या आहेत. शेवटी या गंभीर विषयाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. यासाठी काही मार्गदर्शक विचारही यात मांडले आहेत. यामध्ये मैत्री, विवाहाचे उद्दिष्ट, सामंजस्यता, स्वतःहून आदराने स्वेच्छेने स्वीकारलेली बंधने, शरीर संबंधाची असक्ती ऐवजी आस्था, परस्पर आदरभाव, व्यक्तीत्वाची जपवणूक केल्यास विवाह संस्था टिकेल व समाज व्यवस्थेची नैतिक गुणवत्ता सुधारेल असे या लेखात सांगितले आहे.

'स्त्रीधनावरील स्त्रियांचे अधिकार'[४१] या राम केशव रानडे यांच्या लेखामध्ये स्त्रीधनावर स्त्रियांचा अधिकार कोणत्या प्रकारचा आहे या संदर्भात कत्यायन, मनु, याज्ञवालक्य, नारद, देवल, व्यास या सहा स्मृतिकारांनी कोणते मत मांडले आहे यावर यात चर्चा केली आहे. स्त्रीधनावरील नवरा ह्यात असतानाचे अधिकार, विधवेपणी स्त्रियांचा अधिकार, कुमारपणी स्त्रियांचे अधिकार आणि व्याभिचारी स्त्रीचा स्त्रीधनावरील अधिकार यावर यात चर्चा केली आहे.

'स्त्री शिक्षण' या विषयावर आधारित लेखमाला चित्रमय जगतमध्ये सुरु करण्यात आली होती. फेब्रुवारी १९१६ ते जुलै १९१६ पर्यंतच्या अंकात याविषयी लेखमाला छापली

गेली. यामध्ये स्त्री शिक्षणाची आवश्यकता, स्वरुप, उपयोगिता याविषयी माहिती देण्यात आली. या संदर्भात प्राचीन भारतापासून ते ब्रिटिश कालखंडापर्यंत स्त्री शिक्षणाच्या स्वरुपाचा आढावा घेण्यात आला. प्राचीन काळी आर्य कालखंडात स्त्री–शिक्षणाबद्दलचे स्वरुप कसे होते, धार्मिक शिक्षण घेणाऱ्या स्त्रिया, यज्ञकर्म करणाऱ्या, पौरोहित्य करणाऱ्या व वेद वाङ्मयात ऋचा लिहिणाऱ्या स्त्रियांची माहिती यात दिली आहे.

यानंतरच्या काळात स्त्री शिक्षणाची उपयुक्तता कशी कमी झाली हे ही वर्णीले आहे. स्त्री शिक्षणावर आलेल्या अवकळेचे वर्णन करुन स्त्रीला शिक्षणाच्या वाटा का बंद झाल्या यावर चर्चा केली आहे. ब्रिटिश कालखंडातील सुधारणावादी वातावरणामध्ये स्त्री शिक्षणास झालेल्या प्रारंभाची व स्वरुपाची चर्चा यात केली आहे. त्या अनुषंगाने स्त्रियांना कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यायला हवे यावर चर्चा केली आहे.

स्त्रीला सर्वांगपरिपूर्ण शिक्षण देणे गरजेचे आहे. यामध्ये मनुष्यत्वाची भावना, स्त्रीत्वाची भावना, नागरिकत्वाची भावना स्त्रीमध्ये निर्माण होणे गरजेचे आहे. त्यामुळे स्त्रियांना शारीरिक शिक्षण, भावनिक शिक्षण, गृहशिक्षण, ऐतिहासिक शिक्षण, बुद्धिविषयक शिक्षण याची गरज आहे. या शिक्षणास अंतकरणाविषयक व हस्तविषयक शिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे असे या लेखमालेचे लेखक गो. मा. चिपळुणकर म्हणतात.

स्त्री शिक्षणाच्या कार्यकारी स्वरुपावर चर्चा करताना लेखक म्हणतो की, ज्ञानाचे मानवी अनुभवाचे क्षेत्र जसे व्यापक होत जाते त्यामानाने शिक्षणाची व्याख्याही बदलत जाते. त्यात नवनवीन गोष्टींचा समावेश होतो. स्त्री व पुरुष ही संसाररुपी गाड्याची दोन चाके आहेत. या प्रत्येक चाकाला शिक्षणरुपी आसाची नितांत आवश्यकता आहे. या संदर्भात स्त्री शिक्षणाच्या कार्यकारी स्वरुपावर भाष्य करताना लेखक म्हणतो की, स्त्री व पुरुष या दोघांनी पार पाडावयाच्या कर्तव्याचे शिक्षण स्त्रीला देणे गरजेचे आहे. प्रेम, दया, श्रद्धा, आशा, सेवा, स्वार्थत्याग, जननीत्व इ. चे शिक्षण स्त्रीला दयावे तर धैर्य ज्ञान, शक्ति, चिकाटी, साहस, प्रयत्न, जनकत्व इ. गुणसंपत्तीचे शिक्षण पुरुषांना देणे गरजेचे आहे.

स्त्री शिक्षणाची ध्येयमीमांसा करताना लेखकाने पुढील मुद्यावर प्रकाश टाकला आहे. स्त्रीला वाङ्मयविषयक शिक्षण दिले पाहिजे. त्याशिवाय तिच्या बुद्धीविषयक शिक्षणाचा खऱ्या अर्थाने विकास होणार नाही. त्याचबरोबर स्त्रीला मायभाषेतून शिक्षण द्यावे यावर लेखक ठाक आहे. त्याच बरोबर शिक्षणशास्त्रशुद्ध परिक्षा पद्धतीचा ही लेखकाने पुरस्कार केला आहे.

'स्त्री शिक्षणक्रमाचे दिग्दर्शन'[४२] या गंगाधर बापुजी खरे यांच्या लेखामध्ये श्री. कर्वे यांनी 'स्त्रियांची युनिव्हर्सिटी' स्थापन केल्यापासून स्त्री शिक्षणाच्या प्रश्नावर जी चर्चा चालु आहे, त्यातील विविध मुद्यावर भाष्य केले आहे. त्या संदर्भाने या स्त्री शिक्षणाचे ध्येय काय याविषयी चर्चा करताना लेखक म्हणतो की, स्त्री व पुरुष यांची शिक्षणाबद्दलची ध्येय वेगवेगळी आहेत. कारण शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या अंगभूत गुणांचे विकसन करणे होय. त्यामुळे दोघांच्या शिक्षणाचे उद्देश भिन्न आहेत. पुरुष वर्गाच्या शिक्षणाचा उद्देश पुरुषास कर्तव्यशील, व्यवहारचतुर, संकटास तोंड देणारा, कुंटुंब संरक्षणार्थ समर्थ करण्याचा आहे. तर स्त्री वर्गास शिक्षण देण्याचा उद्देश स्त्रीस गुणवंती, मर्यादाशील, गृहकृत्यात कुशल, बाल संगोपनास चतुर करण्याचा आहे. अशा परिस्थितीस दोघास एकाच प्रकारचे शिक्षण देऊन कसे चालेल असा सवाल लेखकाने केला आहे.

याशिवाय मुलींच्या शिक्षणातील इतर अडचणी याचाही विचार लेखात करुन इयत्ता १ ते ७ वी पर्यंतच्या अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शन यात केले आहे.

परदेशी स्त्रियाविषयी माहिती देणारे लेखही यात देण्यात आले. यामध्ये 'पाश्चात्य समाजातील बंधमुक्त स्त्रिया'[४३] या वि. वि. दीक्षित यांच्या लेखामध्ये पाश्चात्य राष्ट्रामध्ये यंत्रयुग, भांडवलशाही, यातून स्त्री पुरुष कलह, स्वातंत्र्य व समतेसाठीचा त्यांच्यातील लढा याविषयी कारणमीमांसा केली आहे. त्याचबरोबर येथील समता, स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या स्त्रिया या सुखवस्तु घरातील आहेत. त्यामुळे स्त्री जातीचा त्यांच्या दुःखाचा त्यांना कळवळा येतो. असे नाही तर आत्मप्रतिष्ठा व प्रसिद्धी यासाठी त्यांची धडपड चालु असते. प्रेम, दया, मार्दव हे स्त्रीला निसर्गाने दिलेले गुण आहेत. या गुणांना दाबून टाकून लिंग कलहासाठी या सिद्ध झाल्या आहेत. यामुळे समाजाची नितिमत्ता व अंतरचना बिघडून समाजव्यवस्थेचा आणि कुटुंबव्यवस्थेचा कसा ऱ्हास होत आहे यावर यात प्रकाश टाकला आहे.

'इंग्रजी स्त्रियांची गृहव्यवस्था' या सौ. गंगुबाई पटवर्धन यांच्या लेखामध्ये इंग्लंडमधील विभक्त कुटुंबपद्धतीची कारण मीमांसा आणि स्वरुप स्पष्ट केले आहे. विभक्त कुटुंब पद्धतीत स्त्रिया कुटुंब व नोकरी सांभाळून सामाजिक कार्य याकडे कसे लक्ष्य देतात याविषयी माहिती दिली आहे. त्यांचे दैनंदिन व आठवड्याचे कामकाज कसे चालते, त्यांना कुटुंबात पुरुषाबरोबरीचा मान कसा मिळतो, मुलांची काळजी घेण्यात तेथील स्त्रिया कशा अग्रेसर असतात यावर भाष्य केले आहे.

या लेखिकेच्या 'इंग्रजी स्त्री' या दुसऱ्या लेखात इंग्लंडमध्ये स्त्री जन्माचे कसे स्वागत केले जाते, मुलांइतकीच शिक्षणाची संधी मुलींनाही दिली जाते याविषयी माहिती दिली आहे. तेथील गरीब मुले मुली नोकरी करुन शिकतात. श्रीमंतापासून गरीबांपर्यंत पोषाख एकाच प्रकारचा असल्याने सर्व स्त्रिया सारख्याच दिसतात. नोकरी न मिळालेल्या स्त्रिया मेड्स म्हणून राहतात. येथे प्रत्येक स्त्रीला लग्न करणे शक्य नसते कारण पुरुषांची संख्या लढाईनंतर कमी झाली आहे. त्यामुळे समाजबाह्य संबंध, अनैतिक प्रेम प्रकरणे यांनाही येथे मोठा वाव निर्माण झाला आहे याकडे लेखिकेने लक्ष्य वेधले आहे.

'जर्मन स्त्रिया व समाजसेवा' या डॉ. पांडुरंग दामोदर गुणे यांच्या लेखामध्ये, जर्मन स्त्रियांना समाजसेवा व आत्मोउदधार याचे नैतिक शिक्षण कसे दिले जाते, अशा शिक्षण घेतलेल्या स्त्रिया 'स्त्री मंडळे' स्थापन करुन त्याद्वारे स्त्रियांच्या उद्धाराची कामे कशी करतात याची माहिती दिली आहे. व्याख्याने, लेख लिहिणे, वर्गणी फंड गोळा करणे या माध्यमातून स्त्री वर्गास जागृत करण्याचे व त्यांच्या हाल अपेष्टा कमी करण्याचे काम समाजसेवा करणाऱ्या स्त्रिया करतात. मोठ मोठी इस्पीतळे सार्वजनिक फंडातून उभारुन गरीब मजुर बायकांची बाळंतपणे व बाळाचे संगोपन करण्याचे कार्य याद्वारे कसे केले जाते याची सचित्र माहिती दिली आहे.

'चिनी स्त्रिया' चीनमध्ये राजकीय स्वातंत्र्याचा जसा झगडा चालु आहे तसाच सामाजिक सुधारणांसाठीही लढा दिला जात आहे. भारताप्रमाणे येथील स्त्रियांवरही अनेक बंधने होती. परंतु ख्रिश्चन मिशनऱ्यांनी चालवलेल्या शाळा कॉलेजातून चिनी स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या आहेत. शिक्षण, डॉक्टरकीचे पद सांभाळू लागल्या आहेत. याविषयी तेथील स्त्री

वर्गात शिक्षणामुळे झालेले बदल येथे अधोरेखित केला आहे. तेथील स्त्रिया आपल्या हक्कासाठी कशा जागृत झाल्या आहेत, विविध सामाजिक कायदे व राजकीय सामाजिक हक्कासाठी कशा लढा देत आहेत याची माहिती यात दिली आहे.

'अमेरिकेतील दारुबाज स्त्रिया'[४४] अमेरिकेतील एक दारुबाज स्त्री लेखिकेचे आपल्या व्यसनाविषयीचे विचार यात अनुवादित केले आहेत. ज्या समाजात धार्मिक बंधने नसतात, स्त्रियांना कोणतीही आडकाठी नसते, पुरुष स्त्री असा भेद नसतो अशा समाजात सुधारणेचा अतिरेक होऊन समाजबाह्य गोष्टीही स्तुत्य कशा मानल्या जातात याचे चित्रण यात पहावयास मिळते. यासंदर्भात घटस्फोट, अनैतिक संबंध, समान हक्क या गोष्टी जरी चांगल्या करता असल्या तरी त्याचा दुरुपयोग इतका केला जातो की शेवटी या गोष्टी त्याज्य वाटू लागतात. या संदर्भात व्यसनाधिनता, त्यामागची कारणे, त्याचे परिणाम, जबाबदारी, कर्तव्याचे दडपण, नैराश्य यातून या व्यसनाचे स्त्रीवर्गातील प्रमाण कसे वाढले आहे हे यातून समजते.

## ४.१.५ शिक्षण विषयक लेखन :–

प्राचीन काळापासून स्वातंत्र्योत्तर कालखंडापर्यतच्या शिक्षण व्यवस्थेवर आधारीत, भारतीय शिक्षण व्यवस्थेवर आधारीत अनेक लेख चित्रमय जगतमध्ये छापले गेले. देशी विदेशी शिक्षणाच्या स्वरुपावर आधारीत लेखनही यात झाले.

'संस्कृत शिक्षणाचे महत्व'[४५] कृष्णाजी गोविंद किनरे यांनी एका मद्रासी गृहस्थाचे संस्कृत शिक्षणाचे विचार यात मांडले आहेत. मनुष्याच्या अंतःशक्तीचा विकास करणे, त्याच्या कर्तृत्वशक्तीचे पोषण करुन तिला पुष्ट करणे व तीला स्वराष्ट्रहिताच्या विकासाला तयार करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. त्यासाठी आपल्या प्राचीन संस्कृतीचे व धर्माचे शिक्षण देणे आवश्यक आहे. तज्ञ लोकांची मार्गदर्शने आयोजित करावी. अशा विषयाला वाहीलेली मासिके, पत्रके देशी भाषेतून प्रसिद्ध करावी व असे संस्कृत शिक्षण देण्यासाठी समिती मंडळे ही स्थापन करावी असे या लेखात म्हटले आहे.

'विद्यार्थ्यांच्या भावी हिताचे मार्ग'[४६] या म. पा. काळोखे यांच्या लेखामध्ये अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया, विद्यार्थी संख्या, शिक्षण संस्थाची संख्या, मुलांची आवडनिवड, सुशिक्षित बेकार,

नोकरी–व्यवसायातील समस्या याबद्दल पाश्चात्य शिक्षण पद्धती व भारतीय शिक्षण पद्धती यावर चर्चा केली आहे. तसेच विद्यार्थींच्या भावी हितासाठी शिक्षण पद्धतीमध्ये कोणते अनुकूल बदल अपेक्षित आहेत याविषयी चर्चा केली आहे.

'प्रौढ शिक्षणाची सद्यस्थिती व ती सुधारण्याचे मार्ग'[४७] या गो. मा. चिपळुणकर यांच्या लेखामध्ये अमेरिकेच्या प्रौढ शिक्षण पद्धतीची माहिती दिली आहे. यामध्ये प्रौढशिक्षणाची सवंगता, अभ्यासक्रम, शिक्षक व परिक्षक एकच असणे, सहावारी वार्षिक परिक्षेची विभागणी, विषयावारी, वर्गपालट, स्मरणशक्तीवर पडणारा अत्यल्प बोजा, क्रमिक पुस्तकांना तद्विषयक वाङ्मयाची मिळणारी पुष्टी, शरीर बलसंवर्धनास महत्व, राष्ट्रबलसंवर्धन, देशोद्धारक विचारसरणीला दिलेले महत्व, मातृभाषेतून शिक्षण व परिक्षा या प्रौढशिक्षणाच्या वैशिष्ट्यांची माहिती दिली आहे. त्याचबरोबर अशाप्रकारच्या शिक्षणातून बाहेर पडलेला विद्यार्थी सामाजिक कार्यात कसा सक्रिय होऊ शकतो याविषयावर चर्चा केली आहे.

'बालशिक्षा' या लेखामध्ये कृष्णाजी गोविंद किनरे यांनी अपत्यसुखाबद्दल विवेचन केले आहे. जगातील सर्वात मोठे सुख म्हणून त्याकडे बघितले जाते. परंतु अपत्य जर कुसंतान निघाले तर आईवडिलांना कुसंतानांपेक्षा निसंतान बरे असे वाटते. म्हणून हे दुःख टाळण्यासाठी आईवडिलांनी आपली जबाबदारी ओळखून त्यांना चांगले शिक्षण दिले पाहिजे, चांगले वळण लावले पाहिजे. त्यासाठी लहानपणीच त्यांना कशी शिस्त व संस्कार करणे गरजेचे आहे याविषयी या लेखात सविस्तर विवेचन केले आहे.

'शिक्षण प्रगतीविषयक विचार'[४८] या कृष्णाजी फाटक यांच्या लेखामध्ये ब्रिटिशकालीन शिक्षणपद्धती अधिक पद्धतशीर व टिकाऊ करण्यासाठी काय करणे गरजेचे आहे अशा मुद्यांवर चर्चा केली आहे. यामध्ये आस्थेवाईक पालक, नियमित वक्तशीर हजेरी, उत्साही शिक्षक, निपक्षपाती मार्गदर्शक, तज्ञ परिक्षक, कर्तुत्ववान व शिक्षण प्रेमी जिल्हा स्कुल बोर्ड, साक्षरतेचा प्रसार, ट्रेनिक रिफ्रेशर वर्ग व शिक्षकाची बढती, पगारवाढ योजना या गोष्टी अनुकूल केल्यास शिक्षणाची प्रगती होऊन ते अधिक पद्धतशीर व उपयुक्त होईल असे लेखकास वाटते.

'प्राथमिक शिक्षणासंबंधी विचार' या लेखामध्ये पहिली ते चौथी पर्यंतच्या शिक्षणाचे स्वरुप काय असावे, अभ्यास क्रमाचे नियोजन, शिकवण्याची पूर्वतयारी, आराखडा व त्याची अंमलबजावणी कशी करावी या संदर्भात चर्चा केली आहे. विद्यार्थी कार्यक्रम उपक्रम घेतल्यास, परीक्षापद्धतीत व्यवस्थितपणा आणल्यास व अध्ययन अध्यापन परिणाम कारक केल्यास प्राथमिक शिक्षणात प्रगती होईल असे लेखक म्हणतो.

'जुनी शिक्षण पद्धती' या लेखामध्ये एका शिक्षकाने जुन्या व नव्या शिक्षणपद्धतीची चर्चा केली आहे. त्यामध्ये जुने शिक्षण शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक गुणांचा विकास करणारे होते. मानवाच्या व्यक्तीमत्वाचा विकास करुन राष्ट्राउन्नतीस प्रेरणा देणारे होते. तर आताचे (ब्रिटिशकालीन शिक्षण) स्पर्धात्मक वातावरण, प्रभावी परिक्षा पद्धती, विविध समारंभ, बक्षिस पद्धती, सृष्टी व्यापार यांना महत्व देणारे आहे असे लेखक म्हणतो.

'माझ्या शिक्षण संस्थेचे ध्येय'[४९] या लेखामध्ये रविंद्रनाथ टागोर यांच्या शिक्षण संस्थेबद्दल त्यांचे विचार यात मांडले आहेत. यामध्ये आधुनिक शिक्षणपद्धतीमध्ये विद्यार्थ्याची होणारी कुचंबना, वाढता बौद्धिक व मानसिक भार यावर चर्चा करुन टागोर यांची शिक्षण संस्था ही प्रस्थापित शिक्षण व्यवस्थेपेक्षा कशी वेगळी आहे यावर चर्चा केली आहे. टागोर यांची शिक्षण संस्था ही प्राचीन ऋषींच्या गुरुकुल योजनेचेच आधुनिक प्रतिक आहे. निसर्ग, व्यवहारज्ञान, विद्यार्थ्यांच्या कलागुण व स्वातंत्र्यविचारास प्रोत्साहन देणारी ही शिक्षण संस्था आहे. विद्यार्थ्यांच्या लौकिक व्यवहारगत व संसारात विद्यार्थ्याचे आयुष्य यशस्वी कसे होईल याचे यात ज्ञान दिले जाते. विद्यार्थ्यांच्या हृदयाला भिडणारे शिक्षण यात दिले जाते. जगातील सर्व राष्ट्रांचे अध्यात्मिक ऐक्य स्थापन करणे हे या शिक्षण संस्थेचे ध्येय आहे असे रविंद्रनाथ टागोर म्हणतात.

'नालंदा विद्यापीठ'[५०] दाजी गणेश आपटे यांच्या या लेखामध्ये प्राचीन कालखंडातील आंतरराष्ट्रीय विद्यापीठ नालंदा याची माहिती दिली आहे. महत्वाचे बौद्ध धर्माचे अभ्यास केंद्र म्हणूनम ते कसे विकसित पावले याची माहिती यात दिली आहे. त्याचबरोबर येथील परिक्षा पद्धती, अभ्यासक्रम, प्रशासन, खर्च याविषयीची माहिती देऊन अनेक परकीय विद्यार्थ्यांना ज्ञानदान करणारे हे आवासी विद्यापीठ कसे होते याची सविस्तर माहिती यात दिली आहे.

'ही विद्यापीठे की पोपटपीठे'[५१] या ना. गो. चापेकर यांच्या लेखामध्ये शिक्षण क्षेत्रात क्रांतीकारक उलथापालथ झाल्याशिवाय नव्या पिढीची प्रगती होणार नाही असे लेखक म्हणतो. विद्यार्थ्यांचा वाढता बेशिस्तपणा व अनैतिकता हा सध्याच्या बेचव ध्येयशुन्य शिक्षणाचा परिणाम आहे. त्यामुळे खरे जीवननिष्ठ व जीवनोपयोगी शिक्षण द्यायचे असेल तर विद्यापीठाची कार्यपद्धती प्रभावी झाली पाहिजे. या संदर्भात विद्यापीठांनी कोणकोणती कर्तव्ये पार पाडली पाहिजेत याची माहिती यात दिली आहे. आपली कर्तव्ये विद्यापीठाने योग्य रितीने न पाळल्यास विद्यापीठे ही पोपटपीटे होतील असे लेखक म्हणतो.

देशी शिक्षण व्यवस्थेबरोबर परदेशी शिक्षण व्यवस्थेवर प्रकाश टाकणारे लेखही यात लिहिले गेले. यासंदर्भात 'रशियातील शिक्षणप्रयोग'[५२] या श्री केशवदत्त यांच्या लेखात रशियातील क्रांती वातावरणात, शिक्षणव्यवस्थेमध्येही कशी क्रांती झाली आहे याची माहिती यात दिली आहे. रशियात झार कालखंडात शिक्षणास विरोध होता, परंतु नव्या राजवटीत शिक्षणाच्या विकासाची कठोर पावले उचलली आहेत. त्यासाठी शाळा, वर्तमानपत्रे, सिनेमा, नाटकगृहे यामधून शिक्षणाविषयी जाणीव जागृती कशी केली जात आहे याची माहिती दिली आहे. ८ ते १५ वर्षाची मुले दुय्यम शिक्षणाच्या शाळेत जातात, तर १५ ते १९ वर्षाची मुले कौशल्यविकास शाळेमध्ये जातात. राष्ट्रहिताच्या दृष्टीने येथील शालेय अभ्यासक्रमात कोणते बदल केले आहेत याचाही आढावा यात घेतला आहे. याचप्रमाणे 'जर्मनीतील चालुशिक्षण पद्धती'[५३] या आनंद श्रीधर परांजपे यांच्या लेखामध्ये, जर्मनीमध्ये शिक्षण व्यवस्थेत जर्मन भाषेचे महत्व, प्रशासकीय विभाग व शाळांचे प्रमाण, सरकारचे शिक्षणविषयक धोरण, लोकशाळा, नागरिक शाळा व धार्मिक शाळा यांचे स्वरूप, ध्येये व अभ्यासक्रम याविषयी यात चर्चा केली आहे.

'मेक्सिकोच्या शिक्षणसंस्थेत समाजसत्तावाद'[५४] या अ. सी. केळुसकर यांच्या लेखामध्ये प्रचलित शिक्षण पद्धतीला क्रांतीकारक स्वरूप देऊन तिच्यात अमुलाग्र सुधारणा घड्वून आणण्याचे कार्य मेस्किकोने कसे हाती घेतले आहे यावर चर्चा केली आहे. येथील शिक्षणात व्यक्ती हितापेक्षा समाज हिताला महत्त्व दिले आहे. त्याला अनुषंगुन येथील सरकारने प्राथमिक व दुय्यम शिक्षणपद्धतीची पुनर्घघटना करण्याचे काम शिक्षणखात्याकडे सोपविले आहे.

निरक्षरता दुर करण्यासाठी जाहीरनामे, वर्तमानपत्रे, हस्तपुस्तके, मासिके यातून कसा प्रचार होत आहे. याची माहिती लेखात दिली आहे. या समाजसत्तावादाचे मुख्य ध्येय शिक्षणाच्या माध्यमातून कॅथलिक चर्च व परदेशी भांडवलदार यांच्या विरुद्धच्या लढ्यामध्ये आहे याचे सविस्तर वर्णन या लेखात केले आहे.

'इंग्रज येण्यापूर्वीची, नंतरची व सांप्रत चालु असलेली हिंदुस्थानची शिक्षण पद्धती व ती बदलण्याचे उपाय'[५५] या हरि विनायक रिसवडकर यांच्या लेखामध्ये प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंतच्या भारतातील शिक्षणपद्धतीचा आढावा घेतला आहे. प्राचीन काळात वेदाभ्यास, दंत कथा, तर्क, व्याकरण, खगोल वेदांत इ. विषय शिकवले जात. गुरुकुल शिक्षण पद्धतीमध्ये उपनिषद, तत्वज्ञान वेद, आत्मा, विश्व यांची निर्मिती, चातुर्वर्ण्यव्यवस्थेनुसार दिले जाणारे शिक्षण इ. गोष्टीची माहिती दिली आहे. मध्ययुगात मशिदी या शिक्षण केंद्र बनल्या. यामध्ये इलाही (परमार्थज्ञान) रिआझी (गणित, खगोल, गायन, यंत्रशास्त्र, भौतिकशास्त्र व इतिहास) यांच्या शिक्षणास महत्व प्राप्त झाले. तर मराठे काळात हस्ताक्षर, जलद लिहता येणे, दप्तरीज्ञान (जमाखर्च, हिशोब, सरकारी, जहागीरी, प्रांतांची जमाबंदी) लष्करी, शाररीक शिक्षण, नैतिक शिक्षण यांना महत्व प्राप्त झाले. याची माहिती दिली आहे.

ब्रिटिश कालखंडात इंग्रजी भाषा, विज्ञान, तंत्रज्ञान, कायदा या गोष्टी शिक्षणामध्ये महत्वपूर्ण बनल्या. त्यामुळे भारतीयांना शिक्षण व्यवस्थेतील अध्ययन प्रक्रियेत अनेक समस्या निर्माण झाल्या असे लेखक म्हणतो. त्या समस्यांची सविस्तर माहिती या लेखात दिली आहे. या समस्या सोडविण्यासाठी मातृभाषेतील शिक्षण, शाररीक शिक्षण, कल कौशल्यावर आधारित शिक्षण देणे गरजेचे आहे असे लेखक म्हणतो. अशा शिक्षणामुळे स्वहित व राष्ट्रहीत या दोन्ही गोष्टी साध्य होणार आहेत. त्यामुळे ब्रिटिशकालीन शिक्षण व्यवस्थेत अनुकूल बदल होणे गरजेचे आहे असे विचार या लेखात मांडले आहेत.

## ४.१.७ व्यक्ति चरित्रविषयक लेखन :–

भारतातील व परदेशातील कर्तुत्ववान व्यक्तीमत्वाची, महापुरुषांची, नेत्यांची, संताची ओळख करुन देणारे अनेक लेख चित्रमय जगतमध्ये छापले गेले.

प्राचीन राज्यकर्त्यांच्या गुणकर्तुत्वाची, त्यांच्या ध्येय धोरणाची माहिती देणारे लेख यामध्ये छापले गेले. यामध्ये 'सम्राट हर्षवर्धन'[५६], 'राजाधिराज कनिष्क'[५७] 'सम्राट अशोक' हे लेख महत्वाचे आहेत. तसेच मध्ययुगीन राज्यकर्ते व सरदार मंडळीचे कार्यकर्तुत्व व पराक्रम सांगणारे लेखही यात छापले गेले. यामध्ये 'महाराणा प्रताप'[५८], 'सरदार बाजी प्रभु देशपांडे', 'सेनापती दाभाडे', 'छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र', 'सुर्याराव पिसाळ'[५९], 'होळकर घराण्याची पुर्वपिठीका', 'पुण्यश्लोक आहिल्या बाई होळकर व त्यांचे आक्षेप', 'संभाजीचा वध' हे लेख महत्वाचे आहेत.

मध्ययुगीन मुस्लीम राजवटीतील अनेक इतिहास प्रसिद्ध व्यक्तीमत्वाचे लेखही यात छापले गेले. यामध्ये 'वाङ्मयविशारद व रणधुरंधर तुर्की स्त्री हलिदेहमनुम'[६०] हा सिताराम रामजी तावडे यांचा लेख, 'विजापुर येथील आदिलशाही बादशहा'[६१], 'खुरशीद बेगम', 'अकबर आणि जैन धर्म' हे लेख महत्त्वाचे आहेत.

धार्मिक व तत्वज्ञान विषयक क्षेत्रात कामगिरी केलेल्या संत मंडळीचे व महापुरुषांचे लेखही यात छापले गेले. यामध्ये 'श्रीरामकृष्ण परमहंस', 'महासाधु तुकाराम', 'ख्रिस्ती धर्माचे परमाचार्य पोप पॉल', 'वीर शैव मत उद्धारक श्री बसवेश्वर', 'श्री. गुरुगोविंदासिंह व त्यांचे संक्षिप्त चरित्र'[६२] हे लेख महत्वपूर्ण आहे.

परदेशातील व्यक्तीचरित्रांची माहिती देणारे लेखनही यामध्ये करण्यात आले होते. 'डॉ. सन्यत्सेन व त्यांचे तत्वज्ञान', 'चीनचा खंबीर माणूस युआन-शि-काई',[६३] 'टॉलस्टॉय याचे त्रोटक चरित्र', 'जोसेफ चेंबर्लेन', 'व्हाईसराय लॉर्ड मिंटो', 'हिटलरशाही अर्थात हिटलरच्या राजनीतिचे मर्म', 'लेनीनच्या काही आठवणी', 'ट्रॉटस्की', 'अमेरिकेचे ३५ वे अध्यक्ष जॉन केनेडी', 'राणी एलिझाबेथ', 'दलाई लामांचा शोध'[६४], 'नेपोलियनचे व्यक्तिदर्शन', 'अमेरिकेचे ३६ वे अध्यक्ष प्रो. जॉन्सन', 'रॅमसे मॅक्डोनाल्ड', 'ॲडॉल्फ हिटलर'[६५], 'अमेरिकेचे प्रणेते जॉर्ज वॉशिंग्टन' हे लेख  छापले गेले.

देशी संस्थानिकांविषयी माहिती देणारे लेखही यामध्ये छापले गेले. यामध्ये 'श्रीमंत सवाई तुकोजीराव होळकर', 'श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधी', 'आदर्श प्रजाहित संस्थानिक सयाजीराव गायकवाड?'[६६] या संस्थानिकांचे चरित्र छापले गेले.

आधुनिक भारताच्या सामाजिक जीवनामध्ये महत्वपूर्ण भूमिका निभावणाऱ्या महापुरुषांचे चरित्रलेखही चित्रमय जगतमध्ये छापण्यात आले. 'राष्ट्रधर्म प्रवर्तक बाबू अरविंद घोष', 'कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर'[६७], 'कै. राजवाडे', 'कॉ. मानवेंद्रनाथ रॉय', 'प्रो. द. वा. पोतदार', 'बाळशास्त्री जांभेकर', 'रविंद्रनाथ टागोर', 'ज्योतिर्विंत कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित', 'व्यायामपटू डॉ. लक्ष्मणराव कोकर्डेकर', 'लोकनायक', 'माधव श्रीहरि उर्फ बापूजी अणे', 'प्रा. रा. श्री. जोग', 'रविंद्रांची राष्ट्रभक्ति', 'उद्योगरत्न डॉ. विश्वेश्वरय्या', 'हरि नारायण आपटे', 'डॉ. जयंत नारळीकर' हे चरित्र लेख महत्वाचे आहेत.

आधुनिक भारताच्या जडणघडणीत राजकीय क्षेत्रात आपले योगदान देणाऱ्या अनेक थोर राष्ट्रपुरुषांची माहितीही चित्रमय जगतमध्ये देण्यात आली. त्यामध्ये पुढील चरित्रलेख महत्वाचे आहेत. 'कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक', 'लो. टिळकांचे जीवित', 'लोकमान्यांचे स्मरण', 'म. गांधी व सत्याग्रह', 'अहिंसा तत्वातील राजकारण', 'गांधी विशेष अंक', 'गांधी व चर्चिल यांचे द्वंद्व युद्ध' हे अंक महत्वाचे आहेत. या दोन महापुरुषांच्या चरित्राची माहिती देणारे अनेक लेख चित्रमय जगतमध्ये छापण्यात आले. 'श्री. काकासाहेब गाडगीळ', 'डॉ. राजेंद्र प्रसाद', 'वासुकाका जोशी विशेष अंकातील वासुकाकांच्या चरित्राची माहिती सांगणारे लेख', 'महमद अलीजिना'[६८], 'सरदार वल्लभाई पटेल', 'स्वातंत्र्यवीर सावकार', 'सरोजिनी नायडू', 'दादाभाई नौरोजी'[६९], 'श्री यशवंतराव चव्हाण', 'श्री. अरविंद घोष', 'श्री. मानवेंद्रनाथ रॉय', 'नेहरु विशेष अंकातील नेहरुंच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणारे लेख', 'पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री', 'शांततेचे शिल्पकार नेहरु', 'पं. जवाहरलाल व मं. गांधी', 'श्रीमती इंदिरा गांधी', 'लालबहादुर शास्त्री, गोपाळ कृष्ण गोखले'[७०] इत्यादी लेख महत्वाचे आहेत.

## ४.१.८ आरोग्य विषयक लेखन :-

चित्रमय जगतमध्ये आरोग्य, आहार याविषयी अनेक लेख छापले गेले. प्राचीन भारतीय आयुर्वेदाची महती सांगणारे अनेक आरोग्य विषयक लेख यात छापले गेले. यामध्ये 'आयुर्वेद हे एक शास्त्र आहे काय?'[७१] हा वैद्यभूषण पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर यांचा लेख महत्वाचा आहे. 'आयुर्वैद्यकाची प्रगती' या डॉ. गं. पां. काळोखे यांच्या लेख, 'आयुर्वेदीक चिकित्सा-अनुभव व विवेचन'[७२] या लेखांमध्ये इतर आरोग्य चिकित्सापेक्षा आयुर्वेदीक चिकित्सा शरीरास लाभदायक

कशी आहे, इतर घातक परिणामांची चर्चा करता ही चिकित्सा पद्धती किती फायदेशीर आहे याविषयी यामध्ये चर्चा केली आहे. 'लंघन चिकित्सा' ही एक आरोग्यविषयक व आहाराविषयक लेखमाला चित्रमय जगतने मे १९१७ ते मे १९१८ पर्यंतच्या अंकामध्ये सुरु केली होती. याचे लेखक कृष्णाजी गोविंद किनरे हे होते. या काळात क्षयरोगाचे प्रमाण वाढलेले दिसते. भारतीय समाजात या रोगाबद्दल अनेक समज गैर समज अस्तित्वात होते, त्यामुळे या रोगाबद्दल जागृती निर्माण करणारे अनेक लेख छापले गेले. यामध्ये 'क्षयरोग व त्याविरुद्ध चालविलेली मोहिम'[७३], 'क्षय रोग व त्याची सुश्रुषा करणाऱ्यास सुचना' हे डॉ. गणेश सदाशिव सहस्त्रबुद्धे यांचे लेख महत्वपूर्ण आहेत.

जंतुशास्त्राविषयी झालेल्या प्रगतीबद्दल माहिती देणारे लेखही यात छापले गेले. या संदर्भात 'रोग, रोगजंतु व त्याचा प्रतिबंध'[७४], 'आमच्या जंतुशास्त्रात आहे काय?' हे लेख महत्वाचे आहेत. लहान मुलांच्या आरोग्यावर आधारित लेखही यात छापण्यात आले. यामध्ये 'बाल अर्धांग' हा अ. वा. रोनापुरे यांचा लेख, 'मुलांचे आजार' हा कृष्णाजी गोविंद किनरे यांचा लेख, 'बालसंगोपन व कुंटुंब नियोजन'[७५] हा लेख,'मुलांचे विकार', 'कांजण्या गोवर' हे लेख महत्वाचे आहेत. 'संध्योपासनेचे रहस्य'[७६] यामध्ये आरोग्य व संध्या उपासना विधी याचा कसा जवळचा संबंध आहे हे सांगितलेग आहे. स्वच्छता आणि आरोग्य यांचा जवळचा संबंध आहे हे सांगणारे लेखही यात छापले गेले. यामध्ये 'हात व आरोग्य' हा डॉ. श्रीपाद मोरेश्वर देशमुख यांचा लेख, 'खेडेगावातील मलमुत्राची व्यवस्था'[७७] 'ग्रामोद्‌धार व रोगनिवारण' हे लेख महत्वाचे आहेत.

हृदयरोगावर आधारित अनेक लेख समाजजागृतीसाठी देण्यात आले. 'हृदयरोग कसा टाळता येईल.'[७८], 'हृदयरोगावर नवा उपाय' हा बा. मो. कानिटकरांचा लेख महत्वाचा आहे. 'खेड्यातील वैद्य' या गो. भि. देशमुख यांच्या लेखामध्ये घरगुती औषधे किती रोगनिवारक आहेत याचे महत्व सांगितले आहे. खेड्यात रानावनातील व स्वयंपाक गृहातील अनेक वस्तु या अनेक आजारांवर औषध म्हणून कशा वापराव्यात याची माहिती यात दिली आहे. याशिवाय 'कॅन्सर' या श्रीकृष्ण रामचंद्र पोतनीस यांच्या लेखात कॅन्सर या असाध्य रोगाची माहिती, लक्षणे, स्वरुप याविषयी माहिती दिली आहे. 'दंतरोगाचे कारण कोणते'[७९] या वैद्य गोविंद

कुलकर्णी यांच्या लेखामध्ये दाताचे आरोग्य, या संबंधीत उद्भवणारे आजार, खाण्यापिण्याच्या सवयी, उपचार याविषयी माहिती दिली आहे.

समतोल आहार आणि व्यायाम हे चांगले आरोग्य टिकवण्यासाठी महत्वाचे घटक आहेत. याविषयी जाणिव निर्माण करणारे लेखही चित्रमय जगतमध्ये छापण्यात आले. यामध्ये, 'समतोल आहार व आरोग्य'[८०] हा ग. पा. परांजपे यांचा लेख, 'व्यायामाची मुल तत्वे' हा पांडुरंग मुळे यांचा लेख, 'उपास आणि आरोग्य' हा वै. गणेशशास्त्री जोशी यांचा लेख, 'उपवासाचे मानसशास्त्रीय विवेचन' हा त्र्यं. बि. मोहोरीर यांचा लेख, 'आहार आणि पोषण'[८१] हा लेख इत्यादी महत्वपूर्ण आहेत. 'अन्नातील कोंडा व तत्संम पदार्थाची आवश्यकता', 'स्वयंपाकातील सुधारणा हे लेखही या संदर्भात महत्वाचे आहेत. पाश्चात्य वैद्यकीय ज्ञानाची माहिती देणारे लेख ही यात छापले गेले. यामध्ये 'दुःखावर शस्त्राने मिळवलेला विजय', 'पाश्चिमात्य वैद्यकीचे पूर्वचाल व भावी स्वरुप'[८२], 'प्रचलित चिकित्साशास्त्रे', 'औषधांची सफलता व निष्फलता', 'होमियोपॅथी म्हणजे काय', 'शस्त्रक्रियेतील एक महत्वपुर्ण क्रांती' हे लेख महत्वपुर्ण आहेत.

प्लेग या रोगावर माहिती देणारे लेखही यात लिहिले गेले. 'भयंकर मानसिक रोग, भिती'[८३] या लेखामध्ये भितीची लक्षणे, स्वरुप, उपाय याविषयी मानशास्त्रीय चर्चा केली आहे. आरोग्यशास्त्रातील प्रगतीमुळे लोकांचे आयुर्मान वाढले आहे, परंतु त्याचबरोबर नवनवीन रोगांचे प्रमाणही वाढले आहे. याविषयी माहिती सांगणारा 'डॉक्टरांची वाढ समाजाचे आरोग्य'[८४] हा लेख यात लिहिला गेला. आरोग्याचा कानमंत्र देणारे लेख ही यात लिहले गेले. यामध्ये 'आरोग्याचे आदर्श' ही लेखमालाही सुरु करण्यात आली होती. अनुवंशिक रोगांवर माहिती देणारा 'वैद्यकशास्त्र संमत अनुवांशिक रोग' हा अनंत सदाशिव ओळतीकर यांचा लेख महत्वाचा आहे. संतती नियमनावर माहिती देणाऱ्या लेखामध्ये 'संतती नियमनाची शस्त्रक्रिया', 'संतती नियमाची आधुनिक साधने' हे लेख छापले गेले.

## ४.२ चित्रमय जगतमधील धर्मविषय लेखन :-

चित्रमय जगतमधील धार्मिक लेखामध्ये हिंदुधर्माभिमान, वारकरी संप्रदाय, बौद्ध धर्म, जैन धर्म, धर्म तत्वज्ञान यासारखे विषय हाताळले गेले. 'हिंदु धर्माचे स्वरुप लक्षण'[८५] या

लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांच्या लेखामध्ये, इ.स.१९११ मध्ये मद्रास राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष बापु भूपेंद्रनाथ बसु यांनी हिंदु लोकांची लग्ने रजिस्टर करण्यासंबंधीचे एक बिल वरिष्ट कायदे कौन्सिलात मांडले होत. त्यावेळी हिंदु कोणास म्हणावे म्हणून वर्तमानपत्रात अनेक चर्चा झाल्या. त्या अनुषंगाने या लेखाचे प्रयोजन टिळकांनी केले होते. यामध्ये हिंदु या शब्दाची उत्पत्ती सांगताना हिंदु हा मुळ फारशी शब्द, सिंधु या शब्दाचा अपभ्रंश कसा आहे व हिंदु हा शब्द केवळ देशदृष्ट्या, वर्णदृष्ट्या व जन्मज्ञाति दृष्ट्या योजिला नाही तर तो धर्मदृष्ट्या योजिला आहे याविषयी माहिती दिली आहे. या संदर्भाने धर्म म्हणजे काय, याचे प्रतिपादन करताना ते म्हणतात की, धर्म शब्दात केवळ परमेश्वराच्या ज्ञानाचा व त्याची कृपा संपादन करुन घेण्याच्या मार्गाचा समावेश नाही तर त्याचबरोबर काही सामाजिक, व्यवहारिक व नैतिक आचार आणि आयुष्यातील विविध प्रसंगी कराव्या लागणाऱ्या विधी आचार व संस्काराचाही समावेश होतो. याविषयी माहिती देऊन शेवटी लोकमान्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, आचारात्मक हिंदु धर्माचे जे लक्षण आहे तेच हिंदु धर्माचे स्वरुप लक्षण आहे. यामध्ये विधी संस्कारांना मुळस्थान आहे. या विधी संस्कारात प्रातांनुसार, ज्ञातिनुसार भेद असले तरी हिंदु धर्माच्या सामान्य लक्षणाच्या मुळ स्वरुपात त्यामुळे फारसा फरक पडत नाही असे लोकमान्य टिळक म्हणतात.

'धर्म व आधुनिक शास्त्रे'[८६] या सदाशिव रामचंद्र गोरे यांच्या लेखामध्ये आधुनिक कालखंडात विज्ञान तंत्रज्ञानात झालेली प्रगती, अनुभवजन्य वस्तुनिष्ठा, ज्ञान, त्यातील शास्त्रीयता, अचुक व काटेकोरपणा यावर चर्चा केली आहे. त्याचबरोबर धर्म कल्पनांविषयी भौतिक शास्त्राची नकारात्मक दृष्टी यावर चर्चा केली आहे. जगाच्या उत्क्रांतीविषयी मीमांसा करताना जडद्रव्य व शक्ति यातून विश्वनिर्मिती झाली आहे असे लेखक म्हणतो. आत्मा, अमरत्वाची कल्पना, परलोक, पुनर्जन्माची संकल्पना फोल आहे याचे सविस्तर विवेचन केले आहे. धर्म असे सांगतो की, परमात्म्याने जग निर्माण केले आहे, तो सृष्टीच्या कणाकणात व्यापला आहे, त्याचे अस्तित्व हे सामान्य ज्ञानाने नव्हे तर ज्ञानेद्रियांच्या शक्तीच्या जागृतीनेच होऊ शकते असा विचार लेखकाने मांडला आहे. शेवटी लेखक धर्म व आधुनिक शास्त्रे याविषयी स्वरुप संबंध स्पष्ट करुन त्याचे अधिक वादातील स्पष्टीकरण न करता ही दोन्ही

शास्त्रे म्हणजेच धर्म व आधुनिक शास्त्रे ही मानवीमनाचीच निर्मिती आहे. या सर्वांचे कारकत्व मानवाकडे जाते असे लेखक म्हणतो.

'धर्म आणि परिस्थिती'[८७] या लेखामध्ये लेखकाने कालखंडानुसार धर्म हा परिवर्तनशील असला पाहिजे यावर प्रकाश टाकला आहे. धर्माची आचार बाजू ही नव्या जमान्यात कालबाह्य वाटत असल्यास तिच्यामध्ये अनुकूल बदल झाला पाहिजे असे लेखक ठामपणे म्हणतो. व्यर्थ अभिमान व पुराणप्रियता काही उपयोगाची नाही जाति वर्णानुसार निर्देशित केलेली कार्ये, कर्तव्ये, व्यवसाय सुद्धा आधुनिक काळात कालबाह्य ठरत आहेत; त्यातही अनुकुल बदल होणे अपेक्षित आहे असे लेखक म्हणतो. त्याशिवाय राष्ट्रीयत्वाच्या जाणिवा विकसित होऊन आपण एक आहोत ही भावना निर्माण होणार नाही. पारतंत्र्यातील भारत वासियांच्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेस यामुळे कसा अडसर निर्माण झाला आहे यावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. थोडक्यात बदलत्या काळानुसार धर्मपरिवर्तन आवश्यक आहे त्याशिवाय राष्ट्रीय भावना व मानवी जीवनाची प्रगती शक्य नाही असे लेखक म्हणतो.

'हिंदू धर्म आणि नवनिर्मिती'[८८] के. ना. डांगे यांच्या या लेखामध्ये भारतीय समाजात स्थल काल खंडापासून धार्मिक श्रद्धेविषयी जे विविध समज गैरसमज आहेत याविषयी यात चर्चा केली आहे. धार्मिक कार्याला अंधश्रद्धा म्हणणारा एक समाज गट निर्माण होत आहे यावर चर्चा केली आहे. या संदर्भात सत्यनारायणाची पुजा व त्यावेळी सांगितली जाणारी कथा, या विषयाच्या अंगाने स्पष्टीकरण देताना लेखक म्हणतो की, काळानुरुप सत्यनारायणाच्या कथेमध्ये बदल झाले पाहिजेत. धार्मिक सुधारणा ही समाज हिताच्या दिशेने झाली पाहिजे व असे बदल कोणताही व्यर्थ अवडंबर व कांगावा न करता सद्सद् विवेक बुद्धिने स्वीकारणे गरजेचे आहेत असे लेखक म्हणतो.

'धर्मशास्त्र व हिंदु कायदा समितीच्या सुचना'[८९] या केशव गजेंद्रगडकर यांच्या लेखामध्ये, वारसा व विवाह या गोष्टींबाबत हिंदु कायदा समितीची मुळ योजना व भूमिका काय आहे यावर चर्चा केली आहे. धर्मशास्त्र परिवर्तनशील असून कालाप्रमाणे त्यात इष्ट बदल व सुधारणा करणे गरजेचे आहे. या संदर्भात एक पत्नी विवाह, विधवेचा वारसा हक्क, धनावरील स्त्रीचा अमर्याद अधिकार, परिवर्तनवादी धर्मशास्त्रज्ञाची मते यात चर्चेला घेतली आहेत. अशा

प्रकारे या लेखात लेखकाने धर्मशास्त्र व हिंदु कायदा समिती योजना याविषयी सुधारणा विचाराचे स्वागत केले आहे.

अशाच प्रकारचा पुढील लेख द. श्री. मराठे यांनी लिहिला. यामध्ये, 'हिंदुधर्मशास्त्र कायदा व सुधारणा'[९०] या लेखामध्ये हिंदु धर्मशास्त्र हे ईश्वर प्रणीत व अपरिवर्तनीय आहे याविषयी चर्चा केली आहे. कायदा म्हणजे काय?, धर्मशास्त्र म्हणजे काय?, त्याची निर्मिती कोणी व का केली? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. हिंदु कायद्यातील सुधारणेकडे 'सांस्कृतिक लढा' या दृष्टीने का पाहिले जाते याच्याकडे सुद्धा लक्ष वेधले आहे. हिंदु धर्मशास्त्रामध्ये स्त्रियांच्या अधिकारावर मांडलेल्या विचारांची चर्चा केली आहे. यामध्ये वारसाहक्क, स्त्रीधन, विवाह, विवाहसंस्था, पुरुषप्रधान संस्कृती, स्त्रियांचे इतर आर्थिक सामाजिक, धार्मिक हक्क यावरही सुधारणेच्या अंगाने चर्चा केली आहे.

'धर्म'[९१] या पांडुरंग काशिनाथ पेंडसे यांच्या लेखामध्ये, धर्म या शब्दाचा अर्थ, स्वरुप, व्याप्ती, प्राचीन कालखंडापासून आधुनिक कालखंडापर्यंत कशी बदलत गेली, धर्म या गोष्टीत कोणकोणत्या गोष्टीचा अंतर्भाव होतो यावर चर्चा केली आहे. या संदर्भाने धर्माचे आस्तित्व शोधताना सृष्टीची निर्मिती, सृष्टीचे नितीनियम, जडवाद, How to live and live according to nature, jurisprudence या संदर्भात धर्मशास्त्राचे आध्यात्मिक, आधिदैविक आधिभौतिक ज्ञानाचे व्यापक स्वरुप यावर चर्चा केली आहे. यानंतर धर्मातील दोन बाजू आचार आणि व्यवहार यांचे स्वरूप कसे आहे व त्यापैकी पूर्वी आचार तत्वाला कसे विशेष महत्व होते परंतु आता व्यवहार तत्वाचे पारडे कसे जड झाले आहे यामधून धर्माचा अधःपात कसा सुरु आहे यावर भाष्य केले आहे. 'धर्म हा आमचा प्राण'[९२] या लक्ष्मण हरी वराडकर यांच्या लेखामध्ये भारतीयांच्या संवेदना जागृतीची व कर्तुत्वाची गुरुकिल्ली हिंदु धर्मात कशी आहे याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर भारताच्या समकालीन समस्या, पारतंत्र्य, दारिद्र्य, भाषाभेद, जातिभेद, रितीरिवाजभेद यावरही प्रकाश टाकला आहे. या समस्या सोडविण्यासाठी धर्म कसा मार्गदर्शन करेल याविषयी सविस्तर माहिती दिली आहे.

'धर्मोरक्षति रक्षितः?[९३] या जनार्दन सखाराम करंदीकर यांच्या लेखामध्ये धर्म समाजाचे रक्षण करतो, समाजाच्या सद्बुद्धीची, सदाचाराची वाढ करतो, सत्प्रवृत्ती, स्वार्थत्याग,

परोपकाराची भावना दृढ करतो. कर्तव्यनिष्ठा बाणतो याविषयी सविस्तर विवेचन केले आहे. राजधर्म, प्रजाधर्म, क्षात्रधर्म हे धर्माचे उपप्रकार आहेत. त्याचीही विशेष लक्षणे आणि महत्व विषयाच्या अनुषंगाने प्रतिपादीत केले आहे. शेवटी लेखक म्हणतो की, वैदिक धर्म, तत्वज्ञान आणि आचारविचार यात कोणताही दोष नाही. या तत्वज्ञानास अनुसरुन आचारविचाराची शिस्त पाळून आम्ही वागलो नाही, त्यामुळे आपल्यावर पारतंत्र्याची राष्ट्रीय आपत्ती ओढवली आहे. हा दोष हिंदु धर्माचा नसून या धर्माकडे दुर्लक्ष करणाऱ्यांची चुक आहे. या चुकीची दुरुस्ती करुन हिंदु धर्माचे खरे उज्ज्वल स्वरुप ओळखल्यास आपल्या राष्ट्राचा उद्धार आपण समर्थ होऊन करू याविषयी ठाम विश्वास लेखकाने दाखवला आहे.

'सनातन धर्माची मुलतत्व'[९४] या पांडुरंग वामन काणे यांच्या लेखामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे पूर्व वैदिक व उत्तर वैदिक स्वरुप यावर चर्चा केली आहे. मध्ययुगात व आधुनिक काळात या व्यवस्थेला अधिक विकृत स्वरुप कसे प्राप्त झाले आहे यावरही लक्ष वेधले आहे. या व्यवस्थेच्या निर्मिती मागील उद्देश समाजाच्या धारणपोषणास कसा अनुकूल होता यावरही चर्चा केली आहे. या व्यवस्थेचा उद्देश मनुष्य मात्राला स्वतःची कर्तव्ये नेमून देऊन स्वकर्तव्य करावे व परंपरेने समाज स्थैर्य कायम ठेवावे हे होते. ज्ञान, कर्म, भक्ती या तीन मार्गाद्वारे मोक्ष प्राप्तीकरणे हे दुसरे धर्म तत्व होते. याशिवाय आश्रम पद्धती व ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम या चार आश्रम व्यवस्थेमध्ये केले जाणारे विविध संस्कार आणि विधी याचे पालन करणे हे सुद्धा आपल्या सनातन धर्माची मुलतत्वे आहेत असे लेखक म्हणतो. 'हिंदुसमाजाचे रक्षण केवळ राष्ट्रसभाच करु शकेल!'[९५] या शं. द. जावडेकर यांच्या लेखामध्ये हिंदुमहासभा विरुद्ध राष्ट्रसभा यांच्यातील वादावर चर्चा केली आहे. आज महाराष्ट्रात जिकडे तिकडे 'हैद्राबाद सत्याग्रह' उर्फ 'भागानगर निः शस्त्र प्रतिकार', 'स्वातंत्र्यवीर बॅ. सावरकर की जय', 'हिंदु धर्म की जय' वगैरे घोषणा ऐकू येत असतात. घरोघर हिंदुमहासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्याविषयी चर्चा चालु असते. पक्षवाद, व्यक्तीपुजा करणाऱ्या या संघटना भारतीय समाजाचे हित साधु शकत नाहीत तर विशिष्ट ध्येयाने विचाराने प्रभावित झालेली व सर्व समावेशक राष्ट्रसभाच खऱ्या अर्थाने हिंदु समाजाचे रक्षण साधु शकेल असे लेखकाला वाटते.

'ईश्वर आहे का'[९६] या स. वि. बर्वे यांच्या लेखामध्ये विश्वाच्या उत्पत्ती, स्थिती व लशायी ईश्वर विषयक कल्पना कशी जोडली आहे याविषयी विवेचन केले आहे. परंतु विश्वाच्या उत्पत्ती, स्थिती, लयातून ईश्वराचे अस्तित्व कसे सिद्ध करता येत नाही हे दाखवण्याचा प्रयत्न यात केला आहे. त्यासंदर्भात भौतिकशास्त्र, वैज्ञानिक दृष्टीकोन यांचा आधार घेतला आहे. 'पूर्वजन्म आणि पुनर्जन्म'[९७] या शि. म. परांजपे याच्या लेखामध्ये संत मंडळीच्या अभंगाचे विविध प्रकार सांगितले आहेत व त्यापैकी निर्याणासंबंधीच्या अभंगावर प्रकारावर चर्चा करुन त्या संदर्भाने संत बहिणाबाईच्या निर्याणाच्या अभंगावर चर्चा केली आहे.

'ज्ञातिसंघ'[९८] या महादेव राजाराम बोडस यांच्या लेखात हिंदु समाजातील असंख्य जाती, पोटजाती यांच्यातील परस्पर स्पर्धा द्वेष कमी करुन राष्ट्रीय ध्येय वृद्धींगत करण्यासाठी काय केले पाहिजे या संदर्भात ज्ञातिसंघाची ध्येय धोरणे काय असावी, परकीय सत्तेला लढा देण्यासाठी ज्ञातिसंघाचे कार्य काय राहिल यावर चर्चा केली आहे. शुल्लक सामाजिक प्रश्नांची चर्चा चालवून आपआपसातील भेद वाढविण्यापेक्षा एका उच्च ध्येयाने हिंदु समाजाची घटना घट्ट केली तरच आधुनिक युगात एक प्रबल राष्ट्र म्हणून हिंदुस्थान युरोपियन राष्ट्रांच्या सत्ता स्पर्धेत उभा राहिल असे लेखक म्हणतो.

'पंढरपूर येथील विठोबा आणि वारकरी पंथ'[९९] या लेखामध्ये रा. भि. जोशी यांच्या व्याख्यानाचा अनुवाद दिला आहे. यामध्ये पंढरीचा विठोबा, वारकरी संप्रदाय, पंढरपुरची वारी व त्यामधील अखंडता यावर चर्चा केली आहे. महाराष्ट्रात अनेक आस्मानी सुल्तानी संकटे आली, राज्यक्रांत्या झाल्या तरी वारकरी संप्रदायाची परंपरा अखंड का आहे यावरही भाष्य केले आहे. याशिवाय विठ्ठल या शब्दाची उत्पत्ती, अर्थ, आख्यायिका यावर चर्चा केली आहे. या संदर्भात म्हैसुर प्रांतातील होयसळ यादव वंशाचा राजा विष्णुदेव याचा या प्रकरणाशी असणारा संबंध, पंढरपुर या शब्दाचे नामानिधान, पौंडरीकपुरचा इतिहास, तद्संबंधी शिलालेख, आख्यायिका यांची माहिती दिली आहे. एकनाथाचा विठ्ठलाच्या स्थापनेशी असणारा संबंध, पुंडलिकाची कथा, विठ्ठलाच्या मूर्तीचा इतिहास, मथुरेचा श्रीकृष्ण, त्याची राणी रुक्माई, 'राई' म्हणजे राधा यांची आख्यायिका यात चर्चीली आहे. याचबरोबर विठ्ठलभक्तीचा मराठी राष्ट्रांवर

झालेला परिणाम, आध्यात्मिक समानता, बंधुभाव, संसारातून परमार्थाची कल्पना, स्वराज्य, स्वभाषा, स्वधर्माद्वारे महाराष्ट्राच्या एकीकरणाची प्रक्रिया यावर भाष्य केले आहे.

'महाराष्ट्रातील भागवत धर्म'[१००] वासुदेव लक्ष्मण चिपळुणकर यांनी लिहिलेल्या या लेखामध्ये महाराष्ट्रातील प्रमुख धाार्मिक संप्रदायामध्ये असणाऱ्या लिंगायत, महानुभाव, वारकरी, रामदासी या पंथाची माहिती दिली आहे. या सर्व पंथाचे गुणविशेष म्हणजे हे पंथ उदयास येण्यास तत्कालीन महाराष्ट्राची राजकीय, सामाजिक, धार्मिक परिस्थिती कशी कारणीभूत ठरली यावरही चर्चा केली आहे. या धर्मापैकी लिंगायत व महानुभाव पंथाची तत्वे व आचारविचार सामान्य महाराष्ट्रीयांना फारशी पटली नसल्याने त्याचा विस्तार झाला नाही. परंतु वारकरी व रामदासी संप्रदायाने महाराष्ट्रीयन जनतेच्या मनाचा ठाव घेऊन तत्कालीन समाज, धर्म, राजकारणात जी जागृती घडवून आणली ती विशेष महत्वपूर्ण होती. या संदर्भाने मांडणी केली आहे.

'धर्माधर्मनिर्णयांत पुराणांचा अधिकार' या चि. वि. वैद्य यांच्या लेखामध्ये कलियुगात वैश्य व क्षत्रिय वर्ण नाहीत अशा पुराण विधानास निर्देशित करुन पुराणांच्या विश्वासाहर्ततेबद्दल शंका उपस्थित केली आहे. यामुळे पुराणांची विश्वासाहर्तता तपासून पहाणे गरजेचे आहे. त्यामध्ये जर पुरानवचन स्मृति वचनाविरुद्ध असेल तर ते त्याज्य मानावे असे लेखक म्हणतो.

'श्रीमद्‌भागवत-रहस्य-परिचय' या गणेश विष्णु देवळालकर यांच्या लेखामध्ये १८ पुरणांपैकी सर्वश्रेष्ठपुराण म्हणून या ग्रंथाचा परिचय करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. या ग्रंथ परिचयाचे दोन मार्ग अंतरंग व बहिरंग परिशीलन हे असून ग्रंथातील सार, गर्भितार्य, भावार्थ भाषासरणी, काव्यदृष्टी, व्याकरण शुद्धता, काल स्थल निर्णय इ. गोष्टीचे निवेदन यामध्ये दिले आहे. याशिवाय यातील द्वैतसिद्धांत, लोकसत्ताकवाद, समाजसत्तावाद, वेदांताची कल्पना व स्वरुप स्पष्ट करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

'हिंदुस्थानातील प्राचीन काळची न्यायपद्धती'[१०१] रा. के. रानडे यांच्या या लेखामध्ये मनुस्मृती व यज्ञवलक्यस्मृति यांचा आधार घेऊन प्राचीन काळाची न्यायपद्धती कशी होती याविषयी विवेचन केले आहे. न्यायदानसंस्था त्यातील सभासद, न्यायाधिश, त्यांची पात्रतावादी,

प्रतिवादी, फिर्याद, अर्जी, पुरावा, साक्षीदार, दिव्य प्रथा, निवाडा, स्थानिक न्यायदान संस्था यांची माहिती दिली आहे. यावरुन प्राचीन कालखंडात न्यायदान व्यवस्था कशी होती याचा अंदाज बांधता येतो.

'शिवकालीन शुद्धि'[१०२] या भास्कर वामन भट यांच्या लेखामध्ये आचार व्यवहार आणि प्रायश्चित संबंधीचे वाद निवारण्यासाठी कोणकोणत्या धार्मिक सामाजिक संस्था महत्वाची भूमिका निभावत होत्या याविषयी माहिती दिली आहे. यामध्ये ब्रह्मसभा ही विद्वान ब्राह्मण वर्गाची तीर्थ क्षेत्री असणारी सभा होती. जातिसभाा ही अत्यंत महत्वाची व प्रभावी न्यायदान संस्था होती. त्याचबरोबर राजसत्ताही सुद्धा महत्वपूर्ण न्यायदान संस्था होती, याबद्दल माहिती दिली आहे. या संदर्भाने कामश्रृंगेरी पीठ येथील धर्माधिकारी ब्राह्मण घराणे, त्यांचे ब्रह्मसभेतील महत्वपूर्ण स्थान, शंकराचार्याचे प्रतिनिधी म्हणून त्यांना मिळालेला नाव लौकिक, त्याचप्रमाणे स्वराज्यातील आचारधर्माविरुद्ध वर्तन केल्यास उत्पन्न होणाऱ्या दोषातून कोणत्याही व्यक्तीची मुक्तता करणे, तिला शुद्ध करुन पुन्हा धर्मात घेणे इ. अधिकार त्या काळी कोणकोणत्या संस्था व व्यक्तींकडे होते याचे दिग्दर्शन यात केले आहे.

'सनातन धर्मावरील हल्ले'[१०३] या चि. वि. वैद्य यांच्या लेखामध्ये स्मृती ग्रंथाचे स्वरुप, त्यातील उपदेश रुपी व विधिरुपी नियमांची वैशिष्ट्ये याची माहिती दिली आहे. त्याचबरोबर पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या सुशिक्षित भारतीयांनी जी धर्म व समाजसुधारणा चळवळ आमलात आणली, स्मृती श्रुती सारख्या धार्मिक ग्रंथावर जे हल्ले चढवले त्याला या लेखात तीव्र विरोधा केला आहे. याशिवाय सनातनी लोकांनी याला तीव्र विरोध केला पाहिजे असेही मत व्यक्त केले आहे. कारण सनातनी लोकांमुळेच धर्म संस्कृती टिकुन आहे. त्यामुळे सुधारकांच्या नवीन स्मृती ग्रंथ बनविण्याच्या विचारावर हल्ला चढवून जुन्या स्मृती ग्रंथातच अनुकूल असे बदल करावेत, नविन धर्मवचने तयार करु नयेत असे लेखकाचे म्हणणे आहे.

'ज्ञानेश्वरी व समाजवाद' या ना. के. भागवत यांच्या लेखामध्ये ज्ञानेश्वरी या ग्रंथाकडे समाजशास्त्रीय दृष्टीने पाहून तिचे समालोचन करण्याचा प्रयत्न केला आहे. या ग्रंथाच्या निर्मितीमागे तत्कालीन राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी वर्णिली आहे. राजकर्त्या विषयीची एक ईश्वरी अंश, वर्णधर्माचा पालनकर्ता, संरक्षक, अनियंत्रित परंतु लोककल्याणकारी

म्हणून राजाची भूमिका, जातिव्यवस्था, भक्तिसंप्रदायाचा उदय, सगुण निर्गुन भक्ती, मोक्षाची संकल्पना, विश्वबंधुत्वाची कल्पना, उपयोगिता व उपयुक्तवाद या सर्वांमधून सर्वांच्या सुखाची आकांक्षा या संकल्पना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून स्पष्ट केल्या आहेत.

'रामायण भारतीय संस्कृतीचे सर्वस्व' या रा. प्र. कानिटकर यांच्या लेखामध्ये पंडित नेहरु आणि चक्रवर्ती राज गोपालचारी यांची मते दिली आहेत. रामायण व महाभारत ही दोन्ही महाकाव्ये गेली कित्येक शतके भारतीय विचारांना आणि मनोभावांना संस्कारक्षम वळण देण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका निभावत आहेत. शेतकऱ्यांपासून ते धनिकांपर्यंत व निरक्षर श्रमिकांपासून ते महापंडितांपर्यंत सर्वांना रामसिताचा व कृष्णाचा उपदेश समकालीन वाटतो.

वाल्मीकिने रामायणाची रचना केली तर तुलशीरामाने याचे प्राकृत भाषेमध्ये रुपांतरण करुन बहुजन समाजाला ते खुले करुन दिले. हा आपल्या संस्कृतीचा अनमोल ठेवा असून याचा परिचय करुन घेतल्याशिवाय भारताची खरी ओळख होणार नाही. या दोन्ही महाकाव्यामधून भारतीय संस्कृती, समाज, धर्म यांची आपोआप ओळख होते असे पं. नेहरु व राजगोपालचारी म्हणतात.

'राष्ट्रधर्म'[१०४] या वासुदेव कृष्ण भावे यांच्या लेखामध्ये धर्म या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट केला आहे. दैनंदिन जीवनाच्या नित्य व्यवहारात धर्माची आचार बाजू कशी महत्व पुर्ण भूमिका निभावते हे ही यात स्पष्ट केले आहे. धर्माचे सर्वांगाने परिपालन ज्या समाजात होत असते तो समाज खऱ्या अर्थाने जीवंत असतो. या समाजात चार पुरुषार्थाचे पालनही योग्य प्रकारे होत असते असे लेखक म्हणतो. अशा प्रकारचे वर्तन ज्या राष्ट्रात होते ते राष्ट्र बलशाली, किर्तीवान बनुन धर्म हा राष्ट्र धर्म बनतो असे लेखक म्हणतो.

'धर्म व सद्यःस्थिती'[१०५] या लेखामध्ये जगातील कोणत्याही देशात धर्म व परिस्थिती याचा अत्यंत निकटचा संबंध असतो हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्याप्रमाणे कायदा समाजाचे रक्षण करतो त्याप्रमाणे मानवाच्या मनाचे, नितीचे रक्षण हे धर्माच्या हातीच असते. त्यामुळे कोणत्याही समाजाची अंतशक्ती समाजाच्या धर्मशक्तिवर अवलंबून असते असे लेखक याठिकाणी सांगण्याचा प्रयत्न करत आहे. 'तत्वज्ञान आणि धर्म' वि. अ. नाईक यांच्या या

लेखात तत्वज्ञान म्हणजे काय ही संकल्पना स्पष्ट केली आहे. त्याचबरोबर धर्म म्हणजे काय, धर्माचे विविध प्रकार, स्वरुप, लक्षणे यांचीही सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच तत्वज्ञान व धर्म यातील सहसंबंधावर चर्चा केली आहे. शेवटी असा विचार मांडला आहे की, सर्वकंष तत्वज्ञानावर विश्वव्यापी धर्माची उभारणी झाली पाहिजे आणि असे झाले तरच मानव जातीचे खरे व चिरस्थायी आत्मिक कल्याण होणार आहे.

'धर्मांतराचे अंतरंग'[१०६] या के. ना. डांगे यांच्या लेखाामध्ये, हिंदु धर्मातील लोक इतर धर्मामध्ये धर्मांतर का करत आहेत याची विविध अंगाने कारणमीमांसा केली आहे. या संदर्भात धर्मशुन्यता ही परधर्म प्रदेशाची पहिली पायरी आहे असे लेखक म्हणतो. त्याचबरोबर सुधारकी लोक केवळ धर्मातील दोषस्थळावर बोट ठेवतात, त्यामधील सुधारणेवर भर देत नाहीत. त्याचबरोबर मध्यम बुद्धीजीवी वर्गास पोटापाण्याची भ्रांत असल्यामुळे या प्रश्नाकडे लक्ष देण्यास त्यांच्याकडे विशेष वेळ नाही. तसेच आपला आचार धर्म क्लीष्ठ व गुंतागुंतीचा असल्यामुळे सामान्य जणास तो आचरण्यास कठीण जात आहे. या विविध बाबींकडे यात लक्ष वेधले आहे.

धर्माचा उदोउदो करताना धर्माकडे आपण दुर्लक्ष करतो आहोत, याकडे लेखकाने विशेष गांभीर्याने पाहिले आहे. मुस्लीम धर्म व ख्रिश्चन धर्म यांमध्ये 'मानवकल्याणाची भावना' हे तत्व विशेष महत्वाचे आहे. तसेच धर्माच्या सामाजिक तत्वापेक्षा व्यक्ती तत्वाला अधिक महत्व आहे आणि त्यामुळे धर्मांतराचे प्रमाण वाढत आहे याविषयी चिंता व्यक्त केली आहे.

'धर्मांतर'[१०७] लक्ष्मण बळवंत भोपटकर यांच्या लेखामध्ये महाराजांच्या मृत्युनंतर त्यांनी दाखवलेला 'हिंदु धर्माभिमान', यामुळे प्रेरित झालेले शुर मराठा सरदार, सुर्याजी पिसाळ यांचा दगाबाजपणा, येसु व शाहुंची कैद, कैदेमध्ये शाहुवर धर्मांतरासाठी औरंगजेबाने केलेला प्रयत्न, शाहुच्या धर्मांतराला विरोध करण्यासाठी जेबुनिसा बेगमने केलेले शर्थीचे प्रयत्न, आपल्या धन्याच्या रक्षणासाठी खंडेरावाने केलेले धर्मांतरण याविषयीची माहिती दिली आहे. या संदर्भाने सुर्याजी पिसाळ व खंडेराव या दोघांच्या नितीची व स्वामीनिष्ठेची चर्चा केली आहे. यामध्ये सुर्याजीने स्वामीशी व धर्माशी फितुरी केली तर दुसऱ्याने म्हणजेच खंडेरावाने आपली अलोटस्वामीभक्ती व उज्ज्वल धर्मनिष्ठा धर्मांतराने कशी व्यक्त केली याचे विवेचन केले आहे.

बौद्ध धर्मावर आधारित अनेक लेख चित्रमय जगतमध्ये छापले होते. या संदर्भात 'शील समाधीकप्रज्ञा'[१०८] या चिंतामण वैजनाथ राजवाडे यांच्या लेखामध्ये बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी आवश्यक बौद्धक ग्रंथाची माहिती यात दिली आहे. यामध्ये सुत्तपिटक, धम्मपिटक, विनयपिटक या त्रिपिटकांचे महत्व विशद केले आहे. त्याचप्रमाणे इ.स. ५ व्या शतकात बुद्धघोषाने लिहिलेल्या विशुद्धीमार्ग या ग्रंथाच्या आधाराने लेखकाने बौद्धधर्माच्या त्रिरत्नांचे विवेचन केले आहे. सर्व पापातून अलिप्त राहिल्यास शीलाची प्राप्ती होते. त्यानंतर सदाचारणाने व नैतिकतेने पुण्याचा संचय केल्यास समाधी अवस्था प्राप्त होते व शेवटी स्वचित्ताचा परिशोध घेतल्यामुळे प्रज्ञा (ज्ञान) प्राप्त होते.

'भगवान बुद्धाची आध्यात्मिक साधना सिद्धि व उपदेश'[१०९] या रंगनाथरामचंद्र दिवाकर यांच्या लेखामध्ये उत्तर वैदिकाल खंडात निर्माण झालेल्या विविध धर्म संप्रदायाची माहिती यात दिली आहे. या संदर्भाने बौद्ध धर्म व जैनधर्म यांची विशेष माहिती यात दिली आहे. दोन्ही धर्मातील महत्वाची तत्वे, शिकवणूक, नितीनियम याची माहिती यात दिली आहे. जैन धर्मातील कडक तपश्चर्या व अतिरेकी अंहिसा याची माहिती दिली आहे. बौद्धधर्मातील 'मध्यममार्ग' ही संकल्पना स्पष्ट करुन या संकल्पनेतच बौद्धधर्माच्या लोकप्रियतेचे गमक आहे, याविषयी चर्च केली आहे. 'बौद्धधर्म आणि त्याचा विस्तार'[११०] या नारायणराव यरगुड्डी यांच्या लेखामध्ये, मगध बलिष्ठ राष्ट्र बनल्यानंतर इ. स. पू. तिसऱ्या शतकात बौद्धधर्म हा राष्ट्रधर्म कसा बनला यावर चर्चा केली आहे. बौद्ध धर्माची दहा तत्वे, पंचमहाव्रते, अष्टांगमार्ग, त्रिरत्ने या बौद्ध धर्माच्या तत्वांवर यामध्ये चर्चा केली आहे. बौद्ध धर्म परोपकार आणि प्रिती यावर कसा उभा आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या धर्माच्या प्रसारामध्ये सम्राट अशोकाचे योगदान आहे त्यासंदर्भात अशोकाचा धम्म, त्यांचे धर्मविषयक शिलालेख, संघ, संघास केलेला दानधर्म, धम्ममहामात्राची नेमणूक, उत्तरेकडे नेपाळ, चीन, तिबेट कडील प्रसार व दक्षिणेकडे सिलोन, ब्रह्मदेशाकडे झालेला विस्तार व धर्मप्रचारक–प्रसारक यांची सविस्तर माहिती या लेखात दिली आहे. 'चीनचा धर्म व तत्वज्ञान' या लेखामध्ये बि. कृ. नेरुरकर यांनी चीनचा तत्वज्ञ कॉन्फूत्सू आणि त्याचे तत्वज्ञान याची सविस्तर माहिती दिली आहे. या धर्माचे महत्वपुर्ण ग्रंथ त हेउय, चंगयंग, लनयु, मांगात्सि

यातील धर्मतत्वाची माहिती यात दिली आहे. या धर्माचे नऊ सद्‌गुण, मातृपितृभक्ती, सोळा आचारधर्म, अष्टसुत्री, शासनविषयक विचार यांची माहिती यात दिली आहे. याचबरोबर चीन व भारत यांची धार्मिक व सांस्कृतिक जवळीक, बौद्ध धर्म याविषयीही विवेचन यात केले आहे. 'जपानने बौद्ध धर्म कसा पचविला'[१११] रामकृष्ण गोपाळ भिडे यांनी या लेखांमध्ये, बौद्ध धर्माचे मुळ उगमस्थान जरी भारत असले तरी चीन, जपान, सिलोन, कोरिया येथे या धर्माचा प्रसार कसा झाला याची कारणमीमांसा केली आहे. या धर्माच्या अहिंसावादी तत्वज्ञानाचे महत्व प्रतिपादीत करुन अहिंसा तत्वाच्या अतिरेकीपणामुळे भारतीय स्वातंत्र्याला आहोटी कशी लागली याचा आढावा घेतला आहे. परंतु चीन जपान सारख्या देशांमध्ये हा धर्म अहिंसावादाचा पगडा न बसवता कसा टिकून आहे, त्यांचे स्वातंत्र्य आबादीत ठेवून जगावर प्रभुत्व गाजविण्याची जपानची महत्वकांक्षा कशी वाढत आहे व त्या दृष्टीने बौद्ध धर्मात अनुकूल बदल घडवून हा धर्म जपानने कसा पचवला आहे याविषयी विचार मांडले आहेत. या धर्मातील आदर्शतत्वाचा वापर राष्ट्रसंघटन करुन आणण्यास जपान कसा करत आहे याविषयी माहिती दिली आहे.

'हिंदुस्थानातील बौद्धधर्माचे उत्थान व पतन'[११२] हरि गोविंद बोरवणकर यांनी या लेखामध्ये बौद्ध धर्म विनय, शील, प्रज्ञा, त्रिपिटके, अष्टांग मार्ग, सादाचाराची शिकवणूक, समतेचे तत्व, महायान पंथाचा वाढता प्रभाव, संस्कृतभाषा व मूर्तीपुजेचा स्विकार, तंत्रमार्गाचा उद्‌भव व त्याचे हिडीस रुप यामुळे बौद्धधर्माचे झालेले पतन याची सविस्तर माहिती दिली आहे. 'बोधीचर्या उर्फ महायान धर्माची साधना' या हरि गोविंद बोरवणकर यांच्या लेखामध्ये बौद्ध धर्मातील निर्वाण प्राप्तीची संकल्पना स्पष्ट केली आहे. रुप, वेदना, संज्ञा, संस्कार, विज्ञान या पाच स्कंधातून मनुष्याच्या शरीराची निर्मिती झालेली असते. मनुष्याचा जन्म हा दुःख मुलक आहे, या दुःखमुलक जन्माचा हेतु काय असावा, ह्या हेतुची निवृत्ती कशी होईल, दुःख निरोधन कसे करावयाचे त्या संदर्भात बुद्धाने मांडलेले अष्टांग मार्ग व शेवटी समाधी अवस्था यावर सखोल चर्चा या लेखामध्ये केली आहे.

'बोधीसत्व'[११३] या महादेव शास्त्री यांच्या लेखामध्ये सम्राट अशोकाने भगवान बुद्धाच्या जन्मानंतर सुमारे अडिचशे वर्षांनी बौद्ध धर्माचा जो प्रचार प्रसार केला त्याची माहिती दिली

आहे. बौद्ध धर्माचा अशोकावर पडलेला प्रभाव; बौद्ध धर्माच्या प्रचार प्रसारामध्ये त्याने पाडलेली महत्वाची भूमिका, त्याचे धम्म संबंधीचे विचार, अशोकाचा धम्म, हिनयान पंथाचा प्रभाव कमी होऊन महायान पंथाचा वाढलेला प्रभाव, बोधी सत्वाची भूमिका यावर चर्चा केली आहे. ‘पहा तो मनुष्य श्रेष्ठ‘[११४] या चि. वि. जोशी यांच्या लेखामध्ये गौतम बुद्धाला ज्ञान प्राप्ती झाल्यानंतर त्याच्या जीवनात झालेल्या विविध घटनाक्रमांचा परिचय यात दिला आहे. सारनाथ मधील पहिले प्रवचन, निरनिराळे अनुयायी, बौद्ध धर्मस्थळे, बौद्ध धर्मातील प्रवेश, तत्कालीन वर्ण व्यवस्था यावर यात भाष्य करण्यात आले आहे.

‘राजयोगाचा प्रणेता भगवान बुद्ध‘ या अ. प. करमरकर यांच्या लेखामध्ये बुद्धाचे बालपण, त्याच्या आयुष्याला कलाटणी देणारे विविध प्रसंग, त्याचे धम्मचक्र प्रवर्तन, बुद्धाची शिकवणुक मैत्री, करुणा, उपेक्षा, समाधी अवस्था, बौद्ध धर्माचा मध्यम मार्ग, अहिंसेची संकल्पना आणि मोक्षाची संकल्पना याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. ‘बुद्धाचे विचार सौंदर्य‘[११५] या ना. वा. तुंगार यांच्या लेखामध्ये गौतम बुद्धांनी ज्या ज्या ठिकाणी जाऊन जी धार्मिक व्याख्याने दिली त्यातून त्यांचे विचार सौंदर्य कसे समजते यावर भाष्य केले आहे. यामध्ये चांडाळ कोणाला म्हणावे, माणसाच्या पराभवाची कारणे कोणती, वर्णव्यवस्थे संदर्भात बुद्धाचे विचार याविषयीची माहिती दिली आहे.

‘भगवान बुद्धाचे जीवन आणि कार्य‘ या एन. रा. भागवत यांच्या लेखामध्ये भगवान बुद्धांनी आपल्या ८० वर्षाच्या आयुष्यात एक महान जागतिक धर्माचा पाया कसा घातला याविषयी माहिती दिली आहे. सामाजिक, नैतिक, राजकीय, बौद्धधिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात बुद्धाने आपल्या विचारसरणीने अभूतपूर्व क्रांती कशी केली यावर भाष्य केले आहे. त्याचबरोब या धर्माचा आशियाभर प्रसार कसा झाला, त्याच्या लोकप्रियतेची कारणे काय होती यावरही प्रकाश पाडला आहे. मानवी समाजास नवतत्वज्ञान व दृष्टि दिली. समता, करुणा, मानवता याची शिकवण देऊन मनुष्य हा त्याच्या जिवनाचा शिल्पकार आहे याविषयी मार्गदर्शन केले. अज्ञानाच्या अंधारात चाचपडणारे जग बुद्धाच्या तेजस्वी धम्मदिपाने कसे तेजस्वी झाले याविषयी माहिती दिली आहे.

जैन धर्माची माहिती सांगणारे अनेक लेख यामध्ये छापण्यात आले. यामध्ये 'महावीर व त्यांचा धर्मपंथ' या सदाशीव विश्वनाथ खैर यांच्या लेखामध्ये; महावीरांचे बालपण, गृस्थाश्रम, मातापित्यांचा वियोग, वैराग्याग्नी, जैन धर्माची तत्वे, शिकवणूक, पूर्वीचे तीर्थंकार याची माहिती यामध्ये दिली आहे. 'अकबर आणि जैन धर्म'[११६] या लेखामध्ये, अकबराने जैन धर्माचा स्विकार केला होता व तो जैन धर्माचा अनुयायी होता, त्याच्या धर्मामध्ये जैन धर्माची तत्वे सामाविष्ट होती, या संदर्भात सखोल विवेचन केले आहे. या संदर्भाचे ठळक विवेचन करताना, जैन गुरु हरिविजय यांचा अकबरावर असलेला प्रभाव, जीझिया कर बंद करण्यामागील त्याचा उद्देश, अहिंसा तत्व स्वीकारुन प्राणी हत्येच्या संदर्भात त्याने हत्याबंदी नियम पास केले होते यामागील त्याची भूमिका, जैन धर्मक्षेत्रास जाण्यासाठी यात्रेकरु करावरील त्याने घातलेली बंदी, जैन धर्मावर त्याची असणारी श्रद्धा व व्यवहारी पातळीवर केलेला स्वीकार, अबुल फझलच्या ऐन ए अकबरीतील प्राणीहत्या बंदी विषयी व प्रजेच्या मालमत्ता, जीवन आब्रु व धर्मावर संरक्षक म्हणून राजाची असणारी भूमिका याविषयी असणाऱ्या उल्लेखावरुन अकबराने जैनधर्म स्वीकारला होता हे सिद्ध होते असे लेखक म्हणतो.

'मध्ययुगीन भारतातील जैन धर्माची कामगिरी'[११७] या सी.जी. हाडोळे यांच्या लेखामध्ये, जैन धर्माचा स्विकार केलेल्या राज्यकर्त्यांची यादी दिली आहे. त्याचबरोबर विविध राज्य कर्त्यांच्या दरबारी असणारा वरिष्ठ अधिकारी वर्ग जैन होता, जैन विद्वानांनी धार्मिक सामाजिक विषयावर अनेक ग्रंथलेखनही केले आहे. तसेच व्यापारी वर्ग म्हणून जैन उदयास आले होते याविषयी माहिती दिली आहे. यावरुन लेखकाने हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे की, सुशिक्षित समाजात व बहुजन समाजात सुद्धा जैन धर्मलोकप्रिय झाला होता. शिल्पकले मध्येही जैन धर्माने प्रगती केली होती. आबुपहाड, गिरनार येथील जैन मंदिरे कला, सांस्कृतिक दृष्ट्या कशी महत्वपूर्ण आहेत या संदर्भात माहिती दिली आहे. अशाप्रकारे मध्ययुगात जैन धर्माला कशी लोकप्रियता प्राप्त झाली होती याविषयी लेखकाने माहिती दिली आहे.

'जैन धर्ममीमांसा'[११८] या स्वामी विरुपाक्ष्य वडियर यांच्या लेखामध्ये, जैन धर्माचे आचार काय होते, वैदिक धर्मातील अनेक तत्वे जैन धर्मातील आचारावर कशी समाविष्ठ झाली होती यावर चर्चा केली आहे. अहिंसा, कडक उपासतापास, रात्रीचा भोजन निषेध यामध्ये जे

नितीनियम आहेत, त्यावर वैदिक धर्माचा कसा प्रभाव आहे. त्यामुळे जैन ग्रंथांना अवैदिक किंवा अनाधिकारी म्हणणे कसे चुकीचे आहे याविषयी चर्चा केली आहे. 'महावीर व त्यांचा धर्मपंथ'[११९] या सदाशीव विश्वनाथ बर्वे यांच्या लेखामध्ये, महावीरांचे चरित्र, कौटुंबिक पार्श्वभूमी, त्रिशलेची स्वप्ने, स्वप्नफलानुमती, गर्भाचे स्थलांतर, महावीराचा जन्म, बाललीला, कर्म सिद्धांत, पाप पुण्याच्या संकल्पना, अहिंसेचा विचार, जैन धर्माचे तत्वज्ञान व सामान्यरुप, पूर्वीच्या तिर्थकरांच्या कार्याचा आढावा, जैनधर्मातील उपपंथ, पोटभेद, जैन धर्माच्या यशाची कारणे यावर चर्चा केली आहे.

## ४.३ चित्रमय जगत मधील अर्थविषयक लेखन :–

## ४.३.१ स्वातंत्र्यपूर्वकालीन अर्थविषयक लेखन :–

'हिंदुस्थानचा औद्योगिक विकास'[१२०] या लेखामध्ये, अनंत माधव गुर्जर यांनी असा विचार मांडला आहे की, भारतातील जातीभेद मोडून काढण्यासाठी किंवा जाती जातींमध्ये ऐक्य घडवून आणण्यासाठी केवळ सुधारकांचे प्रयत्न पुरेसे नाहीत. ज्या वेळेस हिंदुस्थानचा औद्योगिक विकास होईल, त्याचवेळेस भारतीयांमध्ये ऐक्य प्रस्थापित होईल. यासाठी प्रथम औद्योगिक विकासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच भारतात उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी परदेशी चढाओढ, स्पर्धा किंवा प्रतिकुल राजकीय धोरण या गोष्टी आड येत नसून हिंदी भांडवलदारांची शिथिलता आड येत आहे. हिंदुस्थानात औद्योगिक विकास होण्यासाठी मुबलक व स्वस्त मजुर पुरवठा, कच्चा माल, लोकशिक्षणात झालेली वाढ या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. या गोष्टीच्या अनुकुलतेमुळे भारताचा औद्योगिक विकास होऊ शकतो असा विचार यात मांडला आहे.

'सध्याची महागाई'[१२१] या ग. स. मराठे यांच्या लेखामध्ये, मागणी व पुरवठा यांच्यातील सहसंबंध, उत्पादन, बाजारमूल्य, चलन व्यवस्था, आर्थिक व्यवहाराच्या पद्धती व त्यांचे स्वरूप, सरकारी कर्जरोखे, कंपन्यांचे शेअर, बँकांचे चेक, हुंड्या यांचा वाढता वापर तसेच सट्टेबाजी या सर्वांमुळे महागाईमध्ये वाढ होत आहे या स्वरूपात विस्तृत माहिति दिली आहे.

'इंग्लंडमधील भिकारी'[१२२] या सदाशीव दामोदर आधारकर यांच्या लेखात, आपल्या देशातील भिकाऱ्यांच्या संख्येत झालेली वाढ आटोक्यात आणण्यासाठी काय करता येईल

यासंबंधी लोकांच्या धार्मिक समजुतीस आळा घालणे तसेच सरकारी कायदे करणे गरजेचे आहे या विषयी मार्मिक माहिती दिली आहे. या संदर्भात इंग्लडमधील भिकारी, तेथील शासनाने त्यावर योजीलेले उपाय, श्रमदानाचे महत्त्व, रोजगाराच्या संधी, निर्वाहसाधनांची उपलब्धता, उद्योगधंद्यातील वाढ या विषयी माहिती दिली आहे.

'स्वदेशी चळवळीसंबंधी प्रासंगिक विचार'[१२३] या द. वि. आपटे यांच्या लेखामध्ये भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीमध्ये भारतास स्वातंत्र्य मिळविण्यासाठी 'स्वदेशी' तत्त्वाचा कसा अवलंब करण्यात आला आहे याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. आपल्या देशातील उद्योगधंद्याची वाढ करण्यासाठी परदेशी मालावर बहिष्कार घालून स्वदेशी मालाची उत्पत्ती वाढविण्याचे लक्ष ठेवण्यात आले. याविषयी सांगताना लेखक म्हणतो की, स्वदेशी शिस्त आणि अंतर्गत स्थिरता नसल्यामुळे तसेच भांडवल, मजुर आणि मागणी यांच्यातील हलगर्जीपणामुळे आपण परावलंबी व दरिद्री झालो आहोत. परंतु आता स्वदेशी चळवळीमुळे आपल्यातील उद्योजकता व उत्साह वाढून देशाचे आर्थिक व पर्यायाने राजकीय हीत साधले जाईल.

'औद्योगिक शिक्षणाची आवश्यकता'[१२४] या बाळकृष्ण मेहता यांच्या लेखामध्ये, भारतीय उद्योगधंद्याच्या वाढीसाठी प्रथम औद्योगिक शिक्षणाची आवश्यकता महत्त्वाची असून त्याशिवाय व्यापार व उद्योगधंद्यातील कौशल्य, बारकावे, दर्जा, वितरण प्रक्रिया याविषयी ज्ञान प्राप्त होणार नाही असे लेखक म्हणतो. उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी, विकासासाठी व दीर्घकालीन स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी आवश्यक असणारे वैचारिक व व्यवहारिक ज्ञान औद्योगिक शिक्षणामुळे उद्योजकास प्राप्त होते. यामुळे भांडवल व वस्तुचे उत्पादन, कामगार यांच्यातील मेळ व्यवस्थित घालता येऊन उत्पादन प्रक्रिया सुकर करता येते. अशा प्रकारे औद्योगिक शिक्षणाचे महत्त्व या लेखात सांगितले आहे. 'देशी राज्य व त्यांची औद्योगिक उन्नती' श्रीमंत सरदार माधवराव विनायकराव किवे यांच्या या लेखामध्ये, संस्थानी राज्यामध्ये उद्योगधंद्याची प्रगती कशी करता येईल याविषयी मार्मिक विचार मांडले आहे. त्या संदर्भात लेखक म्हणतो की, देशी संस्थांनी उद्योगधंदे वाढवण्यासाठी लहान उद्योग धंद्यास पैशाची व माहितीची मदत केल्यास व त्यांना उद्योजकतेसाठी प्रोत्साहित केल्यास औद्योगिक प्रगतीस चालना मिळेल व त्याचबरोबर मोठे उद्योगधंदे सरकारने सुरु करून लोकांमध्ये जाणिव जागृती करावयास हवी.

'हिंदी चलन पद्धतीचे भवितव्य'[१२५] या वामन गोविंद काळे यांच्या लेखामध्ये ब्रिटिश कालखंडात पहिल्या महायुद्धानंतर भारतात ज्या वेगवेगळ्या आर्थिक समस्या निर्माण झाल्या यावर यात भाष्य केले आहे. हिंदी चलनाचे महत्त्व व बाजारमुल्य या संदर्भात हिंदुस्थानच्या आर्थिक परिस्थितीस कोणती चलन पद्धती अनुकूल आहे. यासाठी हिल्टन यंग कमिशनने केलेल्या शिफारशी याची माहिती दिली आहे. या कमिशनला भारतीयांनी केलेला विरोध त्या संदर्भात आलेले अनेक लेख याचा आढावा घेऊन उद्योगधंदे, व्यापार आणि सामान्य जनतेचा चरितार्थ यांचा चलनपद्धतीशी कसा जवळचा संबंध आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. चलनवाढीचे परिणाम शेतकरी, उद्योजक आणि सामान्य लोक यांच्यावर जास्त होतात. त्यामुळे आर्थिक परिस्थिती सुधारण्यास वाव मिळत नाही. या सर्वांचे कारण म्हणजे हिंदुस्थानची सत्ता ही येथील लोकांच्या हाती नसून परकियांच्या हाती आहे. त्यामुळे लोकमताचा प्रभाव सरकारवर पडत नाही. यावर उपाय म्हणून हिंदी चलन पद्धतीविषयी कायदेमंडळात चर्चा होऊन लोकमताची छाप सरकारवर पडली पाहिजे.

'चीनची आर्थिक परिस्थिती'[१२६] जनार्दन सखाराम करंदीकर यांच्या या लेखामध्ये, चीनच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेताना, प्रत्येक राज्यक्रांतीच्या मुळाशी 'आर्थिक असंतोष' हे महत्त्वाचे कारण कसे असते याविषयी चर्चा केली आहे. चीनमधील इ.स.१९११ मधील मांचु घराण्याविरूद्धचे बंड व त्यानंतर चीनच्या आर्थिक परिस्थित झालेली सुधारणा याची माहिती दिली आहे. यामध्ये चीनमधील रेल्वे व तारायंत्रणा, चीनचा व्यापार, चीनमधील शिक्षणपद्धती, उत्पन्नवाढीसाठी केलेले उपाय, सरकारच्या वसुलाच्या बाबींमध्ये केलेली वाढ, शेती सुधारणा, परदेशी मालाच्या आयातीवर वाढवलेले जकात कराचे प्रमाण, नाण्यांमध्ये केलेली सुधारणा, व्यापारी जहाजाच्या संख्येतील वाढ या सर्व गोष्टींवर प्रकाश टाकला आहे.

'आयुष्याचा विमा आणि राष्ट्रीय संपत्ती'[१२७] या ग. स. मराठे यांच्या लेखामध्ये राष्ट्रीय संपत्ती कोण-कोणत्या मार्गाने निर्माण करता येते यावर भाष्य केले आहे. या संदर्भात बँक व विमा कंपन्यांचा राष्ट्रीय संपत्तीच्या भरभराटीस कसा हातभार लागतो याविषयी माहिती देताना लेखक म्हणतो की, बँकांमधील पैसा खातेदारांनी मागणी केल्यावर लगेचच द्यावा लागतो. परंतु विमा कंपन्यांचा पैसा दीर्घ मुदतीचा असल्याने तो राष्ट्रीय कार्यासाठी वापरता येतो. हा पैसा

मुदत संपल्यावर अथवा व्यक्ती अपघातात मृत्यु पावल्यावर द्यावा लागतो व त्याची विशिष्ट प्रक्रिया असल्यामुळे तो पर्यंत मुदत मिळते व विमा कंपनीला पैसा उभारणे सहज शक्य होते. म्हणून विमा कंपन्याचा पैसा राष्ट्रीय संपत्तीला अतिशय उपयोगी पडतो असे लेखक म्हणतो.

'संपत्तीचा विनियोग'[१२८] या रघुनाथ गोविंद सरदेसाई यांच्या लेखामध्ये संपत्तीचा विनियोग म्हणजे काय व संपत्तीच्या विनियोगाचे मार्ग कोणकोणते आहेत यावर चर्चा केली आहे. संपत्ती कुटुंबिय व वंशजासाठी ठेवणे किंवा सार्वजनिक कार्यासाठी देणे किंवा संपत्तीच्या धन्याच्या हायातीतच तिची विल्हेवाट लावणे असे तीन मार्ग संपत्तीच्या विनियोगासाठी वापरले जातात असे लेखक म्हणतो. या संदर्भाने संपत्ती सार्वजनीक कार्यासाठी वापरणे किंवा धन्याच्या हायातीतच संपत्तीची विल्हेवाट लावणे या मार्गाचा अवलंब करून संपत्तीचा विनियोग केल्यास देशाच्या आर्थिक विकासासाठी कसा हातभार लागेल याविषयी चर्चा केली आहे.

'रशियाची पंचवार्षिक योजना'[१२९] या र. गो. सरदेसाई यांच्या लेखामध्ये रशिया हा भारताप्रमाणे कृषीप्रधान देश आहे, साम्यवादी विचारसरणी अंगीकारून आर्थिक विकास करण्याचे ध्येय साधण्याचा रशिया कसा प्रयत्न करत आहे. कृषी विकास व औद्योगिक विकास डोळ्यासमोर ठेवून स्टॅलीनच्या नेतृत्त्वाखाली रशियाने पंचवार्षिक योजनेची कशी तयारी केली आहे याविषयी लेखकाने यात माहिती दिली आहे. या पंचवार्षिक योजनेचा मुळ उद्देश भांडवलशाहीची पाळेमुळे खनून काढून आधुनिक पद्धतीने शेतीमध्ये सुधारणा करणे हा आहे. याविषयी महत्त्वपूर्ण माहिती या लेखात दिली आहे.

'भांडवलशाहीवरील कालचक्र'[१३०] या श्रीकृष्ण रामचंद्र पोतनीस यांच्या लेखामध्ये, भांडवलशाही या संकल्पनेचे स्वरूप व पार्श्वभूमी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती, भांडवलदार व कामगार या दोन आर्थिक गटांचा उदय, खुल्या व्यापाराचे तत्त्व, संपत्तीचे असमान वाटप, भांडवलदार व कामगारांमधील तणाव, याविषयी माहिती दिली आहे. त्याचबरोबर या सर्वांमधून दिसणारे भांडवलशाहीचे स्वरूप, भांडवलशाहीतील अनिश्चितता व दोष यावर भाष्य केले आहे. शेवटी लेखक असे म्हणतो की, लोकशाही संकल्पनेमध्ये भांडवलशाहीचे स्वरूप समाविष्ट आहे. लोकशाहीत स्वातंत्र्य, समता,

बंधुता ही तत्वे समाविष्ट असली तरी तिच्यामध्ये असणाऱ्या भांडवलशाही तत्वामुळे स्वातंत्र्य, समता ही तत्वे प्रत्यक्षात व व्यवहारीक पातळीवर अंमलबजावणी करण्यास कुचकामी ठरतात.

'रिझर्व्ह बँक' या लेखात श्री. रा. केतकर यांनी भारतातील रिझर्व्ह बँकेचे महत्व व तिच्या अगोदर असणाऱ्या विविध बँकांचा पूर्व इतिहास यात सांगितला आहे. ब्रिटिश सरकार व रिझर्व्ह बँक यांचा सहसंबंध यावर प्रकाश टाकला आहे. याशिवाय रिझर्व्ह बँक म्हणजे काय? रिझर्व्ह म्हणजे साठा अगर काही कारणासाठी साठवून ठेवलेला पैसा होय. यामध्ये पेपर करन्सी रिझर्व्ह व गोल्ड स्टॅंडर्स रिझर्व्ह या दोन महत्त्वाच्या ठेवी असतात. या दोन्ही ठेवीवर सरकारचे नियंत्रण होते. याविषयी अधिक माहिती देऊन ठेवीवर सरकारचे नियंत्रण होते याविषयी अधिक माहिती देऊन रिझर्व्ह बँकेची कामे, कामातील अडचणी, हुंडणावळीच्या दरातील चढ–उतार यावर या लेखात चर्चा केली आहे.

'जर्मनीचे आर्थिक पुनरूत्थान'[१३१] या रामकृष्ण गोपाळ भिडे यांच्या लेखात, पहिल्या महायुद्धात पराभूत झालेल्या जर्मनीच्या ढासळलेल्या आर्थिक स्थितीचे वर्णन केले आहे. ही ढासळलेली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी जर्मनी काय उपाययोजना करत आहे याची माहिती यात दिली आहे. या संदर्भाने अमेरिकेने दिलेली आर्थिक मदत, त्यातून उत्पादन कार्यास आलेला वेग, उद्योगधंद्यांत झालेली वाढ, व्यापारी व व्यावसायिक उद्योगधंद्यांच्या संघाची उभारणी, शेती, परदेशी व्यापारात केलेली वाढ, करव्यवस्थेत केलेली सुधारणा याविषयी माहिती दिली आहे. 'स्वदेशी म्हणजे काय'[१३२] या शांतिनाथ यशवंत नांद्रे यांच्या लेखामध्ये, कोणत्याही देशाची आर्थिक प्रगती ही तेथील सरकारच्या कृपादृष्टीवर अवलंबून असते परंतु भारतीय राज्यव्यवस्था परकीयांच्या ताब्यात असल्याने त्याची कृपादृष्टी होऊन भारतीय उद्योगधंद्याची प्रगती होईल हा विचार करणे ही अशक्य आहे. असे लेखक म्हणतो. पारतंत्र्यातील भारतीयांना स्वदेशी उद्योगधंद्याची वाढ करून आर्थिक स्वातंत्र्यता प्राप्त करून घेणे अशक्य आहे.

असे असले तरी अनेक छोटे मोठे उद्योग धंदे आहेत की जे सरकारच्या सहाय्याशिवाय चालू शकतात. दैनंदिन व्यवहारातील अनेक छोट्या मोठ्या गोष्टी स्वतः उत्पादित करून आपल्या स्वदेशी उद्योगधंद्यांमधून निर्माण झालेल्या वस्तुच्या वापराचा निश्चय केला पाहिजे

असे लेखक म्हणतो. जेणे करून आपला पैसा हा आपल्या देशातच राहिल. या शिवाय लेखकाने इ.स. १९३०–३४ या काळात परदेशातून भारतात आयात होणाऱ्या विविध वस्तूची यादी दिली आहे. आपण परदेशी वस्तुंवर किती अवलंबून आहोत व हे किती धोकादायक आहे याची जाणिव करून देऊन स्वदेशी वस्तु वापरण्याचा आग्रह केला आहे.

'आर्थिक जीवनाची पुनर्घटना'[१३३] या रा. श्री. खैर यांच्या लेखामध्ये, संपत्तीची मालकी व तिचा उपयोग याविषयी बदलत चाललेल्या कल्पनांचा विचार केला आहे. या संदर्भात पुरुषार्थाची बदलती कल्पना, अर्थप्रधान युग, संपत्तीच्या जुन्या कल्पना, यांत्रिक युग, समाजसत्तेचे विविध प्रमाण यावर चर्चा केली आहे. औद्योगिक कायदे कानुन झाले पाहिजेत, उद्योग धंद्यातील भांडवलदारांची मागणी कमी करून समाजाचे नियंत्रण बसवले पाहिजे. देशात होणाऱ्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीला इष्ट वळण देण्याच्या दृष्टीने पाश्चात्याचे दोष टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपला आर्थिक वेदांत आणि आर्थिक समाजरचनेचे तत्व याचा विचार आज पासूनच केला पाहिजे असे लेखक म्हणतो.

'हिंदुस्थानातील पूर्वकालीन सावकारी व व्यापार' या रा. के. रानडे यांच्या लेखामध्ये, यज्ञवलक्यस्मृति, नारद स्मृति, मनुस्मृति या स्मृतिग्रंथामध्ये सावकारी व व्यापार या संबंधी बरेच नियम आढळतात. यावरून धनको, ऋणको, गुलाम पद्धती, कर्जाची कारणे, उत्पन्नाची साधने या सर्वांची माहिती समजते. यावरून प्राचीन काळात सावकारी व व्यापार कसा चालायचा याची कल्पना येते.

'महाराष्ट्राच्या औद्योगिक व व्यापारी उन्नतीची दिशा'[१३४] या द. दा. देशपांडे यांच्या लेखामध्ये लेखक म्हणतो की, राष्ट्राची आर्थिक उन्नती करण्यासाठी व्यापार आणि उद्योगधंद्याची वाढ होणे आवश्यक आहे. यासाठी तज्ञ व अनुभवी लोकांची व्याख्याने आयोजित केली पाहिजेत. राष्ट्रीय दृष्टीने कारखाने आणि व्यापारी संस्था चालविल्या पाहिजेत. वैयक्तिक स्वार्थाची आणि राष्ट्रास हानीकारक अशा व्यवस्थापक वर्गाची पद्धत बदलली पाहिजे. व तिची कार्यक्षम व उदात्त स्वार्थाच्या पायावर पुनर्घटना केली पाहिजे. आपआपसातील मत्सर व अहितकारक चुरस नाहिशी करून समाजाच्या हिताच्या दृष्टीने औद्योगिक व्यापार व संस्था चालविल्या पाहिजेत तरच महाराष्ट्राची औद्योगिक उन्नती होईल असे लेखक म्हणतो.

'आमचे भिकारी'[१३५] या लेखात यादव शंकर वाविकर म्हणतात की, देशाच्या आर्थिक दुरावस्थेची जी वेगवेगळी कारणे आहेत त्यामध्ये आळशी निरोपयोगी माणसे हे प्रमुख कारण आहे. देवधर्माच्या नावाखाली निरोद्योगी राहून सामान्य लोकांकडून पैसा उकळायचे काम हे भिकारी करत असतात. यामध्ये गोसावी, भोन्या, जंगम, कानफाट्या, कुरमुड्या जोशी, कडकलक्ष्मी, जोगत्या, आराधी, वाघे, भैरवपंथी, विरागी, नंदीवाले, कवडीवाले, बहुरुपी, गोंधळी, भाट इ. अनेक प्रकारचे धष्टपुष्ट लोक दररोज भीक मागत फिरत असतात. काबाडकष्ट करणाऱ्या मजुरापेक्षाही जास्त पैसे हे मिळवतात. अशा भिकाऱ्यांची लोकसंख्या व जीवनखर्चाची आकडेवारीसहित माहिती यात लेखकाने दिली आहे. त्याचबरोबर पाश्चात्य देशातील भिकारी व त्यांची व्यवस्था कशी आहे यावरही प्रकाश टाकला आहे. लोकांच्या धार्मिक भावना न दुखवता लोकांना दान धर्माची नवी योजना सुरु केली पाहिजे. देशातील बेकारी नाहिशी झाली पाहिजे. लोकांनी उद्योगी बनले पाहिजे असे लेखक म्हणतो.

'जपानने आपले उद्योगधंदे कसे वाढविले' या लेखामध्ये पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात जपानने रेशिम, चहा, लोखंड, आगपेट्या व इतर उद्योगधंद्यामध्ये आपली प्रगती कशी केली या संदर्भात चर्चा केली आहे. याचबरोबर जपानमध्ये अगदी बारीक सारीक घरगुती उद्योगधंदे आहेत. शेती सोबत अनेक पूरक जोडधंदे तेथे केले जातात. जपान सरकारने आपल्या उद्योगधंद्याच्या वाढीसाठी, नविन उद्योग स्थापन्यासाठी कर्ज व्यवस्था सुरु केली आहे. तसेच व्यापारी वाढीमध्ये दळणवळण महत्त्वाचे असते, त्यामुळे दळणवळणाच्या आधुनिक सोई उपलब्ध करून दिल्या आहेत. या सर्व कारणांमुळे जपानची उद्योगधंद्यामध्ये वाढ झाली आहे असे लेखक म्हणतो.

'बेकार आणि बेकारी' या चंडीराम हरि पळणिटकर यांच्या लेखामध्ये आधुनिक युगात औद्योगिकरण, यंत्रसामग्री, भांडवलदारी, कारखानदारी यामुळे कामगारांची संख्या वाढली आहे पण त्याचबरोबर अनेक समस्याही निर्माण झाल्या आहेत. यामध्ये यंत्र हेच बेकारीचे मुख्य कारण आहे असे लेखक म्हणतो. याशिवाय मंदीचे वातावरण, हिंदुस्थानातील लोकांची आळशी प्रवृत्ती, उद्योगीपणा कमी असेणे त्यामुळे बेकारी दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे. त्यासाठी

उद्योग प्रवृत्तीचे पुनरूज्जीवन करायला हवे व यंत्रनियमन करणे गरजेचे आहे असे लेखक म्हणतो.

'अर्थप्रधान समाजरचनेचे भवितव्य'[१३६] या सदाशिव विनायक देशपांडे यांच्या लेखामध्ये, आधुनिक काळात आर्थिक उत्पादन प्रक्रियेमध्ये साध्य आणि साधन यांचा कसा विपर्यास होत चालला आहे हे समजून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. संपत्ती हे सुखाचे एक साधन आहे हे विसरून संपत्ती हे एकमेव साध्य आहे अशी प्रामाणिक समजून होत चालली आहे व तिच्या प्राप्तीसाठी माणूस हवी ती उपाययोजना करू लागला आहे. या अर्थोत्पादनात माणसाची किंमत यंत्रापेक्षा कमी झाली आहे. या व्यवस्थेला बदलण्यासाठी देशाच्या अर्थशास्त्रात कोणते अनुकूल बदल झाले पाहिजेत यावर लेखकाने चर्चा केली आहे.

## ४.३.२ स्वातंत्र्य उत्तरकालिन अर्थविषयक लेखन :–

'लोकशाहीतून सामाजिक व आर्थिक समानतेकडे'[१३७] या दत्तात्रय वासुदेव केळकर यांच्या लेखामध्ये, स्वातंत्र्य उत्तर काळात लोकशाही तत्त्वाचा स्वीकार करून भारतात सामाजिक व आर्थिक समानता कशी निर्माण करता येऊ शकेल याविषयी विवेचन केले आहे. भारतीय स्वातंत्र्यलढा म्हणजे अहिंसात्मक व लोकशाही तत्त्वाने घडलेली क्रांतीच आहे. परंतु तत्पुर्वी भारताला पारतंत्र्य का आले याचा वेध घेतला आहे व नव्याने प्राप्त झालेले स्वराज्य कसे टिकवले पाहिजे यावरही लक्ष वेधले आहे. लोकशाही तत्वावर आधारलेली राज्यघटना, मुलभूत हक्क, अस्पृश्यतेचे उच्चाटन, कल्याणकारी सरकारचे उद्दिष्ट याविषयी माहिती दिली आहे.

'डॉलर आणि निर्यात व्यापार'[१३८] हरी माधव नाफडे यांच्या या लेखात, दुसरे महायुद्ध व त्यानंतरचे जागतिक अर्थकारण याचा वेध घेतला आहे. डॉलर टंचाई म्हणजे काय व ती का निर्माण झाली याचा वेध घेतला आहे. या काळात जगात अमेरिका व रशिया या दोन महासत्ता उदयास आल्या. या राष्ट्रांनी आपले आर्थिक पाश दुर्बल देशावर टाकून त्यांना आपल्या पंजाखाली आणण्याचा प्रयत्न चालवला आहे. या दोन्ही राष्ट्राच्या वर्चस्वातून मुक्त होण्यासाठी

प्रत्येक राष्ट्राने आपला निर्यात व्यापार वाढवणे व आयात व्यापार कमी करणे हाच एक उपाय दिसतो व जगातील डॉलर टंचाईवर सुद्धा हाच परिणामकारक उपाय आहे असे लेखक म्हणतो.

'हाय पैसा'[१३९] या के. ना. डांगे यांच्या लेखामध्ये, पैसा व लक्ष्मी हे जरी समान अर्थी शब्द असले तरी त्याचे गर्भित अर्थ अगदी वेगळे आहेत. म्हणून लेखक म्हणतो की, पैसा म्हणजे लक्ष्मी नाही कारण लक्ष्मीची आमची कल्पना फार उदात्त, सात्विक आणि अपार्थिव आहे. लक्ष्मी म्हणजे समृद्धी, सुख, शांति, सौंदर्य, आरोग्य, सद्गुण व मनाची श्रीमंती होय. म्हणूनच लेखक म्हणतो की, भौतिक संपत्तीने दैवी संपत्तीचे संवर्धन झाले तरच तिचा उपयोग; नाही तर तीला काहीच किंमत नाही. 'गांधीजींचा आर्थिक दृष्टीकोन'[१४०] दे. ज. हातेकर यांच्या या लेखात महात्मा गांधीजीचे अर्थशास्त्र प्रचलित पाश्चात्य अर्थशास्त्रीय कल्पनांपासून बरेच भिन्न कसे आहे यावर प्रकाश टाकला आहे. धर्म, राजकारण, न्याय, निती आणि अर्थकारण या शास्त्रातील पृथक्करण गांधीजींना मान्य नाही. ही सर्व तत्वे एकाच जीवनाची अंगे आहेत. नितीशास्त्र आणि अर्थशास्त्र यांची फारकत होऊच शकत नाही. जगात शांतता नांदवायची असेल, सुबत्ता उत्पन्न करायची असेल व सर्वोदयाचे ध्येय गाठावयाचे असेल तर नवे अर्थशास्त्र विकसित करण्याची गरज आहे असेल गांधींना वाटते.

'मुंबई शहरातील दुध पुरवठ्याची अभिनव योजना' या श्रीपाद शंकर नवरे यांच्या लेखामध्ये, मुंबई शहरास शुद्ध, स्वच्छ व सकस दुधाचा पुरवठा करणारे आरे दुध केंद्राची माहिती दिली आहे. मुंबईच्या उत्तरेस सरकारने २० मैल अंतरावर गोरेगाव जवळ आरे येथे प्रचंड दुध वसाहत निर्माण केली आहे. ३५०० एकर क्षेत्रफळाच्या या गौळीवाड्यात ८००० दुभती जनावरे असून रोज ३००० मण दुधाचा पुरवठा त्याद्वारे मुंबईकरांना केला जातो. शास्त्रीय पद्धतीने चालवल्या जाणाऱ्या या दुध केंद्राची माहिती यात देऊन दुग्धव्यवसायास उत्तेजन देण्याचा हेतू साध्य केला आहे.

'राष्ट्रापुढील आजचे महत्त्वाचे प्रश्न' या त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये १५ ऑगस्ट १९५० ला भारतीय स्वातंत्र्यास तीन वर्ष पूर्ण झाली, त्यावेळी भारत सरकारने राष्ट्राच्या विविध समस्या सोडविण्यासाठी किती प्रयत्न केले याची अधिकृत माहिती सरकारी अहवालाद्वारे या लेखमालेत देण्यात आली आहे. या संदर्भाने अन्नधान्य पुरवठा, शेतीची

सुधारणा, उद्योगधंद्याची वाढ, आयात निर्यात व्यापार, शास्त्रीय संशोधन, शिक्षण प्रसार, लष्करी सामर्थ्य, परराष्ट्र धोरण, आर्थिक नियोजन इ. अनेक महत्त्वाच्या विषयावर मांडणी यात केली आहे.

'हिंदुस्थानचे राष्ट्रीय उत्पन्न'[१४१] श्रीपाद शंकर नवरे यांच्या या लेखामध्ये, देशाच्या आर्थिक धोरणाचे नियोजन करण्यासाठी त्या त्या वर्षाच्या आर्थिक उत्पन्नाचा विचार घेणे किती आवश्यक असते यावर भाष्य केले आहे. राष्ट्रात विविध प्रकारे उत्पन्न होणारा माल आणि विविध कामासाठी खर्ची पडणारे श्रम, वार्षिक अंदाजपत्रक तयार करताना करांची विभागणी समाजातील कोणत्या वर्गावर किती असावी, यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रमाण कसे उपयोगी पडते याचे ही महत्त्व विशद केले आहे. राष्ट्रीय नियोजन, राष्ट्रीय उत्पन्न, राष्ट्रीय जमाखर्च, उत्पन्न निश्चित करताना येणाऱ्या निरनिराळ्या अडचणी याचीही या लेखात माहिती दिली आहे.

'आमचे आर्थिक नियोजन यशस्वी कसे होईल'[१४२] या म. के. शेटे यांच्या लेखामध्ये, स्वातंत्र्य उत्तर काळात आर्थिक नियोजनाच्या व औद्योगिक विकासाच्या ज्या प्रचंड योजना सरकारने आखल्या आहेत त्यासंबंधी प्रस्तुत लेखात पद्धतशीर चर्चा करण्यात आली आहे. ग्रामोद्योग व सरकारी उद्योग यांच्या सहाय्याने उद्योगांचे विकेंद्रीकरण केल्यास नियोजन यशस्वी होईल असा लेखकास विश्वास वाटतो. या संदर्भात १९५० चे National Planning Commission, Reglional Planning, विकेंद्रीकरण, ग्रामोद्योग, गांधी योजना, स्वंयमपूर्णता याविषयी लेखकाने माहिती दिली आहे.

'शेतकऱ्यासाठी नवे क्षेत्र'[१४३] गोपाळ गोविंद अधिकारी यांच्या या लेखामध्ये, मार्केट कमिट्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे म्हणजेच उत्पादकाचे कसे कल्याण होईल हे सांगितले आहे. शेतीच्या उत्पादकांना खरा फायदा सहकारी खरेदी विक्री संघामार्फत आपल्या मालाची विक्री करण्यात आहे. तसेच ज्या ज्या ठिकाणी बऱ्याच मोठ्या प्रमाणात उत्पादक आणि व्यापारी यांच्यात देवघेव चालते. अशा व्यापारी केंद्रात मार्केट कमिट्या स्थापन करणे आवश्यक आहे असे लेखक म्हणतो. 'हिंदुस्थानाचा परराष्ट्रीय व्यापार'[१४४] या भास्कर महादेव काळे यांच्या लेखामध्ये, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारताची परराष्ट्रीय व्यापाराची स्थिती कशी बिकट आहे यावर प्रकाश टाकला आहे. हा परराष्ट्रीय व्यापार कसा तुटीचा होत आहे व ही तुट कशी कमी

करता येईल यासंबंधी या लेखामध्ये उपाययोजना सुचवल्या आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या तत्त्वाप्रमाणे आपला व्यापार शक्य तितका समतोल झाल्याशिवाय ही तुट भरून निघणार नाही. त्याचबरोबर उत्पादन खर्च कमी करणे, मालाचा दर्जा सुधारणे, व्यापारविषयक निती कटाक्ष्याने पाळणे, निर्यात वाढवणे इत्यादी उपाययोजना करणे गरजेचे आहे. तर हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार सुकर होईल असे लेखक म्हणतो.

'समाज विकास योजना'[१४५] मो. अ. जोशी यांच्या या लेखात, समाज विकास योजनेची सविस्तर माहिती दिली आहे. भारताच्या सर्वांगीण विकासात खेड्यांच्या विकासाला महत्त्वाचे स्थान असल्यामुळे खेड्याच्या सर्वांगीण सुधारणेसाठी ही योजना अंमलात आणली आहे. या संदर्भात खेडेगावातील समस्या, शेती, दळणवळण, शिक्षण, आरोग्य, मृत जनावरांची विल्हेवाट, आठवड्यांचा बाजार, घरबांधणी याविषयी कार्यक्रम हाती घेऊन सुधारणा कशी करता येईल यावर प्रकाश टाकला आहे.

त्याचबरोबर समाजविकास योजनेचे स्वरूप, नियोजीत खर्च, उद्दिष्ट, ग्रामसेवक पदाचे या योजनेतील महत्त्व, शेती, सहकार, पाणी पुरवठा, आधुनिक अवजारे, बि–बियाणे, खते, पिंकावरील रोग, रोगनाशकद्रव्ये, वृक्षारोपण, जोडधंदे या विषयावर माहिती दिली आहे.

'छोटे उद्योगधंदे व हस्तव्यवसाय'[१४६] या त्र्य. र. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये, देशाची बेकारी नाहिशी करावयाची असेल तर मोठ्या उद्योगधंद्यापेक्षा ग्रामोद्योग पद्धतीचे लहान लहान उद्योग खेडोपाडी काढणे गरजेचे आहे असे लेखक म्हणतो. उत्पादनाची नवनवीन क्षेत्रे शोधून उद्योजकतेस उद्युक्त करण्याचे आवाहन लेखक यात करत आहे. या लघु व हस्तउद्योगाच्या संदर्भात माहिती देताना पंचवार्षिक योजनेचे स्वरूप कसे आहे. कोणत्या धंद्यात किती लोक आहेत, छोटे उद्योगधंदे म्हणजे काय?, त्याचे स्वरूप व त्यास मिळणारे सरकारी संरक्षण व नियंत्रण म्हणजे काय हे स्पष्ट करतो. त्याच बरोबर भारतीय लोकांच्या दारिद्र्याचे खरे कारण, येथील लोकांचा आळस बेफिकिरी व जडता आहे असे सांगून लेखकाने भारतीयांना उद्योजकते साठी आवाहन केले आहे.

'पंचवार्षिक नियोजन' या लेखात त्र्य. र. देवगिरीकर यांनी पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या तीन वर्षाच्या पूर्तीनंतर नियोजन कार्यक्रमांपैकी कोण–कोणते कार्यक्रम पूर्ण झाले, त्यासाठी किती खर्च आला याचे सिंवाहलोकन यात केले आहे. नियोजन कार्यक्रमामध्ये भांडवलाची उभारणी व खर्चाची विभागणी कोणत्या प्रकारे करण्यात आली याची आकडेवारी ही या लेखात दिलेली आहे. तिच्या वरून वाचकांना इ.स. १९५२ साली सुरु झालेल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आर्थिक बाजूची यथार्थ कल्पना येते.

'भारताचे आर्थिक नियोजन' या दि. ब. केरूर यांच्या लेखामध्ये, नियोजन म्हणजे काय?, आर्थिक नियोजन म्हणजे काय? याचबरोबर भारतातील विविध आर्थिक समस्या, बेकारी, उत्पादनातील वाढ, औद्योगिक विकासाची अपरिहार्यता, भांडवल, यंत्रविज्ञान, लहान उद्योग, लहान उद्योगांचे अर्थव्यवस्थेतील स्थान, आर्थिक विकास व सामाजिक उद्दिष्ट इ. मुद्यावर चर्चा केली आहे.

'महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचा आराखडा'[१४७] त्रि. रा. साठे यांच्या या लेखामध्ये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत महाराष्ट्राच्या बाबतीत कोण–कोणत्या विकास कामांचा आराखडा ठरवला आहे, त्याचबरोबर महाराष्ट्रातील औद्योगिक विकासासाठी महाराष्ट्रीयन लोकांच्या स्वभाव वैशिष्ट्यात बदल होणे कसे गरजेचे आहे याविषयी माहिती सांगितली आहे. दैववादीपणा, आळस, निरूद्योगीपणा सोडून उद्योजकतेचा कल वाढविला पाहिजे. आपणास कोणते छोटे मोठे उद्योग करता येतील याकडे लक्ष दिले पाहिजे. याच बरोबर कच्चा माल, पाऊस पाणी, भांडवल पुरवठा, दळणवळण, विद्युतशक्ती, टेक्नीकल व इंजिनिअरिंग शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण केंद्राची उभारणी या गोष्टी कशा करता येतील याविषयी सविस्तर माहिती दिली आहे.

'द्वितीय पंचवार्षिक योजनेतील ग्रामोद्योगाचे स्थान'[१४८] गो. स. कामत यांच्या या लेखामध्ये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये मोठ्या उद्योगधंद्यांबरोबरच लघु उद्योग व ग्राम उद्योगांना विशेष प्राधान्य देण्यात आले होते याची माहिती देण्यात आली आहे. कारण मोठे उद्योगधंदे जीवनमानात त्वरीत सुधारणा घडवून आणण्यास असमर्थ ठरतात. गुंतवलेल्या भांडवलाचे फळ मोठ्या उद्योगात उशीरा मिळते. बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठी मोठे उद्योग फारसे लाभदायक नाहीत. म्हणून नियोजनात समतोलपणा येण्यासाठी भारतातील विशिष्ट

आर्थिक, सामाजिक परिस्थिती लक्षात घेता लघु व कुटीर उद्योगावर भर देणे तितकेच महत्त्वाचे आहे असे लेखक म्हणतो. मानवी क्रय शक्ती वाढवून बेकारीवर मात करणे, जीवनमान सुधारून आर्थिक विकास साधण्यासाठी ग्रामउद्योग किती महत्त्वाचे आहेत हे या लेखातून स्पष्ट होते.

'अन्नधान्याचा प्रश्न व महागाई' या त्र्य. र. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळापासून अन्नधान्याच्या किंमती का वाढल्या, त्याचबरोबर अन्नधान्य उत्पादनात चढ उतार का होत आहे, हे उत्पादन वाढविण्यासाठी काय केले पाहिजे याविषयी माहिती दिली आहे. त्याचबरोबर सहकारी शेती व समाज विकास योजना या गोष्टी यशस्वीपणे अंमलात आल्या तर अन्नधान्याच्या बाबतीतील भारताची दुरावास्था दूर होईल असे लेखकाचे म्हणणे आहे.

'स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील औद्योगिक प्रगती'[१४९] या वा. सी. काळे यांच्या लेखामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १० वर्षाच्या काळात भारताने औद्योगीक क्षेत्रात केवढी आश्चर्यकारक प्रगती केली आहे त्याचा परामर्श घेण्यात आला आहे. या दहा वर्षाच्या अवधीत भारताचे औद्योगिक उत्पादन सरासरी ६०% वाढले असून पेनिसिलिन, रेल्वे, इंजिन, खते, यंत्रसामुग्री, डी. डी. टी, रेल्वेचे डब्बे, रासायनिक उद्योग, आगबोटी असे कितीतरी नवीन उद्योग सुरु करण्यात आले. पंचवार्षिक योजनेच्या दृष्टीने भारताचा हा औद्योगिक विकास किती स्पृहणीय आहे याची कल्पना या लेखावरुन येते.

'गेल्या दहा वर्षातील प्रगतीचे समालोचन–भारतीय शेतीचा विकास' या वा. सी. काळे यांच्या पुढील लेखात स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दहा वर्षाच्या काळात भारतीय शेतीव्यवस्थेमध्ये काय बदल झाले याचा आढावा घेतला आहे. त्या संदर्भात लेखक म्हणतो की, कृषीतील संघटनात्मक व प्रबंधनात्मक दोष दूर करण्याचे प्रयत्न या काळात झाले. तसेच कृषीविषयक उत्पादन वाढविण्याचा, पाणीपुरवठा व पुरनियंत्रणाच्या प्रश्नावर कसे उपाय सुचवले गेले यावरही यात चर्चा करण्यात आली आहे.

'भारताचा व्यापारी विकास' या वा. सी. काळे यांच्या पुढील लेखामध्ये स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या दहा वर्षात भारताने केलेल्या परराष्ट्रीय प्रगतीच्याबाबत आढावा घेतला आहे. फाळणीमुळे भारताच्या व्यापारावर झालेला विघात्मक परिणाम भरुन काढून भारताने जी जोराची वाटचाल केली त्यामुळे भारताचा आर्थिक विकास होण्यास पाठबळ मिळाले. यासंदर्भात भारताच्या दहा वर्षातील व्यापारविषयक विकासाचा आढावा घेताना आयात निर्यात प्रमाण, दळणवळण व कर सुधारणा यांची आकडेवारी सहीत माहिती दिली आहे.

'दुसरी योजना आणि देशापुढील काही आर्थिक प्रश्न'[१५०] या लेखात गो. स. कामत म्हणतात की, पहिले पंचवार्षिक नियोजन संपल्यावर लगेच दुसरे पंचवार्षिक नियोजन लागु करण्यात आले; या काळात वाढलेली महागाई, अन्नधान्य व इतर वस्तुंचा अपुरा पुरवठा यामुळे सर्वसामान्य जनतेची नियोजनावरील श्रद्धा ढासळत चालली आहे. असे असले तरी देशाच्या भावी विकासाचा भक्कम पाया घालण्यासाठी ही योजना जन्माला आली असून ती यशस्वी करण्यासाठी सरकारला जनतेचीही तेवढीच मदत हवी आहे. त्यासाठी लोकशाही नियोजनावरील श्रद्धा टिकली पाहिजे, आर्थिक व प्राकृतिक नियोजन होऊन अर्थव्यवस्था गतिशील झाली पाहिजे, औद्योगिक प्रगती व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली पाहिजे असे विचार या लेखात मांडले आहेत.

'मुंबई राज्यातील शेतीचे उत्पादन' या लेखामध्ये, मुंबई राज्याच्या शेतकी मंत्र्याकडे शेती विषयक एक प्रश्नावली पाठवली होती, या प्रश्नांची जी उत्तरे शेतकी खात्याने पाठवली ती वाचकांच्या माहितीसाठी या लेखामध्ये दिली आहेत. यामध्ये मुंबई राज्याचे दर एकरी दरडोई उत्पादन, अन्नधान्याच्या उत्पादनाचे प्रमाण, व्यापारी पिकांचे प्रमाण, कुळ कायद्याने शेतीच्या उत्पादनावर झालेला परिणाम, मुंबई राज्यातील सर्वात अधिक उत्पादक विभाग, शासनाच्या योजना, जोडधंदे, व्यापारी पिके इ. मुद्यावर सरकारने दिलेली उत्तरे तटस्थपणे दिली आहेत.

'अमेरिकेकडून अधिक डॉलर कसे मिळवता येतील'[१५१] या त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये म्हटले आहे की, भारतास अधिक डॉलर मिळवायचे असतील तर अमेरिकेची सदिच्छा जागृत करणे, तिच्या औदार्याला आव्हान करणे व भारताच्या शांततेच्या ध्येय धोरणाबद्दल तिची खात्री पटवून देणे हा एक मार्ग आहे. याशिवाय निर्यात वाढवणे, आयात कमी

करणे हे आणखी दोन मार्ग आहेत. अमेरिका हा जगातील श्रीमंत देशा आहे. तर हिंदुस्थान गरीब देश आहे. त्यांचे दर मानशी सालीना उत्पन्न जवळजवळ १०,०००/– आहे व आपले ३०० रु. च्या आसपास आहे. इ.स. १९५१ पासून अमेरिकेने आपणास बरीच मदत केली आहे. त्यांच्याकडून धांन्याची पोती आली नसती तर येथे हाहाःकार माजला असता. अमेरिकेकडून आतापर्यंत आपल्याला कर्ज, देणग्या व मदत मिळाली आहे. आपला स्वाभिमान व स्वातंत्र्य आबादीत ठेवून आम्ही ही मदत घेऊ इच्छितो. याशिवाय दुसऱ्या दोन मार्गाचा विशेष अवलंब केल्यास परकीय चलन भारतात येईल याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असून आयात निर्यातीच्या व्यापारात भारताने प्रगती करणे गरजेचे आहे असे लेखक म्हणतो.

'तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचे महत्व' या लेखामध्ये त्र्यं. र. देवगिरीकर यांनी तिसऱ्या योजनेची उद्दिष्टे, ती पुर्ण करण्याचे मार्ग, संकल्पीत खर्च याची माहिती दिली आहे. तिसऱ्या नियोजनात सरकारने पुढील बाबी करावयाचे ठरवले आहे. यात अन्नधान्य स्वयंपुर्णता, पोलाद, कोळसा, रॉकेल, पेट्रोल, वीज यांची वाढ त्याचबरोबर साखरेचे, सिमेटचे, कापडाचे कारखाने व याला लागणारी यंत्रे येथेच तयार करणे, राष्ट्रीय उत्पन्नात दर साल ५% वाढ करणे, बेकारी दुर करण्यासाठी मनुष्य शक्तीचा जास्तीत जास्त वापर करणे, उत्पन्नातील व संपत्तीतील विषमता दूर करणे या गोष्टींचा समावेश आहे. तिसऱ्या नियोजनेत १०,२०० कोटी रुपये खर्च केला जाणार आहे. त्याची गुंतवणूक कशी करणार आहेत याचीही माहिती लेखकाने यात दिली आहे.

'प्रचंड उद्योगांचा देश अमेरिका' या गो. स. कामत यांच्या लेखामध्ये, अमेरिका हा मुळचा शेती प्रधान देश आहे पण एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शेती बरोबर उद्योग धंद्यांनीही तेथे कसे महत्त्व प्रस्थापित केले आहे यावर प्रकाश टाकला आहे. अमेरिकेत मोठ मोठे व अगदी लहान सहान उद्योग कसे देशभर पसरले आहेत यावरही लेखकाने भाष्य केले आहे.

'दुसऱ्या नियोजनाची फलश्रुती'[१५२] या मध्ये त्र्यं. र. देवगिरीकर म्हणतात की, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये चार उद्दिष्टे होती, ती बहुतांश सफल झाली असे म्हणावयास काही हरकत नाही. यामध्ये राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली, औद्योगिकरण यशस्वी झाले बेकारी कमी

करण्याचे उद्दिष्ट तितकेसे साध्य झाले नाही व चौथी गोष्ट म्हणजे सामाजिक विषमता कमी करण्यात काही प्रमाणात यश मिळाले या चारही मुद्यांवर अगदी तपशीलवार चर्चा या लेखात केली गेली आहे.

'पाकिस्तानी अर्थव्यवस्था' या गो. स. कामत यांच्या लेखामध्ये, पाकिस्तानच्या अर्थकाराणात अमेरिकेच्या आर्थिक मदतीचे विशेष स्थान कसे आहे यावर भाष्य केले आहे. त्यामुळे पाकिस्तान सर्वच दृष्ट्या अमेरिकेवर कसा अवलंबून आहे, या गोष्टीचा पाकिस्तानच्या परराष्ट्रीय धोरणावरही परिणाम झाला आहे. या संदर्भाने पाकिस्तानातील अन्नधान्य, वाहतूक दळणवळण, आर्थिक योजना, आयात निर्यात प्रमाण यावर यात चर्चा करण्यात आली आहे.

'चीनचे आक्रमण आणि आर्थिक नियोजन'[१५३] यामध्ये प्र. चि. शेजवलकर यांनी कोणत्याही युद्धाला तोंड देण्यासाठी केवळ रणांगणावरची तयारी पुरेशी पडत नाही तर आर्थिक पाठबळ ही उभे करावे लागते यासंदर्भात आर्थिक नियोजनाचे महत्व स्पष्ट केले आहे. याशिवाय सरहद्दीवरचा संघर्ष हा लवकर संपुष्टात येणारा नसल्यामुळे आपल्याला नेहमीच देशाच्या आर्थिक नियोजनात लष्करी व्यवस्थेला लागणाऱ्या आर्थिक तरतुदीला महत्व दिले पाहिजे असे लेखक म्हणतो.

'भारतातील शेती आणि अन्नधान्य' या प्रा. व. द. देशपांडे यांच्या लेखामध्ये भारताच्या आर्थिक जीवनामध्ये शेती व्यवसाय किती महत्वाचा आहे तरी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या व्यवसायात फारशी प्रगती झालेली दिसत नाही यावर चर्चा केली आहे. राष्ट्रीय उत्पन्नात असणारा शेतीचा वाटा आणि एकूण लोकसंख्येच्या प्रमाणापैकी किती टक्के लोक शेती व्यवसायात गुंतले आहेत याचा विचार या लेखात आला आहे. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा ४०% व शेतीवर अवलंबून असणारा समाज ७२% आहे. त्याचबरोबर लोकसंख्येतही दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्या मानाने अन्नधान्य उत्पादनतही वाढ होत आहे, ही एक समाधानाची गोष्ट आहे. असे लेखक म्हणतो. परंतु अन्नधान्य उत्पादनाचे प्रमाण अजुनही वाढणे आवश्यक आहे असे लेखकाने मत मांडले आहे.

'विकसनशील राष्ट्रातील महागाईचे स्वरुप' या वा. सी. काळे यांच्या लेखामध्ये, अविकसित राष्ट्रे प्रगतिपथावर जात असताना जी महागाई वाढते ती पुष्कळदा आर्थिक विकासासाठी अत्यंत आवश्यक असते असे लेखकास वाटते. वाढती महागाई ही अविकसित राष्ट्राला नेहमी तोट्याचीच ठरते असे नाही. शिक्षण संस्था, सामाजिक संस्था, औद्योगिक संस्थांच्या कार्यामध्ये पैसा खर्च होत असतो; त्यातून महागाई वाढते. या वाढीव महागाईतून आर्थिक विकास घडून येतो. परंतु या महागाईतून ज्या समस्या निर्माण होतात त्याचेही विवेचन या लेखात केले आहे..

'भारतातील कर आणि त्याची आकारणी' या वा. सी. काळे यांच्या लेखामध्ये भारतातील कर व आकरणीचे प्रमाण यावर चर्चा केली आहे. जगातील इतर देशांच्या मानाने भाारतातील करांचे प्रमाण बरेच कमी आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या मानाने ते अधिक आहे. मात्र जागतिक तुलनेने ते कमी दिसत आहे याचे नेमके स्वरुप कसे आहे यावर भाष्य केले आहे. करांचा जास्तीत जास्त भार कोणावर पडतो व त्याचे वितरण कसे होते, राज्य व केंद्र सरकारकडून कोणकोणते कर आकारले जातात याची माहिती यात दिली आहे. याशिवाय कर बुडवेपणाची समस्या याकडेही लक्ष्य वेधले आहे.

### ४.३.३ अर्थविषयक विशेष अंक :–

### औद्योगीक विशेषांक, जानेवारी १९३० :–

या विशेषांकातील 'वैभवशाली हिंदुस्थान' या लेखामध्ये, प्राचीन काळी भारत देश स्वयंमपूर्ण व स्वावलंबी कसा होता, स्वतःच्या गरजा भागवून इतर राष्ट्राच्या गरजा भागवण्याचे काम भारत कसा करत होता, परंतु युरोपीय सत्ता व्यापाराच्या निमित्ताने भारतात स्थायिक झाल्या; त्यावेळी भारताच्या वैभवाला कसे ग्रहण लागले याविषयी माहिती दिली आहे. व्यापारवाद किंवा वाणिज्यवादातून पुढे हळूहळू भारतीय राजकारणात ब्रिटीशांनी प्रवेश मिळवला. राजकीय प्रभुत्व प्राप्त करुन भारताला इंग्लंडची वसाहत कसे बनवले याचा म्हणजेच इंग्लंडच्या भारतातील वसाहतवादी राजकारणाचा धावता इतिहास यामध्ये मांडला आहे.

'पाश्चात्य व्यापाराचे पाश' या लेखामध्ये पोर्तुगीज, स्पॅनिश, डच, इंग्लिश, फ्रेंच या लोकांनी आपआपल्या वखारी कोठे स्थापन केल्या होत्या आणि हिंदुस्थानासोबत त्यांचा कसा व्यापार चालत असे याची माहिती दिली आहे. मुघल बादशहा जहांगिर, शहजहान, औरंगजेब, बहादुर शहा यांच्या काळात या परकीय व्यापारी कंपन्यांना मिळालेल्या सवलती व व्यापार करण्याचे परवाने यावरही प्रकाश टाकला आहे. या युरोपीयन व्यापाऱ्यांमधील आपआपसातील व्यापारी चढाओढ, स्पर्धा याविषयी माहिती दिली आहे.

'उद्योग धंद्याच्या नाशाचा पाया' या लेखामध्ये भारतीय उद्योगधंद्यांचा ब्रिटिश कालखंडात कसा ऱ्हास झाला याची माहिती दिली आहे. लाचलुचपत, कर, अंतर्गत व परदेशी व्यापार, नजराणे या मार्गांनी किती पैसा युरोपात गेला याविषयी यात माहिती दिली आहे. बंगालचे दिवाणी अधिकार मिळाल्यानंतर वासाहतिक शोषणाची प्रक्रिया कशी सुरु झाली यावरही प्रकाश टाकला आहे. खुल्या व्यापाराची अवस्था, पक्क्यामालाची आयात व कच्च्या मालाची निर्यात करणारी बाजारपेठ असे स्वरुप भारताला कसे प्राप्त झाले, उद्योगप्रधान भारत देशास शेती प्रधान कसे बनवले याविषयी चर्चा करण्यात आली आहे.

'ब्रिटिशांनी हिंदुस्थानाचे उद्योगधंदे कसे बुडविले' या लेखामध्ये भारतातील अनुउद्योगीकरणाची प्रक्रिया व कारणे यावर चर्चा केली आहे. भारतात ब्रिटिश काळात नवीन उद्योगधंदे का निघु शकत नाहीत यावरही भाष्य केले आहे. भारताचे राजकीय पारतंत्र्य, जुलुमजबरदस्ती, करव्यवस्था, लुट, कच्च्या मालाची निर्यात, इंग्रजी व्यापाऱ्यांना सवलती, यांत्रिक सुधारणा, धंद्यातील रहस्ये सांगण्याची सक्ती, प्रदर्शने इत्यादी कारणांमुळे भारतात अनुउद्योगीकरण घडले असे या लेखात सांगितले आहे.

याच बरोबर नवे उद्योगधंदे का उभारले जात नाहीत, यावर चर्चा करताना लेखक म्हणतो की, पाश्चात्यांचे भांडवल, वाहतुकीच्या सवलती, बँकांचा फायदा, हुंडणावळणीची सवलत या केवळ पाश्चात्य व्यापाऱ्यांसाठी होत्या. स्वदेशी व्यापाऱ्यांना यातील कोणतीही सवलत मिळत नसे. यामुळे भारताचा औद्योगीक ऱ्हास झाला असे लेखक म्हणतो.

'उद्योगधंदे बुडविण्याचे तीन मार्ग' या लेखात भारतीय उद्योगधंदे ब्रिटिशांनी कोणत्या तीन मार्गाने बुडवले यावर चर्चा केली आहे. ते म्हणजे विलायती कापड स्वस्त केले, देशी कापड अत्यंत महाग केले आणि तिसरी गोष्ट म्हणजे विलायतेत जाणाऱ्या भारतीय कापडाला विलायत बंद केली. भारतात अंतर्गत व्यापारावर कर बसविले आणि परकिय मालासाठी बंदरे मोकळी केली. या तीन मार्गाने आपले उद्योगधंदे बुडवले गेले. याविषयी या लेखात सविस्तर माहिती दिली आहे.

'हिंदुस्थानचे औद्योगीक पारतंत्र्य' या लेखामध्ये, भारतीय उद्योगधंद्यांना आवश्यक कच्चा माल इंग्लंडमधील उद्योगधंद्याला पुरवून ब्रिटिशांनी भारतीय उद्योगधंदे कसे बुडवले, तेथे तयार झालेला पक्का माल पुन्हा भारतात खपावा म्हणून कसे विशेष प्रयत्न करण्यात आले. याची माहिती दिली आहे. सुरत, मुर्शिदाबाद, ढाका या संपन्न शहराच्या दारिद्र्याचे वर्णनही या लेखात केले आहे. भारतास संरक्षक जकातीचे तंत्र अवलंबून भारतीय निर्यात व्यापार कसा बसवला. त्यामुळे भारत पक्क्या मालाची आयात करणारी बाजारपेठ कसा बनला याची माहिती या लेखात दिली आहे.

'औद्योगिक उन्नतीचा विचार' या लेखात ब्रिटिश सत्तेने आपले राजकीय नियंत्रण भारतावर कायम रहावे म्हणून आर्थिक शोषणाचा व क्रुर वसाहतवादी धोरणाचा कसा अवलंब केला याचे चित्रण यात दिले आहे. घटनात्मक सुधारणा मागणाऱ्या भारतीय नेत्यांना असे वाटते आहे की, डोमेनियन स्टेट म्हणजे वसाहतीचे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर औद्योगिक स्वातंत्र्य मिळेल. परंतु जो देश सुई दोऱ्यापासून मोठमोठ्या यंत्रापर्यंत परकीय देशावर अवलंबून आहे त्या देशात राजकीय स्वातंत्र्य मिळाले तरी त्यातून फारसा बदल शक्य नाही असे लेखक म्हणतो. भारताला एका बाजारपेठेचे स्वरुप प्राप्त झाले आहे. कच्च्या मालाची निर्यात व पक्क्या मालाची आयात करणारी ब्रिटिशांची अत्यंत किफायतशीर वसाहत म्हणजे भारत होय. स्वदेशी उद्योगधंद्याना जितकी विघ्ने आणता येणे शक्य आहे तितकी आणण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. या सर्वांतून मार्ग काढण्यासाठी विना सरकारच्या सहाय्याने चालणारे अनेक छोटे मोठे उद्योग स्वबळावर उभारण्याचे आवाहन लेखात केले आहे.

## जागतिक पुनर्घटना अंक, जानेवारी १९४८ :–

या अंकातील 'आर्थिक विकासाचा प्रश्न आणि जनता योजना' या लेखात प्रा. गो. घ. पारीख यांनी देशापुढील निरनिराळ्या योजनेपैकी कामगार फेडरेशन पुरस्कृत जनता योजनेचा सविस्तर आणि सांगोपांग विचार या लेखात केला आहे. आर्थिक नियोजन म्हणजे मुलतः नव्या अर्थव्यवस्थेची उभारणी होय. जुन्या अर्थव्यवस्थेच्या चौकटीत आखलेली केवळ उत्पादन वाढविण्याची योजना नव्हे. त्या अनुषंगाने विविध आर्थिक विकासामधील समस्यांच्या सोडवणूकीसाठी जनता योजना कशी मदत करेल यावर यात सविस्तर मांडणी केली आहे.

'आपला परराष्ट्रीय व्यापार' या स. दा. कोगेकर यांच्या लेखात परराष्ट्रीय व्यापाराची पुनर्घटना हा आपल्या अर्थव्यवस्थेच्या पुनर्रचनेचाच एक भाग आहे यावर विवेचन केले आहे. औद्योगिक प्रगती झपाट्याने व्हावी, रहाणीमान उंचवता यावे हा आर्थिक पुनर्घटनेचा उद्देश असल्यामुळे तो सफल करण्यासाठी परराष्ट्रीय व्यापाराचा उपयोग केला पाहिजे असे लेखकाचे मत आहे. मात्र त्यासाठी वाटेल त्या मालाची वाटेल त्या प्रमाणात निर्यात अथवा आयत करण्याची सवलत देणे योग्य नाही. तर केवळ राष्ट्रीय दृष्टीने व राष्ट्रीय नियोजनाचा एक भाग म्हणून आपल्या गरजा व हित याकडे लक्ष देऊन आपल्या परराष्ट्रीय व्यापाराची पुनर्घटना केली पाहिजे असे लेखक म्हणतो.

'हिंदुस्थानातील बँकाची पुनर्घटना' या व्ही. आर. सोनाळकर यांच्या लेखामध्ये बँक म्हणजे काय? बँकांचा भारतातील ब्रिटिश कालखंडापासूनचा इतिहास, व्यापारी बँका, इंपीरियल बँक, परदेशी बँका, सावकार पेढ्या, यांचे स्वरुप व माहिती दिली आहे. त्याचबरोबर आर्थिक मदत लागणारे लोक, कर्जाची कारणे, व्यापार, उद्योग, आयतनिर्यात, व्यापारात बँकांचे महत्वाचे स्थान विषद केले आहे. त्याचप्रमाणे भारतीयांचे रहाणीमान उंचविण्यासाठी, हिंदी व्यापार, उद्योग, शेतकऱ्याची भरभराट होऊन अर्थव्यवस्था पुढे नेण्यासाठी बँकांची पुनर्घटना करण्याची गरज आहे असे या लेखात म्हटले आहे.

'शेतीचे संयोजन' या व मो. परांजपे यांच्या लेखामध्ये भारतीय शेतीचे उत्पादन का कमी प्रमाणात निघते या कारणांचा वेध घेतला आहे. त्याचबरोबर खंताचा व यंत्रांचा उपयोग

आणि शास्त्रीय शेती पद्धत यांचा अभाव यामुळे उत्पादनावर कसा विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळे शेती किफायतशीर करायची असेल तर सर्व साधनांचा उपयोग करुन तिचे नियोजन केले पाहिजे. त्याला जोड म्हणून लोकसंख्याचेही नियमन झाले पाहिजे तर शेती सुधारेल असे लेखक म्हणतो.

'महाराष्ट्रातील पाणीपुरवठा' के. म. बेडेकर यांच्या लेखात आपला महाराष्ट्र हा सरासरी ४७० मैल दक्षिणोत्तर व १२० मैल पूर्व पश्चिम पसरला असून यातील दोन कोटी ८० लक्ष एकर जमीन लागवडीस लायक आहे. याचबरोबर नऊ लहान मोठ्या नद्या, ओढे, तलाव, पाटबंधारे, विहीरी असून त्यापैकी केवळ साडेतीन टक्के जमिन पाण्याखाली आहे. त्यामुळे शेती पाणीपुरवठ्या अभावी मागास राहिले आहे. यासाठी धरण कालव्याचे प्रमाण वाढवले पाहिजे असे करण्यासाठी नियोजनबद्ध पाणीपुरवठा योजना अंमलात आणणे गरजेचे आहे असे केल्यास महाराष्ट्राचा अन्नधान्याचा प्रश्न नक्कीच सुटेल असे लेखक म्हणतो.

'हिंदुस्थानातील लोखंड व पोलाद धंदा' या शं. वा. किर्लोस्कर यांच्या लेखामध्ये असे म्हटले आहे की, दिल्लीजवळ हजारो वर्षापूर्वी अशोकाने उभारलेल्या लोखंडी स्तंभाकडे पाहून आधुनिक काळातले तज्ञही स्तिमित झाल्यावाचून रहात नाहीत. हा स्तंभ म्हणजे आपल्या अति प्राचीन काळातील पूर्वजांनी लोखंडाच्या धंद्यात मिळवलेल्या उज्ज्वल यशाचे स्मारकच आहे. त्या मुळे या यशाची परंपरा सांभाळण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. लोखंड व पोलाद धंद्यामध्ये भारतीयांनी रस घेऊन प्रगती केली पाहिजे. त्याचबरोबर या लेखात लोखंडाचे प्रकार, त्यापासून केल्या जाणाऱ्या विविध वस्तूंची माहिती, या उद्योगातील अडचणी, सरकारचे धोरण व संरक्षण याची माहिती दिली आहे.

'उद्योगधंद्याचे केंद्रीकरण' यात वसंतराव परांजपे यांनी उद्योगधंद्याच्या केंद्रीकरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्याचा विचार केला आहे. उद्योगधंद्याचे जाळे सगळीकडे पसरल्यामुळे त्याचा विकास जलद होतो असे या लेखात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. बाजारपेठ, कच्चा माल, मजूर, वाहतुक, उत्पादन साधने, जकाती, स्पर्धा, सरकारी सहाय्य, संरक्षण या गोष्टीचा विचार करता औद्योगिक विकेंद्रीकरण किती आवश्यक आहे याची कल्पना यातून येते.

'ग्रामोद्योगाची पुनर्घटना' या अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांच्या लेखामध्ये ग्रामोद्योगाच्या दृष्टीने शेतीबरोबर इतर जोड उद्योगधंदे व पर्यायी उद्योगामध्ये लोकसंख्येचे स्थानांतर झाले पाहिजे असे सुचविले आहे. भारतात शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. त्यातील निम्मी लोकसंख्या त्यातून काढून दुसऱ्या उद्योगधंद्यात समाविष्ट केली पाहिजे. प्रत्येक गाव स्वयंपुर्ण व स्वावलंबी होण्यासाठी शेती व ग्रामीण उद्योगांची पुर्नघटना करणे गरजेचे आहे यासाठी गावातील आर्थिक, सामाजिक व राजकीय घटकांनी एक होणे गरजेचे आहे असे लेखकाला वाटते.

'हिंदी आर्थिक प्रगतीचे राजकारण' या लेखात अ. रा. कामत म्हणतात की, आर्थिक प्रगतीचे राजकारण म्हणजे उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण होय. यामध्ये देशाचे औद्योगीकरण, शेती सुधारणा, जमिनदारी व सावकाराचे निमुर्लन, उत्पादनाची योग्य वाटणी इ. गोष्टी अभिप्रेत आहेत. परंतु त्यासाठी सरकारने राष्ट्रीय प्रगतीचा कार्यक्रम धडाडीने हाती घेतला पाहिजे. देशाची आर्थिक प्रगती साधावयाची असेल तर देशाची अर्थव्यवस्था जनतेसाठी व जनतेच्याच हाती असली पाहिजे असे लेखकास वाटते.

## खास महाराष्ट्र अंक, जानेवारी १९५३ :–

या अंकामध्ये महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीवर लेख देण्यात आले होते. यामध्ये, 'महाराष्ट्राचा औद्योगिक उत्कर्ष कसा होईल?' या शं. वा. किर्लोस्कर यांच्या लेखामध्ये महाराष्ट्रातील पाऊस पाण्याचा तुटवडा व जमिनीचा निकसपणा यामुळे महाराष्ट्राचे आर्थिक भवितव्य उद्योगधंद्याच्या वाढीतच आहे व हे महाराष्ट्राच्या हिताचे आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. यापुढे कारखानदारीच महाराष्ट्राला संजीवनी ठरणार आहे, हे सांगताना औद्योगिक विकासाचा पाया, सरकारी धोरणे व औद्योगीकरण, सरकारचे प्रतिकुल धोरण, जनतेचा उत्साह या विषयाच्या संदर्भाने चर्चा केली आहे.

'महाराष्ट्राच्या उत्कर्षासाठी औद्योगीकरणाची आवशकता उद्योगधंदेच का?' या लेखामध्ये महाराष्ट्रात कोणकोणते उद्योगधंदे सुरु करता येतील या संबंधी प्रश्नोत्तराच्या रुपाने माहिती दिली आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी हा प्रांत आर्थिक, औद्योगीक व

कृषीदृष्ट्या संपन्न झाला पाहिजे. नैसर्गिक व खनिज संपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करुन लहान मोठे उद्योग काढले पाहिजे असे लेखक म्हणतो. 'महाराष्ट्रातील व्यापारी पिके' या प्रा. देवदत्त दाभोलकर यांच्या लेखामध्ये संयुक्त महाराष्ट्राचा एकत्रित विचार करुन महाराष्ट्रातील व्यापारी पिकांची माहिती दिली आहे. संयुक्त महाराष्ट्रात–महाराष्ट्र, महाविदर्भ व मराठवाडा या तीन विभागांचा प्रामुख्याने समावेश होतो. या तीन्ही विभागातील व्यापारी पिकांची कोष्टक रुपाने माहिती दिली आहे. यामधील ऊस, कापूस व भुईमुग या व्यापारी पिकांच्या उत्पादनातून पक्का माल तयार करणारे उद्योग म्हणजेच साखर, कापड, वनस्पती तेल यांचेही प्रमाण वाढले पाहिजे असे लेखक म्हणतो.

'महाराष्ट्रातील साखरेचा धंदा' या गो. गो. अधिकारी यांच्या लेखामध्ये महाराष्ट्राच्या औद्योगीक विकासामध्ये साखर उद्योगाचे फार मोठे स्थान आहे, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. शेतीच्या उत्पादनातून देशाचा आर्थिक व औद्योगिक उत्कर्ष कसा घडवून आणता येतो याचे साखरेचा धंदा हे उत्कृष्ट प्रतीक आहे. महाराष्ट्रात आज या धंद्याची परिस्थिती काय आहे व नियोजनाद्वारे महाराष्ट्र प्रदेशात आणखी धरणे झाली तर या धंद्याचे भवितव्य आणखी उज्ज्वल कसे होईल याचे विवेचन यात केले आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने साखरेची कारखानदारी द्ररिद्री महाराष्ट्राला अनेक प्रकारे कशी उपकारक ठरेल याची चर्चा यात केली आहे.

'महाराष्ट्राची शेती व पिके' या त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये अन्नधान्याच्या स्वयंमपुर्णतेबाबत महाराष्ट्राची स्थिती कशी वाईट आहे, हे आकडेवारीनुसार सांगण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. त्यासाठी इतर प्रांतांच्या अन्नधान्याच्या उत्पादनाचा तुलनात्मक आढावा यामध्ये घेतला आहे. यासंदर्भाने महाराष्ट्राची एकूण लागवडीची जमिन, पिकांचा प्रकार, उत्पादन क्षमता यावर चर्चा केली आहे. तसेच शेतीची सुधारणा कशी करता येईल यावर ही चर्चा केली आहे.

'महाराष्ट्रातील शेतीचे उत्पादन कसे वाढेल' या लेखामध्ये गणेश गोपाळ शेवेकर यांनी आपल्याकडील शेतीत अधिक धान्योत्पादन कसे करता येईल यासंबंधी तुलनात्मक दृष्टीने बहुमोल माहिती दिली आहे. सरकारने सुधारलेली बी–बियाणे, मिक्चर सारखी खते, पेंड

सवलतीच्या दराने देणे, नविन विहीरी बांधणे, जुन्या दुरुस्त करणे, नदीवर बांध बंधारे घालणे, सवलतीच्या व्याजाने व हप्तेबंदीने दिलेली कर्जे फेडण्यास सवलत देणे इ. उपाययोजना करुन उत्पादन वाढवता येईल असे लेखक म्हणतो.

'महाराष्ट्रातील जंगले व औद्योगिक दृष्टीने त्याची उपयुक्तता' या स. रा. गोडबोले यांच्या लेखामध्ये महाराष्ट्रात खनिज संपत्तीप्रमाणे वनसंपत्तीही फारशी नाही; सह्याद्री, सातपुडा या पर्वतांच्या माथ्यावर डांग, नाशिक, ठाणे, खानदेश इ. प्रदेशावर थोडीफार नैसर्गिक 'जंगले' आहेत. औद्योगीक उत्पादनाच्या दृष्टीने त्यातील वनस्पतींचा कितपत उपयोग होण्यासारखा आहे. यासंबंधी सर्व प्रकारची माहिती या लेखात बारकाईने दिली आहे.

## नियोजन विशेषांक, मे १९५७ :–

'द्वितीय पंचवार्षिक योजनेचे आर्थिक वैशिष्ट्ये' या जे. एन. महालनवीस यांच्या लेखामध्ये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची महत्वकांक्षी उद्दिष्टे, बेकारी नष्ट करण्याचा उद्देश, नियोजनावरील खर्च, खर्चाचे नियोजन इ. गोष्टीची सविस्तर माहिती दिली आहे. 'द्वितीय पंचवार्षिक योजनेमार्गे आलेली दृष्टी' या लेखामध्ये म्हटले आहे की, द्वितीय पंचवार्षिक योजनेअंतर्गत सर्वांगीण उन्नती आणि सर्वोदयाच्या उद्दिष्टांचे ध्येय निश्चित केले आहे व त्याद्वारे समाजाची समाजवादी रचना करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्यामुळेच हे पंचवार्षिक आर्थिक नियोजन इतर राष्ट्रापेक्षा वेगळे आहे व हेच त्याचे वैशिष्ट्ये आहे. अशा प्रकारे द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या समाजवादी रुपाचा परिचय करुन देण्याचा प्रयत्न केला आहे.

'द्वितीय पंचवार्षिक नियोजन काही विचार' या न. वि. गाडगीळ यांच्या लेखामध्ये दुसरी पंचवार्षिक योजना यशस्वी करण्यासाठी सर्व स्तरावरील भारतीय जनतेच्या मदतीची गरज आहे असे मत प्रतिपादित केले आहे. प्रगतीचा हा रथ जगन्नाथ रथाप्रमाणे सगळ्यांनी समभावनेने ओढला पाहिजे, सर्व सारखे झाले तर सर्व सुखी होतील हे समाजवादाचे मुख्य सुत्र असून त्याच्या द्वारेच ही योजना यशस्वी होईल असे मत मांडले आहे. समाजवाद म्हणजे आर्थिक, सामाजिक व राजकीय उद्दिष्ट हे आर्थिक समता प्रस्थापित करण्याचे आहे; असे लेखक म्हणतो.

‘दुसरी पंचवार्षिक योजना’ या पां. वा. गाडगीळ यांच्या लेखामध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षात नियोजनाला वेग आला नाही, पण पुढील तीन वर्षात सर्व बाजूने कामाची कशी वाढ झाली व पाचव्या वर्षी नियोजनाचा वेग कसा वाढला, याचा आढावा यामध्ये घेतला आहे. अशा स्थितीत दुसरी पंचवार्षिक योजना काय आहे, तिचे स्वरूप, ध्येय, उद्दिष्टे काय असतील यावर लेखकाने चर्चा केली आहे. राहणीमानाचा दर्जा उंचावणे, यंत्र सामग्रीची उलब्धता, रोजगार, मिळकत व संचित, संपत्तीतील तफावत कमी करणे, आर्थिक समानता आणणे इ. मुद्यांना अनुसरुन दुसऱ्या पंचवार्षिक योजनेवर चर्चा केली आहे. या योजनेच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय पातळीवर सर्वांनी एकत्र येऊन काम पुढे नेले पाहिजे असा विचार मांडला आहे.

‘मध्यमवर्ग आणि नियोजित अर्थरचना’ या स. वा. कोगेकर यांच्या लेखामध्ये एखाद्या देशात शिक्षितांना किती प्रमाणात रोजंदारी उपलब्ध होऊ शकेल हा प्रश्न तेथील अर्थव्यवस्थेची रचना आणि प्रगती यावर कसा अवलंबून असतो याचे विवेचन केले आहे. भारतासारख्या आर्थिक दृष्ट्या अप्रगत समजल्या जाणाऱ्या देशात रोजंदारीची वाढ ही देशाच्या आर्थिक उन्नतीच्या वेगावर आणि पद्धतीवर अवलंबून आहे. मध्यवर्ती सत्तेच्या नेतृत्वाखाली झपाट्याने प्रगती करता आली तरच हा प्रश्न समाधानकारकपणे सुटण्याची आशा आहे असे लेखकास वाटते.

‘मुंबई राज्यातील पाटबंधारे’ या मालोजीराव नाईक निंबाळकर यांच्या लेखामध्ये असे म्हटले आहे की, पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये पाटबंधाऱ्याविषयी योजना हाती घेताना अन्नधान्याच्या वाढीची दृष्टी जशी ठेवण्यात आली होती, ती तशीच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये स्विकारण्यात आली आहे. उन्नधान्याबरोबरच उस, कापुस अशी नगदी पिके वाढवण्याचाही संकल्प करण्यात आला आहे. याचप्रमाणे पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये मोठ्या बागायती योजनांखेरीज छोट्या बागायती योजनेकडेही विशेष महत्व दिले आहे. या साऱ्याच्या यशस्वीतेसाठी १७ नवीन मोठ्या पाटबंधाऱ्याची विविध कामे हाती घेऊन ती पुर्ण झाल्यास ३९ लक्ष एकर जमीन पाणी पुरवठ्याखाली येईल असे लेखकास वाटते.

'योजनेची अर्थव्यवस्था' या ना. अ. माळवेकर यांच्या लेखामध्ये उत्पन्नातील संकल्पित वाढ हा दुसऱ्या योजनेचा गाभा आहे यावर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. त्यामुळे बचत व खर्च याची उभारणी राष्ट्रीय उत्पन्नात अपेक्षित वाढ करेल असे लेखकास वाटते. पहिल्या पंचवार्षिक योजनेमुळे राष्ट्रीय उत्पन्नात १८% वाढ झाली, तर दुसऱ्या योजनेत २५% वाढ होईल अशी अपेक्षा करण्यात आली आहे. चालु शिल्लक, जादा कर, कर्जे, परकीय मदत, बचत, चलनातील वाढ अशा विविध प्रकारांनी दुसऱ्या योजनेची अर्थव्यवस्था कशी संकल्पीत केली आहे याविषयी सविस्तर माहिती दिली आहे.

'दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतील तुटीचा अर्थभरणा' या आ. रा. भट यांच्या लेखामध्ये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतील २५% खर्च भागविण्याकरिता सरकार १२०० कोटीचा तुटीचा अर्थभरणा करणार आहे. चलनी नोटा छापून उत्पन्न आणि खर्च यांच्यातील तफावत भरुन काढण्याच्या या पद्धतीला तुटीचा अर्थभरणा म्हणतात याविषयी माहिती दिली आहे. या मार्गाचा अवलंब करुन आर्थिक नियोजन करणे हा अतिशय कठीण असा महाप्रयोग आहे. हा तोडगा सुचवणे जरी सोपे असले तरी तंत्र अतिशय कठीण आहे. पण मागासलेल्या व अपुरा भांडवल पुरवठा असणाऱ्या आपल्या देशात आर्थिक प्रगती साधायची असेल तर या मार्गाचा अवलंब करण्याखेरीज पर्याय नाही असे लेखकाचे म्हणणे आहे.

'रोजगारीचा प्रश्न' या मध्ये त्र्यं. र. देवगिरीकर म्हणतात की, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात बेकारी निवारण्याचा प्रश्न हा सर्वात कठीण प्रश्न असून तो सोडविण्यासाठी विशिष्ट वातावरणाची आवश्यकता आहे. व ते वातावरण समजुतदारपणा, सहनशीलता व सदिच्छा यानीच निर्माण होईल. मात्र त्या करता राष्ट्रीय दृष्टी असायला हवी असे लेखकाचे मत आहे. कारण राष्ट्रीय दृष्टीच्या आभावी मोठ मोठ्या योजनाही निरोपयोगी ठरण्याचा संभव असतो असे लेखकाचे मत आहे.

'करांच्या उत्पन्नाचा अंदाज' या गो. स. कामत यांच्या लेखामध्ये म्हटले आहे की, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी लागणाऱ्या द्रव्याची तरतुद करण्यासाठी सरकारने जे मार्ग अवलंबिले आहेत यामध्ये करवाढ हा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे अर्थशास्त्रीय दृष्ट्या कराला विरोध करणे अप्रायोजकपणाचे होईल, पण त्यात विषमता असता कामा नये.

धनिकांवरही त्याचा योग्य भार पडला पाहिजे. त्याचप्रमाणे करांच्या उत्पन्नातील बहुतेक भाग जो सरकारी अनुउत्पादक बाबीवर खर्च होतो त्यावर नियंत्रण घालणे आवश्यक आहे. असे लेखकाचे मत आहे उत्पन्नाच्या साधनांची योग्यप्रकारे मांडामांड करुन त्याचा योग्य वापर कसा करता येईल याविषयी मांडणी केली आहे.

**योजना विशेषांक, जानेवारी १९५८ :–** यामध्ये 'मुंबई राज्य व दुसरी योजना' या त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या लेखामध्ये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमुळे मुंबई राज्याचे स्वरुप निश्चित बदलेल असे लेखकास वाटते. कारण मुंबई राज्याच्या वैभवशाली प्रगतीसाठी उत्पादन वाढीच्या, औद्योगिकीकरणाच्या व सर्वांगीण विकासाच्या विविध योजना आखण्यात आल्या आहेत. त्या जसजश्या अंमलात येतील तसतसा जीवनमानाचा दर्जा सुधारला जाईल व बेकारीचे निर्मुलन होईल. पण त्यासाठी प्रत्येकाने कष्ट केले पाहिजेत असे लेखकास वाटते. राष्ट्राच्या उत्कर्षात आपला उत्कर्ष अशी भावना यात समाविष्ट असणे गरजेचे आहे याविषयी यात माहिती दिली आहे.

'छोट्या उद्योगधंद्यांचा विकास' या आ. रा. भट यांच्या लेखामध्ये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये लहान उद्योगधंद्याना प्रोत्साहन देण्याचे धोरण ठरविले आहे व त्यासाठी खास तरतुदही देण्याचे धोरण ठरविले आहे व त्यासाठी खास तरतुदही करण्यात आली आहे. औद्योगिक क्षेत्रात मक्तेदारी उत्पन्न होऊ नये म्हणून लहान उद्योगांना उत्तेजन देणे आवश्यक असते याविषयी सविस्तर विचार मांडले आहेत. मुंबई सरकारने आपल्या दुसऱ्या नियोजनात छोटे उद्योगधंदे, ग्रामोद्योग, कुटीर उद्योग यांचा समावेश केला असून त्यांच्या वाढीच्या व संवर्धनाच्या योजना आखल्या आहेत. या योजनांचा विकास कोणत्या प्रकारे करता येईल याचा खोलवर विचार या लेखात केला आहे.

'आर्थिक प्रगतीसंबंधाने काही विचार' या पां. वा. गाडगीळ यांच्या लेखामध्ये, अर्थ संघटना ही समाजवादी धोरणावर उभारली पाहिजे याविषयी विचार मांडला आहे त्यासंदर्भात शेतीतील सहकार तत्व हे समाजवादाचेच कसे दुसरे रूप आहे याची माहिती दिली आहे. राजकीय लढा कसाही चालु ठेवा, पण शेती क्षेत्रात सहकार आणण्याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनीच अवलंबली पाहिजे असे लेखक म्हणतो.

'मुंबई राज्याचा शेतीविषयक कार्यक्रम' या प्र. चिं. शेजवलकर यांच्या लेखामध्ये दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतील शेतीच्या योजनेचे यश साध्य करण्याकरिता प्रत्यक्ष शेतकऱ्यांनी तितकेच कष्ट घेण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या जीवनाचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर केवळ उत्पादन वाढ होण्यासंबंधीचे कार्यक्रम आखून भागत नाही. शेती खेरीज अन्य रीतीने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या व्यापक योजना आखल्या पाहिजेत व त्या कार्यवाहीत आणल्या पाहिजेत असे लेखक म्हणतो.

'विदर्भाचा कृषी विकास' या वा. सी. काळे यांच्या लेखामध्ये, विदर्भातील कृषी विकास हा विशाल मुंबई राज्यातील एका घटकाचा विकास आहे, संबंध प्रांताच्या एकंदर प्रगतीबरोबर विदर्भाची प्रगती व्हायची असेल तर ह्या प्रदेशातील लोकांनी एकत्र येऊन येथील योजना आखल्या पाहिजेत व आपली अस्मिता जागृत ठेवून आपले हक्क शाबूत राखले पाहिजेत व आपल्या भूप्रदेशाकडे सरकारला लक्ष देण्यास भाग पाडले पाहिजे असा विचार मांडला आहे.

## अन्नधान्य विशेषांक, जानेवारी १९६५ :-

यामध्ये 'भारताची अन्नधान्याची समस्या कशी सुटेल' या त्र्यंबक शंकर महाबळे यांच्या लेखामध्ये अन्नधान्याच्या उत्पादनातील समस्या, नैसर्गिक कारणे, मानवनिर्मित कारणे यांचा वेध घेतला आहे. यामध्ये पाऊस व पाण्याची उपलब्धता, जमिनीची स्थिती, जमिनीची धुप, पिकांवरील कीड, स्वाभाविक रोग ही नैसर्गिक कारणे सांगितली आहेत. त्याचबरोबर मानवनिर्मित कारणांमध्ये लोकसंख्या वाढ, जमिनीची विभागणी, तुकडीकरण, अन्नधान्यापेक्षा नगदी पिके घेण्याकडे वाढणारा कल, लागवडीची विषम विभागणी यावर उपाय सुचवले आहेत. सरकारी उपाययोजनेविषयी मत मांडताना पिकांचा साठा, रेशनिंगची संकल्पना सकरारी कोठारे व अन्नधान्याची प्रत्यक्ष शेतकऱ्याकडून विक्री या विषयी सविस्तर माहिती दिली आहे.

'अविकसित राष्ट्रातील अन्नधान्यांचा प्रश्न' या वि. म. दांडेकर यांच्या लेखामध्ये, बहुतेक विकसनशील देशात अन्न पोषण मूल्य कमी प्रतीचे असते कारण त्यांचे दारिद्र्य होय. यासंदर्भात युनेस्कोच्या अन्न व शेतकी संघटनेने (FAO)प्रसिद्ध केलेल्या निरनिराळ्या

देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न हे दरडोई दररोजच्या अन्नातून मिळणाऱ्या कॅलरी, दरडोई प्राणिज प्रथिने यांचा संबंध दर्शविणारी माहिती दिली आहे. व त्यामुळे भारताचा अन्नधान्याचा प्रश्न किती महत्वाचा व कठीण आहे यावर लक्ष वेधले आहे. 'भारतातील अन्नधान्याचा यक्ष प्रश्न' या प्र. चि. शेजवलकर यांच्या लेखामध्ये अन्नधान्याच्या टंचाईची कारणे, पंचवार्षिक योजनेतील उपाय योजना, समाज विकास योजना, बी. बियाणे, खते, शास्त्रशुद्ध शेतकी, शिक्षण, पाणीपुरवठा, कृषी बँका, पतपेढ्या, लोकसंख्या, चलनवाढ या विविध विषयावर चर्चा केली आहे.

'अमेरिकेत अन्नधान्यांची संपन्नता का?' या का. म. गावस्कर यांच्या लेखात अमेरिकेच्या अन्नधान्यांच्या स्वयंपुर्णतेची व स्वावलंबीपणाची विविध कारणे सांगितली असून यामध्ये निसर्गाचे वरदान, लागवडीयोग्य विस्तृत जमिन, पाण्याची उपलब्धता, प्रयत्नवादी मानव, शेतकी संशोधन, तंत्रज्ञानाचा विकास व अंमलबजावणी, सरकारी सहाय्य इ. वर चर्चा केली आहे. 'ब्रिटनमधील शेती व अन्नधान्य' यामध्ये ब्रिटन हा उद्योग प्रधान देश असला तरी ब्रिटनच्या लोकांना लागणाऱ्या एकूण अन्नधान्यापैकी निम्मे धान्य तो स्वतः निर्माण करतो, या संदर्भात माहिती दिली आहे. या संदर्भात तेथील जमीन, हवामान, जमीनीवरील संबंध, पिकांचे प्रकार, गवताची जमीन, खर्च व प्राप्ती या मुद्यांवर चर्चा केली आहे. 'भारताचा अन्नधान्याचा प्रश्न' या त्र्यं. र. देवगिरीकर यांच्या लेखात भारतातील अन्नधान्याच्या समस्यांचा वेध घेतला असून त्या संदर्भात भारतातील एकूण लागवडीखालील जमीन, पिकांचे विशेषीकरण, नगदीपिकांचे वाढते प्रमाण, धान्य विक्रीची सदोष प्रक्रिया, सरकारी धोरण या विविध मुद्यांवर चर्चा केली आहे.

## उत्पादकता विशेषांक, १९६६ :-

यामधील 'उत्पादकतेचा घटक' या लेखात पद्मभूषण श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांच्या मुलाखतीची माहिती देण्यात आली आहे. या मुलाखतीमध्ये खाजगी उद्योग व वैयक्तिक प्रयत्न हे औद्योगिकरणाचा वेग कसे वाढवू शकतील व आधुनिक दळणवळण व संपर्काच्या सोयी सरकारने उपलब्ध करुन देण्यात पुढाकार घेतला पाहिजे, उद्योगधंदे काढण्यासाठी जनतेला

प्रोत्साहित करणाऱ्या योजनाही आखल्या पाहिजेत. अशा विविध मुद्यावर किर्लोस्करांनी मत मांडले आहे.

'उत्पादकतेबाबत व्यावहारिक दृष्टि' या वसंतराव वैद्य यांच्या मुलाखतीमध्ये उत्पादकतेच्या संकल्पनेत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या मालक, सरकार व कामगार या तीन घटकांच्या सहसंबंधवर चर्चा केली आहे. तसेच सरकारने राष्ट्रीय उत्पादक मंडळे स्थापन केली पाहिजेत. उत्पादक तंत्राची नवी माहिती उद्योजकांनी मिळवली पाहिजे व श्रमिकांनी आपल्या श्रमाची कर्तव्य भावना जागृत ठेवली पाहिजे, याविषयी आपले विचार मांडले आहेत.

'उत्पादकता व भारताचे अन्नधान्य स्वावलंबन' या आ. रा. भट यांच्या लेखामध्ये भारताच्या अन्नधान्याच्या स्वयंमपूर्णतेमध्ये कोणकोणते अडथळे आहेत यावर चर्चा केली आहे. यामध्ये मानव निसर्गाचा किती घातक आहे याविषयी माहिती दिली आहे. त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञान व प्रशिक्षण, भांडवल व साधनसामुग्री या गोष्टी अडचणींवर मात करण्यासाठी कशा उपयोगी पडतील याविषयी चर्चा केली आहे. 'उत्पादकता आणि ग्राहक' या प्र. चि. शेजवलकर यांच्या लेखामध्ये उत्पादकता व ग्राहक यांच्या सहसंबंधांवर भाष्य केले आहे. सामान्य नागरीक उत्पादकतेकडे कसे बेपर्वाइने पाहतात, हे चुकीचे आहे. आपण ग्राहक सुद्धा आहोत त्यामुळे उत्पाकतावाढीचे फळ आपल्या सुद्धा पदरात पडणार आहे, याचा विचार मांडला आहे. याचबरोबर विदेशामध्ये ग्राहकास राजा संबोधले जाते. त्याविषयी महत्त्व प्रतिपादित करताना लेखक म्हणतो की, आपल्या देशात उत्पादकता ही ग्राहकाबाबत जागृति निर्माण करु शकेल. 'छोट्या धंद्याची उत्पादकता' या वि. म. देवल यांच्या लेखामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये लघु उद्योगास असणारे महत्वाचे स्थान यावर चर्चा केली आहे. या लघु उद्योगधंद्याच्या व्यवस्थापकांनी उत्पादकतेच्या तंत्राचा अभ्यास करणे गरजेचे आहे, याविषयी यात सविस्तर माहिती दिली आहे.

'उत्पादकतेचा कानमंत्र' या श्री. ग. बापट यांच्या लेखात उत्पादकता म्हणजे काय व यामध्ये साधनसामग्रीचा पुर्ण वापर करुन पैशाचा अनाठायी व्यय टाळणे व कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन करणे या गोष्टी कशा अभिप्रेत आहेत यावर चर्चा केली आहे.

उत्पादकतेविषयी जागृती करण्यासाठी उत्पादक मंडळे स्थापन करुन याविषयी साहित्यानिर्मितीही करणे गरजेचे आहे असे लेखकास वाटते.

## ४.४ समारोप :–

चित्रमय जगतमध्ये छापले गेलेले सामाजिक लेख हे भारतीय सामाजिक संस्था संकल्पनाविषयी अभिमान बाळगणारे होतेच पण त्याबरोबर काळ आणि बदललेली परिस्थिती पहाता त्यातील अनुकूल बदलांचा स्वीकार करण्यासाठी प्रोत्साहन देणारे होते.

यामधील बोधप्रद सामाजिक इतिहास लेखनामधून पारतंत्र्यातील भारतीयांच्या आळशी, निरोद्योगी व कुपमंडुप वृत्तीवर हल्ला केला गेला. जोमाने स्फुर्तीने राष्ट्रकार्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केलेले दिसते. तरुण पिढीच्या तारुण्यावस्थेतील विविध समस्यावर भाष्य करुन त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी घरातील जेष्ठांनी एकत्र आले पाहिजे. तरुणांची नैतिकता उंचावून त्यांना राष्ट्र कार्यासाठी व समाजधर्माचे पावित्र्य टिकवण्यासाठीच कुंटुंब व्यवस्थेचा जन्म झाला आहे, या हेतूने यात लेख छापले गेले आहेत. सुधारणांविषयीच्या लेखांमध्ये सुधारणेचा व्यापक अर्थ सांगून युरोपीयन व भारतीय सुधारणेची तुलनात्मक चिकित्सा केली आहे.

अनिष्ठ रुढी, हुंडाप्रथा, मद्यपान, बुवाबाजी यासारख्या विषयावरील लेखांमधून या वाईट प्रथांना विरोध करणारे लिखाण झाले आहे. या अनिष्ट चालींमुळे मानवाचे सामाजिक, नैतिक, कौटुंबिक, आर्थिक, शाररिक नुकसान होऊन अप्रत्यक्षपणे देशाच्या अधोगतीला कसा हातभार लागतो याविषयाकडे लक्ष वेधले आहे. हिंदुधर्मीयामध्ये ऐक्य संवर्धन करणारे व तरुण वर्गास राष्ट्रकार्यासाठी उद्युक्त करणारे लेखन यात झाले आहे. लोकसंख्या वाढ आणि नियमन, वाढती बेकारी या समस्यावरही मार्मीक भाष्य यात झाले आहे.

मध्यमवर्ग हा समाजाच्या नैतिक उभारणीमध्ये महत्वपूर्ण भूमिका निभावणारा सामाजिक वर्ग आहे. त्याच्या घटत्या प्रमाणाबद्दल चिंता व्यक्त करणारा लेखही यात छापला गेला. हिंदु सामाजिक कायद्यांमध्ये स्थलकाल परिस्थितीनुरुप काल बाह्य ठरलेली वचने त्याग करुन अनुकूल बदल घडवणारी पुर्नघटीत कलमे स्वीकारली पाहिजेत याविषयीही लेखन झालेले दिसते.

अशा प्रकारे बोधपर सामाजिक लेखनामधून महाराष्ट्रीयांना उद्योगी, महत्वकांक्षी, धर्म व राष्ट्रभक्त, समाजसेवी होण्याचे मार्गदर्शनपर विचार मांडले आहेत. व्यसने, अनिष्ट रुढी परंपरा, इतर सामाजिक समस्या यांना यशस्वी तोंड देण्यासाठी मार्मीक सल्लेही यात दिले आहेत. तरुणपिढी ही राष्ट्राची खरी शक्ती असल्याने तरुणांना समाजकार्य व राष्ट्रकार्य यासाठी उद्युक्त करणारे लिखाणही यात मोठ्या प्रमाणात झालेले दिसते. बदलत्या काळाबरोबर अनुकूल बदल स्विकारुन सामाजिक पुर्नघटनेस आवाहन करणारे लिखान यातून झालेले दिसते.

वर्ण, जातिव्यवस्थेवर अनेक लेख यात छापले गेले. प्राचीन वर्णव्यवस्थेच्या कर्मसिद्धांतावर आधारीत संरचनेचा जोरदार पुरस्कार यामधून झालेला दिसतो. त्याचबरोबर उत्तर काळात जन्माधिष्ठीत व ताठर बनलेल्या वर्णव्यवस्थेच्या स्वरुपाबद्दल चिंता व्यक्त करणारे लिखाणही यात झाले आहे. प्राचीन काळापासून भारतीय समाजव्यवस्थेच्या संस्था संकल्पनांची उत्क्रांती किती शास्त्रीय पद्धतीने झाली होती हे दर्शवणारे लेखन यामध्ये झालेले दिसते.

जातिभेद, अस्पृश्यता या अनिष्ट सामाजिक प्रथांमुळे भारतीय समाज कसा हीणकस बनला आहे या कारणांमुळेच भारतावर पारतंत्र्याची वेळ आली आहे त्यामुळे या समस्याची सोडवणूक करुन राष्ट्रकार्यासाठी एकत्र आले पाहिजे किंवा या समस्या सोडविल्याशिवाय भारतीयांच्यात ऐक्य निर्माण होणार नाही व राष्ट्रकार्यही साधले जाणार नाही असे लेखक म्हणतो.

अशाप्रकारे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य असणाऱ्या वर्णजातिव्यवस्थेवर साधक बाधक चर्चा करुन त्यातील दोष काढून राष्ट्रहीताचे आवाहन यात केले आहे.

विवाहविषयक लेखांमध्ये विवाह ही भारतीय समाजातील अत्यंत महत्वाची पवित्र सामाजिक संस्था म्हणून तिचे महत्व प्रस्थापित करणारे लेखन यामधून झालेले दिसते.

याचबरोबर सगोत्र विवाह, असवर्ण किंवा मिश्र विवाह, आंतरजातीय विवाह याबद्दल अनुकूलता दाखवणारे लेख यात छापले गेले. विवाह या भारतीय समाजातील महत्वाच्या संस्थेमुळे भारतीय समाजाची नैतिकता व पावित्र्यता कशी टिकून आहे याविषयीचे यात लेख

छापले गेले. प्राचीन आर्य काळापासून, जुनाट रानटी परंपरेपासून ते आधुनिक प्रेम विवाह, आंतरजातिय विवाहापर्यंत भारतीय विवाहसंस्थेची वाटचाल दाखवण्याचा प्रयत्न यात झालेला दिसतो.

स्त्रीविषयक लेखामध्ये स्त्रीचे स्वातंत्र्य, अधिकार, हक्क या संदर्भात प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत झालेल्या स्थित्यंतराचा वेध घेणारे लेख चित्रमय जगतमध्ये छापण्यात आले. स्त्री स्वातंत्र्य याविषयावर साधक बाधक चर्चा करणो लेख यात छापले गेले. स्त्री शिक्षण, वारसा हक्क, याविषयी अनुकूलता दर्शविणारे लिखाण यात झालेले दिसते. स्त्रीविषयक समस्या, वेश्या व्यवसाय, पाश्चात्य संस्कृतीतील बंधमुक्त स्त्रीया, त्यांची व्यसने, निराशा यामुळे तेथील ढासळलेली नैतिकता, निर्माण झालेले सामाजिक प्रश्न यावर यात चर्चा करणारे लिखाण झाले आहे. यासंदर्भात स्त्रीचा गुणगौरव करणारे लिखाणही यात झाले आहे.

शिक्षणविषयक लेखामधून प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंतच्या भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या वाटचालीचा आढावा घेणारे लेख यात छापण्यात आले. त्याचबरोबर ब्रिटिश कालीन भारतीय शिक्षण व्यवस्था, त्यातील दोष, समस्या यावर भाष्य करणारे व उपाय सुचवणारे लेखनही यात झालेले दिसते. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीविषयी गौरवपुर्ण भाष्य करणारे लेखन यात झाले आहे. याचबरोबर परकीय देशातील शिक्षण पद्धतीतून आपणास कोणत्या चांगल्या गोष्टी स्वीकारता येतील याविषयावर लक्ष केंद्रीत करणारे लेखनही यात झाले आहे. राष्ट्रवर्धन करणाऱ्या नितीमान विद्यार्थी तरुण वर्गावर भाष्य करणारे लेखनही यात झाले आहे.

थोडक्यात बदलत्या परिस्थितीमध्ये आधुनिक काळात शिक्षण व्यवस्थेतील ध्येय धोरणांमध्ये कोणते अनुकूल बदल होणे अपेक्षित आहे, यावर यात मार्गदर्शन करणारे लेख चित्रमय जगतने प्रकाशित केले आहेत.

परकीय देशांमधील समाज व्यवस्थेवर भाष्य करणारे लेखन यात करण्यात आले. यामध्ये इतर देशातील सामाजिक समस्या, समाज व कुटुंब व्यवस्थेचे विघटन, स्त्री स्वैराचार, त्यातून घसरलेली सामाजिक नैतिक पातळी, अल्पसंख्याक व वर्णद्वेषाचे स्वरुप समस्या, विस्कळीत सामाजिक संरचना यावर भाष्य करणारे लेखन झाले आहे. थोडक्यात परकीय

देशातील विविध सामाजिक समस्यांचा बोध घेऊन आपली समाजव्यवस्था, तिचे पावित्र्य व नैतिकता टिकवण्यासाठी काय केले पाहिजे याविषयी मार्गदर्शन यातून झालेले दिसते.

चित्रमय जगतमधून व्यक्ती चरित्रावर आधारीत लेख मोठ्या प्रमाणात छापले गेले. प्राचीन भारतीय कर्तबगार राज्यकर्त्यापासून ते आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये महत्वपुर्ण भूमिका निभावणाऱ्या अनेक थोर संतपुरुष, समाजसुधारक, उद्योजक, राष्ट्रीय पुढारी यांची चरित्रे यात छापली गेली. त्याचबरोबर आधुनिक काळामध्ये जागतिक राजकारणात महत्वपूर्ण भूमिका निभवणाऱ्या परकीय देशातील नेते, पुढारी, राजकारणी यांचेही चरित्र लेख यात छापले गेले. स्वातंत्र्यपूर्व आणि उत्तर काळातील आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये या चरित्र पुरुषांकडून प्रेरणा, मार्गदर्शन, स्फुर्ती मिळून राष्ट्रकार्याच्या सिद्धीसाठी त्याचा उपयोग व्हावा या हेतुने हे लिखाण केले गेले.

आरोग्य विषयक लेखही यामध्ये मोठ्या प्रमाणात छापले गेले. विविध आरोग्यविषयक समस्याविषयी जागृती करणारे लेख यात होते. विविध रोग, त्याची लक्षणे, स्वरुप, निर्मितीची कारणे, उपाय, प्रतिबंधात्मक उपाय यावर तज्ञ डॉक्टरांचे लेख यात छापून येत असत. भारतीय आयुर्वेदशास्त्राची महती सांगणारे लेखही यात छापले गेले. तारुण्यातील लैंगिक समस्या, कुटुंबनियोजन, ग्रामीण भागातील मलमुत्र विसर्जनावर सुचविलेले उपाय आजही उपयोगी पडणारे आहेत. अशा प्रकारे स्वतंत्र भारताच्या प्राप्तीसाठी व प्राप्तीनंतर निरोगी, सुदृढ, आरोग्यवान, बलवान भारत बनविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शनपर लेख यात छापले गेले.

धार्मिक विषयावर आधारित अनेक लेख यात छापले गेले. यामध्ये हिंदु धर्माभिमान, हिंदुधर्माची वैशिष्ट्ये, तत्वज्ञान, अद्वैत स्वरुप इ. विषयावर माहिती देणारे लेख छापले गेले. काळानुसार आचार धर्मामध्ये अनुकूल बदल करण्यास प्रोत्साहन देणारे लेखही यात छापले गेले. धर्म हा राष्ट्र उभारणीमध्ये किती महत्वपूर्ण आहे, अशा विचारावर लक्ष केंद्रीत करणारे लेख छापले गेले.

याशिवाय ईश्वराचे अस्तित्व, जन्म, पुर्वजन्म, ज्योतिषविद्या, मूर्तीपुजा या वादातीत विषयावर आणि धर्मांतर व धर्मशुद्धीवर अनेक लेख छापले गेले. वारकरी संप्रदाय, पंढरीचा

विठ्ठल, विविध संत, भक्तीमार्ग, स्वामी रामदास समर्थ यांच्या विषयीही अनेक लेख छापले गेले. प्राचीन भारतीय धर्म ग्रंथ, स्मृती, पुराणे, भगवतगीता, वेदसाहित्य यांच्या उच्च साहित्य प्रतिभेवर आणि तत्वज्ञानावर भाष्य करणारे लेखन यात झाले. जैन व बौद्ध धर्मावर माहिती देणारे लेखनही यात मोठ्या प्रमाणात झालेले दिसते. हिंदु धर्माच्या सद्यस्थितीवर भाष्य करणारे व त्यातील अनुकूल बदलास प्रोत्साहन देणारे लेखही यात छापले गेले.

थोडक्यात भारतीय हिंदु धर्म, त्यातील महान तत्वे, विविध संप्रदाय, संतमहंत, तत्वज्ञान, धर्म साहित्य याविषयी गौरवशाली परंपरा सांगणारे लेखन यात केले गेले. उदात्त आध्यात्मिक भावनेने विकसित झालेल्या हिंदुधर्माच्या प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंतच्या स्थित्यंतराचा आढावा यात घेतला आहे. त्याचबरोबर हिंदु धर्मातील आचरण तत्वातील कालबाह्य तत्वाच्या परिवर्तनास मान्यता देणारे लेखन यात झालेले दिसते.

अर्थविषयक लेखन हे चित्रमय जगतमधील महत्वपूर्ण अंग आहे. बरेच अर्थपुर्ण व विवेचक आर्थिक लेखन यामधून झालेले दिसते. स्वातंत्र्य पूर्वकालीन आर्थिक लेखनामध्ये ब्रिटिशांचा वसाहतवाद, भारताचे आर्थिक शोषण, अनुउद्योगीकरण, वाणिज्यवादी तत्वज्ञान यावर भाष्य करणारे लेखन यात मोठ्याप्रमाणावर झाले. त्याचबरोबर पारतंत्र्यातील भारतीयांना नव उद्योगीकरणास प्रोत्साहन देणारे, आर्थिक राष्ट्रवाद निर्माण करणारे, स्वदेशी व बहिष्कार चळवळीस पोषक असे लिखाण यामधून झालेले दिसते.

ब्रिटिश अंमलाखाली सरकारी सहाय्य दुर्लभ असल्याने त्यांच्या सहाय्याशिवाय कोणकोणते उद्योगधंदे करणे भारतीयांना शक्य आहे अशा उद्योगधंद्यांची माहिती देणारे लेख यात छापण्यात आले. याचबरोबर परकीय देशातील व्यापार उद्योगाची माहिती देणारे व त्याद्वारे भारतीयांच्या उद्योजक जाणिवा निर्माण करणारे लेखनही यात मोठ्या प्रमाणात झाले.

स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या नविन आर्थिक जीवनावर भाष्य करणारे लेख छापले गेले. यामध्ये समाजविकास योजना, पंचवार्षिक योजना, आर्थिक पुनर्घटना यावर आधारित विषयाचे विशेष अंक चित्रमय जगतने प्रसिद्ध केले होते. हिंदुस्थानचा परराष्ट्र व्यापार, लघु उद्योग, ग्रामोद्योग यांची माहिती देणारे लेखही मोठ्या प्रमाणात छापले गेले. याचबरोबर

अन्नधान्य टंचाई, महागाई, बेकारी इ. समस्याचा वेध घेणारे चिकित्सक लेख यात छापले गेले. शेती, पाणीपुरवठा यावर भाष्य करणारे लेखही यात छापले गेले. अशा प्रकारे स्वातंत्र्य पूर्वकाळापासून स्वातंत्र्य उत्तरकाळापर्यंत भारतीय आर्थिक जीवनातील पुनर्घटनेचा आढावा यात घेतला गेला आहे.

**तळटीपा :-**

१. चित्रमय जगत, सप्टेंबर १९१३, पृ.३२९.

२. चित्रमय जगत, जुलै १९१५, पृ.३२८.

३. चित्रमय जगत, जुन १९२२, पृ.२४०.

४. चित्रमय जगत, जानेवारी १९२९, पृ.५.

५. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९३४, पृ.४४३.

६. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९५९, पृ.४३५.

७. चित्रमय जगत, जुन १९४०, पृ.२३७.

८. चित्रमय जगत, एप्रिल १९४०, पृ.१६१.

९. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९४०, पृ.३९७.

१०. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९६४, पृ.४३०.

११. चित्रमय जगत, जुन १९१८, पृ.२३२.

१२. चित्रमय जगत, सप्टेंबर १९३८, पृ.३१०.

१३. चित्रमय जगत, एप्रिल १९६१, पृ.१६९.

१४. चित्रमय जगत, जुलै १९१३, पृ.२७४.

१५. चित्रमय जगत, ऑगस्ट १९२४, पृ.३२५.

१६. चित्रमय जगत, ऑगस्ट १९१९, पृ.३३३.

१७. चित्रमय जगत, मार्च १९१८, पृ.११७.

१८. चित्रमय जगत, जानेवारी १९२२, पृ.१६.

१९. चित्रमय जगत, सप्टेंबर १९२१, पृ.३२९.

२०. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९३८, पृ.२६७.

२१. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९३८, पृ.५०६.

२२. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९५९, पृ.४२१.

२३. चित्रमय जगत, सप्टेंबर १९६०, पृ.३८१.

२४. चित्रमय जगत, ऑगस्ट १९६६, पृ.३६९.

२५. चित्रमय जगत, एप्रिल १९१५, पृ.२०३.

२६. चित्रमय जगत, मे १९२३, पृ.२०९.

२७. चित्रमय जगत, सप्टेंबर १९२३, पृ.३३५.

२८. चित्रमय जगत, मे १९३४, पृ.१९२.

२९. चित्रमय जगत, मे १९३९, पृ.१९६.

३०. चित्रमय जगत, जून १९३९, पृ.२६३.

३१. चित्रमय जगत, जून १९४३, पृ.११५.

३२. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९४१, पृ.१०१.

३३. चित्रमय जगत, मार्च १९४०, पृ.१०१.

३४. चित्रमय जगत, एप्रिल १९४०, पृ.१४५.

३५. चित्रमय जगत, एप्रिल १९४०, पृ.१६०.

३६. चित्रमय जगत, जून १९३९, पृ.२४८.

३७. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९२६, पृ.४७६.

३८. चित्रमय जगत, डिसेंबर १९२०, पृ.४५४.

३९. चित्रमय जगत, जुलै १९१४, पृ.३२७.

४०. चित्रमय जगत, मे १९३९, पृ.२०१.

४१. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९४१, पृ.४५१.

४२. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९१६, पृ.५३८.

४३. चित्रमय जगत, एप्रिल १९४१, पृ.१५५.

४४. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९१६, पृ.१.

४५. चित्रमय जगत, एप्रिल १९१७, पृ.१६१.

४६. चित्रमय जगत, जानेवारी १९१८, पृ.९.

४७. चित्रमय जगत, सप्टेंबर १९३४, पृ.३७५.

४८. चित्रमय जगत, ऑगस्ट १९३१, पृ.३०५.

४९. चित्रमय जगत, ऑगस्ट १९३२, पृ.३७०.

५०. चित्रमय जगत, ऑगस्ट १९५४, पृ.३७२.

५१. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९६४, पृ.४२३.

५२. चित्रमय जगत, जून १९२८, पृ.२६७.

५३. चित्रमय जगत, जून १९२४, पृ.२५०.

५४. चित्रमय जगत, मार्च १९३६, पृ. ११९.

५५. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९२६, पृ.४७७.

५६. चित्रमय जगत, सप्टेंबर १९४३, पृ.२४५.

५७. चित्रमय जगत, ऑगस्ट १९४३, पृ.२१८.

५८. चित्रमय जगत, जानेवारी १९१४, पृ.९.

५९. चित्रमय जगत, ऑगस्ट १९१७, पृ.३३७.

६०. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९२३, पृ.९२.

६१. चित्रमय जगत, मार्च १९२०, पृ.१३१.

६२. चित्रमय जगत, जुलै १९२७, पृ.२०७.

६३. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९३९, पृ.४५०.

६४. चित्रमय जगत, जून १९६३, पृ.२६४.

६५. चित्रमय जगत, एप्रिल १९३२, पृ.१९४.

६६. चित्रमय जगत, मे १९६३, पृ.३२१.

६७. चित्रमय जगत, मार्च १९२०, पृ.१३४.

६८. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९४४, पृ.३१६.

६९. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९५६, पृ.४४५.

७०. चित्रमय जगत, मे १९६६, पृ.२०७.

७१. चित्रमय जगत, एप्रिल १९२२, पृ.१४६.

७२. चित्रमय जगत, जून १९२७, पृ.२५६.

७३. चित्रमय जगत, जानेवारी १९२५, पृ.१६.

७४. चित्रमय जगत, जानेवारी १९१७, पृ.११.

७५. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९६०, पृ.७१.

७६. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९१९, पृ.३९०.

७७. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९१५, पृ.५१७.

७८. चित्रमय जगत, सप्टेंबर १९३५, पृ.३९५.

७९. चित्रमय जगत, एप्रिल १९३५, पृ.१७३.

८०. चित्रमय जगत, डिसेंबर १९६७, पृ.६४७.

८१. चित्रमय जगत, मार्च १९६०, पृ.१५५.

८२. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९६३, पृ.१०९.

८३. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९३३, पृ.३४०.

८४. चित्रमय जगत, मे १९३४, पृ.२२९.

८५. चित्रमय जगत, जानेवारी १९१५, पृ.१.

८६. चित्रमय जगत, एप्रिल १९१५, पृ.१८२.

८७. चित्रमय जगत, मार्च १९१७, पृ.१०७.

८८. चित्रमय जगत, मार्च १९३६, पृ.१०९.

८९. चित्रमय जगत, ऑगस्ट१९४३, पृ.२२४.

९०. चित्रमय जगत, सप्टेंबर १९४३, पृ.२५९.

९१. चित्रमय जगत, जानेवारी १९१५, पृ.३०.

९२. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९१५, पृ.६०.

९३. चित्रमय जगत, जानेवारी १९२४, पृ.३२.

९४. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९२८, पृ.९३.

९५. चित्रमय जगत, जून १९३९, पृ.२७१.

९६. चित्रमय जगत, ऑगस्ट१९३७, पृ.३५९.

९७. चित्रमय जगत, मे १९१४, पृ.२१५.

९८. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९२०, पृ.३६९.

९९. चित्रमय जगत, मार्च १९१४, पृ.१२७.

१००. चित्रमय जगत, जुलै १९३४, पृ.२८२.

१०१. चित्रमय जगत, जुलै १९३४, पृ.३००.

१०२. चित्रमय जगत, जून १९२७, पृ.२४२.

१०३. चित्रमय जगत, जानेवारी १९२९, पृ.१.

१०४. चित्रमय जगत, जानेवारी १९२२, पृ.२६.

१०५. चित्रमय जगत, जानेवारी १९२०, पृ.१.

१०६. चित्रमय जगत, डिसेंबर १९३६, पृ.४२७.

१०७. चित्रमय जगत, जानेवारी १९१७, पृ.७.

१०८. चित्रमय जगत, एप्रिल १९१७, पृ.१८७.

१०९. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९२६, पृ.३८१.

११०. चित्रमय जगत, सप्टेंबर १९२६, पृ.२३८.

१११. चित्रमय जगत, ऑगस्ट१९३४, पृ.३२४.

११२. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९३५, पृ.६७.

११३. चित्रमय जगत, जून १९५६, पृ.१७३.

११४. चित्रमय जगत, जून १९५७, पृ.२८४.

११५. चित्रमय जगत, जून १९५८, पृ.२९७.

११६. चित्रमय जगत, एप्रिल १९२१, पृ.२४२.

११७. चित्रमय जगत, जून १९२१, पृ.२६९.

११८. चित्रमय जगत, एप्रिल १९२३, पृ.१८९.

११९. चित्रमय जगत, एप्रिल १९२९, पृ.१५३.

१२०. चित्रमय जगत, एप्रिल १९१६, पृ.१९७.

१२१. चित्रमय जगत, जानेवारी १९२०, पृ.४१.

१२२. चित्रमय जगत, जून १९२०, पृ.२२५.

१२३. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९२०, पृ.३६७.

१२४. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९२२, पृ.३६२.

१२५. चित्रमय जगत, जानेवारी १९२७, पृ.३९.

१२६. चित्रमय जगत, ऑगस्ट१९२७, पृ.३६३.

१२७. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९२८, पृ.९८.

१२८. चित्रमय जगत, डिसेंबर १९२९, पृ.५७०.

१२९. चित्रमय जगत, जून १९३०, पृ.२५७.

१३०. चित्रमय जगत, ऑगस्ट१९३१, पृ.३६४.
१३१. चित्रमय जगत, जानेवारी १९३४, पृ.१७.
१३२. चित्रमय जगत, ऑगस्ट१९३४, पृ.३४४.
१३३. चित्रमय जगत, एप्रिल १९३५, पृ.१७९.
१३४. चित्रमय जगत, सप्टेंबर १९३५, पृ.३१७.
१३५. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९३५, पृ.४५५.
१३६. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९४३, पृ.२२७.
१३७. चित्रमय जगत, जानेवारी १९५०, पृ.२७.
१३८. चित्रमय जगत, मे १९५०, पृ.२४९.
१३९. चित्रमय जगत, ऑगस्ट१९५०, पृ.४०८.
१४०. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९५०, पृ.५१२.
१४१. चित्रमय जगत, सप्टेंबर १९५१, पृ.४४६.
१४२. चित्रमय जगत, मार्च १९५१, पृ.१४३.
१४३. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९५२, पृ.५३१.
१४४. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९५३, पृ.४६२.
१४५. चित्रमय जगत, डिसेंबर १९५३, पृ.५४३.
१४६. चित्रमय जगत, सप्टेंबर १९५४, पृ.४२२.
१४७. चित्रमय जगत, जून १९५५, पृ.३०६.
१४८. चित्रमय जगत, जानेवारी १९५६, पृ.१७.
१४९. चित्रमय जगत, एप्रिल १९५८, पृ.१७३.
१५०. चित्रमय जगत, मे १९५९, पृ.२१३.
१५१. चित्रमय जगत, मे १९६०, पृ.२३७.
१५२. चित्रमय जगत, १९६१, पृ.५४१.
१५३. चित्रमय जगत, जानेवारी १९६४, पृ.२७.

*****

## प्रकरण–५

# चित्रमय जगतमधील सांस्कृतिक लेखन

५.१ प्रस्तावना

५.२ चित्रमय जगतमधील चित्रे

- ५.२.१ छायाचित्रे
- ५.२.२ रेखाचित्रे

५.३ चित्रमय जगतमधील कथा

५.४ चित्रमय जगतमधील कविता

५.५ चित्रमय जगत मधील नाट्यलेखन

५.६ चित्रमय जगत मधील जाहिराती

५.७ समारोप

## प्रकरण–५

# चित्रमय जगतमधील सांस्कृतिक लेखन

### ५.१ प्रस्तावना :–

संस्कृती ही एक भौतिक संकल्पना आहे, त्याचबरोबर ती एक वैचारिक मुल्य असणारी संकल्पना आहे. या संस्कृतीचा निर्माता मानव आहे. मानवाने सुख, आनंद, समाधान मिळविण्यासाठी संस्कृतीची निर्मिती केली. यासाठी निसर्गावरही वर्चस्व निर्माण केले आणि विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भौतिक संस्कृतीस निर्माण केले. आपल्यातील विकार, षडरिपु यांना काबुत ठेवण्यासाठी आध्यात्मिक कल्पनारम्य जीवन मानवाने तयार केले त्यातून धर्माचा उदय झाला. सामाजिक संस्थांचा उदय झाला. त्याचबरोबर सामाजिक व नैतिकमुल्यांच्या कल्पनाही विकसित झाल्या. या सर्व विवेचनावरुन डॉ. इरावती कर्वे या थोर विदुषीने केलेली संस्कृतीची व्याख्या अतिशय समर्पक वाटते. त्या म्हणतात मनुष्य समाजाची डोळ्याला दिसणारी भौतिक व वस्तुरुप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमन सृष्टी म्हणजे संस्कृती होय.

बुद्धीचे, ज्ञानाचे संक्रमण करण्याची शक्ती मानवाला लाभली आहे. त्यामुळे संस्कृतीचे कारकत्व मानवाकडे जाते. संस्कृती ही अमुर्त कल्पना आहे. तिला स्थल कालाचे बंधन नसते. ही एक अविरत चालणारी प्रक्रिया आहे. संस्कृती ही शाश्वत असते. यामध्ये 'भाषा' ही संस्कृती चे मुख्य साधनही आहे आणि संस्कृतीचे वाहनही आहे. स्थल, काल परत्वे संस्कृतीचे उपप्रकार आणि विशेषीकरणही झालेले दिसते. उदाहरणार्थ मानवी संस्कृती, घराण्याची संस्कृती, वैदिक संस्कृती, हिंदु संस्कृती इत्यादी. संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण केले जाते. अशावेळी तिच्या मुळ स्वरुपात बदल होऊन क्रिया प्रतिक्रिया व परिवर्तन घडून येते. अशा प्रकारे संस्कृती ही परिवर्तनवादी आहे असेही म्हणता येते.

संस्कृतीमध्ये मानवाच्या उपजिविकेची साधने, खानपान, वेशभूषा, भाषा, साहित्य, चित्र, शिल्प, नृत्य, संगीत इत्यादी जीवन व्यवहारांचा समावेश होतो. सांस्कृतिक इतिहासामध्ये प्राचीन कालखंडापासून आधुनिक कालखंडापर्यंतचा मानवी संस्कृतीचा विकास आणि स्थित्यंतर

कसे झाले याचा वेध घेतला जातो. स्थल कालपरत्वे संस्कृतीमध्ये जे विशेषीकरण व विभाजन झालेले दिसते त्यांचाही अभ्यास सांस्कृतिक इतिहासामध्ये केला जातो. या इतिहासाची साधने भौतिक व लिखित स्वरुपात उपलब्ध आहेत. यांचा अभ्यास करुन संस्कृती या विषयावर समग्र व्यापक अभ्यास करणे शक्य आहे.

चित्रमय जगत हे मासिक आधुनिक महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यपूर्व व उत्तर कालीन जीवनाचे प्रतिनिधित्व करते. या काळात महाराष्ट्राची सांस्कृतिक वाटचाल कशी झाली असावी हे समजून घेण्यासाठी चित्रमय जगत मासिक एक साधन म्हणून अभ्यासण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. चित्रमय जगतमधील कथा, कविता, नाटक विषयीचे लेख, जाहिराती आणि विशेष म्हणजे चित्रमय जगतमधील चित्रे यामधून तत्कालीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अंगावर कसा प्रकाश पडतो, हे सांगण्याचा प्रयत्न 'चित्रमय जगतमधील सांस्कृतिक लेखन' या प्रकरणात केला आहे.

## ५.२ चित्रमय जगतमधील चित्रे :–

चित्रमय जगतमधून प्रसिद्ध होणाऱ्या चित्रांमध्ये छायाचित्रे आणि रेखाचित्रे असे दोन भाग दिसतात. छायाचित्रामध्ये व्यक्तीचित्रे, स्थल वास्तुचित्रे, नाट्यचित्रे, युद्धा विषयक चित्रे, विशेष छायाचित्रांचा समोवश होतो. तर रेखाचित्रामध्ये इतिहासविषयक आणि पौराणिक रेखाचित्रे, विनोदी चित्रे, विशेष रेखाचित्रे (मुखपृष्ठाची चित्रे) आणि कथाचित्रे यांचा समावेश होतो.

### ५.२.१ छायाचित्रे :–

### स्वातंत्र्य लढ्यावर आधारित छायाचित्रे :–

भारताच्या राजकीय इतिहासातील अत्यंत महत्वाची व प्रदीर्घ काळ चाललेली राजकीय चळवळ म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढा होय. ब्रिटिशांच्या परकीय अंमलाखाली असणाऱ्या भारतीयांना स्वातंत्र्य प्राप्त करुन घेण्यासाठी जो विविध पातळीवर संघर्ष करावा लागला त्या संदर्भाची सचित्र माहिती या मासिकात छापली गेली. भारतीय राष्ट्रीय सभा, तिच्या विविध परिषदा, राष्ट्रीय सभेचे पुढारी, राष्ट्रीय सभेची विविध आंदोलने यांची सचित्र माहिती यात मिळते. देशी विदेशी राजकारणामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या व राजकीय कुटुंबाशी

संबंधीत असणाऱ्या अनेक व्यक्तींची छायाचित्रे चित्रमय जगतमधून प्रसिद्ध झाली होती. यामध्ये प्रथम भारतीय स्वातंत्र्ययुद्धामध्ये महत्वपूर्ण कामगिरी बजावलेल्या व्यक्तीमत्वाची चित्रे स्वातंत्र्यचळवळीच्या सचित्र इतिहासामध्ये मोठ्याप्रमाणात देण्यात आली.

'दक्षिण अफ्रिकेतील लढा'[१] या लेखाअंतर्गत बॅ. गांधी यांचे ट्रान्सवाल येथील छायाचित्र आणि द. अफ्रिकेमतील निःशस्त्र प्रतिकार करणाऱ्या स्त्रियांचे छायाचित्र देण्यात आली होते. 'राष्ट्रीय सभेचे ध्येय'[२] या लेखामधील लॉर्ड कर्झन, दादाभाई नौरोजी, न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळकृष्ण गोखले, मिस अनिबेझंट, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, सर फिरोजशहा मेथा (मेहता), लाला लजपतराय, लॉर्ड मोर्ले, लॉर्ड मिंटो, मि. ह्युम यांची छायाचित्रे, इंडियन होमरुलचा सेंट्रल ग्रुप यांचा फोटो' यामध्ये रा. बापट, देशपांडे, ज. स. करंदीकर, लो. टिळक, रा. खापर्डे, न. चि. केळक, रा. मुंजे, रा. वैदय, रँ. परांजपे, रा. ओगले व रा. देसाई यांचे फोटो आहेत. तसेच 'स्वातंत्र्ययुद्धात पडलेले बळी' यामध्ये सविनय कायदेभंगाच्या चळवळीत कैद व शिक्षा झालेल्या पुढाऱ्यांची सचित्र माहिती दिली आहे. यामध्ये शं. द. देव, ना. दा. सावरकर, सरोजीनी नायडू, बाळु काका कानिटकर, अब्बास तय्यबजी, त्र्यं. र. देवगिरीकर, वा. वि. साठे, अ. वि. काळे, गिरीनारायण तसेच महात्म गांधींच्या अटकेबद्दल निषेध प्रदर्शित करण्याकरता मुंबईस निघालेल्या मिरवणुकीचा फोटो यात दिला आहे. 'कौन्सिलवर बहिष्कार' या लेखामध्ये, राष्ट्रीय सभेने पास केलेल्या असहकारितेच्या ठरावाला अनुसरुन कौन्सिलमध्ये जाण्याचे रद्द करणाऱ्या व्यक्तींचे फोटो यात दिले आहेत. यामध्ये भिमराव गोपाळराव रिट्टी (शिर्डी), गजानन रामकृष्ण भिडे (जळगाव), डॉ. लोहकरे (पुणे), गोविंददासजी मालपाणी (जबलपूर), हनमंतराव देसाई (धारवाड), एच. एस. लिमये (पुणे) यांचा समावेश होतो. तसेच महमुदाबादचे राजेसाहेब मुंबई मुस्लीम लीग परिषदेचे अध्यक्ष याचा फोटो महत्वपूर्ण आहे.

'पुण्यातील कायदेभंगाची मोहिम' या शिर्षकाखाली पिकेटिंग विरुद्ध पुण्याचे कलेक्टर यांनी जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यास न जुमानता पुण्यातील ज्या पुढाऱ्यांनी कायदेभंग केला त्यांची छायाचित्रे यात देण्यात आली होती. त्यामध्ये शि. म. परांजपे, न. चि. केळकर, लक्ष्मण बळवंत भोपटकर, दा. वि. गोखले, डॉ. गणपतराव हार्डीकर, विश्वासराव डावरे, वि. ग. केतकर यांचा यात समावेश होता.

'१९२३ च्या विविध परिषदांचे अध्यक्ष'[३] यामध्ये डॉ. मुरलीला – काँग्रेसचे स्वागताध्यक्ष, गणेश विद्यार्थी – कानपूर काँग्रेसचे चिटणीस, सरोजिनी नायडू– ४० व्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष, पं. मोतीलाल – काँग्रेसचा ठराव पास केला, ताराबाई दीक्षित– काँग्रेस स्वयम सेविका प्रमुख, पुरुषोत्तम टंडन– संयुक्त प्रांत प्रांतिक काँग्रेस कमिटी अध्यक्ष, मोरेश्वर जोशी– कलकत्ता प्रागतिक परिषदेचे अध्यक्ष, स्वामी श्रद्धानंद–कानपूर येथील अस्पृश्य परिषदेचे अध्यक्ष, बाबुराजेंद्र प्रसाद– कानपूर कायस्थ परिषदेचे अध्यक्ष, टि. सी. गोस्वामी– स्वयंमसेवक परिषदेचे अध्यक्ष, न. चि. केळकर– हिंदु सभा वाचनालय परिषदेचे व संस्कृत परिषदेचे अध्यक्ष, भास्कर जाधव– अमरावती अस्पृश्य निवारक परिषदेचे अध्यक्ष, प्रो. हॉनिलटन– मद्रास आर्थिक परिषदेचे अध्यक्ष, रविंद्रनाथ टागोर–तत्वज्ञान परिषद कलकत्ता याचे अध्यक्ष', सरला देवी चौधराणी– कलकत्ता सामाजिक परिषदेच्या अध्यक्ष, अलबर्ट हावर्ड– मुंबई येथील हिंदी शास्त्रीय परिषदेचे अध्यक्ष, यांचे फोटो छापण्यात आले. याशिवाय 'मद्रास काँग्रेस फोटो' यामध्ये मद्रास काँग्रेसच्या कार्यकारणीच्या सर्व लोकांचे फोटो छापण्यात आले.

'काँग्रेसचे अध्यक्ष'[४] या लेखामध्ये इ.स. १८८५ पासून इ.स. १९३४ पर्यंतच्या सर्व काँग्रेसच्या अध्यक्षांचे फोटो देण्यात आले होते. यामध्ये उमेशचंद्र बॅनर्जी, सर विल्यम बेडरबर्न, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, फिरोजशहा मेहता, शंकर नायर, गोपाळ कृष्ण गोखले, रमेशचंद्र दत्त, विशन नारायण धार, दिनशा वाच्छा, नारायणराव चंदावरकर, रा. व. मुधोळकर, सर सत्येंद्र सिंह, भुपेंद्रनाथ बसू, ॲनी बेझंट, लाला लजपतराय, बाबू अंबिका चरण मुजुमदार, मदन मोहन मालवीय, मोतीलाल नेहरु, नवाब सय्यद महमद बहादूर, सय्यद इमाम, देशबंधू चितरंजन दास, म. गांधी, डॉ. अन्सारी, श्रीनिवास अय्यंगार, सरोजिनी नायडू, हफीम अजमलखान, मौ. महमद अली, वियज राघवाचरियर, वल्लभभाई पटेल इ. अध्यक्षांची छायाचित्रे दिली आहेत.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा सचित्र इतिहास ऑगस्ट १९४७ च्या अंकात देण्यात आला, त्याचे शिर्षक 'स्वतंत्र्यता' असे होते. यामध्ये भारताचे राष्ट्रचिन्ह अशोक स्तंभ, मं. गांधी, पं. नेहरु, नेताजी सुभाषचंद्र बोस, मौलान अबुल कलाम आझाद, उमेशचंद्र बॅनर्जी, ना. गोखले, अरविंद बाबु, मदनमोहन मालविय, प. मोतीलाल नेहरु, अल्ली बंधु, वल्लभभाई पटेल, राजेंद्रप्रसाद, राजगोपालचार्य, आचार्य कृपलानी, कैलासनाथ कटजू, बिपिनचंद्र रॉय,

जयरामप्रसाद, दौलतराम, मंगळदास पकासा, बॅ. जीना, बाळासाहेब खेर, डॉ. अन्सारी, डॉ. आंबेडकर, अब्दुल गफारखान, पट्टाभि सितारामय्या, स्वामी श्रद्धानंद, लाला लजपत राय, विजयालक्ष्मी पंडित, सरोजीनी नायडू, प्रफुल्लचंद्र घोष, आचार्य नरेंद्र देव, श्यामप्रसाद मुखर्जी, काकासाहेब गाडगीळ, शंकरराव देव, माधवराव आणे, भुलाभाई देसाई, क्रिप्स ॲटली, माऊँटबॅटन, पॅथिक लॉरेन्स, विनायक सावरकर, भगतसिंग, मदनधिंग्रा, राजगुरु, अच्युत पटवर्धन, जयप्रकाश नारायण व डॉ. लोहिया यांची छायाचित्रे या अंकात देण्यात आली होती.

याशिवाय 'शिरोडा सत्याग्रहातील जखमी स्वयंमसेवक'[५] हे छायाचित्र, गोलमेज परिषदेला जातानाचे विलायतेतील महात्मा गांधीजीचे छायाचित्र'[६] त्या विशिषट घटनेचा इतिहास डोळ्यासमोर आणतात. स्वातंत्र्योत्तर कालीन भारतीय राजकारणातील चित्रांमध्ये 'दिल्लीतील स्वातंत्र्य उत्सव' हे छायाचित्र महत्वाचे आहे. यानंतर म. गांधी यांच्या हत्येनंतर त्यांचा खास अंक मार्च १९४८ मध्ये काढण्यात आला. यामध्ये त्यांची अंत्ययात्रा, महारोग्यांची शुश्रुषा करताना गांधीजींची छायाचित्रे, शोकसभा, त्यांच्या हस्ताक्षराची विविध पत्रे, तसेच राजकीय जीवनातील विविध घटना प्रसंगाचे त्यांचे फोटो देण्यास आले होते.

स्वतंत्र भारताचे मंत्रीमंडळ, विविध खात्याचे अधिकारी व राज्याचे राज्यपाल यांची छाया चित्रेही देण्यात आली होती. '१९६२ च्या निवडणुकीमध्ये यशस्वी झालेले मुख्यमंत्री' यामध्ये महाराष्ट्राचे यशवंतराव चव्हाण, बंगालचे विधनचंद्र रॉय, आसामचे विमलप्रसाद चालिया मद्रासचे कामराज नाडर, राजस्थानचे मोहनलाल सुखाडिया व म्हैसुरचे वि. डी. जत्ती या मुख्यमंत्र्यांची छायाचित्रे व सचित्र माहित दिली होती. जुलै १९६४ च्या जवाहरलाल नेहरु यांच्या विशेष अंकामध्ये बालवयातील नेहरु, कुटुंबासमवेत नेहरु, नेहरुंचे निकटचे सहकारी यामध्ये पटेल, राजेंद्रप्रसाद व राजगोपालचारी यांच्या समवेत काढलेली छायाचित्रे, विविध देशाचे अध्यक्ष, परराष्ट्र मंत्री यांच्या बरोबर काढलेले फोटो यांचा समावेश आहे.

पाकिस्तान युद्धात अपुर्व कामगिरी केलेले हिंदी वैमानिक, भारताची लष्करी ताकद दाखवणारी छायाचित्रे, रणगाडे, विमाने यांची छायाचित्रे जाने १९६६ च्या अंकात देण्यात आली होती. याशिवाय पाकिस्तानी युद्धात महत्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या हिंदुस्थानच्या लष्करी अधिकाऱ्यांची सचित्र माहितीही यामध्ये देण्यात आली होती. अशाच प्रकारची छायाचित्रे भारत

चीन सीमा संघर्षाच्याविषयी काढलेल्या खास अंकात दिली होती. यामध्ये भारत व चिनी लष्करी अधिकाऱ्यांची सचित्र माहिती दिली होती.

याशिवाय भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील विविध संस्थानाचे संस्थानिक, त्यांचे विवाह समारंभ, पदवी दान समारंभ यानिमित्ताने अनेक छायाचित्रे चित्रमय जगतमध्ये छापण्यात आली. भोर संस्थानचे श्रीमंत पंतसाहेब सचिव, सांगली संस्थानचे श्री राजाभाऊ राजवाडे ग्वाल्हेर, जामखेडी संस्थान अप्पासाहेब पटवर्धन, इंदुर संस्थानचे श्रीमंत तुकोजी होळकर,जत संस्थानचे प्रमुख या संस्थानिकांची छायाचित्रे चित्रमय जगत मासिकाने प्रसिद्ध केली होती.

## पहिल्या, दुसऱ्या महायुद्धाशी निगडित छायाचित्रे :-

पहिले व दुसरे जागतिक महायुद्ध हे जागतिक इतिहासातील महत्वपुर्ण घटना आहेत. या महायुद्धात युरोप खंडातील राष्ट्रांबरोबर आशिया खंडातील अनेक राष्ट्रांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग घेतला होता. दोन्ही महायुद्धात इग्लंडचा सक्रीय सहभाग होता. त्यामुळे त्यांच्या अंमलाखालील भारत देशही या युद्धात ओढला गेला होता. याच काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळ गतीमान अवस्थेत पोहचली होती. त्यासंदर्भानेही स्वातंत्र्य लढ्याच्या पार्श्वभूमीवर युद्धविषयक घडामोडींनाही महत्व प्राप्त झाले होते. सुशिक्षित भारतीयांचा युद्धकालीन जागतिक बातम्या वाचण्याकडे कल वाढलेला दिसतो. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात चित्रमय जगतचा खप विक्रमी वाढून २० हजारापर्यंत पोहचल्याचा उल्लेख चित्रशाळेचा इतिहास या पुस्तकात मिळतो.

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धातील घडामोडींची सचित्र माहिती देणारे सदर चित्रमय जगतमध्ये सुरु करण्यात आले होते. 'युद्धविषयी देखावे' असे त्याचे नाव होते. यामध्ये 'कुके कुकची उपयुक्तता' या लेखात सैनिकांना लपुन छपून करावयाच्या हालचालींची माहिती सचित्र दिली आहे. 'समुद्रावरील सुरुंगाचे जाळे' या चित्रामध्ये जलयुद्धामध्ये सुरुंगाचे जाळे कसे पेरावे या विषयी चित्रे देण्यात आली आहेत. तसेच युद्धाच्या काळात विविध देशाच्या लष्करी हालचाली व लष्कराची ताकद दाखवणारी छायाचित्रेही मोठ्या प्रमाणात छापली गेली. यामध्ये लष्करी अधिकाऱ्यांची सचित्र माहिती देण्यात आली होती. यासंदर्भात 'सिंगटौ काबीज करणारे

जपानी जलसेनानी व स्थल सेनानी'[७] यामध्ये ले. ज. कामिओ, व्हॉ. ॲ. टी. काटो या जपानी लष्करी अधिकाऱ्यांची छायाचित्रे आहेत.

युद्धामध्ये भुयारी मार्ग व चर आत्मबचावासाठी व लष्करी साहित्याच्या सुरक्षेसाठी कशा प्रकारे खांदतात याचीही यात चित्रे दिली आहेत. फ्रान्सची लष्करी तयारी व लष्करी अधिकारी यांची माहिती देणारा लेख यात छापला गेला, तो म्हणजे 'फ्रेंच सेनापती जोफ्रे व इतर सेना नायक'[८] हा होय. या लेखातील चित्रावलीत जनरल जोफ्रे, ज. फ्रॅकेट, डी. एस्पेरे, ज. फोच, ज. मॅनूरी, ज. रसेल, ज. डी. लग्ली–डी–कॅरी यांचा समावेश होतो.

तुर्कस्तान व इजिप्तचे सुलतान या चित्रावलीमध्ये तुर्कस्थानचे सुलतान, इजिप्तचे प्रिन्स, हुसेन कामेल पाशा हे इजिप्तचे नवे सुलतान, तसेच इजिप्तचे पदच्युत सुलतान खेदीव, इजिप्तचे मुख्य कमिशनर– ले कर्नल सर आर्थर मॅकमोहॉन यांची छायाचित्रे आहेत. 'रशियाची राणी झारिना'[९] व पहिल्या महायुद्धातील तीची मुत्सद्देगीरी यावर सचित्र माहिती दिली आहे.

'आंतरराष्ट्रीय कायदा व सांप्रतचे महायुद्ध' या लेखात सुएझ कालव्याच्या भागातील युद्धजन्य परिस्थितीची माहिती दिली आहे. याचबरोबर युद्धविषयक हालचालीमध्ये 'चापेन प्रांतातील फ्रेंचांची लढाई', 'पोलंडची रणभूमी', 'पनामा संयोगी भूमी व कालवा' येथील छायाचित्रे प्रसिद्ध करण्यात आली. 'जलयुद्धाची सिद्धता' या लेखामध्ये लढाऊ, आक्रमक, जहाज व विमानामधून केलेल्या आक्रमणाची छायाचित्रे दिली आहेत. यामध्ये झेपोलियन या विमानातून केलेला बॉम्ब स्फोट व त्यामुळे जमिन व तळमजल्यावरील लोकांना झालेल्या इजा याची छायाचित्रे प्रसंगाचे गाभिर्य सांगतात. 'पूर्व प्रशियातील रणांगणात रशियन शिपाई शत्रुवर संगिनीचा मारा करीत आहेत त्यावेळचे छायाचित्र', 'उत्तर समुद्रातील जर्मन व ब्रिटिश आरमारांचे डावपेच दर्शविणारा नकाशा', 'सुरुंगाने भरलेली जर्मन आगबोट', 'हॅवित्झर नामक जर्मन तोफ'[१०] ही छायाचित्रे ही महत्वाची आहेत.

युद्धात सहभागी असणारी राष्ट्रे, त्यांचे लष्करी अधिकारी, राज्यकर्ते यांचीही या संदर्भाने छायाचित्रे छापली गेली. यामध्ये 'इस्लामी राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी झटणारे पुढारी' यामध्ये केमालपाशा, झगलुक पाशा, मुस्ताफा केमाल पाशा यांची छायाचित्रे दिली आहेत.

'आर्यलंडातील स्वातंत्र्याच्या युद्धाचे प्रवर्तक' यामध्ये चेंबरलेन, बर्कनहंड, लॉइड जॉर्ज, चर्चील, ग्रीनवुड, इनव्हॅन्स हेवेर्ट, आर्थर ग्रिफिथ, मिचल कोलिन्स, रॉबर्टसी वारंटन इ. पुढाऱ्यांची छायाचित्रे देण्यात आली आहेत. 'झार व रशियन सेनानायक'[११] या चित्रावलीमध्ये एम्परर दुसरे निकोलस, ग्रॅन्ड ड्युक–निकोलस, जनरल ॲलेकझी, जनरल रुझकी, जनरल रनेन कॉम्फ, जनरल ड्रॅगोमिरॉफ, जनरल रॅडको मिस्ट्रीकॉफ, जनरल ले. निकोलस, जनरल सुखोम्लिनॉफ, जनरल इव्हॅनॉफ या लष्करी अधिकाऱ्यांची छायाचित्रे आहेत.

इंग्रजी आरमार अधिकाऱ्यांचीही छायाचित्रे चित्रमय जगतमध्ये प्रसिद्ध झाली. यामध्ये ॲडमिरल सर जॉन जॅलिको, कमांडर डब्ल्यु. इ. गुडेना, व्हाइस ॲडमिनल डेव्हिड बिटी यांचा समावेश होता. 'दुसऱ्या महायुद्धाच्या युद्धविषयक चित्रावली'[१२] मध्ये 'जर्मनीच्या प्रलय उडविणाऱ्या पाणबुड्या' यु बोटी, 'वार्सा येथील विधवंसकदृश्य', 'इग्लंड व फ्रान्सच्या किनाऱ्यावरील जर्मन पाणबुड्यांचे संचार क्षेत्र', दाखवणारी छायाचित्रे महत्वपूर्ण आहेत. 'जर्मन लोकांच्या लढाईच्या वेळी धुर सोडण्याच्या तऱ्हा', 'मनुष्य संहाराची आधुनिक साधने' यामध्ये ब्रिटिश विमान वाहक जहाज 'फ्युरिअस', अमेरिकेचे फायटर विमान 'हॉमहॉक', तोफा बसवलेले विमान 'स्पिटफायटर', 'दोन हजार पौंडचा ब्रिटिश बॉम्ब', ब्रिटनची प्रचंड आकाश नौका 'स्टलिंग बॉम्बर' या मनुष्य संहाराच्या आधुनिक साधनांच्या छायाचित्राचा समावेशा होतो.

जर्मन लष्करी मोटारी, ब्रिटिश आरमारी जहाजे, बॉम्ब टाकणारी विमाने, वैमानिक हल्ल्याची दृश्ये, बॉम्बवाल्या विमानाचा काफिला, आरमारी तोफगोळे, विमानातून आगबोटीवर होणारा मारा, विमानाला पकडणारे उडते हत्ती, मोटारीवरील मशीनगन, विमानाची वर्दी देणारी यंत्रे यांची छायाचित्रे पाहुन युद्धाची भिषणता जाणवते. पॅसिफिक रणक्षेत्राचा परिचय यामध्ये युद्धविषयक नकाशे, लष्करी कारवाया यांची सचित्र माहिती दिली आहे. 'नाझी सैतानाचा चढाव' यामध्ये जर्मनीच्या लष्करी करवायाची सचित्र माहिती दिली आहे. ॲटम बॉॅंब ने केलेल्या विध्वंसामध्ये 'हिरोशिमा' नगराच्या विध्वंसाची छायाचित्रे महत्वपूर्ण आहेत.

आशिया युरोप खंडातील राजकारणी व्यक्तींची छायाचित्रे यात छापली गेली. यामध्ये 'इंग्लंडवर राज्य करणाऱ्या मेरी नावाच्या पाच राण्या', 'प्रिन्स ऑफ वेल्स याचा राजवंदनविधी', 'बादशहा पाचवे व महाराणी मेरी', 'बाल्कन राष्ट्राचे राजे व प्रधान', ग्रीस,

रुमानिया, बल्गेरियातील राणी राजे आणि प्रधान यांची छायाचित्रे, ‘झारच्या राणीसाहेब व त्यांची कन्या’, ‘बल्गेरियाचा पहिला राजा फर्निनंड’, ‘रणवीर युवराज राजपुत्र प्रिन्स ऑफ वेल्स’, ‘मिसेस सन्यतसेन व डॉ. सन्यतसेन’, ‘जपानचा राजा हिरोहिटा व जपानची राणी नागाकोकुनी’, ‘हिटलरची प्रभावळ यामध्ये हिटलरचा डावा हात कॅप्टन गोअटिंग व उजवा हात डॉ. जोसेफ गोवेल याची छायाचित्रे’, ‘हिंडेनबुर्ग व हिटलर’ याचबरोबर ‘मादाम ताबुई’ या स्त्रीचे छायाचित्र यात महत्वपुर्ण आहे. ही महिला एक पत्रकार म्हणून युद्धकाळात नावाजलेली होती. राजकारणी गोटातील गुप्त व महत्वाच्या बातम्या प्रसिद्ध करण्यामध्ये तिचा हातखंडा होता. जर्मनीने तिच्या अटकेचा हुकूम काढला होता. युद्धविषयक छायाचित्रे देण्याचा उद्देश असावा असा होता की, महायुद्धांची भिषणता, दाहकता व आधुनिक पाश्चात्य यंत्रज्ञानाची माहिती भारतीयांना देणे. तसेच चित्रमय जगत मासिकाचा खप वाढवणे हा होता.

## ऐतिहासिक वास्तु आणि स्थलचित्रे :–

यामध्ये ‘जैन लोकांचे प्रसिद्ध क्षेत्र श्रवणबेळगोळ’, ‘श्री जगन्नाथ पुरीची यात्रा’, ‘पुर्ण गयेची यात्रा’, ‘पुणे शहरातील प्रसिद्ध मंदिरे’ या मध्ये तुळशी बाग आणि बेलबाग मंदिर इत्यादी धार्मिक स्थळाची छायाचित्रे चित्रमय जगतमध्ये माहितीसहित छापली होती.

ऐतिहासिक स्थळांच्या छायाचित्रांमध्ये ‘विजापूर येथील सुप्रसिद्ध इमारती’ यामध्ये गोलघुमट, जुम्मामशिद, इब्राहीम रोझा या इमारतींची सचित्र माहिती दिली आहे. ‘रायगड येथील ऐतिहासिक स्थळे’ यामध्ये शिवाजी महाराजांची छत्री, त्यांच्या कुत्र्याची समाधी, नगारखाना, गंगासागर, हत्ती तलाव यांची सचित्र माहिती दिली आहे. ‘विजापुर बदामी येथील देखावे’ यामध्ये विजापुरचा किल्ला, श्री. रेणुका मंदीर, बदामी येथील लेणी एक व दोन येथील छायाचित्रे, अय्यहोळं शिलालेख, सौपत्ती येथील रेणुका मंदीर (यल्लम्मादेवी मंदीर) यांचीही सचित्र माहिती दिली आहे. उत्तर हिंदुस्थानातील प्रेक्षणीय स्थळे यामध्ये मोती मशीद, दिलवाडा, आबु, बुद्धाचे देऊळ याची माहिती दिली आहे. याशिवाय ‘रावेर येथील पहिल्या बाजीरावाचे वृंदावन’, सयाजीराव गायकवाड बडोदे येथील मकरपुरा पॅलेस, लक्ष्मीविला पॅलेस, तुळापुर येथील संभाजीमहाराजांची समाधी, दिल्ली येथील जयसिंहाने बांधलेल्या वेधशाळेची मुख्य ताऱ्याची मोजणी करण्याचे गृह, ‘दिल्ली येथील दृश्यामध्ये’ कुतुबमीनार, जंतरमंतर,

सुदामा मंदीर, द्वारकानाथाचे मंदीर ही छायाचित्रे  दिलेली आहेत. 'म्हैसुर येथील देखाव्यांमध्ये म्हैसुरचा राजवाडा, कृष्णराज वाडियार यांचा पुतळा, बंगलोरचा अजबखाना इ. छायाचित्रे दिली आहेत. याशिवाय 'महेश्वर येथील देखावे' यामध्ये अहिल्याबाईची छत्री, महेश्वर नगर, राजराजेश्वर मंदीर व तेथील शिल्पकलेची माहिती दिली आहे. 'देवगिरी व वेरुळ' यामध्ये कैलास लेणी, वेरुळ येथील घृष्णकुंड कैलास मंडप, रामटेक येथील देखावे यामध्ये रामटेक अंबासागर तलाव, महादेव मंदीरांची छायाचित्रे दिली आहेत. 'फत्तेपुरसिक्री येथील देखावा' यामध्ये अकबराची राणी जोधाबाई हिचा वाडा, अकबराचे गुरु शेख सलीम चिस्तीचा दर्गा यांची छायाचित्रे दिली आहेत.

याशिवाय परकीय देशातील विविध प्रेक्षणिय व धार्मिक स्थळामध्ये– 'जगातील निरनिराळ्या धर्माची अत्यंत पवित्र तीर्थ'[१३] यामध्ये हिंदु धर्माचे श्री क्षेत्र काशी, ख्रिश्चन धर्म– जेरुसलेम मुख्य देऊळ, बौद्ध धर्म बुद्धगयेतील बुद्धाचे मुख्य मंदीर, इसलामधर्म–काबा, शिख धर्म– अमृतसर सुवर्ण मंदीर, जैन धर्म– आबु येथील मुख्य मंदीर, कुन्फुसु धर्म– शांटुग प्रान्त यांची छायाचित्रे दिली गेली. 'जगातील चमत्कारीक इमारती' यामध्ये ड्रेसन पॅरीस, फ्रॅकफोर्ट–हॅमबर्ग, लेनीनग्राड रशिया विश्वविद्यालय यांची छायाचित्रे देण्यात आली आहेत. 'प्राचीन रोम'[१४] या देखाव्यामध्ये सेंट पिटर्सचे चर्च, लालतिरानचे देऊळ, मोन्यास्टरीमचा अजबखाना, स्काला सान्टा इमारत, आबेलित्क स्तंभ, सांता मारीया, म्याजी ओर देऊळ, सेट पॉलचे देऊळ, सेंट पोट्राइन व्हिकोलीचे देऊळ, मोझेसचा पुतळा, व्हॅटिकन पॅलेस, ग्यालेरी लापिदारिया (पुतळाचे म्युझिअम), चिरामांत्रिओ म्युझिअम, प्लिओ प्लेमनतिनो म्युझिअम, (पिक्चर गॅलरी), सिस्टर चॉपेल, व्हेटिकन लॅबररी, क्यापिटाल इमारत, क्यापिटालिअन म्युझिअम, प्लेबियन ऑफीथिएटर, फोरम ऑफ स्ट्रोजन, सीझर पॅलेस, पानथीअन इमारत, काटाकोम्ब थडगे, व्हिल अंबरटो प्राइमो इ. वास्तुचा समावेश आहे.

## नाट्यचित्रे :–

चित्रमय जगतमध्ये 'नाटकातील देखावे' या सदरा अंतर्गत त्या काळातील विविध सचित्र माहिती प्रसिद्ध होत असे. यामध्ये 'खाडीलकरांची पाच नाटके' या अतर्गत 'कांचनगडची मोहना', 'सवाई माधवरावांचा मृत्यू', 'कीचकवध', 'बायकोचे बंड', 'भाऊबंदकी' या

नाटकांच्या विविध अंकांची छायाचित्रे प्रसिद्ध होत असत. याचबरोबर यशवंत नारायणराव टिपणीस यांच्या 'राधामाधव नाटकातील देखावे' तसेच 'संगीत राक्षसी महत्वकांक्षा' या नाटकातील सर्व अंकांची सचित्र माहिती चित्रमय जगतमध्ये देण्यात आली होती.

पौराणिक कथांवर आधारीत 'चारुदत्त आणि मृच्छकटिक' नाटकांचा देखावा देण्यात आला. 'पहिलीच दोन संगीत नाटके' या अंतर्गत 'संगीत शाकुंतलम्' आणि 'संगीत सौभद्र' यांची सचित्र माहिती छापून आली. याशिवाय 'संगीत द्रौपदी' आणि 'बेबंदशाही' या महाराष्ट्र नाटक मंडळीच्या नाटकातील छायाचित्रेही यामध्ये देण्यात आली. न. चि. केळकर यांचे 'तोतयाचे बंड', अप्पा टिपणीस यांचे 'चंद्रग्रहण' आणि 'शहाशिवजी' हे नाटक यांचीही सचित्र माहिती नाटकांचे देखावे या अंतर्गत छापली गेली. याचबरोबर 'चंद्रगुप्त', 'कृष्णार्जुनयुद्ध', 'राधामाधव', रा. खाडिलकर यांचे 'सत्वपरिक्षा' नाटक, 'संगीत संशाय कल्लोळ', 'म्युनिसिपालटी', 'फाल्गुनराव' इत्यादी नाटकांचे देखावे छापले गेले. कै. बालगंधर्व यांच्या स्त्री वेषातील दोन सुप्रसिद्ध भूमिका 'सौभद्र' मधील 'सुभद्रा' व मृच्छकटिक यामधील 'वसंतसेना' यांची छायाचित्रे चित्रमय जगतने प्रसिद्ध केली होती.

## विशेष छायाचित्रे :–

यामध्ये विवाहउत्सुक वधुवरांच्या जाहिरातींमधील 'वधु'ची छायाचित्रे वैशिष्टपुर्ण आहेत. याशिवाय, बडोदे, सांगली अशा संस्थानांमध्ये भरविलेल्या 'स्त्रीयांच्या हस्त कला कौशल्याचे प्रदर्शन' याची छायाचित्रे, दरवर्षीच्या 'गणेशउत्सवा'ची वेगवेगळ्या ठिकाणाचे देखावे, स्त्रियांच्या मैदानी व घरगुती खेळाचे सामने इत्यादी छायाचित्रे महत्वाची आहेत. याशिवाय अभिनंदन सदरातील शिक्षण, उद्योग, व्यवसाय, क्रिडा, साहित्य यामध्ये भरीव योगदान देणाऱ्या स्त्री–पुरुषांची छायाचित्रेही यामध्ये दिली गेली. 'महाराष्ट्रातील जमाती' यामध्ये ठाकर जात, कातकरी, कंजारीण, भुत्या, घागरिया, साधु, मरी आईचे भक्त, फासे पारधी, वैदु, कातकरी या लोकांची सचित्र माहिती दिली आहे.

'पौर्वात्य देशातील स्त्रिया' यामध्ये सुमात्राकडील स्त्रिया, जपानी स्त्री, अरबी स्त्री, ओमान स्त्री, नेपाळी स्त्री, मंगोलीयन स्त्री, इ. स्त्रियांची वेशभूषा, केशभूषा, अलंकार यांची

सचित्र माहिती मिळते. 'पठाण जातीचे निरनिराळे भेद आणि त्याचे भिन्न पोषाख' या सचित्र लेखात जोवा कै. आफ्रीडी, जोवा कै., आफ्रीड, वझीरखेल, बोरीवाल, युसूफझई, अडमखेल, कोहारी, कलाईखेल, अकोरखेल, अलीखेल, मोशटी और कझर्द, अलीखेल न.१, शईखान नं.१, मुलाखेल नं.३, यांची पगडी व कोट यातील भेदाची बारीक माहिती दिली आहे.

'निरनिराळ्या देशातील स्त्रिया व त्यांचे पेहराव' यामध्ये बल्गेरिया, फिनलंड, ग्रीस, लटोव्हिअन, डॅनिश झेकोस्लाव्हाकिया, सिहली, सॅव्हाय येथील स्त्रियांच्या छायाचित्राचा समावेश होतो. 'हे पहा इंग्लड' यामध्ये इंग्लडमधील चांभार, रस्त्यावर हजामत करणारा न्हावी, हमाल, इंग्लडमधील शिमग्याची सोंगे, खाणीत काम करणारा मजूर, गाढवाच्या गाडीत बसून बाजारास जाणारे मजूर जोडपे, विडीकाडी विकणारा, चुलीकरता लाकडाची मोळी नेणारी स्त्री, भिकारी यांची छायाचित्रे दिली आहेत. युद्धाविषयक विशेष छायाचित्रांमध्ये इग्लंडने जर्मनीच्या 'झेपोलियन' या युद्धविमानावर हल्ला करुन पाण्यात बुडवले त्याचे छायाचित्र, लुसिटानिया आगबोट बुडण्याचा देखावा महत्वपूर्ण आहे.

## ५.२.२ रेखाचित्रे :–

## पौराणिक चित्रे :–

तत्कालीन समाजाची आवड निवड, श्रद्धास्थाने, धार्मिक प्रवृत्ती या गोष्टी विचारात घेऊन चित्रमय जगतने पौराणिक धार्मिक चित्रे दिलेली दिसतात. विविध सणांचे उत्सवांचे औचित्य साधून विशिष्ट सणउत्सवाच्या काळात त्या संदर्भातील धार्मिक चित्रे चित्रमयत जगतमध्ये छापलेली दिसतात. त्या सण उत्सवांची सचित्र माहिती देऊन त्या विशिष्ट सणांचे धार्मिक सामाजिक स्पष्टीकरणही यात केलेले आहे.

रामायण व महाभारत ही भारतीय धर्म संस्कृतीच्या वैभवशाली परंपरांची प्रतिके आहेत. यातील विविध व्यक्तीमत्वची घटना प्रसंगांवर आधारित पौराणिक चित्रे चित्रमय जगतयामध्ये देण्यात आली. भारतीय संस्कृतीतील मुल्य, प्रमाणके, परंपरांना पुन्हा उजेडात आणण्याचा प्रयत्न याद्वारे करण्यात आला. भारतीय संस्कृतीला कमी लेखणाऱ्या ब्रिटिशांच्या विचारसरणीला प्रतिउत्तर देण्याचा हा एक प्रयत्न होता. यामध्ये 'श्रावणी मंगळागौर', 'अष्टमी', 'नवचडी होम',

‘मकरसंक्रमण’, ‘महासाधु तुकाराम यांचे वैकुंठ गमनाचे चित्र’, ‘रणभूमीवरील अर्जुन विषाद हे चित्र’, ‘आर्याची निशाणे’ हे प्राचीन रामायण महाभारतातील राज्यकर्त्यांची चिन्हे ध्वज दाखवणारे चित्र, पॅरिसच्या म्युझिअममधील ‘नंदनवन’ हे इंद्राच्या वस्तीस्थानाचे रेखाचित्र ही पौराणिक रेखाचित्रे महत्वाची आहेत.

याचबरोबर चित्रमय जगतच्या मुखपृष्ठावरही सुंदर पौराणिक व धार्मिक चित्रे छापली गेली यामध्ये ‘संक्रांतीचा वाणवसा’, ‘गलिताभिमानराधा’[१५], ‘वसंत सत्कार’, ‘उर्वशी अवतरण’, ‘वनमाला’[१६] ही महत्त्वाची चित्रे आहेत. तसेच गणपत विश्वास लाड यांचे ‘राधाकृष्ण’ हे चित्र, के. एस. खरे यांचे ‘यशोदा कृष्ण’ व ‘श्रीकृष्णाच्या’ मुरलीला मोहित झालेली गौळण, बाल चित्रकार एम. आर. आचरेकर यांचे ‘मुरलीधर’ हे चित्र, बी. एस. जोशी यांचे ‘अक्रुरासमवेत श्रीकृष्णाचे मथुरेस प्रयाण’ या चित्रात श्रीकृष्णास आडवणाऱ्या व जाऊन देणाऱ्या गोपीका हे चित्र, रामायणातील प्रसंगावर आधारीत बी. एस. जोशी यांचे दुसरे चित्र म्हणजे जानकीला मुद्रिका दाखवून मी रामदूत आहे अशी ओळख पटवीताना ‘मारुती’, ‘भगवान विष्णू’ ही चित्रे महत्वाची आहेत.

याचबरोबर सी. एस. कशीकर यांचे ‘रुक्मिणी प्रणय पत्रिका’[१७] हे रुक्मीणी स्वयंमवर प्रसंगाशी संबंधीत चित्र महत्वाचे आहे. के. एस. खातू यांचे ‘गरुढारुढ लक्ष्मी नारायण’, ‘लवाने धरलेला अश्वमेध यज्ञातील अश्व’ ही चित्रे तसेच एस. एच. गोडबोले यांचे मृगदर्शन, व्ही. एम. खरे यांचे ‘सीता आणि सुवर्णमृग’, ए. एन. माळी यांची ‘गाणसमाधी’, ‘सौरंधी’ ही दोन चित्रे, माधव बागल याचे ‘कुंजवणी’ हे चित्र इत्यादी पौराणिक चित्रे महत्वपूर्ण आहेत.

## इतिहास विषयक चित्रे :–

महाराष्ट्रातील व भारतीय इतिहासातील विविध कर्तबगार राज्यकर्ते, त्यांचे लष्कर, नितीप्रशासन, दरबार याविषयी माहिती देणारी अनेक चित्रे चित्रमय जगतमधून छापण्यात आली. ब्रिटिशकालीन भारतीयांच्या इतिहासविषयक जाणिवा निर्माण करण्याचा प्रयत्न यातून झालेला दिसतो. यामध्ये ‘श्री शिवराजासिंहासना रोहणोत्सव’ हे शिवरायांच्या राज्याभिषेकाचे चित्र, रामदास स्वामी व शिवाजी महाराज यांचे ‘भगवा झेंडा’ हे चित्र, ‘शुर औरंगजेब’ हे चित्र,

‘सवाई माधवराव पेशवे यांचे शनिवारवाड्यातील गणपती रंगमहालातील दरबारी चित्र’, व्हि. एम. खरे यांचे ‘श्रीमंत माधवराव पेशवे यांचे चित्र’, ‘मोगली नवाब व त्यांची वहाने’ हे मुघलकालीन अंबारी, घोडे पालखी घोडदळ, पायदळ, गजदळ याचे माहिती सांगणारे चित्र महत्वपुर्ण आहेत.

त्याचबरोबर भारताबाहेरील विविध संग्रहालयात भारताच्या इतिहासाची साधने उपलब्ध आहेत. त्यामधील दुर्मिळ ऐतिहासिक रेखाचित्रांचा परिचयही चित्रमय जगतने करुन दिलेला दिसतो. यामध्ये ‘शिवाजी महाराज व त्याचे सैन्य’[१८] हे लंडन येथील रॉयल लायब्ररीतील चित्र, ‘मदन रती’ हे पौराणिक चित्र फ्रान्समधील संग्रहालयात आहे. पॅरिसच्या संग्रहालयातील ‘औरंगजेब व त्याचा भाऊ दारिशिको’ हे चित्र, त्याचबरोबर ‘आदिलशाहीचे आठ राज्यकर्ते’ एकाच दरबारात बसलेले दाखविलेले चित्र, ‘नंदनवन’ हे चित्र आणि ‘अंबारीवरची मिरवणूक’ हे चित्र यांचा समावेश होतो. ‘थोरले शहाजी राजे भोसले’ यांचे लंडन येथे ठाकूर श्री. जयराजसिंह सिसोदिया यांच्या संग्रही असणारे चित्र बडोद्याचे प्रोफेसर माणिकराव यांच्याकडून प्राप्त झालेली बाजीप्रभु देशपांडे यांची तसबीर या चित्रांचा समावेश होता अशा प्रकारे संग्रही ऐतिहासिक रेखाचित्रे प्रसिद्ध करण्याचाही प्रयत्न मोठ्या प्रमाणात चित्रमय जगतने केलेला आढळतो.

‘वजीरीची वस्त्रे अपर्ण करण्याचा समारंभ’[१९] या चित्रामध्ये श्रीमंत सवाई माधवराव पेशवे दिल्लीच्या बादशहाकडून आणलेली वजीरीची वस्त्रे महादजी शिंदे यांस अर्पण करीत आहेत असे दृश्य आहे. श्रीमंत सवाई माधवराव पेशवे व पाटील बोवा उर्फ महादजी शिंदे नावेत बसून पर्वतीहून शनिवार वाड्यास जातानाचे चित्र महत्वपूर्ण आहे.

## इतर रेखाचित्रे :–

चित्रमय जगतमध्ये प्रसंग विषयानुसार खास अंकाला अनुलक्षुण मुखपृष्ठावरील चित्रे छापण्यात आली. खास पाकिस्तान अंक, खास चीन अंक, जपान अंक, रशिया अंक इत्यादी अंकात विषयास अनुलक्षुण रेखाचित्रे टाकण्यात आली. यासंदर्भात जपानी स्त्री ‘गैशा’ आणि कामोनदीच्या काठी हे एन. आर. नाडगौडा यांचे रेखाचित्रे विशेष आहे.

## विनोदी चित्रे :-

भारतीय राष्ट्रीय चळवळीतील राष्ट्रीय सभेचे योगदान यश-अपयश, काँग्रेसचे अंतर्गत मतभेद, भारताची ब्रिटिशकालीन आर्थिक दुरावस्था, ब्रिटिश शासनाची जुलमी धोरणे व कायदे, काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमाची दशा व दिशा, महायुद्धकालीन जागतिक घडामोडी, युरोपीयन राष्ट्रीची युद्धविषयी निती, लष्करवाद, वैचारिकता, आर्थिकस्थिती यासंबंधी अनेक विनोदी चित्रे चित्रमय जगतमध्ये छापली गेली. या सर्वांमधून तत्कालीन राजकीय व सामाजिक वास्तवता, न्युनता, गांभिर्य विडंबनात्मक पद्धतीने उपहासात्मक पद्धतीने दाखवले गेले.

विनोदी चित्राचे चित्रकार कोण असावेत या संदर्भात फार कमी माहिती मिळते. कारण भारतीय राजकारणावर आधारित विनोदी चित्रे ही 'संपादकीय स्फुट' या सदरा अंतर्गत छापली गेली. तेथे चित्रकाराचा निर्देश नसल्यामुळे संपादक हा सर्वस्वी या चित्रासाठी जबाबदार असे. तर जागतिक महायुद्धाविषयीची विनोदी चित्रे ही आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रसिद्ध मासिकामधून घेण्यात आली होती. तर विनोदी चित्रे या सदरा अंतर्गत छापलेली चित्रे ही एस. एन. जोशी, बी. बी. जुवेकर, दाणी इ. चित्रकारांनी काढलेली दिसतात परंतु महायुद्ध संपल्यानंतर विनोदी चित्रे देण्याची पद्धत चित्रमय जगतने कायमची बंद केलेली दिसते.

राजकीय व सामाजिक जीवनातील प्रसंगावर अनेक विनोदी चित्रे चित्रमय जगतमध्ये छापण्यात आली. यामध्ये भारतीय राजकीय चळवळीवर आधारित विनोदी चित्रामध्ये 'लाहोर क्रीड काँग्रेसचा घडा नीट जमला नाही' यामध्ये लाहोर अधिवेशनाचे अपयश विनोदी पद्धतीने दाखवले आहे. 'लॉर्ड मोर्ले व लॉर्ड मिंटो'[२०] यांच्या विनोदी चित्रात दोघेही शाईच्या दवतीवर बसलेले दाखवले आहेत. त्यावरुन वृत्तपत्र स्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या कायद्यावर भाष्य केले आहे. 'मुस्लीम लीगची दोन वर्षातील प्रगती' या विनोदी चित्रात राष्ट्रीय सभेला जे पंचवीस वर्षात जमले नाही ते मुस्लीम लीगने दोन वर्षात कसे केले हे दाखवले आहे.

'दुर्बल गरीब गाय' ब्रिटिश सरकारच्या अन्यायकारी कर धोरणामुळे भारत ओझ्याखाली दबलेल्या गायीप्रमाणे दाखवला आहे. तिबेट प्रश्नी भारत व चीनची भूमिका या संदर्भात मजेशीर भाष्य करणारे विनोदी चित्र म्हणजे 'दलाई लामाचा चेंडू'[२१], या चित्रात दलाई लामा रुपी

फुटबॉलला चीनने ठोकर मारल्याने तो पेकिंगमधून हिमालय ओलांडून हिंदुस्थानात कलकत्यापर्यंत येऊन पोहचला आहे असे या चित्रामध्ये दाखवले आहे. 'पुर्व पश्चिम यांचा संगम' या विनोदी चित्रात बैलगाडी आणि मोटरगाडी यांच्या धडकेने बैलगाडी कशी चक्काचुर झाली आहे हे दाखवले आहे. यामध्ये बैलगाडी भारतीय उद्योगधंद्याची निदर्शक आहे, तर मोटारगाडी पाश्चात्य उद्योगधंद्याची निदर्शक आहे. भारतीय अनुउद्योगीकरणाची प्रक्रिया यातून समजते. 'हिंदमातेचा अनुभव' या चित्रात हिंद माता स्वदेशी व्रताच्या विहरीमधून सांप्रदायिक सुधारणांनी भरलेली बादली बाहेर काढत आहे. आपल्या उद्योगधंदयांना उर्जित अवस्था पुन्हा प्राप्त करायची असेल तर स्वदेशी व्रताशिवाय पर्याय नाही, हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. 'पुणे येथील म्युनसिपल इलेक्शनची धामुधुम'[२२] या चित्रामध्ये अशिक्षित मतदार पेटीजवळ गेल्यावर कोणाला मत द्यायचे व मतदान कसे करायचे यामुळे कावराबावरा झालेला दाखविला आहे. प्रत्येक उमेदवार मतदाराची कशी हांजीहाजी करत आहे हे दाखवले आहे. आधुनिक निवडणूक पद्धतीला लाजवेल असे हे चित्र आहे.

'म्हाताऱ्याचे लग्न सोहळे'[२३] या चित्रात वृद्ध म्हाताऱ्याचे लहान मुलीशी होणारे लग्न या सामाजिक प्रश्नावर भाष्य केले आहे. याच विषयावर आधारित दुसऱ्या चित्रामध्ये 'वधु पाहिजे' अशी विनोदी जाहिरात दिली आहे. यात ८० वर्षांच्या म्हाताऱ्याच्या लग्नासाठी सुरेख कमी वयाची मुलगी असावी अशी जाहिरात दिली आहे. त्याच बरोबर मुलीविषयी अपेक्षा सांगताना मुलीचे घराणे सुधारकी नसावे अशी टिप दिली आहे. 'शिक्षण कसे असावे' या विनोदी चित्रामध्ये मेंदु आणि बुद्धी व शरीर आणि स्नायू यांचा शक्तीशी असणारा संबंध स्पष्ट केला आहे. शरीराकडे दुर्लक्ष करुन मेंदुची (बुद्धीजी) जास्त प्रमाणात वाढ झाली आणि बुद्धीकडे दुर्लक्ष होऊन शरीराची जास्त प्रमाणात वाढ झाली तर त्याचे काय परिणाम होतील हे दाखवले आहे. शेवटी मनुष्य मात्रास असे शिक्षण द्यायला हवे ज्या शिक्षणामुळे तन व मन या दोघांचा समान विकास होईल असा विचार मांडला आहे.

'मद्यपान स्वातंत्र्याचा विजय' या चित्रामध्ये अति दारु सेवनामुळे समाज स्वास्थ कसे बिघडत चालले आहे, हे विनोदी पद्धतीने दाखवले आहे. अशाच प्रकारे दुसऱ्या चित्रामध्ये दारुमुळे संसाराची कशी राखरांगोळी होते तरी तिचे व्यसन सुटता सुटत नाही. हे दाखवले

आहे. या दारुबाईच्या स्वैर संचाराला आळा घालण्याचे काम सुधारकांनी व सरकारने त्वरीत हाती घ्यावे असा विचार मांडला आहे. अशाच प्रकारे 'मुंबईतील दारुबंदी व साक्षरता प्रचार' हे चित्र महत्वाचे आहे.

## युद्धविषयक विनोदी चित्रे :–

'जर्मनीने तयार केलेला उंदराचा सापळा'[२४] या विनोदी चित्रामध्ये जर्मनीच्या प्रभावाखाली, वर्चस्वाखाली येण्यासाठी बल्गेरिया, रुमानिया, ग्रीस सारखी राष्ट्रे म्हणजे उंदरे तयार आहेत का नाही असा मजेशीर प्रश्न उपस्थित केला आहे. 'हातात सोटा घेतलेला जर्मन कैसर' अमेरिकन प्रेसिडेंटला म्हणतो ''मेहरबानी करुन मला अनुकूल असा तह घडवून आणण्याचा प्रयत्न करा'' दुसऱ्या एका चित्रात 'विजयश्रीचे पलायन' यामध्ये कैसर विजयश्रीला आपल्याकडे येण्याचे आमंत्रण देतो परंतु विजयश्री ते नाकारते असे दाखवले आहे. जर्मनीची पहिल्या महायुद्धातील प्रभावशाली भूमिका व परंतु त्याच बरोबर नामुष्कीजनक पराभव यातून समजतो.

'दोस्त राष्ट्राची मनोदेवता' यामध्ये न्याय, स्वातंत्र्य, बंधुभाव यासाठी झटणाऱ्या दोस्तराष्ट्राची आदर्श प्रतिमा उभी केली आहे. तर जर्मन गटातील राष्ट्रे लोकशाही स्वातंत्र्याच्या विनाशासाठी लढत आहेत म्हणून त्यांना भूत पिशाच्च बाधा झालेली दाखवली आहे. 'युद्धामुळे झालेली महागाई'[२५] यामध्ये अन्न वाया जाऊ नये म्हणून शिळी वातड भाकरीसुद्धा श्रीमंत लोक आवडीने खाऊ लागले आहेत, तर दुसऱ्या चित्रात प्रतिष्ठीत श्रीमंत लोक दातात अडकलेले शीत फुकट जाऊ नये म्हणून नोकराला दात कोरणे आणावयास सांगत आहे.

दुसऱ्या महायुद्धावर आधारित विनोदी चित्रामध्ये 'सारेच शांततावादी' यामध्ये लढाई नको असे सांगणारे सारेच युरोपीयन देश आत्मरक्षण व शांतता यासाठी ऐकमेकांवर बंदुका धरुन उभे आहेत. अशा प्रकारे शांततावादाचा विरोधाभास येथे दिसतो. 'चीनमधील सीसॉचा खेळ' निद्रिस्त अवस्थेतील चीनच्या मानेवर फळी ठेवून इग्लंड व अमेरिका सी सॉचा खेळ खेळत होती, परंतु आता चीनला जाग आल्यामुळे मानेवरची फळी चीनने भिरकावून लावली आहे. त्यामुळे अमेरिका व इग्लंड कसे कोलमडून पडले आहेत हे दाखवले आहे. 'तोफा

तलवारीचे संगीत'[२६] या विनोदी चित्रात मुसोलिनीने जुनी संगीत वाद्ये टाकून तोफा तलवारी सारख्या नव्या वाद्यावर मृत्यूगीते गायला कशी सुरुवात केली आहे असे चित्र आहे.

## म. गांधीजींच्या विधायक कार्यक्रमातील मुद्दयावर भाष्य करणारी विनोदी चित्रे :–

दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात म. गांधीजीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यचळवळीची वाटचाल सुरु झाली होती. त्यातील काही घटनांचे विनोदी चित्रण चित्रमय जगतने केले होते. गांधीजींच्या विधायक कार्यक्रमाअंर्तगत दारुबंदी हा महत्वाचा मुद्दा होता. त्याला अनुसरुन अनेक विनोदी चित्रे छापण्यात आली. 'दारुला जलसमाधी', 'मुंबईतील दारुबंदी आणि साक्षरता प्रचार' अशी चित्रे यामध्ये महत्वाची आहेत. तसेच अशा महत्वपूर्ण मुद्दयावर पुर्णपणे यश मिळवणे किती कठीण आहे यावरही अनेक विनोदी चित्रे छापण्यात आली. 'सैरावैरा उधळलेला तट्टू' या चित्रामध्ये अस्पृश्य उद्धार हा समाजाला रुचेल पटेल अशा पद्धतीने होणे गरजेचे आहे परंतु हा कार्यक्रम सैरावैरा उघळलेल्या तट्टू प्रमाणे होत आहे असे यात दाखवले आहे.

## ५.३ चित्रमय जगतमधील कथा :–

चित्रमय जगतमध्ये छापलेल्या कथा तत्कालीन उच्चवर्णीय मध्यमवर्गीण समाजाचे व त्यांच्या जीवन पद्धतीचे निर्देशन करतात. तत्कालीन मध्यमवर्गाच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन कथाचे विषय आलेले दिसतात. महानगरीय जीवनशैली तेथे पोटापाण्यासाठी वेगवेगळे उद्योग करणारा कष्टकरी समाज यावरही यातून प्रकाश टाकलेला दिसतो. घराण्याच्या इतिहास विषयक कथा यात दिसतात. शि. म. परांजपे, विठ्ठल सीताराम गुर्जर, ह. ना. आपटे, विनायक लक्ष्मण बर्वे, रा. वि. दामले, रा. ह. दातार अशा साहित्यकांच्या कथा यात छापल्या गेल्या. ज्यांनी विसाव्या शतकाच्या पुर्व कालखंडात कथा व कादंबरी लेखनामध्ये स्वतःचे विशेष योगदान दिलेले दिसते.

चित्रमय जगत मासिकामध्ये अनेक लघुकथा, ऐतिहासिक पौराणिक कथा, सामाजिक कथा, नैतिक बोधप्रद कथा छापल्या गेल्या. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील प्रत्येक अंकात प्रामुख्याने किमान दोन कथा तरी छापलेल्या दिसतात.

**व्यक्तिविशेष कथा :-**

यामध्ये 'संजीवनी' व 'शिलाद्रव' या विठ्ठल सीताराम गुर्जर यांच्या कथा, 'गोविंदाची गोष्ट'[२७] ही शि. म. परांजपे यांची कथा, 'विजयी वीर' ही श्री. स. चुनेकर यांची कथा, रा. ह. दातार यांची 'लहरी की उपकारी', याचबरोबर 'राजकुमारी निहाल', 'विश्वास', 'काजुवाली', 'आबा', 'संध्या-छाया', 'आस्मान तारा', 'निःस्वार्थी उपकारकर्ता' ही हणमंत बाबुराव अत्रे यांची कथा, श्रीयुत हर्षे यांची 'तरी म्हटल सासूबाई', गणेश कृष्ण फाटक यांची 'आई! आई!'[२८], 'वासादुवे विनायक जोशी यांची 'रेवती'[२९], ल. श. सबनीस यांची 'सदुची आई', विष्णू गणेश देशपांडे यांची 'चंद्रजोत' ही कथा इ. महत्वाच्या कथा समाजजीवनातील विविध स्वभावाच्या व्यक्तीमत्वांवर प्रकाश टाकतात.

**प्रेमविषयक कथा, विवाह आणि कौटुंबिक जीवनावर आधारीत कथा :-**

यामध्ये श्रीनिवास विनायक गोरे यांची 'भग्नहृदया', वि. त्य. गर्दे यांची 'भिडस्त प्रेम'[३०], रामचंद्र हरि दातार यांची 'विजेची ज्योत', पांडुरंग लक्ष्मण पुंडलीक यांच्या 'प्रेम मीलन', 'चंद्राचे चांदणे', 'सौंदर्य की प्रेम', माधव कृष्ण आठल्ये यांची 'संगम' ही कथा, नारायण विनायक मुरलीकर यांची 'प्रेमदुर्ग'[३१] ही कथा, 'प्रेमाची त्रिकोणामिती'[३२] ही सदानंद यांची कथा, 'अभिसारिका' इ. कथा प्रेमातील विविध भावभावना, विकार यावर भाष्य करतात.

यामध्ये उमाकांत ठोंबरे यांची 'उपरतीचे क्षण', श्रीयुत विठ्ठल सीताराम गुर्जर यांची 'हिंदु', र. वि. दामले यांची 'पौर्णिमेचे गंगास्नान', वीरानुयायी यांची 'विषारी वैभव', द. र. जोशी यांची 'स्वयंवर', पुरुषोत्तम यांची 'माझ्या मधुसाठी', ज. ना. ढगे यांच्या 'नशीब उघडले', 'साखरपुडा', ना. स. करंदिकर यांची 'मिनाक्षी जमशेट विवाह', दुर्गाबाई निबंकर यांची 'निराश्रित'[३३], शं. ना. सहस्त्रबुद्धे यांच्या 'पहिली मंगळागौर', 'शिपाई गडी', 'तारेचा आत्मयज्ञ'[३४], 'पुरुषाचे मन', 'विनायक व जमना', द. रा. रायरीकर यांची 'पुनर्विवाह'[३५], शांता अष्टपुत्रे यांची 'आगीतून फोफाट्यात' इ. कथा महत्वपूर्ण आहेत. नातेसंबंध व कौटुंबिक सांसारिक जीवनाचे चित्रण यात आढळते.

## वास्तववादी कथा :–

यामध्ये समाजजीवनातील विविध जीवनाअनुभवांचे चित्रण आढळते. यामध्ये अनंत ज्ञानेश्वर कुलकर्णी यांची 'माझं बाळ', अनंत गोविंद जोशी यांची 'गर्भदरिद्री गोविंदराव', वि. वा. जोशी यांच्या 'एम. ए. नसलेला एम. ए.' व 'शहरात गेल्यावर', विजय यांची 'पवित्र गुन्हा' ही कथा, विठ्ठल सीताराम गुर्जर यांची 'पाप मोचन', पी. नाथ रेगे यांच्या 'कक्षेबाहेर', 'डोंगरदऱ्यातले खेळगडी' व 'तिन सांगितले होते', ल. ब. भोपटकर यांची 'हायकोर्टातील निराशा', सी. के. दामले यांची 'रंगराव आणि यादवराव अथवा संपत्तीचे रहाटगाडगे' सखाराम गोविंद विरकूड यांची 'नायक होण्याची हौस', राजाराम नारायण यांची 'सुडाची भयंकर कल्पना', 'असुरीजग', 'पायातील दगड', 'गरिबाचे संसार', 'बानेदार जमिनदार', 'सर्कस बहादुर'[३६], 'करमणूक', 'संन्याशाची', 'स्मरणवही', 'कलेची मर्यादा', 'भाड्याने देणे आहे', 'बंगला आणि झोपडी', 'रक्ताची ओढ'[३७] 'तडजोड', 'शकुनी घोडा', 'माणसाची जात', 'एका पीडीची आत्मकथा', 'ग्रामपंचायत' ही के. ना. डांगे यांची कथा', बि. वा. बोकील यांची 'मध्यमवर्ग लोपी समास' ही कथा तसेच 'श्रीमंती आली', 'काळ आला होता', 'वृद्धाश्रम'[३८], 'कर्जफेड', 'माझ्या वकिलीची फी', 'धर्मशाळेत', 'लालदिवा' इत्यादी कथा महत्वाच्या आहेत.

## बोधप्रद कथा :–

यामध्ये नैतिक मुल्य, शिकवणूक देणाऱ्या कथांचा समावेश होतो. यामध्ये 'गुप्त ठेवा' ही त्र्यं. र. देवगिरीकरांची कथा, 'साविद्या या विमुक्तये', 'तेजस्वी तारे', 'राजाभिषेक', 'कर्तव्य की प्रेम', 'केवळ वचनाकरता', 'कर्तव्य आणि परमार्थ', 'सध्याचे कर्तव्य', 'सिंहिणीची शिकार', 'दैवायत्तं फुले जन्म'[३९] ही सौ. लीला आफळे यांची कथा, 'काश्मीरातील सती–पद्मा', 'नास्तिक', 'जागी झालेली माणुसकी', 'टोळभैरव', 'आशेची फुले', 'त्याग', 'आमची कुळी', 'गुंडाची पैदास', 'सर्वत्र काळा बाजार', 'डोळे उघडले', 'संशयाचा खेळ'[४०], 'गुणाकाराने गुण उधळले', 'राजाचा जयजयकार असो', 'फाशी की काळेपाणी', 'भाऊबंदकी', 'हा न्याय देवाचा की सैतानाचा', 'धर्मवेडेपणा', 'ठिणगीचा पेट', 'हक्काची जाणिव', 'दोन प्रवासी', 'हात दाखवून अवलक्षण', 'मृगजल', 'देवाची अक्कल' या सीताराम नरसिंह पटवर्धन यांची कथा, 'जीवनाचे तत्व', 'चुकलेली गाडी', 'सुड व क्षमा', 'मोत्याची

माळ ही विनायक शिवराम परांजपे याची कथा', 'कृतज्ञता', 'आंधळी कोशींबीर', 'स्मारक', 'सतीचे वाण' ही द. का. हसमनीस यांच्या कथा, 'खडकावरच्या जाईजुई', 'आश्रुची होळी', 'समाधी', 'चकवा', 'गालबोट', 'परिवर्तन', 'प्रतिमा', 'संकल्प', 'माणूस', 'दिपमाळ', 'चुकलेला मार्ग'[४१], 'मानवाचे वैरी', 'पितृहृदय' इ. बोधप्रद कथा महत्वाच्या आहेत.

## इतिहासविषयक कथा, पौराणिक कथा :–

यामध्ये 'लढवाय्यक बंध'[४२] 'ऐतिहासिक गजेंद्रमोक्ष', 'कोंदणगडचा किल्लेदार'[४३] या मा. द. गोखले यांच्या कथा, 'राणी कुरंगी' ही विनायक लक्ष्मण बर्वे यांची कथा, 'सत्तावन सालानंतर', दा. न. शिखरे यांची कथा, 'शिलेदार' ही विष्णु गणेश देशपांडे यांची कथा, 'बजरंगाची देशसेवा' ही शिवाजी महाराजांच्या वेळची गोष्ट, 'हिंदु धर्माचा जयजयकार' ही प्राचीन बुद्ध काळची गोष्ट, 'पिंडीवरील विंचु'[४४] ही संभाजी महाराजांच्या दुर्वतनाविषयीची गोष्ट, 'ऐश्वर्याची इतिश्री' ही नादिर शहाने दिल्लीवर आक्रमण केले त्यावेळीची गोष्ट, 'शिवाजीचा दोस्त' ही त्र्यं. र. देवगिरीकर यांची गोष्ट इत्यादी ऐतिहासिक गोष्टी महत्वाच्या आहेत. याशिवाय 'ऐतिहासिक गोष्टी' या सदराअंतर्गत कै. लोकहितवादी यांनी लिहिलेल्या ऐतिहासिक थोर पुरुषांच्या गोष्टी येथे दिल्या गेल्या. यामध्ये 'नानांनी युक्ति लढवली', 'साहसी गोविंदपंत', 'दिवाण व तपकीरवाले', 'हत्तीची परिक्षा', 'रामशास्त्री आणि पुनर्विवाहाचा प्रश्न', 'खर्ड्याच्या लढाईतील निजामाचे हत्ती', 'नानांची दिनचर्या', 'चाळीला हात लावण्याचा अधिकार', 'हजामाला शालजोडी', 'इंग्रजाला काढण्याचे मसलत' अशा छोट्या छोट्या कथा या सदराअंतर्गत दिल्या गेल्या.

पौराणिक कथा, यामध्ये 'दंडकारण्यातील प्रणयिनी', 'शिष्ठाई व्यर्थ गेली' ही कौरव पांडवाच्या भांडणामध्ये श्रीकृष्णाची शिष्ठाई व्यर्थ जाऊन युद्ध कसे घडले याची कारणमीमांसा आहे. याचबरोबर 'सुवर्णपुरीची कथा', शि. म. परांजपे यांची 'मदन दहन'[४५], गौतमपुत्र यावर आधारित वा. गो. आपटे यांची 'शेवट गोड झाला' ही गोष्ट, 'पितृहत्या का प्रियाराधन'[४६] ही केशवाग्रजांची कथा, 'मंकणऋषीची गोष्ट' ही कथा इत्यादी महत्वपूर्ण आहेत.

## ५.४ चित्रमय जगतमधील कविता :–

## सामाजिक कविता :–

'शांति! शांति! शांति!' या सीताराम केशव दामले यांच्या कवितेमधून कुंटुब कलह, नातेसंबंधातील तणाव, स्वार्थ कसा वाढत चालला आहे व त्यामुळे मानवी जीवन कसे कलहयुक्त झाले आहे याची प्रचीती येते. पशुपक्षांच्या जीवनात असणारा आनंदीभाव याचाही उल्लेख यात करुन कवी शांतिमय सहजीवनाचा संदेश यात देत आहे.

'आहेस अझुनि कां मुल मानवा' या लक्ष्मण हरि वराडकर यांच्या कवितेमध्ये लौकिक जीवन, या जीवनाची आसक्ती, त्यामधील भ्रमनिरास याविषयी चर्चा केली आहे व समाज सेवेचा दिव्य संदेश दिला आहे. 'साहेबांचा पट्टेवाला' या कृष्णाजी हरी जोगळेकर यांच्या कवितेमध्ये दारुचे व्यसन मानवाची सामाजिक प्रतिष्ठा कशी नष्ट करते याविषयी माहिती दिली आहे.

'कोण स्वातंत्र्य!' या कवितेमध्ये भारतीय समाजातील सामाजिक व आर्थिक विषमता याकडे कवि अनंततनय यांनी लक्ष वेधले आहे. स्वातंत्र्य ही संकल्पना केवळ राजकीय नसून ती सामाजिक, आर्थिक कशी आहे यावर प्रकाश टाकला आहे.'आजच्या महाराष्ट्रास' या कवितेमध्ये कवि अनंतराव कृष्णाजी टेकाडे यांनी महाराष्ट्रीयन जनतेस नैतिक व राष्ट्रीय आवहन केले आहे व महाराष्ट्रीय जनतेस सामाजिक वास्तवतेचे भान करुन दिले आहे.

'त्रिवार वंदन' आणि 'कालचा महाराष्ट्र' या दोन्ही कवितांमध्ये कवि यशवंत यांनी महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचा परिचय करुन दिला आहे. इ.स. च्या पहिल्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत शक, हर्षवर्धन व औरंगजेब या तीन परचक्रापासून महाराष्ट्राचे रक्षण करण्यासाठी केलेला प्रयत्न व मराठ्यांची स्वातंत्र्यप्रिय वृत्ती याचा परिचय करुन दिला आहे. 'आजचे गाणे'[४७] यामध्ये अनंतराव कृष्णाजी टेकाडे म्हणतात की, इतिहासाच्या पाऊलखुणामधून समकालीन वास्तवता समजून घेतली पाहिजे व यातून बोध व धडा घेतला पाहिजे.

'इषारा'[५८] या रा. स. नारायण यांच्या कवितेमध्ये शहरी व ग्रामीण जीवनातील भेद स्पष्ट करुन हा भेद नष्ट न केल्यास अधोगती कडे वाटचाल होणार, मानव तावादाची समता बंधुतेची मुल्ये नष्ट होणार आहेत असे कवि निदर्शनास आणून देऊन यासाठीचा इषारा देत आहे. 'प्रबोधन' या अनंत कृष्णाजी टेकाडे यांच्या कवितेत प्रबोधन म्हणजे काय, समाज व धर्म सुधारणा याविषयीचे विचार मांडले आहेत. 'बंडवाला' या नारायण केशव बेहरे यांच्या कवितेत अनिष्ट रुढीविरुद्ध पेटून उठणाऱ्या व निकराने प्रतिकार करणाऱ्या बंडवाल्याचे वर्णन पहावयास मिळते. तर के. ना. नारखेडे यांच्या 'बंडवाला' या कवितेमध्ये कामगार वर्ग, त्यांच्या वर्ग जाणिवा याविषयीची माहिती मिळते. याचा समावेश मार्क्सवादी काव्य प्रकारात करता येईल.

'गुढीपाडवा' या अनंत टेकाडे यांच्या कवितेमध्ये नवविचार, आधुनिकतेची गुढी उभारण्यास सांगितली आहे. यशवंत या कवीच्या 'काल आज' या कवितेमध्ये भारतात होणारा सामाजिक बदल दाखण्याचा प्रयत्न केला आहे. 'कारकुनाचे गाणे' या कवितेमध्ये नोकरी करणाऱ्या कनिष्ट मध्यवर्गीय लोकांचा जीवनपट व त्याची धडपड उलगडून दाखवली आहे. के. ना. डांगे यांच्या 'मंदीर प्रवेशानंतर'[४९] या कवितेमध्ये इंदूर येथे मोठी मिरवणूक काढून हरीजनांनी गोपाळ मंदीरात प्रवेश मिळवला त्याला अनुलक्षून दलितांना आलेल्या आत्मभानाचे वर्णन यात केलेले आढळते. तर त्यांच्या 'सुशिक्षिते' या कवितेत शिकलेल्या माणसाचा अहंभाव व आपल्या समाजकडे बघण्याची हिनकस वृत्ती, प्रस्थापित व्यवस्थेला बदलण्याऐवजी दोष देऊन दुर्लक्ष करण्याच्या वृत्तीवर कडक प्रहार केला आहे.

'ये शांतिदुत' या श. दि. गायतोंडे यांच्या कवितेत स्वातंत्र्य युद्धाच्या काळात झालेल्या जातीय दंगलीच्या पार्श्वभूमीवर गांधीजींना समस्या निवारण करण्यासाठी खेड्यातील जनतेने केलेले आवहन शब्दबद्ध केले आहे.याशिवाय लोकमान्य टिळकांच्या पुण्यस्मरणावर आधारीत त्यांना आदरांजली देणाऱ्या अनेक कविता यात छापल्या गेल्या.स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक विषयावर वाहिलेल्या कवितांमध्ये राजा मंगळवेढेकर यांची 'माणसालाही मृत्यूभय गुढ' या कवितेत जन्म मृत्यूविषयी मानवीभावभावनांचे चित्रण केले आहे. 'माझा भारत देश' या अनंत पोतदार यांच्या कवितेमध्ये स्वातंत्र्यउत्तर काळातील वेश, धर्म, वर्ण, जात विषयक वैविध्य असणाऱ्या भारताविषयीच्या भावना सांगितल्या आहेत. 'शेतकरी जो आमुचा राजा'

यामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषी व्यवसायाचे असलेले महत्त्व, अन्नधान्याच्या स्वयंपुर्णतेचे ध्येय साध्य करण्यासाठी शेतकरी वर्गास केलेले आवाहन चित्रित केले आहे.

'नवे लक्ष्मी पुजन' ही गा. के. सहस्त्रबुद्धे यांची स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या आर्थिक औद्योगिक विकासास प्रोत्साहन देणारी ही कविता यात छापली गेली. 'मजुरांची नवी वसाहत' या के. ना. डांगे यांच्या कवितेमध्ये मुंबई शहराच्या कामगार लोकांच्या जीवन वास्तवाचे वर्णन केले आहे.'मराठी वरी प्रेम तुझे गे' या कवितेमध्ये मराठी भाषेची महती वर्णिली आहे. 'वसुंधरे तु सांग बरे' या ग. म. वैदय यांच्या कवितेमध्ये अमेरिका व भारताची नैतिक तुलना केल्यास भारत कसा सरस ठरेल यावर चर्चा केली आहे.'मराठवाडा विद्यापीठ' या बि. म. घुले यांच्या कवितेत मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या चळवळीचा आढावा घेतला आहे.

## निसर्ग विषयक कविता :–

यामध्ये 'दिव्य फुले' या यशवंत महादेव केणी यांच्या कवितेमध्ये निसर्गातील बदलाचा मानवी मनावर होणारा परिणाम वर्णीला आहे. निसर्गामधील विविध ऋतुमधील स्वभाव वैशिष्ट्ये मानवी स्वभावातही कशी आढळतात हे त्यावरुन समजते. 'पुष्पराज गुलाब' या रा. निफाडकर यांच्या कवितेमध्ये गुलाब पुष्पाचे भेट देण्याच्या पद्धतीमागील प्रयोजन याविषयी भाष्य केले आहे. 'देवी उषा' या कवि माधव यांच्या कवितेमध्ये ऋग्वेदामध्ये सुक्त ९२ मध्ये असलेल्या उषा देवीच्या प्रार्थनेचा मराठी अनुवाद दिला आहे. उषा ही पहाटेची देवी तिची स्वभाव वैशिष्ट्ये, पहाटेतील निसर्गातील व मानवी मनोविकारातील बदल यामध्ये वर्णीले आहेत.

'वसंत सत्कार'[५०] या कवितेमध्ये वसंत ऋतुवेळी निसर्गात येणारा बहर, नवचैतन्य मानवी मनासही कसे चैतन्य प्राप्त करुन देते याविषयी माहिती दिली आहे. अशाच प्रकारे 'सृष्टिदेवतेचा लग्नविधी' या कवि प्रद्युम्न यांच्या कवितेमध्ये निसर्गाच्या वसंत ऋतुमधील बदलामुळे सृष्टीला प्राप्त झालेल्या नववधु स्वरुपाची चर्चा केली आहे. याचप्रमाणे 'शरद सोहळा' या वासंती शहा यांच्या कवितेमध्ये शरद ऋतुमधील निसर्गातील बदल व सृष्टीला

प्राप्त झालेले नवरुप याचे वर्णन केले आहे. 'तीन बडे शिल्पी'[५१] या कवि हरिश यांच्या कवितेमध्ये शिशीर, शरद व ग्रीष्म या तीन ऋतुंना पृथ्वीचे निसर्गाचे शिल्पकार आहेत, अशा स्वरुपाची उपमा देऊन त्यासंदर्भाने त्यांच्या वैशिष्ट्यांची चर्चा केली आहे. वर्षाऋतुची महती सांगणारी काव्ये या मासिकात छापली गेली. त्यामध्ये 'वर्षाकाल आला' ही बळवंत खापर्डे यांची कविता, कवि अरविंद यांची 'वर्षाकाल' ही कविता, 'गर्द सावळ्या घनांनी' ही बाबा मोहोळ यांची कविता तर व. ग. खापर्डे यांची यामध्ये 'वर्षा' ही कविता महत्वाची आहे. वर्षा ऋतूचे स्वरुप, स्वभाव, निसर्गातील व मानवी भावभावनात त्यामुळे होणारा बदल याविषयीचे चित्रण केले आहे.

याशिवाय 'कोकिळेस' व 'पारव्यास' या कवितांमधून मानवाच्या मनातील हुरहुर, अगतिकता, भेटीची ओढ या भावनांचे चित्रण केले आहे. 'जीवंत झरा' या कवितेमध्ये झऱ्याचा गुढ, रम्य प्रवाह मानवाच्या जन्म मृत्यू सारखा गुढ कसा भासतो यावर चर्चा केली आहे. 'दुर्दिन' या कवितेमध्ये रा. अ. काळोखे निसर्गाच्या प्रकोपाचे भयंकर वर्णन केले आहे. तसेच वर्णन नारायण केशव बेहेरे यांच्या 'अमावस्येची रात्र' यामध्ये दिसते.

## इतिहासावर भाष्य करणाऱ्या कविता :–

चित्रमय जगतमध्ये राजकीय विषयास व राष्ट्रवादास प्रेरणा देणाऱ्या, राष्ट्र कार्यास जागृत करणाऱ्या अनेक कविता छापल्या गेल्या. यासंदर्भात स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य लढयास उद्युक्त होण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या व मराठ्यांच्या वैभवशाली इतिहासावर भाष्य करणाऱ्या कविता आढळतात. यामध्ये 'जिजाईचे आपल्या बापास उत्तर' या पं. वा. घाणेकर यांच्या कवितेमध्ये स्वराज्य निर्मितीची आंकाक्षा बाळगेलेल्या व आपल्या पतीच्या कार्यकर्तुत्वावर विश्वास असणाऱ्या जिजाबाईंनी आपल्या नातेसंबंधाचा विचार न करता आपल्या वडिलांना सुनावलेल्या परखड विचारांना काव्यरुपाने सादर केले आहे.

'शनवारवाड्यास पाहून'[५२] या सि. के. दामले यांच्या कवितेमध्ये पेशव्यांच्या राजधानीचे मुख्य केंद्र असणाऱ्या शनिवारवाडयाच्या वैभवशाली इतिहासाचे वर्णन केले आहे.तसेच त्याच्या सध्याच्या दुरावस्थेबद्दल चिंता व्यक्त करुन त्यास पुन्हा पुनःवैभव प्राप्त करुन देण्यासाठी

मराठी तरुणास आवाहन केले आहे. ‘शिवरायांचा धावा’ या स. कृ. कोल्हाटकर यांच्या कवितेमध्ये पारतंत्र्यातून भारतीयांची सुटका करण्यासाठी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांच्या विचार व कृतीला पुन्हा उजागार करणे गरजेचे आहे असे वर्णन केले आहे. याच धर्तीवरील कवि अरविंद यांची ‘भगवा झेंडा’ ही कविता महत्वाची आहे. ‘रायगडावर वीज चमकली’ या वसंत खापर्डे यांच्या कवितेमध्ये शिवाजी महाराजांच्या कामगिरीचे वर्णन करुन स्वराज्य, स्वभाषा आणि स्वधर्म टिकवण्यासाठी त्यांनी कसे प्रयत्न केले याची माहिती दिली आहे.

‘पेशवाईचा अखेरचा आघात’[५३] या शारदाबाई बापट यांच्या कवितेमध्ये नाना फडणीसांनी सवाई माधवरावांच्या इच्छेविरुद्ध नागनाथास हत्तीच्या पायी दिले तेव्हापासून श्रीमंत सवाई माधवरावांची प्रकृती बिघडून त्यांनी कारंजावर उडी मारुन आपले जीवन संपवले त्या प्रसंगास अनुलक्षुण हे काव्य केले आहे. ‘बंदिवान तलवार’ या अनंतराव कृष्णाजी टेकाडे यांच्या कवितेमध्ये दिल्लीतील मुघलांच्या किल्यामध्ये ऐतिहासिक वास्तुसंग्रहालयात दृष्टीस पडलेल्या कपाटातील समशेरीस पाहून हे काव्य लेखकास सुचले. यामध्ये निष्क्रिय तलवार पुन्हा क्रियाशील होणे कसे गरजेचे आहे याविषयी भाष्य केले आहे. ‘मुरारबाजी’ या कवि अरविंद यांच्या कवितेमध्ये व ‘वीर विश्वास’ या अनंततनय यांच्या कवितेत मराठ्यांच्या इतिहासातील वीर पराक्रमी पुरुषाच्या कार्य कर्तुत्वाची महती दिली आहे. ‘पावनखिंडीचा गाझी’ या दु. आ. तिवारी यांच्या कवितेमध्ये बाजीप्रभु देशपांडे यांच्या पावनाखिंडीतील पराक्रमाची माहिती वर्णीली आहे. ‘पानिपतावरची मध्यान्ह’ या शांताराम अवळसकर यांच्या कवितेमध्ये मराठ्यांच्या पानिपतावरील पराभवाची कारणमीमांसा केली आहे. त्याचप्रमाणे ‘बेभान नरसाळा’ यामध्ये फिरंगोजी नरसाळा या चाकणच्या किल्लेदाराच्या पराक्रमाचे वर्णन येते. ‘शिवाजी व नेपोलियन’ या सीताराम बाळकृष्ण जोशी यांच्या कवितेमध्ये या दोन्ही महान राष्ट्रपुरुषांची तुलना केली आहे. तर ‘यमुनेच्या तीरावर’ या कवितेमध्ये मुघलसत्तेच्या वैभवशाली इतिहासाच्या ऱ्हासाचे चित्रण यमुना नदी कसे करत आहे हे काव्यरुपाने सांगीतले आहे.

कर्नाटकातील धोंडो वाघ नावाच्या सरदारास वठणीवर आणण्यासाठी दुसऱ्या बाजीरावाने धोडोंपत गोखले यास पाठविले. गोखले यांनी आपला पुतण्या बापु गोखले

(महाराष्ट्राचे शेवटचे सेनापती) यास बरोबर घेतले. यावेळी झालेल्या लढाईत धोंडोपंताना वीर मरण आले. त्यावेळी त्यांची उत्तर क्रिया करण्यासाठी आलेल्या बापूंना चुलतीने पुन्हा मोहिमेवर पाठविले व धोंडो वाघाचा वध केल्याशिवाय उत्तर क्रिया होणार नाही असे सांगितले त्यावेळचा प्रसंग अनंततनय यांनी 'महाराष्ट्र विदुला' यामध्ये रंगवला आहे. 'मुसलमान बनु मी कैसा' या बा. वा. खाडिलकर यांच्या कवितेमध्ये औरंगजेबाने संभाजी महाराजांना कैद केल्यानंतर त्यांच्यावर केलेल्या धर्मांतराच्या सक्तीच्या प्रसंगाचे वर्णन करुन संभाजी महाराजांचा हिंदुधर्माभिमान वर्णिला आहे.

## देशभक्तीवर आधारीत कविता :-

यामध्ये कवी श्रीनिवास यांच्या 'हिंदमातेचा पुत्रशोक' या कवितेमध्ये आणि 'शापित महाराष्ट्र' या गिरीष यांच्या कवितेमध्ये स्वैराचारी उदासीन भारतीय तरुणांना राष्ट्र कार्यासाठी उद्युक्त केले आहे. भारतातील थोर पुरुषांनी बजावलेल्या कामगिरीची माहिती देऊन असे सुपुत्र काळाच्या पडद्याआड गेल्यामुळे भारतमाता शोक करीत आहे. अशाप्रकारे पुन्हा असे वीरपुरुष भारत मातेच्या रक्षणासाठी जन्मास यावेत असा विचार या कवितेमध्ये मांडला आहे. वि. दा. सावरकर यांच्या 'सागरास' या कवितेने त्याकाळातील तरुणांस राष्ट्रप्रेमाने भारावू सोडले होते. तर कृ. अ. बेहरे यांच्या 'सप्तर्षी' कवितेने ब्रिटिशविरोधी भावना तीव्र केल्या होत्या. 'स्वराज्य आहे जन्मसिद्ध हा हक्कचि माझा खरा' या कवितेत तसेच 'उठा जागे व्हा उठा' या. द. प. चिंचाळकर यांच्या कवितेमध्ये पारतंत्र्यातील भारतीयांना स्वराज्य प्राप्तीसाठी उद्युक्त केले आहे.

'अश्रु हो! कशाला आता करितसा आंधळे डोळे' हे दुसऱ्या बाजीरावाच्या कन्या कुसुमाबाईसाहेब आपटे यांनी पेशवे घराण्याची सत्ता नष्ट होऊन राजसत्ता जाऊन दुर्दैव पदरी पडल्याने शोकमय काव्य रचले आहे.ब्रिटिशांच्या दडपशाहीच्या धोरणामुळे स्वातंत्र्यचळवळीत सहभागी असणाऱ्या अनेक भारतीयांना ब्रिटिशांनी कैदेत टाकले होते, त्यांना उद्देशून एका वीरमातेचे उद्विग्न विचार दु. आ. तिवारी यांनी 'वीरमाता व बंदीवान पुत्र' या कवितेत मांडले आहेत.

'महाराष्ट्र शारदेस' या ग. त्र. माडखोलकर यांच्या काव्यात महाराष्ट्राच्या वैभवशाली ऐतिहासिक परंपरेचे महत्व सांगितले आहे.कवि अनंततनय यांनी 'दुःख क्षोभाचे सुस्कारे' व 'नमस्कार त्या लोकमान्यग्रणीला' या कवितांमध्ये लोकमान्य टिळकांच्या मृत्युमुळे महाराष्ट्रीय जनतेमध्ये पसरलेल्या दुःखाच्या सावटाचे वर्णन केले आहे. 'खादी माहात्म्य' या मुकुंदराय यांच्या आणि 'गांधी टोपी' या मुकुंद लोंढे यांच्या कवितेमध्ये महात्मा गांधी, त्यांची असहकार चळवळ, स्वदेशी व बहिष्काराची संकल्पना काव्यबद्ध केली आहे. 'हिंद माते' व 'भाारत' या केशवतनय यांच्या कवितेत व 'भारत' या गो. ना. कारखानीस यांच्या कवितेत तसेच 'मायभूमीची हाक' या रघुनाथ सरंजाम यांच्या कवितेमध्ये पारतंत्र्यातील भारताची बिकट अवस्था, गुलामगिरी, उदासीन वृत्ती यावर प्रकाश टाकून स्वराज्य प्राप्तीच्या ध्येयासाठी कार्यप्रवीण होण्यासाठी आवाहन करणारे काव्य केले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय किंवा राष्ट्रीय विषयाला वाहिलेल्या कवितांमध्ये पुढील कवितांचा समावेश होतो. कवि शरद यांच्या 'जय जय महाराष्ट्रदेशा' व 'जयजय भारत' या कवितांमध्ये स्वातंत्र्य प्राप्ती झाल्यामुळे भारताच्या जयघोषाचे व या पवित्रभूमीच्या वैभवशाली परंपरेचे कौतुक केले आहे. 'काश्मिरची कुलवधू'[५४] या कवितेमध्ये काश्मिरची समस्या, पाकिस्तानची वक्रदृष्टी, सततची आक्रमणे यावर वास्तववादी काव्य केले आहे. हे काव्य मुळचे मिर्झा आसिफ या नवोदित काश्मीरी कवीचे आहे. त्याचा अनुवाद दिनकर देव यांनी केला आहे.

'भारत प्रशस्ती' या अ. कृ. टेकाडे यांच्या कवितेमध्ये भारताची स्वातंत्र्यप्राप्ती, दीर्घ संघर्ष, त्यात मिळालेले यश, लोकशाही, सार्वभौम, धर्मनिरपेक्ष राज्य व्यवस्थेची स्थापना या संदर्भात काव्य केले आहे. भारताची फाळणी झाल्यामुळे व त्यानंतर निर्माण झालेल्या जातीय दंगलीमुळे स्वातंत्र्य प्राप्त होऊनही आनंदाचा हिरमोड झालेला दिसतो. त्या संदर्भात राजा व्यवहारे यांची 'स्वप्न विध्वंसक' ही कविता महत्वाची आहे. 'अनाहूत' या कवितेमध्ये स्वातंत्र्यप्राप्तीच्या वाटचालीची सुंदर चर्चा केली आहे. या संदर्भात 'धन्यजीवन' व 'उगवला स्वातंत्र्याचा सुर्य' या स. वा. दीक्षित यांच्या कविता महत्वाच्या आहेत.

स्वातंत्र्य प्राप्तीमध्ये महत्वाची भूमिका निभावणारे राष्ट्र पुरुष यांच्यावरही अनेक कविता रचल्या गेल्या यासंदर्भात 'महात्माचे महाप्रयाण' नमस्ते महात्मन, 'पंडितजीचे मृत्यूपत्र' या कविता महत्वाच्या आहेत.

## ५.५ चित्रमय जगत मधील नाट्यलेखन :-

'भारतनाट्य समाज व नाट्य संमेलन' या लेखामध्ये भारत नाट्य समाजातर्फे भरविण्यात आलेल्या नवव्या नाट्य संमेलनाची माहिती दिली आहे. यामध्ये नाट्यकला, या कलेकडे रसिक-अरसिक समाजाची पहाण्याची दृष्टी, नाटक व राजकीय चळवळीचा संबंध त्यामुळे ब्रिटिश सरकारचा त्यावर असलेला रोष, निव्वळ मनोरंजनात्मक नाटके, पाश्चात्य नाट्यसृष्टीचा मराठी नाट्यकलेवर झालेला परिणाम, नाटकाचा उपयुक्ततावादी पैलु यावर यात चर्चा करण्यात आली आहे.

'चंद्रगुप्त'[५५] या लेखामध्ये न. चि. केळकर यांनी लिहिलेल्या नविन नाटकावर समीक्षापर लेखन केले आहे. नंद घराण्याचा नाश, मौर्य घराण्याची स्थापना, यामध्ये कौटिल्याने चंद्रगुप्तास केलेली मदत, अपमानाचा बदला घेण्यासाठी नंद घराण्यातील हरनंदाने चंद्रगुप्ताविरुद्ध केलेले कारस्थान, चंद्रगुप्ताचे कुळ, चंद्रगुप्त व तारिणी यांचे संबंध यावर प्रकाश टाकला आहे. त्याचबरोबर नाटकाचे कथानक, संवाद, अंक, भूमिका याविषयीही माहिती दिली आहे.

'विद्याहरण नाटक'[५६] या लेखाचा लेखक एक प्रोफेसर असून या नाटकांचा सारांश यात दिला असून यामधील शुक्राचार्याची व्यसनाधिनता, अधिराजाची मुढता, कपटी युवराजाचा उताविळ व अप्पलपोटेपणा यामुळे संजीवनी विद्या कच कसा हरण करतो याविषयी हे नाटक आहे. या संदर्भात या नाटकाच्या शिर्षकनामावर चर्चा केली आहे. यामध्ये विद्याहरण या शिर्षकाशिवाय दिव्यप्रेम किंवा सुरानिबंध असे नावही यास कसे शोभले असते यावर चर्चा केली आहे.

'संगीत विद्याहरण' यामध्ये प्रसिद्ध नाटककार आणि कांचनगडची मोहना, सवाई माधवरावांचा मृत्यू, कीचकवध, बायकांचे बंड व प्रेमध्वज या गद्य आणि संगीत मानापमान या

संगीत नाटकाचे सुप्रसिद्ध लेखक कृ. प्र. खाडिलकर यांनी लिहिलेल्या संगीत विद्याहरण या नाटकाचे परिक्षण यात केले आहे. किर्लोस्कर संगीत नाटक मंडळींनी हे नाटक रंगभूमीवर आणले. त्याचा सारांश यात दिला आहे. यामध्ये देवदानवाच्या युद्धात दानवाची सरशी, दानवगुरु शुक्राचार्य यांच्याकडे असणारी संजीवनी विद्या, देवगुरु ब्रहस्पती पुत्र कच याने विद्या मिळविण्यासाठी शुक्राचार्याचे पत्करलेले शिष्यत्व, शुक्राचार्याची मुलगी देवयानी हिच्या सोबत कचाचे प्रेमसंबंध, शुक्राचार्याची व्यसनाधिनता यावर यात भाष्य केले आहे.

'चारुदत्त आणि मृच्छकटिक' या शिवराम महादेव परांजपे याच्या लेखामध्ये सुप्रसिद्ध प्राचीन नाटककार भासाचे चारुदत्त व शुद्रकाचे मृच्छकटिक हे नाटक, यांच्यामध्ये असणाऱ्या साम्यस्थळावर येथे चर्चा केली आहे.भास कविच्या चारुदत्त नाटकावरुन आपले मृच्छकटिक नाटक बनविताना शुद्रकाने केलेले फेरफार यात निर्देशित केले आहेत. स्थल, काल व साहित्यिक दृष्ट्या शुद्रक व भास या दोन्ही कविच्या नाट्यविषयक दृष्टीकोनाची तुलनात्मक चर्चा यात केली आहे.

'कृष्णार्जुन युद्ध'[५७] या नाटकाचे गणेश विठ्ठल कुलकर्णी यांनी चित्ताकर्षक नाटक मंडळीने रंगभूमीवर आणलेल्या न. चि. केळकर लिखित कृष्णार्जुन युद्ध या नाटकाचे परिक्षण यात केले आहे. केळकर यांनी केसरी व मराठा या दोन वृत्तपत्रांच्या संपादनाची जबाबदारी सांभाळून हे नाटक लिहिण्यापूर्वी नाट्यलेखनाच्या त्यांच्या पूर्वानुभवाचीही माहिती दिली आहे. यापूर्वी त्यांनी नवरदेवाच्या जोडीगोळीने, सरोजिनी, तोतयाचे बंड, चंद्रगुप्त इ. नाटके लिहिली आहेत. त्यानंतरचे पौराणिक नाटक म्हणजे कृष्णार्जुन युद्ध होय. कौरव पांडवांच्या युद्धानंतर कृष्ण आणि अर्जुन वनक्रिडेसाठी जातात. येथे नारदमुनी प्रकट होऊन सर्व जग स्वार्थ प्रेमावर चालले आहे असे उद्गार काढतात. ही गोष्ट दोघांनाही पटत नाही, तेव्हा केलेले उद्गार सिद्ध करुन देण्यासाठी नारद दोघांमध्ये युद्ध कसा घडवून आणतो असे हे नाटक आहे. जगाच्या प्रत्येक व्यवहाराच्या मुळाशी स्वार्थाचा अदृश्य हेतु असला तरी हे तत्व विषद करुन सार्वत्रिक प्रेमाचा फोलपणा सिद्ध करुन दाखवणे अनिष्ट आहे असा सुचक संदेश यात दिला आहे.

'रा. खाडिलकर यांचे सत्वपरिक्षा नाटक'[५८] या लेखामध्ये रा. खाडिलकर यांची लेखणी व नाट्यप्रतिभा, कथा प्रसंगाची निवड यावर यात चर्चा केली आहे. तसेच महाभारतातील

हरिश्चंद्राची कथा या नाटकात वर्णन केली आहे. खाडिलकरांच्या लेखणी संदर्भात येथे एक गोष्ट नमुद केली आहे की, खाडिलकरांची नाटके केवळ करणमणूकीसाठी नसून त्यामध्ये नितीतत्वे अथवा लोकशिक्षणाचे धडे कसे दिले जात यावर भाष्य केले आहे. या अनुषंगाने प्रस्तुत नाटकाचे कथानक, त्यातील गुणदोष, पौराणिक कथा, प्रस्तुत नाटकातील भाषा, स्वभाव, संवाद नैपथ्य यावर चर्चा केली आहे.

'प्रियदर्शिका व नागानंद ही नाटके कोणाची'[५९] या शि. म. परांजपे यांच्या लेखामध्ये प्राचीन काळी होऊन गेलेला महान नाटककार भास याविषयी माहिती दिली आहे. त्याने लिहिलेल्या नाटकांमध्ये रत्नावली, प्रियदर्शिका व नागानंद या तिन्ही नाटकांचाही समावेश होतो; असे काहींचे मत आहे परंतु वरील तीन नाटकांचे कर्तेपण नाटकातील प्रस्तावनेतील निर्देशनानुसार श्री हर्ष नामक राजाकडे जाते. परंतु सुप्रसिद्ध काव्यप्रकाशकार मम्मभट्ट यांच्या मते हर्षाच्या दरबारी धावक नामक कवी होता त्याने ही नाटके लिहिली व राजाच्या नावाने प्रसिद्ध केली. त्याबदल्यात हर्षाने त्याला भरपूर धन दिले. हा धावक कवि म्हणजेच भास असावा असे मम्मटभट्ट म्हणतात. कारण धावक कपडे धुणारा परीट व भासकवि हा पण परीटच होता. त्यामुळे भास म्हणजेच धावक होय. असे त्यांचे म्हणणे आहे. याशिवाय नाटकामधील साम्य स्थळाचा उल्लेख ही लेखकाने केला आहे. वरील नाटके भासाच्या इतर नाटकांशी साम्यता कशी दर्शवतात यावरही प्रकाश टाकला आहे. प्रियदार्शिका मध्ये शारदातप, कन्यकादर्शन, लता वृक्षावरील प्रेम, गायनवादन, उदबंधन, पायवंदन यांचे उल्लेख येतात. हेच उल्लेख मृच्छकटिक व नागानंदामध्ये येतात. यावरुन या नाटकाचे कर्तेपण भासकडे जाते. हे लेखक सिद्ध करतो.

'पहिलीच दोन संगीत नाटके' या अनंत वामन बरवे यांच्या लेखात कै. आण्णासाहेब किर्लोस्करांनी मराठीमध्ये संगीत नाटकांचा पाया घातला त्यानंतर संगीत नाटकात झालेली सुधारणा, विकास याविषयी या लेखात चर्चा केली आहे. संगीत नाटकांमध्ये संगीत हा नाटकाचा आत्मा असतो. परंतु संगीतामुळे अभिनयावर बंधने येतात, असे अनेकांचे म्हणणे असते, याचा लेखक विरोध करतो.लेखक म्हणतो की, प्रेक्षक हा अभिनयापेक्षा स्वरताल, लपेट, आलाप यामुळे जास्त खिळवून ठेवता येतो.

'संगीत संशयकल्लोळ' या गो. ब. देवल यांच्या नाटकांचे यामध्ये परिक्षण केले आहे. शृंगार व प्रेमकलहाची गुंतवणूक यात दिसते. सामाजिक शिक्षण व नितीमत्तेचा बोध देणारे हे नाटक म्हणून या नाटकाचे वेगळे महत्व सांगता येईल असे लेखक म्हणतो. 'खाडिलकरांच्या संगीत स्वयंमवर नाटकामबद्दल दोन शब्द' या भास्कर भैरव महाबळे यांच्या लेखामध्ये या नाटकात रुक्मिणी स्वयंमवराची कथा असली तरी रसपरिपोष, व स्वाभविक आविष्कारासाठी मुळ कथानकात नाटककाराने जो फेरफार केला आहे. यातील बरेवाईटपणा यावर या लेखात प्रकाश टाकला आहे.

'शाकुंतलेची महती' या दत्तात्रय पांडुरंग पाठक यांच्या लेखात 'शाकुंतलम' या नाटकातील शकुंतलाच्या व्यक्तीरेखेविषयी माहिती दिली आहे. शकुंतला व दुष्यंत यांच्यातील संयोगातील हृदयगम सौंदर्य, जडत्व, चंचलपणा व दुसऱ्या भेटीतील दिव्य सौंदर्य, स्वभावातील पावित्र्य, चारित्र्य याविषयी माहिती दिली आहे.'संगीत द्रौपदी' या वासुदेव विनायक जोशी यांच्या लेखामध्ये मयसभा, दुर्योधनाची क्रुरता इथपासून पांडवाचा वनवास इथपर्यंतचा भाग या नाटकामध्ये घेतला आहे. यामध्ये द्रौपदीची भूमिका बालगंधर्व यांनी वठवली असून त्यांचा प्रभावी अभिनय व गायनामुळे नाटक अधिकच प्रभावशाली झाले आहे. जुगार व त्याचे दुष्पपरिणाम या नाटकामध्ये चांगल्याप्रकारे दाखवले आहेत. याशिवाय नाटकातील संवाद, सुत्रधार भाषाशैली, विनोद यावरही यामध्ये प्रकाश टाकला आहे.'रा. खाडिलकरांची द्रौपदी' या भास्कर महावळ यांच्या लेखामध्ये, द्रौपदीच्या व्यक्तीरेखेबद्दलची माहिती दिली आहे. या नाटकातील मुख्य पात्र म्हणून कथेची मुळ रचना व महत्व या दृष्टीने उठावदारपणा, रसपरिपोष व परिणामकपणा यासाठी मुळ कथानकात केलेला फेरफार, द्रौपदीची व्यक्तीरेखा, चरित्र, अगतिकता, पतिसेवापरायणता यावर भाष्य केले आहे.

'कादंबऱ्या व नाटके' यामध्ये दोन साहित्यकलाकृती, नाटक व कादंबऱ्यांची स्वभाव वैशिष्ट्ये, लक्षणे, स्वरुप, साम्य, भेद यावर चर्चा केली आहे. त्यातील वस्तुस्थिती व कल्पना याविषयी माहिती दिली आहे.'एकच प्यालातील आंतर रहस्य' अनंत जनार्दन करंदीकर यांच्या या लेखामध्ये प्रचलित मन्वतंराच्या भीषण स्वरुपाचे वर्णन यात केले आहे. आनंदाभाव आणि

सौंदर्यहीन समाजाचे भीषण दृश्य गडकऱ्यांनी यात रंगवले आहे. आणि हेच या अप्रतिम शोककारी नाटकाचे अंतर रहस्य आहे असे लेखक म्हणतो.

'संगीत पटवर्धन नाटक' या दत्तात्रय रामचंद्र घारपूरे यांच्या लेखात सप्टेंबर १९२४ मध्ये पुण्यातील रे मार्केटजवळ झालेल्या गांधी भाषणाचा संदर्भ घेतला गेला आहे. या भाषणात गांधी असे म्हणाले होते की, 'महाराष्ट्रीयनांना खादीचे राजकारण कळत नाही, परंतु कौन्सिलातले राजकारण मात्र समजते. त्याचे कारण म्हणजे श्रद्धेचा अभाव ही गोष्ट लक्षात ठेवून श्री. टेंबे यांनी 'संगीत पटवर्धन' हे नाटक बसवले आहे. त्याचे मुळ कथानक द्रौपदीवस्त्र हरणाचे असले तरी द्रौपदीच्या श्रीकृष्णातील अढळ श्रद्धेबरोबर खादीलाही महत्व देण्यात आले आहे. ज्यांनी खादी हाती घेतली त्यांची मने श्रद्धायुक्त होती असे यात दाखवले आहे. खादी ज्या प्रमाणे शरीराचे रक्षण करते त्याप्रमाणे श्रद्धा असहाय्य मनाचे ही रक्षण करु शकते हे त्यांस सिद्ध करायचे असल्यामुळे पटवर्धन अंकातील संविधान अंकात खादीच्या राजकारणास महत्वाचे स्थान कसे दिले आहे, हे समजते.

'भवभुति व त्याची नाटके' यामध्ये वि. रा. तळाशीकर यांनी महावीर चरित्र, मालती माधव, उतरारामचरित्र यांचा कर्ता भवभूति याच्या साहित्यविषयक दृष्टीची माहिती यामध्ये दिली आहे. केवळ कल्पनारम्यवाङ्मयावर भिस्त ठेवून शास्त्रज्ञान व विद्वतेस कमी लेखणाऱ्या आधुनिक कलावंतासारखी सारस्वताविषयीची त्यांची कल्पना नव्हती हे लेखक स्पष्ट करतो. ही नाटके लिहिताना वेद उपवेद यांचा सुक्ष्म अभ्यास त्यांनी केला होता. सांख्य व योग या दर्शनशास्त्राचे परिशिलन त्यांनी केले होते. अशाप्रकारे भवभूतिच्या साहित्यदृष्टीचे महानत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. 'एकच प्याला आणि विद्याहरण' या लेखात अनंत गोविंद जोशी यांनी दोन्ही नाटकांची तुलना केली आहे व या दोन्ही नाटकांचे विषय, कल्पना, ध्येय एकच असून सुधारक व शुक्राचार्य या दोन्ही पात्राचे, व्यक्तीरेखेचे व्यक्तीमत्व सारखेच भासते. तरी सुद्धा एकच प्याला पेक्षा विद्याहरण हे नाटक सरस उदात्त व खोल विचारांचे आहे असे लेखक म्हणतो. 'एकच प्यालातील सिंधू' या कु. सखुबाई जोशी यांच्या लेखात सिंधू पात्राचे व्यक्तीमत्व, थोर पावित्र्य अगतिकता, कर्तव्य परायणता, चारित्र्य याविषयी चर्चा केली आहे.

'बालगंधर्व' या लेखामध्ये बालगंधर्व मराठी रंगभूमीचे मुकुटमणी व नटसम्राट कसे झाले याची माहिती दिली आहे. नाट्यसंगीतामधील स्त्री कलाकारांची गाणी, हावभाव व अभिनय यामध्ये त्यांनी कसे कौशल्य हस्तगत केले होते याविषयी माहिती दिली आहे. त्यांच्या स्त्री भूमिका स्त्रियांना लाजविण्या इतक्या प्रभावी होत्या. स्त्रियांचे सहज सुलभ हावभाव, लाडिक भाषा शब्दातील माधुर्य, लालित्य, नाटकाचे शास्त्रीयज्ञान याविषयी यात चर्चा केली आहे. 'मराठी रंगभूमीवर शेक्सपिअरचा अवतार', या द. रा. गोमकाळे यांच्या लेखामध्ये मराठी नाटककार खाडिलकर, कोल्हाटकर, गडकरी यांनी मराठी नाट्यतंत्रात शेक्सपिअरचे नाट्यतंत्र कसे अवगत केले, शेक्सपिअरच्या नाट्यरचनेचे सामर्थ्य मराठीत कसे आणले यावर चर्चा केली आहे.

## ५.६ चित्रमय जगत मधील जाहिराती :–

चित्रमय जगतमधून पुस्तके, औषधे, सौंदर्यप्रसाधने, साप्ताहिक, विविध संस्था, लग्न, ज्योतिष विषयक जाहिराती, खाद्यान्न, ट्रॅव्हल कंपनी, बँका, पतपेढ्या, कारखाने, आधुनिक यंत्रे यांच्या जाहिराती मोठ्या प्रमाणात दिसतात.

सुरुवातीच्या काळात पुस्तकांच्या व शालेय उपयोगी गोष्टीच्या जाहिराती देण्यास विशेष प्राधान्य दिलेले दिसते. इ.स. १९४० नंतरच्या काळातील, सौंदर्यप्रसाधने व औषधांच्या दिल्या गेलेल्या जाहिराती या तत्कालीन आरोग्य व सौंदर्याविषयी वाढत चाललेल्या जागृतीचा परिणाम आहेत हे समजते. तत्कालीन मध्यमवर्गाच्या व उच्चवर्णीयांच्या गरजा, आवडी निवडी, जीवन शैली ओळखून जाहिराती छापल्या गेल्या. दांपत्य जीवन व कुटुंब नियोजन याला प्राधान्य देणाऱ्या जाहिराती या विशेषत्वाने दिसतात. समााजाची मागणी तसा पुरवठा हा दृष्टीकोन या जाहिरातीवरुन दिसतो. जाहिरातीतून पैसे कमविण्याची धंदेवाईक वृत्तीही यातून दिसते.

वासुकाकांच्या काळात जाहिरातीतून पैसे कमवण्याची वृत्ती या मासिकातून दिसत नाही; परंतु नंतरच्या काळात मात्र ती स्विकारलेली दिसते. यामधून मासिकाच्या ढासळत चाललेल्या गुणवत्तेवरही व लोकप्रियतेवरही प्रकाश पडतो. चित्रमय जगतमध्ये अनेक जाहिराती या पुस्तक किंवा ग्रंथविषयक होत्या. यामध्ये नाटक, पाठयपुस्तके, रंगीत चित्रांची पुस्तके,

विविध गोष्टी, कादंबरी, धर्मविषयक ग्रंथ, ऐतिहासिक ग्रंथ, शास्त्रीय पुस्तके यांची प्रसिद्धी जाहिरात चित्रमय जगतमधून केली गेली.

नाट्यविषयक ग्रंथामध्ये 'कृ. प. खाडिलकरांची नाटके' या अंतर्गत संगीत मानापमान, भाऊबंदकी, बायकोचे बंड, सवाई माधवरावांचा मृत्यू, कांचननगडची मोहना इत्यादी नाटके ग्रंथ रुपात प्रकाशित झालेली जाहिरात चित्रमय जगतमध्ये वारंवार दिसते. याशिवाय 'देविचंद्रगुप्त', 'एकच प्याला', 'संगीत विद्याहरण', 'शाकुंतलम' या नाटकांच्या पुस्तकांच्या जाहिराती चित्रमय जगतमध्ये देण्यात आल्या होत्या.

शालेय पुस्तकांच्या जाहिरातीही चित्रमय जगतमध्ये छापण्यात आल्या. यापैकी काही इयत्ताची पुस्तके चित्रशाळा छापखान्याने स्वतः प्रकाशित केली असल्यामुळे प्रत्येक अंकात या शालेय पुस्तकांच्या जाहिराती ठरलेल्या असत. यामध्ये 'सचित्र अक्षरबोध', 'मुळाक्षरांचे चित्रयुक्त रंगीबेरंगी पत्ते', 'जनावरांचे पत्ते', 'म्यॅट्रीक स्कुल फायनल व इतर परिक्षासाठी विद्यार्थ्यांना उपयुक्त पुस्तके', 'पब्लीक सर्व्हिससाठी उपयुक्त पुस्तके', 'वाक्प्रचार व म्हणी', 'निबंधलेखन आणि अनुवाद', 'गुजराती, हिंदी, मराठी अक्षरबोध व लिपी', 'व्याकरण पुराणिक', 'सुलभ केकावली', 'इंग्लिश कपनियन टु मराठी व्याकरण', 'अलंकार विवेक', 'करण कौमुदी' इत्यादी व्याकरण व भाषेवर आधारित पुस्तकाच्या जाहिराती चित्रमय जगतमध्ये छापल्या जात. याशिवाय 'किनरे व लेले कृत इंग्लिश मराठी डिक्शनरी' ची जाहिरातही चित्रमय जगतमध्ये वारंवार प्रसिद्ध होत असे. गोष्टीच्या पुस्तकांच्या जाहिरातीमध्ये 'अरबी भाषेतील सुरस चमत्कारीक गोष्टी', 'लहान मुलांच्या चित्ररुप गोष्टी', 'चिमुकल्यांच्या गोष्टी' यांचा समावेश होता.

धर्मविषयक पुस्तकांच्याही जाहिराती यामध्ये होत्या. यामध्ये 'एकनाथ महाराजांचे सहा ग्रंथ' यामध्ये एकनाथी भागवत, श्री. एकनाथकृत रुक्मिणी स्वयंवर यांची जाहिरात येत असे. याशिवाय 'चातुर्मासाकरिता धार्मिक ग्रंथ' यामध्ये हरिविजय, भक्तिविजय, रामविजय, पांडवप्रताप, नवनाथ भक्तिसार, जैमिनी अश्वमेध भक्तमाला, भक्तिप्रेमामृत, शिवलीलामृत, श्रीगुरुचरित्र, शनिमहात्म्य, रुक्मिणीस्वयंमवर, शिवकथामृत, मत्स्यपुराण, लिंगपुराण इत्यादी ग्रंथाच्या जाहिराती येत असत.तत्वज्ञान विषयक पुस्तकांमध्ये 'अधिभौतिक सुधारणा',

‘परमार्थविचारमाला’ या पुस्तकांच्या जाहिराती येत. याशिवाय विज्ञानविषयक ग्रंथामध्ये ‘सृष्टिशास्त्र’, ‘प्राणीशास्त्र’, ‘पदार्थाविज्ञानशास्त्र’, ‘कीटकशास्त्र’ इ. पुस्तके चित्रशाळेने स्वतः छापली होती व त्याची जाहिरात दिली होती. आरोग्य आहार विषयक पुस्तकांच्या जाहिरातींमध्ये ‘लंघनचिकित्सा’, ‘सार्थ शारंगधरसंहिता’, ‘काय खावे आणि काय शिजवावे’, ‘निसर्गोपचार’ इ. चा समावेश होतो. दांपत्यजीवनावर आधारीत ‘कोकशास्त्र’, ‘कश्मिरी कोकशास्त्र’, ‘दांम्पत्य रहस्य विज्ञान’[६०] ‘संततीनियमनाची शस्त्रक्रिया’ इ. पुस्तके महत्वाची आहेत.

इतिहास विषयाशी संबंधीत ग्रंथाच्या जाहिरातीही मोठ्या प्रमाणात यामध्ये दिल्या होत्या. यामध्ये न्या. रानडे यांचे ‘मराठी सत्तेचा उत्कर्ष’, ‘ग्रांट डफच्या इतिहासावरील टीका’, ‘निः शस्त्राचे राजकारण’, ‘आशिया खंडाच्या पारतंत्र्याचा इतिहास’, ‘राजतरंगिणीचे साग्र व सटीक भाषांतर’, ‘मराठ्यांच्या लढायांचा इतिहास’, ‘पेशवाईतील प्रसिद्ध राजकारणी पुरुष सखाराम बापू यांचे चरित्र’, ‘पंडित जवाहरलाल नेहरु यांचे चरित्र’, ‘क्रांतिकारकांचा अप्रकाशित इतिहास’, ‘हिंदुस्थानची प्रचलित राज्यव्यवस्था’[६१], ‘भारत वर्षाचा धार्मिक इतिहास’, ‘राजवाडे यांचे लेखसंग्रह’, ‘बेनिटो मुसोलिनी’, ‘शिखांचा स्फुर्तीदायी इतिहास’, ‘जोसेफ मॅझिनी’, ‘राजकीय आठवणी’, ‘२० व्या शतकातील पहिल्या ५० वर्षाचा इतिहास’ ‘हिंदी सुमेरी संस्कृती’, ‘खादी शास्त्र’, ‘प्राचीन भारतीय ऐतिहासिक कोश’, ‘बार्डोली सत्याग्रहाचा इतिहास’, ‘थोरांचा परिचय’, ‘वसाहतीचे स्वराज्य’, ‘पहिले महायुद्ध’, ‘मुसोलिनी’, ‘गांधीचा अहिंसावाद’, ‘गांधी वाङ्मय’, ‘राजेंद्रप्रसाद’, ‘जवाहलाल नेहरु’, ‘१८७५ ची शिपाई गर्दी या ग्रंथाचा समावेश होतो.

## औषधांच्या जाहिराती :–

डोकेदुखीच्या औषधाच्या जाहिरातींमध्ये ’मेन्यॉलार्क’ औषधाची जाहिरात चित्रमय जगतात सुरुवातीच्या काळात छापली जात असे. तापाच्या औषधांमध्ये साफी ‘सोलर एग्युमिक्चर’, ‘कार्णिक एग्युमिक्चर’, ‘शक्तिसंजीवनी’, लोकमान्य टिळकांनी शिफारस केलेले ‘ज्वरबिंदू’ या औषधाची वारंवार जाहिरात केली जात असे.

पेनबामच्या अनेक जाहिराती यात प्रसिद्ध होत. यामध्ये 'अमृतांजन', 'इन्डोबाम', 'क्रिसंट बाम' यांचा समोवश होतो. त्वचाविकारावरील औषधांमध्ये 'गजकर्णाचे मलम' खरुज व नायट्यासाठी 'डायमंड मलम', 'के. बी. रेळे यांचे गजकर्णवरील मलम', 'त्वचाविकारासाठी सपट आणि कंपनी मुंबई यांचे 'सपटलोशन', 'रिगोझोन', 'बाबामलम' इ.ची जाहिरात येत असे. अँग्लो इंडियन ड्रग्ज अॅण्ड केमिकल कंपनी मुंबई यांची 'ऑडमन्स सायप्रस साल्व्ह' या पेनबामची जाहिरात प्रत्येक अंकात असे. पोटाच्या विकारावरील औषधांमध्ये वैद्य बाबा मायदेव यांचे 'वातनाशक चुर्ण', 'अग्निमाद्यनाशक चुर्ण', 'रक्तशुद्धीचुर्ण' आणि 'शौचशुद्ध लॅक्झिल चुर्ण', 'सुदर्शन चुर्ण' यांच्या जाहिराती दिल्या जात. डोळयांच्या विकाराशी संबंधी लोटसनी 'नेत्रांजन' या औषधांची जाहिरात प्रसिद्ध होत असे. मुत्रविकारामध्ये प्रमेह परमा, मुत्ररोगावरील गोनोकिलर याची जाहिरात येत असे.

शक्तिवर्धक औषधांमध्ये 'शुद्धशीलाजीत', 'सुदर्शन धातुपौष्टीक चुर्ण', 'टणकर यांचे टॉनिक सिरप', 'डाळिंबार्क मधू', 'द्राक्षार्कमधु', 'झेनिथ द्राक्षासव', 'झंडू द्राक्षासव' बंगाल केमिकल कंपनी कलकत्ता यांचा 'च्यवनप्राश' टॉनिक सर्वाकरिता यांचा समावेश होतो.

दंतमंजनाच्या जाहिरातींमध्ये 'दन्तधावन टुथ पावडर', 'डी.डी. पेस्ट', 'मीराडेंटल क्रीम व टुथ ब्रश'[६२],'दोस्त दंतमंजन', 'कोपरान टुथपेस्ट' यांचा समावेश होता. लहान मुलांच्या औषधांमध्ये 'डोंगरे यांचे बालामृत', 'लहान मुलांचे टॉनिक– श्री धृतपापेश्वर अरविंदासव याची जाहिरात', चित्रमय जगतमध्ये छापली जात असे. केसांच्या तेलामध्ये 'सुदर्शन तेल', 'संजीवन हेअर टॉनिक', 'रामतिर्थ ब्राम्हीतेल', 'लेनन्क्रीम' यांचा समावेश होतो.

स्त्री विकारांशी संबंधीत औषधांच्या जाहिरातींमध्ये दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स मुंबई यांचा 'बाळकडू व बाळंतकाढा', स्त्रीच्या निरोगी आरोग्यासाठी 'एम्ब्रोशिया', 'फॉस्फौरा', लेकुरवाळ्या बायांसाठी व भावी मातांसाठी 'युटरॉन', संतती सुख लाभण्यासाठी 'प्रेगनोल' व 'बाळ प्रसव योग' ही औषधे, मासिक धर्मातील स्वास्थ्यासाठी डॉ. पुरोहित फार्मसी यांचे 'शोधना' त्याचबरोबर संतती नियमनासाठी आवश्यक औषधांच्या व साधनांच्या जाहिरातीही यात दिल्या जात असत. यामध्ये संतती नियमन करणारा स्र्वोत्कृष्ट उपाय 'जमा ना फळ', डॉ. डी. जे. कुलकर्णी मुंबई यांच्या वितुळणाऱ्या गोळ्या, गर्भप्रतिबंधक औषध 'राहत',

गर्भधारणेस प्रतिबंध, एस. एच. खान मुंबई चर्चगेट यांचे 'थ्रीनॉट' बंद विटाळ चालु, बंद मासिक विटाळ सुरु होण्यासाठी 'ओनोन', गर्भ राहणार नाही यासाठी बंधकारक औषध 'मथुरा', संतती प्रतिबंधक रबरी साधने स्त्री पुरुषांकरिता हेल्थ ॲन्ड कंपनी मुंबई यांचा समावेश होतो.

याचबरोबर रक्तदोषावर 'सार्सापरिला', 'थंडी खोकला फुफ्फुसाच्या विकारावर चविष्ठ गोळ्या, 'प्युमिलेट' मधुमेहावर पटवर्धन यांच्या गोळ्या, कफासाठी 'कसविन' हे औषध, धन्वतरी फार्मसी पुणे यांचे हृदयरोगावर 'हार्टडिसीज' हे औषध, पिण्याचे पाणी शुद्ध करण्यासाठी क्लोरोडक इ. औषधांच्या जाहिराती येत असत.

## सौंदर्य प्रसाधनांवर आधारित जाहिराती :-

यामध्ये केसांच्या तेलांच्या जाहिरातीमध्ये 'क्रामिनिया ऑईल', 'मनोहर केशतेल', 'प्यारा हेअर ऑईल', 'हेअर जेल- लाइम ज्युस ॲन्ड ग्लिसरीन, कॅथ डाईन हेअर ऑईल, कॅस्ट्रोलक्स हेअर ऑईल, लोमा तेल इ. चा समावेश होतो. चेहऱ्यास लावल्या जाणाऱ्या स्नो मध्ये 'कामिनिया स्नो', 'कांचन स्नो', 'काश्मिर स्नो' यांच्या जाहिराती प्रसिद्ध होत. सुगंधी अत्तरे व सेंटमध्ये 'ओटो दिलबहार', 'कामिनिया सुरंगी अत्तर', 'अगुरु सेंट', 'ओटो सुगंधराज', 'कस्तुरी सेंट', 'यु.डी. कोलन', 'लव्हेंडर वॉटर', 'प्लोरावेरा ओटो', 'लव्हेंडर सेंट', 'इरा परफ्युम' इत्यादीच्या जाहिराती दिल्या जात. साबणाच्या जाहिरातींमध्ये 'चारमॉस- मेडिकल व टॉयलेट साबण', बंगाल केमिकल कंपनी कलकत्ता यांचा पारदर्शक ग्लिसरीन साबन 'कामिनिया व्हाईट रोज सोप', सुंगधी साबूंचा राजा- 'दिलबहार सोप', 'कॉमिनिया' 'लव्हेंडर सोप', 'रेक्सोना साबण'[६३] यांचा समावेश होतो. सौभाग्य अलंकारामध्ये कुंकू, 'सुवासिक कुंकूडबी'ची जाहिरात असे. याचबरोबर 'जाई काजळाची' जाहिरातही शेवटच्या काही अंकात दिसते. केसांना रंगविणाऱ्या बादशाही हेअरडायचीही जाहिरात येत असे, शालीमार फेस पावडरची जाहिरातही चित्तवेधक होती.

## साप्ताहिकांच्या जाहिराती :-

यामध्ये कॉंग्रेसचे महाराष्ट्रातील दणदणीत साप्ताहिक 'रणगर्जना' तसेच शुद्धी संघटना, ब्राह्मणेत्तरवाद, अस्पृश्यता निवारण यासाठी गो. ल. खोत यांनी संपादित केलेले 'प्रचलित

राजकारण' हे साप्ताहिक, कृ. प्र. खाडिलकर यांचा 'नवा काळ', प्र. के. आत्रे यांचे मनोरमा, स्त्रियांचे मासिक, 'आनंद' हे लहानमुलासाठी सुरु केलेले वासुदेव गोविंद आपटे यांचे मासिक, ना. सी. फडके यांचे 'झंकार', तारा टिळक व आनंदकर यांचे 'गृहलक्ष्मी', किरात यांचे 'स्फूर्ति', वामन रामचंद्र गाडगीळ यांचे 'चित्रमय कृषीवल' यांच्या जाहिराती चित्रमय जगतमधून प्रसिद्ध होत. त्याच बरोबर चित्रशाळेचे प्रकाशन असणाऱ्या 'शालापत्रक' व 'ध्रुव' यांची ही जाहिरात प्रसिद्ध होत असे. 'चित्रमय जगत','शालापत्रक', ध्रुव ही तिन्ही मासिके अवघ्या आठ रुपयात (वार्षिक वर्गणी) अशी त्यांची जाहिरात असे.

## संस्थाविषयक जाहिराती :–

यामध्ये विविध सराफी पेढ्या, विमा कंपनी, बँक, औषधाच्या कंपनी, विविध कारखाने यांचा समावेश केला आहे.

सोन्याचांदीचे व्यापारी, सराफी दुकानांच्या अनेक जाहिराती चित्रमय जगतमध्ये दिल्या गेल्या. 'सराफी आणि जेव्हरी दुकान सांगली', 'मुंबईचे सुप्रसिद्ध जवाहिरे नरोत्मदास भाऊ ज्युएलर्स', 'पु. ना. गाडगीळ आणि कंपनी' या महत्वाच्या आहेत. विमा कंपनीच्या जाहिरातींमध्ये 'दि सोशल ॲशुरन्स कंपनी लिमीटेड मुंबई', 'गुडवील ॲशुअरन्स कंपनी', 'ओरिएंटल गव्हर्मेंट सिक्युरिटी लॉईफ ॲशुअरन्स कंपनी लिमिटेड मुंबई', 'वेस्टन इंडिया विमा कंपनी लिमिटेड सातारा', 'दि व्हल्कॅन इन्शुएरन्स कंपनी लिमिटेड मुंबई', 'नागपूर पायोनिअर इन्शुएरन्स कंपनी' यांचा समावेश होता.

बँकांच्या जाहिरातीमध्ये 'दि प्रेसिडेन्सी इंडोस्ट्रियल बँक लि. पुणे', 'बॉम्बे प्रोव्हेशिअल को. ओपरेटिव्ह बँक', 'दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड', 'सारस्वत को. ओपरेटिव्ह बँक लि.', 'दि. बॉम्बे स्टेट को ओपरेटिव्ह बँक मुंबई', 'देना बँक' यांचा समावेश होतो. साखर कारखान्यांच्या जाहिरातींमध्ये, 'पंचगंगा सहकारी साखार कारखाना लि. इचलकरंजी कोल्हापुर', 'दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.', 'दि फलटन शुगरवर्क लिमिटेड' यांचा समावेश होतो. याशिवाय टेलरिंग कॉलेज कोल्हापुर, छायाचित्रे व रेखाचित्रे यासाठी प्रसिद्ध संस्था– 'एक्सेल', शिअर फोटो एनलार्जिंग कंपनी मुंबई, 'हायक्लस पोर्ट्रेट पेंटर फोटो

नॉव्हेलटीन मुंबई’ या संस्थेची जाहिरात असे. त्याचबरोबर फोटोग्राफर, केमिस्ट, आयुर्वेदिक फार्मसीवाले, कारखानदार यांना आपल्या मालावर फॅन्सी लेबले लावण्यासाठी व पेटंट औषधाकरिता कार्डबोर्ड बॉक्सेस तयार करणारी प्रसिद्ध कंपनी– दांडेकर ब्रदर्स एन्ग्रेव्हर्स मुंबई या संस्थेची जाहिरात महत्त्वाची आहे. त्याचप्रमाणे पेटंट डिझाइन व ट्रेडमार्कसाठी प्रसिद्ध लॉ मॉरीस ॲन्ड कंपनी कलकत्ता या संस्थेची जाहिरात प्रसिद्ध होत असे.

ट्रॅव्हल कंपनीच्या जाहिरातीमध्ये ‘दत्त दिगंबर यात्रा कंपनी श्री दत्तनिवास गोखले हॉल समोर लक्ष्मी रोड या संस्थेची जाहिरात महत्वाची आहे. याचबरोबर ’जोशी– दामले मंगल कार्यालय’ व राहण्याची सोय असणाऱ्या ‘माधवाश्रम मुंबई’ आणि दवे हिंदु हॉटेल स्टेशन समोर पुणे या संस्थाच्या जाहिरातीही यात प्रसिद्ध होत असत.

## खाद्यान्नाच्या जाहिराती :–

यामध्ये ‘फणसपोळी सावंतवाडी हनुमान एजन्सी’, ‘कोल्हापुरी सर्वोत्तम चिवडा’, ‘उन्हाळ्याची थंडाई’, ‘महाबळेश्वरीमध’, ‘बेडेकर मसाले’, ‘व्हि. पी. बेडेकर ॲन्ड सन्स मुंबई यांच्या पापड लोणचे मसाल्याच्या उत्पादनाची माहिती देणाऱ्या जाहिराती, शीत पेयांच्या जाहिरातींमध्ये ‘लाईम ज्युस कॉर्डियल’, ‘सायरप–स्कॅश’, ‘चित्रशाळेची सोयाबीन कॉफी’, ‘रा. बी. फॅक्टरी मिरज यांची बिस्कीटे’ रावळगावकर यांची टॉफी मिठाई, ‘कोमा प्रॉडक्स मुंबई यांची सरबते व लोणची’ इत्यादी जाहिरातीचा समावेश होतो.

याशिवाय ‘मुखविलास’, ‘शण्मुंगम तपकीर’, ‘मनोहर सुपारी’, शुद्ध पवित्र निर्भेळ रंगतदार व सुवासिक केशर, ‘कमला कस्तुरी तपकीर’, ‘इला सिगारेट’, ‘मंगरुळी तपकीर’, ‘लंगर छाप विडी’ या चैनीच्या वस्तुच्या जाहिरातीही यात छापल्या गेल्या.

## इंजिन व यंत्रे स्वदेशी उद्योग यांच्या जाहिराती :–

यामध्ये शेतकी उद्योगाशी संबंधीत इंजिन व यंत्रांच्या जाहिराती यात मोठ्या प्रमाणात दिल्या गेल्या. यामध्ये ‘आलिव्हर नांगर’, ’रुमेली आईलपुल ट्रॅक्टर’, पाणी खेचण्याचे ‘हरक्युल्स इंजीन’, ‘किर्लोस्कर कंपनीचे शेंग सोलण्याचे यंत्र’, ‘किर्लोस्कर पंप’, दांडेकर बंधू इंजिनिअर्स सांगली, धान्य दळण्याच्या चक्या, लोखंडी नांगर व शेतीची यंत्र सामुग्री बनवणारे

कारखानदार' याची जाहिरात महत्वपूर्ण आहे. दि. मनोहर ट्रेडिंग कंपनी यांची 'सोडावाटरची नमुनेदार व टिकाऊ यंत्रे', अत्रे यांचे 'नागरी लेखन यंत्र–मराठी हिंदी टाईपरायटर, देशी बायडिंग मशीन–कोष्टीकामासाठी सुलभ', 'अन्नपुर्णा कुकर', 'कंपनी बंगलोर', बी. रा. तारकर कुकर कंपनी मुंबई' या प्रेशर कुकरच्या जाहिराती महत्वाच्या आहेत.

याशिवाय ॲटलंस, इस्टर्नस्टार, झेब्रा या सायकलीच्या जाहिरातीही यात प्रसिद्ध होत. याशिवाय स्वदेशी छोट्या मोठ्या उद्योगधंद्याच्या जाहिरातीही यात प्रसिद्ध होत. यामध्ये 'स्वदेशी चाकू', 'स्वदेशी बटने', 'गांधी टोपी', यांच्या जाहिराती वारंवार दिसतात. याचबरोबर लग्नमुंजीकरता रंगीबेरंगी बेलबुट्टीची पोस्टकार्ड, फॅशनेबल डायरी, कॅटलॉग, दिनदर्शिका', तसेच 'स्वदेशी कॅमेरा हॅपी कंपनी अलिगड', 'पेनाच्या विविध कंपनीच्या शाईमध्ये गोपाळ ब्रदर्स कॅनल, लोटस कंपनीची शाई, तसेच के. टी. नगरकर कंपनी, नाशिक यांची 'लोकमान्य टिळकांच्या फोटोची घड्याळे', बाजाच्या पेट्या, 'किर्लोस्कर फ्ल्युट व सक्सेस फ्ल्युट या जाहिराती महत्त्वाच्या आहेत. किचन फरशी ओटे यासाठी 'झेनिथ स्टाईल' यांची जाहिरात, 'किर्लोस्कर पोलादी फर्निचर औंध', एच. टी. शहा आणि कंपनी गोलपीठा मुंबई यांचे 'ग्यासबत्तीचे मोठे दुकान' या जाहिरातीचा लहान मोठ्या उद्योगाच्या जाहिरातींमध्ये समावेश होतो.

## लग्नविषयक जाहिराती :–

यामध्ये 'वधु पाहिजे', 'वर पाहिजे', 'पुनर्विवाह करणारा ब्राह्मण वर पाहिजे', 'कश्यप गोत्रास जुळेल अशी ऋग्वेदी देशस्थ वधु पाहिजे अशा जाहिराती केवळ ब्राहमण व कायस्थ समाजाच्या संबंधीत लग्नविषयक जाहिराती मासिकात येत असत. यामध्ये वधुवरांची सचित्र माहिती वय, रंग, शरीरयष्टी, जात–उपजात, उत्पन्न, शिक्षण याची माहिती असे.याशिवाय जमिन प्रॉपर्टी, नाव बदल, पत्ता बदल, निधन वार्ता, अभिनंदनाच्या जाहिरातीही मोठ्या प्रमाणात चित्रमय जगतमध्ये देण्यात आल्या होत्या.

## ५.७ समारोप :–

देशी विदेशी राजकारणामध्ये महत्वपूर्ण भूमिका निभावणाऱ्या व्यक्तिची छायाचित्रे चित्रमय जगतमध्ये छापण्यात आली. यासंदर्भात भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासामध्ये

महत्वपुर्ण कामगिरी करणाऱ्या व्यक्ती कशा होत्या किंवा कशा दिसायच्या याविषयी अभ्यासकांमध्ये व वाचकांमध्ये नेहमीच उत्सुकता असते. यासंदर्भाने लोकमान्य टिळक व महात्मागांधींची विविध घटना प्रसंगांची चित्रे, कॉँग्रेसच्या विविध अध्यक्षांचे फोटो यावरुन स्वातंत्र्य लढ्याच्या वाटचालीवर प्रकाश पडतो.

याचबरोबर स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्वतंत्र भारताचे मंत्रीमंडळ व जवाहरलाल नेहरुंची विविध घटना प्रसंगाची चित्रे, महाराष्ट्रातील विविध संस्थांचे संस्थानिक यांची छायाचित्रे चित्रमय जगतने छापलेली दिसतात.

युद्धविषयक छायाचित्रांमध्ये पहिल्या व दुसऱ्या महायुद्धातील प्रत्यक्ष घडामोडीची सचित्र माहिती चित्रमय जगतमध्ये देण्यात आली. या संदर्भातील 'युद्ध विषयक देखावे' या सदरामध्ये महायुद्धविषयक युरोपीयन राष्ट्राची रणनिती, डावपेच, नकाशे, लष्करी तयारी इ.ची सचित्र माहिती छापली जात असे. त्याचबरोबर युरोपीयन राष्ट्राचे लष्करी अधिकारी, त्यांच्या लष्करी पदव्या, श्रेणीरचना, वेषभूषा, शिष्ठाचार याविषयीही माहिती ही यात मिळते.

याचबरोबर मनुष्य संहाराची आधुनिक साधने, शस्त्रास्त्रे, वैमानिक हल्ल्याची दृश्ये, उद्धवस्थ शहरे, विमानवाहक युद्ध नौका, आरमारी तोफा, विमानाला पकडणारे उडते हत्ती, मशीनगन्स, पाणबुड्या, लढाऊ विमाने यांच्या छायाचित्रावरुन पहिल्या महायुद्धापेक्षा दुसरे महायुद्ध किती भयानक होते याची कल्पना येते. या संदर्भात हिरोशिमा शहराच्या विध्वंसाचा देखावा अतिशय महत्वाचा असून यातून युद्धाचे भयानक रूप समजते. अशाप्रकारे युद्धविषयक चित्रांमध्ये विविध राष्ट्रांची युद्धसज्जता, युद्धाचे नकाशे, युद्ध सामग्री, पाणबुड्या, तोफा, रणगाडे, अण्वस्त्र इ. ची माहिती मिळते व त्यायोगे समुद्रावरील हवेतील आणि जमिनीवरील लढाई कशी लढली गेली याची कल्पना येते.

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या संदर्भाने आशिया व युरोपखंडातील विविध राष्ट्रातील राज्यकर्ते व त्यांचा युद्धातील सहभाग, मुसद्देगीरी याचीही कल्पना येते. या संदर्भात हिटलर आणि मुसोलिनी यांची छायाचित्रे महत्वाची आहेत. त्याचबरोबर चीन, जपान, रशिया,

अफगणिस्तान, अमेरिका, फ्रान्स व इंग्लंड या देशातील राज्यकर्ते व महत्वाचे अधिकारी यांचीही चित्रे यात दिली आहेत.

ऐतिहासिक वास्तु आणि स्थल यांच्या छायाचित्रांमध्ये धार्मिक स्थळामध्ये मंदीरे आणि ऐतिहासिक स्थळांमध्ये विविध किल्ले, महाल, वाडे, समाधीस्थळे, इमारती, पुरातत्वीय उत्खननाची छायाचित्रे यांची सचित्र माहिती दिली आहे. या ऐतिहासिक व स्थलविषयक छायाचित्रामधून पर्यटनाची व ऐतिहासिक धार्मिक दृष्ट्या महत्वाची स्थळे कोणती आहेत याविषयी माहिती मिळते. याचबरोबर ही वास्तु कोणी, कधी व कोठे बांधली याचाही इतिहास समजतो. वास्तुंचे स्थापत्य शास्त्रीय वैशिष्ट्यही समजते. या ऐतिहासिक वास्तुंची जपणूक करुन आपला वैभवशाली इतिहास कसा टिकवून ठेवला पाहिजे याविषयीही प्रेरणा मिळते. थोडक्यात पारतंत्र्यातील भारतवासियांना आपल्या वैभवशाली वास्तुंचे जतन संवर्धन करण्याचा संदेश यात दिला आहे.

परदेशातील प्रेक्षणीय स्थळांच्या छायाचित्रावरुन परदेशातील विविध प्रेक्षणीय व धार्मिक स्थळे कोणती आहेत, ती कोणी, कधी, का बांधली, तेथील शिल्पकला, दुर्मिळ वास्तुसंग्रहालये याची माहिती मिळते.

यामध्ये विविध नाटकांच्या विविध अंकांची छायाचित्रे देण्यात आली होती. ’नाटकांचे देखावे’ या सदराअंतर्गत अशी चित्रे देण्यात आली होती. आधुनिक काळात ज्याप्रमाणे चित्रपटांच्या जाहिराती वृत्तपत्र व मासिकमधून केल्या जातात व त्या वाचक वर्गात लोकप्रिय असतात. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यपूर्व काळात विविध नाटकांच्या जाहिराती, छायाचित्रे, परिक्षणे वाचकवर्गात प्रिय होती. या छायाचित्रांमधून प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत नाटकांच्या स्वरुपात झालेला बदल, रंगभूमीचे बदलते स्वरुप, बदलते विषय, पाश्चात्य नाट्यकलेचा भारतीय नाट्यकलेवर झालेला परिणाम याविषयी माहिती समजते.

चित्रमय जगतमध्ये दुर्मिळ छायाचित्राअंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण छायाचित्रांचा समावेश होतो. यामध्ये विवाहयोग्य वधुवरांच्या जाहिरातीची चित्रे महत्वाची असून ‘वर पाहिजे’ या शिर्षकाखाली ही छायाचित्रे दिली गेली. यामध्ये वधु आणि वराचे वय, वर्ण, जात, अपेक्षा

यांचाही उल्लेख असे. यामध्ये वधुची वेशभूषा, फोटोसाठी देण्यात येणारी 'पोज' याही गोष्टी महत्वपुर्ण आहेत. तसेच वेगवेगळ्या राज्यकर्त्यांच्या राज्यारोहनाच्या चित्रावरुन राज्यकर्त्या वर्गातील समारंभ, शिष्टाचार, पोषाख पद्धती इत्यादीची माहिती मिळते. त्याचबरोबर पौर्वात्य देशातील स्त्रिया या चित्रामधील पुर्वेकडील विविध देशांमधील स्त्रियांची चेरापट्टी, वेशभूषा, केशभूषा, अलंकार यांची खुपच मनोरंजक माहिती मिळते, अशीच माहिती ही महाराष्ट्रातील विविध भटक्या विमुक्त जाती जमातीतील लोकांचे व्यवसाय, दिनक्रम, वेशभूषा, अलंकार, धार्मिक समजूती यावर आधारीत चित्रातून मिळते. महायुद्धाच्या संदर्भात झेपोलियन विमान व लुसाटानिया या आगबोटीच्या विनाशाचा देखावा रोमहर्षक वाटतो.

यामधील पौराणिक चित्रांमध्ये विविध सणवाराप्रसंगी केल्या जाणाऱ्या विधीची सचित्र माहिती आढळते. त्याचबरोबर रामायण आणि महाभारत यामधील विविध घटनाप्रसंगावर भाष्य करणारी चित्रे यात काढली गेली. विशेष करुन श्रीकृष्णाच्या बाल्यावस्थेतील लीलांवर भाष्य करणारी व तारुण्यअवस्थेतील गोपीका व राधिका समवेत असणारी तसेच रासलीलेची चित्रे यात मोठ्या प्रमाणात छापली गेली. यामधून प्राचीन भारतीय वेशभूषा, शिष्ठाचार, रितीरिवाज, समाज, संस्कृती, धर्म यावर भाष्य करता येते.

यामधील वनमाला, उर्वशी आवतरण मार्ग प्रतिक्षा या चित्रामध्ये इतिहासातील शुर पराक्रमी वीरपुरुष यांची रेखाचित्रे पहावयास मिळतात. त्यावरुन त्यांच्या स्वभाव आणि व्यक्तिमत्वावर प्रकाश पडतो. अशी चित्रे भारताबाहेरील पोर्तुगाल, हॉलंड, लंडन पॅरीस येथील म्युझिअमध्ये ही भारताच्या इतिहासाची सांस्कृतिक साधने पहावयास मिळतात. युरोपीयन लोक हे चौकस बुद्धीचे असल्यामुळे देशाटनाची जी जी साधने आणि ऐतिहासिक दुर्मीळ वस्तु त्यांना भारतात सापडल्या त्या त्यांनी आपआपल्या देशात नेऊन तेथील सार्वजनिक संस्थांच्या संग्रहालयातून ठेवण्याचा खटाटोप केलेला दिसतो. यामध्ये ऐतिहासिक लेख, थोर व्यक्तिमत्वांच्या तसबीरी, दुर्मीळ भौतिक वस्तु यांचा समावेश आहे. याची माहिती देणारे सदर चित्रमय जगतने सुरु केले होते. ही चित्रे भारतीय थोर पुरुष, राज्यकर्ते, त्यांचे लष्कर येथील वैभवशाली परंपरेची ओळख करुन देतात.

विनोदी चित्रांमधून राजकारण आणि सामाजिक जीवनातील प्रसंगावर भाष्य करणारी अनेक विनोदी चित्रे चित्रमय जगतमध्ये छापली गेली. त्यातून राजकीय सामाजिक जीवनातील न्युनता, विडंबनात्मकता वास्तवता दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

चित्रमय जगतमधील कथांमध्ये व्यक्तीविशेष कथा महत्वाच्या आहेत. निरनिराळ्या स्वभावाच्या माणसांच्या कथा यामध्ये दिसतात. प्रेमळ, रागीट, वीर, धाडसी, कामांध, संशयी, वात्सल्यभाव असणाऱ्या स्वभावाच्या व्यक्तीचे विचार आणि वर्तन कसे असते ते यातून समजते.

प्रेमविषयक कथांमधून विरह, मिलन, शृंगार, विकार, भावभावनांबरोबच प्रेमातील नैतिकता, पावित्र्य, त्याग याविषयाची माहिती यातून मिळते. तत्कालीन विचार, विवाह व कौटुंबिक जीवनावर आधारित कथांमधून समकालीन वास्तवतेचे चित्रण घडते. प्रेमविवाहातून झालेला भ्रमनिरास, पती पत्नीतील गैरसमज समजुतदारपणाचा सामंज्यास्याचा अभाव, पुरुषी अहंकार, स्त्रियांचा संशयीस्वभाव, यामुळे निर्माण झालेले कौटुंबिक वादळ याची प्रचिती या कथांमधून येते.

वास्तवादी कथांमध्ये शिक्षण, उच्च नागरी जीवन रहाणीमान यामुळे मानवाचा स्वभाव संकुचित आणि स्वार्थी झाला आहे हे समजते. आपला समाज, संस्कृती यापासून तो कसा दुर गेला आहे हे समजते. याचबरोबर सामाजिक, आर्थिक विषमता दर्शवणारे लेखनही यात दिसते. पोट भरण्यासाठी मरण येईपर्यंत कष्ट करणारा कष्टकरी वर्ग, त्याची जगण्यासाठी चाललेली धडपड दिसते. तसेच असहायता, अगतिकता असली तरी पावित्र्य व चारित्र्याचे रक्षण करण्यासाठी पापी लोकांचा केलेला नितःपातही यात दिसतो.

शहरी संस्कृती, नाट्यचित्रपटसृष्टी यातील प्रसिद्धीला भूलणाऱ्या मायावी जीवनातील वास्तवतेची जाणीव झाल्यावर निराश झालेल्या लोकांचीही अवस्था कथांमध्ये वर्णीली आहे. सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा असणाऱ्या श्रीमंत वर्गाची ढासळलेली नितीमत्ताही यात सांगितली आहे. शेतकरी कामगार वर्गाचा जीवनसंघर्ष आणि मध्यमवर्गावर वाढलेला दबावही या कथांमध्ये दिसतो.

बोधप्रद कथांमध्ये नैतिक मुल्यांची शिकवण देणाऱ्या, मार्गदर्शन करणाऱ्या, बोध देणाऱ्या कथांचा समावेश होतो. शिक्षणामुळे समाजजीवनात झालेली क्रांती, आध्यात्माबरोबरच प्रापंचिक कर्तव्याची जाणिव करुन देणाऱ्या कथांचा समावेश यामध्ये होतो. याचबरोबर सामाजिक कुप्रथा, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार, गुंडागिरी, अहंमपणा याचा अंत नेहमी वाईटच कसा असतो याचा बोध देणाऱ्या कथा यात छापल्या गेल्या. परोपकार, क्षमाशिलता मानवाला कसे उच्च स्थानी घेऊन जातात याची जाणिव करुन देणाऱ्या कथा यात छापल्या गेल्या.

इतिहासविषयक कथांमध्ये ऐतिहासिक वीरपुरुष, पराक्रमी राजे, सरदार, लष्करातील शिपाई यांचे पराक्रम सांगणाऱ्या कथांचा समावेश होतो. इतिहासात होऊन गेलेल्या अनेक थोर पुरुषांच्या अप्रसिद्ध कथा ही यात छापल्या गेल्या. त्यातून दरबारी अधिकारी, दरबारी जीवन, शिष्ठाचार, ऐतिहासिक घटनाप्रसंग यांची माहिती मिळते.

पौराणिक कथामध्ये प्राचीन कालीन राज्यकर्ते, नगरे, ऋषी मुनी, आख्यायिका, देवतांचे अवतार, रामायण महाभारतातील प्रसंग यांचा समावेश होतो.

भारतीय स्वातंत्र्यचळवळीवर विविध घटनांविषयी माहिती सांगणाऱ्या कथाही यामध्ये लिहिल्या गेल्या. या संदर्भात गांधी युगातील असहकार चळवळ, कायदेभंग चळवळ, विधायक कार्यक्रम इत्यादीचे महत्व सांगणाऱ्या कथा छापल्या गेल्या. पाकिस्तानच्या निर्मितीच्या संदर्भात हिंदु मुस्लीम जनतेमध्ये असणारे विचार कथारुपाने सादर करण्याचा प्रयत्नही मासिकामध्ये झालेला दिसतो.

चित्रमय जगतमधील सामाजिक आशयाच्या कवितांमध्ये अंहिसा, शांततामय सहजीवन यांचा संदेश देणाऱ्या कथा छापल्या गेल्या. मराठी माणसाच्या नैतिकतेस आवाहन करणाऱ्या व स्वातंत्र्याचा अर्थ सांगणाऱ्या कविता लिहिल्या गेल्या. वैभवशाली इतिहासाचे स्मरण करावयास लावणाऱ्या व इतिहासाच्या पाऊलखुणांमधून समकालीन वास्तवतेचा वेध घ्यायला लावणाऱ्या कविता यामध्ये दिसतात. त्याचबरोबर सामाजिक, आर्थिक विषमतेवर भाष्य करणाऱ्या व मार्क्सवादाकडे झुकणाऱ्या कविताही यात दिसतात. यामध्ये शेतकरी कामगार वर्गाचे महत्व सांगणाऱ्या कविताही येतात.

निसर्गविषयक कवितांमध्ये निसर्गामधील बदल व मानवी भावभावना, स्वभाव यातील साम्यस्थळे शोधणाऱ्या कविता लिहिल्या गेल्या. निसर्गातील विविध ऋतु विशेषता वसंत आणि वर्षा ऋतु यांचे अतिशय सुंदर वर्णन करणाऱ्या कविताही यात छापल्या गेल्या. यामधील पशुपक्षी, झरे, नदी यांच्यावरील कविता हुरहुर, आगतिकता, गुढता, भेटीची ओढ यावर भाष्य करतात. तसेच निसर्गाच्या रुद्ररुपाविषयी माहिती देणाऱ्या कविताही यात छापल्या गेल्या.

यामध्ये राजकीय विषयावर आधारीत कविता प्रामुख्याने राष्ट्रवाद आणि राष्ट्रकार्यास प्रेरणा देणाऱ्या कविता छापल्या गेल्या. या संदर्भाने स्वातंत्र्यपूर्व कालखंडात छापलेल्या कविता महत्वाच्या आहेत. यामध्ये मराठ्यांचा वैभवशाली पराक्रम काव्यबद्ध केलेला दिसतो. मराठ्यांच्या इतिहासातील महत्वाच्या कर्तबगार व्यक्ती, ऐतिहासिक स्थळे, वास्तु यांना उद्देशून या कविता लिहिल्या गेल्या. यामध्ये प्रामुख्याने शिवाजी महाराज, संभाजी राजे, शनिवारवाडा, रायगड यांच्यावर लिहिलेल्या कविता महत्वपूर्ण आहेत. याशिवाय पानिपतची तिसरी लढाई आणि मराठेशाहीचा अस्त इत्यादींवर कारणमीमांसा करणाऱ्या कविताही मोठ्या प्रमाणात दिसतात.

पारंतत्र्यातील भारतीयांना देशभक्तीसाठी उदयुक्त करणाऱ्या कविता यात दिसतात. यामध्ये कृष्णाजी अनंत बेहरे यांच्या कविता व वि. दा. सावरकर यांची 'सागरास' ही कविता महत्वपूर्ण आहेत. पारतंत्र्याच्या दुःखाचे आश्रु गाळण्यापेक्षा राष्ट्रकार्यास उद्युक्त करणाऱ्या, आवाहन करणाऱ्या कविता यामध्ये हेतुपुर्वक छापल्या गेल्या. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रीय आंदोलनातील कामगिरीचे महत्व सांगणाऱ्या कविता यामध्ये दिसतात.

स्वातंत्र्योत्तर कालीन कवितांमध्ये स्वतंत्र भारताच्या वैभवशाली परंपरेचे कौतुक करणाऱ्या कविता दिसतात. याचबरोबर देशाची फाळणी, जातीय दंगली, काश्मीरचा वाद याला अनुसरुन समकालीन राजकीय स्थितीवर भाष्य करणाऱ्या कविताही चित्रमय जगतमध्ये छापल्या गेल्या.

नाट्यकलेच्या संदर्भाने चित्रमय जगतमध्ये जेवढे लेख छापले गेले त्यावरुन तत्कालीन कालखंडामध्ये नाट्यकला रसिक प्रेक्षकांमध्ये व समाजामध्ये कशी लोकप्रिय ठरली होती याची प्रचीती येते. याचबरोबर शास्त्रीय नाटके त्यांचे स्वरुप आणि संगीत नाटके व त्यांचे स्वरुप

यावरुन शास्त्रीय नाटकामधून संगीत नाटकांमध्ये नाटक कलेचे झालेले स्थित्यंतर समजून येते. संगीत नाटकामध्ये अभिनयापेक्षा संगीतास जास्त महत्व असते तर शास्त्रीय नाट्यकलेमध्ये पात्राच्या संवाद कौशल्यास विशेष महत्व असते.

यासंदर्भाने मराठी नाट्यसृष्टीमध्ये रा. प्र. खाडिलकरांच्या नाटकांमुळे नाटकांचे एक नवे युग आवतरलेले दिसते. कार्यकारणभाव आणि स्वभाव परिपोष यादृष्टीने त्यांची नाटके महत्वपूर्ण दिसतात. किंबहुना ही त्यांच्या नाटकांची वैशिष्ट्ये होती. त्यांच्या नाटकांमधील ऐतिहासिक पात्रे इतकी प्रभावशाली होती की जरी इतिहासाची पुनर्रचना झाली. तरी त्यांनी वठवलेली पात्रे डोळ्यासमोरुन कधीही नाहीशी होणार नाहीत असे म्हटले तर वागवे ठरणार नाही.

मराठी नाटकांवर इंग्रजी नाटकांचा प्रभाव पडल्यामुळे मराठीमध्ये नवी बुकीश नाटके कशी उदयास आली हे ही यामधून समजते. याच कालखंडामध्ये मराठी नाटकांमध्ये विनोदी नाटकांचेही युग आवतरलेले दिसते. या संदर्भाने श्रीपाद कोल्हाटकर यांची नाटके महत्वाची असून ‘कोटीबाजपणा’ हे त्यांचा नाटकांचे ठळक वैशिष्टय होते. स्वातंत्र्यचळवळीचा, गांधी चळवळीचा विशेष प्रभाव नाटक कलेवर पडलेला दिसतो. सामाजिक नाटके सुद्धा या काळात निर्माण झाली. लोकशिक्षण, नितीमुल्य देणारी ही नाटके होती. पौराणिक नाटकांचा प्रभावही तत्कालीन मराठी नाट्य सृष्टीवर पडलेला दिसतो. अशा नाटकांच्या पुननिर्मितीवर मराठी नाट्यसंस्थांनी दिलेला भर समजतो.

याचबरोबर नाट्य परिक्षणाचे अनेक लेखही यात छापले गेले. याचबरोबर तरुण पिढीच्या उत्कर्षासाठी चित्रपटांपेक्षा रंगभूमी किती महत्वाची आहे याची जाणीव करुन देणारे लेखनही चित्रमय जगतमध्ये झालेले दिसते.

चित्रमय जगतमध्ये ज्या ग्रंथविषयक जाहिराती छापल्या गेल्या यामध्ये शालेय पाठ्यपुस्तकापासून विविध विषयावर आधारित ज्ञान देणाऱ्या ग्रंथाच्या जाहिरातींचा समावेश होतो.

यामध्ये नाट्यग्रंथ, धार्मिक ग्रंथ, इतिहास विषयक ग्रंथ, भाषा व्याकरणावरील ग्रंथ, कुटुंब व्यवस्था, दांपत्यजीवन, कामशास्त्र यावर आधारीत ग्रंथ, विज्ञानावर आधारित ग्रंथ इत्यादीच्या जाहिरातींचा समावेश होतो. त्याचबरोबर स्वातंत्र्यचळवळीमध्ये सहभागी असणाऱ्या थोर व्यक्तीमत्वाच्या चरित्राची माहिती सांगणाऱ्या ग्रंथाच्याही जाहिरातीमोठ्या प्रमाणात छापल्या गेल्या.

औषधांच्या जाहिरांतींमध्ये ताप, डोकेदुःखी, पोट व अंगदुखीपासून शक्तीवर्धक औषधाच्या जाहिराती मोठ्या प्रमाणात दिसतात. त्याचबरोबर त्वचा रोग, स्त्रियांचे विविध आजार, दंतमंजन, केशसंवर्धनाची औषधे आणि संतती नियमनाची औषधे यांच्याही जाहिराती दिसतात.

सौंदर्य प्रसाधनातील जाहिरातींमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे केससंवर्धन तेल, सुंगधी अंतरे, अंगाचा व कपड्याच्या साबणाची जाहिरात यांचा समवेश होतो त्याचबरोबर त्वचेला तजेला आणणाऱ्या क्रिम (स्नो), काजळ, कुंकू, हेअरड्राय, फेसपावडर इत्यादीच्याही जाहिराती दिसतात.

साप्ताहिकांच्या जाहिरातींमध्ये प्रचलित राजकारण स्त्रीविषयक, शिक्षणविषयक, उद्योगधंद्यावर आधारीत मासिकांचा समावेश होतो.

संस्थाविषयक जाहिरातींमध्ये सोन्याचांदीच्या व्यापारी पेढ्यांच्या जाहिराती, विमा कंपनी, विविध बँका, साखर कारखाने, ट्रॉव्हल कंपनी, औषधी संस्था, निवासी हॉटेल्स यांच्या जाहिरातींचा समावेश होतो.खाद्यानाच्या जाहिरातीमध्ये कोल्हापूरी चिवडा, बेडेकर मसाले यांची उत्पादने, शीतपेये, बेकरी प्रोडक्टस याचबरोबर हौशी व छंदी लोकांसाठी सिगरेट, विडी, तपकीर, सुगंधी पान, मसाल्याच्या जाहिरातीही मोठ्या प्रमाणात दिसतात. स्वदेशी उद्योगधंदा करणाऱ्या कंपनींच्या जाहिरातीही यामध्ये छापल्या जात. यामध्ये विविध कृषी अवजारे, यंत्रे, इंजिन्स, टायपरायटर, कुकर, सायकल, वस्त्रउद्योग, स्टेशनरी, संगीत कलेत वापरली जाणारी सामुग्री, बांधकाम साहित्य इ. उद्योगावर आधारीत उद्योगधंदयाच्या व यंत्र साहित्याच्या

जाहिराती यात छापल्या गेल्या. याचबरोबर भविष्य, ज्योतिषी, लग्नविषयक जाहिराती, प्रॉपर्टी, नावबदल, अभिनंदन, निधनवार्ता इत्यादी विषयक जाहिरातीही यामध्ये छापल्या गेल्या.

अशाप्रकारे चित्रमय जगतमधील सांस्कृतिक लेखन या प्रकरणामधून चित्रकला, साहित्य, नाट्यकला, जाहिराती यामधून स्वातंत्र्यपूर्व व उत्तर कालीन मराठी संस्कृतीमधील बदल सातत्याचा आढावा घेता येणे शक्य आहे. तत्कालीन छायाचित्रावरुन 'सामाजिक व राजकीय वास्तव समजते. पर्यटन, इतिहासविषयक जाणिवा प्रकट करण्याचा प्रयत्न दिसतो. बाह्य जगाशी व संस्कृतीशी भारतीयांचा परिचय करुन देण्याची भावना दिसते व त्यातून आधुनिकता व जागतिकीकरण यांची ओळख भारतीयांना पर्यायाने महाराष्ट्रीय मराठी वाचकास करुन देण्याचा प्रयत्न दिसतो.

रेखाचित्रामधून भारतीय संस्कृतीची मुल्ये, वैचारिकता नैतिकता जपण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. या चित्रामध्ये मानवी भावभावना, यातील नैसर्गिक सौंदर्य व निसर्गवादाचा प्रत्यय येतो. साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते. ती लेखकाच्या मनाची अभिव्यक्ती असली तरी, लेखक ज्या समाजात रहात असतो त्या समाजाचा प्रभाव त्याच्या व्यक्तीमत्वावर पडतो. तोच प्रभाव त्याच्या लेखनीतही उतरतो. त्यामुळे सामाजिक वास्तव, सामाजिक बदलांची दशा व दिशा समजण्यासाठी चित्रमय जगत मधील कथा, कविता आणि नाट्य लेखन महत्वाचे आहेत. या साहित्यामधून आधुनिक महाराष्ट्राची स्वातंत्र्यपूर्व उत्तर काळात झालेली जडण घडण, वैचारिकता आणि भौतिकताही समजते. स्वातंत्र्यचळवळ, त्यातील विविध प्रवाह, समकालीन बदलते आर्थिक व सामाजिक निकष यामधून समजतात. ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणामुळे व स्वातंत्र्योत्तर कालीन आर्थिक धोरणामुळे सामान्य माणसांचे जगण्याचे आयाम कसे बदलले हे समजते. कामगार, कष्टकरी, सधन वर्ग, कुटुंब व्यवस्था, कुटुंबव्यवस्थेचे बदलते स्वरुप, विभक्त कुटुंब पद्धतीची झालेली सुरुवात समजते. विवाह या जीवनातील महत्वाच्या घटनेबद्दल बदलत गेलेल्या आकांक्षा, प्रेमविवाह, घटस्फोट, कुंटुंबातील समतोलास गेलेला तडाही समजतो. प्रेमभावनेतील विविध विचार आणि विकारही समजतात. स्त्रीविषयक समाजात बदलत चाललेला दृष्टीकोन समजतो. स्त्री वर्गाच्या सामाजिकीकरणाची दशा व दिशा समजते. नैतिक मुल्ये व शिष्ठाचार, सामाजिक भान याबद्दल असणारे समाज ग्रह समजात. तत्कालीन

मनुष्य जातीची स्वभाव वैशिष्ट्ये समजतात. जाहिरातीमधून शिक्षण, आरोग्य, सौंदर्य याविषयीची समाजात निर्माण झालेली जागृती समजते. सामान्य लोकांच्या रहाणीमानात झालेला बदल समजतो. त्यांची सौंदर्यपूर्ण जीवन आसक्ती ही समजते.

**तळटीपा :–**

१. चित्रमय जगत, एप्रिल १९१५, पृ.२२३.
२. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९१५, पृ.४९६.
३. चित्रमय जगत, जानेवारी १९२८, पुरवणी, पृ.८.
४. चित्रमय जगत, जानेवारी १९३५, पृ.११.
५. चित्रमय जगत, जुलै १९३०, पृ.२९७.
६. चित्रमय जगत, सप्टेंबर १९३५, पृ.४०२.
७. चित्रमय जगत, जुलै १९१५, पृ.३४५.
८. चित्रमय जगत, जानेवारी १९१५, पृ.३.
९. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९१५, पृ.४१.
१०. चित्रमय जगत, जुलै १९१८ पृ.२९५.
११. चित्रमय जगत, जानेवारी १९१५, पृ.२.
१२. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९४२, पृ.५०.
१३. चित्रमय जगत, जानेवारी १९२८, पृ.२२.
१४. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९१३, पृ.३७७.
१५. चित्रमय जगत, एप्रिल १९१९, पृ.१४७.
१६. चित्रमय जगत, जानेवारी १९१४, मुखपृष्ठ.
१७. चित्रमय जगत, जानेवारी १९२४, पृ.३९.
१८. चित्रमय जगत, जून १९२५, पृ.२१३.
१९. चित्रमय जगत, जानेवारी १९३६, पृ.५८.
२०. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९७६, पृ.२८.
२१. चित्रमय जगत, मार्च १९१०, पृ.४४.
२२. चित्रमय जगत, एप्रिल १९१५, पृ.२०८.
२३. चित्रमय जगत, एप्रिल १९१०, पृ.६३.
२४. चित्रमय जगत, एप्रिल १९१६, पुरवणी, पृ.३.
२५. चित्रमय जगत, मे १९१८, पृ.२१५.

२६. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९३५, पृ.५१२.

२७. चित्रमय जगत, जानेवारी १९१७, पृ.१४.

२८. चित्रमय जगत, मे १९२०, पृ.१९५.

२९. चित्रमय जगत, जुलै १९१९, पृ.२१८.

३०. चित्रमय जगत, सप्टेंबर १९३६, पृ.४६४.

३१. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९१२, पृ.२८५.

३२. चित्रमय जगत, एप्रिल १९४४, पृ.९९.

३३. चित्रमय जगत, डिसेंबर १९२२, पृ.५००.

३४. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९१८, पृ.४४३.

३५. चित्रमय जगत, मार्च १९३५, पृ.१३८.

३६. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९२६, पृ.४८९.

३७. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९५४, पृ.५५६.

३८. चित्रमय जगत, सप्टेंबर १९५९, पृ.३९६.

३९. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९३३, पृ.४५८.

४०. चित्रमय जगत, मार्च १९२२, पृ.१२६.

४१. चित्रमय जगत, ऑगस्ट १९४७, पृ.४२३.

४२. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९११, पृ.२२७.

४३. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९३४, पृ.४३२.

४४. चित्रमय जगत, मे १९२६, पृ.२३७.

४५. चित्रमय जगत, जानेवारी १९१६, पृ.५५.

४६. चित्रमय जगत, एप्रिल १९१९, पृ.१५४.

४७. चित्रमय जगत, सप्टेंबर १९३०, पृ.३८१.

४८. चित्रमय जगत, सप्टेंबर १९३६, पृ.४१२.

४९. चित्रमय जगत, ऑगस्ट १९३९, पृ.३६८.

५०. चित्रमय जगत, मे १९१४, पृ.२६९.

५१. चित्रमय जगत, मार्च १९४७, पृ.१५१.

५२. चित्रमय जगत, जानेवारी १९२२, पृ.२६.

५३. चित्रमय जगत, नोव्हेंबर १९२२, पृ.४३८.

५४. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९५२, पृ.११२.

५५. चित्रमय जगत, जुलै १९१३, पृ.२८२.

५६. चित्रमय जगत, ऑगस्ट १९१३, पृ.३२४.

५७. चित्रमय जगत, फेब्रुवारी १९१५, पृ.११५.

५८. चित्रमय जगत, ऑक्टोबर १९१५, पृ.४६७.

५९. चित्रमय जगत, डिसेंबर १९१५, पृ.५७६.

६०. चित्रमय जगत, जानेवारी १९३०, पृ.१६.

६१. चित्रमय जगत, डिसेंबर १९३७, पृ.४६७.

६२. चित्रमय जगत, जुलै १९३५, पृ.२८१.

६३. चित्रमय जगत, जुलै १९५९, पृ.२९७.

*****

# प्रकरण ६

# उपसंहार

एकोणिसावे शतक हे भारताच्या इतिहासात प्रबोधनाचे शतक मानले जाते. या काळात भारतात आधुनिकीकरण घडून आले. ब्रिटिशांचा परकीय अंमल व पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या भारतीयांचा सुधारणावादी दृष्टीकोन या गोष्टी यास कारणीभूत ठरल्या. राजकीय पारतंत्र्य, आर्थिक शोषण, धर्माचा व समाजव्यवस्थेचा मागासलेपणा यामुळे निराश झालेल्या भारतीय समाजात जागृती घडवून आणण्यासाठी जी साधने वा माध्यमे वापरली गेली, यामध्ये वृत्तपत्र व नियतकालिके यांचे फार मोठे योगदान आहे.

भारतात या काळात अनेक वृत्तपत्रे व मासिके निर्माण झाली होती; त्यासंदर्भाने एकोणिसाव्या शतकातील मराठी नियतकालिकांचे स्वरूप पहाता ती विशिष्ट विषयाला वाहिलेली दिसतात. यामध्ये साहित्य, ललित वाङ्मय, प्राचीन वैभवाचे पुनरुज्जीवन, भाषा, व्याकरण, इतिहास, स्त्री–शिक्षण व धर्मसुधारणा या विषयांना महत्व देणारी मासिके दिसतात. याचबरोबर राजकीय जागृती करून ज्ञानप्रसार व लोक सुधारणा करणारी मासिकेही या काळात निर्माण झालेली दिसतात.

विसाव्या शतकातील मराठी नियतकालिकांचे स्वरूप पहाता या काळात सुशिक्षित व हौशी वाचकांची संख्या वाढलेली दिसते. त्यामुळे मासिकांच्या संख्येत व स्वरूपातही मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसतो. या काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळ गतीमान झालेली दिसते. त्याचबरोबर पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांच्या प्रभावामुळे जागतिक बातम्यांकडे वाचक वर्ग आकृष्ट झालेला दिसतो. यामुळे सर्वसंग्राहक स्वरूपाची मासिके या काळात निर्माण झालेली दिसतात. शिक्षण, स्त्री, आरोग्य, लहान मुलांची मासिके, उद्योग, कृषी विषयक, विज्ञान तंत्रज्ञानविषयक, दलित वर्गाचे प्रतिनिधित्व करणारी मासिके, अनियतकालिके अथवा लघुनियतकालिकेही या काळात निर्माण झालेली दिसतात.

या संदर्भात विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मराठी मधील पहिले सचित्र व सर्वसंग्राहक स्वरूपाचे मासिक सुरु झाले, ते म्हणजे 'चित्रमय जगत' होय. जानेवारी १९१० मध्ये चित्रशाळा

छापखान्याने हे मासिक सुरु केले होते. इ.स. १८७८ मध्ये स्वदेश, स्वधर्म व स्वभाषेच्या रक्षणाकरिता विष्णुशास्त्री चिपळुणकरांनी हा छापखाना उभारला होता. पुढे इ.स. १९०५ मध्ये या छापखान्याची मालकी वासुकाका जोशी यांच्याकडे आली. वासुकाका म्हणजेच वासुदेव गणेश जोशी होय. ते लो. टिळकांचे निकटचे सहकारी होते. पुढे गांधी युगातील विविध राजकीय चळवळीत ते सक्रीय सभागी असल्यामुळे 'पुण्यातील एक चळवळे गृहस्थ' म्हणून ते प्रसिद्ध होते. शेवटपर्यंत वासुकाका म. गांधींच्या विचारसरणीशी व काँग्रेसशी एकनिष्ठ राहिलेले दिसतात. चित्रशाळेचे मालक म्हणून चित्रशाळेच्या 'चित्रमय जगत' या मासिकाच्या ध्येय धोरणावर आणि स्वरूपावर त्यांच्या विचारप्रणालीचा प्रभाव पडलेला दिसतो. अनेक क्रांतीकारक व राष्ट्रीय सभेचे नेते चित्रशाळेशी संबंध ठेवून होते. त्यामुळे हा केवळ छापखाना न रहाता, ती एक 'राष्ट्रीय संस्था' बनलेली दिसते. या संदर्भात वासुकाकांची कामगिरी महत्त्वाची आहे.

प्रकाशनातील नियमितपणा, अखंड दर्जेदार वितरण सेवा, तसेच सचित्र मासिक, समालोचनाचा उपक्रम यामुळे हे मासिक दीर्घायुषी ठरलेले दिसते. मासिकाच्या पहिल्या अंकातील पहिल्या पानावर मासिकाच्या निर्मिती मागील भूमिका स्पष्ट केली आहे. त्यानुसार स्वदेशासाठी जागृती घडविणे, स्वभाषा, सत्यधर्म आणि स्वावलंबीपणा याचा प्रसार करणे हे याचे उद्दिष्ट होते. तसेच लोकांना 'राजकीय शिक्षणाचे धडे देणे' हा ही स्पष्ट उद्देश मुखपृष्ठावर छापलेला दिसतो. हे मासिक केवळ मराठीमधूनच नव्हे तर गुजराथी, कानडी, हिंदी व इंग्रजी मधून छापण्याचा घाट वासुकाकांनी घातलेला दिसतो. परंतु तो फारसा यशस्वी झालेला दिसत नाही. मराठी भाषेमधील चित्रमय जगत मात्र इ.स. १९१० ते इ.स. १९६८ पर्यंत अखंड चालू राहिलेले दिसते. त्यामुळे हे मासिक स्वातंत्र्यपूर्वकाळ आणि स्वातंत्र्य उत्तरकाळ या दोन्ही काळांचे प्रतिनिधित्व करते. या मासिकातील राजकीय, सामाजिक, धर्मविषयक, आर्थिक जीवनाविषयक व सांस्कृतिक विषयावर आधारित लेखांचा अभ्यास केला असता; विसाव्या शतकातील पूर्वार्धापासून बदलत जाणाऱ्या महाराष्ट्राचे स्वरूप समजून घेणे शक्य झाले आहे.

या मासिकामध्ये लेखन करणारा लेखक वर्ग त्या काळातील सामाजिक, राजकीय जीवनात आपले योगदान देणारा आंग्लविद्याविभूषीत भारतीय वर्ग होता. ज्याला आपण मध्यमवर्ग म्हणू शकतो. या वर्गाने स्वातंत्र्यपूर्व कालीन भारतामध्ये प्रबोधन, आधुनिकता व

राष्ट्रवाद या संकल्पना रुजविण्याचे काम केले होते. त्यामुळे त्यांचे मासिकातील लेखन वास्तवदर्शी आणि अभ्यासपूर्ण होते. यामध्ये लोकमान्य टिळक, इतिहासाचार्य राजवाडे, चि. वि. वैद्य, शि. म. परांजपे, दा. वि. गोखले, द. गो. गोखले, द. गो. लिमये, रामचंद्र विनायक पटवर्धन, अनंत भास्कर आळतेकर, सिताराम केशव दामले, गो. स. सरदेसाई, रा. गो. भिडे, पां. न. पटवर्धन, विष्णु महादेव भट, शंकर दत्तात्रय जावडेकर, द. श्री. मराठे, ज. स. करंदीकर, द. वा. पोतदार, प्रा. वा. काणे, काका कालेलकर, श्री. रा. केतकर इत्यादीचा समावेश होतो.

सुरुवातीच्या कालखंडात चित्रमय जगतचे संपादक कोण होते याची मासिकामध्ये कोठेही नोंद आढळत नाही. परंतु नाटककार अनंत वामन बर्वे, ज. र. आजगावकर, सेनापती बापट, वा. म. जोशी, ज. स. करंदीकर या सल्लागार मंडळींनी मिळून ही व्यवस्था पाहिलेली दिसते. इ.स. १९२७ पर्यंत चित्रमय जगतच्या कोणत्याही अंकावर संपादकाचे नाव छापलेले दिसत नाही. परंतु इ.स. १९१२ ते इ.स. १९२१ या काळात इतिहास संशोधक दत्तात्रय विष्णूपंत आपटे यांनी संपादकाची भूमिका पार पाडलेली दिसते. पुढे इ.स. १९२२ ते इ.स. १९५० या प्रदीर्घ कालखंडापर्यंत त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर यांनी संपादकाची धुरा सांभाळलेली दिसते. त्यानंतर इ.स. १९५० ते इ.स. १९६८ पर्यंत रामचंद्र प्रल्हाद कानिटकर यांनी संपादकीय सुत्रे स्वीकारलेली दिसतात.

चित्रमय जगतमध्ये प्राचीन भारतीय राज्यव्यवस्था आणि राज्यकर्ते, प्राचीन धर्म, परंपरा, साहित्य याविषयी अनेक लेख छापले गेले. या लेखांचा मुळ उद्देश आपला वैभवशाली इतिहास भारतीयांना ज्ञात व्हावा व त्यामधून ब्रिटिश सत्तेच्या पारतंत्र्यातून सुटका करून घेण्यासाठी प्रेरणा व मार्गदर्शन मिळावे हा होता. भारतीयांना असंस्कृत व रानटी मानणाऱ्या ब्रिटिश सरकारला लेखणीच्या माध्यमातून वैचारिक शह देऊन आपल्या सभ्यतेचे संस्कृतीचे उज्ज्वल रूप उजेडात आणण्यांचे काम या प्राचीन भारतीय राजकारणावर आधारलेल्या लेखांनी केले. प्राचीन भारतीय सभ्यता, संस्कृती, शासन प्रणाली यामधील भारतीय क्षेष्ठत्व दाखवण्याचा प्रयत्न यामधून झालेला दिसतो.

मध्ययुगीन भारतावर आधारित लेखांमधून मराठ्यांच्या इतिहासाच्या अनुषंगाने अनेक लेख छापण्यात आले. यामध्ये परकीय सत्तेच्या अंमलात स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवाजी महाराजांच्या कामगिरीचा परिचय करून देणारे लेख यात छापले गेले. अनेक मराठी सरदार मंडळींच्या पराक्रमाची माहिती सांगणारे लेख यात छापले गेले. पानिपतावर झालेला पराभव आणि पेशवाईच्या किंवा मराठेशाहीच्या अस्ताच्या संदर्भानेही अनेक लेख यात छापले गेले. यामधून पुर्वजांनी केलेल्या चुका निदर्शनात आणून देणे व समकालीन राजकीय दास्यातून म्हणजेच ब्रिटिश सत्तेच्या अंमलातून सुटका करून घेण्यासाठी उपयुक्त बोधप्रद लेखन यात झालेले दिसते. ब्रिटिशसत्तेच्या अंमलाखालील भारतीयांमध्ये स्वातंत्र्याच्या, राष्ट्रीयत्वाच्या जाणिवा विकसित करणे हा या लेखांच्या मागील उद्देश होता.

चित्रमय जगतचे संपादक दत्तोपंत विष्णू आपटे हे स्वतः इतिहास संशोधक असल्यामुळे, त्यांच्या या संशोधकीय वृत्तीची छाप त्यांच्या मासिकामधील लेखांवरही पडलेली दिसते. मराठ्यांच्या इतिहासावर टिका करणाऱ्या परप्रांतीय व युरोपीय इतिहासकारांना पुराव्यासहित प्रतिउत्तर देणारे लेख त्यांनी या मासिकात लिहले आहेत. या लेखांमधून इतिहासविषयक जाणिवा निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. शास्त्रशुद्ध इतिहास लेखन कसे केले पाहिजे याचाही परिचय वाचकांना करून दिलेला दिसतो.

भारतीय स्वातंत्र्यचळवळीच्या चालु घडामोडी समजण्याचे अत्यंत महत्त्वाचे साधन म्हणजे चित्रमय जगत हे मासिक होय. बंगालची फाळणी, मोर्लेमिंटो सुधारणा कायदा, वसाहतीचे स्वराज्य, जबाबदार राज्यपद्धती यावर चिकित्सक विश्लेषण करणारे लेख यात छापले गेले. लोकमान्य टिळक व त्यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या राजकीय घडामोडींची अगदी वास्तवदर्शी माहिती यामधून समजते. ब्रिटिश सत्तेची अन्यायकारी व जुलमी धोरणे यामधून प्रकाशात आणली गेली.

महात्मा गांधीजींचा भारतीय राजकारणात झालेला प्रवेश, त्यांचे अफ्रिकेतील कार्य, त्यानंतर भारतात आल्यानंतर चंपारण्या, खेडा येथील सत्याग्रहामधील त्यांचे योगदान, रौलेट कायदा, जालियनवाला बाग हत्याकांड, खिलापत चळवळ याद्वारे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे त्यांनी स्विकारलेले नेतृत्त्व, या संदर्भाने आलेले लेख भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या सुरुवातीच्या

पर्वाची माहिती देतात. याचबरोबर सत्य, अहिंसा, सत्याग्रह, स्वदेशी, बहिष्कार, असहकार आणि सविनय कायदेभंग चळवळ यावर झालेले संपादकीय व वैचारिक लेखनही महत्त्वपूर्ण आहे. अशा लेखनातून सामान्य भारतीयांना स्वातंत्र्य चळवळीकडे आकर्षित करण्याचे काम चित्रमय जगतने केलेले दिसते. याशिवाय फेर नाफेर, स्वराज्य पक्ष, सामयन कमिशन, नेहरू रिपोर्ट, लाहोर अधिवेशन, सविनय कायदेभंगाची चळवळ, मीठाचा सत्याग्रह, महाराष्ट्रात झालेले मीठाचे सत्याग्रह, शिरोडा व वडाळा येथील सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, सोलापुरचा सत्याग्रह यांची माहिती सांगणारे लेख यात दिले गेले. या लेखांमधून स्वातंत्र्य चळवळीच्या विविध हालचाली जन सामान्यापर्यंत पोहचवण्याचे काम चित्रमय जगतने केलेले दिसते. या लेखांद्वारे स्वातंत्र्य चळवळीची व्याप्ती आणि स्वरूप कसे वाढत गेले हे ही समजते. त्याचबरोबर या चळवळीतील लोकसहभाग वाढून चळवळ भारताच्या कानाकोपऱ्यात कशी पोहचली हे सुद्धा समजून येते.

पहिली गोलमेज परिषद, गांधी आयर्विन करार, दुसरी गोलमेज परिषद, रँम्से मॅकडोनाल्डचा जातीय निवाडा, पुणे करार, तिसरी गोलमेज परिषद या विषयी माहिती देणाऱ्या लेखांमधून भारतीय स्वातंत्र्य चळवळींचा घटनात्मक विकास समजतो. दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतीय स्वातंत्र्य लढ्याला आलेली गतीमानता समजते. या संदर्भात वैयक्तीक सत्याग्रह, क्रिप्स मिशन, छोडो भारत चळवळ यावरील लेखामधून भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर कसा येऊन पोहचला हे ही समजते.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील चळवळींपैकी क्रांतीकारी चळवळ हा एक महत्त्वाचा प्रवाह आहे. अन्यायी जुलमी ब्रिटिश सरकारला वठणीवर आणण्यासाठी सशस्त्र क्रांती महत्त्वाची मानणारी ही चळवळ होती. या संदर्भात अनेक लेख यात छापले गेले. भारतीय क्रांतीकारकांचे फोटो चित्रशाळेने विक्रीसाठी ठेवलेले होते. आणि पुण्यातील क्रांतीकारी चळवळीचा चित्रशाळेशी संबंध असावा म्हणून ब्रिटिश सरकारने अनेक वेळा संशय घेऊन छापखान्यावर व चित्रमय जगतावरही खटले भरून त्याचे अंक जप्त केलेले दिसतात. भारतीय स्वातंत्र्यचळवळीमध्ये तरुण वर्गाने उत्साहाने सहभागी व्हावे हा उद्देश या प्रकारचे लेख छापण्यामागचा होता.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये राष्ट्रीय सभेचे फार मोठे योगदान राहिले आहे. राष्ट्रीय सभेच्या विविध परिषदा, ठराव, अहवाल, काँग्रेसचे विविध पुढारी यांच्याबद्दल माहिती देणारे लेखनही मासिकामध्ये झालेले दिसते. अशा प्रकारच्या लेखांमधून स्वातंत्र्यचळवळीच्या ऐतिहासिक वाटचालीचा प्रवास समजतो. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या वाटचालीमध्ये उद्‌भवलेली सर्वात मोठी समस्या म्हणजे मुस्लीम लीग व त्यांचा द्विराष्ट्र सिद्धांत आणि पाकिस्तानची मागणी ह्या गोष्टी होय. भारतात जातियवादाचा झालेला विकास व त्याची कारणमीमांसा समजून घेण्यासाठी चित्रमय जगतमध्ये या संदर्भाने छापलेले लेख महत्त्वपूर्ण आहेत.

ब्रिटिशांच्या अंमलाखाली असणाऱ्या भारताचा स्वातंत्र्य लढ्यासाठी चाललेल्या प्रयत्नाचा शेवटचा टप्पा म्हणजे वेव्हेल योजना, सिमला परिषद, त्रिमंत्री योजना, माऊंट बॅटन योजना आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा कायदा होय. या सर्व लेखांमधून भारतीय स्वातंत्र्याची फलश्रुती कशी घडली याची माहिती मिळते.

स्वातंत्र्य उत्तरकालीन भारतीय राजकारणावर भाष्य करणारे अनेक लेख चित्रमय जगतमध्ये छापले गेले. भारताची फाळणी, जातीय दंगली, निर्वासीतांचे प्रश्न, संस्थानांचे विलीनीकरण यावर आधारीत लेखांचा यामध्ये समावेश होतो. याचबरोबर स्वतंत्र भारताच्या राजकीय ध्येय धोरणावर भाष्य करणारे लेखनही यामध्ये झालेले दिसते. यामध्ये भारताची लोकशाही, पंचायती राज, स्थानिक स्वराज्य संस्था, घटनानिर्मिती पंचवार्षिक योजना या प्रकारच्या लेखाचा यामध्ये समावेश होतो. स्वतंत्र भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर प्रकाश टाकणारे लेखनही यामध्ये झाले. भारत–चीन आणि भारत–पाकिस्तान संबंध, कश्मीरचा प्रश्न, पंडित नेहरू व त्यांची अलिप्ततावादी विचारसरणी या संदर्भात अनेक लेख यामध्ये छापले गेले.

जागतिक घडामोडींवर भाष्य करणारे लेखनही यामध्ये झाले. यासंदर्भाने पहिले आणि दुसरे महायुद्ध व या महायुद्धाच्या संदर्भाने आलेले विविध देशातील राजकीय घडामोडींचे लेखनही महत्वपूर्ण आहेत. पहिल्या महायुद्धाच्या संदर्भाने चीनची राज्यक्रांती, बाल्कन युद्ध, सुएझ कालवा, साम्राज्यवादी युरोपीयन राष्ट्रावरील लेख वाचनीय आहेत. त्याचबरोबर दुसऱ्या महायुद्धाच्या संदर्भाने आलेले विविध युरोपीयन राष्ट्रांच्या युद्ध नितीवरचे लेख व विविध

युरोपीयन विद्वानांची या संदर्भातील मते प्रदर्शन करणारे लेखही महत्वपूर्ण आहेत. त्याचबरोबर रशियन राज्यक्रांती, हिटलर, नाझीवाद, कम्युनिझम, युरोपीयन राष्ट्रांच्या आर्थिक व लष्करी मदत देणाऱ्या संघटना व करार, मार्शल योजना, युद्ध समाप्तीनंतरची युरोपीयन राष्ट्रांची राजकीय अवस्था, अफ्रिकेतील वर्णद्वेषाची चळवळ इत्यादीची माहिती देणारे लेख व त्या संदर्भातील संपादकीय लेखन अत्यंत अभ्यासपूर्ण व विश्लेषक स्वरूपाचे आहे. त्यामुळे विसाव्या शतकातील विविध जागतिक घडामोडी समजून घेण्यासाठी हे लेख महत्त्वपूर्ण आहेत.

चित्रमय जगतमध्ये छापल्या गेलेल्या सामाजिक लेखनामधून प्राचीन भारतीय संस्था व संकल्पनाविषयी असणारा अभिमान व्यक्त होतो. परंतु बदलत्या काळानुसार यामधील कालबाह्य तत्वे काढून टाकली पाहिजेत व अनुकूल बदलांचा स्विकार केला पाहिजे. अशा प्रकारे बदलास प्रोत्साहन देणारे लेखनही यात झालेले दिसते.

यामधील बोधपर सामाजिक लेखनामधून भारतीयांना विशेषतः तरुणांना, उद्योगी, महत्वकांक्षी, धर्म व राष्ट्रभक्त, समाजसेवक होण्याचे आवाहन केलेले दिसते. व्यसने, अनिष्ट रुढी परंपरा व सामाजिक समस्या यांचा विरोध करून तरुण पिढीला राष्ट्र आणि समाजकार्यासाठी उद्युक्त करणारे हे लेखन होते. त्याचबरोबर बदलत्या काळानुसार अनुकूल बदल स्विकारून सामाजिक पुनर्घटनेस आवाहन करणारे हे लेखन होते.

वर्ण जातिव्यवस्थेवर आधारित अनेक सामाजिक लेख यात छापले गेले. प्राचीन काळी भारतात झालेली भारतीय संस्था आणि संकल्पनांची उत्क्रांती ही किती शास्त्रीय होती यावर भाष्य करणारे लेख यात दिसतात. परंतु नंतरच्या काळात उद्भवलेल्या जातिभेद, अस्पृश्यता, अनिष्ट सामाजिक प्रथांमुळे भारतीय समाज कसा हिनकस बनला आहे आणि त्यामुळेच त्याच्यावर पारतंत्र्याची वेळ आली आहे. अशा प्रकारची कारणमीमांसा करणारे लेखनही चित्रमय जगतमध्ये झालेले दिसते.

विवाहविषयक लेखनामधून पवित्र धार्मिक, सामाजिक संस्काराचे महत्व प्रातिपादित करणारे लेखनही यामधून झालेले दिसते. याचबरोबर प्रेमविवाह, सगोत्र विवाह, मिश्र विवाह, आंतरजातीय विवाह या बद्दल अनुकूलता दर्शवणारे लेखनही यामध्ये झालेले दिसते. प्राचीन

काळापासून आधुनिक कालखंडापर्यंत भारतीय विवाहसंस्थेची वाटचाल कशी झाली हे ही या लेखनामधून समजते.

स्त्री स्वातंत्र्यावर आधारित साधक बाधक चर्चा करणारे लेखनही यामधून झालेले दिसते. स्त्री शिक्षण, वारसा हक्क याविषयी अनुकूलता दर्शविणारे लेखनही या मासिकात झालेले दिसते. याचबरोबर भारतीय स्त्री व पाश्चात्य स्त्री यांच्या संदर्भाने स्वातंत्र्य, हक्क, अधिकार, नैतिकता, चारित्र्य याविषयी चर्चा करणारे लेखनही यामध्ये झालेले दिसते. स्त्रीला कोणत्या प्रकारचे शिक्षण द्यावे या संदर्भातील लेखामध्ये विज्ञान तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणा ऐवजी होम सायन्स, गृहशास्त्रावर आधारित शिक्षणावर भर दिलेला दिसतो. कुलीन स्त्रीयांनी कोण–कोणत्या कला गुणांची जोपासना करावी, स्त्रीयांना देण्यात येणारे हक्क कोण कोणते असावेत या संदर्भात संपत्ती विषयक हक्क, पुनर्विवाह, घटस्फोटाचा हक्क, मतदानाचा हक्क याविषयी अनुकूलता दर्शविणारे लेखन यात झालेले दिसते. स्त्रीच्या चारित्र्याच्या, पावित्र्याच्या संबंधाने पाश्चात्य स्त्री व भारतीय स्त्री यांच्यावर भाष्य करणारे लेखनही यात झालेले दिसते. परंतु या सर्व स्त्री विषयक लेखांचे स्वरूप पहाता मासिकाचा स्त्री विषयक सुधारणावादी दृष्टीकोन व्यापक नसून मर्यादीत होता हे दिसते. ज्या स्त्री सुधारणा सुचवलेल्या आहेत त्या प्रामुख्याने उच्चवर्णीय स्त्रीयांशी संबंधीत आहेत. बहुजन स्त्रीया विषयी सुधारणा सुचविणारा एकही लेख यात दिसत नाही.

शिक्षण हा समाज विकासाचा पाया असतो. त्या अनुषंगाने प्राचीन, मध्ययुगीन व ब्रिटिशकालीन भारतीय शिक्षण संस्थेच्या वाटचालीची साधक बाधक चर्चा करणारे लेख चित्रमय जगतमध्ये छापले गेले. यामध्ये अभ्यासक्रम, तंत्रशिक्षण, मुल्यशिक्षण, कौशल्य शिक्षण, शिक्षणातील उपयुक्ततावाद या संदर्भात चर्चा करणारे लेखन झालेले दिसते.

परकीय देशांमधील समाजव्यवस्था, तेथील समाज व्यवस्थेतील दोष, विकेंद्रीत कुटुंबसंस्था, तेथील नैतिकतेच्या व पावित्र्याच्या संकल्पना इत्यादींविषयी माहिती देणारे लेख यात देण्यात आले. भारतीय समाजव्यवस्थेच्या, नैतिकतेच्या, पावित्र्याच्या संकल्पना समजून घेण्यासाठी व भारतीय समाज व पाश्चात्य समाजातील फरकाचे परिक्षण करण्यासाठी हे लेख महत्वपूर्ण आहेत.

प्राचीन कालखंडापासून आधुनिक कालखंडापर्यंत भारताच्या जडण–घडणीमध्ये महत्वपूर्ण योगदाने देणाऱ्या अनेक थोर व्यक्ती, संत पुरुष, समाजसुधारक, उद्द्योजक, पुढारी होऊन गेले. त्यांच्या चारित्र्याविषयी माहिती देणारे चरित्र लेख चित्रमय जगतमध्ये जाणिवपूर्वक छापले गेलेले दिसतात. याचबरोबर जागतिक राजकारणामध्ये, समाजकारण व अर्थकारणामध्ये योगदान देणाऱ्या विदेशी व्यक्तीमत्त्वाची कामगिरी प्रतिपादीत करणारे लेखही चित्रमय जगतने छापलेले दिसतात. 'आपणही त्यांच्या सम व्हावे' या उक्तीप्रमाणे भारतीयांचे चारित्र्य सुधरवण्याचा उद्देश या मागे होता असे म्हणावयास हरकत नाही.

आरोग्य या विषयावर आधारित लेखनही चित्रमय जगतमध्ये झालेले दिसते. विविध आरोग्य समस्या व त्यावर उपाय सुचवणारे हे लेखन होते. बाल आरोग्य, तरुणांच्या आरोग्य समस्या, स्त्री आरोग्य, कुटुंब नियोजन, ग्रामीण आरोग्य इत्यादी विषयी मार्गदर्शन करणारे लेखन यात झालेले दिसते.

चित्रमय जगतमध्ये आर्थिक जीवनाशी संबंधीत अनेक महत्वपूर्ण लेख छापलेले दिसतात. त्या संदर्भाने स्वातंत्र्य पूर्वकालीन भारताच्या आर्थिक स्थितीवर भाष्य करणारे महत्त्वपूर्ण लेख यात छापलेले आहेत. या लेखांमधून ब्रिटिशकालीन भारताची वसाहतवादी अर्थव्यवस्था, भारताचे आर्थिक शोषण, अनुउद्योगीकरण, व्यापारवाद इत्यादी गोष्टींची माहिती मिळते. याचबरोबर पारतंत्र्यातील भारतीयांच्या औद्योगिक जाणिवा निर्माण करणारे लेखनही यामधून झालेले दिसते. स्वदेशी आणि बहिष्कार चळवळीस पोषक असे आर्थिक लिखानही यामध्ये झालेले दिसते.

स्वातंत्र्य उत्तर कालीन भारताच्या आर्थिक जीवनाची माहिती देणारे लेखनही यात झालेले दिसते. स्वतंत्र भारताचे आर्थिक धोरण, पंचवार्षिक योजना, समाजविकास योजना, विदेशी व्यापार, लघुउद्योग, ग्रामउद्योग याविषयी माहिती यामधून मिळते. तसेच स्वातंत्र्य उत्तर कालखंडातील अन्नधान्य टंचाई, महागाई, बेकारी या आर्थिक जीवनाशी संबंधीत समस्यावर भाष्य करणारे लेखनही यामध्ये झाले. भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असणाऱ्या शेती व्यवसायाच्या सुधारणे संदर्भातही महत्त्वपूर्ण लेख चित्रमय जगतमध्ये छापले गेले. या सर्वांमधून

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातून स्वातंत्र्य उत्तर कालीन भारताच्या आर्थिक जीवनाच्या पुनर्घटनेची वाटचाल कशी झाली हे समजते.

चित्र हे या मासिकाचे ठळक वैशिष्ट होते. मासिकाला स्थैर्य व लोकप्रियता लाभण्यासाठी मासिकामधील चित्रांचा फार मोठा वाटा आहे. यामधील छात्राचित्रे व रेखाचित्रे समकालीन वास्तवतेचे प्रतिबिंब आहेत. तसेच त्या काळातील इतिहासाचे महत्त्वाचे भौतिक साधनही आहे. इतिहासातील वेगवेगळ्या व्यक्ती, व्यक्ती समुदाय, विविध जाती जमाती कशा होत्या याविषयी वाचक आणि अभ्यासकांमध्ये नेहमीच उत्सुकता असते. एखादी घटना समग्र वाचण्याऐवजी सचित्र वाचल्यास तिचे आकलनही चांगल्या प्रकारे होते. या संदर्भाने भारतीय स्वातंत्र्य चळवळ, पहिले व दुसरे महायुद्ध या महत्त्वाच्या घटनेशी संबंधीत असलेल्या व्यक्तींची, स्थळांची छायाचित्रे चित्रे चित्रमय जगतने प्रसिद्ध केली होती. ती तत्कालीन इतिहासाचे प्राथमिक साधन आहे.

ऐतिहासिक स्थल आणि वास्तू हे आपल्या वैभवशाली इतिहासाचे साक्षीदार आहेत. त्यांची जपवणूक करणे, संवर्धन करणे हा हेतु डोळ्यासमोर ठेऊन ऐतिहासिक स्थल, वास्तु विषयक छायाचित्रे छापण्यात आली.मराठी नाट्यकलेच्या विविध छायाचित्रांमधून समकालीन मराठी वेषभूषा, केशभूषा, पेहराव, चालीरिती, परंपरा यावर भाष्य करता येते. त्यातील पौराणिक नाटकांवरही मराठी संस्कृतीची छाप कशी पडली आहे हे ही समजते. यामधील दुर्मिळ छायाचित्रांमधून छायाचित्रकारांची कसब ही पहावयास मिळते व तत्कालीन समाजाच्या सौंदर्यदृष्टीचीही कल्पना येते.

चित्रमय जगतमधील रेखाचित्रे ही जरी चित्रकाराची अभिव्यक्ति असली तरी समकालीन मराठी संस्कृतीचा प्रभावही त्यावर पडलेला दिसतो. यातील पौराणिक व ऐतिहासिक चित्रांमधून प्राचीन, मध्ययुगीन भारतीय संस्कृती, त्यांचा पेहराव, शिष्टाचार, चालीरिती, वैभवशाली परंपरा इत्यादीची ओळख होते. यामधील कथा चित्रे व विनोदी चित्रे समकालीन जीवनातील वास्तवता, न्युनता, दोष दर्शवितात. स्वातंत्र्यपूर्व कालीन चित्रमय जगतमधील इतके चांगले ब्लॉक मेकींग, सुरेख छपाई, सचित्र लेख पाहुन अचंबा वाटतो. परंतु स्वातंत्र्य उत्तर

कालखंडात याला उतरती कळा लागलेली दिसते. राजकीय पुढाऱ्यांच्या मोठ–मोठ्या छायाचित्रांमागे ही सुंदर चित्रे नाहीशी झालेली दिसतात, लोप पावलेली दिसतात.

या सर्व चित्रांमधून विसाव्या शतकातील पूर्वार्धात, मराठी माणसाच्या अभिव्यक्तीमध्ये होणाराबदल समजू शकतो. स्त्री विश्वाशी संबंधीत छायाचित्रे पहाताना स्त्रीयांनी कला, शिक्षण, व्यवसाय, खेळ या क्षेत्रामध्ये बजावलेल्या कामगिरीची माहिती मिळते. स्त्रीयांच्या सामाजिकीकरणाची प्रक्रिया समजते. तत्कालीन रुढी, परंपरेस आलेला सैलपणा समजतो. बदललेले राहणीमान, सौंदर्यदृष्टी, जीवनासक्ती समजते. कलेच्या अभिव्यक्तीची, आस्वादाची बदललेली परिभाषा समजते. या मासिकातील चित्रे पहाताना त्यातील नैतिकता व पावित्र्याच्या कल्पनाही निदर्शनास येतात. पाश्चात्य चित्रकारी सारखे सौंदर्याचे विकारी प्रदर्शन त्यात दिसत नाही. यातील पौराणिक चित्रे, आध्यात्मवादी व निसर्गवादी आहेत. व्यक्ती व घटनाचित्रे शिष्टाचार व औपचारिक निती नियमांचे पालन करणारी आहेत. अशा प्रकारे चित्रमय जगतमधील चित्रे ही भारतीय आचार विचारांचे प्रतिबिंब आहेत. भारतीय समाजाच्या नैतिक कल्पना त्यातून दृष्टीगोचर होतात.

स्वातंत्र्योत्तर कालखंड चित्रमय जगतच्या अंकामधील चित्रांची संख्या व गुणवत्ता कमी होत गेलेली दिसते. त्यामुळे त्यांच्या प्रसिद्धीसही उतरती कळा लागून मासिकाचा अंत झालेला दिसतो.

साहित्य ही लेखकाची अभिव्यक्ती असते. जी त्याच्या लेखणीमधून अभिव्यक्त होत असते. तत्कालीन भौतिक जीवनाचे संस्कार लेखकाच्या व्यक्तीमत्वावर झालेले असतात. तेच संस्कार त्याच्या लेखणीतही उतरतात. त्यामुळे साहित्य हे सुद्धा तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब असते. सामाजिक बदलाची प्रक्रिया समजून घेण्याचे अत्यंत महत्त्वाचे साधन म्हणजे तत्कालीन साहित्य होय. यातील पात्रे काल्पनिक असली तरी लेखकांचे स्वअनुभव त्यात कथन होत असतात. त्यामुळे हे लिखाण वास्तववादी बनलेले दिसते.

समाजातील विविध स्वभावाची माणसे, त्यांच्या भावभावना, त्यांचे चारित्र्य, नैतिकता, आचार–विचार, आधुनिक भारतीय सामाजिक संस्था, संकल्पना, विभक्त कुटुंबपद्धती,

विवाहाविषयी आधुनिक विचार, शिक्षणामुळे मानवाच्या भौतिकतेमध्ये आणि वैचारिकतेमध्ये झालेली क्रांती, शहरातील कष्टकरी, कामगार वर्गाचे जीवन, आर्थिक विषमता, मध्यमवर्गाची जीवनपद्धती, शहरीभागातील बदललेले आर्थिक संबंध आणि उत्पादन प्रक्रिया, आर्थिक सामाजिक विषमता या सर्वांची माहिती या कथांमधून होते. विसाव्या शतकातील बदलत्या महाराष्ट्राची दिशा यातून समजू शकते.

चित्रमय जगतमध्ये राष्ट्रीय हेतूने अनेक कविता छापलेल्या दिसतात. आपला वैभवशाली इतिहास, परंपरा, संस्कृती यांची ओळख करून देणाऱ्या कविता संख्येने मोठ्या प्रमाणात छापलेल्या दिसतात. याचबरोबर राष्ट्रकार्यासाठी उद्युक्त करणाऱ्या, प्रेरणा देणाऱ्या कविताही यामध्ये मोठ्या प्रमाणात दिसतात. या ऐवजी धर्म, ऐहिक जीवन, निसर्ग, यावर आधारित कविता फारशा दिसत नाहीत. या कवितांचे स्वरूप पाहता चित्रमय जगतमधील कविता, राष्ट्रीय स्वरूपाच्या आहेत. थोर महापुरुष, राजकीय नेते, क्रांतीकारकांच्या कार्याची महती सांगणाऱ्या कविताही यात छापल्या गेल्या. पानिपतावरील पराभव व पेशवाईचा अस्त या बद्दल खंत व्यक्त करणाऱ्या काही कविता या राजघराण्याशी किंवा सरदार घराण्याशी संबंधीत व्यक्तींनी लिहिल्या आहेत. वि. दा. सावरकरांची सागरा ही कविता राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्वपूर्ण असणारी कविता प्रथम चित्रमय जगत मध्ये छापण्यात आली. नारायण केशव बेहरे यांच्या सप्तर्षी कवितेतील जहाल राष्ट्रवादामळे ब्रिटिशांनी मासिकावर खटला भरलेला दिसतो व कवितेच्या कविला आपली नोकरीही गमवावी लागलेली दिसते.

नाटक कला ही सुद्धा तत्कालीन समाजाच्या इतिहासाचे महत्वपूर्ण साधन असते. नाटकांचे विषय हे तत्कालीन सामाजिक परिस्थिती व गरज यातून सुचलेले असतात. त्यामुळे सामाजिक वास्तवतेचा शोध घेण्यासाठी त्या काळातील नाटकेही महत्त्वाची असतात. चित्रमय जगत मासिकांमध्ये पौराणिक, ऐतिहासिक नाटकांबरोबरच सामाजिक नाटकांची माहिती देणारे लेख छापले गेले. सामाजिक नाटकांमध्ये समकालीन सामाजिक समस्या व राष्ट्रीय चळवळ यातील विषय घेतलेले दिसतात. त्यासंदर्भात सत्याग्रह, स्वदेशी व बहिष्काराची चळवळ, विविध विधायक कार्यक्रम, दारुबंदी, अस्पृश्यता निवारण यावर आधारित नाटके महत्त्वाची आहेत. एकंदरीत या काळात लिहिल्या गेलेल्या नाटकांमधून सामाजिक शिक्षणाचा पाठ दिलेला दिसतो.

त्या काळातील विविध स्वरूपाची नाटके व नाटक संस्था, नाट्य परिक्षणे यावरून रसिक लोकांचा या कलेकडे बघण्याचा दृष्टीकोन समजतो व तरुण पिढीच्या आवडी निवडीही समजतात. स्वातंत्र्य उत्तर काळात या नाट्य कलेकडे बघण्याचा दृष्टीकोन संकुचित झालेला दिसतो. कारण या काळात चित्रपट सृष्टीचे महत्व वाढलेले दिसते. त्या अनुषंगाने नाट्यकला व चित्रपटसृष्टी यावर साधक–बाधक चर्चा करणारे लेखन या मासिकामधून झालेले दिसते. त्यातून मनोरंजनाच्या साधनात झालेला बदलही समजतो व तरुण पिढीच्या बिघडण्याची कारणे ही उद्बोधीत होतात.

चित्रमय जगतमधील जाहिरातीमधून विसाव्या शतकात सुरु झालेल्या भौतिक बदलांचा सामाजिक जीवनावर झालेला परिणाम समजतो. तत्कालीन पुस्तकांच्या जाहिरातींवरून त्या समाजाची साहित्यिक अभिरूची, शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप समजते. त्याचबरोबर धार्मिक व वैज्ञानिक जाणिवा, विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांना प्राप्त झालेले महत्त्वही समजते सौंदर्य प्रसाधनांच्या जाहिरातीवरून सौंदर्यदृष्टी व त्याची बदलेलेली परिमाणे समजतात. औषधांच्या जाहिरातीवरून समाजाच्या आरोग्य विषयक समस्या व आरोग्यविषयक जागृतीची कल्पना येते. विविध यंत्रे, इंजिन विषयक जाहिरातीवरून उद्योगात व शेती व्यवसायात आलेली आधुनिकता समजते. बँक, पतपेढी, विमा कंपन्यांच्या जाहिरातीवरून भांडवल, कर्ज पुरवठा, आर्थिक ठेवी, सुरक्षितता, अशा प्रकारच्या आर्थिक व्यवहारांना निर्माण झालेले महत्त्व व आर्थिक व्यवहारांना आलेली गतीमानता समजते. विविध औद्योगिक संस्थांच्या जाहिरातीवरून महाराष्ट्रातील उद्योजकतेच्या विकासाची वाटचालही समजु शकते. मनोरंजन, आहार, विहार, खाजगी जीवन, दांपत्य जीवन यांना या काळात निर्माण झालेले महत्त्वही या जाहिरातीद्वारे समजू शकते.

वरील विवेचनावरून चित्रमय जगतच्या दीर्घायुषीपणाचे रहस्य समजते. परंतु स्वातंत्र्य उत्तर कालखंडापासून या मासिकाची लोकप्रियता कमी होत गेल्याचे दिसते. ज्या हेतूने हे मासिक सुरु झाले होते, तो हेतु स्वातंत्र्य प्राप्तीमुळे साध्य झाला होता. त्यामुळे पुन्हा नविन हेतु डोळ्यासमोर ठेवून मासिक चालवणे कठिण झालेले दिसते. खरे पाहिले तर इ.स. १९४३ पासूनच या मासिकांचा आकार व पानांची संख्या कमी झालेली दिसते. 'जागतिक घडामोडींची माहिती देणारे राष्ट्रीय वृत्तीचे राजकीय मासिक' असे स्वरूप स्वातंत्र्य उत्तर कालीन चित्रमय

जगताने धारण केलेले दिसते. स्वातंत्र्य उत्तर काळातील अंकांमध्ये काँग्रेसचे सत्ताधारी, राजकारण, जागतिक घडामोडी आणि एखादी कथा एवढेच विषय दिसु लागले. मासिकांचे सचित्र समालोचन दिसेनासे झाले. त्यातच चित्रशाळा छापखान्याची आर्थिक दुरावस्था वाढलेली दिसते. संपादक व छापखान्याचे विश्वस्त मंडळ यांच्यातील वाद पराकोटीला पोहचून नाइलाजास्तव जानेवारी १९६८ मध्ये हे मासिक बंद करावे लागले.

**निष्कर्ष :–**

चित्रमय जगतमध्ये छापल्या गेलेल्या राजकीय सामाजिक–आर्थिक व सांस्कृतिक लेखांचा अभ्यास करून पुढील निष्कर्ष दृष्टीक्षेपात येतात.

- भारतीयांच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी विष्णुशास्त्री चिपळुणकरांनी 'चित्रशाळा' छापखाना काढला होता.
- वासुकाका जोशी यांना चित्रशाळेची मालकी प्राप्त झाल्यानंतर या छापखान्याचे स्वरूप अधिक व्यापक बनून ती एक 'राष्ट्रीय संस्था' बनली.
- भारतीयांना राजकीय शिक्षणाचे धडे देण्यासाठी 'चित्रमय जगत' या मासिकाची निर्मिती झाली. या मासिकाच्या निर्मितीमागे राष्ट्रीय हेतू होता.
- उत्तम ब्लॉग मेकिंग, सुरेख छपाई, सचित्र लेख असणारे हे मराठीतील पहिले मासिक होते.
- सुरुवातीच्या काळात मासिकाच्या ध्येय धोरणावर वासुदेव गणेश जोशी म्हणजेच वासुकाकांचा प्रभाव होता. 'घटनेचा सम्यक बोध' होण्याच्या उद्देशाने मासिकात विषयाला अनुसरुन चित्रे देण्यात आली. त्यामुळे वासुकाकांनी या मासिकाचे केलेले नामकरण 'चित्रमय जगत' अगदी सार्थ ठरते.
- चित्रशाळा छापखान्याचे मालक व चित्रमय जगतचे प्रकाशक असणारे वासुकाका तत्कालीन राजकारणात सक्रीय असणारे 'पुण्यातील चळवळे गृहस्थ' होते. टिळकयुग आणि गांधीयुग यामधील विविध राजकीय चळवळींमध्ये ते सहभागी होते. राष्ट्रीय सभा व महात्मा गांधी यांचा त्यांना विशेष आदर होता. स्वतः सर्व लेख वाचून टिपणे काढून योग्य तो बदल करून मजकूर छपाईस देत असत. काँग्रेस व गांधीवादाचा विशेष प्रचार प्रसार

करणारे हे मासिक होते. स्वदेशी व बहिष्कार या गांधीजीच्या राजकीय लढ्यातील महत्त्वाच्या तत्वांचा विशेष प्रचार या मासिकाने केला.

- इ.स. १९१० ते इ.स. १९११ या काळात समाजकारण, राजकारण यात सक्रीय असणाऱ्या मंडळीच्या संपादकीय भूमिकेमुळे खऱ्या अर्थाने हे मासिक विविधांगी व 'सर्वसंग्राहक' बनलेले दिसते.
- इ.स. १९१२ ते इ.स. १९२१ या काळात जेष्ठ इतिहास संशोधक दत्तात्रय विष्णुपंत आपटे यांच्या संपादकीत्वाखाली राष्ट्रीय इतिहास लेखन साम्राज्यवादी व परप्रांतिय सदोष लेखनावर टिका, शास्त्रशुद्ध इतिहास लेखन, इतिहास संशोधन या गोष्टींना महत्त्व प्राप्त करून देणारे लेखन झाले. थोडक्यात भारतीयांमध्ये इतिहास विषयक जाणिवा निर्माण करण्याचा प्रयत्न या काळातील मासिकाच्या वाटचालीमध्ये झाला.
- इ.स. १९२२–१९५० या प्रदीर्घ काळात त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर या काँग्रेसच्या जेष्ठ पुढाऱ्याने संपादकीय जवाबदारी स्वीकारलेली दिसते. या काळात खऱ्या अर्थाने राष्ट्रीय सभा व गांधीवाद यांचा प्रचार प्रसार मासिकाने केला व मराठी लोकांना राजकीय शिक्षण देण्याचे कामही यशस्वी रित्या निभावलेले दिसते.
- इ.स. १९५१ ते इ.स. १९६८ या काळात रामचंद्र प्रल्हाद कानिटकर चित्रमय जगतचे संपादक बनलेले दिसतात. या काळातही राष्ट्रीय काँग्रेस व सत्तारुढ सरकारची ध्येय धोरणे यांच्या प्रसाराचे काम मासिकाने प्रामाणिकपणे निभावलेले दिसते.
- मासिकातील संपादकीय लेखन व त्यासंदर्भाने येणारी 'स्पष्टवक्ता', 'संपादकीय', 'स्फुटविचार' ही सदरे मासिकाचे राष्ट्रीय स्वरूप निर्धारित करतात. यातील लेखन खऱ्या अर्थाने राजकीय जागृतीस पोषक होते व त्यामुळे मासिकांचा राष्ट्रीय हेतू साध्य झाला.
- चित्रमय जगत मधील लेखक वर्ग हा तत्कालीन बुद्धीजीवी वर्ग होता. त्या काळातील राजकारण व समाजकारणात तो सक्रीय होता. त्यामुळे त्या मासिकातील लेख व लेख लिहिण्यामागील हेतू सुद्धा राष्ट्रीय होता. त्यामुळे मासिकातील लेखन राष्ट्रीय लेखन प्रवाहात मोडते.

- विसाव्या शतकाच्या पुर्वार्धात भारतीय स्वातंत्र्य चळवळीला गतीमानता प्राप्त झाली होती. यावर आधारित अनेक राजकीय लेख यात छापले गेले त्यातून भारतीय स्वातंत्र्य चळवळीची वाटचाल समजते.
- राजकीय लेखाचे स्वरूपही राष्ट्रीय असल्यामुळे मासिकाला ब्रिटिश सरकारच्या वक्रदृष्टीला सामोरे जावे लागलेले दिसते. ब्रिटिशविरोधी वातावरण तयार केल्याच्या गुन्ह्याबद्दल मासिकावर खटले भरून त्याचे अंकही जप्त केलेले दिसतात. तसेच चित्रशाळा छापखाना हा पुण्यातील राष्ट्रीय हालचालीचे महत्त्वाचे केंद्र असल्याचा संशय ब्रिटिश सरकारला असल्यामुळे छापखाण्यावरही अनेक वेळा खटले भरून त्याचे ब्लॉक्स जप्त केलेले दिसतात. त्यामुळे हे मासिक भारतीय स्वातंत्र्य लढ्यावर भाष्य करणारे व महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीवर प्रकाश टाकणारे हे महत्वपूर्ण इतिहासाचे साधन आहे.
- मासिकावर स्वातंत्र्यउत्तर काळातही काँग्रेसचा प्रभाव असल्यामुळे पंतप्रधान पं. नेहरुंच्या आघाडी सरकारशी एकनिष्ठ राहिलेल्या या मासिकाने ‘संयुक्त महाराष्ट्र चळवळ’ या महत्त्वाच्या स्वातंत्र्य उत्तर कालीन चळवळीकडे दुर्लक्ष केलेले दिसते.
- वर्ण, जातिव्यवस्था, विवाह, कुटुंबव्यवस्था याविषयी अभिमान बाळगणारे व यामध्ये काळानुसार बदल झाले पाहिजेत असा सुधारणावादी दृष्टीकोन दर्शविणारे लेख यात छापले गेले. आचार धर्मातील अनिष्ट व कालबाह्य तत्वांना विरोध करणारे लेखनही यात झालेले दिसते. परंतु एकूणच या लेखाचे स्वरूप पहाता हे लेख फारसे प्रभावी नाहीत. प्रस्थापित वर्णव्यवस्था, समाजरचना मोडण्याचे धाडसी विधान हे लेख करत नाहीत.
- स्त्री शिक्षण, कायदेशीर हक्क, स्त्री स्वातंत्र्य, नैतिकता याविषयी जे लेखन झाले ते फक्त उच्चवर्णीय स्त्रीयांच्या सुधारणा निर्देशित करतात. स्त्रीवाद किंवा लिंगभावाचे चिकित्सक विश्लेषण करणारे लेख यात नाहीत. अशाप्रकारे सामाजिक लेखनामधून दिसणारा सुधारणावादी दृष्टीकोन हा व्यापक नसून मर्यादीत स्वरूपाचा दिसतो. कारण हे लेख लिहिणारा लेखक वर्ग स्वतः अभिजन उच्चवर्णीय असल्यामुळे त्यांचे लेखनही त्यांच्या वर्गाचे प्रतिनिधित्व करतात.
- शिक्षण हे समाज विकासाचे मुख्य अंग असल्यामुळे शिक्षणाच्या स्वरूपावर साधक–बाधक चर्चा करणारे, त्यात उपयुक्ततावाद, विज्ञानवाद, मुल्यशिक्षण इत्यादी गुण वैशिष्ट्यांचा

आग्रह धरणारे लेखन यात झाले आहे. या काळात वाढत चाललेली शैक्षणिक जाणिव जागृती या लेखांमधून समजते. असे असले तरी तळागाळातील समाज समुहाला शिक्षण प्रवाहात कसे आणता येईल याकडे लक्ष वेधणारा एकही लेख यात नाही. यावरून यातील शिक्षण विषयक लेखही वरवरच्या सुधारणा सुचवणारे आहेत हे समजते.

- यामधील सामाजिक लेखाचा मुळ उद्देश नैतिकता, चारित्र्य वृद्धींगत करून राष्ट्रकार्यासाठी भारतीयांना आवाहन करणे हा होता. सामाजिक सुधारणा करणे हा नव्हता. तरी सुद्धा हे लेख विसाव्या शतकातील सामाजिक बदलाचे परिक्षण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत.
- ब्रिटिशकालीन भारताची आर्थिक स्थिती, ब्रिटिशांची शोषक अर्थनिती यावर भाष्य करणारे लेख यात दिसतात. भारतीयांना उद्योजकतेस प्रेरणा देणारे, आर्थिक राष्ट्रवाद निर्माण करणारे लेखन यात झालेले दिसते. त्याचबरोबर स्वातंत्र्य उत्तरकालीन भारताची आर्थिक स्थिती, आर्थिक समस्या, आव्हाने यावर प्रकाश टाकणारे लेखन यात झाले. स्वतंत्र भारताची आर्थिक ध्येय धोरणे यावर प्रकाश टाकण्यासाठी हे लेख महत्त्वपूर्ण असून ब्रिटिशकालीन भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वातंत्र्य उत्तरकालीन अर्थव्यवस्थेमध्ये झालेले स्थित्यंतर यातून समजते.
- चित्रमय जगतचे 'चित्र' हे मुख्य वैशिष्ट्य होते. यातील रेखाचित्रे व छायाचित्रे तत्कालीन सामाजिक सांस्कृतिक, राजकीय जीवनाची माहिती देणारे प्राथमिक साधन आहे. स्वातंत्र्य उत्तर काळापासूनच यामध्ये छापलेल्या चित्राचे प्रमाण कमी होत गेले. स्वातंत्र्य उत्तरकाळापासून रेखाचित्राची जागा राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या छायाचित्रांनी घेतलेली दिसते. सचित्र लेखांचे प्रमाण ही कमी झालेले दिसते. या संदर्भात चित्रशाळेच्या इतिहासामध्ये ही उल्लेख आढळतो.
- चित्रमय जगतमधील कथा, कविता, नाट्यलेखन हे जरी साहित्यीकाची अभिव्यक्ती असली तरी तत्कालीन बदलत जाणारे सामाजिक वास्तव, मराठी संस्था संकल्पना यांची माहिती यातून मिळते.
- चित्रमय जगत मधील विनोदी चित्रे तत्कालीन सामाजिक, राजकीय जीवनातील न्युनता, कमतरता, वास्तवता दर्शवितात. विडबंन व उपहास ही त्याची वैशिष्ट्ये दिसतात. ही चित्रे संपादकीय सदरामधून छापली गेली असल्यामुळे यास सर्वस्वी संपादक जबाबदार असे. या चित्रकारांचे फारसे उल्लेख मिळत नाही. तर महायुद्धविषयक विनोदी चित्रे ही आंतरराष्ट्रीय

मासिकातून घेतलेली दिसतात. त्याचा निर्देश चित्राखाली दिलेला दिसतो. सामाजिक, राजकीय, जागतिक घडामोडीतील वास्तवता, गांभीर्य विनोदी उपहासात्मक पद्धतीने दाखवण्याचा प्रयत्न यातून झालेला दिसतो.

- चित्रमय जगतमध्ये कथा, कादंबरी, कविता लिहिणारा वर्ग हा तत्कालीन उच्चविद्याविभूषित व बुद्धीजीवी वर्ग होता. त्यामुळे त्यांचे साहित्यही अभिजन वर्गाचे प्रतिनिधित्व करते. यामध्ये राष्ट्रीय स्वरूपाच्या ज्या कविता छापलेल्या दिसतात, त्यामध्ये राजघराणी व सरदार घरण्यातील वारसदारांनी आपल्या कवित्वाची हौस भागवून घेतलेली दिसते. यातील सर्व कवि व लेखक तत्कालीन साहित्य क्षेत्रामध्ये प्रसिद्धी पावलेले नाव कमवलेली मंडळी होती. त्यामुळे नवोदित बहुजन वर्गातील साहित्यिक व साहित्य यामध्ये दिसत नाही.
- चित्रमय जगतमधील जाहिरातींमधून मराठी लोकांच्या विशेषतः अभिजन वर्गाच्या आवडी निवडी, मनोरंजन, ज्ञानार्जन, सुखसोई, जीवन जगण्याची पद्धती, धार्मिक सामाजिक समजूती, आरोग्य, सौंदर्य विषयक संकल्पना यांचा परिचय होतो. या सर्वांमधून महाराष्ट्राचा आधुनिकतेच्या दिशेने होणारा प्रवास समजण्यास मदत होते.
- ऑगस्ट १९४७ ला भारत स्वातंत्र्य झाला. त्याचबरोबर राजकीय शिक्षण देण्याच्या उद्देश्याने सुरु झालेल्या या मासिकाच्या हेतूचीही फलश्रुती झाली. परंतु एवढी लोकप्रियता मिळवलेले मासिक लगेचच बंद करणे चित्रशाळेच्या विश्वस्तांना पटले नाही. यातूनच चित्रमय जगतचे नवे पर्व सुरु झालेले दिसते.
- स्वातंत्र्य उत्तर काळात नवा हेतू, उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून हे मासिक चालु ठेवण्यात आले. या काळात 'जागतिक घडामोडींची माहिती देणारे राष्ट्रीयवृत्तीचे मासिक' असे त्याचे स्वरूप झालेले दिसते. हा हेतू मुखपृष्ठाच्या आतील पानावर स्पष्टपणे निर्देशित केलेला दिसतो. परंतु याच काळापासून या मासिकाची लोकप्रियता कमी होऊन या मासिकाची अस्ताकडील वाटचालही सुरु झालेले दिसते.
- वाचक वर्गामध्ये ज्या कारणाने हे मासिक लोकप्रिय झाले होते. तो हेतू पूर्ण झाल्याने नव्या रुपातील नव्या उद्देश्याचे मुळ चेहरा बदलेले मासिक वाचकास पचनी पडणे अवघड झालेले दिसते.

- या काळात मासिकाचा आकार, पानांची संख्या व सचित्र लेखन कमी झालेले दिसते. अनेक वेळा जाहिर निवेदन देऊन वर्गणीदारांना चित्रमय जगतच्या अंकाचा दर वाढल्याबद्दल सुचित केलेले दिसते. यामधील जाहिरातींची संख्याही वाढलेली दिसते. जाहिरातीमधून उत्पन्न कमवून मासिकाचा निर्मिती खर्च भागवण्याचा उद्देश व्यावहारिकदृष्टी यामध्ये दिसते.
- या काळात चित्रशाळा छापखान्याच्या विश्वस्त मंडळातील अंतस्थवाद व बिघडलेली आर्थिक स्थितीही चित्रशाळेच्या इतिहास या ग्रंथातून उघडकीस येते. या सर्वांचा परिणाम एकत्रित रित्या होऊन चित्रमय जगत या मासिकाचा अंत झालेला दिसतो. प्रकाशनातील नियमितपणा, दर्जेदार लेख व प्रभावी वितरण सेवा व सचित्र मासिक समालोचन या गुणवैशिष्ट्याने प्रसिद्धीस आलेलेल्या व वाचकवर्गात लोकप्रिय असलेल्या या मासिकाची ही गुण वैशिष्ट्ये लयास गेल्याने अंत झालेला दिसतो.
- हे मासिक पूर्णपणे अभिजन वर्गाने अभिजनवर्गासाठी निर्माण केलेले मासिक होते. या मासिकातील सामाजिक, सांस्कृतिक लेखांचे परिक्षण करता हे ठामपणे म्हणता येईल. याचे स्वरूप सर्व संग्राहक असले तरी यात राजकीय लेखनास विशेष प्राधान्य देण्यात आले होते.
- चित्रमय जगतमधील चित्रे, खास अंक, संपादकीय सदर व जागतिक घडामोडीची सदर यामुळे इतर मासिकापेक्षा त्याचे वेगळेपण सिद्ध होते आणि हे वेगळेपणच त्याच्या प्रसिद्धीचे व दीर्घायुषीपणाचे रहस्य होते.

अशा प्रकारे वरील निष्कर्षावरून चित्रमय जगतचे मराठीतील पहिले सचित्र व सर्व संग्राहक म्हणून स्थान निश्चित होते. भारतीयांना राजकीय शिक्षणाचे धडे देण्याचे कार्य व उत्तरार्धात जगातिक घडामोडींची माहिती देण्याचे कार्य 'राष्ट्रीय हेतूने' केलेले दिसते. बदलता महाराष्ट्र व आधुनिकतेच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल समजून घेण्यासाठी हे मासिक अत्यंत महत्वपूर्ण असे इतिहासाचे साधन ठरू शकते हे यातून स्पष्ट होते.

*****

# संदर्भग्रंथ सूची


## प्राथमिक साधने

अ) चित्रमय जगत मासिकाचे मूळ अंक, इ. स. जाने १९१० ते जाने. १९६८.

आ) प्रकाशित मराठी साधने

१. कानिटकर रा. प्र., 'चित्रशाळेचा इतिहास (१८७८ ते १९७३)',वासुकाका जोशी विश्वस्त निधी, पुणे, १९७५.

२. कानिटकर रा. प्र., 'देवगिरीकरांचे चरित्र', महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे, १८८१.

३. दत्तोपंत आपटे स्मारक मंडळ (संपा.), 'दत्तोपंत आपटे लेखसंग्रह', अनाथ विद्यार्थीगृह प्रकाशन, पुणे १९४५.

४. देवगिरीकर त्र्यं. र., 'वासुकाका जोशी व त्यांचा काळ', चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९४८.

## दुय्यम साधने

### अ) मराठी ग्रंथ

१. कानडे रा. गो., 'मराठी नियतकालिकांचा इतिहास (१८३२–१९३६)', कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९८८.

२. कुबेर डॉ. वा. ना., 'भारताचा स्वतंत्र लढा : १९३०–३४', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.

३. कुलकर्णी अ. रा., 'मराठ्यांचे इतिहासकार', डायमंड पब्लिकेशन, पुणे, ऑक्टो. २००७.

४. कुलकर्णी अ. रा., 'शिवकालीन महाराष्ट्र', राजहंस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, २००४.

५. कुलकर्णी व. दि., 'मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास १९३२ ते १८८२', खंड–१, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, १९८७.

६. केळकर न. चि., 'लोकमान्य टिळक यांचे चरित्र', खंड–१,२,३, वरदा बुक्स, पुणे, १९८८.

७. केळकर श्रीपाद, ‘छोडो भारत–१९४२’, दुसरी आवृत्ती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे २००३.

८. कंटक प्रेमा, ‘सत्याग्रही महाराष्ट्र’, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १९४०.

९. खरे ग. ह., कुलकर्णी अ. रा., ‘मराठ्यांचा इतिहास’, खंड–३, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६.

१०. चिटणीस कृ. ना., ‘मध्ययुगीन भारतीय संस्था व संकल्पना’, खंड १ ते ४, प्रकाशन सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे, १९८७.

११. चौधरी डॉ. के. के., ‘झुंजार पुणे’, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, २००८.

१२. जावडेकर आचार्य शं. द., ‘आधुनिक भारत’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९.

१३. जोगळेकर ग. ना. (संपा.), ‘मराठी वाङ्मयाचा अभिनव इतिहास (काही लेखक, काही साहित्यकृती) १८००–१९२०’, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९५.

१४. जोशी वि. कृ., लेले रा. के., ‘वृत्तपत्रांचा इतिहास’, युगवाणी प्रकाशन, मुंबई, १९५१.

१५. जोशी शं. ना., ‘मराठेकालीन समाजदर्शन’, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९६०.

१६. दत्त रजनी पाम (मुळ लेखक), य. ना. देवधर (अनु.), ‘आजकालचा भारत’, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६.

१७. दाते शंकर गणेश, ‘मराठी नियतकालिकांची सूची’, खंड–३, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९८१.

१८. दीक्षित म. श्री., ‘१९ व्या शतकातील महाराष्ट्र : एक दृष्टीक्षेप’, प्रकाशन म. श्री. दीक्षित, पुणे, १९८६.

१९. दीक्षित राजा, इतिहास : समाजविचार आणि केशवसुत, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९३.

२०. दीक्षित राजा, ‘एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र : मध्यमवर्गाचा उदय’, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे, २००९.

२१. देशमुख उषा मा., ‘मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास’, खंड–१,२,३, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९४.

२२. पंडित नलिनी, ' महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, तृ. आ., २०००.
२३. पंडीत भवानीशंकर, 'महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे', पुणे विद्यापीठ, पुणे, १९६८.
२४. पेंडसे श. दा., 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास', सुविचार प्रकाशन, नागपूर, चौथी आवृत्ती, १९६५.
२५. फडके य. दि., 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', खंड ३,५,६,७,८, मौज प्रकाशन, मुंबई, २००४.
२६. फाटक न. र., 'आर्वाचीन महाराष्ट्रातील सहा थोर पुरुष', मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९६७.
२७. बेडेकर भणगे, 'भारतीय प्रबोधन', समाज प्रबोधन संस्था, पुणे, प्र. आ., १९७३.
२८. भावे वा. कृ., 'पेशवेकालीन महाराष्ट्र', भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, १९७६.
२९. भावे वि. ल., 'महाराष्ट्र सारस्वत', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती, १९९२.
३०. माटे म. श्री., 'मध्ययुगीन महाराष्ट्र', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००१.
३१. माडखोलकर ग. त्र्यं. 'विष्णु कृष्ण चिपळुणकर काल आणि कर्तृत्व', ठाकुर आणि कंपनी, अमरावती, १९५४.
३२. वैद्य कोठेकर, 'महाराष्ट्रातील काँग्रेसचा लढा', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९८५.
३३. साने रवि किरण, 'लढा संयुक्त महाराष्ट्राचा', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९.
३४. सरदार गं. बां, 'प्रबोधनातील पाऊलखुणा', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९७.
३५. सरदार गं. बा. (संपा.), 'महाराष्ट्र जीवन परंपरा : प्रगती आणि समस्या', जोशी लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६०.
३६. सहस्त्रबुद्धे पु. ग., 'महाराष्ट्र संस्कृती', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७५.

## इंग्रजी संदर्भ ग्रंथ

१. Bipin Chandra (etal), 'Indiasstrugale for indedendence : 1857-1947', pen guin book, Delhi, 1989.
२. Desai A. R., 'Social Background of Indian Nationalism', Popular Prakashan, Bombay, 1976.
३. Mujumdar R. C., 'History of the freedom in India', vol, I, II, K. L. Mukhopadhyay, Calcutta, 1971.
४. MukerjeeHiren, 'Indian Renaissance and Raja Ram Mohan Roy', Pune University, Pune, 1975.
५. SarkarSumit, 'Modern India 1885-1947', Macmillan India Limited, 1983.


## इतर मासिके

१. ‘करमणूक’, १८९० ते १९१७.
२. ‘किर्लोस्कर’, १९३०.
३. ‘सह्याद्री’, १९३५ ते १९७७.
४. ‘मनोरंजन’, १८९५ ते १९३५.

## वृत्तपत्रे

१. काळ,पुणे.
२. केसरी,पुणे.

## परिशिष्ट–१
## चित्रमय जगत मासिकाच्या पहिल्या अंकाचे मुखपृष्ठ



# परिशिष्ट–२



चित्रमय जगतचे संस्थापक – वासुकाका जोशी




चित्रमय जगतचे संपादक

# परिशिष्ट–३
## निवडक चित्रमय जगत मासिकाची मुखपृष्ठे



# परिशिष्ट–४
## निवडक चित्रमय जगतच्या विशेषांकांची मुखपृष्ठे


























# परिशिष्ट ५
# चित्रमय जगत मधील निवडक रेखाचित्रे


















# परिशिष्ट ६
# चित्रमय जगत मधील निवडक युद्धविषयक चित्रे














# परिशिष्ट ७
# चित्रमय जगत मधील निवडक व्यंग्य  चित्रे

























